म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६९
REFBK-0001238

ठाणे



सौ. पार्वतीबाई चिटनवीस.

मुक्त
म. ग्रं. सं. ठाणे.

# आमचा जगाचा प्रवास.

स. ग्रं. १८.१२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

हें

पुस्तक

सौ. पार्वतीबाई चिटनवीस,

छिंदवाडा, (सी. पी.)

यांनीं लिहिलें व प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

मुंबई येथें 'मनोरंजन' छापखान्यांत छापिलें.

REFBK-0001238

किंमत १-४-०.

Printed by Kashinath Raghunath Mitra, at the Manoranjan Press,
1., Girgaon Road, Bombay;
Published by Mrs. Parwatibai Chitnavis, Dy. Commr's Bungalow,
Chhindwara, C. P.

# प्रस्तावना.

पहिल्यानें आह्मांला सन १९०१ मध्यें विलायतेला जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं आह्मी इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, बेलज्यम, जर्मनी, इटली आणि इजिप्त हे देश पाहिले. या प्रवासाचें वृत्त लिहिण्याचा मीं प्रयत्न केला होता; पण कांहीं कारणांमुळें तो अपुराच राहिला. पुढें सन १९१० च्या शेवटीं एक वर्षाची रजा घेण्यांत आली. तींत जगाचा प्रवास करण्याचें आह्मीं योजिलें व ईशकृपेनें तें निर्विघ्नपणें पार पडलें.

आमच्या या जगाच्या प्रवासाचें वृत्त माझ्या अल्पमतीला सुचलें तसें या पुस्तकांत लिहिलें आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व इतर घरगुती अडचणींमुळें तें पुरें करण्याला फार अवकाश लागला, व त्यामुळें तें प्रसिद्ध करूं नये, असेंहि एकवार वाटत होतें; परंतु 'कांहींच न करण्यापेक्षां उशिरां झालें तरी हरकत नाहीं,' या वचनाप्रमाणें किंचित् उशिरां कां होईना, आज तें प्रकाशित करीत आहें.

पुस्तक लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असून माझ्या प्रवास-वृत्तांत पुष्कळ उणिवा राहिल्या आहेत, हें मी पुरतेपणें जाणून आहें. विस्तारभयास्तव लोकस्थितीविषयीं माझे स्वतःचे विचार मीं दिले नाहींत, व वृत्त फार त्रोटक झालें आहे. तरी सुज्ञ वाचक यांतील उणिवींकडे दुर्लक्ष्य करितील अशी आशा करितें.

मु. छिंदवाडा. पार्वतीबाई चिटणवीस.



शंकर माधव चिटनवीस.

# ...चा जगाचा प्रवास.

## प्रकरण पहिलें.

## मुंबईहून प्रयाण.

इसवी सन १९०१ सालीं आह्मीं पहिल्याप्रथम इंग्लंडचा प्रवास केला, आणि तो दूरचा पहिलाच प्रवास ह्मणून आह्मांला बराच कठिण वाटला; परंतु तेव्हांपासून पुन: एकदां जपान, अमेरिका वगैरेंकडून फिरून यावें, असें आमच्या मनांत घोळत होतें. त्याप्रमाणें तारीख १८ नोव्हेंबर १९१० पासून एक वर्षाची रजा घेण्यांत आली, आणि जपान वगैरे जगाच्या पाठीवरील दुसरे देश पाहून येण्याचा विचार आह्मीं कायम केला.

तारीख २६ फेब्रुआरी रोजीं सकाळीं १०वाजतां आह्मी बॅलर्डपायरवर आलों. त्यापूर्वी पंधरा दिवस आह्मी आमच्या लांबच्या प्रवासाचे कपडे वगैरेंची तयारी करण्याकारितां मुंबईला येऊन राहिलों होतों. तरी पण आयत्या वेळीं थोडीशी गडबड झालीच! आमचें सामान लवकर जावें, आणि आह्मांला त्रास होऊं नये, ह्मणून निघण्यापूर्वी सुमारें अर्धा तास आधीं सामान रवाना केलें; पण आमच्या नोकरांनां आणि गाडीवाल्याला काय वाटलें कोण जाणे, त्यांनीं आमचें सामान भलतीकडेच नेलें. आह्मी व आह्मांला पोहोंचवावयाला आलेली मंडळी बंदरावर आलों,तरी आमच्या सामानाचा ठिकाण नाहीं! आतां काय करावें? सामान गेलें तरी कोठें? सर्व पॅसेंजर आले व सर्वांचें सामानहि भराभर जाऊं लागलें. डॉक्टरची तपासणी सुरू झाली—तरी आमच्या सामानाचा ठिकाण नाहीं! सामान वेळेवर नाहीं आलें, तर आह्मी जाणार कशीं? आह्मी दोघेंहि एकमेकांवर रागावूं लागलों. मी ह्मणूं लागलें "नोकराला बरोबर सांगितलें कां नाहीं? तो अडाणी मनुष्य हें माहीत का नव्हतें?" ते ह्मणूं लागले "तुह्मींच त्याला अपालो बंदरवर नेण्याला सांगितलें असेल!"

शेवटीं आमचा पुतण्या, जांवई आणि पोहोंचवावयाला आलेले दुसरे एक गृहस्थ व्हिक्टोरियांत बसून चौकशी करूं लागले. एकदाचें सामान आलें. तें येऊन इतर पॅसेंजर मंडळीबरोबर आह्मी लहान बोटींत जाऊन बसलों; परंतु त्या घाईंत पोहोंचवावयाला आलेल्या मंडळीचा आह्मांला निरोप घेतां आला नाहीं. कारण, आमच्या सामानाचा पत्ता लावावयाला गेलेली मंडळी आह्मी निघण्याच्या वेळीं परत आली नव्हती. निघतांना त्यांचा निरोप घेतां आला नाहीं, याबद्दल फार वाईट वाटलें. ते परत आले, तेव्हां त्यांना बोटीजवळ येण्याची मनाई झाली होती. ती मंडळी दूर उभी राहून हातांनीं आह्मांला खुणा करीत होती. आमचे मित्र तात्यासाहेब खारकर यांनीं चांगले सुवासिक फुलांचे दोन हार आमच्याकरितां आणले होते, तेहि आमच्या सामानाच्या गडबडींत त्यांना देतां आले नाहींत, ह्मणून ते त्यांनीं एका शिपायाबरोबर आमच्याकडे बोटीवर पाठवून दिले. आमची बोट धक्क्याजवळ बराच वेळ उभी होती, पण इतरांना बोटीजवळ येण्याची परवानगी मिळेना. शेवटीं आमचा पुतण्या व जांवई एका लहान होडींत बसून आमच्या बोटीजवळ आले; पण तितक्यांत बोट दोनतीन मिनिटांनीं निघणार तों सर्वांनाच बोटी-जवळ येण्याची परवानगी मिळाली, व आमच्या दोघी भाच्या व इतर मंडळी सर्वच धक्क्याजवळ आली. आमची फार जुनी मोलकरीण कुशी फारच रडूं लागली, आणि आमच्या भाच्याहि रडूं लागल्या. मलाहि पण त्या सर्वांना सोडून जाणें मोठें कठिण वाटूं लागलें, व एकसारखें डोळ्यांना पाणी येऊं लागलें. मी आमच्या पुतण्याला सर्वांचा सांभाळ करण्याबद्दल व पत्र पाठविण्याबद्दल सांगत आहें, इतक्यांत बोट निघाली.

आतां आमचें लक्ष्य मोठ्या बोटीकडे लागलें. ही बोट धक्क्यापासून अर्ध्याएक मैल अंतरावर उभी होती. मोठमोठे दोर घेऊन खलाशीलोक तयारच होते. त्यांनीं आमची लहान बोट मोठ्या बोटीला बांधली आणि लांकडी शिड्या लावून जिना तयार केला. डॉक्टरचा पास दाखवून

## मुंबईहून प्रयाण.

आह्मी मोठ्या बोटीवर चढलों. ही पी. ॲंड् ओ. कंपनीची 'देवाना' नांवाची बोट चांगल्या आणि मोठ्या बोटींपैकीं एक होती. मुंबईपासून आमच्याबरोबर फारसे पॅसेंजर दिसले नाहींत. फक्त दोनतीन पारशी जोडपीं, आणि पंचवीसतीस यूरोपियन पुरुषबायका मिळून असतील. त्यांच्यापैकीं बहुतेक सेकंडक्लास पॅसेंजरच होते. एकच यूरोपियन बाई व सातआठ पुरुष मंडळी व आह्मी उभयतां इतकींच काय तीं फर्स्ट क्लास-मध्यें होतों. आमचें कॅबिन मधल्या मजल्यावर असून लहानसेंच होतें. फारसें हवाशीरहि नव्हतें. तीनचार बिछान्यांचीं कॅबिन्स जिकडेतिकडे रिकामीं पडलेलीं दिसत होतीं. हीं सर्व रिकामीं कॅबिन्स पाहून आह्मांला मोठें आश्चर्य वाटलें. कारण, कुक कंपनीनें कितीतरी गप्पा मारल्या होत्या. 'फार गर्दी आहे—तुह्मांला खरोखरच जावयाचें असेल तर लवकर आह्मांला पक्कें सांगा, नाहींतर मागाहून जागा मिळणार नाहीं!' त्यांच्या या सांगण्या-प्रमाणें आह्मी नोव्हेंबरपासूनच तिकिटें घेऊन ठेविलीं होतीं. असो. या रिकाम्या खोल्या पाहून आह्मांला वाटलें, कीं, एकादें तीन बिछान्यांचें कॅबिन आह्मांला दिलें असतें, तर काय झालें असतें? उगीच रिकामीं तर पडलीं आहेत! आह्मांला पुढील भविष्य कोठें माहीत होतें, कीं, सध्याचें मिळालेलें कॅबिनहि लवकरच जाणार आहे ह्मणून! कॅबिनमध्यें सामान वगैरे बरोबर आलें किंवा नाहीं तें पाहून आह्मी खालीं लंच घेण्याला गेलों, इतक्यांत आमची बोट निघाली.

समुद्र चांगला शांत होता आणि त्यामुळें बोट म्हणण्यासारखी कांहीं हलत नव्हती. तथापि माझें डोकें सारखें भणभण करीत होतें. मग हे पहिलेच दोनतीन दिवस होते, आणि बोटीची चांगली सवय झाली नव्हती, म्हणून कीं काय कोण जाणे. डेक्वर, ड्रॉइंगरूममध्यें किंवा कॅबिनमध्यें कोठेंच चैन म्हणून पडेना. जीवाला बरें नसलें म्हणजे मना-मध्यें नाना तऱ्हेच्या कल्पना उठतात, व डोकें अधिक भणाणून जातें, त्याप्रमाणें माझी स्थिति झाली होती. एवढ्या मोठ्या फर्स्ट क्लासमध्यें काय

ती मी एकटीच स्त्री ! बाकीची सर्व पुरुषमंडळी. एक यूरोपियन बाई होती, पण ती आपलें खाणेंपिणें वगैरे कॅबिनमध्येंच करीत असे. ह्मणून बोटीवर कांहींच करमणूक नव्हती.माझ्या मनामध्यें असा विचार येई,कीं, एवढा मोठा जगाचा प्रवास करावयाचें आह्मीं डोक्यावर घेतलें आहे, पण तें कसें काय ईश्वर पार पाडील कोण जाणे !

या 'देवाना' बोटीवरील आमची स्टुअर्डेस फार चांगली बाई होती. मी बोटीवर आलें तों ती मजकडे येऊन ह्मणाली "मॅडम, तुह्माला कांहीं लागलेंसवरलें तर मला सांगा, व कपडे वगैरे घालतांना मदत पाहिजे असल्यास हांक मारा; आणि तुमची इच्छा असेल तर तुमचें खाणेंपिणें तुमच्या खोलींतच आणून देईन." हें तिचें कामच होतें ह्मणा; पण एकंदरींत ती चांगल्या स्वभावाची दिसली. सकाळीं साडेसात झाले, कीं, दरवाज्यावर ठक्ठक् ठोके बसावयाचे, व 'कम् इन्' ह्मटलें, कीं, ही बाई आंत येऊन एक कप चहा, कांहीं फळें आणि चारपांच बिस्किटें आणून ठेवावयाची. तो चहा व बिस्किटें पाहिलीं, कीं, माझें डोकें तर अधिकच दुखावयाला लागे ! कारण, तोंड धुणें नको कांहीं नको—तसा तो बिछा-न्यांतल्या बिछान्यांत चहा घेणें कोणाला बरें वाटेल ? तशी साहेब-लोकांनां सवय असते. ते जागे झाले, कीं, बिछान्यांतच चहा घेऊन मग बिछान्याबाहेर पाय टाकतात. चहा तुह्मी घ्या कीं नका घेऊं, ती बिचारी आपलें काम करीत असे.

आतां उद्यां कोलंबो येणार, आणि मग एकदोन दिवस तरी जमिनी-वर रहावयाला मिळेल, या आशेनें मनाला थोडें समाधान वाटूं लागलें. संध्याकाळचे सुमारें पांच वाजले होते, व समुद्र अगदीं शांत दिसत होता. सूर्यबिंब हळुहळू अस्त पावत होतें, व तीं सूर्याचीं मावळतीं किरणें मंदमंद होत चाललीं होतीं. बोटीच्या पुढच्या टोंकाकडे डेक्वर आह्मी दोघें आणि आमचा एक अमेरिकन पॅसेंजर सोबती ती संध्या-काळची सूर्यास्तसमयाची समुद्राची शोभा पहात उभीं होतों. बोट आपला

मार्ग क्रमीतच होती. बोटीच्या खालील पंख्याच्या जोरानें समुद्राचें पाणी सारखें घुसळलें जात होतें, आणि त्याच्या पांढऱ्या शुभ्र फेंसाळ लाटा बोटीच्या दोन्ही बाजूंनीं वाहेर येत होत्या. नंतर त्यांचे रंग पांढरे, निळे, भुरके असे होतहोत समुद्रांत मिसळत होते. या टोंकाकडेच तिसरा क्लास होता. त्यांत सुमारें शंभरदीडशें पॅसेंजर होते. हे बहुतेक गोंव्याकडील मुसलमान व कांहीं गरीब ख्रिश्चन लोक होते. हे लोक कोलंबो, सिंगापूर वगैरेंकडे जात असावेत. या वेळीं त्यांचीं संध्याकाळचीं जेवणें चाललीं होतीं. प्रत्येकाच्या पुढें एकएक लहान जस्ताचें ताट व तसेंच पाणी पिण्याचें एक टमरेल होतें. ताटामध्यें भाताचा ढीग आणि त्याच्या डोक्यावर दोनदोन पळ्या मांसाची आमटी. पण बिचारे आनंदानें हंसत खेळत जेवीत होते. तो एक मोठा विलक्षण देखावा दिसत होता.

आमचा अमेरिकन सोबती हिंदुस्तान वगैरेंकडून प्रवास करून परत चालला होता. त्याला कांहीं हिंदुस्तान आवडलें नाहीं, असें दिसलें. त्याचें ह्मणणें, अमेरिकेसारखा सुखसोईचा जगांत दुसरा देशच नाहीं! "आमच्या आगगाड्या किती सोईच्या व आरामाच्या असतात! बोटींतून किती उत्तम व्यवस्था असते! हॉटेलें किती चांगलीं! तुमच्या हिंदुस्तानच्या आगगाड्या अगदीं भिकारड्या! इकडील पहिल्या क्लासच्या डब्यांसारखे आमच्याकडे तर कुत्रे भरण्याचे डबे असतात!" या अमेरिकनबुवांच्या गोष्टी ऐकून आह्मांला मोठें आश्चर्य वाटे, व मनाला एकप्रकारचें समाधान वाटे, कीं, असा चांगला देश पाहण्याला आपण जात आहों.

असें आमचें बोलणें चाललें आहे, इतक्यांत बोटीचा कॅप्टन तेथें आला, व " तुमच्या प्रकृति कशा काय आहेत, तुह्माला जलप्रवास आवडतो किंवा नाहीं, आतां आपण कोलंबोजवळ आलों आहोंत; उद्यां सकाळीं आठनऊ वाजतां कोलंबोला बोट जाईल, एकदोन दिवस तेथें राहील," असें ह्मणाला. हा कॅप्टन फार चांगला मनुष्य होता; सर्व पॅसेंजर्सशीं चार गोड शब्द बोलून तो सर्वांचा समाचार घेत असे.

जेवण वगैरे आटोपल्यावर नवांच्या सुमाराला आह्मी आमच्या कॅबिनकडे गेलों, तों तेथें दरवाज्याशींच आमचा स्टुअर्ड उभा होता. तो पुढें येऊन ह्मणाला "महाराज, आपल्याला उद्यांपासून हें कॅबिन बदलावें लागेल."

"कां बरें?" आह्मीं दोघांनींहि आश्चर्यानें विचारलें. "कुकनीं तर कधींपासूनच हें कॅबिन आमच्या नांवावर पक्कें केलें आहे, व आमच्या तिकिटावरहि याच कॅबिनचा नंबर आहे. असें असतांना मध्येंच हा काय घोटाळा? बरें, आह्मांला दुसरें कॅबिन द्याल तें यापेक्षां वाईट नका देऊं ह्मणजे झालें. मग आमची कांहीं तक्रार नाहीं."

त्या बिचाऱ्याला तरी या गडबडीची काय माहिती असणार? तो आपला हुकमाचा ताबेदार. तो ह्मणाला "माझ्याकडून होईल तितकें करून तुमच्याकरितां हेंच कॅबिन ठेवण्याचा प्रयत्न करीन उद्यां इंग्लंडकडून मंगोलिया बोट येणार आहे, आणि त्या बोटीवरील शंभरदीडशें पॅसेंजर्स या बोटीवर येतील. त्यामुळें येथें फार गर्दी होईल व आपल्याला या कॅबिनपेक्षां चांगलें कॅबिन मिळणें कठिण आहे."

## कोलंबो.

तारीख ३ मार्च १९११ रोजीं सकाळीं आठ वाजतां आमची 'देवाना' बोट कोलंबो बंदरांत आली. बोटीवर आह्मी थोडेच पॅसेंजर्स असल्यामुळें फारशी गडबड दिसत नव्हती. ब्रेकफास्टनंतर आह्मी फर्स्टक्लास व सेकंडक्लासचे पॅसेंजर वरती ड्रॉइंगरूममध्यें जमा झालों. नंतर डॉक्टरनीं येऊन सर्वांकडे पाहिलें व सर्वांनां एक एक पास दिला, व किनाऱ्यावर जाण्याची मोकळीक केली. आह्मीं आपले थोडेसे—एक दिवसापुरते कपडे वगैरे घेऊन बाकीचें सामान स्टुअर्डच्या स्वाधीन केलें, व कुकच्या लहान बोटींतून किनाऱ्यावर गेलों. तेथें बरेचसे रिकशॉ उभे होते. या रिकशांमध्यें एकाला बसण्यापुरती जागा असते, व एक किंवा दोन मनुष्यें तो ओढीत नेतात. अशा गाड्या आपल्याइकडे मुंबई, पुणें, कलकत्ता वगैरे शहरीं

बिलकूल दिसत नाहींत. दार्जिलिंग, सिमला, मद्रासइकडे मात्र बऱ्याच आहेत. आह्मी या रिकशांत बसून किनाऱ्याजवळील एकदोन हॉटेलमध्यें गेलों, परंतु तेथें एकहि खोली रिकामी नव्हती, ह्मणून रिकशावाल्यांनीं आह्मांला ब्रिस्टल हॉटेलमध्यें नेलें. हें हॉटेल समुद्रकिनाऱ्यापासून अर्ध्याएक मैलावर आहे. या हॉटेलमध्यें क्लार्क वगैरे बरेच सिंगालियन नोकर दिसले. हे लोक मद्रासी लोकांसारखेच काळे असून यांचा पोषाखहि कांहींसा तसाच असतो; परंतु यांची सिंगालियन भाषा वेगळीच आहे. येथील हमाल, कुली, रिकशावाले, गाडीवाले वगैरे अशिक्षित लोकसुद्धां मोडकीतोडकी इंग्रजी भाषा बोलून आपलें काम चालवीत असतात. मग हॉटेलच्या ऑफिसमधील एक क्लार्क आह्मांला पाहून ह्मणाला "दोघांची खोली आहे, परंतु पंचवीस रुपये रोज द्यावा लागेल! बरें, पण तुह्मी आमचे देशबांधव दिसतां, तेव्हां तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तुह्मांला वीस रुपयांलाच देतों!"

या त्याच्या गप्पा आह्मांला समजल्या; परंतु रूढीप्रमाणें त्याला थँक्स देऊन आंह्मी आपल्या खोलींत गेलों.

दुपारचे दोन वाजण्याचा सुमार झाला होता. बाहेर ऊन कडक पडलें होतें. परंतु आह्मांला समुद्रांत बोटीपेक्षां येथें जमिनीवरच कितीतरी बरें वाटलें. कपडे वगैरे अस्ताव्यस्त टाकून आणि बारीक साधे कपडे घालून आह्मी विजेच्या पंख्याखालीं पलंगावर पडलों. या वेळीं उन्हाळ्याला नुकताच कोठें प्रारंभ झाला होता, व एव्हांपासूनच इकडे इतकी उष्णता असावी, याचें आह्मांला आश्चर्य वाटूं लागलें.

आह्मी कांहींशीं झोंपेच्या गुंगींत व कांहींशीं आळसांत होतों, तों दरवाज्यावर ठक्‌ठक् ठोके ऐकूं आले. "या आंत," अशी परवानगी मिळतांच एक साहेब आमच्या दोन्ही पलंगांच्यामध्यें येऊन उभा राहिला. त्याला पाहून मला तर कसेंसेंच वाटलें. कारण, दरवाज्यावर ठोठावलें तेव्हां आह्मांला वाटलें, कीं, कोणीतरी हॉटेलचा नोकर असेल, ह्मणून

त्याला आंत येण्याची आह्मीं परवानगी दिली; परंतु पहातों तों हा साहेब! तो कायसें इंग्लिशमध्यें सांगून निघून गेला. पंख्याच्या घरघरण्यामुळें मला तें नीटसें ऐकूं आलें नाहीं. तो निघून गेल्यावर हेहि पण लागलीच उठले, व गडबडीनें कपडे घालूं लागले. हें आहे तरी काय गौडबंगाल—मला कांहींच समज पडेना! मी आपली एकसारखी विचारूं लागलें "कोण हा मनुष्य? काय त्यानें सांगितलें? एवढ्या गडबडीनें कोठें चाललांत?"

"तो आपला कॅबिनचा स्टुअर्ड. त्यानें मला येऊन सांगितलें, कीं, 'पहिल्या क्लासमध्यें आपल्याकरितां कांहीं कॅबिन राहिलें नाहीं, तेव्हां आपल्याला दुसऱ्या क्लासच्या कॅबिनमध्यें जावें लागेल.' ह्मणून त्या बिचाऱ्यानें येऊन सूचना दिली, कीं,'येथें पी. अँड ओ. कंपनीचें ऑफिस आहे, तर त्यांच्याकडे जाऊन पहा कांहीं होईल तर, आणि कुक कंपनीच्याहि ऑफिसमध्यें जाऊन पहा.'"

"असें का? हा त्याचा मोठा चांगुलपणा समजला पाहिजे, कीं, दोन-तीन हॉटेलें शोधीत येऊन त्यानें आपल्याला खबर दिली. नाहींतर त्याला काय एवढी जरूर पडली होती?"

मी अशी कांहीं बोलत आहें, तों तितक्यांत ते निघूनहि गेले. सुमारें पाऊणएक तासानें परत आले; परंतु चेहऱ्यावर राग, तिरस्कार वगैरेंचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. काय झालें, काय नाहीं, हें जाणण्याची जरी मला अत्यंत उत्कंठा लागली होती, तरी चर्येवरील तीं रागाचीं चिन्हें पाहून एकदम विचारण्याला मी धजलें नाहीं. मनाला थोडासा धीर आणला, कीं, कांहीं वेळानें आपोआप कळेलच! पण माझ्या उतावळ्या स्वभावाला कोठला फार वेळ धीर निघायला? मी आपली हळुहळू विचारण्यास सुरुवात केलीच "मग काय—आपणांला सेकंड क्लासच्याच कॅबिनमध्यें गेलें पाहिजे वाटतें?"

"होय! गेलें पाहिजे, नाहीं तर काय करणार? तुह्माला येथें रहावयाचें असेल तर रहा आणखी पंधरा दिवस दुसरी बोट येईपर्यंत.

ते ह्मणतात 'दुसऱ्या बोटींतहि पहिल्या क्लासचें कॅबिन मिळेलच, अशी आह्मी खात्री देऊं शकत नाहीं. त्यांच्या दोन अटी आहेत. 'एक तर तुह्मीं सेकंड क्लासच्या कॅबिनमध्यें निजण्यापुरतें जावें; बाकी तुमचें जेवण-खाण, वसणेंउठणें सर्व फर्स्ट क्लासमध्यें करावें; किंवा तुह्मांला हें कबूल नसेल व फर्स्ट क्लासचेंच कॅबिन पाहिजे असेल, तर तुमच्या बायकोनें इतर बायांबरोबर एकाद्या कॅबिनमध्यें जावें, व तुह्मीं पुरुषांच्या कॅबिन-मध्यें जावें. कारण, फर्स्ट क्लासमध्यें स्वतंत्र कॅबिन तुह्मां दोघांनां आह्मी देऊं शकत नाहीं, याबद्दल आह्मांला फार वाईट वाटतें. अथवा तुमची इच्छा असेल, तर तुह्मीं सेकंडक्लास पॅसेंजर व्हावें; तुमचे फर्स्ट क्लासचे पैसे परत मिळतील. तुमच्यासारखे आणखी दोघेतिघे फर्स्टक्लास पॅसेंजर आह्मांला सेकंड क्लासमध्यें पाठवावे लागले. तर आतां तुह्मांला काय कबूल आहे तें कळवा, ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करूं.' कुकच्या ऑफिसांतहि मी गेलों होतों, पण ते बेटे कानावर साफ हात ठेवितात, व ह्मणतात, कीं, 'मुंबईच्या ऑफिसवाल्यांनीं काय केलें तें आह्मांला माहीत नाहीं. आह्मी आतां कांहीं करूं शकत नाहीं. तुह्मींच परभारें त्यांनां लिहा!' सांगा आतां काय करावयाचें तें? ह्मणजे त्याप्रमाणें त्यांनां कळवितों. कारण, तुमचा पूर्वींपासून हेका आहे, कीं, तुह्मी बोटीच्या सेकंड क्लासमधून कधीं जाणार नाहीं, ह्मणून एवढा विचार. मला तर सेकंड क्लासमधून जाण्याला कांहीं हरकत वाटत नाहीं!"


मीं ह्मटलें "माझा हेका ह्मणून कांहीं नाहीं! पण मीं ऐकिलें आहे, कीं, सेकंड क्लासचीं कॅबिनस् अगदीं लहान बिळासारखीं असतात, व खाण्यापिण्याची वगैरे चांगली व्यवस्था नसते. तसेंच सेकंड क्लास, बोटीच्या मागच्या टोंकावर असल्यामुळें तो भाग बराच हलतो. समुद्र-प्रवासाला आधींच मी कच्ची आहें, आणखी या हलण्यानें अधिकच त्रास होणार; पण आतां प्रसंगच आला आहे तर काय करावयाचें? येथें तरी आठपंधरा दिवस राहून काय करणार? आणखी येथें दिवस

मोडल्यानें आपला पुढील कार्यक्रम बिघडेल. ह्मणून आपल्याला आतां ही बोट गमावितां उपयोगी नाहीं. ज्याअर्थी आपण एवढ्या दूरच्या प्रवासाला निघालोंच आहों, त्याअर्थी आतां जे जे कांहीं प्रसंग येतील, त्यांनां सादर झालेंच पाहिजे! आतां सेकंड क्लास असो, कीं थर्ड क्लास असो, आपल्याला गेलें तर पाहिजेच."

अशा कांहीं धीराच्या व समाधानाच्या गोष्टी मीं सांगितल्या, तेव्हां राग थोडासा शांत झाल्यासारखा दिसला. नंतर आह्मीं ठरविलें, कीं, उद्यां लवकरच बोटीवर जाऊन सेकंड क्लासची कशी काय व्यवस्था असते ती स्वत: पाहून यावें, आणि मग आपल्याला जें सोईस्कर वाटेल तें ठरवावें.

नंतर स्नानें वगैरे करून संध्याकाळीं सुमारें पांच वाजतां हॉटेलच्या मार्फत एक घोड्याची गाडी ठरविली, व कोलंबोमध्यें ज्या कांहीं पाहण्याजोग्या जागा असतील तिकडे आह्मांला घेऊन जाण्याविषयीं गाडीवाल्याला सांगून आह्मी निघालों. कोलंबोमध्यें पाहण्याजोगें विशेष असें फारसें कांहीं नाहीं. सिलोनमध्यें दालचिनी, लवंगा वगैरेंचे मोठमोठे बगीचे असल्याचें आह्मीं ऐकिलें होतें. तेव्हां येथेंहि तसे कांहीं असतील, असें वाटून आह्मांला दालचिनीच्या बगीच्यांत नेण्याविषयीं आमच्या गाडीवाल्याला आह्मीं सांगितलें. त्याप्रमाणें गाडीवाल्यानें आह्मांला एका मोठ्या थोरल्या मैदानांत नेलें, आणि "हाच दालचिनीचा बगीचा." असें तो ह्मणाला. "येथेंच कांहीं वर्षांपूर्वी मोठी दालचिनीची राई होती; परंतु सरकारानें अलीकडे सर्व झाडें तोडून टाकिलीं आहेत. तुह्मांला दालचिनी, लवंगा यांचीं रानें पहावयाचीं असतील, तर कोलंबोच्या बाहेर दहावीस मैलांवर गेलें पाहिजे, ह्मणजे सिलोनची कांहींतरी शोभा दिसेल. निदान तुह्मीं कँडीला तरी गेलें पाहिजे, ह्मणजे तुह्मांला सिलोनची थोडीबहुत कल्पना होईल."

कांहीं वेळ समुद्रकिनाऱ्यानें इकडेतिकडे फिरून गाडीवाल्यानें आह्मांला दुकानांच्या ओळींत आणलें. तेथें भाजीपाला, फळफळावळ,



कोलंबा येथील सिलोनी लोकांच्या झोंपडीचा देखावा.

पानतंबाकू, वाणीउदमी वगैरेंचीं दुकानें होतीं. तेथील एका दुकानांत तीं हिरवींचार ताजीं विड्याचीं पानें, तीं पांढरी शुभ्र, बारीक कातरलेली नवी रोठी सुपारी वगैरे पाहून तीं विकत घेण्याचा मला मोठा मोह पडला, व त्याला आमच्या गाडीवाल्यानेंहि भर घातली, कीं, "सिलोनी विड्याचीं पानें फारच रुचकर असतात. तीं दिसावयाला हिरवीं दिसतात इतकेंच, पण खाण्याला फार स्वादिष्ट असतात." आह्मीं तीं एक आण्याचीं विकत घेतलीं तीं बरींच आलीं. शिवाय त्यांबरोबर कात, चुना, सुपारी, लवंग वगैरे मसालाहि खूब मिळाला. कोलंबोमध्यें नारळींचीं, सुपारींचीं, केळींचीं वगैरे कोंकणी झाडेंहि रस्त्याच्या आजूबाजूंनीं बरींच दिसलीं.

आमच्या हॉटेलमध्यें दुपारपासूनच नोटिस लागली होती, कीं, "देवाना बोट उद्यां रात्रीं दहा वाजतां कोलंबो बंदरांतून निघेल."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ब्रेकफास्टनंतर हॉटेलजवळील कांहीं दुकानें पाहिलीं, व पंखे, उशा वगैरे किरकोळ सामान खरेदी केलें. हॉटेलच्या आंतमध्येंच पुष्कळशी जवाहिरांचीं व कापड वगैरेंचीं दिल्ली, आग्रा, बनारस इकडील व्यपाऱ्यांचीं दुकानें होतीं. कोलंबोमध्यें या मालाची बरीच विक्री होत असावी, असें वाटतें. कांहीं बारीकसारीक जवाहीर आह्मीं विकत घेतलें, आणि तेथेंच पुढच्या हॉटेलमध्यें येणारा-जाणारांची गंमत पहात बसलों.

आज सकाळीं ह्मणा, कीं, काल सकाळीं ह्मणा, बऱ्याचशा बोटी कोलंबो बंदरांत आल्या असाव्या. कारण, सेलर्स लोकांच्या व पॅसेंजर्स लोकांच्या झुंडीच्याझुंडी सोडावॉटर, लेमोनेड, चहा वगैरे पिण्यासाठीं हॉटेलमध्यें येत होत्या. हें हॉटेल आपलें कांहींसें रेस्टराँसारखेंच होतें. या मंडळीमध्यें एक जपानी बाई होती. तिनें एका जर्मन कीं इटालियन इसमाशीं लग्न केलें होतें. या बाईनें इंग्लिश पोषाख केला होता; परंतु तो जपानी चेहरा कुठें लपावयाचा नाहीं. या जोडप्याचा एक लहानसा गुटगुटीत गोजीरवाणा मुलगाहि बरोबर होता. ती जपानी बाई माझ्या-

जवळ येऊन बसली, आणि जर्मन भाषेमध्यें माझ्याशीं बोलूं लागली. मीं तिला इंग्लिशमध्यें सांगितलें, कीं, मला जर्मन, इटालीयन, फ्रेंच वगैरे भाषा येत नाहींत. साधारण आपलें मोडकेंतोडकें इंग्रजी येतें. पण तिला इंग्लिश येत नव्हतें. त्यामुळें तिचें मला व माझें तिला समजेना !

## देवाना बोटीचा सेकंड क्लास.

संध्याकाळीं सुमारें पांच वाजतां आह्मी 'देवाना' बोटीवर पुन: चढलों. या वेळीं आमच्याशिवाय दुसरे कोणी पॅसेंजर्स बोटीवर आलेले दिसत नव्हते; परंतु सामान वगैरे चढविण्याची गडबड चालली होती. आमचें कॅबिन बदलल्यामुळें आमच्या मनाला स्वस्थता नव्हती, आणि बोटीवर आलों तरी मनाचा कांहींच निश्चय होईना. एकदां वाटे कीं, अड-चणी सोसून फर्स्ट क्लासमध्येंच रहावें. पुन: एकदां वाटे, आपले पैसे परत घ्यावे, व सेकंड क्लासमध्यें जावें. यांनां पुन: रागाची लहर आली, आणि "आतां मुंबईच्या कुकच्या ऑफिसला चांगलेंच खडखडीत पत्र लिहितों. त्यांनीं मला मध्येंच असा धोका दिला. असें होतें तर आह्मांला मुंबईलाच कळवायचें होतें !" असें ह्मणाले. नंतर परसरकडे (या मनुष्याकडे बोटी-वरील व्यवस्थेचें काम असतें) गेले, व त्याला विचारलें "अशी कशी हो तुमची व्यवस्था ? इतर लोकांनीं पैसे दिले तसे आह्मींहि दिले आहेत, आणि त्यांचा जसा हक्क आहे तसा आमचाहि आहे." वगैरे वगैरे.

परसर ह्मणाला "माझ्या व कॅप्टनच्या हातीं कांहीं नाहीं ! मला फार वाईट वाटतें—पण मी काय करूं ? आमच्या ऑफिसांतून लिहून येईल तसें आह्मांला केलें पाहिजे. परंतु सिंगापूर अथवा पिनँग येथें कोणी उतरले, कीं, लागलेंच तुह्मांला चांगलें कॅबिन देऊं."

मग त्याच्याबरोबर आह्मी सेकंड क्लास पहावयाला गेलों. तेथें डायनिंग रूम चांगली स्वच्छ, सामान वगैरे चांगलें नीटनेटकें, आणि एकंदर व्यवस्था फर्स्ट क्लाससारखीच दिसली. कॅबिनहि फर्स्ट क्लास-प्रमाणेंच होतें. उगीच थोडेंसें वीत दोन विती लहान असेल, एवढेंच.

कॅबिन समुद्राच्या बाजूकडील नसून, विजेच्या पंख्याचीहि व्यवस्था होती. वरती साधारण डेकहि बरें होतें, व एक लहानशी सिटिंगरूम आणि त्याच्याशींच लागून एक पुरुषाकरितां स्मोकिंग रूम वगैरे सर्व कांहीं व्यवस्था ठीक दिसली. नंतर आह्मीं ठरविलें, कीं, आतां सेकंड क्लासमध्येंच राहून हाहि एक अनुभव घ्यावयाचा. मग परसरनें सरटिफिकिट लिहून दिलें, व सांगितलें, कीं, "तुमचे पैसे मुंबईस कुकच्या मार्फत मिळतील."

संध्याकाळीं सात वाजतां बोटीवर जिकडेतिकडे विजेच्या दिव्यांचा चकचकाट पसरला, व हळुहळू पॅसेंजर लोक बोटीवर चढूं लागले; आणि जसजसा आठांचा सुमार होऊं लागला, तसतशी या मंडळीची फर्स्ट क्लासमध्यें व सेकंड क्लासमध्यें एकच गर्दी झाली. मुलें, नली, तान्हीं, खेळतीं, रांगतीं, चालतीं, बोलतीं अशीं एकेका जोडप्याच्या मागें आपलीं तीनतीन चारचार मुलांचीं लटांबरें, सर्वांच्या हातांत तऱ्हे-तऱ्हेचीं खेळणीं, चित्रविचित्र रंगीबेरंगीं टोप्या आणि अंगामध्यें नीटनेटके व सुबक असे कपडे, अशा या लहानमोठ्या मंडळींनीं सेकंड क्लासचें डेक गजबजून गेलें. आह्मी दोघें खुर्च्यांवर बसून येणाऱ्या मंडळीची मौज पहात होतों. ही सर्व मंडळी, विशेषतः मुलेंबाळें, बाया वगैरे पाहून माझ्या मनाला बरेंच समाधान झालें, व वाटलें, कीं, बोटीवरील पुढील प्रवास आह्मांला आतां फारसा कंटाळवाणा वाटणार नाहीं. जरी ही मंडळी आपल्याशीं फारशी मित्रत्वानें वागली नाहीं, तरी आपलें डेकवर बसलें ह्मणजे सहजच करमणूक होईल. या मंडळीमध्येंहि एकदोन जोडपीं कुरकुर करीत आलीं, कीं, "पहा, आह्मीं चारचार महिन्यांपूर्वीं फर्स्ट क्लासच्या कॅबिनकरतां नांवें लिहिलीं असून, आतां अर्ध्या रस्त्यावर आह्मांला सेकंड क्लासमध्यें घातलें, हा अगदीं धोका आहे!" वगैरे वगैरे त्यांची कुरकुर चालली होती. हा प्रसंग आह्मां एकट्या-वरच नाहीं, हें कळून. काय असेल तें असो, नंतर आह्मांला आमच्या विपत्ति तितक्या कष्टप्रद वाटल्या नाहींत. समदुःखी मिळाला ह्मणजे

मनाला थोडेंतरी समाधान वाटतें ह्मणतात,त्याचा या वेळीं आह्मांला प्रत्यय आला. नंतर प्रसिद्ध केल्याप्रमाणें देवाना बोट बरोबर रात्रीं १० वाजतां कोलंबो बंदरांतून निघाली.

कोलंबो बंदराची शोभा या वेळीं फारच सुंदर दिसत होती. बंदरामध्यें जिकडेतिकडे लहानमोठ्या शेंकडों बोटी दिव्यांनीं सुशोभित अशा सर्वत्र पसरल्या होत्या, व कांहीं हलक्या बोटी समुद्राच्या मंदमंद लाटांनीं हेलकावे खात होत्या. जणूं काय या अलंकारमंडित लहानमोठ्या परीच नृत्य करीत आहेत, असें वाटे! बंदरकिनाऱ्यावरहि जिकडेतिकडे मोठमोठे व दूरपर्यंत प्रकाश फेंकणारे दिवे खांबाखांबावर दिसत होते. या वेळीं शुक्लपक्षाला नुक्ताच कोठें आरंभ झाला होता. अर्थात्च चंद्र अगदीं बाल्यदशेंत होता. तथापि त्या अनेक दिव्यांच्या प्रकाशांनीं कोलंबो बंदराची शोभा विलक्षण मनोहर दिसत होती. या वेळीं आह्मी सर्व पॅसेंजर लोक डेकवर बसून आपापल्यापरी त्या सुंदर देखाव्याची तारीफ व प्रशंसा करीत होतों. बोट बंदराच्या बाहेर निघाल्यावर वेगानें आपला पुढील मार्ग क्रमूं लागली, व बंदराचा सुंदर देखावा हळुहळू आमच्या नजरेआड झाला.

## पिनँग.

आमची बोट आतां पिनँगच्याजवळजवळ आली होती, व समुद्राच्या बाजूला दूरवर लहानमोठ्या टेंकड्या दिसत होत्या. कोलंबोपासून आम्ही अरबीसमुद्र सोडून हिंदीमहासागरामध्यें शिरलों होतों. हा समुद्र पिनँग-कडे कांहींसा अरुंद होत आला आहे.

तारीख ९ मार्च रोजीं सकाळीं आठ वाजतां बोटीनें पिनँगच्या बंद-रांत नांगर टाकला. धक्क्यापासून सुमारें पावमैलाच्या अंतरावर बोट उभी होती. येथें बोट फारच थोडी म्हणजे तीनचार तासच थांबणार होती.

ब्रेकफास्ट झाल्यावर लागलीच आह्मी बोटीवरील कांहीं मंडळी लॉंचनें ( लहान बोटीनें ) पिनँग शहर पाहण्याकरितां किनाऱ्यावर गेलों. तेथें बरेचसे रिकशॉ आले, व कांहीं घोड्याच्या गाड्याहि उभ्या होत्या. दोन

रिकशांत बसून आह्मी शहरांत फिरण्याकरितां गेलों. रिकशॉ ओढणारे चिनी लोक होते. त्यांनां इंग्लिश, हिंदुस्तानी वगैरे कांहीं बोलतां येत नव्हतें; परंतु खुणांनीं सर्व कांहीं ते समजून घेत होते. गांवांतील कांहीं मोठ्या रस्त्यांनीं, बाजारपेठेंतून वगैरे त्यांनीं आह्मांला बरेंच झपाट्यानें फिरविलें. शहराचा थोडाबहुत भाग जो कांहीं आमच्या पाहण्यांत आला, तो बराच स्वच्छ आणि नीटनेटका दिसला. रस्ते चांगले रुंद, व दुकानें आणि घरें नीटनेटक्या तऱ्हेनें बांधलेलीं अशीं दिसलीं. बाजारओळी-मध्यें कांहीं दुकानें इंग्लिश मालाचींहि आहेत; परंतु पुष्कळशीं दुकानें अनेक आकृतींच्या, विलक्षण तऱ्हेच्या रंगांच्या, सुक्या व ताज्या माशांचीं जिकडेतिकडे भरलेलीं दिसत होतीं. हें पाहून मला वाटलें, कीं, या प्राण्यांकारितां हे लोक सारा समुद्र धुऊन काढतात कीं काय नकळे! ईश्वराच्या कृतीचेंहि कौतुक वाटलें, कीं, ज्यानें अशा खारट समुद्रांतहि लाखों तऱ्हेचे असे प्राणी निर्माण केले आहेत, त्या परमेश्वराची धन्य आहे! येथें हेंहि एक सांगितलें पाहिजे, कीं, या दुकानांतून लहानमोठे पुष्कळ तऱ्हेचे वाळलेले बेडूकहि विक्रीकारितां ठेविलेले होते! भाजीपाल्याचीं व फळफळावळीचीं दुकानेंहि बरींच होतीं.

येथें पुष्कळ तऱ्हेचे लोक दिसले. मुसलमान, खोजे, गोंवेवाले, मलाई व चिनी लोकांची तर बरीच वस्ती असावी, असें दिसलें. येथें लांकडाचा चांगला व्यापार चालतो. लोखंडाच्या आणि कोळशाच्याहि मोठमोठ्या खाणी आहेत, व आसपासच्या टेंकड्यांवर मिऱ्यें, लवंगा, दालचिनी वगैरे मसाला चांगला पिकतो. पिनँग हें पृथ्वीच्या अगदीं मध्यरेषेवर आहे, ह्मणून येथें दिवस व रात्री नेहमीं समसमान असतात; पाऊस बहुत-करून वर्षभर थोडथोडा पडतच असतो, त्यामुळें नेहमीं जिकडेतिकडे हिरवें गार असतें; परंतु हवेमध्यें कांहींशी उष्णता असते.

आमच्या रिकशावाल्यांची इच्छा होती, कीं, आम्हांला आणखी समुद्राच्या दुसऱ्या बाजूकडे फिरवावें; परंतु आमची बोट लवकर निघणार असल्यामुळें आम्हांला तिकडे जातां आलें नाहीं.

आम्ही परत बंदरावर आलों; तेव्हां आमची लहान बोट तयारच होती. ती सकाळची वेळ असल्यामुळें, बंदरावर लोकांची व्यापारधंद्यासंबंधीं सारखी गडबड चालली होती. लहान बोटींतून आणि होड्यांतून पुष्कळ तऱ्हेचा माल बंदरांत येत होता. तितक्यांतच चारपांच बोटी फळफळावळ, चांगल्या ताज्या भाज्या, नारळ वगैरेंनीं भरून आल्या, त्यांकडे माझें चित्त लागलें. सुंदर कोंवळीं वांगीं, चवळीच्या शेंगा, ताज्या लुसलुशीत भेंड्या, कांदे, केळीं, मोठमोठालीं कलिंगडें, या सर्व वस्तु अगदीं मोह पाडणाऱ्या होत्या. असो. या भाजीपाल्याचा आह्मांला तेथें काय उपयोग होता ह्मणा! त्यांतूनहि कांहीं फळें विकत घेतलीं असतीं, पण तीं बोटीवर नेण्याची मनाई असे. आह्मी मुंबईहून कांहीं नागपुरी संत्रीं बरोबर घेतलीं होतीं; परंतु आमचा कॅबिन स्टुअर्ड नेहमीं तीं या कोंपऱ्यांतून त्या कोंपऱ्यांत लपवीत असे, व आह्मांला सांगे, कीं, "हीं फळें लवकर खाऊन तरी टाका, अथवा एकदांचीं समुद्रांत फेंकून तरी द्या! कारण, फळें वगैरे जिनसा कॅबिनमध्यें ठेवण्याची सक्त मनाई आहे. कॅप्टन पाहील तर मला रागें भरेल." ह्मणून आह्मीं हीं फळें विकत घेतलीं नाहींत. नंतर पिनँग शहर पाहण्यास आलेली आमची इतर सोबती मंडळी लवकरच जमा झाली, आणि आह्मी सर्व मिळून मोठ्या बोटीवर गेलों.

## मलाया स्ट्रेटस्.

बरोबर नेमलेल्या वेळीं बोटीनें पिनँग बंदर सोडलें, व हळुहळू ती मलाया स्ट्रेटस् नांवाच्या अरुंद समुद्रांतून चालली. आतां आह्मी सेकंड क्लासची मंडळी बहुतेक सर्व एकमेकांच्या चांगलीच ओळखीचीं झालों होतों. पिनँगला आमची सेकंड क्लासची पांचसहा मंडळी उतरली होती, व थर्ड क्लासचे लोकहि बरेच उतरले होते. ह्मणून सेकंड क्लासचीं समुद्राच्या बाजूचीं दोनतीन कॅबिनस् रिकामीं झालीं होतीं. तेव्हां हेड स्टुअर्डनीं आह्मांला सांगितलें, कीं, जर तीं तुह्मांला पाहिजे असतील तर घ्या. पण आमच्या कॅबिनमध्यें आह्मांला कोणत्याच

तऱ्हेचा त्रास वाटत नव्हता. ह्मणून त्यांचे सामानाची उचलाउचल करण्याच्या भानगडींत आह्मी पडलों नाहीं. पिनंगहून बरेचसे पॅसेंजर बोटीवर आले होते. आमच्या सेकंडक्लासमध्येंहि चारपांच चिनी, एक मिशनरी जोडपें व बरोबर एक तीन वर्षांची मुलगी, अशी मंडळी आली होती. या चार चिन्यांनां आमच्या शेजारच्या कॅबिनमध्यें घातलें होतें. या चौघांमध्यें एक ह्मातारा होता, व तिघे अठरावीस वर्षांचे होते. मग त्यांचें परस्पर कांहीं नातें होतें कीं काय, कोण जाणे. परंतु तो ह्मातारा चिनीच होता कीं काय, अशी त्याच्या मुसलमानी तऱ्हेच्या पेहरावावरून शंका येई. चिनी लोकांसारखी त्याला लांब शेंडीहि नव्हती. बाकीचे तीन इसम मात्र चिनी पोषाख करीत असत. ह्मणजे सैलसा लांब अंगरखा व तसाच ढिला पायजमा, लांब शेंड्या व त्याला गंगावन लावून लांब वेण्या घालावयाच्या, आणि तीं लांब वेण्यांचीं शेंपटें पाठीवर टांचेपर्यंत लोळावयाचीं. चिनी बायांचाहि पोषाक बहुतेक पुरुषांसारखाच असतो परंतु त्या केंसांच्या वेण्या न घालतां एकप्रकारचा आंबाडा घालतात. असो. पुढें आह्मांला कळलें, कीं, या चिनी ह्मातान्यानें मुसलमानी धर्म स्वीकारिला आहे, व हा चिनी मुसलमान ह्मटला जातो. ह्मातारा फार सभ्य आणि स्वभावानें फार गरीब होता. तो बसला असतांना आह्मी कोणीहि बाया तिकडे गेलों, तर उठून उभा राही व जमिनीपर्यंत लवून सलाम करी. तीं तिघें मुलें मात्र जरा उनाडच होतीं. त्यांनीं डेकवर बसण्याच्या खुर्च्या आणल्या नव्हत्या. ब्रेकफास्ट झाल्यावर सर्व बायका पुरुष आपापल्या खुर्च्यांवर डेकवर येऊन बसत असत; पण या तिघां चिनी मुलांनीं आपल्या बिछान्याच्या वळकट्या आणाव्या, व तेथें डेकवर हांतरून लोळावें, उड्या माराव्या वगैरे प्रकार करावे. हें पाहून एक स्टुवर्ड त्यांच्यावर रागावला, व त्यानें त्यांच्या वळकट्या एका हॉलमधून खालच्या मजल्यावर फेंकून दिल्या व सांगितलें, कीं, "दिवसाचें असें डेकवर निजायचें नाहीं; कॅबिनमध्यें निजत जा!"

यूरोपियन मुलेंहि बोटीवर बरींच होतीं; आणि तीं ह्मणजे कमी दांड व गोंगाट करणारीं होतीं, असें नाहीं. परंतु वयानें लहान असल्यामुळें त्यांनां तितकें कोणी ह्मणूं शकत नसे. एक जपानी गृहस्थहि सेकंड-क्लासमध्यें होते. हे मुंबईपासूनच आले होते. हे मुंबईस एका व्यापाऱ्याचे एजंट होते. मुंबई बंदरावर एकदोघां भाल्यांनीं यांच्या गळ्यांत बरेचसे फुलांचे हार वगैरे घालून त्यांनां निरोप दिला होता. आतां हे जपानीबोवा स्वदेशीं चर्तुभुज होण्याकरितां चालले होते. यांचा आपला यूरोपियन थाट होता. दोघे मुसलमान व्यापारीहि आमच्या क्लासमध्यें होते. हे जपान येथें कोबी गांवीं व्यापार करीत असत. या दोवांमध्यें थोरले शेटजी जे होते, त्यांनां इंग्लिश लिहितांवाचतां कांहीं येत नव्हतें. परंतु त्यांच्या सांगण्यावरून आह्मांला कळलें, कीं, ते पंधरासोळा वर्षांपासून जपानमध्यें व्यापार करीत आहेत, आणि बहुतेक दरवर्षीं मुंबईला येतजात असतात. दुसरे गृहस्थ होते ते तरुण असून त्यांनां इंग्लिश येत होतें. हे पहिल्यांदांच जपानला चालले होते, व त्यांचा हा पहिलाच जलप्रवास होता. बिचारा नेहमीं उदास दिसे. उदासीनतेचें कारण असें समजलें, कीं, हे तीन वर्षांच्या बोलीनें त्या मोठ्या शेटजींबरोबर त्यांच्या कोबी येथील दुकानावर नोकरीला जात असून, मागें घरीं आपली तरुण पत्नी व तीन लहान मुलें यांनां सोडून आले होते. अर्थात्‌च, तीन वर्षें त्यांनां सोडून इतक्या लांबच्या पल्ल्यावर रहावयाचें. मग मनाला हुरहूर वाटणें साहजिक आहे.

या दोघांशीं आह्मांला बोलण्याचालण्याला सांपडत असे. थोरले शेटजी तर जपानची फारच प्रशंसा करीत असत; व सांगत, कीं, जपानसारखा जगांत दुसरा देशच नाहीं! हवा अतिशय चांगली; लोक फार सभ्य आणि उद्योगी; तसेंच देशामध्यें मोठमोठाले रमणीय डोंगर, नद्या, देवळें वगैरे वगैरे फारच पहाण्यासारखा तो देश आहे. आह्मांला वाटलें, बरें, चला आतां जपान थोड्या दिवसांवर आलें आहे—'चक्षुर्वै सत्यम्‌ !'

आमच्या सेकंड क्लासमध्यें अमेरिकन बायाहि बऱ्याच होत्या. त्या चीन, जपान वगैरेंकडून फिरतफिरत स्वदेशीं जाणार होत्या. यांच्यामध्यें रत्नागिरीची मिस जेफर्सन नांवाची एक मिशनरी बाई होती. ही बाई बोलूनचालून चांगली होती. हिची बोटीवरील सोबतीण ही इंग्लंडहून चिनामध्यें लग्नाकरितां जात होती. तिचा भावी पति चिनामध्यें होता. बिचारी रोज नखाबोटांवर दिवस मोजीत होती. ती मला नेहमीं थट्टेनें ह्मणे, कीं, तुह्मी आपल्या प्रवासाचें पुस्तक लिहिणार आहां ना? तेव्हां आह्मां सर्वांविषयीं कांहींतरी लिहालच!

या यूरोपियन बाया–विशेषत: अमेरिकन बाया, रोज रात्रीं निजण्यापूर्वीं लांबलचक डायरी लिहीत असतात. सर्व दिवसामध्यें काय पाहिलें, काय केलें, काय वाचलें, कोण भेटलें वगैरे वगैरे सर्व इत्थंभूत लिहावयाचें. मला वाटे, रोजरोज रात्रीं या बाया डायनिंग सलूनमध्यें अगर डेकमधील सलूनमध्यें जमून डायऱ्या लिहितात, तर एवढें लिहितात तरी काय? बरें, घरीं असलों तर कांहीं विशेष घडतें तरी; पण बोटीवर विशेष तें काय होणार? ह्मणून मी एक दिवस त्यांच्या घोळक्यांत गेलें, व त्यांच्या डायऱ्या ऐकण्याची आपली इच्छा त्यांनां दर्शविली. त्या ह्मणाल्या "मग तुह्मी रोज कां नाहीं येत? आह्मी रोज तुह्माला वाचून दाखवीत जाऊं."

डायरींतील मजकूर येणेंप्रमाणें:–बोट आज किती मैल चालली; दुपारीं पुस्तकाचीं पानें किती वाचलीं; त्यांच्यामध्यें लक्ष्यांत ठेवण्याजोगीं व कांहीं धडा घेण्याजोगीं कोणकोणचीं वाक्यें होतीं; अमक्या अमक्या बाईशीं इतका वेळ बोलणें झालें, त्यांत अशी अशी माहिती मिळाली; सूर्यास्ताचा देखावा फार सुंदर दिसला; समुद्र चांगला शांत होता; मुलें अमकेअमके खेळ खेळलीं. या व अशाच गोष्टी विस्तारानें लिहिल्या होत्या.

या डायऱ्या ऐकण्याची मला मोठी मौज वाटत असे, आणि मीं असें जवळ सांगितलें ह्मणजे मला नेहमीं ह्मणत असत, कीं, "हो, तुह्माला

दुसऱ्यांच्या डायऱ्या ऐकण्याची नेहमीं मौज वाटते, पण स्वतः लिहायला नको! त्यांच्यासारखी डायरी तुह्मी लिहीत गेलां, तर पुढें तुमच्या पुस्तकाला किती चांगली मदत होईल!"

परंतु मी आपली नेहमींप्रमाणें कांही तरी सबबी सांगून आपला आळशी स्वभाव लपवीत असें, आणि ह्मणत असें "होय, खरोखरीच मी जमिनीवर गेलें ह्मणजे रोज नियमानें डायरी लिहीत जाईन; पण बोटीवर माझें मेलें नेहमींच डोकें दुखत असतें व घेरी येत असते, त्यामुळें नेहमीं उदास वाटतें."

आणि या सर्वच सबबी कांहीं अगदींच खोट्या नव्हत्या. कारण, समुद्र कितीहि शांत असला, तरी माझें आपलें थोडथोडें डोकें दुखतच असे. असो.

फर्स्ट क्लासच्या स्टुअर्डेस्‌सारखीच सेकंड क्लासची स्टुअर्डेस् चांगली बाई होती. ती आह्मां सर्व बायांची चांगली काळजी घेत असे. शिवाय तिला कांहीं लहान मुलांनांहि पहावें लागत असे कारण, दोघी ऐरीश बाया होत्या, त्यांचीं मुलें अगदीं लहान होतीं; एकीचें दोन महिन्यांचें, व दुसरीचें तीन किंवा अडीच महिन्याचें होतें. जेव्हां त्यांच्या आया स्नानाला किंवा जेवावयाला जात असत, तेव्हां अर्थात्‌च स्टुअर्डेसला त्यांची काळजी घ्यावी लागे. बहुतकरून त्यांचें खाणें स्टुअर्डेस त्यांच्या खोल्यांत पोहोंचवीत असे. या बाया आपलीं तान्हीं मुलें वेताच्या लांबट पेटाऱ्यांमध्यें निजवीत असत. त्या पेटाऱ्यांमध्यें चांगल्या मऊ लहान गाद्या व उशा असत, आणि दुधाच्या लहान बाटल्या चोखावयाला देऊन तीं आपली पेटाऱ्यांचीं वाणें घेऊन त्या घटकाभर दुपारीं डेकवर येऊन बसत असत. तीं चिमुकलीं अर्भकें आपल्या पेटाऱ्याच्या नरकुलामध्यें आपले गोजिरवाणे हातपाय हालवून खेळत असत, आणि त्यांचा लाड करण्याकरितां जर त्यांचा टोपलीवर कोणी वांकले, तर गोड रीतीनें हंसून त्याचें स्वागत करीत असत! या तान्ह्या बाळांनां जरा तरी कल्पना होती

काय, कीं, आपण या एवढ्या मोठ्या अफाट समुद्रांतून तरंगत जात आहोंत! ह्मटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं, कीं, बाळपणासारखें प्राण्याला कोणच्याच पणामध्यें सुख नाहीं! परंतु विचार करतां या सर्व गोष्टी पुष्कळ अंशीं मुलाच्या मातेवरहि अवलंबून असतात. कारण, मूल कितीहि सशक्त व निरोगी असलें,पण त्याची आई आळशी,निष्काळजी व अज्ञान असली, तर त्या मुलाचें बाळपणहि सुखाचें होत नाहीं. उदाहरणार्थ, आपल्या हिंदुस्तानांतील बायका मुलाला वेळच्यावेळीं न्हाऊंधुऊं घालावयाच्या नाहींत; त्यांचीं चिरगुटें, पांघुरणें धुण्याचा आळस करावयाच्या; मूल वरदूध पीत असलें तर त्याच्या दुधाची काळजी घ्यावयाच्या नाहींत; अथवा त्याला भूक नसली तरी बळजबरीनें पाजायाच्या. अशा तऱ्हेनें चांगल्या सशक्त मुलालाहि त्या दुखणें आणून मग त्याचें निमित्त दुसऱ्यावर घालतील! "ती अमकी अमकी बाई आली होती; परवां तिचीच माझ्या मुलाला दृष्ट लागली;ह्मणूनच माझें मूल रात्रभर रडलें! त्या अमक्यातमक्या सटवीनेंच कांहीं जादुटोणा केला असेल!" अशा तशा कांहीं तरी कल्पना डोक्यांत घेऊन मुलाचें दुखणें एका तऱ्हेचें तर त्याला उपचार दुसऱ्याच तऱ्हेचे करितील, आणि या प्रेमळ आयाच मुलाच्या आयुष्यांतील अत्यंत सुखाचा काळ—त्याचें बाळपणहि त्रासदायक करावयाला निमित्त होतील.

आमच्या या ऐरिश बाया बोटीवरहि आपल्या मुलांची शुश्रूषा नियमितपणानें करीत असत. त्यामुळें मुलें एवढ्या लांब बोटीच्या प्रवासांतहि चांगलीं राहिलीं. या दोघी बायांपैकीं एकीचा नवरा बरोबर होता. त्यानें पुण्यास व तिकडे आणखीं कुठेंकुठें सोल्जरचें काम केलें होतें. ह्मणून त्याला हिंदुस्तानची बरीच माहिती होती. या जोडप्याचें हें एकच तान्हें मूल होतें. परंतु ती दुसरी बाई बिचारी एकटीच प्रवास करीत होती, व त्या तान्ह्यामुलासुद्धां तिच्या गळ्यांत तीन मुलें होतीं; थोरला मुलगा चार वर्षांचा होता; त्याच्या पाठची अडीच वर्षांची एक मुलगी; आणि

तिसरें तें तान्हें मूल. आई बिचारी त्या लहान मुलाला घेऊन बहुतकरून खालीं आपल्या खोलींत रहात असे, व हीं दोघें बहिणभावंडें वरतीं डेकवर खेळत असत. दोघेंहि मुलें बरींच खोडकर होतीं. विशेषत: 'मे' तर फारच खोडकर मुलगी होती. परंतु तिच्या खोड्या आह्मां सर्वांनां आवडत असत. ती फार गोड आणि मोकळ्या मनाची आनंदी मुलगी होती. तिच्याबरोबरचीं इतर बरींच मुलें बोटीवर होतीं; परंतु 'मे' इतकी गमती कोणी नव्हती. दुपारीं वाचतांवाचतां खुर्चीवर जर कोणाला झोंपेची गुंगी आली, तर ती हळूच येऊन त्याचें पुस्तक अथवा चष्मा घेऊन लपवीत असे. डोळे उघडून पहावें तों 'मे'ची स्वारी आपली कांहीं अंतरावर हंसत उभी दिसावयाची! मग आपल्या बोबड्याबोबड्या ऐरिश भाषेंत ह्मणावायची "आतां निजूं नका! चांगलें हुषारीनें वाचा—नाहीं तर तुमचें पुस्तक असेंच लपवून ठेवीन, व मग लवकर देणार नाहीं!"

कधींकधीं तर तिची आई तिच्या लाल सुंदर झुबकेदार केसांनां गुलाबी अथवा उदेशी रिबन बांधीत असे. त्या दिवशीं मे अगदीं गर्वानें व अभिमानानें अगदीं ताठून जावयाची! मग आह्मी कोणी तिच्याशीं बोललों नाहीं, तरी आपणच आह्मांला ताकीद करायला येत असे. "पहा बरें, आज माझ्या आईनें माझ्या केंसांला नवीन रिबन बांधिलें आहे; ह्मणून तुह्मी कोणी माझ्या खोड्या करूं नका—नाहींतर माझें नवें रिबन खराब कराल!"

मेची आई तिला नेहमीं रागें भरत असे, आणि सांगत असे, कीं, "तूं दुसऱ्या कोणाच्या खोड्या करीत जाऊं नको. नाहींतर मी तुला वरतीं डेकवर अगदीं जाऊं देणार नाहीं! येथें माझ्याजवळ रहात जा, आणि आपल्या धाकट्या भावाला खेळवीत जा."

अशा रीतीनें एकाद्या दिवशीं मे वर आली नाहीं, ह्मणजे आह्मांला करमत नसे. मग आह्मी तिच्या आईला सांगावें, कीं, "मे पासून आह्मांला कांहीं त्रास नाहीं; उलट चांगली करमणूक होते." तेव्हां पुन: मेला वर येण्याची परवानगी मिळत असे.

आणखी चोघीपांचजणी चौदापंधरा वर्षे वयाच्या मुली होत्या. त्या आपल्या नेहमीं बोटीवरील तरुण ऑफिसर आणि कांहीं तरुण पॅसेंजर लोकांशीं थट्टामस्करी करीत असत; अथवा डेकवर दडदड धांवणें, उड्या मारणें, अशा तऱ्हेनें आपली करमणूक करीत असत. असो.

अशा तऱ्हेनें सर्वच पॅसेंजरचें मी वर्णन करीत बसलें, तर तें एक मोठें थोरलें भारूडच होईल! ह्मणून थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, देवाना बोटीवरील हे पंधरासोळा दिवस आमचे फार चांगले गेले, इतर सोबती आमच्याशीं चांगले वागले. ईश्वरकृपेनें समुद्रहि शांत होता.

## बोटीवरील कॉन्सर्ट.

बोट आतां उद्यां सिंगापूरला पोहोंचणार–त्याच्या आदल्या रात्रीं आमच्या सेकंड क्लासच्या मंडळींनीं कॉन्सर्ट केलें. फर्स्ट क्लासचीहि कांहीं मंडळी गावयाला आणि सोंगें वगैरे घेण्याला आली होती. त्या सर्वांनीं थट्टेचीं व मौजेचीं गाणीं ह्मणून करमणूक केली. परंतु सेकंड क्लासच्या एका गृहस्थानें लंडनच्या ह्मातार्‍या कुलीचें सोंग घेतलें होतें, तें इतकें हुबेहूब साधलें होतें, आणि त्याची बतावणीहि त्यानें इतकी चांगली केली, कीं, सर्वांची हंसतांहंसतां अगदीं मुरकुंडी वळली ! एक मळकटशी विजार, तसाच ठिगळें लावलेला तो कोट, एक वांकडीतिकडी निष्काळजीपणानें डोक्याला घातलेली फाटकीशी टोपी, एका मनगटाला एक चिंधी बांधलेली, तोंडाला काळें फांसलेलें, अशा थाटानें स्वारी येऊन मोठ्या आवेशानें बोलायला सुरुवात केली. त्या भाषणापैकीं थोडेसें जें कांहीं मला आठवतें, तें येथें देतें. तें मला फारच मौजेचें वाटलें.

"आज सात वर्षें झालीं–मीं सरकारच्या फायद्याकरितां काम सोडून दिलें, व हत्यारांनां रजा दिली; माझी ह्मातारी बायको मात्र कामाला जाते; तिला गेलेंच पाहिजे! नाहीं तर पोटाचें कसें होईल? एक दिवस मी रस्त्यानें जात होतों, तों मला लॉर्ड चान्सलर भेटला; तो मला ह्मणतो

'वेल, काय तुला सांगावें! दिवसेंदिवस एक्साइज रेव्हिन्यु ग्रेटब्रिटनचा फार कमीकमी होत चालला आहे.' तें ऐकून मीं लागलाच निश्चय केला, व त्याला सांगितलें, कीं, 'हें काम माझ्याकडे लागलें! आजपासून माझ्यानें होईल तितकें करून तुमच्या अबकारीचा फायदा करीन. पूर्वींपासून मी करीतच आहें ह्मणा; पण आजपासून हत्यारांनां हातच लावणार नाहीं—व त्याप्रमाणें मीं आज सात वर्षें आपला निश्चय चालविला आहे. बहुतकरून मी आपला वेळ दुकानावरच घालवितों, आणि सरकारच्या फायद्याकरितां चांगलें उंची बिअर पितों. नाहीं तर तुह्मी बेटीं आजकालचीं पोरें! कांहीं तरी मूर्खपणाच्या कल्पना डोक्यांत घेतां. ह्मणे दारु न पितां लेमोनेड, लाईमज्यूस, नाहीं तर नुसतें साधें पाणी प्यावें! असें निःसत्त्व पेय प्यावयाचें, व सरकारचें मोठें नुकसान करून ठेवावयाचें. तुह्मांला सांगून ठेवितों, मी आतां लौकरच पार्लमेंटचा मेंबर होणार आहें, तेव्हां अशा या महत्त्वाच्या गोष्टींचीं बिलें आधीं पास करीन, आणि (Old Woman) तिला रोज सकाळीं कामावर धांवत जावें लागतें, तर अशा बायांकरितां ट्रॅमचें भाडें माफ असावें, हें एक महत्त्वाचें बिल पास करीन! माझ्या (Old Woman) ह्मातारीचें माझ्याविषयीं फार चांगलें मत आहे; एक दिवस संध्याकाळीं ती आपले मळके कपडे धुण्याकरितां नळावर गेली होती, तेथें ती सर्व बायकांनां सांगत होती, कीं, माझा ह्मातारा आतां लौकरच पार्लमेंटचा मेंबर होणार आहे, तेव्हां मोठमोठीं महत्त्वाचीं बिलें तो पास करील. मी आडून ऐकत होतों—कां? आहे कीं नाहीं माझ्याविषयीं तिचें Grand मत!"

अशाचसारखें गमतीचें व खुबीदार भाषण करून चार घटका त्यानें सर्वांची करमणूक केली.

## सिंगापूर.

तारीख १० मार्च रोजीं सकाळीं आठ वाजतां, आमची बोट सिंगापूरच्या धक्क्याला येऊन लागली. येथें प्लेग, कॉलरा वगैरे कांहीं नसल्या-

मुळें बोट इतकी आंत आली होती. येथें पुष्कळसा माल व डांकेच्या थैल्या उतरावयाच्या असतात, तेव्हां हेंहि कारण असेल. असो. एवढी मोठी प्रचंड बोट हळुहळू बंदरांत आणून मोठमोठ्या लोखंडाच्या रशांनीं व दोरखंडांनीं धक्क्याला अगदीं कसून टाकिली, व मोठा थोरला पुलासारखा लांकडी जिना तयार केला. या ठिकाणीं बोट एक दिवस आणि एक रात्र राहणार असल्यामुळें तितक्या वेळांत पॅसेंजर्स लोकांनां वाटेल तेव्हां जाण्यायेण्याची मोकळीक होती. ब्रेकफास्ट झाल्यावर तेथें जे कोणी उतरणार होते, ते आपापल्या मित्रांनां गुडबाय करून उतरून गेले. आह्मी बाकी राहिलेली मंडळी डेकवर उभी राहून सभोंवतालचा देखावा पहात होतों. कारण, बोट तेथेंच दिवसभर रहाणार होती, तेव्हां आह्मांला लौकर खालीं उतरण्याची घाई नव्हती. बोटीच्या आसपास पुष्कळसे चिनी लोक लहानलहान होड्यांत बसून बोटीवरील लोकांजवळ पैसे मागत होते. पैसे पाण्यांत फेंकले ह्मणजे तिघेचौघे एकदम खालीं डोकें करून तीरासारखे पाण्यांत बुडत, व पैसा घेऊन पुनः होडींत येऊन बसत. पाण्यांत बुड्या मारण्याची त्या लोकांनां कांहीं भीतिच वाटत नसे. जणूं काय हे मनुष्यदेहधारी मोठमोठे मासेच आहेत, असें वाटे! अंगावर वस्त्र ह्मणाल तर कमरेभोंवती लहानलहान चड्डया, एवढेंच काय तें. हे शरीरानें चांगले सुदृढ, गुटगुटीत, ठेंगण्या बांध्याचे, आणि वर्णानें चांगले गोरे होते. अशा या चिनी लोकांनीं आमची बोट अगदीं वेढून टाकिली होती.

सुमारें बारा वाजतां आह्मी खालीं बंदरांत उतरलों. तेथें जवळच कांहीं रिकशे उभे होते; परंतु आमच्यापेक्षां जलद चालणाऱ्या मंडळींनीं ते लागलेच घेऊन ते चालतेहि झाले. आह्मांला रिकशॉ किंवा घोड्याची गाडी मिळेना! तेथें दोघेतिघे चिनी कुली उभे होते, त्यांनां इंग्लिशमध्यें रस्त्याची माहिती वगैरे विचारिली, तर त्यांनां कांहींच समजेना.

झालें! मग माझ्यावर आली पट्टी! "पहा, तुह्मी लवकर चालत नाहीं, लवकर निघत नाहीं; ते लोक लवकरलवकर पुढें आले, रिकशे, गाड्या

केल्या, निघूनहि गेले ! एक रिकशॉ होता, त्यांत तुह्माला ह्मटलें बसा, मी तुमच्या बरोबर पायीं चालतों, तर तुह्मीं ऐकिलें नाहीं. बसूं तर दोघें बसूं, व चालूं तर दोघें चालूं असें ह्मणतां; पण आतां अशा या उन्हामध्यें तुमच्यानें कसें चालवणार ?"

परंतु ईश्वराला काय काळजी नकळे! तितक्यांत एक ह्मातारा चिनी दोघांनां बसण्याजोगा एक मोठा रिकशॉ घेऊन धांवतच आमच्यापाशीं आला. तो आपल्या भाषेंत जें बोलला, त्यापैकीं आह्मांला एक शब्दहि समजला नाहीं. आह्मीं त्याला सांगितलें " आह्मांला मार्केटमध्यें ने." त्याप्रमाणें त्यानें बाजारांत एका मुसलमानाच्या दुकानांत आह्मांला नेलें. तेथें त्या दुकानदाराला विचारून तेथील शिरस्त्याप्रमाणें त्या रिकशा-वाल्याला पैसे देऊं लागलों; पण तो घेईना! आपल्या भाषेंत आरडा-ओरड करूं लागला. तेव्हां आह्मी त्याला आणखी थोडे जास्ती पैसे देऊं लागलों, तरी तो कांहीं ऐकेचना! "वंडालर, वंडालर! पूलिस पूलिस!" एवढें आह्मांला समजलें. "एक डालर द्या, नाहींतर तुह्मांला पोलिसांत नेतों!" हा त्याच्या ह्मणण्याचा अर्थ होता. तितक्यांत एक मनुष्य सायक-लवर बसून चालला होता, त्यानें हें ऐकून तो त्या दुकानांत आला, आणि आह्मांला ह्मणाला, कीं, "याला वीस सेंटच्यावर एक पैहि देऊं नका! हे बेटे चिनी परक्या लोकांनां असाच त्रास देतात." त्यानें मग त्या चिन्याला दोनतीन थपड्या व गचांड्या दिल्या, तसा तो आपला रिकाशॉ घेऊन झपाट्यानें पळून गेला !

हा मनुष्य हिंदुस्तानचाच होता; परंतु बरेच दिवसांपासून सिंगा-पुराला कचेरींत नोकरीला होता. मग आह्मी ट्रॅममध्यें बसून व्हाईटवेच्या दुकानीं गेलों. तेथें कांहीं जिनस खरेदी करून मग एक घोड्याची गाडी ठरविली, आणि तेथील पब्लिक पार्क पहावयाला गेलों. हा बाग चांगला विस्तीर्ण आणि अनेक तऱ्हेच्या फुलांफळांच्या झाडांनीं सुशोभित आहे, व निरनिराळ्या जातींच्या वेलांचे जागजागीं सुंदर लतामंडप आहेत.

एकंदरींत हा बाग मोठा सुंदर आहे. बागेचा शक्य तितका भाग पाहून मग आह्मी शहरांत फिरावयाला गेलों. तेथील गव्हर्नरचा बंगला, कचेरी, हॉस्पिटल वगैरे इमारती पहातपहात बाजारपेठेंतून चिनी लोकांच्या क्वार्टर्सकडे आलों. तेथें फार घाण, आणि आसपास अगदीं गलिच्छ होतें. हा भाग समुद्राच्या दलदलीच्या जागेंत आहे, आणि बरेचसे गरीब चिनी लोक लांकडांचीं उंच उंच घरें करून येथें राहिले आहेत. कांहीं चिनी लोक एका लहानशा खाडींत गढूळ व घाणेरड्या पाण्यांत मासे धरीत होते. घाण तर अतिशय सुटली होती. अशा या घाणीमध्यें हे लोक सुरक्षित तरी कसे राहतात, याचेंच मला आश्चर्य वाटलें. इतर सर्व ठिकाणीं शहरांत बरीच स्वच्छता दिसली; परंतु हा चिनी लोकांचा भाग फारच गलिच्छ दिसला. त्याचें हेंहि एक कारण आहे, कीं, तेथें समुद्राची दलदल असल्यामुळें नेहमीं ओल व घाण रहाते. असो.

नंतर संध्याकाळीं सुमारें सहा वाजतां आह्मी बोटीवर गेलों. आमच्या गाडीवाल्याला इंग्लिश साधारण बोलतां येत होतें, त्यामुळें वाटेनें कोठें त्रास झाला नाहीं. हा सिलोनकडील राहणारा होता. येथें मुसलमान लोकांचीं दुकानेंहि बरींच दिसलीं.

बंदरावर माल उतरण्याची एकसारखी गडबड चालली होती. बोट बंदरांत आल्यावर पहिल्यानें डाकेच्या थैल्या काढिल्या, आणि मग मोठमोठ्या पेट्या, पार्सलें वगैरे माल काढण्याचें काम रात्रीं सातआठ वाजेपर्यंत चाललें होतें. सर्व बंदर मालानें अगदीं भरून गेलें होतें. नंतर आठ वाजतां कोळसा घेण्याचें काम सुरू झालें. तो देखावा मोठा विलक्षण दिसत होता. या लोकांकरितां तीनचार लांकडी जिने लाविले होते, व शेंकडों मजूर–पुरुष, बायका, मुलें, मुली–टोपल्या भरभरून कोळसे बोटीवर आणीत होतीं, व डेकवरून खालीं कोळशाच्या खोलींत ओतीत होतीं. बिचाऱ्यांचीं शरीरें पायांपासून मस्तकापर्यंत धुतलेल्या विस्तवासारखीं दिसत होतीं. या काळ्याभोर लहानमोठ्या आकृति बंदरा-

वरील व बोटीवरील चकचकीत गॅसच्या व विजेच्या प्रकाशांत खालींवर धांवतांना अद्भुत दिसत होत्या !

हें कोलिंग रात्रीचे दहा वाजे तों चाललें होतें, आणि त्याच्या खरीचा थोडाबहुत प्रसाद आह्मां सर्वांनां मिळाला होता. दुसऱ्या दिवशीं आमच्या अमेरिकन बाया "येथें डाकेच्या थैल्या किती उतरल्या ?" याविषयीं चौकशी करूं लागल्या, कारण, या अशा सर्व गोष्टी त्यांनां डायरीमध्यें लिहावयाच्या असत. कोणी ह्मणे तीनशें, तर कोणी पांचशें. नीट चौकशी करतां नऊशें डाकेच्या थैल्या सिंगापूरला उतरल्या, असें समजलें.

## हाँगकाँग.

तारीख १६ मार्च रोजीं सकाळीं दहा वाजतां आमची बोट हॉंक-काँगच्या बंदरांत आली. आह्मां पॅसेंजर लोकांची नेहमींप्रमाणें खालीं उतरण्याची एकच गडबड सुरू झाली. या बोटीवरील बरेचसे पॅसेंजर्स हाँगकाँगला उतरले, व फारच थोडे पुढें शांघायला गेले.

कुक कंपनीचीं माणसें येऊन आह्मांला आमच्या सामानासुद्धां लहान बोटीनें बंदरावर घेऊन गेलीं. तेथें कांहीं रिकशे, व कांहीं खुर्च्या होत्या. या खुर्च्यांनां दोन्ही बाजूंनीं लांब दांड्या लाविलेल्या असतात. त्या दोन माणसें खांद्यावर घेऊन डोलीसारखीं उचलून घेतात. आह्मां दोघांनां या खुर्च्यांत बसवून कुकच्या माणसांनीं बंदरापासून बरेंच लांब वरवर चढवीत एका लहानशा हॉटेलमध्यें नेलें. त्यांच्या सांगण्यावरून समजलें, कीं, दुसरीं मोठालीं हॉटेलें सर्व भरून गेलीं होतीं. असो.

एकदांचीं आह्मी त्या लहान हॉटेलच्या दरवाज्याजवळ गेलों; परंतु तेथें कोणीहि दिसलें नाहीं. मग रिंग केली तेव्हां एक अर्धवयी, पण जरा छानछुक अशी बाई बाहेर आली. तिला "खोली आहे का ?" असें विचारतांच "माझ्याजवळ एक कोंपरासुद्धां रिकामा नाहीं !" असें तिनें उत्तर दिलें.

हें ऐकून आह्मांला फारसें वाईट वाटलें नाहीं! कारण, हें हॉटेल चांगलेंसें दिसलें नाहीं, व बंदरापासून बरेंच दूर कोठच्या कोठें एका बाजूला होतें. मग आह्मीं किंग एडवर्ड हॉटेलमध्यें गेलों. हें हॉटेल एका पारशानें चालविलें आहे. हें चांगलें मोठें असून समुद्रकिनाऱ्याला जवळ आहे, व दुकानें, बाजारपेठ वगैरे सर्व जवळ पडतें.

मग लंच झाल्यावर आमचे मित्र मिस्तर जे. डायर—हे सेंट्रल प्राव्हिन्समध्यें सिव्हिलियन ऑफिसर आहेत—यांनीं हाँगकाँग येथें एका मोठ्या कारखान्यांत मॅनेजरचें काम करीत असलेल्या आपल्या भावाला एक पत्र दिलें होतें, त्यांच्या भेटीला हे गेले. मी एकटीच हॉटेलमध्यें होतें. मिस्तर डायरचे बंधु घरीं नव्हते; त्यांना टेलिफोन केला व तीन वाजतां भेट होईल असें समजलें. तेव्हां तीन वाजतां त्यांची भेट घेतली.

नंतर चार वाजतां येथील पर्वताचें शिखर पाहण्यास गेलों. शिखरापर्यंत विजेची ट्रॅम नेली आहे. वरून खालीं समुद्राचा आणि शहराचा देखावा फारच सुंदर दिसतो, व येथेंहि एक लहानसें हॉटेल आहे, आणि कांहीं चिनी लोक भाड्यानें देण्याकरितां डँडी व कांहीं रिकशे घेऊन उभे होते. येथें बोटीवरील मिशनरी वगैरे बरीच मंडळी आह्मांला भेटली. ही मंडळी भोंवतालच्या देखाव्यांचे फोटो घेत होती. हे अमेरिकन लोक—बायकापुरुष बहुतकरून सर्व आपापल्याजवळ एक लहानसा कॅमेरा अथवा खोड्याक नेहमीं प्रवासांत बाळगितात. सुमारें एकतास आह्मी इकडेतिकडे फिरून मग खालीं आलों, व दोन रिकशे घेऊन चिनी टाऊन, फुलांचा बाजार, समुद्रकिनारा, हें पहात बरींच फिरलों. रस्त्यानें पुष्कळ गरीब चिनी बाया हळुहळू लंगडत चालतांना दिसल्या. अशा लंगडत चालणाऱ्या एकदोघी चिनी बाया मला सिंगापूरलाहि दिसल्या होत्या; परंतु तेव्हां मला वाटलें, कीं, त्यांच्या पायांला कांहीं दुखापत झाली असेल. पण जेव्हां हांगकांगला सर्व चिनी बाया लंगडतांना पाहिल्या, तेव्हां त्याचें कारण माझ्या लक्ष्यांत आलें. चिनी लोकांमध्यें पुष्कळ दिवसांपासून अशी

एक वेडगळ चाल आहे, कीं, मुलीचीं लहानपणापासून पावलें दाबून-दाबून आंखूड करावयाचीं, इतकीं, कीं, बिचाऱ्यांनां चांगलें चालतांसुद्धां येत नाहीं! परंतु त्यांनां त्याची सवय झालेली असते, ह्मणून कांहींच वाटत नाहीं, असें ह्मणतात. आंखूड पावलें आणि बारीक पाय करणें हें चिनी बायांचें सौंदर्य समजलें जातें, असेंहि कोणी ह्मणतात. जशा यूरोपियन स्त्रिया कंबर बारीक करण्यांत व डोक्याला पुष्कळसे खोटे केंस लावण्यांत सौंदर्य समजतात, अगर आह्मीं हिंदी स्त्रिया तोंडावर जागजागीं गोंदण्यांत व नाककान टोंचण्यांत सौंदर्य समजतों, अशाच-सारखी चिनी स्त्रियांची ही चाल मला मोठी विलक्षण आणि निर्दयपणाची वाटली. कांहीं श्रीमंत चिनी बाया रिकशांत बसून इकडे तिकडे हवा खातांनाहि दिसल्या.

समुद्राच्या बाजूकडे चिंध्यांचीं, फटक्यातुकड्या कपड्यांचीं बरींच दुकानें दिसलीं. मग या चिंध्यांचें हे लोक काय करितात, कोण जाणे. याच बाजारामध्यें ठिकठिकाणीं चिनी बाया शेगड्या घेऊन बसल्या होत्या, व शेगड्यांवर मोठमोठें एकएक मडकें असून त्यांत कायसा पांढरा पदार्थ रटरट उकळत होता. जवळ कांहीं पसरट वाट्यांसारखीं भांडीं आणि लांकडी चमचे गिऱ्हाईकांनां देण्याकरितां ठेवलेले होते. गिऱ्हाईक मंडळी इकडूनतिकडून येऊन दोनचार पैशांच्या तो मडक्यांतील पदार्थ व त्याच्याबरोबर एक प्रकारचीं बिसकिटें घेऊन तेथेंच बसून खात होते. तीं भांडीं न विसळतां त्यांतच दुसऱ्या गिऱ्हाईकांनां देत. त्या वाट्या धुण्याच्या त्रास त्या दुकानदारांनां मुळींच पडत नव्हता, असें दिसलें.

हा चिंध्यांचा बाजार अगदीं घाणेरडा दिसला; पण दुसऱ्या भागांतील फुलांचा बाजार फारच चांगला होतो. अनेक तऱ्हेच्या रंगांचीं सुवासिक फुलें टोपल्यांत भरून विक्रीकरितां चिनी बाया जागजागीं बसल्या होत्या, व संध्याकाळच्या वेळीं त्या फुलांचा मधुर सुवास सर्व बाजारभर पसरला होता.

सुमारें सातसाडेसात पावेतों फिरून आह्मी परत हॉटेलांत गेलों. या हॉटेलांत सर्व चिनी लोकच नोकर होते. डायनिंग रूममध्यें या नोकर लोकांचा पोषाखाचा व त्यांच्या लांबलांब शेंड्याचा देखावा विलक्षण दिसत होता. हे चिनी चांगले हुषार नोकर असतात, असा त्या हॉटेलाच्या मालकाचा अनुभव होता.

देवाना बोट हॉंगकॉंगला एक दिवस उशीरां आल्यामुळें आह्मांला कँटन शहर पहावयाला जातां आलें नाहीं. कारण, निपोमारो बोट दुसऱ्याच दिवशीं हॉंगकॉंगहून निघणार होती. तेव्हां ती बोट आह्मांला चुकवितां येत नव्हती.

## निपोमारो बोट.

तारीख १७ मार्च रोजीं ब्रेकफास्ट झाल्यावर सुमारें एक वाजतां आह्मी बंदरावर जाण्याला निघालों. हॉटेलच्या मालकानें आमच्या सामानाची वगैरे सर्व व्यवस्था लावून दिली होती, आणि भाड्याचे दोन रिकशेहि आणून दिले. हे पारशी गृहस्थ फार चांगल्या स्वभावाचे होते. नाहींतर कांहीं पारशी लोक व आपले हिंदुलोकहि असे असतात, कीं, थोडक्यामध्येंच त्यांच्या अंगीं साहेबी ऐट येते, आणि मग आपल्या देशबांधवांशीं चांगल्या रीतीनें वागण्यांत त्यांनां लाज वाटते! असो. हे पारशी गृहस्थ तशांपैकीं नव्हते, व त्यांचें हॉटेलहि चांगलें चालत असावें, असें दिसलें.

आह्मी बंदरावर आलों, तेव्हां झिमझिम पाऊस सुरू झाला होता. हा बंदराचा भाग उघडा व जवळ बसण्याची सोय नसल्यामुळें आह्मी कांहीं अंतरावरील मालाच्या वखारींत आश्रयाकरितां गेलों. कारण, बारा वाजतांची लॉंच निघून गेली होती, व दुसरी निघण्यास अवकाश होता. परंतु तितक्यांत कुक कंपनीची एक लॉंच जात होती, त्यांतून आह्मी गेलों. निपोमारो बोट किनाऱ्यापासून दीडएक मैलाच्या अंतरावर उभी होती. बोटीच्या भोंवतालीं लहान बोटींची माल वगैरे चढविण्याची एकच गडबड चालली होती, व त्याच दिवशीं दुसरी एक बोट

'तिओमारो' ही ऑस्ट्रेलियाला जात होती. या दोन्ही बोटी जवळजवळच उभ्या होत्या. या एकाच जपानी कंपनीच्या, दोहोंची बांधणी वगैरे सारखीच, आणि दोन्ही अकराअकरा हजार टन वजनाच्या आहेत.

कुकच्या एजंटनें ओरडाआरड करून त्या गर्दीतून एकदांचें आह्मांला बोटीवर चढविलें, व आमचें सामान वगैरे कॅबिनमध्यें लावून दिलें.

हांगकांगमध्येंच कुकच्या ऑफिसांतून आह्मी जपानची सर्व माहिती करून घेतली होती, व नोट–रुपये वगैरेंचीं जपानी नाणीं करून घेतलीं होतीं. जपानमध्यें दुभाषा गाईडहि ठरवून ठेविला असून त्याला बजावून सांगितलें होतें, कीं, "देवाना बोटींत जशी गडबड झाली तशी आतां पुढें आमच्या प्रवासांत होतां कामा नये! नाहीं तर तुमच्यामार्फत प्रवास करण्यांत काय फायदा ?"

दोनअडीच वाजतां पॅसेंजर मंडळी बोटीवर आली, आणि बायका-पुरुष व मुलांबाळांनीं बोट गजबजून गेली.

आह्मी त्या गजबजलेल्या विस्तीर्ण डेकवर उभें राहून सभोंवतालचा समुद्राचा सुंदर देखावा पहात होतों. हांगकांग आणि जपान यांमधील हा समुद्र क्वचित् शांत असतो. सर्व समुद्रभर लहानमोठीं सुंदर हिरव्या गार झाडांनीं आच्छादिलेलीं अनेक बेटें पसरलीं आहेत. या बेटांमधून मोठी थोरली प्रचंड बोट वांकडींतिकडीं वळणें घेऊन मोठ्या काळजीपूर्वक न्यावी लागते. या समुद्राला 'यलो सी' असें ह्मणतात. या समुद्रामध्यें नेहमीं धुकें व अंधार असतो, त्यामुळेंहि त्यांना फार काळजी घ्यावी लागते.

या वेळींहि थोडथोडा पाऊस पडत होता, व समुद्रामध्यें जिकडे-तिकडे धुकें पसरलें होतें. तीन वाजतां बोट निघाली; परंतु ती अगदीं हळू चालत होती. प्रत्येक सेकंदाला सिग्नल देत होती. मग संध्या-काळच्या सुमाराला धुकें जरा कमी झालें, व पुढें बेटेंहि फार नव्हतीं. पण पाऊस सुरूच होता. वाऱ्यानें त्यांत येऊन भर घातली, तसतशा समुद्राच्या लाटा आमच्या कॅबिनच्या खिडकीपर्यंत उसळूं लागल्या.

या बोटीवर बहुतेक नोकर जपानी होते. कॅप्टन, एंजिनियर वगैरे मोठमोठे ऑफिसर मात्र अमेरिकन होते. कारण, जपानी लोकांविषयीं अमेरिकन लोकांची अजून पूर्ण खात्री नव्हती. एवढी मोठी प्रचंड बोट जपानी लोक सुरक्षित रीतीनें चालवूं शकतील कीं नाहीं, याविषयीं त्यांनां संशय होता. आमची स्टुअर्डेस अमेरिकनच होती. ही वयानें तरुण असून स्वभावानें थोडी उद्धट होती. तिच्याविषयीं सर्वच बायांची कुरकूर असे. कारण, ती कधीं आपण होऊन बायांच्या कॅबिनमध्यें जाऊन त्यांचा समाचार घेत नसे. जर कोणीं रिंग करून बोलावलेंच, तर यावयाची, नाहीं तर कधीं ढुंकूनहि पहावयाची नाहीं. ती लँड ऑफ् लिबर्टीची राहणारी होती, ह्मणून तिच्या कल्पना तशा असतील; किंवा स्वभावगुण असतील. या बोटीवरील आमचें कॅबिन चांगलें होतें. ह्मणजे पी. एँड ओ. कंपनीच्या कॅबिनपेक्षां या कॅबिनमध्यें पुष्कळ सोई होत्या. आमचें कॅबिन दोनच बिछान्यांचें होतें, परंतु चांगलें मोकळें ऐसपैस असून बाजूला बसण्याकरितां एक कोच होतें, व कपडे ठेवण्याकरितां एक कपाट होतें. या बोटींत तीनचार नंबरच्या कॅबिन्स होत्या. ज्याप्रमाणें पैसे भरावे, त्याप्रमाणें सोयीच्या मिळत. पहिल्या नंबरच्या कॅबिनमध्यें सर्वच व्यवस्था उत्तम. मोठी बेडरूम, मोठे छप्परपलंग, खुर्च्या, कोच वगैरे चकचकीत सामान. त्याच्याशीं लागूनच स्वतंत्र बाथरूम, आणि एक सीटिंगरूम. श्रीमंत अमेरिकन लोक चारचार महिन्यांपासून कॅबिन्सचीं तिकिटें घेऊन ठेवतात.

बोटीवर बहुतेक अमेरिकनच मंडळी होती. यांच्यापैकीं बरीच मंडळी हिंदुस्तानची यात्रा करून आली होती. त्यांच्या आपसांत हिंदुस्तानविषयीं बऱ्याच गोष्टी चालत असत. एक इंग्लिश गृहस्थ बर्माहून आले होते. हे रंगूनला कलेक्टर होते. आतां रजा घेऊन कॅनडा वगैरे देश पाहण्यास ते चालले होते. त्यांची पत्नीहि त्यांच्याबरोबर होती. मला पाहून या बाईला फार आश्चर्य वाटलें. त्या मला ह्मणाल्या "तुह्मी एकट्याच, कोणी नोकर-

चाकर बरोबर नसतां, असा इतका दूरचा प्रवास करण्यास कशा धजलां? तुह्माला भीति वाटत नाहीं काय?"

मीं त्या बाईला ह्मटलें "माझे पति बरोबर असतां मला कशाची भीति आहे?"

निपोमारो बोट ही इतर चांगल्या बोटींपैकींच एक सोयीची अशी बोट होती. ही उंचीमध्यें चारपांच मजली असून, सुंदर ड्राइंगरूम आणि डायनिंगहॉल, सीटिंगरूम, आणि चांगलें प्रशस्त डेक वगैरे सर्व होतें. संध्याकाळीं बोटीवरील व्यवस्थापक आह्मांला विचारूं लागला "तुह्मी जेवायला कोणच्या टेबलाकडे बसणार? कॅप्टनच्या टेबलाकडे बसणार कीं काय?"

आह्मीं सांगितलें "आह्मांला कॅप्टनचेंच टेबल पाहिजे असें नाहीं. आह्मांला कोठेंहि बसविलें तरी चालेल; मात्र आह्मी दोघें जवळजवळ पाहिजे."

मग बाजूच्या टेबलाकडे कांहीं अमेरिकन मंडळीबरोबर आमची जागा ठरली. या टेबलावर आह्मी आठजणें होतों. आह्मी दोघें, एक अमेरिकन जोडपें, आणि चार अमेरिकन पोक्त बाया. पहिल्याच रात्रीं आह्मी सर्वजणें चांगले मित्र झालों, व कॅप्टनच्या टेबलाकडे बसण्यापेक्षां या साध्याभोळ्या अमेरिकन बायांबरोबरच बसणें आह्मांला बरें वाटलें.

दुसऱ्या दिवसापासून वारा आणि पाऊस चांगलाच जोरानें वाहूं लागला, व एवढी मोठी जड बोट असूनहि लाटांच्या आदळण्यानें समुद्रांत नाचूं लागली, व दोन्ही बाजूंनां गडबडूं लागली. हवा अगदीं सर्द झाली. थंडीनें तर अंगावर शहारे येऊं लागले. डेकवर जाण्याची सोयच राहिली नाहीं. मोठमोठ्या प्रचंड लाटा बोटीवर येऊन आदळत, आणि त्यांचे कारंज्यासारखे तुषार वरच्या डेकपर्यंत पोहोंचत. आह्मी बहुतेक बाया आपल्या कॅबिनमध्यें पडून राहिलों होतों. माझें तर डोकें विलक्षण दुखूं लागलें, आणि पोटामध्यें डवडवूं लागलें. कांहीं खावयाला

जावें तर सारखी ओकारी येऊं लागली. त्यांनाहि कांहीं बरें वाटत नव्हतें; परंतु ते माझ्यासारखे पडून नव्हते. कसा तरी वेळ घालविण्या- करितां ड्राइंगरूममध्यें किंवा स्मोकिंगरूममध्यें कोठें तरी घटकाभर बसून पुन: माझा समाचार घेण्याला कॅबिनमध्यें येत, व मला कांहीं सोडावॉटर, बर्फ, फळें वगैरे खाण्याचा आग्रह करीत; परंतु मला कोणाशीं बोलणेंसुद्धां बरें वाटेना.

त्या वेळीं माझ्या मनांत हजारों कल्पना येऊं लागल्या. वाटे कीं, हें वावटळ आणखी जोरानें वाढलें तर बोट फूटून जाईल, व आमचे कायकाय हाल होतील! आतां पुन: आह्मांला हिंदुस्तान दिसेल कीं नाहीं, कोण जाणे! आह्मांला इकडे येण्याची कशी बुद्धि झाली! जपानला काय पहायचें होतें? मनांतच कल्पना नसती आली का, कीं, जपान असें चांगलें आहे, अमेरिका खूप मोठी आहे! नाहींतर जपानचीं व अमेरिकेचीं चित्रें पाहिलींच होतीं. मग कशाला इकडे येण्याच्या आह्मी भरीस पडलों, कोण जाणे! अशा अनेक कल्पनांचे तरंग माझ्या डोक्यांत येऊं लागले. आपल्यांत एक ह्मण आहे, कीं, वैरी न चिंती तें मन चिंती! ती अगदीं खरी आहे, याची प्रचीति या वेळीं मला चांगलीच आली!

कांहीं वेळानें परत कॅबिनमध्यें आले, तेव्हां मी आपल्या सर्व कल्पना सांगितल्या नाहींत; पण मला वाटतें, या वावटळांत आपली बोट बुडेल व आपल्याला हिंदुस्तान व आपलें घर कांहीं पुन: दिसत नाहीं, अशाच एकसारख्या कल्पना माझ्या डोक्यांत येत आहेत, असें सांगितलें.

"भलत्याच तुमच्या कांहींतरी कल्पना! या एवढ्याशा वावटळीनें कुठें एवढी मोठी बोट बुडते कीं काय? आणि आपल्यापेक्षां कॅप्टन वगैरे ऑफिसरांनां किती काळजी व त्यांच्यावर किती जोखीम आहे? आतांच स्मोकिंगरूममध्यें मला ते सांगत होते, कीं, हें कांहींच नाहीं! थंडीच्या दिवसांत तुह्मी या, ह्मणजे कसा समुद्र खवळलेला असतो तें तुह्मांला दिसेल. खालीं भयंकर लाटांची गर्जना, तर वरून दाट बर्फाचा

वर्षाव. रात्रीच्या वेळीं अपर डेकवरून तो देखावा फार भयंकर आणि अंगावर शहारे आणणारा दिसतो; सर्व बोटभर गरम पाण्याची स्टीम ठेवावी लागते, आणि अंगावर खूब जाड कपडे घालावे लागतात. लाटांच्या जोरानें बोट एकसारखी खालींवर उसळ्या मारीत असते. त्यामुळें बोटीवर कोणाला चालणेंफिरणेंहि कठिण होतें. तशा वेळीं जर तुह्माला इकडे आणलें, तर काय कराल कोण जाणे! अजून आपल्याला हिंदुस्तान सोडून पुरा एक महिनाहि झाला नाहीं; तोंच इतक्या घाबरतां व हिंदुस्तान हिंदुस्तान करतां, मग पुढें कसें करणार? काल तर त्या बाईकडून मोठ्या धीराच्या ह्मणून सर्टिफिकेट मिळवलें—झालें, एवढ्यांतच तें धैर्य गडबडलें! चला, जरा ड्रॉइंगरूममध्यें बसा. तेथें कांहीं बाया बसल्या आहेत, तेथें बसून कांहीं वाचण्याचा वगैरे प्रयत्न करावा. उगीच पडून राहिल्यानें भलभलत्या कल्पना येतात, आणि डोकें अधिक दुखतें."

त्याप्रमाणें खरोखरीच ड्रॉइंगरूममध्यें घटकाभर बसल्यावर मला जरा बरें वाटूं लागलें; परंतु खालीं डायनिंगरूममध्यें जेवावयाला कांहीं जाववलें नाहीं, ह्मणून मी पुनः कॅबिनमध्येंच पडून राहिलें. पण त्यांनीं स्टुअर्डेसला माझ्याकडे पाठविलें. ती बाई माझ्या बिछान्याजवळ येऊन ह्मणाली "तुह्माला माझी जरूर आहे कीं काय? तुमच्या यजमानांनीं मला पाठविलें आहे. हे अमके अमके पदार्थ आज जेवणाला आहेत. यांतलें तुह्माला काय पाहिजे आहे, सांगा."

मीं तिला ह्मटलें "मला कांहीं नको. फक्त कांहीं फळें, एकादें संत्रें, सफरचंद वगैरे घेऊन या."

त्यांनीं तिला फळें आणतांना पाहिलें. तेव्हां विचारलें "काय! नुसतीं फळेंच नेतां? थोडें आइसक्रीमहि घेऊन जा."

"पण मडमनीं मला नुसतीं फळेंच सांगितलीं!"

"बरें, सांगितलीं असतील, पण थोडें आइसक्रीमहि नेलें तर काय होतें !"

"पण मडमनीं तर फळेंच सांगितलीं!" असा तिनें आपलाच हेका चालविला.

सांगावयाला कारण, अशी ती दांडगी बाई होती. हिच्या मानानें देवाना बोटीवरील दोघीहि स्टुअर्डेस किती तरी चांगल्या व सभ्य अशा होत्या.

निपोमारोवरील सेकंड क्लास साधारण लहानच होता. कारण, इकडे बहुतकरून चांगले लोक फर्स्ट क्लासनेंच जातात. सेकंड क्लास नोकर वगैरे लोकांकरितां असतो. या सेकंड क्लासमध्यें चारपांच जपानी बाया होत्या, पण त्या सर्व यूरोपियन बायांचीं मुलें खेळविण्याकरितां होत्या.

तारीख २०ला बोट शांघायला आली. पाऊस व वारा या वेळीं बराच कमी झाला होता. येथें बोट एका विस्तीर्ण नदीच्या तोंडाशीं उभी राहिली. मग ब्रेकफास्टनंतर आह्मी सर्व पॅसेंजर लोक, लहान स्टीमरनें शांघायला गेलों. तेथें एक गाडी करून शहराचा मुख्य मुख्य भाग पाहिला, व एक चिनी देऊळ व बाग वगैरे पाहून व्हाइटवेच्या दुकानीं कांहीं खरेदी केली. तेथें बरेच हिंदुस्तानी लोक दिसले. कांहीं शीख लोक पोलिसांत नोकर आहेत. हे लोक उंच आणि धिप्पाड असल्यामुळें पोलिसचा ड्रेस त्यांनां चांगला शोभत होता.

संध्याकाळीं सहा वाजतां आह्मी पुनः स्टीमरमध्यें बसलों. येथून चीन वगैरेंकडून सातआठ यूरोपियन पॅसेंजर येऊन मिळाले. यांपैकीं कांहींनां बरीच श्रीमंत चिनी मंडळी पोहोंचवावयाला आली होती. त्यांत दोघीतिघी चिनी बायाहि होत्या. त्यांनीं आपल्या यूरोपियन मित्रांकरितां कांहीं चिनी कपडे, पंखे वगैरे नजराणे आणिले होते. त्यांच्या एकमेकांशीं भेटी, व पुनःपुनः वांकून सलाम हीं बोट चालू होईपर्यंत सारखीं चाललीं होतीं.

रात्रीं आठ वाजतां बोट शांवायहून निघाली. देवाना बोटहि येथें आजच सकाळीं आली होती, व तिच्यावरील बरीच मंडळी निपोमारोवर आली होती. त्यामुळें निपोमारो बोट आतां पूर्ण भरली होती. रात्रीच्या वेळीं तो सुंदर व भव्य जेवणाचा दिवाणखाना स्त्रीपुरुषांनीं गच्च भरून जात असे, आणि वरतीं ड्राइंगरूममध्यें ग्रामोफोनचें अनेक तऱ्हेच्या तालसुरांत गायन चालत असे. या डायनिंग हॉलमध्यें जागजागीं नाजूक व सुबक असे कनेरी पक्ष्यांचे पिंजरे टांगले होते. हे पक्षी फारच मधुर गायन करीत असत. एकंदरींत कोणत्याहि तऱ्हेनें ही जपानी बोट इतर चांगल्या बोटींनां हार जात नव्हती.

बोटीवर न्हाव्याचेंहि दुकान होतें. हे न्हावीदादा अमेरिकन गृहस्थ होते. यांच्या दुकानीं कांहीं लहान घड्याळें, आंगठ्या वगैरे चमत्कारिक वस्तु विक्रीकरितां ठेविल्या होत्या. त्यांच्या किंमतीहि आश्चर्य वाटण्या-जोग्या होत्या.

न्हावी ह्मटले—मग ते कोणत्याहि राष्ट्राचे असोत, अथवा कितीहि सुधारलेले असोत—त्यांनां गप्पागोष्टी सांगण्याचें जणूं काय वरदानच असतें! त्याप्रमाणेंच या बोटीवरील हे न्हावीदादा होते. त्यांच्या खोलींत नेहमीं थोडीबहुत मंडळी असावयाचीच. मग हजामतीच्या निमित्तानें असो, वा गप्पागोष्टी ऐकावयाला असो. कांहीं बायाहि केंस विंचरून घेण्याकरितां अथवा विक्रीकरितां ठेविलेल्या वस्तु विकत घेण्याकरितां जरी नसल्या, तरी पाहण्याकरितां तरी जात असत. कित्येकींच्या तर दिवसां-तून दोनतीन खेपा होत असत. “कोठें एवढा वेळ गेलां होतां?” असें विचारलें, ह्मणजे “कोठें नाहीं—बार्बरशीं बोलत होतों.” असें आपलें ठरींव उत्तर यावयाचें. मी ह्मणे “नेहमींनेहमीं अशा कशाच्या तरी गोष्टी ऐकायच्या, आहे तरी काय त्याच्यांत!”

“वा, त्याच्याकडून कितीतरी माहिती मिळते! बोटीची, जपानी लोकांची, अमेरिकन लोकांची, पॅसेंजरची. तो ह्मणत होता, आणखी

दोनतीन वर्षांनीं तुह्मी पहाल, बोटीवरील मोठमोठ्या जागाहि जपानी लोक पटकावतील! मग या बोटीवर तुह्मांला एक अमेरिकन नोकर, अथवा ऑफिसर दिसणार नाहीं! जपानी लोक फार हुषार आणि मोठे युक्तिवान् आहेत. शिकतेवेळीं मोठ्या हिकमतीनें व गरिबीनें आमच्या-जवळून शिकून घेतात. मग एकदां विद्या साधली, ह्मणजे सांगतात, आतां तुह्मी जा, आह्मी आमचें संभाळून घेऊं, आतां तुमचें काम नाहीं! अशातशा पुष्कळ गोष्टी ऐकायला मिळतात, व वेळहि निघून जातो."

तीनचार दिवसांत वारा व पाऊस बराच निवळला, आणि मग मला तितकी भीतिहि वाटेनाशी झाली. डोकें दुखणेंहि कमी झालें. परंतु त्या चारपांच दिवसांत आह्मी डेकवर गेलों नाहीं. जें कांहीं पहिल्याच दिवशीं थोडा वेळ बसलों, तेवढेंच.

प्रकरण दुसरें.

## जपान.

तारीख २२ मार्च १९११ रोजीं सकाळीं आठ वाजतां आमची बोट नागासाकीला आली. आधल्या दिवशीं नोटिस दिल्याप्रमाणें ब्रेकफास्ट साडेसाताला झाली, आणि ज्यांनां येथें उतरावयाचें होतें तीं आपापल्या सामानासुद्धां डेकवर तयार झालीं. नागासाकी हें बोटीचें कोळसे घेण्याचें ठिकाण आहे; ह्मणून येथें बोटी सहासात तास उभ्या राहतात. अमेरिकन कंपनीची मंचुरिया बोटहि या वेळीं येथें उभी होती, व कुली लोकांची कोळसा चढविण्याकरितां एकसारखी गडबड चालली होती. याच बोटीनें आणखी एका महिन्यानें आपण अमेरिकेला जाऊं, असें मला सांगितलें. तेव्हां त्या बोटीकडे माझें अधिकच लक्ष्य लागलें. ती बोट आमच्या बोटीपासून जरा दूर असल्यामुळें ती लांबच लांब व काळीकाळी दिसत होती.

आह्मी सामान घेऊन डेकवर तयार होतों; परंतु त्यांचा विचार येथेंच उतरावें, कीं, पुढें कोबीला उतरावें, असा चालला होता. कारण, बोटीवरील बरीच मंडळी आह्मांला ह्मणत होती, नागासाकीला कशाला उतरतां? कोबीलाच कां नाहीं जात? नागासाकीला विशेषसें कांहीं पाहण्यासारखें नाहीं. परंतु बोट उभी राहून जिना तयार होतांच कुकच्या मार्फतीनें आमचा जपानी गाइड डेकवर आला, व त्यानें यांनां विचारलें "तुह्मीच का मिस्टर चिटणवीस? मी तुमचा गाईड आहें. ही मला हॉंगकॉंगहून कुकच्या ऑफिसांतून तार आली आहे. तुमचें सामान, किल्ल्या वगैरे माझ्या स्वाधीन करा. कस्टमऑफिसांत सर्व उघडून दाखवावें लागेल."



आमचा जपानी गाईड आणि त्याची पत्नी.

यांनीं गाईडला ह्मटलें " नागासाकीला विशेष पाहण्यासारखें कांहीं नाहीं, असें ऐकितों. असें जर असेल, तर आह्मी एकदम कोबीला जातों. तुह्मी आह्माला तेथें येऊन मिळावें."

परंतु गाईड ह्मणाला " येथेंहि कांहीं पाहण्याजोगीं स्थळें आहेत, तीं उगीच कशाला सोडून देतां? इतक्यावर जशी आपली इच्छा."

नंतर आह्मी गाईडच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व सामान आणि किल्ल्या त्याच्या स्वाधीन करून त्याच्याबरोबर लहान बोटीनें किनाऱ्यावर गेलों.

हॉटेल किनाऱ्याजवळच होतें, ह्मणून गाडी वगैरे करावी लागली नाहीं. हॉटेल चांगलें स्वच्छ असून खोल्यांतील सामान, पलंग, खुर्च्या, लोखंडी शेगडींत धगधगीत विस्तव वगैरे सर्व कांहीं नीटनेटकें होतें. हवेंतील गारठा अजून तसाच होता, आणि पाऊसहि थोडथोडा पडतच होता. त्यामुळें खोलींतील तो विस्तव पाहून मनाला किती तरी हुषारी व आनंद वाटला. हॉंगकॉंग सोडल्यापासून आह्मांला अजून सूर्यदर्शन नव्हतें.

आमच्या खोलीची नोकर एक चुणचुणीत जपानी मुलगी होती. तिला आह्मीं विचारलें " आमचे मळके कपडे तूं उद्यां धुऊन देशील का? चांगले धुतले पाहिजेत."

"Yes Sir! Very Good Washing!—होय महाराज—फार चांगलें धुणें!"

तिला कांहीं सांगितलें, कीं, ती आपलीं पांच बोटें दाखवी. "In five Mumba—पांच मिनिटांत!" असा त्या खुणेचा अर्थ होता. या मुलीची मला मोठी गंमत वाटली, व एक प्रकारची करमणूकहि झाली.

आमचे गाईड—इनोइसन—आह्मांला हॉटेलमध्यें पोहोंचवून मग कस्टम-ऑफिसांतून आमचें सामान घेऊन आले, व त्यांच्या विचारानेंच आह्मी

आमच्या पुढील प्रवासाचा—कोणच्या तारखेला कोठें जावयाचें, कोठें किती दिवस रहावयाचें, व कोणत्या गाडीनें निघावयाचें, वगैरे—सर्व कार्यक्रम ठरविला.

उपाहार झाल्यावर दोन वाजतां रिकशांत बसवून आमचे गाईडबुवा आह्मांला नागासाकीचें पुरातन सिंटोचें देऊळ पाहण्यास घेऊन गेले. हें देऊळ बऱ्याच उंच अशा एका टेंकडीवर आहे. वरती देवळापर्यंत सुमारें दीडशें पायऱ्या असतील. मला तर चढतांचढतां अगदीं दम लागला. एकतर थोडाथोडा पाऊस पडत होता, ह्मणून एका हातानें छत्री धरावयाची व थंडीच्या बचावाकरितां अंगांत मोठा थोरला जाड आणि लांब कोट घातलेला तो दुसऱ्या हातानें आंवरून धरावयाचा. अशा थाटानें बसतउठत एकदांचीं आह्मी मजलीला जाऊन तर पोहोंचलों. त्या उंचउंच पायऱ्या पाहून मला आधींच बजावलें होतें, कीं, " जर तुमच्यानें चढवेल तर या; नाहीं तर खुशाल रिकशांत बसून रहा. " परंतु पाय दुखोत कीं कांहीं होवो, कशी तरी हळुहळू मी चढेनच, असा निश्चय करून मी वर चढलें.

देवळाच्या सभोंवतीं चांगला मजबूत परकोट असून आंत शिरण्याचा मुख्य दरवाजा मजबूत आणि मोठा आहे. देवळाची कांहींशी रचना आपल्याकडील देवळासारखीच आहे. देवळाच्या आंतील भागांतून परकी लोकांनां जाऊं देत नाहींत, ह्मणून आह्मी बाहेरील भाग पाहून लवकरच निघालों. या डोंगरावर मोठमोठीं व जुनीं कापराचीं झाडें गाईडनें आह्मांला दाखविलीं. देवळाचा मोठा दरवाजा या झाडाच्याच लांकडाचा केला असून तो फार जुना आणि मजबूत आहे. चेरीजचींहि पुष्कळ झाडें या डोंगरावर आहेत, व त्यांनां मोहोर येऊन कांहीं सुंदर लाल फुलें बाहेर आल्यामुळें हा लहानसा डोंगर फार रमणीय दिसत असतो. खालीं पायऱ्यांचा देखावाहि चांगला दिसत होता.

९२३८

मग आह्मी पुनः रिकशांत बसून, कासवाच्या पाठीच्या वस्तु करतात तो कारखाना पाहण्यास गेलों. बाहेरून हें एक लहानसें दुकान दिसलें; परंतु आंत बरेच लांबलांब सोपे होते, व वर माडी होती. या माडीवर पंधरावीस जपानी मजूर कासवाच्या पाठीला पॉलिश करून त्याच्या डब्या, तसबिरीच्या फ्रेमी, फण्या, पंखे वगैरे वस्तु तयार करीत होते. तयार झालेल्या वस्तु कपाटांतून व्यवस्थेशीर ठेविलेल्या होत्या. दुकानदार आह्मांला मोठमोठ्या किंमतदार वस्तु दाखवूं लागला, व ह्मणाला " गुदस्तां याच वेळीं बडोद्याचे महाराज आले होते. त्यांनीं चांगली खरेदी केली. तुह्मीहि त्यांच्याकडीलच आहां काय ? तुह्मीहि चांगली खरेदी केली पाहिजे !"

आह्मीं त्याला सांगितलें "आह्मी बडोद्याच्या महाराजांचे कोणी नाहीं, किंवा त्यांच्या पार्टीपैकींहि नाहीं. आह्मी आपलीं गरीब माणसें आहोंत. त्यांच्यासारखी खरेदी आह्मी कशी करणार !"

आह्मी या कारखान्यांतील कित्येक वस्तु खरेदी करून व कांहीं वेळ इकडेतिकडे गांवांत फिरून परत हॉटेलांत गेलों. आमच्या खोलीच्या नोकरबाईनें खोलींतील शेगडी पेटवून व हाततोंड धुण्याकरितां गरम पाणी ठेवून, खिडक्यांच्या दरवाज्यांचे पडदे वगैरे व्यवस्थित लावून ठेविले होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ह्मणजे तारीख २३ रोजीं दहा वाजतां आह्मी नागासाकीहून निघालों. आतां आमच्याकडे कांहींएक राहिलें नव्हतें. सर्व कांहीं व्यवस्था आमचे गाईडबुवा करीत होते. सामान वगैरे पाहणें, रेल्वेतिकिटें घेणें, हॉटेलचे व मजूर लोकांचे पैसे देणें, आमच्या खाण्यापिण्याची वेळच्यावेळीं बरदास्त ठेवणें, सर्व कांहीं गाईडकडे होतें. आह्मी जशीं कांहीं कळसूत्री बाहुलीं झालों होतों ! आमचे सूत्रधार गाईडबुवा जसें सूत्र हलवितील, तसें आह्मांला नाचावें लागे. जपानमध्यें परकी लोकांनां गाईड केल्यावांचून चालतच नाहीं. कारण, अजूनहि

फारच थोडे जपानी लोक इंग्लिश बोलतात, व ह्मणून गाईड असला तरच सर्व तऱ्हेची सोय होते.

कुक कंपनीनें आमच्याजवळून प्रत्येकीं रोज अठरा येनप्रमाणें एका महिन्याचे पैसे घेतले होते. त्यामध्यें मग सर्व कांहीं आलें. ह्मणजे गाईडचा पगार, रेलवे फर्स्ट क्लासचें भाडें, हमाली, रिकशॉ, हॉटेल, नोकरांचे पैसे वगैरे. फक्त लेमोनेड, सोडावॉटर वगैरे कांहीं पेय, किंवा नाटकाला किंवा खेळाला गेलें तर त्याचे पैसे, मात्र आह्मांला द्यावे लागत. एक येनची किंमत एक रुपया चौदा आण्यांजवळ आहे.

आह्मी नागासाकीहून निघालों, तेव्हां आकाश मेघाच्छादित होतें, व राहूनराहून पावसाच्या बारीकबारीक सरी येत होत्या, त्यामुळें रस्ते ओले चिंब झाले होते. रिकशांतून उतरवून गाईडनें आह्मांला वेटिंगरूममध्यें बसविलें. येथें जपानी लोकांची, विशेषत: जपानी बायांची मला पाहण्यासाठीं एकच धांदल उडाली ! एकीवर एक पडून अगदीं डोकावून पाहत होत्या. आमचा गाईड मला ह्मणाला "काय मॅडम ! या बाया तुह्माला पहात आहेत, याचा तुह्माला राग तर नाहीं ना येत ? जपानी बाई तुमच्या हिंदुस्तानांत गेली तर तिला पाहण्याची अशीच तुमच्या लोकांनां इच्छा होईल ! "

मी ह्मणालें "छे हो, त्यांत कसला आला आहे राग ? मला तर या बायांची उलट गंमत वाटते."

मग तेथून आमची ट्रेन लवकरच निघाली.

## जपानची आगगाडी व बाजूचा देखावा.

जपानमध्यें आगगाड्यांची चांगली सुधारणा केलेली आहे. एकदोन दिवसांचा लांबचा प्रवास करणाऱ्या गाड्यांत प्रवाशांची वर्गावर्गाप्रमाणें व्यवस्था केलेली असते. गाडींतूनच या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जाण्यायेण्याची व्यवस्था असते. तिसऱ्या क्लासांत इकडच्याप्रमाणें जरी

गर्दी असते, तरी पॅसेंजर्स लोकांनां चांगल्या तऱ्हेनें वागवितात. इकडच्याप्रमाणें भांडणें व गोंगाट होतांना दिसला नाहीं.

फर्स्ट क्लासचा डबा चांगला व मोठा लांब होता. त्यांत एकंदर अठरा सीटस् होत्या. डब्याच्या दोन्ही टोंकाला बाथरूमस् असून एक पुरुषांकरितां व दुसरी बायकांकरितां होती. डब्यामध्यें पांचसहा पिकदाण्याहि ठेवलेल्या असतात. जपानी लोक तंबाखु ओढण्यांत पटाईत असल्यामुळें थुंकण्याकरितां आणि राख वगैरे झाडण्याकरितां यांचा उपयोग करावयाचा. खिडकींतून बाहेर थुंकावयाचें नाहीं, कारण त्याच्या योगानें गाडीवर डाग पडतात. एकंदरींत जपानांत शक्य तितकें स्वच्छतेकडे लक्ष्य दिलें जातें.

फर्स्ट क्लास आणि सेकंड क्लासमध्यें एकेक पोर्टर हजर असतो. तो पॅसेंजर लोकांचें सामान पाहतो व नीट व्यवस्थेनें ठेवितो. शिवाय, बायकापुरुषांचे स्लीपरहि त्याच्याजवळ असतात. जपानी लोक बाहेर निघाले ह्मणजे खडावांसारखे लांकडाचे उंचउंच जोडे घालतात. कोणी इंग्लिश तऱ्हेचे बूटहि वापरतात. हे श्रीमंत जपानी लोक आगगाडींत बसले ह्मणजे आपले जोडे व बूट काढून ठेवितात, व तेथील पोर्टरजवळचे स्लीपर घालतात. प्रत्येकाजवळ एकएक ब्ल्यांकिट असतें, तें पोर्टर त्यांच्या बसण्याच्या जागीं चांगलें अंथरून देतो. शिवाय वारा भरण्याची उशी असते, त्यांत वारा भरून ती उशाला ठेवून देतो. मग या स्वाऱ्या धूम्रपान करीत व वर्तमानपत्रें वाचीत आपापल्या जागेवर लोळतात. यांची वर्तणूक सभ्य तऱ्हेची असते.

आमचे गाईडबुवा मध्येंमध्यें येऊन आजूबाजूच्या सीनरीकडे लक्ष्य देण्याला सांगत होते. गाडी समुद्राच्या बाजूनें चालली होती, व जिकडेतिकडे लहानमोठे डोंगर हिरव्यागार झाडांनीं आच्छादल्यामुळें फार मनोहर दिसत होते. डोंगराच्या पायथ्याशीं गव्हांचीं व भाजीपाल्याचीं शेतें, व त्यांवर उत्तम आलेलीं पिकें हीं पाहणाराला आनंद देत होतीं.

लहानलहान गांवांतूनसुद्धां नारिंगांचीं आणि सफरचंदांचीं झाडें फळांनीं ओथंबलेलीं होतीं. गाडींतून समुद्राची रम्य शोभा दिसत असते.

दीड वाजतां आमचा गाईड टिफिनबास्केट घेऊन आमच्या डब्यांत आला. कारण, गाडीला डायनिंगकार संध्याकाळीं लागणार होती, ह्मणून बऱ्याच इसमांनीं आपापल्या फराळाच्या करंड्या आणिल्या होत्या. जपानी लोकांनीं मात्र स्टेशनावरच आपलें फराळाचें विकत घेतलें. हें फराळाचें लांकडाच्या लहानलहान पेट्यांतून होतें, व या पेट्या चांगल्या चित्रविचित्र कागदांत गुंडाळलेल्या होत्या. एका पेटींत चांगला गरम भात, एकांत चारपांच तऱ्हेच्या भाज्या, व एका पेटींत कांहीं गोड पदार्थ असून, एक लहानशी फराळाची टोपली होती. हे पदार्थ खाण्याकरितां लेखणीसारख्या दोन बारीक काड्याहि असतात. त्यांनीं जपानी लोक भात, भाज्या, मिठाई वगैरे पदार्थ खातात. जेवण झाल्यानंतर जपानी लोक चहा पितात. या चहांत दूध किंवा साखर न घालतां नुसता कढतकढत घेतात. हा चहा चिनी किटल्यांतून बहुतेक मोठ्या स्टेशनावर विकत मिळतो.

आमच्या गाईडनें आमच्याकरितां दोन किटल्या विकत घेतल्या. पण तो दूधसाखरेखेरीज चहा आह्मांला कसा बरा लागणार ? तथापि गाईडचा आग्रह ह्मणून आह्मीं थोडथोडा घेतला. गाईड ह्मणाला "हा जपानी चहा थोडा तरी घेत जा; ह्मणजे इकडील थंडी तुह्मांला बाधणार नाहीं."

चार वाजतां गाडी मोजीला आली. पोर्टरनें आधींच आमचें सामान वगैरे बाजूला लावून ठेविलें होतें, व ब्रशनीं आमचे कपडे व जोडे साफ करून दिले. या त्याच्या कामगिरीबद्दल सर्वांनीं इच्छेनुरूप त्याला बक्षीस दिलें.

ट्रेनमधून उतरल्यावर गाईडनें आह्मांला स्टेशनावरील एका जपानी टीहॉऊसमध्यें नेलें. या टीहाऊसमध्यें खुर्च्या, टेबलें वगैरे इंग्लिश सामान नव्हतें; परंतु लहानसें घर असून स्वच्छ होतें, व खालीं चटया टाकल्या

असून त्यावर लहानलहान चौकोनी गाद्या बसण्याकरितां ठेविल्या होत्या. दुकानाचा मालक एका बाजूला उभट डौलाच्या एका शेगडींत विस्तव घालून शेकत बसला होता. त्याचें हातानें कांहीं बारीक तऱ्हेचें शिवणकाम चाललेंच होतें. आह्मांला पाहून उभें राहून त्यानें जपानी चालीप्रमाणें दोनतीन वेळां लवून सलाम केला, व लहानलहान गाद्या आह्मांला बसावयाला दिल्या.

एका लांकडाच्या नकशीदार तबकामध्यें तीनचार चहाचे कप आणि जपानी तऱ्हेचीं बिस्किटें घेऊन एक तरुण मुलगी आंतून आली, आणि मोठ्या अदबीनें गुडघे टेंकून तिनें चहाचे कप आह्मांला दिले.' या दुकानांत कांहीं सामान नव्हतें, किंवा दुकानाच्या लांकडी भिंतींनां तसबिरी वगैरेहि लाविलेल्या नव्हत्या; परंतु एका कोपऱ्यामध्यें भिंतीला लांकडी फळी ठोकून तीवर एक लहान धातूची मूर्ति ठेविली होती, व तिच्या गळ्यांत फुलांचे दोन हार होते. दोन्ही बाजूंनां पितळी निरंजन होतें. हें काय आहे, असें गाईडला विचारतांच " ही सिंटोची मूर्ति आहे, आणि सर्व जपानी लोकांच्या घरीं ही मूर्ति असून धूपदीप लावून सर्व लोक तिची पूजा कारितात, " असें त्यानें सांगितलें.

तेथून जवळच आमची लॉंच उभी होती. त्यांत बसून समुद्राच्या खाडींतून सिमोनासकीला आह्मी संध्याकाळीं दिवेलावणीला पोहोंचलों, व तेथें जवळच रेलवेहॉटेलमध्यें उतरलों.

## सीमोनासकी.

सीमोनासकी येथील रेलवे हॉटेल फार व्यवस्थित आहे. प्रत्येक रूममध्यें चांगलें उंची व मखमलीनें आच्छादिलेलें फर्निचर असून स्वच्छ पलंग, बिछाने, विजेचे दिवे वगैरे व्यवस्था उत्तम दिसली. जेवणाचा दिवाणखाना चांगला भव्य, स्वच्छ आणि चकचकीत होता. तरुण जपानी मुली वाढण्याकरितां तयार होत्या. या मुली आपल्या कामांत फार हुषार व वागणुकींत सभ्य असतात.

सीमोनासकी हें शहर जपानच्या इतिहासांत फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. इ.स. १८६४ सालीं इंग्लिश, फ्रेंच, डच व अमेरिकन् लढाऊ जहाजांनीं या शहाराला वेढा दिला होता. येथेंच जपानच्या पक्षाचा पराभव करून जपान देशांत परराष्ट्रांनीं व्यापार करण्याची मोकळीक मिळविली. हें शहर जपानच्या मुख्य बेटांतील एक आहे. येथें हल्लीं बरेच तऱ्हेचे उद्योगधंदे भरभराटींत आहेत. येथें आह्मी फार थोडा वेळ राहिलों, ह्मणून विशेष कांहीं पाहण्यास मिळालें नाहीं. सकाळीं रिकशांत बसवून गाईडनें आह्मांला इकडेतिकडे थोडें फिरविलें, आणि साडेनवांला ब्रेकफास्ट घेऊन आगगाडीनें आह्मी पुढें निघालों.

आमच्या फर्स्टक्लासमध्यें कांहीं यूरोपियन व बरीचशी जपानी मंडळी होती. यांमध्यें एक जोडपें होतें. नवऱ्यानें आपले जोडे वगैरे काढून व उशाला वारा भरलेली उशी घेऊन पाय लांब करून झोंपेला सुरुवात केली. जणूं काय फार दिवसांचें जाग्रणच झालें होतें! बायको थोड्याशा जागेमध्ये गुढघे टेंकून बसली. या जपानी बाईची नवऱ्याशीं फार अदबीची वागणूक दिसली. जपानी लोकांची—विशेषत: बायकांची—अशीच बसण्याची चाल आहे. ही बाई चांगली देखणी असून सडपातळ होती. तिच्या डोक्यावर कांहीं खऱ्याखोट्या केंसांचा सुंदर मुगुट केला होता व तोंडाला पावडर लाविली होती. ओंठ व गाल यांनां थोडा तांबुस रंग लाविला होता. ही बाई नवऱ्याचे पाय फार काळजीपूर्वक आपल्या मांडीवर घेऊन बसली होती. एकाच्या सुमाराला गाडी एका मोठ्या स्टेशनावर आली, तेव्हां ही जपानी बाई हळूच उठली, व नवऱ्याची झोंपमोड होऊं नये ह्मणून फार संभाळून हळुहळू त्याच्या जपानी लांब आंगरख्याचे खिसे चांचपूं लागली. नंतर एका खिशांतून एक लहानसें पैशांचें पाकीट काढलें, व भात, भाज्या, चहा, फळें वगैरे जिनसा तिनें विकत घेतल्या. ही बायकोची सर्व हालचाल त्या गृहस्थाला समजत होती, असें दिसलें. कारण, हे पदार्थ विकत घेतल्यावर त्याची

स्वारी जांभया आणि आंगमोडे देत उठून बसली ! बायकोनें लागलेच खाण्याचे ते सर्व पदार्थ पुढें केले. त्यांचा चट्टामट्टा करून आणि चहाचा पेला झोंकून स्वारीनें पुन: आपलें निद्राख्यान सुरू केलें ! बाकी राहिलेले पदार्थ त्या बाईनें लागतील ते खाऊन पुन: गुडघे टेंकून ती नवऱ्याच्या पायांशीं बसली. अशी ती दगडाच्या पुतळीसारखी बसलेली पाहून मला वाटलें, कीं, बिचारीचे पाय अगदीं मोडावले असतील; परंतु जपानी बायका नेहमींच अशा बसतात, व किती वेळ बसलें तरी त्याचें त्यांनां कांहीं वाटत नाहीं, असें गाईडच्या सांगण्यावरून समजलें. आमच्या-जवळ एक यूरोपियन गृहस्थ बसला होता, तो 'Poor girl, I am sorry for her' असें दोनतीन वेळ पुटपुटला.

असो. नंतर दोन वाजतां आह्मी स्टेशनवर उतरलों. तेथें मियाजिमाच्या हॉटेलचा मनुष्य सांपान ( होडी ) घेऊन आला होता. त्या होडींत बसून सभोंवतालचा सुंदर देखावा पहातपहात सुमारें अर्ध्यातासानें आह्मी मियाजिमाला पोहोंचलों. आमच्याबरोबर दोन यूरोपियन जोडपीं होतीं. पैकीं एक आमच्याप्रमाणेंच वयानें जरा पोक्त होतें, व दुसरें अगदीं तरुण होतें.

## मियाजिमा.

मियाजिमा हें एक लहानसें सुंदर बेट आहे. येथें एकच हॉटेल आहे. याला मिकॅडो हॉटेल ह्मणतात. हें हॉटेल समुद्रकिनाऱ्याजवळ एका सुंदर डोंगराच्या पायथ्याशीं बांधलें आहे. डोंगरावरून खळखळ वहात येणाऱ्या एका ओढ्यानें या हॉटेलला वेढा घातला आहे, त्यामुळें हें हॉटेल एकाद्या रमणीय जलमंदिराप्रमाणें दिसतें. याचे प्रत्येक भाग वेगवेगळाले बांधिलेले आहेत. ड्रॉइंगरूमची एक वेगळीच लहानशी इमारत आहे. डायनिंग हॉल वेगळाच सभामंडपासारखा चौकोनी आहे, व चार बाजूंवर खांबांनां लोखंडी शेगड्या केल्या आहेत. मिया-जिमाला बहुतकरून नेहमीं थंडी असते. ह्मणून जेवणाच्या वेळीं सकाळ

संध्याकाळ या शेगड्यांतून धगधगीत विस्तव पेटवितात. त्यामुळें या मंडपांत बसलें असतां ऊब येते, आणि मनाला फार आनंद वाटतो. या मंडपाला चारी बाजूंनीं खिडक्या असल्यामुळें चहूंकडील सुंदर देखावाहि पहाण्याला मिळतो.

व्हिजिटर्सनां उतरण्याच्या खोल्या आहेत, ती एक वेगळीच जागा बांधिली आहे. या सर्व इमारती लांकडाच्या केल्या असून एकमजली आहेत. खिडक्यांचीं व दरवाज्यांचीं तावदानें कागदांचीं आहेत. आमची खोली साधारण लहानच होती, परंतु आंत जरूरीच्या सर्व वस्तु होत्या. लहानमोठीं कपडे ठेवण्याकरितां तीनचार कपाटें आणि खुंट्या होत्या. एका बाजूला एक फायर प्लेस व एक वाफेनें गरम रहाणारें यंत्र होतें. ड्रेसिंग टेबल, वॉशिंग टेबल सर्व कांहीं काळजीपूर्वक ठेविलीं होतीं, नोकर बॉय वारंवार येऊन खोलींतील विस्तव वगैरे कमीजास्ती करण्याबद्दल चौकशी करीत असे.

थोडी विश्रांति घेतल्यावर चहा घेऊन गाईडच्या बरोबर आह्मी गांवांत फिरण्यास गेलों. मियाजिमा हें लहानसें गांव आहे. परंतु याच्या-विषयीं अशी आख्याइका आहे, कीं, जपानमध्यें ज्या तीन सुंदर जागा आहेत, त्यांपैकीं ही एक आहे. या बेटाची लांबी पूर्व-पश्चिम पांच मैल, व रुंदी दक्षिणोत्तर अडीच मैल आहे. या बेटावर पुष्कळशा सुंदर दऱ्या आणि आल्हादकारक गोड पाण्याचे जीवंत झरे आहेत. सभोंवतालचा देखावा रमणीय आहे. येथें किरकोळ लांकडी वस्तु-ह्मणजे पळ्या, चमचे, मुलांचीं खेळणीं, तबकें, डबे-केल्या जातात, व याच वस्तूंचीं बरींच दुकानें येथें आहेत.

रात्रीं जेवणाच्या वेळीं आमच्याबरोबर आलेलीं दोन्ही जोडपीं आह्मांला भेटलीं. त्या तरुण जोडप्याला फारसें बोलावयाला नको होतें; परंतु तें पोक्त जोडपें बरेंच बोलणारें होतें. विशेषतः बाई फार बोलकी होती. या बाईला कांहीं जपान आवडलें नाहीं, असें दिसलें. ती मला ह्मणाली

"I am disappointed here in Japan, and I do not like these—" हे जपानी नोकर मला आवडत नाहींत. ते उगीच सत्रा वेळां खोलीच्या दाराशीं ठकूठक् करून त्रास देतात. इकडील जेवणहि मनाजोगें नाहीं. सीनरीची आख्याइका आहे, तितकी ती चांगली नाहीं. याच्यापेक्षां उत्तमउत्तम सीनरी आमच्या अमेरिकेंत आहे. तुह्मी अमेरिकेंत गेलां ह्मणजे याचा प्रत्यय येईल."

असो. जेवतांनाहि एकसारखी तिची कुरकूर चालली होती. त्या वाढणाऱ्या जपानी मुलींनां तिनें अगदीं पुरेपुरे करून सोडलें होतें. "हे सुप चांगलेच नाहींत, हे थंडच आहेत, पुनः गरम करून आणा; या अमक्याअमक्यांत मिरेंच कमी आहेत, दुसरें करून आणा," अशी सारखी कटकट चालविली होती. नवरा बिचारा भिऊन गरिबासारखा बसला होता.

रात्रीच्या वेळीं हा जेवणाचा हॉल फार सुरेख दिसत होता, आणि त्या वाढणाऱ्या जपानी मुलीहि मोठ्या मौजेच्या दिसत होत्या. सर्वजणी बहुतेक सारख्याच ठेंगण्या बांध्याच्या, पायामध्यें लांकडी खडावा, अंगांत जाड किमोने व रेशमी रंगीबेरंगी पटक्यांनीं कंबरा बांधलेल्या. डोक्यावर काळ्याभोर केंसांच्या चांगल्या विंचरलेल्या मुगुटासारख्या वेण्या, व त्यांमध्यें चमत्कारिक फुलें किंवा बटरफ्लाइज वगैरे खोंचलेले. बारीक चिरीव डोळे, फुगीर लाल गाल, ओंठावर मंद हास्य, अशा या मुली हातांत डिशेस घेऊन माना डुलवीतडुलवीत एकामागून एक जेवणाच्या मंडपांत शिरत असत. जेवण वगैरे सर्व व्यवस्था यूरोपियन तऱ्हेचीच असे. मग आमच्या अमेरिकन बाईला तें कां आवडत नसे, कोण जाणे!

दुसऱ्या दिवशीं ब्रेकफास्ट घेऊन आह्मी तेथील प्रसिद्ध देऊळ पहावयाला गेलों. हें शिंटोचें देऊळ आहे. या देवळाच्या मूळस्थापनेची तारीख सांगतां येत नाहीं; परंतु याचें पुनरुज्जीवन बाराव्या शतकांत

झालें. देवळाच्या दोन्ही बाजूंनां लांबलांब दालनें असून हें देऊळ अगदीं समुद्रकांठीं असल्यामुळें हीं दालनें समुद्राच्या भरतीच्या वेळीं पाण्यांत तरंगतांना दिसतात, असें तेथील लोक ह्मणतात. या देवळाच्या समोर समुद्रामध्यें एक मोठा कापराच्या लांकडाच्या चौकटीचा दरवाजा केला आहे, आणि त्याला लाल रंग दिला आहे. हा दरवाजा पुष्कळ लांबून दिसतो. दरवाज्याची उंची साडेचवेचाळीस फूट आहे, व लांबी त्र्याहत्तर फूट आहे. हा हल्लींचा दरवाजा १८७५ मध्यें बांधला. येथें दरवर्षीं जपानी लोकांचा एक मोठा सण होत असतो. या वेळीं येथें किनाऱ्यावरच्या एक हजार दगडांच्या दीपमाळा आहेत, त्यांत दिवे लावितात, व समुद्रांत पोंहण्याच्या शर्यती, कुस्त्या वगैरे खेळ करितात.

आह्मी देऊळ पहात होतों, तेव्हां कांहीं जपानी ह्मातान्या बायाहि देवदर्शनाला आल्या होत्या. त्या देवापुढें पैसे ठेवून गुढघे टेंकून व हात जोडून बराच वेळ ध्यानस्थ बसत. ही त्यांची दर्शनाची तऱ्हा बहुतेक आपल्यासारखीच दिसली.

या देवाला कांहीं लोक घोडे वहातात, (नजर करितात). हे घोडे कोणच्याहि रंगाचे असले, तरी देवळांत राहिल्यानें ते पांढऱ्या रंगाचे होतात, अशी एक आख्यायिका गाईडनें आह्मांला सांगितली.

या देवळाजवळच एका टेंकडीवर १५८२ मध्यें कोरिया प्रांत सर केल्याबद्दल एक स्मारक हॉल बांधिलेला आहे. याला जपानी लोक सेंट जोजिका किंवा एक हजार चटईचा हॉल ह्मणतात. या हॉलजवळच एक पांच मजली पॅगोडा आहे. हें सर्व पाहून आह्मी हॉटेलमध्यें गेलों, व लंच घेऊन पुनः होडींत बसून रेलवे स्टेशनावर आलों. तेथें ट्रेनमध्यें बसून रात्रीं दहा वाजतां कोबेला पोहोंचलों.

## कोबे.

कोबे हें जपानमध्यें एक मोठें शहर आहे. येथें व्यापारधंद्याकरितां सर्वांनां मोकळीक आहे, व येथील बंदरांतहि फार मोठा व्यापार चालतो.

नेहमीं शेंकडों लहानमोठ्या बोटी येतजात असतात. हिंदुस्तानवासीय लोक येथें व्यापारधंद्याकरितां बरेचसे येऊन राहिले आहेत. येथील रेलवे स्टेशनहि बरेंच मोठें असून समुद्राला अगदीं जवळ आहे. आह्मी ट्रेनमधून उतरलों, व स्टेशनच्या बाहेर आलों. तेथें पुष्कळ रिकशे उभे होते. जपानमध्यें घोड्यांच्या गाड्या फारशा नाहींत, आणि बैलांच्या तर मुळींच नाहींत. रिकशांचीच फार चाल आहे. आणि तिकडील अरुंद रस्त्यांनां ते सोईचेच पडतात. हवा थंड असल्यामुळें लोकांनां ते ओढण्याचे फारसे श्रम वाटत नाहींत.

रात्रीच्या वेळीं कोबी शहराचा देखावा फार सुंदर दिसत होता. रस्त्यानें व दुकानांतून रंगीबेरंगी दिवे लाविले होते. आजूबाजूंचीं घरें व हिरवींगार झाडें दिव्याच्या उजेडांत अगदीं शांत दिसत होतीं. समुद्रामध्यें कित्येक लहानमोठ्या बोटी दिव्यांच्या मंदमंद उजेडांत विश्रांति घेत डुलत होत्या. एकंदरींत सर्व देखावा फार सुंदर दिसत होता. पाऊसहि चांगला उघडला होता. आह्मी सारखीं सातआठ तास गाडींत बसल्यामुळें अगदीं कंटाळून गेलों होतों, व केव्हां एकदांचीं हॉटेलमध्यें पोहोंचतों व विश्रांति घेतों, असें आह्मांला झालें होतें. परंतु रिकशामध्यें बसून तो कोबी शहराचा सुंदर देखावा दृष्टीस पडल्यावर मनाला आणि शरीराला बरीच हुषारी वाटली, व आळसहि कमी झाला. येथें आह्मी ग्रँड ओरिएंटल् हॉटेलमध्यें उतरलों होतों. हें येथील सर्वांत मोठें हॉटेल आहे. हें पांचसहा मजली असून अगदीं वरच्या मजल्यावर एक सुरेख बगीचा केला आहे. येथें तऱ्हेतऱ्हेचीं फुलझाडें लाविलीं असून कांहीं लॉन्स् केलेले आहेत. येथें आह्मी एकच रात्र राहिल्यामुळें येथील कांहींच पाहतां आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ब्रेकफास्ट घेऊन आह्मी ट्रेननें निघालों व दहा वाजतां ओसाकाला आलों.

## ओसाका.

ओसाका हें जपानांत मोठें नामांकित शहर आहे. येथें व्यापाररोजगार फार मोठा चालत असतो. येथें सुती, रेशमी आणि लोंकरी मालाच्या

पुष्कळ गिरण्या आहेत. दोन प्रसिद्ध जुनीं देवळें, टांकसाळ आणि एक मोठी गिरणीहि आह्मीं पाहिली. रिकशांत बसून दुकानें वगैरे शहराचा बराच भाग पाहिला.

## कियोटो.

दुपारीं साडेचार वाजतां आह्मी कियोटो शहरीं येऊन पोहोंचलों, व तेथें हॉटेलमध्यें राहिलों. हें हॉटेल व्यवस्थेशीर चालविलें आहे. याची इमारतहि मोठी आहे. सभोंवतीं सुंदर बाग आणि चेरीचीं झाडें आहेत. हे चेरीब्लॉसमचे दिवस असल्यामुळें या झाडांनां मनोहर फुलें आलीं होतीं. हीं चेरीफुलें फिकट गुलाबी रंगाचीं, अथवा पांढरीं असतात. हा चेरीब्लॉसम पाहण्याकरितां इंग्रज व अमेरिकन लोकांच्या दरवर्षी झुंडीच्या झुंडी येत असतात.

कियोटो हॉटेल या वेळीं यूरोपियन लोकांनीं गजबजून गेलें होतें. हॉटेलच्या खालच्या मजल्यावर बरींच जपानी मालाचीं दुकानें होतीं, व ड्राइंगरूमहि खालींच होतीं. तेथें बसलें, ह्मणजे दुकानदार व कांहीं जपानी बाया, हस्तिदंती, लांकडाचे व कासवाच्या पाठीचे खोदींव काम केलेले पंखे, फण्या, डबे वगैरे वस्तु खरेदी करण्याकरितां लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करीत.

कोणींहि भीक मागावयाची नाहीं, असा जपान देशांत कडक कायदा आहे. प्रत्येकानें कांहीं तरी उद्योगधंदा करून आपलें पोट भरावें, व जे अगदींच लुलेपांगळे असतील त्यांची व्यवस्था सरकार करतें. ह्मणून जपानमध्यें रस्त्यावर अथवा देवळांतून कोठेंहि भिकारी दिसत नाहींत. येथील आंधळे गरीब लोक दुसऱ्याची पायचेपी करून आपलें पोट भरितात. हे लोक या कामांत मोठे कुशल असतात, असें ह्मणतात. गरीब ह्माताऱ्या बाया लहान मुलांनां संभाळतात, किंवा दुकानदाराच्या बारीकसारीक जिनसा पाठीला बांधून विक्रीकरितां फिरतात.

# कियोटो.

कियोटो ही जपानची जुनी राजधानी आहे. १८६९ पर्यंत बादशहा व त्याचें दरबारी मंडळ येथेंच राहत असे. हें शहर रेशमी कापड आणि त्यावरील नकशीदार काम, ब्रांझवर्क, क्लाइसन, सातसुमा व इतर तऱ्हेच्या प्राचीन व अर्वाचीन कौशल्याबद्दल प्रसिद्ध आहे. येथें आह्मी ता. २ एप्रिल १९११ पर्यंत राहिलों. या वेळांत येथील व आसपासचीं प्रसिद्ध स्थळें, मनोरंजक देखावे व देवळें पाहिलीं.

येथील जुना राजवाडा पाहण्यास सरकारी परवानगी लागते, आणि ती ब्रिटिश ॲंबॅसेडरच्या मार्फत सहज मिळते. या वाड्याला एकांत एक असे तीन मोठे परकोट आहेत, व या परकोटांनां चारी दिशांनां चार भव्य दरवाजे आहेत. मुख्य दरवाज्यानें आंत गेलें ह्मणजे पॅलेस ऑफिसरला पास दाखवावा लागतो, व त्याच्या रजिस्टरांत सह्या कराव्या लागतात. नंतर तो, एक गाईड बरोबर देऊन वाडा दाखविण्याची तजवीज करितो.


पॅलेसच्या दालनाजवळ गेलों, तेव्हां तेथील गार्डानें आमच्या पायांत कापडाचे शिवलेले जोडे घातले; बरें झालें, कीं, आह्मांला बूट काढावे लागले नाहींत. कारण, ते जोडे आमच्या बुटांवरूनच बांधिले. ही जोडे घालण्याची पद्धत स्वच्छतेकरितां आहे. कारण, बाहेर चालून आलेले जोडे धुळीनें भरलेले असल्यामुळें आंतील स्वच्छ जागा खराब होण्याचा संभव असतो, ही गोष्ट खरी आहे; पण मला वाटतें कीं, ही चाल फक्त स्वच्छतेकरितां नाहीं. यामध्यें कांहीं धर्माचा व रूढीचाहि भाग असावा. जपानी लोक लांकडी अथवा गवताचे जोडे घालतात, आणि देवळांत किंवा कोणाच्या घरीं गेलें असतां बाहेर दरवाज्याशीं काढून ठेवितात. यावरून असें दिसतें, कीं, आपल्या इकडील चालीप्रमाणें जपानांत जोडे घालून आंत जाणें चांगलें समजत नाहींत. आमचा गाईड ह्मणाला, कीं, हें त्यांच्या धर्माच्याहि विरुद्ध आहे.

नंतर कपड्याचे जोडे घालून आह्मी वाड्यांत गेलों. जपानी पद्धतीप्रमाणें वाड्याची सर्व इमारत लांकडाची केली आहे. खिडक्यांचीं व दरवाज्यांचीं सर्व तावदानें पांढऱ्या कागदाचीं केलीं आहेत. वाड्यामध्यें जिकडेतिकडे लांब दालनें आहेत, आणि मध्यें कांहीं लहानमोठे हॉल आहेत. यांपैकीं कांहीं हॉल खास मुलाखती घेण्याकरितां आहेत, व या हॉलच्या मागें गुप्त खोल्या आहेत. या खोल्यांतून बादशहाच्या संरक्षणार्थ त्या वेळीं हत्यारबंद शिपाई ठेविलेले असत, व क्वचित् त्यांचा उपयोग बादशहाची इतराजी असलेल्या लोकांनां दग्यानें पकडण्यांतहि होत असे. बादशहाच्या निजण्याच्या खोलीची आणि सभोंवतालच्या दालनांची तक्तपोशी अशी केली आहे, कीं, तीवरून कितीहि हळू चाललें, तरी चाहूल ऐकूं येते. त्या वेळीं बादशहाच्या जीवाला पुष्कळ धोके असत, ह्मणून अशा तऱ्हेच्या व्यवस्था करीत असत.

इ. स. १८६८ मध्यें हल्लींच्या बादशहाला याच वाड्यांत राज्याभिषेक झाला होता. येथें बादशहा अलीकडे क्वचित्च येतो. हा वाडा आतां लोकांनां पाहण्याकरितांच आहे. वाड्यांतील भिंतींवर प्रसिद्ध चित्रकार कानो व त्याच्या शिष्यवर्गानें काढलेलीं चित्रें अजून चांगलीं आहेत, व भिंतींवरील लांकडी खोदींव कामहि फार सुरेख आहे. असें सांगतात, कीं, हें काम करणाऱ्या कारागिराचा एक हात अधु असून हें सर्व काम त्यानें एका हातानें केलें आहे !

या राजवाड्याशिवाय आणखी तीन राजवाडे आहेत. दोन उन्हाळ्यांत राहण्याकरितां व तिसरा इ. स. १६०४ मध्यें शोगन (प्रधान) आयासूनें बांधिलेला किल्ला आहे. या राजवाड्यांत पाहण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. भिंतींवरील जुनीं चित्रें आणि लांकडी खोदींव काम, एवढेंच आहे. हंड्या, झुंबरें, तसबिरी, टेबलखुर्च्या, पलंग वगैरे कांहींएक नाहीं. जिकडेतिकडे लांकडाची तक्तपोशी व त्यावर गवताच्या चटया अंथरल्या आहेत, व कांहीं खोल्यांतून लहान गाद्या व उशा ठेविल्या होत्या. कोठें-

9236



Karora-o, One of National Treasures

कारोराओ.

कोठें दिवे लावण्याकरितां लोखंडाचे आंकडे व कोठें कागदाचे कंदील लटकाविले आहेत. जपानी लोक टेबल, खुर्च्या, पलंग वगैरे इंग्लिश सामान अजून फारसें वापरीत नाहींत, असें दिसलें. लहानलहान चौकोनी गाद्यांचा ते उपयोग करितात. याच गाद्या एकावर एक ठेवून दिवसा बसण्याच्या, व रात्रीं एकाला एक जोडून त्यांच्या बिछान्याच्या कामीं उपयोग करण्याचा प्रघात आहे.

या शहरीं पुष्कळ जुनीं प्रसिद्ध देवळें आहेत. पैकीं होकोजी नांवाच्या देवळांत बुद्धाची मोठी मूर्ति आहे. हिची उंची ४२ फूट, तोंडाची रुंदी २४ फूट, लांबी ३० फूट व मानेचा परीघ ३६ फूट आहे. या देवळांत एक मोठी धातूची घांट आहे; तिची उंची १४ फूट, कक्षा ९ फूट व जाडी ९ इंच आहे. शिवाय लहानमोठ्या घंटा पुष्कळ आहेत. कांहीं घंटा बऱ्याच उंच बांधिल्या आहेत. या घंटांचीं लहान, परंतु उंच देवळें पृथक्पृथक् बांधिलेलीं असतात, व ह्यातारे पुजारी जपानी भाषेंत कांहीं मंत्र ह्मणतांना घंटांच्या दोऱ्या हालवीत असतात. तेथें भाविक स्त्रीपुरुषांची गर्दी असते. कोणी बाया आपल्या मुलांबाळांबद्दल विचारीत असतात, कोणी आपल्या नशिबाविषयीं विचारीत असतात, तर कोणी आपल्या घरचीं मेलेलीं माणसें स्वर्गस्थ झालीं किंवा नाहीं तें विचारीत असतात. या सर्वांपासून दक्षिणा घेऊन पुजारीबुवा जोरानें घंटा वाजवून कांहीं वेळ ध्यानस्थ बसत होते, आणि मग कागदांच्या चिठ्यांवर कांहीं लिहून देत होते. कोणाला कांहीं तायत्या व भारलेल्या अंगाऱ्याच्या पुड्या वगैरे देत असत.

यांतून कांहीं लिहिलेल्या चिठ्या निघत असत. त्यांत त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें मिळत असत. आह्मी कांहीं वेळ तेथें उभे राहून ही सर्व मौज पाहत होतों व गाईड आह्मांला इंग्लिशमध्यें सर्व समजावून सांगत होता. गाईड आह्मांला विचारूं लागला, "तुमच्या हिंदुस्तानांतहि असे देवभोळे लोक असतीलच !"

आणखी या मोठमोठ्या देवळांच्या कंपाउंडमध्यें इतर देवांचीं लहान-मोठीं बरींच देवळें असतात. त्यांत देवीचीं देवळें जिकडेतिकडे बरींच आढळलीं. या देवतेची आराधना बायका फार करितात, असें दिसलें. ज्या बायांचीं लहान मुलें मरतात, त्या बाया या देवतेला बाहुल्या आणून वाहतात, व दुसरें मूल लवकर दे ह्मणून तिची प्रार्थना करितात. मुलगा व्हावा अशी इच्छा असली, तर देवीला बाहुला, व मुलगी व्हावी अशी इच्छा असल्यास बाहुली वाहतात. एक बाई लहान मुलगी घेऊन देवीजवळ आली होती, व पुजारीबुवाला विचारीत होती, कीं, "मी देवी-जवळ मुलगा मागितला असतां मुलगी झाली आणि माझ्या शेजारणीनें मुलगी मागितली असतां तिला मुलगा झाला." यावर पुजारीबुवा त्या बाईची समजूत घालीत होते, कीं, "तुमच्या मागण्यांत कांहीं चुकी झाली असेल. परंतु आणखी कांहीं बाहुल्या व दक्षणा वगैरे देवीला आणा, ह्मणजे तुमच्या इच्छेप्रमाणें देवी फळ देईल."

आणखी एक मोठें बुद्धाचें देऊळ पाहण्याला गाईडनें आह्मांला नेलें. या देवळाचा सभामंडप फार विस्तीर्ण होता, व मध्यभागीं मोठी भव्य मूर्ति होती. या मूर्तीच्या दोन्ही बाजूंला काननदेवतेच्या ३३३३३ लांकडी मूर्ति उतरत्या पायऱ्यांवर ठेविल्या आहेत, व या मूर्तींनां दत्तासारखीं तीन तोंडें व सहा हात आहेत. चिवोनीन हें एक कियोटोमध्यें प्रसिद्ध देऊळ आहे, व येथें एकेक लक्ष पौंड वजनाच्या कांहीं घंटा आहेत. या घंटा पंचधातूच्या केलेल्या आहेत, असें ह्मणतात.

हीं सर्व देवळें लांकडाचीं केलेलीं असतात. ह्मणून यांनां आग लागण्याची फार भीति असते, व बहुतकरून वर्ष दोन वर्षांनीं नेहमीं या देवळांनां आग लागून फार नुकसान होतें; परंतु जपानी लोक लाग-लीच वर्गणी जमा करून व कांहीं सरकारांतून मदत घेऊन देवळें पुनः जशींच्यातशीं बांधून तयार करितात.

की काकुजी या नांवाचें येथें एक प्रसिद्ध स्थळ आहे, तें एका सुंदर टेंकडीच्या पायथ्याशीं बांधिलें असून त्याच्यासभोंवतीं एक सुंदर बाग केलेली आहे. बागेच्या मध्यभागीं एक चांगलें तळें आहे. या बागेला लागूनच दुसरी एक बाग आणि बंगला आहे. याला Silves Pavilion असें ह्मणतात. येथील बंगल्यांत आशिकागाशिगन (Ceremonious tea ) विधियुक्त चहा पीत असे.

आमच्या गाईडनें या सर्व गोष्टी पाठ करून ठेविल्या होत्या,असें दिसलें. कोठेंहि गेलें, तरी तो आपला एकसारखा पाढा वाचीत असे. त्या अमक्या राजानें असें केलें, त्या अमक्या प्रधानाच्या वेळीं असें झालें, असें आपलें लांबलचक करून सांगत असे. जसें आपल्याकडे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं गेलें ह्मणजे तेथील उपाध्ये, बडवे लोक यात्रेकरूंनां पुष्कळसें भारूड सांगत असतात, तशासारखेंच आमच्या गाईडचें चालत असे.

तरी गाईड आह्मांला ह्मणत असे, कीं,"अमेरिकन लोकांसारखे तुह्मी मला कांहींच प्रश्न करीत नाहीं; ह्मणून मी तुह्मांला फारसें सांगत नाहीं. त्या लोकांनां तर पुष्कळ गोष्टी सांगाव्या लागतात. तेव्हां त्यांनां वाटतें, कीं, गाईड चांगला हुषार आहे."

याशिवाय अर्वाचीन सुधारणेपैकीं इम्पीरियल म्युझियम, फाइन आर्ट म्युझियम, इम्पीरियल युनिव्हर्सिटी, व इतर कांहीं संस्था पाहिल्या.

एके दिवशीं कियोटोहून रेलवेनें ११ मैल लांब, कमीओका या स्टेशनावर गेलों व तेथून रिकशांत बसून होझु नांवाच्या गांवीं गेलों. रस्त्यानें गव्हांचीं हिरवींगार शेतें आणि भाजीपाल्याचे मळे बरेच दिसले. येथील शेतें लहानच, पण फार सुरेख असतात. जमीन जिकडेतिकडे रेताडच, पण जमिनीची मशागत उत्तम करून तांदूळ, गहूं, भाज्या, फळें वगैरेंचीं पिकें जपानी लोक चांगलीं काढतात. गांवांत जेवढें मलमूत्र निघेल, तेवढें ते लोक शेतांत नेऊन टाकतात. शेतांतून याच्याकरितां जागजागीं विहिरी केलेल्या असतात, व त्यांत हें मलमूत्र सांचवून, खत तयार करून तें खत पिकाला देतात.

होझु हें गांव थोडें उंचीवर आहे व येथें मोठी खडकाळ नदी आहे. येथें घाटावर बऱ्याच होड्या होत्या, त्यांपैकीं गाईडनें आमच्याकरितां एक ठरविली. होडींत बसतेवेळीं त्यानें आह्मांला सांगितलें, कीं, "खूब घट्ट धरून बसा."

कांहीं यूरोपियन मंडळीहि आली होती. त्यांनींहि तीनचार होड्या घेतल्या. या मंडळीनें आपल्याबरोबर फराळाच्या पेट्या, व सोडावॉटर वगैरे खाण्यापिण्याच्या जिनसा बऱ्याच आणल्या होत्या. यांच्याबरोबरहि दोघेतिघे जपानी गाईड होते. या गाईड लोकांनीं यूरोपियन पोषाक केला होता, तें पाहून आमचा गाईड ह्मणाला "मीहि आतां यूरोपियन ड्रेस करीत जाईन!" आणि त्याप्रमाणें आमचे गाईड इनोइसन हे दुसऱ्या दिवसापासून थेट यूरोपियन बनले, व आपल्या जपानी ड्रेसला त्यांनीं रजा दिली.

आह्मी या खडकाळ व जोरानें वाहणाऱ्या नदींतून तेरा मैल गेलों. कोठेंकोठें तर हे जोरानें वाहणारे प्रवाह फारच भयंकर आहेत. दोन्ही बाजूंनीं मोठमोठे नोकदार खडक व मध्यें अगदीं अरुंद जागा आहे. पाणी अतिशय जोरानें व कर्कश आवाज करीत वाहत असतें. तें पाहून असें वाटे, कीं, आतां या एवढ्याशा जागेंतून होडी जाईल तरी कशी? मनांत येई, कीं, झालें—आतां येथें होडी खास उलटणार, व या भयंकर प्रवाहांत हालअपेष्टा होऊन या परकीय देशांत आपला अंत होणार! कांहीं विपरीत झालें, तर अशा या खडकामध्यें कोणी मदत तरी कशी करणार? आमच्याबरोबर आणखी चारपांच होड्या होत्या; परंतु सर्वांच्यापुढें आमचीच होडी होती. कसेंहि असो; आपल्यामागें कांहीं लोक आहेत, असें मनाला वाटून थोडा धीर येत असे.

गाईड घटकोघटकीं मला ह्मणत असे, कीं, "मॅडम, कांहीं भिऊं नका. आमचे हे जपानी नावाडी फार हुषार आहेत, व या नदींतून होड्या नेण्याची त्यांनां नेहमीं सवय आहे. ते कांहींएक धोका होऊं देणार नाहींत."

असे हे सातआठ ( Rapids ) प्रवाह ओलांडल्यावर मग पुढें नदीचें पात्र चांगलें रुंद झालें, आणि तेथें पाणीहि अगदीं उथळ आहे, ह्मणून पुढें होड्या जाऊं शकत नाहीत. नदीच्या दोन्ही बाजूंची सीनरी हिरवीगार दिसत होती. आमचा गाईड ह्मणाला, कीं, "वसंतऋतूमध्यें आझेली या फुलांनां भर येतो. तेव्हां या नदीच्या दोन्ही बाजू फार सुंदर दिसतात, व त्या वेळीं पुष्कळ लोक पिकनिककरितां येथें येतात."

त्या उथळ पाण्यांत आह्मांला कांहीं लहानलहान होड्या दिसल्या. या होड्यांनां लांबलांब दोऱ्या बांधिलेल्या होत्या, व कांहीं नावाडी त्या दोऱ्या धरून या होड्या पाण्यांत इकडेतिकडे लहान मुलाच्या गाड्या-सारखे ओढीत होते. होड्यांतून जपानी लोक आपलीं बायकामुलें घेऊन बसले होते, व तेथेंच त्यांचा चहा वगैरे फराळ चालला होता. तो एक मोठा मजेदार देखावा दिसत होता.

होडींतून उतरून जवळच नदीच्या थडीवर एक जपानी इन होती, तेथें आह्मी गेलों. दरवाज्याशीं दोघी तरुण मुली उभ्या होत्या, त्यांनीं आमच्या बुटावर कापडी जोडे चढविले, तेव्हां आह्मांला आंत घेतलें. हें लहानसें दोन मजली घर स्वच्छ व व्यवस्थेशीर होतें. त्या मुलींनीं आह्मांला वर नेलें आणि खिडक्या वगैरे खालीं वर सरकवून आमच्या-करितां एक लहानशी खोली तयार केली. बसण्याकरितां तेथें एक लांकडी बांक होतेंच व मध्यें एक टेबल होतें. तेथून खालीं नदीचा देखावा फार मनोवेधक दिसत होता. चहा वगैरे घेऊन थोडी विश्रांति घेतल्यावर आह्मी रिकशांत बसून संध्याकाळीं कियोटोला परत आलों.

## बीवा तळें.

कियोटोहून ११ मैलांवर बीवा नांवाचें जपानमध्यें सर्वांत मोठें तळें आहे. तेथें रेलवेनें अथवा रिकशांत बसून जातां येतें. ब्रेकफास्ट झाल्यावर रिकशांत बसून आह्मी हें तळें पहावयाला गेलों. त्याचा परीघ ३८ मैल आहे. हें तळें कियोटो शहराला पाण्याचा पुरवठा करितें.

शहरांतील कारखानेहि याच्यावरच चालतात. तळें पाहून कारासाकी या गांवीं गेलों, व तेथें असलेलें एक हजार वर्षांचें जुनें झाड पाहिलें. तें पाहून एका इनमध्यें लंच घेतली. नंतर पुनः रिकशांत बसून बोटसुया गांवीं आलों, व होडींत बसून बीवा कॅनलनें कियोटोला परत आलों. हा बीवा कॅनल ७॥ मैल लांब आहे, आणि हा डोंगराच्या खालून खोदीत नेला आहे, ह्मणून याला तीन बोगदे आहेत. त्यांपैकीं सर्वांत मोठा बोगदा २४३६ मिटर लांब आहे. यांत विजेचे दिवे लावले आहेत, तरी बराच अंधार असतो. मध्येंमध्यें बऱ्याच कोळशाच्या खाणी आहेत, ह्मणून कोळसे नेणाऱ्या बोटींची नेआण चाललेली असते. आमच्या बोटीवर गाईडनें दोन जपानी कंदील घेतले होते. चार नावाडी होते. पुढून येणाऱ्या बोटींशीं टक्कर होऊं नये, ह्मणून हे नावाडी मोठ्यानें ओरडून त्यांनां सूचना करीत होते. या काळोखी बोगद्यांत मला फार भीति वाटूं लागली, व केंव्हां एकदां उजेडांत जातों असें होऊन मनामध्यें नाहींनाहीं त्या कल्पना येऊं लागल्या. येथें मला त्या खडकाळ व जोरानें वाहणाऱ्या नदीची आठवण झाली, व वाटलें, कीं, तेथें चांगला उजेड व मोकळी हवा तरी होती !

मीं मनांतल्या मनांत किती तरी ईश्वराचा धांवा केला, व नवसहि केले; गाईडचाहि मला राग आला. वाटूं लागलें, कीं, हा गाईड आह्मांला उगीच भलत्यासलत्या जागीं घेऊन येतो. या काळोखामध्यें पहायचें होतें तरी काय ? विजेचे दिवे पण तेहि अगदीं मंद होते.

जेंव्हां त्या काळोख्या बोगद्याच्या बाहेर आलों,आणि जिकडेतिकडे चकचकीत सूर्यप्रकाश, सुंदर हिरवेगार डोंगर वगैरे पाहिले, तेंव्हां हुषारी येऊन भीति नाहींशी झाली.

असो. अशाच तऱ्हेचें कांहीं संकट जेंव्हां मनुष्यावर येतें, तेंव्हांच त्याला ईश्वराची खरी आठवण होते; परंतु सुखाच्या व आनंदाच्या वेळीं मनुष्याला ईश्वराचा विसर पडतो, असा अनुभव सर्वांनां आहेच.

# जीजत्सु.

ही एक प्रकारची जपानी कुस्ती आतां हिंदुस्तानांत पुष्कळ लोकांनां ऐकून माहीत झाली आहे. या कुस्त्यांची तालीम घेण्याकरितां कियोटोमध्यें म्युझियमजवळ एक मोठा औरसचौरस हॉल बांधिला आहे व हॉलमध्यें ठळक जागीं राजाकरितां व राजपुत्रांकरितां बसण्याच्या जागा केल्या आहेत.

एके दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां या कुस्त्या पाहण्यास आह्मी गेलों. तेथें त्यांच्या नेहमींच्या चालीप्रमाणें एकानें येऊन आमच्या बुटांवर कापडी जोडे अथवा मोजे चढविले, व मग आह्मांला आंत घेतलें. हा हॉल मुलांनीं व तरुण माणसांनीं अगदीं गजबजून गेला होता. या कुस्त्यांमध्यें दहापासून पंधरासोळा वर्षांच्या वयाचीं मुलेंच पुष्कळ होतीं. या मुलांनां ते मोठे पुरुष कुस्त्यांचे डाव, पेंच वगैरे शिकवीत होते. तिकडील थंड हवेमुळें मुलें चांगलीं सशक्त दिसत होतीं, आणि या कुस्तीच्या व्यायामानें त्यांच्या तोंडावर चांगला लाल रंग आला होता. हा देखावा मोठा मनोरंजक दिसत होता.

या हॉलच्या एका बाजूला कांहीं तरुण बायांचा घोळका जमलेला होता. या घोळक्यामध्यें एक तरुण मुलगी हातांत एक लांब भाला घेऊन या बायांनां भाल्याचा फेरफटका शिकवीत होती. ती मुलगी भाला घेऊन मागेंपुढें उड्या मारून त्या इतर बायांनां भाल्याचा उपयोग कसा करावा हें समजावून सांगत होती, व त्या बायाहि तिच्या हावभावांचें लक्ष्यपूर्वक अनुकरण करीत होत्या.

असें ह्मणतात, कीं, या मुलीच्या घराण्यांतील बहुतेक सर्व बाया भाल्याचा उपयोग करण्यांत फार वाकब होत्या व आहेत. याच घराण्यांतील बाया इतर बायांनां भाल्याचे हात शिकवीत असत.

मला त्या कुस्त्या पाहण्यापेक्षां त्या हंसतमुखी बायांचा घोळका, व ती भाला घेऊन उभी असलेली मुलगी पहाणेंच फार गमतीचें

वाटलें. मी बराच वेळ तेथें उभी राहून, त्या घोळक्याकडे पहात उभी होतें. ती मुलगी व कांहीं बाया आह्मी परकीय आहोंत हें पाहून आमच्याकडे आल्या, व आपल्या जपानी चालीप्रमाणें त्यांनीं खूब लवूनलवून सलाम करून आह्मी कोण, कुठचीं वगैरे विचारपूस केली.

## नाट्कगृह.

एके दिवशीं आमचा हेडवेटर आमच्या टेबलाजवळ येऊन आह्मांला विचारूं लागला "तुह्मीं कियोटोमध्यें कायकाय पाहिलें? तुह्मांला काय आवडलें? तुह्मीं आमचीं कांहीं जपानी नाटकें पाहिलीं कीं नाहीं? तीं फारच चांगलीं होत असतात.

त्याला बरेंच इंग्लिश बोलतां येत होतें, व तो जेवणाच्या वेळीं सर्वांच्या टेबलाजवळ जाऊन समाचार घेत असे. "आज तुह्मी नाटकाला जाच!" अशी त्यानें फार कळकळीनें शिफारस केली. 'Oh Sir, you must go to-night to the theatre. I go every night."

असें त्यानें हातवारे करून आह्मांला सांगितलें, व आमच्याहि मनांत आलें, कीं, एकादें जपानी नाटक पहावें. त्याप्रमाणें आह्मी आपला नाटकाला जाण्याचा विचार गाईडला सांगितला. परंतु तो गाईडच्या मनाला येईना. तो ह्मणूं लागला "जपानी भाषेंत नाटक होणार तें तुह्माला समजणार कसें? व नाटकाला जावें असें कुकच्या प्रोग्राममध्यें लिहिलेलें नाहीं!"

आह्मीं त्याला सांगितलें "कुकच्या प्रोग्रामशीं आह्मांला काय करायचें आहे. तिकीटाचे पैसे आह्मीं देऊं. मग तर तुला एवढें भिण्याचें कारण नाहीं ना?"

आमच्या गाईडला शाळा व गिरण्या वगैरे पाहण्याला चल ह्मटलें, ह्मणजे त्याच्या जिवावर येत असे. तो आह्मांला देवळें व बागबगीचे पाहण्याला नेत असे. तो ह्मणत असे, कीं, अमेरिकन लोकांनां तर देवळें पाहणेंच फार आवडतें. असो.

जेवणानंतर आह्मी नाटक पाहण्याला गेलों. तेथें पहिल्या वर्गांत पांच-सहा यूरोपियन बायकापुरुष होते. बाकी बऱ्याच खुर्च्या रिकाम्या होत्या. परंतु तिसरा वर्ग जपानी लोकांनीं अगदीं गच्च भरून गेला होता. या जमावामध्यें बायकांचीच संख्या अधिक दिसत होती. हा तिसरा वर्ग स्टेजच्यापुढें खोलगट अशा सपाट जागेवर होता, आणि वीत दीडवीत उंचीच्या लांकडी फळयाच्या मध्येंमध्यें पार्टिशन करून चौकोनी हौदासारखे बॉक्सेस केले होते. त्यांमध्यें आठआठ, सहासहा इसमांना बसण्यास जागा होती. कांहीं प्रेक्षक लोक जेवण वगैरे तेथेंच उरकीत होते. या लोकांचे जेवणाचे पदार्थ कोठेंहि मिळतात, व ते खाण्याचा विशेष त्रासहि पडत नाहीं. लांकडाच्या डब्यांतून भात, भाज्या, गोड पदार्थ मिळतात, ते काड्यांनीं खावयाचे आणि डबे फेंकून द्यावयाचे. नंतर थोडा गरम चहा घेतला, कीं, झालें जेवण !

कांहीं बाया व तरुण मुली तोंडाला रंग आणि पावडर लावीत असत. जपानी बाया तोंडाला, गालांला व ओठांला वगैरे रंग लावण्याच्या फार शोकी असतात. लाल व गुलाबी रंगाची पावडर, ब्रश व एक लहानसा आरसा, या सामानाची एक छोटीशी पिशवी नेहमीं त्यांच्या खिशांत असते, व मनाला वाटेल तेव्हां त्या तिचा उपयोग करितात.

नाटकाचे एकदोन अंक पाहून आह्मी लवकरच हॉटेलमध्यें परत आलों. कारण, भाषा समजत नसल्यामुळें नाटकांत विशेष गोडी लागेना. जरी गाईड आह्मांला समजावून सांगत होता, तरी दुसऱ्याच्या सांगण्यामध्यें व स्वतःला समजण्यामध्यें पुष्कळ अंतर असतें; व आमच्या हेडवेटरनें जी अगदीं जीव तोडून तारीफ केली होती, तसें कांहीं नाटक सुरेख नव्हतें.

## कियोटो युनिव्हर्सिटी.

सकाळीं दहा वाजतां आह्मी कियोटो युनिव्हर्सिटी पहावयाला गेलों. थोडाथोडा उघडझांपी पाऊस पडत होता, व हवा अगदीं सर्द झाली

होती. तिच्याबरोबर बर्फाचे बारीकबारीक तुषारहि वर्षाव करीत होते; ते यांच्या काळ्या कोटावर जणूं मोत्यांच्या दाण्यांप्रमाणें चमकूं लागले. हवा जरी इतकी थंड झाली होती, व मधुनमधून हलक्या बर्फाचा वर्षाव चालला होता, तरी शरीराला आणि मनाला कोणत्याहि तऱ्हेचा आळस किंवा सुस्तपणा वाटत नव्हता. उलट आणखी हुषारी येत असे, व वाटे, कीं, कितीहि थंडी व पाऊस असला, तरी जाड कपडे घालून फिरत असावें. जपानी लोकहि मोठे बाहेर फिरणारे दिसले. पाऊस असो, थंडी असो, ज्या रस्त्यानें जावें, त्या रस्त्यानें पुरुष, बायका, मुलें यांची सारखी गर्दी असावयाची.

या वेळींहि आमच्यासारख्या प्रेक्षक लोकांची पुष्कळ गर्दी होती. दरवाज्यावर पास घेऊन आह्मी आंत गेलों. युनिव्हार्सिटीची इमारत साधारण बरीच मोठी आहे, व कंपाउंड चांगलें विस्तीर्ण आहे. येथें मुलांनां सर्व तऱ्हेचे शास्त्रीय व विजेचे प्रयोग वगैरे फार काळजीपूर्वक शिकवितात.

## चेरीडान्स.

हा चेरीडान्स एप्रिलपासून सुरू होतो. तो महिना दीडमहिना रोज रात्रीं होत असतो. हा चेरीडान्स व चेरीब्लॉसम पाहण्याकरितां जपानमध्यें दूरदूरचे यूरोपियन लोक दरवर्षी येत असतात. विशेषतः अमेरिकन लोक फार येतात.

एप्रिलच्या पहिल्या तारखेला ह्मणजे ज्या दिवशीं डान्सला सुरुवात झाली, त्याच दिवशीं हा डान्स पहावयाला आह्मी गेलों. संध्याकाळीं साडेपांच वाजतां थिएटरचे दरवाजे उघडले. पहिल्यानें आह्मां सर्व प्रेक्षकांनां बाहेरील एका हॉलमध्यें बसविलें. येथें बसण्याकरितां लांकडाचें एक बांक होतें, व पुढें एक लहान टेबलासारखी पाटी होती. नंतर उत्तम शृंगार केलेल्या मुली येऊन त्यांनीं सेरिमोनियस टी तयार केला. हा चहा तयार करण्याकारितां हॉटेलच्या एका बाजूला एक टेबल ठेविलें

होतें, व त्यावर दोन शेगड्या होत्या. या शेगड्यांवर त्या मुलींनीं नाटकी हावभाव करीत खापरी भांड्यांत चहा तयार केला.

मग आणखी कांहीं मुली येऊन त्यांनीं लहान चिनी पेल्याबशांतून तो चहा आणि कांहीं मिठाई प्रत्येक प्रेक्षकाला मोठ्या अदबीनें लवून आणून दिली. तो चहाचा पेला व बशी ज्याला वाटेल त्यानें सेरिमोनियस टीच्या स्मरणार्थ घेऊन जावें, अथवा नको असल्यास तेथेंच टाकून यावें, असा रिवाज आहे. चहाचा समारंभ झाल्यावर आह्मी थिएटरमध्यें गेलों. आमच्या सीटस् वरच्या मजल्यावर होत्या. सर्व थिएटर चेरीच्या फुलांनीं व कागदाच्या रंगीबेरंगी दिव्यांनीं सुशोभित केलें होतें.

स्टेजच्या दोन्ही बाजूंनां रांगेनें सरसरी ६० मुली चांगला पोषाक करून व हातांत निरनिराळीं वाद्यें घेऊन बसल्या होत्या. नंतर ६०।७० शृंगार केलेल्या नाचणाऱ्या मुली येऊन हावभाव करीत नाचूं लागल्या. या मुलींवर देखरेख करण्याकरितां दोघी ह्माताऱ्या बाया त्यांच्यामागें रहात होत्या. या ह्मातान्या बाया स्टेजवर नाचावयाच्या वेळेस मध्येंमध्यें मिरवतांना पाहून प्रेक्षकांची मनें विरस होत. मग त्या कोणाची देखरेख करीत होत्या, कोण जाणे !

नाचणाऱ्या मुली थोडा वेळ नाचून पुनः आंत जात व पोषाकांत थोडा फेरफार करून येत असत. नाच चालला असतांच स्टेजवर अनेक तऱ्हेचे सीन दाखवीत होते. हा नाच तासभर चालला होता. संध्याकाळचे ५ पासून ते रात्रीचे ११ वाजेपर्यंत या नाचाच्या तीन आवृत्ति होतात. एकंदरीनें हा चेरीडान्स खरोखरी प्रेक्षणीय आहे, यांत शंका नाहीं.

## नारा.

तारीख २ एप्रिल १९११ रोजीं सकाळीं ब्रेकफास्ट घेऊन आह्मी कियोटोहून ट्रेननें निघालों, ते दुपारीं एक वाजतां नारा येथें पोहोंचलों. नारा हें जपानमधील सुंदर स्थळांपैकीं एक गणलें जातें, व ८ व्या शतकांत

हें जपानची राजधानी होतें. येथें मुख्य पाहण्यासारखें स्थळ ह्मणजे शिंटोचें पुरातन देऊळ होय. हें देऊळ निकासाञ्यामा नांवाच्या डोंगराच्या पायथ्याशीं असून सभोंवतालीं उंच किपटोमेरी नांवाचीं झाडें आहेत. देवळाच्या पटांगणांत शेंकडों पाळींव हरणें चरत असतात. येणारेजाणारे लोक तेथील दुकानांतून बिस्किटें घेऊन त्यांनां घालतात. देवळांत जाणाऱ्या मुख्य वाटेवर दोहों बाजूंनीं तीन हजार तोरा किंवा दीप-माळा आहेत. यांपैकीं एक तृतीयांश निरनिराळ्या धातूंच्या केल्या आहेत, व बाकीच्या दगडी आहेत. या देवळांत कागुरा नांवाचा एक धार्मिक नाच तरुण मुली करीत असतात, आणि तो ठरींव फी दिली असतां प्रेक्षकांनां कोणत्याहि वेळीं दाखवितात. याशिवाय येथें आणखीहि कांहीं प्रसिद्ध देवळें आहेत. पैकीं त्वोदाईजी नांवाच्या देवळांत बुद्धाची एक मोठी मूर्ति व एक जुनी घांट आणि जुन्या वस्तूंचें संग्रहालय आहे.

दुसऱ्या दिवशीं पाऊस फार असल्यामुळें आह्मांला तेथेंच मुक्काम करावा लागला. दुपारीं पाऊस थोडा उघडला, तेव्हां निरनिराळे तीन रिकशे घेऊन तेथून दोन मैलांवर असलेलें सरकारी फार्म पाहण्यास आह्मी गेलों. त्या दिवशीं सुटी असल्यामुळें तेथें कोणी हजर नव्हतें; परंतु थोड्या वेळांतच एक कामगार आला, व त्यानें आह्मांला बरीच माहिती दिली. येथें बाटल्यांतून सर्व तऱ्हेचीं धान्यें भरून ठेविलेलीं होतीं, व बाहेर कंपाउंड-मध्यें लहानलहान शेतें व फळांचीं झाडें वगैरे अनुभव पहाण्याकरितां लाविलीं होतीं.

नंतर तेथून जवळच एक देऊळ होतें, तें आह्मी पहावयाला गेलों. देवळाच्या पुढच्या दरवाज्यावर दोन्ही बाजूंनां हातांत गदा घेतलेल्या अक्राळविक्राळ मोठ्या दोन मूर्ति होत्या. जशा आपल्या इकडे देवळां-तून मारुतीच्या किंवा गरुडाच्या मूर्ति असतात, तशांसारख्याच कांहीं अंशीं या मूर्ति होत्या. हें देऊळ शिंटोचें होतें. शिंटोची मूर्ति उभी असते, व तिचा आकार लहान असतो. परंतु बुद्धाची मूर्ति खूब मोठी

असून बसलेली असते. त्या दिवशीं या देवळांत लहानशी जत्रा भरली होती, व आसपासचे बरेच लोक जमा झाले होते. कांहीं मिठाईचीं व लांकडी सामानाचीं दुकानें बसलीं होतीं; व दुसरीं माशांचीं व खेंकड्यां ( चिंभोऱ्या )चींहि तितकींच दुकानें होतीं. सर्व लोक त्यांचीच जास्ती खरेदी करीत होते. हे मोठमोठे खेंकडे फार विलक्षण दिसत होते. कांहीं काळ्या रंगाचे, कांहीं पांढऱ्या, तर कांहीं लाल रंगाचे व कांहीं गुलाबी ठिपकेदार, असे चित्रविचित्र होते. ते मोठमोठ्या पिंपांतून भरून ठेविले होते, गिऱ्हाइकांनां दोनदोन, चारचार जसे लागत, तसे ते दोरीला बांधून विकीत होते. तेथें या प्राण्यांचीच मोठी विक्री चालली होती, व तो एक मोठा विलक्षण देखावा दिसत होता.

हें देऊळ एका लहानशा खेडेगांवाजवळ आहे. येथें ही लहानशी जत्रा मोठ्या मौजेची दिसत होती. मुलें जागजागीं जमा होऊन कुस्त्या, भोंवरे वगैरे अनेक खेळ खेळत होतीं. कांहीं स्त्रीपुरुषांचे घोळके हंसत फिरत होते, आणि कांहीं झाडांखालीं बसून आनंदानें गप्पागोष्टी बोलत होते. हे जपानी लोक जसे उद्योगी असतात, तसेच ख्यालीखुशाली करणारेहि असून नेहमीं आनंदी व हंसतमुख दिसतात. तिकडील चांगल्या हवेमुळें मुलें नेहमीं निरोगी आणि सशक्त असतात. कांहीं मुलें तर इतकीं लठ्ठ असतात, कीं, त्यांच्या लाल व फुगऱ्या गालांमुळें त्यांचे बारीक डोळे अगदीं बुजून जातात.

जत्रा पाहून दिवेलागणीच्या सुमाराला आह्मी परत हॉटेलांत गेलों. रस्त्यानें थोडथोड्या पावसाच्या सरी येत होत्या; परंतु वाटेवर बरेच बागबगीचे व कांहीं खेडीं पहाण्यांत आलीं.

## नागोया.

तारीख ४ एप्रिल १९११ रोजीं दुपारीं तीन वाजतां ट्रेननें आह्मी नागोया येथें गेलों, व तेथें नागोया हॉटेलमध्यें उतरलों. मग चहा घेतल्यावर तेथील मोठमोठे कारखाने पाहिले. हें शहर क्लाइसन, पोर्सिलेन व पंखे

या जिनसांकरितां प्रसिद्ध आहे. शहर समुद्रकिनाऱ्यावर असून चांगलें बंदर आहे. तेथील किल्ला फार जुना असून प्रसिद्ध आहे.

इ. स. १६१० मध्यें हा किल्ला पुष्कळ सरदार लोकांनीं मिळून टोकुगावा नांवाच्या घराण्यांतील पहिल्या शोगनकरितां बांधिला होता. या किल्ल्याच्या शिखरावर सोन्याच्या मत्स्यांची एक जोडी आहे. या मत्स्यांचें नकशीदार काम फार अप्रतिम आहे. हे मत्स्य तयार करण्याकारितां, केचोकोबन नांवाचे जुन्या जपानी सुवर्णाच्या नाण्याचे १७९७५ तुकडे लागले, व त्यांची किंमत ३५,००,००० येन होती. ही मत्स्यांची जोडी शहराच्या कोणत्याहि भागांतून दिसते. हा किल्ला पांच मजली आहे, व तो सरकारी परवानगीशिवाय पाहूं देत नाहींत.

दुसऱ्या दिवशीं उपाहार झाल्यावर आह्मी किल्ला पाहण्यास गेलों. हवा सुंदर होती, पाऊस उघडला होता, व मंदमंद सूर्यकिरण सर्वत्र पसरले होते. त्यामुळें तीं सुरेख रीतीनें कातरलेलीं हिरवींगार लहानमोठीं झाडें व कुंपणें विशेष रमणीय दिसत होतीं. किल्ल्याच्या सभोंवार फार मोठें विस्तीर्ण पटांगण आहे. यांत जपानी पलटणीची कवाईत व घोडदौड चालली होती. आधींच जपानी लोक लहान असतात, व किल्ल्याच्या पांचव्या मजल्यावरून तर ते लहानलहान वानरांसारखे दिसूं लागले!

नागोया शहराची अलीकडे बरीच सुधारणा केली आहे. येथील रस्ते बरेच रुंद आहेत. येथें जपानी सरकारची बरीच मोठी फौज आहे.

## सीटझोका.

नागोया येथून लंच घेऊन निघालों, ते संध्याकाळीं चार वाजतां आह्मी सीटझोका येथे पोहोंचलों. येथें दायतोका नांवाच्या हॉटेलांत उतरलों. येथें पाहण्यासारखें विशेष कांहीं नव्हतें. परंतु संध्याकाळीं फिरावयाला ह्मणून गाईडनें तेथील एक लहान बाग पाहण्यास नेलें व जवळच एक बुद्धाचें पुरातन देऊळ होतें तें पाहिलें. त्या दिवशी क्राउन प्रिन्स या शहरांतून टोकिओकडे जाणार होता, ह्मणून त्याच्या सन्मानार्थ गांवांत

जिकडेतिकडे तोरणें, पताका, दिवे लावून मोठी शोभा आणिली होती; व तरुण मुलें राजपुत्राला सलामी देण्याकरितां पोषाख वगैरे करून रस्त्यानें उभीं होतीं. जपानी लोकांमध्यें राजनिष्ठा फार दिसली. अलीकडे रशियाच्या लढाईपासून जपानमध्यें लोकांवर जबर कर बसविले आहेत. परंतु त्यांचें त्यांनां कांहींच वाटत नाहीं. ते ह्मणतात "राजानें आमच्या कल्याणाकरितां व आमच्या हिताकरतांच कर बसविले आहेत, तेव्हां ते आह्मांला सोसलेच पाहिजे."

सीटझोका येथें लाखेचें व बांबूचें नाजूक काम फार सुरेख होतें. या कामाचे कांहीं कारखाने आह्मीं पाहिले.

## मीयानोष्टा.

दुसऱ्या दिवशीं मीयानोष्टास जाण्याकरितां निघालों, व गोझु स्टेशनावर दुपारीं ४ वाजतां उतरलों. तेथून ८॥ मैल ट्रामवेनें डोंगराच्या पायथ्यापर्यंत गेलों. तेथें युमाटी नांवाचें गांव आहे. तेथील जपानी इनमध्यें चहा घेतला. अशा इन्स् जपानमध्यें बहुतेक सर्व ठिकाणीं आहेत, व टीहॉउसेसहि जिकडेतिकडे आहेत. जपानी लोक यांनां आश्रयहि चांगला देतात. कोठें बाग पहावयाला जा, अथवा देऊळ पहावयाला जा, तेथें हीं लहानलहान टीहॉउसेस आहेतच. तेथील व्यवस्था राखण्याकरितां दोन जपानी मुली हजर असतात. तेथें गेलें, कीं त्या एका तबकांत नुसत्या चहाचे पेले, व दुसऱ्या तबकांत तांदळाचीं बिस्किटें घेऊन येतात. मग तो चहा तुह्मांला नको असला, तरी त्यांनां पैसे देण्याकरितां घ्यावा, व वाटेल तर प्यावा अथवा ओतून टाकावा. परंतु जपानच्या थंड हवेला थोडा तरी हा ऊन चहा घेतला, ह्मणजे बरें असतें.

या इनमध्यें कांहींशी यूरोपियन तऱ्हेची व्यवस्था दिसली. पुढें एक मोठा हॉल होता, आणि त्या हॉलमध्यें इकडेतिकडे बऱ्याच टेबलखुर्च्या ठेविल्या असून येथें चहाच्याबरोबर दूध, साखर, फळें, बिस्किटें वगैरे

होतीं. याचें हेंहि एक कारण होतें, कीं, ही इन मीयानोष्टाच्या अगदीं रस्त्यावर होती, आणि या रस्त्यानें यूरोपियन लोक नेहमीं जातयेत असतात, तेव्हां त्यांच्या सोईकरितां ही सर्व व्यवस्था ठेविली होती.

चहा घेतल्यावर रिकशांत बसून आह्मी मीयानोष्टाचा डोंगर चढूं लागलों. रस्त्याची सीनरी आपल्याइकडील पहाडी प्रदेशाप्रमाणेंच होती; तींत विशेष कांहीं नव्हतें.डोंगराची उंची समुद्रकिनाऱ्यापासून ११२० फूट आहे, व सभोंवतालच्या प्रदेशांत उन्हाळीं आहेत. या झऱ्यांच्या पाण्यानें स्नान केलें असतां आरोग्यास फायदेशीर होतें, असें ह्मणतात. संध्याकाळीं सात वाजतां आह्मी मियानोष्टाला जाऊन पोहोंचलों, व तेथील फुजी या हॉटेलमध्यें उतरलों. हें हॉटेल जपानमध्यें सर्वांत उत्तम गणलें जातें. येथील बहुतेक सर्व खोल्यांनां स्वतंत्र बाथरूमस् आहेत, आणि त्यांमधून झऱ्याचें ऊन पाणी स्नानाकरितां आणलेलें आहे. खोल्यांत विजेचे दिवे असून आंत स्वच्छताहि चांगली ठेविली जाते. येथें नेहमीं फार थंडी असते, ह्मणून खोल्यांतून धमधमीत विस्तव ठेविलेला असतो. रात्रीं निजण्याच्या वेळीं घालण्याकरितां किमोने बायकापुरुषांकरितां पलंगावर ठेविलेले असतात, व पायांत घालण्याकरितां स्लिपर्सहि असतात. जर तुह्मांला पाय रगडून घ्यावयाचे असतील, तर त्याच्याकरितांहि बायकापुरुष तेथें हजर असतात. त्यांनां ठरींव पैसे दिले असतां ते येऊन पाय चेंपणें, अंग रगडणें वगैरे करितात. त्यांनां काय द्यावयाचें, किती द्यावयाचें वगैरेंबद्दल खोलींत यादी असते.

हें हॉटेल चांगलें उंच जागीं असून बरेंच मोठें आहे. सभोंवतालचा देखावा फार रमणीय असून फुजी हा पर्वत बर्फानें आच्छादिलेला पांढराशुभ्र दिसतो. हॉटेलच्या पुढें सुंदर बाग आहे; त्यांत ठिकठिकाणीं कारंजीं व पाण्याचे धबधबे केले आहेत. या पाण्यांत सुंदर रंगारंगाचे मासे सोडिले आहेत. जपानी लोकांची बागबगीचा करण्याची तऱ्हा वेगळीच असते. त्यांच्या बागेमध्यें आपल्याइकडील बागेसारखीं फारशीं

फुलझाडें वगैरे नसतात. परंतु नेहमीं हिरवीं राहणारीं झाडें, अनेक तऱ्हेच्या आकृत्यांमध्यें कौशल्यानें कातरलेलीं, इकडेतिकडे विरळ लाविलेलीं असतात. त्यांच्या सभोंवार वांकडेतिकडे, परतु सुंदर रस्ते केलेले असतात. बागेच्या मध्यभागीं व आजूबाजूला उथळ खळगे खणून त्या खळग्यांच्या बाजू दगडांनीं बांधून आंत पाणी भरून रंगीबेरंगी मासे त्यांत सोडतात, व शक्य असेल तर डोंगरावरून वहात येणारें पाणी नळ्यांतून आणून कारंजीं करितात. परंतु जर कोणा श्रीमंत मनुष्याचा स्वतःचा बाग असला, तर मात्र तेथें फुलांचे ताटवे, फुलझाडें, फळझाडें वगैरे असतात.

हॉटेलमध्यें पुष्कळ यूरोपियन लोक उतरले होते. शिवाय एक पारशी गृहस्थ, एक जपानी बाई व तिचा यूरोपियन नवरा, त्याचे चारपांच यूरोपियन मित्र अशी पांचसहा जणांची पार्टी एका मोटारमध्यें बसून आली होती. ही जपानी बाई यूरोपियन पोषाख करीत होती, व थाटावरून हें जोडपें बरेंच श्रीमंत दिसलें. यूरोपियन मंडळीमध्यें निपोमारो बोटीवरील कांहीं इसम आमच्या ओळखीचे भेटले. त्यांच्याशीं जेवणानंतर आह्मीं गप्पागोष्टी केल्या. दुसऱ्या दिवशीं ब्रेकफास्ट घेतल्यावर खुर्च्यांत बसून लेक हाकोनी पाहण्याला गेलों. आमचा गाईड घोड्यावर बसला. लेक हाकोनी हॉटेलापासून साडेसहा मैल लांब आहे, व मीयानोष्टापेक्षां एक हजार फूट उंच आहे. सरोवर फार सुंदर असून त्यांत फुजी पर्वताचें प्रतिबिंब दिसतें. या सरोवराच्या कांठीं एक राजवाडा आहे. येथें बादशहा उन्हाळ्यांत कधींकधीं येऊन राहतो, व तेथें एक लहानसें हॉटेलहि आहे. येथें आह्मी लंच घेण्यास उतरलों. या हॉटेलांतून सरोवराची व फुजी पर्वताची शोभा चांगली दिसते. येथें कांहीं ह्मातान्या जपानी बाया रंगवलेल्या लांकडी जिनसा विक्रीकरितां घेऊन आल्या होत्या, त्या आपापल्या गांठोड्यांतून एकएक वस्तु काढून आह्मांला दाखवूं लागल्या. त्या जिनसांचीं नांवें मडम फुजी यामा, मडम चेरी वगैरेंसारखीं

चमत्कारिक असत. ज्यांच्यावर फुजी यामाचें अथवा चेरी फुलाचें चित्र असे, त्यांनां हीं नांवें मिळत. जपानी लोकांनां फुजी पर्वताचा व चेरी फुलांचा फार अभिमान वाटतो. ज्या त्या वस्तूवर यांचीं चित्रें असतात.

या ह्मातार्‍या बायांपैकीं दोघीतिघींनीं केशवपन केलें होतें, ह्मणून आह्मीं गाईडला विचारलें, कीं, "ही चाल जपानमध्येंसुद्धां आहे कीं काय?"

गाईड ह्मणाला "जपानी ह्मातार्‍या विधवा केशवपन करितात; परंतु हें त्यांच्या खुषीवर असतें. त्यांनीं केंस काढलेच पाहिजेत असें नाहीं."

आह्मीं लंच घेतल्यावर होडींत बसून सरोवराच्या दुसर्‍या बाजूला गेलों. सरोवराचें पाणी स्फटिकासारखें स्वच्छ दिसत होतें. सभोंवतालच्या डोंगराची व त्यावरील सुंदर झाडांची पडछाया पाण्यावर पडल्यामुळें पाण्याला अधिक शोभा आली होती. आमच्या होडीवर तिघे नावाडी होते. होडी शिड्यांच्या व वल्ह्यांच्या मदतीनें चालली होती. परंतु वारा बराच असल्यामुळें होडी डुलत असे, त्या वेळीं मला फार भीति वाटे, व मी पुनः पुनः गाईडला बजावीत असें, कीं, "नावाड्यांनां चांगली काळजी घ्यावयाला सांगा." रस्त्यानें आह्मांला गाईड बर्‍याच गोष्टी सांगत होता 'अमक्या ऋतूमध्यें अमकीं फुलें निघतात. मग अशाअशा तर्‍हेची सीनरी दिसते. हिंवाळ्यांत सरोवराचें पाणी थिजून दगडासारखें होतें, व सर्व प्रदेश बर्फमय होतो.' आमच्या बरोबर आणखीहि बरीच मंडळी होती. परंतु ती घोड्यावरून आल्यामुळें आमच्या आधीं आली व लंच घेऊन भराभर होड्यांत बसून निघाली. आमचीच होडी सर्वांच्या मागें राहिली. असो.

आह्मी किनार्‍यावर पोहोंचलों, त्यापूर्वींच गाईडनें आमच्याकरितां खुर्च्यांची व्यवस्था करून ठेविली होती. तेथून आह्मी दुसर्‍या वाटेनें निघालों. गाईड पायांनींच येत होता. त्याला चालतांना पाहून मला त्याचा फार हेवा वाटला, व वाटलें, कीं, जर देवानें माझ्या पायां-

नांहि बळ दिलें असतें, तर मीहि वनश्रीची शोभा पाहतपाहत पायांनींच चाललें असतें. अशा पहाडांतून पायांनीं चालण्याची मौज वाटते. तशांतूनहि मी चाललें असतें; पण रस्ता फार अवघड. तशांत दोन दिवस जोर करून चाललें व मग आठ दिवस अजारी पडलें, तर या करण्यांत काय अर्थ?

या वाटेनें सरोवरापासून सुमारें तीन मैलांवर ऊन पाण्याचे सुंदर झरे आहेत, तेथें आह्मी गेलों. गाईडच्या मनांत तेथें न्यावयाचें नव्हतें. तो ह्मणाला "तेथें काय पहावयाचें आहे? उगीच वेळ मोडतो!" पण आह्मीं त्याचें ऐकिलें नाहीं.

## ऊन पाण्याचे झरे.

हे झरे उंचसखल अशा पर्वतामध्यें आहेत. येथेंहि एक साधारणशी इन आहे. या ठिकाणीं झऱ्याचें स्नान करण्याकरितां पुष्कळ जपानी लोक येत असतात, व वाटेल तर आठ दिवस येथें राहतात. या पाण्यांत थोडा गंधकाचा अंश आहे, आणि याच्या स्नानानें वायूचे विकार बरे होतात, असा जपानी लोकांचा अनुभव आहे. झऱ्याच्या जागीं एक लहानसें छप्पर बांधलेलें आहे, व त्यामध्यें दोन लहान टांकीं आहेत; पैकीं एक बांधिलेलें व दुसरें स्वाभाविकच आहे. आह्मी तेथें गेलों, तेव्हां पुष्कळ स्त्रीपुरुषांचा जमाव स्नान करीत होता. तो देखावा पाहून मला चमत्कारिक वाटलें. त्या लहानलहान टाक्यांमध्यें बायका, पुरुष, मुलें, मुली, ह्मातान्याकोतान्या सर्व उघडीं दिगंबर होऊनहि एका जागीं स्नानें करीत होतीं. एकाच्याहि अंगावर एक बोटभरहि चिंधी नव्हती, आणि त्या उघड्या छपरांमध्यें आनंदानें स्नानें चाललीं होतीं. ज्यांचीं स्नानें झालीं होतीं, ते खुशाल उघडेफटिंग बाहेर येऊन अंग पुशीत होते. आपण उघडे आहोंत, कीं नागवे आहोंत, दुसरे लोक आपल्याला पाहून हंसतील कीं काय, वगैरे कल्पनाच त्यांच्या मनाला शिवत नव्हती, असें दिसलें. आह्मांलाच तेथे उभें रहण्याची

लाज वाटूं लागली, ह्मणून आह्मी तेथून लवकरच गेलों. आमचा गाईड येथें आमच्याबरोबर आला नाहीं. तो ह्मणाला "मी चालून दमलों आहें, ह्मणून येथें जरा इनमध्यें थोडी विश्रांति घेतों. हे खुर्च्यावाले लोक तुह्मांला झऱ्याजवळ नेतील."

इनपासून झरे कांहीं दोनशें एक कदमांपेक्षां लांब नसतील; परंतु तेथें न येण्याची गाईडची उगीच टाळाटाळी असावी, असें पाठीमागून आमच्या लक्ष्यांत आलें. कारण, हे बायका पुरुष नागवेउघडे होऊन एका जागीं स्नान करतांना पाहून आह्मी त्याला नांवें ठेवूं, असें वाटून त्याला आह्मांबरोबर येण्याची लाज वाटली असावी. जपानी इनमध्यें व साधारण कुटुंबांत आंघोळीचें एकच लहानसें टांकें असतें. त्यांत वाटेल त्यानें जावें, फराफर कपडे फेंकून द्यावे आणि बुचकळी मरावी. मग त्यांत दुसऱ्यांचीं स्नानें चाललीं असलीं तरीहि थांबण्याची कांहीं एक जरूरी नाहीं!

एक यूरोपियन गृहस्थ जपानमध्यें प्रवास करीत असतांना त्यानें तेथील आपल्या अनुभवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यानें स्नानाबद्दलचा एक अनुभव दिला आहे. एका खेडेगांवीं तेथें हॉटेल वगैरे कांहीं नसल्यामुळें त्याला जपानी इनमध्यें उतरावें लागलें. तेथें स्नानाचें एक टांकें होतें, त्यांत तो गृहस्थ स्नान करीत होता. जपानी लोकांचे दरवाजे ह्मणजे काय, नुसत्या लांकडाच्या फळ्या व कागदाचीं तावदानें. त्या दरवाज्यांनां कडीकुलूप मुळींच नसतें. वाटेल त्याला आंतून बाहेरून उघडतां येतें. ह्मणून त्या स्नानाच्या खोलीचा दरवाजा फरकन उघडून एक जपानी बाई आंत शिरली, व अंगावरील कपडे भराभर काढून आंघोळ करण्याकरितां हौदाजवळ आली. परंतु त्या यूरोपियन गृहस्थानें हातपाय ताणून तिला आंघोळीला जागा दिली नाहीं. हें पाहून ती बाई आश्चर्यानें खदखदां हंसली व कपडे पुनः घालून बाहेर निघून गेली. असो. सर्वच देशांमध्यें अशा कांहीं विलक्षण चाली असतात.

आतां जपानमध्यें हळुहळू या चाली बऱ्याच सुधारत चालल्या आहेत, आणि या झऱ्यावरहि सरकार बायकापुरुषांच्या स्नानाच्या वेगळ्या जागा करणार आहे, असें ह्मणतात.

मग पुनः खुर्च्यांत बसून आह्मी निघालों. रस्ता बराच उतरता व फार अवघड होता. कोठेंकोठें तर अगदीं अरुंद होता. डोंगरामध्यें जागजागीं गंधक जळत होता, व त्याचा वास हवेमध्यें पसरला होता.

## आंधळ्याच्या पायचेपीचा अनुभव.

आह्मांला हॉटेलांत परत येण्याला बरीच संध्याकाळ झाली, व दिवसभर एकसारखें फिरत राहिल्यामुळें अतिशय थकवा आला. तेव्हां गाईड यांनां ह्मणूं लागला "तुह्मी येथील आंधळ्या माणसांकडून अंगचेपी करून पहा. हे आंधळे अंगचेपीच्या कामांत फार कुशल असतात. हे आंधळे लोक शहरांतून व मोठ्या गांवांतून पूर्वरात्रीं रस्त्यानें शीळ वाजवीत फिरत असतात, व ज्याला जरूर लागेल तो त्यांनां बोलावतो. हे लोक काहण्यागोष्टी सांगण्यांतहि फार हुषार असतात, अशी त्यांची आख्यायिका आहे."

मग गाईड गेला आणि एका आंधळ्याला घेऊन आला. हा आंधळा चांगला मजबूत एकाद्या पैलवानासारखा दिसत होता. त्यानें आपल्याबरोबर पावडरची एक पिशवी आणिली होती. त्यांतील पावडर त्यानें आपल्या हातांनां लाविली व कंबर वगैरे बांधून तो आंगचेपी करूं लागला. परंतु ती तिकडील आंगचेपीची पद्धत यांनां आवडली नाहीं, असें दिसतें. आणि त्यांनां तिची जरूरीहि नव्हती. उगीच एक अनुभव पहावयाचा होता. मलाहि गाईड ह्मणाला "तुमच्याकरितां एक आंधळी बाई घेऊन येतों."

परंतु मीं सांगितलें "मला त्याची जरूरीहि नाहीं, व मला अनुभवहि पहावयाचा नाहीं."

## उंच सुळासारखा पर्वत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उपाहार झाल्यावर गाईडनें भाड्याच्या दोन खुर्च्या केल्या, व आह्मांला बसवून उंच सुळासारखा पर्वत पहावयाला नेलें. हा डोंगर हॉटेलच्या जवळच आहे. परंतु त्याच्यामध्यें एक मोठी खोल दरी आहे. या दरींतून खूप जोरानें खळखळ आवाज करीत पाणी वाहत असतें. या दरीवर जागजागीं पूल केले आहेत, आणि या दरीची दोन्ही बाजूंची शोभा फार चित्तवेधक दिसत असते.

या डोंगराचा रस्ता अतिशय अरुंद आहे, व जागजागीं वळसे घेऊन वांकडातिकडा नागमोडीसारखा आहे. एका बाजूला नुसता उंच पर्वताचा कडा, तर दुसऱ्या बाजूला खोल भयंकर दरी. असें वाटे, कीं, जर का या खुर्चीवाल्यांचा पाय घसरला, अथवा यांनां ठेंच लागली, तर एका क्षणांत आह्मी खुर्चीसुद्धां या भयंकर दरीमध्यें गडगडत जाऊं. या लोकांचें काय, वानरासारख्या उड्या मारीत वर चढतील, पण आमचे मात्र हातपाय मोडण्याची पाळी येते कीं काय, कोण जाणे!

हा रस्ता या डोंगराला नुसत्ता कंगोऱ्यासारखा कोरलेला आहे, व अगदींच पाऊलवाटेचा आहे. परंतु या जपानी कुलींनां नेहमीं खुर्च्या नेआण करण्याची सवय असल्यामुळें फार खबरदारीनें ते आपलें काम करितात. गाईड आमच्यामागें मागें चालत येत होता, आणि आह्मांला क्षणोक्षणीं सांगत होता, कीं, "भिण्याचें कांहीं कारण नाहीं. येथें कधींहि कांहीं धोका होत नाहीं. हे खुर्च्या उचलणारे लोक चांगले मजबूत व नेहमींचे वाकबगार आहेत." रस्त्यानें तीन जागीं टीहाउसेस लागलीं व या तिन्ही जागीं आह्मीं सर्वांनीं चहा घेतला. तेथें जपानी मुली गरम चहा आणि बिस्किटें वगैरे घेऊन तयारच होत्या. त्यांनीं आह्मांला चहा दिला, व हात शेकण्याकरितां एक लहान शेगडी पुढें आणून ठेविली. तेथें थोडीथोडी विश्रांति घेतघेत आह्मी पर्वताच्या अगदीं शिखरावर गेलों. येथेंहि एक चांगलें सुबक टीहाउस होतें. येथें बराच गारठा होता.

कारण येथून फुजी पर्वताचें टोंक बरेंच जवळ दिसत होतें, व त्यावरील बर्फ वाऱ्यानें चोहोंकडे पसरत होतें. ह्मणून येथें अंगाला झोंबणारी थंडी होती. येथून फुजी पर्वत, हाकोनी तळें, आमचें हॉटेल, दरी वगैरे सर्व फार सुंदर दिसत होतें. फुजी पर्वताचें शिखर बर्फानें अगदीं पांढरेंशुभ्र व चकचकीत दिसत होतें, व उंच डोकें करून आकाशाचें जणूं काय चुंबन घेत आहे असें दिसत होतें.

हें सृष्टिदेवीचें अलौकिक सौंदर्य पाहून फार आनंद झाला, व वरती चढतांना जो मनाला त्रास आणि भीति वाटली होती त्याचा कांहींसा विसर पडला, व वाटलें, कीं, कांहीं असो, अशी बिकट जागाहि आपण पाहिली. नंतर आह्मी इकडेतिकडे थोडा वेळ फिरून चहा घेतला,व आतां खालीं कसें उतरावयाचें हा प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला.गाईड ह्मणाला "खालीं उतरण्याचा रस्ता दुसरा आहे, व फार उतार आहे. ह्मणून तुह्मी खुर्चींत बसा. साहेब पायीं चालतील व आह्मी त्यांचा हात धरूं. ह्मणजे एक रिकामी खुर्ची दोन माणसें खालीं नेतील, व मग सहा कुली तुमची खुर्ची हळुहळू खालीं उतरतील."

परंतु तो भयंकर उतरता रस्ता पाहून खुर्चींत बसण्यास माझा जीव कांहीं धजेना. कारण वरती चढण्याची गोष्ट वेगळी होती . चढतांना पाय घसरण्याची तितकी भीति नसते. परंतु उतारावरून झोंक संभाळणें फार कठिण असतें. ह्मणून मीं हट्ट धरिला, कीं, "मीहि पण सर्वांबरोबर पायीं चालेन, मी नाहीं खुर्चींत बसत. हे खुर्चीवाले लोक किती जरी मजबूत असले, तरी मनुष्यच आहेत कीं नाहीं ? तेव्हां अशा उतरत्या रस्त्यानें ओझें घेऊन चालावयाचें, तेव्हां अशा स्थितींत त्यांचे पाय घसरणें अगदीं शक्य आहे."

यावर गाईडनें व यांनीं मला पुष्कळ सांगितलें, कीं, " अशा वाईट रस्त्यानें तुमच्यानें चालणें होणार नाहीं. उगीच एकाद्या वेळीं पाय मुरगळून घ्याल; अथवा घेरी येऊन पडाल, झालें. चांगल्या राजा-

सारख्या खुर्चींत बसा, आह्मीहि पण तुमच्या खुर्चांबरोबर चालतों, व तुह्मांला चांगलें संभाळून खालीं उतरतों." परंतु मीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. मुकाट्यानें हळुहळू चालण्याला आरंभ केला.

गाईडच्या हाताचा टेंका घेऊन मी मोठ्या मुष्किलीनें दोन मोडी-वरून उतरलें, परंतु मग पुढें माझ्यानें पाऊलहि टाकवेना. एकदम पोटऱ्यांत गोळे आले व सर्व अंगाला दरदरून घाम सुटला. आणि आतां खरोखरीच घेरी येऊन पडतें कीं काय, असें वाटूं लागलें. तितक्यांत बाजूला एक चांगला दगड दिसला; व त्यावर मी जाऊन बसलें. मग मला खुर्चींत बसणें भागच पडलें, व त्या लोकांनीं मला कांहीं एक धक्का लागूं न देतां लवकरच खालीं उतरून आणलें. या रस्त्यानें मात्र टीहाउसेस मुळींच नाहींत. हा रस्ता अतिशय उतार आहे. परंतु त्या दुसऱ्या रस्त्या-पेक्षां बराच जवळ आहे. परंतु हे दोन्ही रस्ते फार धोक्याचे आणि कठिण आहेत. अनुभवाशिवाय त्याची कल्पना होणें कठीण आहे.

हॉटेलजवळ येऊन पोहोंचलों, तेव्हां मीं देवाचे फार आभार मानिले, व जपानमधील हें तिसरें संकट टळलें असें मला वाटलें. नंतर लंच घेण्यास थोडा अवकाश होता, ह्मणून तेथील कांहीं दुकानांतून आह्मी फिरलों, व कांहीं लाकडी वस्तु आणि बाहुल्या वगैरे खरेदी केल्या. इतर मोठ्या हॉटेलांप्रमाणें यांतहि तऱ्हेतऱ्हेच्या जपानी वस्तूंचीं दुकानें होतीं. मीयानोष्टामध्यें कोणकोणत्या जागा पहाण्यासारख्या आहेत, व तेथें कसकसें जावें वगैरेंबद्दलच्या जाहिराती जपानी आणि इंग्लिश भाषेमध्यें येथें लाविलेल्या होत्या. त्याचप्रमाणें कोणत्या बोटी कधीं येणार, केव्हां कोठें जाणार वगैरे सविस्तर माहितीच्याहि जाहिराती असून परदेशच्या प्रख्यात बोटींच्या भव्य व सुंदर तसबिरीहि भिंतीवर टांगल्या होत्या. प्रवासी लोकांनां कोणत्याहि तऱ्हेची अडचण पडूं नये, या गोष्टीकडे जपानी लोकांचें बरेंच लक्ष्य आहेसें दिसलें.

या हॉटेलचा मालक फार चांगला मनुष्य होता. तो स्वतः हॉटेलची सर्व व्यवस्था पाहत असे, व त्याची थोरली मुलगी त्याला पुष्कळ मदत करी. जेव्हां आह्मी मीयानोष्टाहून निघालों, तेव्हां त्यानें व त्याच्या मुलीनें आह्मांला पुष्कळ आग्रहानें सांगितलें, कीं, "जर हिंदुस्तानांतून तुमचे मित्र अगर तुह्मी इकडे पुनः कधीं याल, तर येथें येण्याला आळस करूं नका."

## कामाकुरा.

तारीख ९ एप्रिल १९११ रोजीं सकाळीं उपहार करून मीयानोष्टाहून निघालों, ते कांहीं रिकशांत, कांहीं ट्राम्वेंत व कांहीं रेल्वेनें संध्याकाळीं चार वाजतां कामाकुरा येथें पोहोंचलों, आणि तेथें एका हॉटेलमध्यें उतरलों. हें हॉटेल समुद्रकिनाऱ्यावरच आहे व त्याच्या कंपाउंडमध्यें पांढरी रेती पसरलेली आहे. या रेतींत कांहीं झाडें वगैरे असून लोकांनां बसण्याकरितां दगडांचे सुंदर ओटे केले आहेत. पाऊस वगैरे नसला तर चहा वगैरे येथेंच घेतात.

दुसरे दिवशीं सकाळीं दायबुझू किंवा मोठा बुद्ध पहावयाला गेलों. ही मूर्ति इ. स. १२५२ मध्यें ओतली गेली. ही पंचरस धातूची आहे. हिची उंची ४९ फूट ७ इंच असून व परीघ ९७ फूट २ इंच आहे. डोळे सोन्याचे असून कपाळावर चांदीचा तिलक आहे. या देवळाचा दोनदां वादळानें आणि एकदां समुद्राच्या भरतीनें नाश झाला. तेव्हांपासून ह्मणजे इ. स. १४९५ नंतर पुनः देऊळ बांधिलें नाहीं. मूर्ति तशीच उघड्या मैदानांत असून सभोंवतीं थोडा बाग आहे.

नंतर येथून जवळच एका टेंकडीवर अवलोकितेश्वरा देवीचें देऊळ आहे, तें पाहण्यास गेलों. देवीची मूर्ति धातूची असून चतुर्भुज आहे, व तिच्या डोक्यावर मुगुट आहे. आपल्याकडील मूर्तीप्रमाणेंच रचना दिसली. हें देऊळ उंच ठिकाणीं असल्यामुळें तेथून समुद्राचा व शहराचा देखावा चांगला दिसतो. हॉटेलमध्यें परत आल्यावर लंच घेऊन ट्राम्वेनें निघालों.

वाटेंत येनोसीमा हें बेट पाहिलें. या बेटाला जाण्याकरितां समुद्रात एक अरुंद व लांब सुमारें अर्धा मैल पूल आहे. या पुलावरून पायींच जावें लागतें. वाटेल तर लहान बोटीनेंहि जातां येतें. या बेटांत वेत्तेन ऊर्फ सरस्वतीची पवित्र गुहा आहे, आणि तेथें एक लहानसें हॉटेल आहे. कांहीं लोक येथें मौजेनें तीनचार दिवस राहतात.

नंतर कटासी स्टेशनावर गेलों, व तेथें ट्रेनमध्यें बसून संध्याकाळीं पांच वाजतां टोकिओला पोहोंचलों.

## टोकिओ.

टोकिओ येथें आह्मी इंपीरियल हॉटेलमध्यें उतरलों. हें हॉटेल पुष्कळ मोठें आहे, व येथील व्यवस्था उत्तम आहे. या वेळीं हॉटेलमध्यें पुष्कळ यूरोपियन मंडळी होती. त्यांमध्यें बरेच अमेरिकन होते, आणि आह्मांला निपोमारो बोटीवर ज्या अमेरिकन बाया भेटल्या होत्या,त्याहि येथें होत्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शिबापार्क पाहण्यास गेलों. येथें झोडोपंथाचें झोजोजी नांवाचें एक बुद्धाचें देऊळ आहे, व टोकीगुवा घराण्यांतील शोगनानच्या समाधि आहेत. बुद्धाच्या देवळाचा अंतर्भाग सोनेरी रंगाचा आहे. दिवसा गेलें असतां आंतील खोदींव बारीक काम दृष्टीस पडतें.

जपानी लोकांनीं सर्व जपानभर लाखों रुपये खर्च करून मोठमोठीं व सुंदर बुद्धाचीं अनेक देवळें बांधिलीं आहेत, व मोठमोठ्या प्रचंड बुद्धमहाराजांच्या लांकडी व धातूच्या मूर्ति स्थापन केल्या आहेत. यावरून असें दिसतें, कीं, जपानी लोकांची बौद्धधर्मावर फार निष्ठा होती, व अजूनहि पुष्कळ लोकांची निष्ठा असेलच. कारण कोठेंहि देवळाची हेळसांड केलेली दिसत नाहीं. नेहमीं डागडुजी वगैरे करीत असतात. सिंटोचीं देवळें कोठेंकोठें आहेत, परंतु बुद्धाचीं देवळें फार आहेत.

नंतर तेथें जवळच असलेला बाजार पाहण्यास गेलों. या बाजाराकरितां एक मोठी पक्की दोन मजली इमारत आहे, व येथें सर्व तऱ्हेचा

माल नियमित किंमतीला मिळतो. येथील दुकानांत माल विकण्याकरितां मुलीच दिसल्या. या मुलींनां इंग्लिश वगैरे येत नसतें; परंतु त्या आपल्या जपानी विद्येंत निपुण असतात. या बाजारामध्यें मुलींनीं व स्त्रियांनीं केलेल्या शिवणकामाचीं पुष्कळ दुकानें आहेत.

बाजार पाहून मग एका टेंकडीवर गेलों. येथें कोयोका किंवा म्यापल क्लब आहे. येथें पूर्वीं कळविलें असतां कोयोआडोरी नांवाचा नाच दाखवितात, व येथें उत्तम तऱ्हेचें जपानी जेवण मिळतें. परंतु आह्मांला या दोन्हीहि गोष्टी नको होत्या. जरी गाइडनें अनुभव पाहण्याचा आह्मांला बराच आग्रह केला, तरी त्याचें आह्मीं ऐकिलें नाहीं. येथें पुष्कळ जपानी लोक आपलीं बायकामुलें व मित्रमंडळी घेऊन विहार करीत होते. जपानी लोक जसे उद्योगी आणि चळवळे आहेत, तसे ते ख्यालीखुशाली करणारेहि आहेत, असें दिसलें. तेथून चेंबर ऑफ् कॉमर्सच्या कचेरींत गेलों. या इमारतींत वेलकम् सोसायटीचें ऑफिस आहे, तेथें सेक्रेटरीला भेटून कांहीं संस्था पाहण्याकरितां शिफारसपत्रें घेतलीं. ही सोसायटी परकीय प्रवाशांनां सर्व प्रकारची मदत करण्याकरितां स्थापित झाली आहे, आणि तीन येन फी भरली असतां प्रवाशी लोकांनां या सोसायटीचे मेंबर करितात.

आह्मी जपानमध्यें आलों, तेव्हांच या सोसायटीला लिहून फी भरली होती. या सोसायटीनें आह्मांला पुष्कळ मदत केली व माहितीहि दिली. दुपारीं राजवाड्याचा कांहीं भाग पाहिला व वाड्याच्या सभोंवतालचा बागहि पाहिला. हा बाग सुंदर असून इंग्लिश धर्तीवर आहे. येथें फुलांचे ताटवे वगैरे पुष्कळ आहेत. राजवाड्याच्या सभोंवतीं खोल खंदक असून त्यांत पाणी आहे.

हल्लीं टोकिओ ही जपानची राजधानी असल्यामुळें येथें फार सुधारणा झाली आहे. मुख्यमुख्य रस्ते चांगले रुंद व प्रशस्त आहेत, जागजागीं हवाशीर बागा, मोठमोठ्या इमारती, व दुकानेंहि चांगलीं

आहेत. येथें आह्मांला घोड्यांच्या गाड्याहि बऱ्याच दिसल्या. जपानमध्यें आह्मीं इतक्या गांवीं फिरलों, परंतु घोड्यांच्या गाड्या आह्मांला कोठें दिसल्या नाहींत, व इतके रुंद रस्तेहि दिसले नाहींत.

दुसऱ्या दिवशीं मुलींचें टेक्निकल स्कूल पाहिलें. तेथें मुलांप्रमाणें मुलींनांहि शिकवितात. येथें शिक्षकाच्या कामावर कांहीं बायका आणि पुरुष आहेत. मुलींनां सर्व तऱ्हेचें काम फार काळजीपूर्वक शिकवितात. येथें मुलींकारितां बोर्डिंग हॉउसहि आहे, आणि तरुण मुलींवर देखरेख करण्याकरितां सातआठ अगदीं ह्मातान्या बाया ठेविल्या आहेत. गाइड ह्मणाला " त्या ह्मातान्या बाया ठेवण्याचें हेंहि एक कारण आहे, कीं, या निराश्रित ह्मातान्यांनां कांहींतरी पोटाचें साधन व्हावें आणि त्यांचा या मुलींनांहिं उपयोग व्हावा." आह्मी येथें आलों तेव्हां शाळा सुरू होण्याला अर्धा एक तास होता. ह्मणून मुली एका हॉलमध्यें जमा होऊन कांहीं शिवणकाम करीत होत्या. त्या आपल्या फावल्या वेळांत असेंच कांहीं शिवणकाम करून त्या वस्तु बाजारांत विकण्याकारितां देतात. येथील सर्व मुली फार आनंदित दिसल्या, व त्यांनां काम करावयाची हौस फार असावी असें दिसलें.

## मुक्या व बहिऱ्यांची शाळा.

या शाळेची इमारत मोकळ्या आणि हवाशीर मैदानांत आहे. येथें मुलें व मुली मिळून, ६०० मुके व बहिरे विद्यार्थी आहेत. येथील डायरेक्टरनें आह्मांला पहिल्यानें मैदानांत मुलांचे खेळ व कसरत पाहण्यास नेलें. येथें मुलगे व मुली मिळून अनेक तऱ्हेचे खेळ व कसरती करीत होतीं. त्या सर्वांच्या शरीरप्रकृति चांगल्या सशक्त आणि सुदृढ दिसत असून मुद्रा आनंदित होत्या. त्यांनां एकमेकांशीं करपल्लवी खुणांनीं बोलतांना पाहून मोठी मौज वाटली. आह्मां परकीय लोकांनां पाहून त्यांनाहि आश्चर्य वाटलें असें दिसलें. कारण कांहीं मुलांनीं उत्कंठेनें डायरेक्टरजवळ येऊन आपल्या करपल्लवी भाषेमध्यें आमच्याबद्दल

चौकशी केली. डायरेक्टरनें त्यांनां सांगितलें, कीं, "या वेळेस आपलें कसरतीचें काम करा; मग तुह्मांला समजेल."

थोड्याच वेळानें शाळेंतील शिक्षणाला सुरुवात झाली. मग आह्मांला सर्व वर्गांतून फिरवून तेथील शिक्षणपद्धति दाखविली. येथें लहान मुलींनां व मुलांनां एके जागीं शिक्षण दिलें जातें; परंतु ज्यांचें प्राथमिक शिक्षण संपून ज्या सोइंग व पेंटिंग कामें शिकतात, अशा तरुण मुलींच्या शिक्षणाच्या जागा वेगळ्या आहेत.

हे मुके व बहिरे विद्यार्थी येथील शिक्षणानें फार हुषार झाले आहेत. डायरेक्टरनें आह्मांला चवथ्या वर्गांत नेलें, व तेथील बोर्डावर लिहिलें, कीं, 'हे गृहस्थ व या बाई किती वयाच्या असतील याची कल्पना करा, व कागदावर लिहून मला आणून दाखवा.' हें बोर्डावरील वाक्य वाचतांच त्या सर्व विद्यार्थ्यांमध्यें एकच गडबड उडाली, व सर्व मुलें टक लावून आमच्याकडे पाहूं लागलीं, व कोणी कागद व पेन्सिली घेऊन आपापलीं डोकीं खाजवूं लागलीं. या सर्वांमध्यें एका दहा वर्षांच्या मुलीनें आमचें दोघांचें वय बरोबर सांगितलें. मग डायरेक्टरनें पुन: बोर्डावर लिहून सांगितलें, कीं, ' आपापला नकाशा काढा, व त्यांत इंडिया कोठें हें एकदम दाखवा.' तें वाचल्याबरोबर सर्वांनीं इंडिया दाखविली. अशाच तऱ्हेचे आणखी कांहीं प्रश्न विचारले व त्यांचीं त्यांनीं उत्तरेंहि बरोबर दिलीं. मग आह्मीं मुलींचें शिवणकाम व पेंटिंग काम पाहण्यास गेलों. येथें हरतऱ्हेचे लेस, लहान मुलींचे कपडे, जपानी खाकी मोने पेंटिंगनें रंग दिलेल्या तसबिरी, पंखे, पडदे वगैरे जिनसा कांचेच्या कपाटांतून चांगल्या व्यवस्थेशीर ठेविल्या होत्या, आणि सर्व वस्तूंवर त्यांची किंमत व करणाराचें नांव लिहिलेलें होतें. आह्मीं तेथील बऱ्याच वस्तु विकत घेतल्या. या मुक्या व बहिऱ्या मुलींचें अप्रतिम कौशल्य पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

नंतर सर्वांत मोठा पेंटिंगचा क्लास पाहण्यास गेलों. पेंटिंगचें लांकडावरील खोदीव काम, मातीचे पुतळे वगैरे कामें सर्व पुरुषच करितात.

येथील एका मुख्या इसमाला कागदावर लिहून कळविलें, कीं, 'एक चांगला पंखा लवकर तयार कर.' त्यानें लागलाच कागद कातरून आणि दोन वासाच्या कमच्या छिनून त्याला जोडून पंखा तयार केला, व त्याच्या एका बाजूला फुजी पर्वताचें व दुसऱ्या बाजूला चेरी ब्लासमचें चित्र काढून तो पंखा आह्मांला नजर केला. डायरेक्टर ह्मणाला "ही लहानशी मुक्यावहिऱ्यांच्या शाळेची आठवण तुमच्याजवळ असूं द्या. कारण हिंदुस्तानांत गेल्यावर इकडील सर्व गोष्टी स्वप्नवत् वाटूं लागतील !"

डायरेक्टर फार चांगल्या स्वभावाचा व सभ्य वर्तणुकीचा मनुष्य दिसला. आपला वेळ खर्च करून तो आमच्यावरोबर फिरला व सर्व शाळा त्यानें आह्मांला चांगल्या रीतीनें दाखविली.

## जिओलॉजिकल गार्डन.

दुपारीं जिओलॉजिकल गार्डन पाहण्यास गेलों. येथें जनावरांचा संग्रह फारसा नाहीं; परंतु एका भागामध्यें मातीचे पुतळे फारच सुरेख केलेले आहेत. हे अगदीं हुबेहूब मनुष्यासारखे दिसतात. जपानमध्यें ज्या ऐतिहासिक गोष्टी घडल्या त्यांचे हे नमुने आहेत, त्यामुळें हे पाहण्यांत अधिकच चित्त वेधतें.

येथें तीनचार थिएटरेंहि आहेत. तेथें लहानलहान मौजेचे खेळहि होतात, व थोडासा बायस्कोपहि दाखवितात. अशा रीतीनें या ठिकाणीं करमणुकीचीं बरींचशीं साधनें ठेविलीं आहेत.

## उनेओ पार्क.

हा पार्क एका उंचसखल जागीं असून येथें एक सिंटोचें देऊळ आहे, आणि तेथें बाजारहि भरत असतो. येथें लहानमोठीं झाडें अनेक तऱ्हेच्या आकृत्यांमध्यें कातरलेलीं आहेत. तीं हिरवींगार असून सुंदर दिसतात. हा पार्क फार मोठा असून प्रेक्षणीय आहे; परंतु आह्मी दमल्यामुळें थोडासा भाग पाहिला व हॉटेलमध्यें परत आलों.

## सुगामो प्रिझन.

तारीख १३ एप्रिल १९११ रोजीं सकाळीं सुगामो प्रिझन पाहण्यास गेलों. हा तुरुंग फक्त पुरुषांकरितांच आहे. बायकांकरितां दुसरा आहे. टोकिओमध्यें हा सर्वांत मोठा आहे. यांत २१०० कैदी राहण्याची व्यवस्था आहे. परंतु आह्मी गेलों, त्या दिवशीं कैद्यांची संख्या ३००० होती. हा तुरुंग बायकांनां पाहण्याची मनाई आहे, ह्मणून मला आंत जातां आलें नाहीं. ह्मणून मी बाहेर रिकशांत बसून राहिलें. परंतु बाहेर बागेमध्यें पुष्कळ कैदी काम करीत होते ते पहिलवानासारखे चांगले लठ्ठ दिसले, व त्यांच्या अंगावरील कपडेलत्ते बरे दिसले. यावरून कैदी लोकांची बरीच काळजी घेतात, असें दिसलें. हे आंतून परत आले, तेव्हां मला अंतर्व्यवस्थाहि उत्तम असल्याचें कळलें.

बायकांचा तुरुंग पाहण्याची मला फार इच्छा होती; परंतु वेळ राहिला नव्हता, व पाऊसहि जोरानें येऊं लागला, ह्मणून तो बेत सोडून दिला.

## लष्करी हत्यारांचें म्युझियम.

दुपारीं लष्करी हत्यारांचें म्युझियम पाहण्यास गेलों. या म्युझियममध्यें पुष्कळ जुनीं हत्यारें व चिलखतें वगैरे आहेत. आणि चायनावारमधील व रशियनवारमधील मिळालेलीं हत्यारें, जहाजें, होड्या, तोफा बंदुकी वगैरे पुष्कळ जिनसा आहेत. या लढाईत जिंकून आणलेल्या वस्तूंबद्दल जपानी लोकांनां मोठा अभिमान वाटतो. असें वाटणें साहजिकच आहे.

नंतर तेथें जवळच असलेलें एक लहान थिएटर पहावयाला गेलों. येथें रूसोजपानी युद्धाचा देखावा दुर्बिणींतून दाखवितात. या लढाईमध्यें जपाननें रशियाला कसें जेरीस आणलें, व कायकाय युक्त्या केल्या, याचा सर्व देखावा हुबेहूब दाखवितात. हे जपानी शिपाई उंदरासारखे डोंगरांतून व खोऱ्यांतून बंदुकी घेऊन दबून बसावयाचे, आणि रशियन लोक मोठमोठे उंच, धिप्पाड व मोठमोठ्या घोड्यांवर बसलेले, भरधांव

चाल करून जपानी लोकांवर यावयाचें व जपानी लोकांच्या धडाधड बंदुकीच्या सपाट्यानें पटापट घोड्यांसुद्धां एकदम जमिनीवर पडावयाचें. अशाच तऱ्हेचे लढाईचे देखावे दाखवितात. या लढाईच्या वेळीं पुष्कळ चांगल्याचांगल्या घराण्यांतीलसुद्धां जपानी बाया जखमी लोकांची शुश्रूषा करण्याकरितां नर्सीस ह्मणून गेल्या होत्या. त्यांचींहि चित्रें दाखविलीं आहेत. या लढाईच्या वेळचा इतिहास एका अमेरिकन गृहस्थानें लिहिला आहे, त्यांत तो लिहितो, कीं, "जपानी लोकांनां जर एकादा रशियन जखमी मनुष्य सांपडला, तर ते लोक त्याला हॉस्पिटल-मध्यें पाठवीत होते, आणि तेथें त्याची आपल्या लोकांप्रमाणेंच शुश्रूषा करीत होते; आणि जर एकादा मेलेला मनुष्य सांपडला, तर त्याला चांगली मूठमाती देत असत. परंतु रशियन लोकांची वर्तणूक याच्याविरुद्ध असे. त्यांनां जर एकादा जखमी अगर मेलेला जपानी मनुष्य सांपडला, तर ते लोक त्याला निष्काळजीपणानें फेंकून देत असत."

## हायकोर्ट.

वाटेनें जातांना आह्मांला हायकोर्टची इमारत दिसली, तेव्हां जपानमधील हायकोर्ट कसें काय आहे तें पहावें, ह्मणून आह्मी आंत गेलों. शिपायांनीं आह्मांला खुणेनें सांगितलें, कीं, "अंगावरील कोट वगैरे बाहेर काढून ठेवा व मग आंत जा."

कोर्टाचें काम अगदीं शांतपणानें चाललें होतें. न्यायाधीश चांगल्या उंच जागीं बसले होते. त्यांचा चेहरा फार गंभीर दिसत होता. पुढें पांचसहा वकील लोक व कांहीं इतर मंडळी होती, आणि त्यांच्यामागें कांहीं प्रेक्षक लोक होते, तेथें आह्मीहि जाऊन बसलों. न्यायाधीशाचा व वकील वगैरे लोकांचा पोषाख जपानीच होता. इंग्लिश ड्रेस कोणींहि केला नव्हता.

हायकोर्ट पाहून आह्मी परतलों, तेव्हां गाइडनें आह्मांला एका हस्ती-दंती खोदींव कामाच्या दुकानीं नेलें. येथें हस्तीदंतावर काम केलेल्या



जपानांत घेतलेला माझा फोटो.

खोदींव नकशीदार, सुरेख व मोह पाडणाऱ्या अनेक वस्तु ठेविल्या होत्या. या वस्तु जशा सुंदर होत्या, तशी त्यांची किंमतहि जबर होती. आह्मी आपल्या शक्तीप्रमाणें कांहीं वस्तु खरेदी केल्या. त्या वेळीं पावसाच्या सरी बऱ्याच जोरानें येऊं लागल्या व आकाशामध्यें काळे ढग चोहोंकडून येऊं लागले. त्यामुळें जिकडेतिकडे अंधार होऊन व अगदीं संध्याकाळ झाल्यासारखें वाटलें. त्यामुळें त्या दुकानांतच कांहीं वेळ थांबावें लागलें. दुकानदाराच्या मुलीनें आमच्याकारितां चहा व मिठाई आणिली, आणि फार स्वागत केलें. शेजारीं एक फोटोग्राफरचें दुकान होतें. ह्मणून गाइड ह्मणाला, कीं, "येथें रिकामें बसण्यापेक्षां त्या दुकानीं चला व आपला फोटो काढवा." पण हे ह्मणाले, कीं, "माझे कपडे चांगले नाहींत, पावसानें भिजले आहेत व त्या अंधारामध्यें फोटोहि चांगले निघणार नाहींत." परंतु गाइडचा व दुकानदाराचा आग्रह पडला, कीं, "तुह्मी आपला नाहीं तर मडमचा तरी काढवा, व आह्मी जपानी लोक या कलेमध्यें किती हुषार आहोंत हें पहा." मग मला हे ह्मणाले, कीं, "तुह्मी आपलाच या प्रवासी पोषाकांत फोटो घ्या, ह्मणजे आपल्याजवळ एक जपानची आठवण राहील." हें फोटोग्राफरचें दुकान अगदीं लहान पण दुमजली होतें. मग पाठीमागें आणखी जागा असेल तर कोण जाणे! परंतु पुढची जागा अगदीं लहान होती. येथें दोन तरुण मुलें कागदावर चित्रें काढीत होतीं. गाइडनें त्यांनां सांगितल्यावर तीं आह्मांला वर घेऊन गेलीं. ही वरील खोली लहानच होती, व इकडीलप्रमाणें भिंतींनां फोटो, तसबिरी वगैरे डामडौल मुळींच नव्हता. मला वाटलें, या अशा ठिकाणीं फोटो तरी काय काढावयाचा? आणि हीं पोरें तरी काय काढणार? यांच्याजवळ धड कॅमेरा दिसत नाहीं, अथवा पडदेहि दिसत नाहींत. आणि ही खोली पाहिली तर अशा तऱ्हेची. परंतु ज्या अर्थीं येथें आलोंच आहों त्या अर्थीं फोटो कसाहि निघो–काढलाच पाहिजे. असा माझा विचार चालला आहे, तों त्या दोघां मुलांनीं पाठीमागें एका लहानशा

घराच्या देखाव्याचा पुसटसा पडदा ठेविला व कांहीं आर्टिफिशियल शेवाळ आणि कांहीं वांकडींतिकडीं लांकडें इकडेतिकडे मांडिलीं. जसें कांहीं समुद्रकिनाऱ्यावर लहानसें घर आहे, व त्या घराच्यापुढें मी उभी आहें, अशा तऱ्हेचा हा देखावा तयार केला. मग मला तेथें उभी करून त्यानी एका क्षणांत फोटो काढून घेतला. अशा उभ्या रहा, कीं, तशा उभ्या रहा, इकडे पहा, कीं, तिकडे पहा, कांहीं एक त्रास दिला नाहीं व तीनचार दिवसांत तुह्मांला याच्या प्रति मिळतील, असें सांगितलें. परंतु आह्मांला दुसऱ्या दिवशीं निकोला जावयाचें होतें व तेथें एक दिवस राहून पुढें याकोहामाला जावयाचें आणि तेथून १९ तारखेला बोटीवर चढावयाचें. मग आह्मांला फोटो कसे मिळणार? परंतु तो फोटोग्राफर ह्मणाला, कीं, "तुह्मांला याकोहामाला फोटो आणून पोहोंचवूं, त्याविषयीं काळजी नको." हा दुकानदार ह्मणाला "त्यांचें फोटोग्राफीचें मुख्य दुकान दुसरीकडे असून ही त्याची एक शाखा आहे. तुह्मी त्या मुख्य दुकानीं जा. ह्मणजे तेथें किती उत्तमव्यवस्था व गर्दी असते, हें तुह्मांला दिसेल. मी तुह्मांला तेथील पत्त्याचें कार्ड देतों." आह्मीं त्याला सांगितलें "आह्माला आतां मुळींच वेळ नाहीं, नाहींतर खुषीनें गेलों असतों." नंतर आह्मीं त्याचे पैसे चुकवून तेथून निघून गेलों.

## कलाकौशल्याचें एक्झिबिशन.

तारीख १४ एप्रिल १९११. सकाळीं कलाकौशल्याचें एक्झिबिशन पहावयाला गेलों. हें फार मोठें आहे, व येथें पुष्कळ नामांकित वस्तु ठेविल्या आहेत. तीनचार मोठमोठे पेंटिंग हाल आहेत, व लहानमोठ्या पेंटिंगच्या अनेक तसबिरी आहेत. यांपैकीं कांहीं फार सुरेख आहेत. त्यांच्याकडे टक लावून एकसारखें पहातच रहावें असें वाटे. त्यांची तारीफ करावी तेवढी थोडी. हें एक्झिबिशन चांगलें पहाण्यास निदान एक आठवडा तरी पाहिजे. तें आह्मी वअध्या तासदीडतासामध्यें पहाणार, तेव्हां अर्थात्च आमचें पाहणें ह्मणजे इकडे तिकडे थोडीशी नजर

फेंकली कीं झालें, चला लवकर, अशांतली स्थिति होती. रात्र थोडी व सोंगें फार अशांतली आमची गत झाली. एक्झिबिशन पाहून उनीओ स्टेशनजवळचा एक बगीचा पहाण्यास गेलों. येथें जनावरांचा, पक्ष्यांचा व इतर आणखी प्राण्यांचा संग्रह फार मोठा आहे. येथीलहि थोडासा भाग आम्हीं पाहिला. येथील सर्वच व्यवस्था चांगली आहे. परंतु वाघाच्या व सिंहाच्या जागा फारच वाखाणण्यासारख्या आहेत. यांच्या पिंजऱ्यांच्या सभोंवतीं दोनतीन जाड कांचेच्या तावदानी भिंती केल्या असून आंत जागजागीं लोखंडाच्या खांबांतून फायरप्लेस सारख्या शेगड्या केल्या आहेत. या शेगड्या, हवेच्या मानानें जितकी उष्णता लागेल तितक्या प्रमाणानें पेटविल्या जातात. याशिवाय गरम पाण्याच्या नळ्याहि लाविल्या आहेत, आणि त्यांच्या पिंजऱ्यांशीं लागूनच कांहीं गुहा, लहानलहान डोंगर व त्यांनीं आंघोळी करण्याकरितां चांगलीं स्वच्छ टाकीं, लोळण्याकरितां आणि खेळण्याकरितां चांगली मऊ रेती, मधुनमधून हिरवेंगार गवत व कांहीं झाडें लावलेलीं, अशा सर्व आर्टिफिशल वस्तु हुबेहूब केल्या आहेत, त्यामुळें हे वाघ चांगले लठ्ठ व चकचकीत दिसतात. इतके लठ्ठ वाघ मीं कोणत्याहि पिंजऱ्यांत पाहिलेले नाहींत.

## उनिओ स्टेशन.

हें स्टेशन फार मोठें आहे व येथून पुष्कळ ठिकाणीं गाड्या जातात. आम्हीं येथून दुपारीं २ च्या गाडीनें निकोला जाण्याकरितां निघालों. स्टेशनावर लोकांची अतिशय गर्दी होती, आणि जिकडेतिकडे जाण्याकरितां प्लॅटफॉर्मवर गाड्या तयार होत्या. जपानी बायका आणि पुरुष आपापलीं गांठोडीं घेऊन इकडेतिकडे धांवत होते. त्यांच्या पायांतील लांकडी जोड्यांच्या आवाजानें स्टेशन दणाणून गेलें होतें. टोकिओमध्यें जीं मुख्यमुख्य स्टेशनें आहेत, त्यांपैकीं उनिओ हें एक आहे. टोकिओ जपानमध्यें सर्वांत मोठें शहर आहे. तेथील लोकसंख्या बावीस

लक्ष आहे, असें ह्मणतात. हें सोळाव्या शतकांत आयासोशोगननें आपलें वसतिस्थान केलें, तेव्हांपासून याची फार भरभराट झाली. त्यापूर्वीं हें एक लहानसें खेडें होतें. नंतर १८६८ मध्यें बादशहा तेथें राहण्यास आला, व शोगनच्या कारभारचा शेवट झाला. तेव्हां शहराचें नांव यड्डो बदलून टोकिओ ठेवलें.

आह्मी येथें फारच थोडे दिवस राहिलों; तेव्हां अर्थात्च आह्मी आणखी विशेष कांहीं पाहूं शकलों नाहीं. टोकिओएवढें मोठें शहर आपल्या हिंदुस्तानांत एकहि नाहीं. जरी या शहराची रचना ह्मणण्यासारखी सुरेख नाहीं, तरी स्वच्छता, टापटीप फार चांगली आहे. जपानी लोक आपलीं दुकानें, घरें व सभोंवतालची जागा वगैरे चांगली स्वच्छ ठेवितात. घरांतून आणि दुकानांतून बांबूंच्या लहानलहान लांकडाचीं खोडें कोरून त्याच्या पिकदाण्या ठेविलेल्या असतात. कोणालाहि थुंकावयाचें असलें तर त्यानें त्यांत थुंकावें, वाटेल तेथें थुंकावयाचें नाहीं, अशी त्यांची चाल आहे. घरांतील केरकचरा वगैरेंकरितां ज्या जागा मुक्रर केलेल्या असतील तेथें नेऊन तो टाकला पाहिजे. त्यामुळें लहानलहान गल्ल्या, बोळ, घराच्या आसपासची जागा वगैरे चांगलीं साफ राहतात. चिनी लोकांसारखे हे लोक घाणेरडे नसतात, व चालीरीतीनेंहि पुष्कळ सभ्य असतात. कांहीं यूरोपियन लोकांचें असें मत आहे, कीं, चिनी लोक चालीरीतींनीं जरा ओबडधोबड असतात, तरी ते मनाचे चांगले व साधे असतात; परंतु जपानी लोक मोठे कावेबाज असतात. आमच्या थोड्याबहुत अनुभवावरून आह्मांला तर जपानी लोक मनमिळाऊ, चांगले मायाळू, प्रामाणिक आणि सभ्य असे दिसले. चिनी लोकांशीं आमचा फार संबंध आलेला नाहीं. टोकिओमध्यें व किओटोमध्यें आह्मी कांहीं मध्यम स्थितींतील लोकांच्या येथें त्यांच्या आमंत्रणावरून चहा घेण्यास गेलों होतों. त्यावरून त्यांच्या घरच्या स्थितीची कल्पना आह्मांला थोडीबहुत आली. यांच्या घरांत तांब्यापितळेचीं अथवा

9239



कोणत्याहि धातूचीं भांडीं मुळींच दिसलीं नाहींत. स्वयंपाकघरांत एका बाजूला उंच उंचवटे करून त्या ओट्यांवर लहानमोठ्या भट्टीसारख्या चुली होत्या, व त्या मानानेंच लहानमोठीं मडकीं चुलीवर ठेविलीं होतीं. एका मडक्यांत भात शिजत होता, व एका मडक्यांत चहाचें पाणी तयार होतें. भाजी ह्मणा, किंवा आमटी ह्मणा, शिजून तयार झालेली होती, व त्याचें मडकें झांकून एका बाजूला ठेविलें होतें. भिंतींना बोर्डवर बरीचशीं चिनी व लांकडाचीं ओबडधोबड लहानमोठीं भांडीं ठेविलीं होतीं. लांकडाच्याच पळ्या व लांकडाचेच चमचे. कांहीं सुऱ्या, चिमटे, भात खाण्याच्या लांकडी काड्या असें कांहीं साधारण सामान होतें. या स्वयंपाकाकरितां व घरकामाकरितां एक तरुण मुलगी नोकर होती, व मुलेंबाळें खेळविण्याकरितां एक म्हातारी बाई होती. मुलीबाळी धरून या घरीं पांचसहा बाया होत्या, व चारपांच पुरुषमंडळी होती. या बायांनीं आह्मांला आपलें घर व आंतील व्यवस्था दाखविली. या घरांतील पुरुषांनांसुद्धां इंग्लिश मुळींच येत नव्हतें; तेव्हां अर्थात्च त्यांच्याशीं गाइडच्या मार्फत आह्मांला बोलावें लागे. यांच्या जेवणाचे पदार्थ ह्मणजे मुख्य भात व कोणच्या तरी तऱ्हेच्या माशाची भाजी, व तांदळाच्या पिठाचे कांहीं गोड पदार्थ, आणि दुधासाखरेशिवाय नुसता चहा. झालें. आपल्यासारख्या त्यांनां पुष्कळ भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, लोणचीं, पापड, दहीं, दूध वगैरे कांहीं लागत नाहीं. यांची जेवणाची तऱ्हा ह्मणजे त्यांच्या त्या लहानलहान चौकोनी उशा सभोंवतीं टाकून त्यांवर गुडघे टेंकून बसावयाचें, आणि मध्यें चिनीच्या कटोऱ्यांतून भात, भाज्या, चटण्या, आमटी जें कांहीं असेल तें काड्यांनीं व लांकडी चमच्यांनीं खावयाचें. भात मात्र या लोकांनां गरम लागतो, आणि दर जेवणाच्या वेळीं गरम चहा असलाच पाहिजे. चहाचेंहि बरें असतें. कारण त्याला दूधसाखर लागतच नाहीं, ह्मणून कितीहि वेळ चहा घेतला, तरी फारसा खर्च येत नाहीं. हें चहाच्या पाण्याचें मडकें

नेहमीं चुलीवर उकळतच असतें, व भाताच्या आधणाचेंहि मडकें नेहमीं तयार असतें. जेव्हां वाटेल तेव्हां लवकर भात करितां येतो. जेवणाचा व सोंवळ्याओंवळ्यांचा फारसा खटाटोप नसल्यामुळें जपानी बायांनां शिवणकाम, पेंटिंग, लिहिणेंवाचणें अशा कामांनां पुष्कळ वेळ मिळतो. तथापि असेंहि दिसलें नाहीं, कीं, जपानी बाया ह्मणजे आपल्या कामांत नेहमीं गढलेल्या आहेत! तर सकाळीं, संध्याकाळीं, दुपारीं केव्हां तरी रोज त्या फिरावयाला जातात. बागेंतून, लहानलहान बोटींतून नेहमीं यांच्या पार्श्या चाललेल्या असतात, आणि रस्त्यांतून, देवळांतून वगैरे बायकांचे वोळकेच्या वोळके पाठीला मुलें बांधून हंसतखेळत आनंदानें फिरत असतात.

असो. नंतर या बायांनीं आपलें लहानसेंच पण नीटनेटकें व स्वच्छ घर आह्मांला दाखविलें, व शिवणकाम, पेंटिंगचें काम जें कांहीं त्यांनीं केलें होतें तेंहि दाखविलें. मग एका लहानशा हॉलमध्यें चहाची तयारी झाली. सर्वांनां बसण्याकरितां लहानलहान गाद्या मांडल्या आणि मध्यें लांकडाच्या तबकांतून चहाचे कप, बिस्किटें, मिठाई, फळें वगैरे जिनसा आणून ठेविल्या. त्यांची जपानी मंडळी त्या गाद्यांवर गुडघे टेंकून बसली. आह्मीहि त्यांच्यांसारखें बसण्याचा प्रयत्न केला, परंतु आह्मांला चमत्कारिकच वाटूं लागलें. पायालाहि रग लागली. ह्मणून आह्मी आसरमांड्या घालून बसलों. अशा रीतीनें त्यांच्याबरोबर चहा घेण्याची आह्मांला मोठी मौज वाटली व बरीच करमणूकहि झाली. चहानंतर त्या बाईच्या दोघी मुलींनीं कांहीं जपानी वाद्यें वाजवून गाणींहि गाइलीं. गाणीं जरी आह्मांला समजलीं नाहींत, तरी त्या मुलींचे आवाज मधुर असल्यामुळें आह्मांला त्यांचा कंटाळा आला नाहीं. ही घरवालीबाई व बुवा दोघेंहि पोक्त वयाचीं होतीं, आणि त्यांचीं पुष्कळशीं मुलेंबाळें होतीं. त्यांचीं दोन मुलें लग्न झालेलीं असून तीं वेगळीं राहत असत. बाकीचे दोन मुलगे व दोन तरुण मुली अविवाहित असून आई-

त्रापांजवळ राहत होतीं. शिवाय आणखी कांहीं अज्ञान मुलें व कांहीं नातलग मंडळीहि होती. या मंडळीनें आमचें चांगलें स्वागत केलें, व सर्वांनीं अनेक वेळां लवूनलवून व सुस्कारे टाकीतटाकीत त्यांच्या चालीप्रमाणें नमस्कार केले. असे नमस्कार ह्मटले ह्मणजे फार अगत्याचे गणले जातात.

## निको.

संध्याकाळीं चार वाजतां आह्मी निकोला जाऊन पोहोंचलों. वाटेनें दोन जागीं गाड्या बदलाव्या लागल्या. वाटेनें डोंगराची व क्रिप्टोमेरी झाडांची सीनरी चांगली दिसली. गाडींत यूरोपियन व जपानी मंडळी फार होती. जी जपानीबाई पहिल्या वेळेस आगगाडीच्या प्रवासांत भेटली, ती जशी गुढघे टेंकून नवऱ्याच्या पायांशीं तटस्थ बसली होती, त्याप्रमाणें आह्मांला गाडींत पुष्कळ जपानी बाया दिसल्या; परंतु त्या बाईसारखी तटस्थ बसणारी एकहि बाई दिसली नाहीं, व तिच्या नवऱ्यासारखा झोंप घेणाराहि कोणी जपानी इसम दिसला नाहीं. उलट हंसूनखेळून बोलणारीं जोडपीं मात्र पुष्कळ दिसलीं.

निकोला आह्मी कनाया हॉटेलमध्यें उतरलों. या हॉटेलांत बऱ्याच अमेरिकन बाया होत्या. त्यांत कांहीं आमच्या ओळखीच्याहि निघाल्या. त्या आमच्यासारख्याच फिरत असून त्यांच्याआमच्या गांठीहि पडत होत्या. दुसऱ्या दिवशीं आह्मी निको येथील जगप्रसिद्ध देवालय पाहण्यास गेलों.

तेथें एका मुख्य देवालयांत टोकुगावा नांवाच्या कांहीं शोगनानच्या समाधि आहेत. या समाधींची अजून चांगली काळजी घेतली जाते. येथें मोठमोठ्या देवालयांचें काम प्रेक्षणीय असून, भिंतीला, खांबाला व वरच्या छताला लाखेचीं व सोनेरी मुलाम्याचीं कामें सुरेख व मजबूत केलेलीं आहेत. जपानी भाषेंत एक ह्मण आहे, कीं, “ निको पाहिल्याशिवाय केको ( उत्तम ) शब्दांचा उपयोगच करूं नका ! ” मला तर रोजरोज देवळें पाहून कंटाळा आला, व माझें लक्ष्यहि लागत नव्हतें;

परंतु देवळें पहाण्याच्या निमित्तानें बाहेर पडून इकडेतिकडे फिरणें तरी होत होतें, व कांहीं डोंगर, पहाड आणि नद्यांचे सुंदर देखावे पाहण्यास मिळत होते. अशीं कांहीं देवालयें पाहिल्यावर मीं गाइडला ह्मणालें "आतां देवळें पाहण्याचा मला कंटाळा आला आहे, तर देवळाखेरीज दुसरें कांहीं पहाण्यासारखें असल्यास दाखवा." नंतर गाइडनें आह्मांला जुना शोगन लोकांचा दिवाणखाना दाखविला. या दिवाणखान्यांत विशेष असें पाहण्यासारखें कांहीं नाहीं; परंतु भिंतीवरील जुनीं चित्रें व खांबावरील खोदींव काम चांगलें आहे. हा दिवाणखाना राजघराण्यांतील लोकांच्या उपयोगाकरितां ठेविला आहे. येथून थोड्याच अंतरावर एक बेचाळीस फूट उंच तांब्याचा स्तंभ आहे व जवळच आयासो शोगनची समाधि आहे. त्याच्या स्मरणार्थच हा स्तंभ केलेला आहे. स्तंभावरील खोदींव काम पाहण्यासारखें असून, समाधिसमोरील चिनी लांकडाचें गेटाचें काम फार सुबक आहे. एका इमारतींत टोकुगुवा घराण्यांतील शोगनानच्या मौल्यवान् वस्तु व मिळालेले नजराणे व बक्षिसें ठेविलेलीं आहेत.

दुपारीं एक शाळा पाहिली, व तेथून नदीच्या पलीकडील एक मोठा प्लमफळाचा बाग पाहण्यास गेलों. हा अगदीं नदीच्या किनाऱ्यावर आहे, व फार मोठ्या विस्तीर्ण जाग्यावर केला आहे. बागेच्या सभोंवतीं नेहमीं हिरवेंगार राहणाऱ्या झाडांचें कुंपण आहे. हें कुंपण तऱ्हेतऱ्हेच्या आकृतींमध्यें फार कुशल रीतीनें कापलें आहे. बागेंत लोकांनां बसण्याकरितां जागजागीं गर्द व थंड अशी छाया टाकणाऱ्या झाडांच्या खालीं दगडाचीं सुरेख टाकीं व रमणीय अशा जागा केल्या आहेत. ठिकठिकाणीं पाण्याचीं डबकीं करून त्यांत कारंजीं लाविलीं आहेत, व आंत रंगीबेरंगी मासे सोडले आहेत.

कितीहि थकलेला मनुष्य असला व तो या बागेमध्यें घटकाभर येऊन बसला, तर त्याच्या मनाला व शरीराला विश्रांति वाटून आनंद होईल,



Gobujio, One of National Treasures

गोबुजिओ.

असेंच हें स्थळ आहे. या बागेंत तीनचार चहापानगृहेंहि आहेत. तेथें तरुण मुली अथवा बायका हजर असतात, व येणाऱ्याजाणाऱ्या लोकांनां चहा, बिस्किटें, मिठाई, फळें वगैरे विकतात. याशिवाय कांहीं लोक, तबकें, ताटें, खेळणीं अशा लहानसहान वस्तुहि विक्रीकरितां ठेवतात.

नंतर आह्मी एका उंच टेकडीवर एक फार पुरातन देऊळ आहे, तें पाहण्यास गेलों. येथें बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. या देवळामध्यें जोडे घालून जाऊं देत नाहींत. दरवाज्याजवळ एकदोन मुली कापडी जोडे घेऊन उभ्याच असतात. प्रेक्षकांचे जोडे त्या काढून घेतात, व हे कापडी जोडे घालून देतात. नंतर परत जातांना पुनः ज्यांचे जोडे त्यांनां घालून देतात.

या देवळाजवळ एका उंच कड्यावर आणखी एक लहानसें देऊळ आहे. तेथें जाण्याला २०० पायऱ्या चढाव्या लागतात, आणि तेथून बराच दूरचा देखावा चांगला दिसतो. गाइड व हे दोघे वर गेले. माझी देखील वर जाण्याची इच्छा होती; परंतु पाय दुखत असल्यामुळें आणि पायऱ्या अगदीं उतरत्या असल्यामुळें मी खालींच बसून राहिलें. येथें आह्मांला पुष्कळ अमेरिकन बाया भेटल्या. त्यांत एकदोघींजवळ गाइडबुकें असून, त्यांत दिलेल्या माहितीप्रमाणें देवळें वगैरे पहात त्या फिरत होत्या. त्यांनां गाइड वगैरे कोणी लागत नसून त्या प्रत्येक गोष्ट नोटबुकांत लिहून घेत होत्या.

या बायांमध्यें आमची हॉटेलची ह्मातारी एक इंग्लिश बाई होती. ती स्वभावानें फार चांगली व मोकळ्या मनाची असून हॉटेलांत नेहमीं आमच्याजवळ बसून घटकाभर गप्पागोष्टी सांगत असे. ही बाई देवळाच्या दरवाज्याच्या नजीकच्या पायरीवर अगदीं थकून बसली होती. आह्मी बाहेर येऊं लागलों, तेव्हां ती आह्मांला आंत पाहण्यासारखें काय आहे, हें विचारूं लागली, व ह्मणाली "मला बूट काढण्याचा त्रास आला आहे, व मीं जीं दोनचार देवळें पाहिलीं, त्या त्या ठिकाणीं बूट काढतां

काढतां मला कंटाळा व थकवा आला आहे; परंतु जिज्ञासा कांहीं तृप्त होईना, व असें वाटलें, कीं, येथें कांहीं तरी विशेष पाहण्याजोगें असून विनाकारण आळसामुळें पहावयाचें राहील."

आह्मीं तिला "पाहण्यासारखें विशेष कांहीं नाहीं, तरी तुमची इच्छा असल्यास जा." असें सांगितलें, तरी ती ह्मातारी बूट काढून गेलीच! तिच्यानें कांहीं राहवलें नाहीं!

तारीख १६ एप्रिल रोजीं सकाळीं उपहार झाल्यावर आह्मी लेक चुंझजी पहाण्यास गेलों. हें निकोसापासून सुमारें अकरावारा मैल असेल. येथें रिकशांत अथवा खुर्च्यांत वसून जातां येतें. वाटेनें सृष्टिसौंदर्य चित्ताकर्षक आहे. तीनचार जागीं लहानमोठे धबधबे लागतात. येथेंहि जपानच्या चालीप्रमाणें चहाचीं दुकानें होतींच.

आमच्याबरोबर बऱ्याच अमेरिकन बायाहि आल्या होत्या व आमची इंग्लिश ह्मातारी पण होती. ही बाई बोलावयाला असल्यामुळें वाटेनें करमणूक होऊन वेळ लवकर गेला. ही बाई हिंदुस्तानांत केव्हांहि आली नव्हती; पण हिंदुस्तानाविषयीं तिनें बरीच माहिती वाचिली होती. ती ह्मणाली "माझी हिंदुस्तानांत जाण्याची फार इच्छा आहे, व केव्हांतरी मी जाईनच! तुमच्या हिंदुस्तानांत तर जपानप्रमाणें सुंदर जागा पुष्कळ असतील. मी ऐकतें, कीं, 'काश्मीर' फार सुंदर प्रदेश आहे. परंतु मला वाटतें, तुह्मी तेथें अजून गेलां नसाल. कारण सर्वच मनुष्यांचा असा स्वभाव असतो, कीं, वेळ व पैसा असल्यास परकीय देश पाहाण्यास आधीं धांवावें. याचें कारण असें, कीं, अं: तें काय, तें तर आपल्या देशांतच आहे! केव्हांहि पाहतां येईल! असा विचार करून आपण तें लांबणीवर टाकतों."

कांहींहि असो, या बाईचें ह्मणणें खरें ठरलें.

या सरोवराच्या कांठीं एक चांगलें हॉटेल आहे, व दुसऱ्या बाजूला देवळें आहेत. सरोवराचें पाणी स्वच्छ मोत्यांसारखें असून त्यांत मंदमंद लाटा येत होत्या. हॉटेलच्या ड्राइंगरूममध्यें बसलें असतां खिडकींतून

सरोवराची शोभा सुंदर दिसते. हें सरोवर समुद्रसपाटीपासून ४४०० फूट उंच, ७॥ मैल लांब, व २॥ मैल रुंद असून याचा परीघ २० मैल आहे. यांत अनेक तऱ्हेचे मासे आहेत. याचें पाणी हिंवाळ्यांत बर्फासारखें होतें. उन्हाळ्यांत पुष्कळ लोक येथें येऊन राहतात.

या सरोवराच्या सीनरीपेक्षां मला हाकोनी सरोवराची सीनरी फार आवडली, व निकोपेक्षां मीयानोष्टाचे डोंगर, पहाड, देखावे वगैरे अधिक रम्य दिसले. निको ही फार चांगली जागा आहे, आणि पुष्कळांनां मीयानोष्टापेक्षां निको फार आवडतें; परंतु आवडनिवड ही आपल्या रुचीवर आहे. मीयानोष्टाचें सौंदर्य स्वाभाविक आहे, आणि तेथें देवळें वगैरे फारशीं नाहींत. निकोचें तसें नाहीं. तेथें पुष्कळ झाडें वगैरे लावून, आणि मोठमोठीं देवळें बांधून त्याला सौंदर्य आणलें आहे. संध्याकाळीं हॉटेलला परत आलों. आमच्या खोलीमध्यें आंत चांगला धगधगीत विस्तव पेटवून ठेविला होता, व वाशिंग टेबलावर गरम पाणी, स्वच्छ टॉवेल वगैरे सर्व तयारी करून ठेविली होती. येथें सकाळसंध्याकाळ बरीच थंडी असल्यामुळें खोलीमध्यें विस्तवाची फार जरूरी असते, आणि जपानी मुली आपल्या कामामध्यें कधींच हयगय करीत नसतात. एकदां त्यांनां समजलें, कीं, अमुक वेळेला अमुक करावयाचें, कीं, त्याप्रमाणें बरोबर करावयाचें; पुनः सांगण्याची जरूर नाहीं. यांचा प्रवासांत नेहमीं नियम असे, कीं, सकाळीं सहा वाजतां उठून स्नान आटोपून रामायण, शिवलीलामृत वगैरे पोथ्या वाचावयाच्या, नमस्कार घालावयाचे, व मग कपडे वगैरे घालून साडे आठला ब्रेकफास्ट घेण्याला तयार असावयाचें. मग रात्रीं निजावयाला किती जरी रात्र झाली असली तरी हा सकाळचा नियम चुकावयाचा नाहीं. मग वाटेंत असा, ट्रेनमध्यें असा, कीं, कोठेंहि असा. कोठेंहि हॉटेलमध्यें गेलें, कीं, तेथील चेंबरमेडला ताकीद व्हावयाची, कीं, सकाळीं सहा वाजतां स्नानाचें पाणी वगैरे तयार पाहिजे ! त्याप्रमाणें या जपानी मुली सकाळीं सहाचा ठोका पडला, कीं

दरवाज्यावर ठकठक करावयाच्या, व स्नानाची तयारी असल्याबद्दल वर्दी द्यावयाच्या. नंतर फायरप्लेसमध्यें विस्तव पेटवून, कपड्यांनां ब्रश करून, जोडे साफ करून, व वारनिस देऊन जेथल्या तेथें ठेवून कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें निघून जावयाच्या. काम करितांना कधीं खडखड धडधड करून त्रास द्यावयाच्या नाहींत.

आपल्या हिंदुस्तानच्या मानानें सकाळीं सहाला उठणें फार लवकर सममजलें जात नाहीं; परंतु जपान, आणि यूरोपच्या फार थंड हवेमध्यें तें फार लवकर समजलें जातें. यूरोपमध्यें तर बहुतेक ठिकाणीं नोकर-लोकसुद्धां सात वाजल्याशिवाय उठावयाचे नाहींत; मग यजमान कोठले उठावयाला ? ंतिकडील लोक रात्रीं एकदोन वाजेपर्यंत जागतात; व दुसरे दिवशीं आठ साडे आठ वाजेपर्यंत निजतात.

या हॉटेलमध्यें आमची खोली वरच्या मजल्यावर होती, आणि याचें काम करणाऱ्या पांचसहा मुली होत्या. या मजल्यावरच त्यांनां बसण्या-उठण्याकरितां एक स्वतंत्र खोली दिली होती. त्या नेहमीं तेथेंच हजर राहून, फावल्या वेळांत शिवणकाम, लेसेस वगैरे करीत असत. येथील नोकरांनां बोलावण्याची एक वेगळीच तऱ्हा होती. घंटीचें बटण दाबलें, कीं, ऑफिसमध्यें त्याचा आवाज होत असे. मग तो ऑफिसवाला टेलि-फोननें मुलींनां कळवीत असे, कीं, 'अमक्या नंबरच्या खोलींत तुमची जरूर आहे, लवकर जा.' मी एकादे वेळीं उगीच गमतीनें बटण दाबीत असें, कीं, लागलीच टेलिफोन होऊन लागलीच आमच्याकडे एक बाई धांवत यावयाची. जपानमध्यें टेलिफोन आणि तारायंत्रें जिकडेतिकडे आहेत. लहानलहान दुकानांतूनसुद्धां टेलिफोन आणि रस्यारस्त्यांनीं लहानलहान ज्या पोलिसांच्या झोंपड्या असतात, त्यांत देखील ही व्यवस्था असते.

रात्रीं जेवणें वगैरे झाल्यावर आह्मी सर्व बाया ड्राइंगरूममध्यें फायर-प्लेसजवळ बसलों. थंडी बरीच कडक पडली होती, ह्मणून विस्तव

फार प्रिय वाटत होता. आमची मैत्रीण ह्मातारी बाई पुष्कळ गमतीच्या गोष्टी सांगून आह्मां सर्वांनां हंसवीत होती. तिनें पुष्कळ प्रवास केला होता. ती ह्मणाली " माझ्यामागें कांहींएक पाश नाहीं; कारण, मला एकच मुलगा असून त्याचें लग्न वगैरे झालें आहे, व त्याला पलटणीमध्यें नोकरी आहे, तेव्हां त्याची कांहीं काळजी नाहीं. माझा नवरा मरण पावल्याला दहा वर्षे झालीं, तेव्हां आतां मीं अशीच फिरत असतें. मला प्रवास करणें फार आवडतें."

तेव्हां मी त्या बाईला विचारलें " तुह्मांला समुद्रापासून कांहींच त्रास होत नाहीं का? मला तर जराशी बोट हलावयाला लागली, कीं कसेंसेंच होऊन डोकें फिरूं लागतें."

ती बाई ह्मणाली "मला पूर्वी असेंच होत होतें; परंतु एका डॉक्टरानें एक औषध सांगितलें. तें घेतल्यापासून मला कांहींच त्रास होत नाहीं. तुह्मांला पाहिजे असेल तर त्या औषधाचें नांव लिहून देतें. तें औषध शहरामध्यें कोणत्याहि दुकानीं मिळतें."

मला त्याची जरूर होतीच. कारण, अमेरिकेचा जलप्रवास जवळ आला होता, व त्याची मला आधींपासूनच धास्ती पडली होती. ह्मणून मी त्या औषधाचें नांव लिहून घेतलें. नंतर या बायांमध्यें जपानविषयीं संभाषण सुरू झालें. कांहीं बाया जपानच्या सौंदर्याची, लोकांच्या हुषारीची वगैरे तारीफ करूं लागल्या; परंतु मध्येंच दोन अमेरिकन बाया ह्मणाल्या "आमची तर जपानमध्यें येऊन पूर्ण निराशा झाली. आह्मांला येथें तारीफ करण्यासारखें कांहींच दिसत नाहीं. जपानपेक्षां चीन देश बरा आहे. रशियन वॉरपासून जपानची जिकडेतिकडे मोठी बढाई चाललेली असते, त्यामुळें लोकांनां वाटतें, कीं, जपान ह्मणजे काय आहे व काय नाहीं! येथील लोकांची ह्मणण्यासारखी सुधारणा दिसत नाहीं. येथें पाहण्यासारखें ह्मणाल तर चेरीब्लासम आहे; दुसरें तर आह्मांला कांहीं विशेष दिसत नाहीं!"

आमच्या ह्यातान्या बाईचें व इतर बायांचें मत निराळें पडलें. त्या ह्मणाल्या "जपान फार सुंदर देश आहे, व लोकांनीं आपली सर्व तन्हेनें सुधारणा केली आहे. आतां त्याच्यामध्यें कांहीं दोष असतील; परंतु ते एकदमच निघणें कसें शक्य आहे ? "

या बाया मला विचारूं लागल्या " तुमचें कसें काय मत आहे ? व अनुभव काय आहे? " मीं सांगितलें " जपानबद्दल माझें मत चांगलें आहे. माझ्या थोड्या दिवसांच्या अनुभवावरून मला वाटतें, कीं, जपानी लोक फार सभ्य असून फार प्रामाणिक आहेत."

कोणत्याहि देशांत निदान ५।६ महिने राहिल्याशिवाय तेथील खरी स्थिति समजणें कठीण आहे. आह्मी जपानमध्यें सारा एक महिना राहिलों, व तितक्यांत सतरा गांवीं फिरलों. तेव्हां इतक्या थोड्या वेळांत खरी स्थिति समजणें शक्य नाहीं. परंतु ' शितावरून भाताची परीक्षा ' या न्यायानें जपानबद्दल आमचें मत वाईट झालें नाहीं.

या हॉटेलमध्यें सालवेशन आर्मीपैकीं कांहीं ख्रिश्चन जपानी बाया होत्या. त्या आपल्या फंडाकरितां हॉटेलमध्यें लोकांजवळ पैसे मागत असत. एक बाई आह्मी बसलों होतों तेथें हळुहळू आली, व मोठा आशीर्वाद देऊन पैसे मागूं लागली. आह्मीं तिला कांहीं पैसे दिले. मग ती भीतभीत अमेरिकन बायांकडे गेली, आणि ह्मणाली "तुह्मी मेल्यावर स्वर्गाला जाल, तुमच्या आत्म्याला शांति मिळेल." असेंतसें ह्मणून ती पैसे मागूं लागली. यावर एक बाई तिच्या अंगावर वसकन् ओरडून ह्मणाली "जा जा,आह्मी स्वर्गाला जाऊं किंवा नरकामध्यें जाऊं, त्याशीं तुला काय करावयाचें ? तुझ्यासारख्यांना आह्मीं पैसे देत नाहीं. आमच्या आत्म्याला नेहमीं शांति आहे, तुझ्या आशीर्वादाची जरुरी नाही!" बिचारी पहिल्यांदा भीतभीतच आली होती,व हे शब्द ऐकल्याबरोबर मागच्या पायीं निघून गेली.

जपानमध्यें आह्मी इतक्या ठिकाणीं फिरलों, परंतु आह्मांला भिकारी किंवा धर्मार्थ पैसे मागणारे कोठेंहि आढळले नाहींत. याच हॉटेलमध्यें फक्त ही बाई दिसली.

टोकिओमध्यें या महिन्याच्या २१ व्या तारखेला मिक्याडो (बादशहा) मोठी गार्डन पार्टी देणार होता. त्याचें आमच्या या अमेरिकन बायांनां व वृद्ध इंग्लिश बाईला वगैरे सर्वांनां निमंत्रण आलें होतें. आह्मांलाहि आमच्या 'वेलकम् सोसायटी'च्या मार्फत निमंत्रण आलें होतें; परंतु आह्मी १९ तारखेला जपान सोडणार होतों, तेव्हां आह्मांला त्याचा स्वीकार करितां आला नाहीं.

या पार्टीकरितां सर्व बायांची पोषाखाबद्दल वगैरे मोठी जारीनें तयारी चालली होती. टोकिओमधील मोठमोठ्या दुकानदारांशीं यांचा रोज पत्रव्यवहार चालला होता, आणि ड्राइंगरूममध्यें सकाळसंध्याकाळ सारखी वाटाघाट चाललेली असावयाची, कीं, कोणच्या रंगाचा किमोना चांगला दिसेल, कशा रंगाची रिबन खुलेल, लेस कोणत्या तऱ्हेचे घ्यावे?

आमच्या वृद्ध बाईची तर सर्वांपेक्षां जास्तीच गडबड! कांहीं रेशमी कापडाचे व कांहीं रिबनचे नमुने हातांत घेऊन या बाईला दाखव, त्या बाईला दाखव, हें कसें दिसेल, तें कसें दिसेल, अशी तिची धांदल उडून गेली. ती मला ह्मणाली "तुह्मी उगीच जपान सोडण्याची घाई करितां! चांगला गार्डन पार्टीचा चान्स आला असतां सोडून देतां. तुह्मां इंडियन लोकांनां अजून एनर्जी नाहीं आली. राग नका येऊं देऊं—तुमची मैत्रीण ह्मणून थट्टेनें ह्मटलें."

आह्मीं त्या बाईला सांगितलें "आमची १९ तारखेची बोट चुकवतां येत नाहीं. कारण, आमचा लंडनपर्यंतचा सर्व प्रोग्राम बिघडेल, आणि कारोनेशनला आह्मांला लंडनला पोंचतां येणार नाहीं."

ता. १७ एप्रिल रोजीं दुपारीं लंच झाल्यावर आह्मी निकोहून निघालों. आमच्या गाइडचें घर येथेंच असून त्याचे तिघेचौघे भाऊ, मुलेंबाळें वगैरे बरेंच मोठें कुटुंब होतें. त्याचा एक भाऊ पेंटिंगचें काम चांगलें करीत असतो. त्याच्या हातचीं बरींचशीं चांगलींचांगलीं चित्रें गाइडनें आह्मांला नजर केलीं. संध्याकाळीं चार वाजतां टोकिओ येथें उन्निओ

स्टेशनावर उतरलों. येथें लोकांची अतीशय गर्दी होती. येथून रिकशांतून तीन मैलांवरील शिंवासी स्टेशनावर गेलों, व तेथून ट्रेननें संध्याकाळीं याकोहामाला पोहोंचलों.

## याकोहामा.

येथें ओरिएंटल पॅलेसमध्यें उतरलों. सकाळीं देवळें, दुकानें, बाजार वगैरे पाहिला. यांची रचना अलीकडील असल्यामुळें इंग्लिश धर्तीवर आहे. रस्ते रुंद असून, घरें व दुकानें बरींच प्रशस्त बांधिलीं आहेत. सन १८८६ मध्यें हें बंदर परकीय व्यापाऱ्यांनां खुलें केलें, तेव्हां येथें फक्त ८७ झोंपड्या होत्या; परंतु हल्लीं येथील लोकसंख्या ३२,६०० असून वाढत्या प्रमाणावर आहे. येथें पुष्कळ उंची जपानी मालाचीं मोठमोठीं दुकानें आहेत. यूरोपियन लोकांचींहि बरींच दुकानें आहेत. येथें कांहीं पारशी व्यापारी दिसले. ते हिंदुस्तानचा माल विकीत असतात. हॉटेलमध्यें लोकांची फार गर्दी होती. ही सर्व मंडळी अमेरिकेला जाण्याकरितां आली होती. यांच्यामध्यें इंग्लिश, अमेरिकन, जर्मन, फ्रेंच, ऑस्ट्रेलियन वगैरे लोक होते. अमेरिकन लोकांची संख्या जास्त होती.

लंच झाल्यावर दुपारीं बाहेर जाण्याचा आमचा विचार नव्हता; आणि तसें गाइडलाहि आह्मीं सांगितलें. "मग संध्याकाळीं समुद्रकिनाऱ्या-वर वगैरे हवा खाण्याला जाऊं, दुपारीं विश्रांति घेण्याची इच्छा आहे, ह्मणून तुह्मी आपल्या इनमध्यें विश्रांति घ्या."

गाइड नेहमीं आपल्या जपानी इनमध्यें उतरत असे. जपानमध्यें सर्व ठिकाणीं त्यांच्या इन्स् असतात. मोठमोठ्या हॉटेलजवळसुद्धां एकदोन तरी इन्स् असतातच. तेथें त्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था असते, व तेथील व्यवस्थापक बहुतकरून बायकाच असतात.

लंचनंतर आह्मीं कांहीं पत्रें वगैरे लिहिलीं, व ड्राइंगरूममध्यें वर्तमानपत्रें वाचीत बसलों. परंतु यांनां बाहेर गेल्याशिवाय चैन पडेना.

ह्मणून हे उठले व ह्मणाले " मी जरा कुकच्या ऑफिसमध्यें जाऊन पुढील व्यवस्थेची चांगली चौकशी करून येतों. कारण, उद्यां बोटींत बसलों ह्मणजे १७।१८ दिवस बंदिवासच आहे, ह्मणून आजचा दिवस इकडेतिकडे फिरून घेतों. "

सुमारें १॥ तासानें हे परत आले, व सांगूं लागले " आज एक विलक्षण रिकशावाला मिळाला होता! त्या बेट्यानें मला भलतीकडेच नेलें! पहिल्यानें मी येथून त्याच्या रिकशांत बसून कुकच्या आफिसांत गेलों. तेथें कांहीं माहिती वगैरे विचारून या रिकशावाल्याला सांगितलें, कीं, इकडेतिकडे थोडें फिरव व पुनः हॉटेलांत परत घेऊन चल. त्यानें एका वांकड्यातिकड्या रस्त्यानें रिकशा नेला, व एका माडी-जवळ उभा करून मला आपल्या मोडक्यातोडक्या इंग्लिश भाषेंत ह्मणाला 'येथें चांगली नाचणारी जपानी मुलगी आहे. ती अंगावरील कपडे वगैरे काढून टाकून नाचते. पुष्कळ लोक तिचा नाच पहाण्याला जातात, तुह्मालाहि मी घेऊन जातों, चला.' हें ऐकून मी त्याचे अंगावर खूब ओरडलों व त्याला सांगितलें, कीं, 'मला नाच पहाण्याची मुळींच इच्छा नाहीं; मला माझ्या हॉटेलांत घेऊन चल. उगीच फाजीलपणा करूं नको!' 'नाहीं, नाहीं, जरासें तर चला! तुह्माला नाच खूब आवडेल, येथून कांहीं दूर नाहीं, मी तुह्माला आत्तां घेऊन जातों!' असें ह्मणून माझ्या पाठीस लागला. तेव्हां पुनः मीं त्याला दरडावून सांगितलें, कीं, 'मला जायचें नाहीं, तूं आपला मुकाट्यानें हॉटेलांत चल.' यावर तो 'हो हो' ह्मणाला व दोनतीन रस्ते ओलांडून बागबगीचा अस-लेल्या एका घराजवळ घेऊन गेला, व रिकशा उभा करून मला ह्मणाला 'उतरा, हें हॉटेल आलें.' मीं खालीं उतरून वेड्यासारखा इकडेतिकडे पाहूं लागलों. इतक्यांत त्यानें शीळ घातली, तेव्हां सातआठ जपानी मुली जिन्यानें धडधड खालीं उतरून आल्या, व हीः हीः करीत माझ्या-भोंवतीं गोळा झाल्या, आणि इंग्लिश भाषेंत विचारूं लागल्या 'तुह्मी

काय खातां, काय पितां, वरतीं चला !' वगैरे मोठा गौरव करूं लागल्या. त्यांनां वाटलें, कीं, बरी शिकार आहे ! परंतु मला अत्यंत राग येऊन मी ह्मणालों ' मी काय पितों? पाणी पितों ! मला नाहीं वर यायचें ! या रिकशावाल्यानें मला फसवून येथें आणलें ! ' मग मीं छडी घेऊन त्या रिकशावाल्याला धमकावून सांगितलें ' चल आतां तुला पोलिसच्या ताब्यांत देतों ! तूं असा परकीय लोकांनां फसवून अशा भलत्या ठिकाणीं आणतोस असा तुझ्याबद्दल पोलिसांत रिपोर्ट करितों ! ' मग गयावया करून 'मी चुकलों, एकवार क्षमा करा, पोलिसांत सांगूं नका; नाहीं तर माझें रिकशाचें लायसन्स काढून घेतील.' असें ह्मणून नंतर तो मला मुकाट्यानें हॉटेलमध्यें घेऊन आला व हातावर पैसे पडतांच जो निघून गेला तो पुनः दिसलासुद्धां नाहीं ! पहा, इतके दिवस आह्मी जपानमध्यें फिरलों, पण असा लुच्या मनुष्य कधीं भेटला नाहीं. कदाचित् गाइड नेहमीं आपल्याबरोबर असे, ह्मणून कोणीं फसवण्याचें धाडस केलें नसेल.''

प्रकरण तिसरें.

# मांचुरिया पॅसीफिक मेल स्टीमर.

तारीख १९ एप्रिल १९११.

सकाळीं बारा वाजतां आह्मी 'मांचुरिया' बोटीवर चढलों. धक्क्यापासून बोट एक मैलाच्या अंतरावर उभी होती. या धक्क्याजवळ उतारु लोकांनां बसण्याकरितां छायेची जागा मुळींच नाहीं. या वेळीं थोडथोडा पाऊस पडत होता व बोटीवर नेणारी लांच अद्यापि आली नव्हती. ह्मणून जवळील मालाच्या वखारीचा आह्मांला आश्रय करावा लागला. परंतु बरें झालें, कीं, पाऊस जोराचा नव्हता व लांच लवकरच आली, व झपाट्यानें तिनें आह्मांला मांचुरिया बोटीवर नेलें. गाइडनें आमचें सामानसुमान नीट बोटीवर लावून दिलें. डेकवर बसण्याकरितां हांगकांगला खुर्च्या घेतल्या होत्या, त्या आह्मीं गाइडला देऊन टाकल्या. कारण लोक ह्मणाले, खुर्च्या नेआण करतांना निरुपयोगी होतील, व तेथें भाड्यानें मिळतातच. त्याप्रमाणें आह्मीं खुर्च्या भाड्यानें घेतल्या.

टोकिओमध्यें पाऊस पडत असतां एका लहान दुकानीं आह्मीं जो फोटो घेतला होता, तो त्यानें कबूल केल्याप्रमाणें आजच सकाळीं आणून दिला. आह्मांला त्याचा मुळींच भरंवसा नव्हता. कारण, आमचा बोटींत बसण्याचा दिवस आला तरी फोटोचा पत्ता नाहीं! तेव्हां वाटलें, कीं, त्या दुकानदारानें आह्मांला थापा देऊन फसविलें, व पैसे उपटले, झालें. गाइड मात्र ह्मणत होता, कीं, "तुह्मी कांहीं काळजी करूं नका. तुह्मी बोटीवर चढण्यापूर्वीं फोटो तुमच्या हातांत पडेल. आह्मी जपानी लोक कधींच दगलबाजी करणार नाहीं!" असो. याप्रमाणें त्यानें फोटो आणून दिला, व तो फार चांगला काढलेला पाहून जपानी लोकांच्या कुशलतेची तारीफ केल्यावांचून माझ्यानें राहवलें नाहीं.

मांचुरिया बोटीचें डेक थोड्याच वेळांत पॅसेंजर्स लोकांनीं गजबजून गेलें. अमेरिकन बाया उंच उंच जोडे घालून व अरुंद स्कर्ट नेसून, आणि डोक्यावर अनेक तऱ्हेच्या टोप्या ठेवून पऱ्यांसारख्या इकडेतिकडे नाचूंबागडूं लागल्या. कोणाकोणाला त्यांचे मित्र वगैरे पोहोंचवावयाला आले होते, त्यांच्या भेटी वगैरे चालल्या होत्या. याशिवाय पुष्कळ दुकानदार लोकहि आपला माल विकण्याकरितां पॅसेंजर लोकांनां मोह पाडीत होते. ती आणखी एक या गडबडीला मदत होत होती.

नंतर पहिली घंटा खूब जोरानें वाजली, तसे इतर लोक हळुहळू खालीं जाऊं लागले. आमच्या गाइडनें आमचा शेवटचा निरोप घेतला, तेव्हां त्याला व आह्मांलाहि फार वाईट वाटलें. तो फार चांगला गाइड होता. त्यानें आह्मांला जपानमध्यें कोणत्याहि तऱ्हेचा त्रास पोंचूं दिला नाहीं, किंवा कधींहि आह्मांला फसवण्याचा किंवा पैसे काढण्याचा प्रयत्न केला नाहीं. फक्त टोकिओमध्यें एकदां काय तो त्याच्यावर रागवण्याचा यांनां प्रसंग आला होता. कारण, टोकिओमध्यें तो ह्मणूं लागला "तुह्मी येथें फार दिवस राहूं नका. मला कुकच्या ऑफिसांतून पत्रें येतात, कीं, फार खर्च करूं नका. येथें हॉटेलचा वगैरे खर्च फार येतो." तेव्हां हे ह्मणाले "असें असेल, तर आजच तुला सोडून दुसरा गाइड करतों, व कुकच्या ऑफिसांत तार करून आजपासून पुढचे माझे काय पैसे असतील ते परत मागतों. मला माझ्या प्रवासाची सर्व व्यवस्था करितां येते. मी कांहीं कुकशीं असा करार केला नाहीं, कीं, मी येथें अमूकच दिवस राहीन. मीं जे पैसे भरले आहेत, ते आपल्या आरामाकरितां भरले आहेत व सर्व तऱ्हेनें फर्स्टक्लासचे भरले आहेत."तेव्हां गाईडनें यांची क्षमा मागून कुकचें पत्र दाखविलें. त्यांत "खर्च बेतानें करावा, परंतु मि. चिटणवीस यांनां नाखुष करूं नये," असा मजकूर होता. तेव्हां हे "ह्मणाले, यांत कांहीं नाहीं, असें तर त्यांनीं तुला लिहिलेंच पाहिजे!"

गाइडनें आपला पत्ता आह्मांला दिला आणि सांगितलें, कीं, "जर तुमचे मित्र अथवा कोणी ओळखीचे इसम इकडे येतील, तर त्यांनां माझा पत्ता जरूर सांगा. मी त्यांनां चांगली मदत करीन व त्यांचा प्रवास थोड्या खर्चांत करून देईन. मला विसरूं नका. कधींकधीं पत्र पाठवीत जा."

इतक्यांत दुसरी घंटा झाली; तेव्हां इतर लोकांनां बोटीच्याखालीं उतरावें लागलें. ते लोक उतरून गेल्यावर खलाशांनीं जिने, शिड्या वगैरे लागलीच वरतीं ओढून घेतलीं व दोरांनीं जिकडेतिकडे बांधून टाकिलीं. नंतर तिसरी घंटा झाली. त्याबरोबर बोटीनें मोठी गर्जना करून हळुहळू याकोहामाच्या बंदरांतून प्रयाणाला सुरुवात केली. डेकवर सर्व उभे राहून आपापल्या ओळखीच्या लोकांनां हातरुमाल हलवून खुणा करीत होते. आमचा गाइड इनोइसन आह्मी दृष्टीआड होईपर्यंत आमच्याकडे हातरुमाल हलवीत होता.

झालें. थोड्याच वेळांत जपानचें बंदर दिसेनासें झालें. आह्मांला जपान सोडावयाला वाईट वाटूं लागलें. जपानमध्यें आह्मी सरासरी एक महिना होतों. हे दिवस इतके लवकर गेले, कीं, आह्मांला वाटलें, कीं ८।१० दिवसच आह्मी राहिलों कीं काय कोण जाणे! आमच्या दोघांच्याहि प्रकृति तेथें चांगल्या होत्या. आह्मी दोघें एकमेकांनां ह्मणूं लागलों, कीं, कांहीं दिवसांनीं जपान आपल्याला स्वप्नवत् वाटूं लागेल, व हळुहळू सर्व गोष्टींचा विसर पडेल. ईश्वरकृपेनें तेथील आमचा सर्व प्रवास निर्विघ्नपणें पार पडला, ह्मणून देवाचे आह्मीं आभार मानले, व पुढेंहि अशीच कृपा ठेव आणि आह्मांला आमच्या देशीं सुखरूप पोंचव, अशी त्याची प्रार्थना केली.

मग खालीं कॅबिनमध्यें गेलों. आमचें कॅबिन दुसऱ्या मजल्यावर होतें, व एकावर एक असे दोन बिछाने होते. एका बाजूला बसण्या-उठण्याकारितां एक कोच होतें, व कॅबिन समुद्राच्या बाजूला असल्यामुळें

वारा चांगला येत होता. निकोमध्यें जी आह्मांला वृद्ध बाई भेटली होती, तिनें एक औषध लिहून दिलें होतें, तें याकोहामाला आह्मीं विकत घेतलें. त्या औषधाचें नांव 'मदरसील' असें होतें. याच्या गुळगुळीत वाटाण्याएवढ्या लालसर गोळ्या होत्या. या दोनदोन गोळ्या आह्मीं दोघांनीं मोठ्या उत्कंठेनें गिळल्या, व मनाला मोठी आशा व धैर्य वाटूं लागलें, कीं, आतां आपल्याला समुद्रापासून कांहीं त्रास होणार नाहीं.

पुन: डेकवर परत आलों, तेव्हां वारा बराच जोराचा वाहात होता, व थोडथोडा पाऊस पडत असल्यामुळें हवेंत बराच गारठा भासूं लागला. डेकस्टयुवर्ड एक ह्मातारा चिनी होता. त्यानें दोन खुर्च्यांनां आमच्या नांवाच्या चिठ्या लावून चांगल्या निवाऱ्याच्या जागीं मांडून ठेविल्या. आह्मीं आपलीं जाड ब्लँकिटें पायांवरून घेऊन व उशा लावून खुर्चीवर वाचीत बसलों. बोटहि आतां झपाट्यानें चालूं लागली. डेकवरील सर्व गोंगाट शांत होऊन जिकडेतिकडे मंडळी आपापल्या खुर्च्यांवर स्वस्थ बसली होती. आतां बोटीच्या सभोंवतीं जिकडेतिकडे दृष्टीला समुद्राचें फेंसाळ पाणी मात्र दिसत होतें, व मासे खाणारे पांढरे बगळे वगैरे पक्षी तुरळक इकडेतिकडे उडतांना दिसले. मॉंचुरिया बोट ह्मणजे समुद्रांत तरंगणारें एक मोठें प्रचंड हॉटेलच होतें. जरी ही बोट दिसण्यांत निफोबोटीसारखी सुंदर नव्हती, तरी निफोपेक्षां बरीच मोठी होती. डेक बरेंच रुंद आणि विस्तीर्ण होतें.

बोटीवर फर्स्टक्लासमध्यें आह्मी ६०० पॅसेंजर्स होतों. निपोबोटीवर ज्या अमेरिकन बाया आह्मांला भेटल्या, त्यांपैकीं बऱ्याच या बोटीवर होत्या. तेव्हां आह्मां दोघांनांहि वाटलें, कीं, बोटीवर ओळखीचें कोणीतरी बोलायला आहे, पुढें नव्या ओळखी होतील तेव्हां होतील.

पहिला दिवस तर बरा गेला. दुसरे दिवशीं सकाळीं माझ्यानें बिछान्यावरून उठवेना. एकसारखें डोकें दुखूं लागलें, व खाण्यापिण्यावर वासना जाईना. मोठ्या आशेनें औषधाच्या गोळ्या घेतल्या, पण

त्याचाहि कांहीं परिणाम माझ्यावर झाला नाहीं. हे मला ह्मणूं लागले "तुमचें डोकेंच विलक्षण असेल तर औषध तरी बिचारें काय करील? अजून समुद्र ह्मणण्यासारखा फारसा खवळलेला नाहीं, व बोटहि हालत नाहीं, तरीहि तुमचें डोकें दुखतें तर कोणीं काय करावें?"

दोन दिवस मी खाण्यापिण्याशिवाय कॅबिनमध्यें पडून राहिलें; परंतु तिसऱ्या दिवशीं पोटांत कांहीं नसल्यामुळें मला अगदीं गळल्यासारखें वाटूं लागलें. डोकें दुखणें बंद होईना. हे ह्मणाले "डॉक्टरला बोलावून आणतों, तो तुह्माला कांहीं औषध देईल." पण मीं ह्मटलें "मला औषध वगैरे कांहीं नको, २।३ दिवस असेंच पडून राहूं द्या, मग आपोआप बरें वाटूं लागेल."

एवढें बरें होतें, कीं, एथील स्टयुवर्डेस बरी होती. ती अमेरिकनच होती, व जरा वयातीत असून नेहमीं येऊन माझा समाचार घेत असे, व मला सांगत असे, कीं, कांहीं तरी खात जा, ह्मणजे तुह्माला बरें वाटेल. त्याप्रमाणें मी थोडें दुध, पुडिंग, फळें वगैरे खाऊं लागलें, व डेकवर मोकळ्या हवेंत बसूं लागलें, आणि त्यानें पुष्कळ बरें वाटूं लागलें, व डोकें दुखणेंहि बंद झालें. पुढें बोटीचें हालणें व समुद्राची हवा अगदीं आंगवळणीं पडत चालली.

बोटीवर पुष्कळ देशांचे आणि पुष्कळ धर्मांचे पॅसेंजर्स् होते. इंग्लिश, जर्मन, फ्रेंच, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन, आह्मी इंडियन, जपानी, चिनी, व दोन बर्मी मुलें होतीं. सर्वांत अमेरिकन लोकांची—विशेषत: बायकांची संख्या जास्त होती. यांत बरेच मिशनरी लोक होते. दोघे गृहस्थ मॉर्मन धर्माचे होते. हे मिशनरी लोक चीन व जपानमध्यें नोकर होते कांहीं बाया हिंदुस्तानांतून आल्या होत्या. एक चांगले भव्य दिसणारे बिशप व त्यांची पत्नी हीं चिनांतून आपल्या देशीं विश्रांति घेण्याकरितां चाललीं होतीं.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत डेकवर अनेक तऱ्हेचे खेळ चाललेले असत. रात्रीं जेवणानंतर नेहमीं एकदोन दिवसांआड नाच, कान्सरट वगैरे चालत. दुपारींहि नेहमीं धांवण्याच्या व दोर ओढण्याच्या शर्यती, पिलो रेसेस, असे करमणुकीचे व गमतीचे खेळ चाललेले असत. अशा तऱ्हेनें मनाला बरीच करमणूक होत असे, व वेळ निघून जात असे.

या अमेरिकन बायांत कांहीं बऱ्याच म्हाताऱ्या होत्या. त्या डेकवर कोठेंतरी जमून गोष्टी सांगत बसत. एकाद्या वेळीं मीहि त्यांच्याजवळ बसें, तेव्हां त्यांच्या त्या गोष्टी ऐकून मला आश्चर्य वाटे. या बाया चीन, जपान वगैरेंकडून फिरतफिरत आतां अमेरिकेला जात होत्या. एके दिवशीं जपानबद्दल गोष्टी चालल्या असतां एक बाई म्हणाली "मी जपानमध्यें सहा महिने राहिलें. फुलझाडांनां मोहोर कसा येतो, मग त्याच्या कळ्या कशा होतात, फुलें कशीं उमलतात, तीं किती दिवस टिकतात, रंग कसकसा बदलत जातो, हें सर्व मीं अगदीं मुळापासून तों शेवटपर्यंत पाहिलें." कोणी शेवंतीच्या फुलाचें तर कोणी जपानी बायांच्या केंसांचें वर्णन करूं लागल्या. एक बाई अगदीं म्हातारी होती, ती चीनहून आपल्या ९-१० वर्षांच्या नातीला बरोबर घेऊन अमेरिकेला जात होती. ती जपानमध्येंहि कांहीं दिवस राहिली होती. ती मध्येंच म्हणाली "मला चिनापेक्षां जपान फार आवडलें. माझी तेथें आणखी कांहीं दिवस राहण्याची इच्छा होती; परंतु काय करूं? मला होमसिक वाटूं लागलें. कारण, माझा नवरा माझ्याबरोबर नव्हता, म्हणून चुकल्यासारखें वाटूं लागलें, व घरीं केव्हां जाईन असें झालें. परंतु आणखी २।३ वर्षांनीं पुन: जपानला नवऱ्याला बरोबर घेऊन येईन, मग होमसिक वाटणार नाहीं व मग तेथें आम्ही पुष्कळ दिवस राहूं."

या बाईचें बोलणें ऐकून मला असें आश्चर्य वाटलें, कीं, या बाईच्या केंसाचे जख्ख आंबाडे झाले आहेत, तोंडांत एकहि दांत नाहीं, तरी म्हणते, कीं, दोन वर्षांनीं नवऱ्याला घेऊन जपानला येईन! इतकी

म्हातारी झाली, तरी अजून प्रवासाचा कंटाळा वाटत नाहीं, व इकडे जाईन तिकडे जाईन, हिंदुस्तानांत व बर्म्याला जाईन, अशी एकाद्या तरुण मुलीप्रमाणें उमेद ठेवते. यावरून आपण म्हातारी झालों आहों, असें तिला मुळींच वाटत नाहीं, असें दिसतें.

या सर्व गोष्टी मीं यांच्याजवळ सांगितल्या, तेव्हां हे म्हणाले "पहा, ती बाई इतकी म्हातारी असून तिला किती इच्छा व तरतरी आहे ती! नाहीं तर तुम्ही थोडक्यांतच घाबरून जातां व नेहमीं घरघर करितां; कांहीं तरी धडा घ्या या बाईपासून!"

अशा तऱ्हेनें बोटीवरील सातआठ दिवस निघून गेले व तितक्या वेळांत बऱ्याच लोकांशीं आमच्या चांगल्या ओळखी झाल्या. रात्रीं जेवणानंतर बरीच बाया मंडळी ड्राइंगरूममध्यें बसून वाचणें, शिवणें करीत असत, व पुरुष मंडळी स्मोकिंगरूममध्यें पत्ते खेळत असत, किंवा डेकवर इकडे-तिकडे हिंडत असत. रात्रीं डेकवर बरीच थंडी पडत असे, म्हणून जेवणा-नंतर ड्राइंगरूममध्यें आम्ही बसत असूं. अमेरिकन लोकांची अशी एक चाल दिसली, कीं, जेवतांना ड्रिंकस्, वाइन वगैरे कांहीं घ्यावयाची नाहीं; परंतु जेवणानंतर ज्याला जें लागेल तें स्मोकिंगरूममध्येंच खूब प्यावयाचें. स्मोकिंगरूममध्येंच दारूचें दुकान होतें. तेथें दुपारपासूनच पिणारांची गर्दी असावयाची, आणि ग्लासांवर ग्लास व बाटल्यांवर बाटल्या चाललेल्या असावयाच्या. दुपारीं व रात्रीं जेवणाचे वेळीं बँड वाजत असे. हे बँडवाले लोक फिलीपाईन बेटामधील राहाणारे होते, व वर्णानें हिंदू लोकांप्रमाणें काळेसांवळे होते. हे लोक बँड चांगला वाजवीत असत. दिवसापेक्षां रात्रीच्या वेळीं बँड कानाला फार चांगला वाटत असे. रात्रीं बोटीवर बरीच शांतता असे, त्यामुळें बँडचे ध्वनि चोहोंकडे दुमदुमत. रात्रीच्या वेळीं त्या अफाट समुद्रामध्यें बोटीचें प्रतिबिंब फार प्रेक्षणीय दिसत असे, व विजेच्या दिव्यांचा प्रकाश समुद्राच्या स्वच्छ पाण्यावर दूरपर्यंत विजेप्रमाणें लहरी मारीत असे, आणि डेकवर बागड-

णाऱ्या तरुण स्त्रियांच्या वस्त्रभूषणांनीं तर त्या प्रकाशाला विशेषच शोभा येत असे. ही सर्व तऱ्हेच्या रत्नांनीं अलंकृत झालेली बोट रात्रीच्या वेळीं इंद्रभुवनाप्रमाणें चमकत असे. ड्रॉइंगरूम बोटीच्या पुढच्या टोंकाकडे होती, व तेथें बसलें असतां तेथील खिडक्यांतून समुद्राचा थोडाबहुत देखावा दिसत असे. नाहीं तरी समुद्राच्या पाण्याशिवाय दुसरा कोणता देखावा दिसणार होता ? रात्रंदिवस जेथपर्यंत दृष्टि पोंचेल, तेथपर्यंत समुद्राचें पाणी दिसावयाचें. खालीं समुद्र व वरतीं आकाश हाच काय तो देखावा आमच्या डोळ्यांपुढें होता.

जेवणानंतर मी ड्रॉइंगरूममध्यें बसलें ह्मणजे कांहीं अमेरिकन बाया माझ्याजवळ येऊन बसत, व हिंदुस्तानांतील चाली रीतींविषयीं अनेक प्रश्न विचारीत. "तुह्मी कपाळावर हा लाल तिलक कशाकरितां ह्मणून लावितां ? हें तोंडावर कशाकरितां गोंदलें आहे ? हें काय धर्मासंबंधीं कांहीं आहे कीं काय ? हिंदुस्तानांत कशा रीतीनें राहतां ? तुह्मी हिंदू बाया सुखी असतां कीं नाहीं? तुमच्या लग्नाच्या चालीरीति कशा काय आहेत?" वगैरे अनेक प्रश्न करीत. मीं त्यांनां सांगितलें, कीं "आह्मी हिंदुस्तानांत चांगल्या सुखी असतों.तुमच्या कांहीं अमेरिकन लोकांचा समज आहे,कीं, हिंदुस्तानांतील सर्व बायका दुःखी असतात; परंतु तसें कांहीं नाहीं. आतां हें खरें आहे, कीं, हिंदुस्तानांत अनेक जाती, अनेक धर्म, अनेक भाषा आहेत, आणि त्याप्रमाणें निरनिराळ्या चालीरीति, समज आणि कल्पना आहेत, व कांहीं धर्मभोळेपणाच्या, वेडगळपणाच्या चालीरीतिहि रूढ झाल्या आहेत. जसजसा ज्ञानाचा प्रसार होईल, तसतशा या चाली आपोआप मोडत जातील आणि जातहि आहेत. हिंदुस्तानांत अजून विद्येच्या मानानें मोठा समाज अज्ञानदशेंत आहे, व लोकांनां पाहिजे तितकी विद्येची गोडी अद्याप लागलेली नाहीं. याचें कारण शाळांची कमतरता व आणखीहि पुष्कळ तऱ्हेच्या अडचणी आहेत; परंतु लोकांमध्यें सुधारणेची व विद्याप्रसाराची चळवळ चालली आहे आणि

हळुहळू तिला यश येत आहे. सरकारहि विद्यावृद्धीचा व लोकसुधारणेचा प्रयत्न करीत आहे." अशा आमच्या गोष्टी चालत.

आतां कुंकवाबद्दल या बायांनां काय सांगावें व त्यांनां तें कसें समजावें, ही मला मोठीच पंचाईत पडली. हें आमचें सौभाग्यचिन्ह आहे असें सांगावें तर सौभाग्य तरी त्यांनां काय समजणार? तेव्हां मीं त्यांनां सांगितलें, कीं, "आमच्या हिंदूजातीमध्यें कुमारींनीं व विवाहित बायांनीं कुंकू जरूर लावावें लागतें. परंतु तें विधवा स्त्रियांनां मात्र लावण्याची मनाई आहे व एका अर्थीं हें आमच्या धर्माचें एक चिन्ह आहे."

यावर या सर्व बाया ह्मणूं लागल्या "How interesting! How interesting".

कांहीं बाया आपल्या श्रीमंतीच्या व डागडागीन्यांच्या डौलांत असत. त्या कधीं आमच्याशीं बोलत नसत. अथवा आह्मी आपण होऊन त्यांच्याशीं बोलत नव्हतों, ह्मणून त्या बोलत नव्हत्या असेंहि कदाचित् असेल.

या डौली बायांमध्यें एक बाई मोठी चमत्कारिक होती. ती साधारण चाळीशीच्या जवळजवळ होती. परंतु तिला नटण्यामुरडण्याची फार आवड होती. तिचें नांव 'हिरावंती' असें आह्मीं ठेविलें होतें. ती पुष्कळसे हिऱ्यांचे चमकणारे दागिने नेहमीं घालीत असे. मग ते हिरे खरे कीं खोटे देव जाणे! डोक्याला दोनचार हिऱ्याचे कंगवे खोंचलेले, कानांमध्यें हिऱ्यांचीं कुंडलें, गळ्यामध्यें हिऱ्यांचा कंठा, हातामध्यें हिऱ्यांच्या पाटल्या, आंगठ्या हिऱ्यांच्या, कंबरपट्टा हिऱ्यांचा, अशा या 'हिरावंती' तोंडाला पुष्कळसा रंग व पावडर लावून तें सुशोभित करीत असत. हिरावंती फारशा कोणाशीं बोलत नसत. कॅप्टनशीं, डॉक्टरशीं, किंवा इंजिनियर वगैरे ऑफिसरांशींच बोलत असत, व जेवायलाहि कॅप्टनजवळच बसत. कॅप्टनचें टेबल डायनिंगरूमच्या मध्यभागीं होतें, व त्याच्या बाजूनें एक लांब टेबल होतें. त्या टेबलाकडे आह्मी सर्व

मित्र मंडळी बसत असूं. जपानी, चिनी, बरीचशी अमेरिकन मंडळी, आणि बिशप वगैरे येथेंच बसत असत. येथें कॅबिनच्या कामावर, वाढण्याच्या कामावर, बिछाने घालणें, स्नानाची व्यवस्था पाहणें वगैरे सर्व कामांवर चिनी लोकच होते. खलाशांच्या कामावरहि चिनीच होते, व हे आपापल्या कामांत फार दक्ष दिसले. डायनिंगरूममध्यें मुख्य वेटर एक पोक्त वयाचा अमेरिकन होता. तशाच पोक्त वयाच्या दोघी स्ट्युवर्डेस बाया होत्या.

एके दिवशीं फॅन्सी ड्रेस बॉल झाला. त्याची तयारी दोनतीन दिवस आधींच चालली होती. बॉलच्या आदल्या दिवशीं जेवणाच्या वेळीं सर्वांनां चिठ्या पाठविल्या. त्यांत 'कोणचा ड्रेस तुह्मी करणार तें कळवा,' असा मजकूर होता. आह्मीं लिहून दिलें, कीं, आमचा नेहमींचाच पोषाक करणार; आह्मांला नाचायचें वगैरे कांहीं नाहीं.

बॉलच्या दिवशीं बोटीवर बायकांची एकसारखी गडबड चालली होती. या पेट्या उघड, त्या उघड, हे कपडे काढ, ते कपडे काढ, अशी धामधूम चालली होती. न्हाव्याच्या खोलींत तर बायकांची जत्राच जमली होती. नाचणाऱ्या सर्व बाया न्हाव्याजवळून आपले केस ब्रशनें साफ करून व बुचडे बांधून घेत होत्या. बिचारा न्हावी पडला एकटा, व बाया पडल्या पुष्कळ. तेव्हां त्याची अगदीं धांदल उडून गेली होती. त्याला नेहमींचीच अशी संवय असल्यामुळें आपलें काम तो झपाट्यानें करीत होता. तो देखावा मजेदार दिसला. न्हाव्याचें कॅबिन डेकवर जाण्याच्या जिन्याजवळच होतें, ह्मणून डेकवर जातांयेतांना ही सर्व हालचाल दिसे.

संध्याकाळीं डेकच्या एका भागामध्यें रंगीबेरंगी पडदे, निशाणें वगैरे लावून नाचाकरितां जागा तयार केली होती. मग डायनिंगहॉलमध्यें जेवणाच्या वेळीं हंसण्याचा व टाळ्यांचा काय एकच गोंगाट सुरू झाला.

जसजसें एकेक सोंग येऊं लागलें, तसतसा टाळ्यांचा व हंसण्याचा सपाटा सुरू झाला. पुष्कळांनीं पुष्कळ प्रकारचीं सोंगें घेतलीं होतीं. कोणी चिनी झाले होते, कोणी बलुची, कोणी समराई, कोणी मुसलमानी बाया; परंतु आमच्या हिरावंती 'अमेरिकन' फ्लॅग झाल्या होत्या, व त्या सर्वांमध्यें चांगल्या ठळक दिसत होत्या. अमेरिकेचें निशाण अर्धें पांढरें व अर्धें उदी असून त्यावर तारे असतात; ह्मणून या बाईनेंसुद्धां अशाच तऱ्हेच्या कपड्यांचा लांब ड्रेस केला होता व ५।६ लहानलहान निशाणें डोळ्यांनां खोवून, दोन्ही हातांत दोन मोठीं निशाणें घेतलीं होतीं. दोन खांद्यांवर दोन निशाणें असलेलें असें हें स्त्रीरूपी अमेरिकन फ्लॅग वरून जेव्हां डायनिंगरूममध्यें उतरलें, तेव्हां काय विचारतां? टाळ्यांचा, टेबलावर सुऱ्या आपटण्याचा, हंसण्याचा, ओरडण्याचा एकच गोंगाट उडाला. कित्येक देशभक्तांनीं हें अमेरिकेचें निशाण ह्मणून उठून खडी ताजीम दिली. कसेंहि असो; आमच्या हिरावंतीचा पार्ट चांगला वठला. दुसऱ्या दोघी मुली मुसलमानिणी झाल्या होत्या; त्यांचींहि कामें हुबेहूब दिसलीं. असा हा बोटीवरील बॉल फार चांगला झाला. रात्रभर नाचणें चाललें होतें.

एके दिवशीं दुपारीं मिसेस् ओकले या बाईचें लेक्चर झालें. या बाई हिंदुस्तान, चीन, जपान या देशांतून प्रवास करीतकरीत आतां स्वदेशीं चालल्या होत्या. त्या फिलाडेलफिया येथील राहणाऱ्या होत्या. "आह्मी बाया आमच्या देशीं काय करीत असतों," या विषयावर हिनें व्याख्यान दिलें.

लेक्चर ऐकण्याकरितां ड्राइंगरूममध्यें बरीच मंडळी जमा झाली होती. प्रेसिडेंट बिशपसाहेब यांनीं मिसेस ओकले यांची सर्वांनां ओळख करून दिल्यानंतर त्या बाई बोलण्यास उभ्या राहिल्या. त्या ह्मणाल्या "फिलाडेलफियामध्यें बायकांचे पुष्कळ क्लब आहेत; परंतु मी एका विवक्षित क्लबाविषयींच बोलणार आहें. या क्लबाच्या आह्मी बऱ्याच बाया

मेंबर आहों. येथें आह्मी आपला वेळ गंजीफा खेळण्यांत किंवा दुसऱ्यांच्या टवाळक्या करण्यांत, अथवा ख्यालीखुशाली करण्यांत घालवीत नाहीं, तर आपल्या समाजांत कोणकोणत्या सुधारणांची जरूर आहे, त्या कशा करितां येतील, अथवा निराश्रित बायामुलांनां कोणत्या तऱ्हेनें मदत करावी, त्याचप्रमाणें कांहीं तरुण मुली व स्त्रिया दुकानांत व गिरण्यांत नोकर आहेत त्यांनां त्यांचे मालक विनाकारण त्रास देतात, कोणी वेतन बरोबर देत नाहींत, कोणी त्यांनां वाईट रीतीनें वागवतात, त्या गरीब असल्यामुळें त्यांची दाद लागत नाहीं, त्यामुळें त्यांनां मदत कशा रीतीनें करावयाची, वगैरे वगैरे विषयांची वाटाघाट करण्यांत आह्मी आपला वेळ खर्च करितों, व त्या कामाकरितां मेंबरांची निवडणूक करितों. तसेंच गांवांमध्यें रस्त्यानें कांहीं भाजीपाला व फळेंविक्ये गोंगाट करितात, चर्चमधून वाजवीपेक्षां उगीच जास्त घंटा वाजवीत असतात, त्यामुळें जवळपास राहणाऱ्या लोकांनां व हास्पिटलमधील रोग्यांनां विनाकारण त्रास होतो; ह्मणून शक्य तितका हा गोंगाटहि बंद केला पाहिजे असा विचार करून आमच्यापैकीं कांहीं बाया या विषयावर लेक्चरें देत फिरूं लागल्यामुळें बराच फायदा झाला आहे. त्या वेळीं क्लबची सेक्रेटरी मी होतें, ह्मणून दुसऱ्या आठवड्यांत माझ्या टेबलावर पत्रांचा मोठा थोरला गठ्ठा येऊन पडला. त्या पत्रांतून आमचे फार फार आभार मानले होते. गांवामध्यें गिरण्यांतून व स्वयंपाकघरांतून फार धूर होऊं नये, त्यामुळें प्रकृति बिघडते आणि फळेंफुलें व झाडेंहि खराब होतात. अशा सूचना करून व हा त्रास दूर करण्याच्या युक्त्या एकमेकांनां सुचवून त्यावर वाटाघाट करितों. अशा रीतीनें आह्मी वेळाचा सदुपयोग करितों. हें करितों ह्मणून आह्मी आपले नवरे, घरेंदारें, मुलेंबाळें थोडींच सोडलीं आहेत! घरचें सर्व काम सांभाळून फावल्या वेळांतच आह्मीं हीं सर्व कामें करीत असतों.

"जपानमध्येंहि मी तीनचार व्याख्यानें देऊन तेथें कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्याची तेथील लोकांनां सूचना दिली. जपानमध्यें

अलीकडे बऱ्याच गिरण्या आणि कारखाने झाल्यामुळें टोकिओ, ओसाक वगैरे शहरांतून बराच धूर होऊं लागला आहे; ह्मणून तेथील लोकांनां मीं सांगितलें कीं, तुह्मी जर या धुराला आळा घातला नाहीं तर तुमच्या मुलाबाळांच्या प्रकृति चांगल्या रहाणार नाहींत, व तुमच्या देशाचें सौंदर्य लवकरच लयाला जाईल. लहान मुलांच्या गालांवरील लाल रंग जाऊन तीं निस्तेज दिसूं लागतील. लोकांचें आरोग्य चांगलें राहून व्यापारधंदाहि भरभराटीला येईल, अशा तऱ्हेचें नेहमीं धोरण व सुधारणा ठेवा. अशा तऱ्हेचीं लेक्चरें दिलीं. तीं तेथील लोकांच्या मनावर ठसलीं, असें दिसलें."

असें या बाईचें बराच वेळ लांबलचक व्याख्यान झाल्यावर प्रेसिडेंट बिशप साहेब ह्मणाले 'मिसेस ओकले यांच्या लेक्चरावरून आपल्याला समजलेंच आहे, कीं, या बाई व त्यांच्या मैत्रिणी आपला अमूल्य वेळ जनतेच्या कल्याणाकारितां खर्च करितात, व आपल्या कृतीनें इतरांनां उत्तेजन देतात. मला असें सांगण्याला फार आनंद वाटतो, कीं, आमच्या अमेरिकेची जी एवढी भरभराट आणि सुधारणा झाली आहे ती मिसेस ओकले यांच्यासारख्या दीर्घोद्योगी व जनतेच्या सुखासाठीं प्रयत्न आणि साहाय्य करणाऱ्या स्त्रिया आहेत ह्मणूनच झाली आहे. मी मनापासून इच्छितों, कीं, इतर स्त्रियाहि मिसेस ओकले यांचें अनुकरण करून आपल्या देशभगिनींच्या व देशाच्या कल्याणाकारितां झटतील."

मिशनरी लोकांचीं रोज ब्रेकफास्टनंतर डायनिंगरूममध्यें लेक्चरें होत असत; परंतु तीं ख्रिश्चन धर्मासंबंधीं असत.

बिशप यांनां नेहमीं हिंदुस्तानासंबंधीं माहिती विचारीत असे, कीं, मिशनरी लोकांचीं कामें कशीं काय चाललीं आहेत, त्यांच्याशीं लोक कसे काय वागतात? आह्मी चिनामध्यें ख्रिश्चियानिटीचा प्रसार केला आहे; हिंदुस्तानांतहि एकच धर्म झाला पाहिजे असें मला वाटतें. हे ह्मणाले "तसें होणें अशक्य आहे! कारण, हिंदुस्तानांतील पुष्कळ लोकांची

आपल्या धर्मावर श्रद्धा आहे, व पुष्कळ सुशिक्षित लोक आपल्या धर्मामध्यें आणि चालीरीतींमध्यें पुष्कळ सुधारणा करीत आहेत. कारण, सर्वांच्याच धर्माचीं मूलतत्त्वें चांगलीं असतात; परंतु लोकांच्या अज्ञानामुळें त्यांत विलक्षण चालीरीति घुसडल्या गेल्या आहेत आणि विद्येच्या व व्यापाराच्या मानानें हिंदुस्तान बरेंच मागें आहे. हिंदुस्तानांतहि चहूंकडे पुष्कळ मिशनरी लोक पसरले आहेत, व कांहीं कांहीं गोष्टींत ते बरींच अनुकरणीय कामगिरी बजावतात. दुष्काळाच्या वेळीं किंवा प्लेगच्या वेळीं हे लोक चहूंकडे फिरून मदत करतात. पोरकीं आणि अनाथ मुलें यांचें चांगलें संरक्षण करितात, व त्यांनां विद्या वगैरे शिकवितात. त्यांनीं बऱ्याच शाळा व दवाखाने चालविले आहेत."

हें यांचें भाषण ऐकून बिशपसाहेबांनां फार समाधान वाटलें.

बोटीवरील मिशनरी मंडळीनां आह्मी ख्रिश्चन नाहीं ह्मणून राग येत असे. एके दिवशीं सकाळीं ब्रेकफास्ट झाल्यानंतर रोजच्याप्रमाणें मीं आपला जाडा कोट घेतला व पुस्तक, चष्मा, शिवणकामाची पिशवी वगैरे वस्तु घेऊन आह्मीं दोघें डेकवर जात होतों. हे थोडे पुढें निघून गेले होते, व मी मागून हळुहळू चाललें होतें. एक मिशनरी बाई एकदम माझ्याजवळ येऊन मला ह्मणाली "काय हो, तुह्मीं ख्रिश्चन आहां कीं नाहीं?"

मी ह्मणाल्यें "नाहीं, आह्मी हिंदु आहों."

"अझून कसे नाहीं ख्रिश्चन झालां?"

असे तिचे प्रश्न ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें, व मीं मनांत ह्मटलें कीं, आतां हिला ह्मणावें तरी काय? एकदम एकाद्या माथेफिरूसारखी मला येऊन विचारते आहे! मीं तिला कांहीं उत्तर दिलें नाहीं. तिच्याकडे कानाडोळा करून वर जाऊं लागलें. ती बाई पुनः ह्मणाली "बरें रात्रीं मीं तुमच्याशीं याविषयीं बोलेन."

तेथेंच खोलीच्या दाराशीं न्हावी उभा होता, तो त्या बाईवर रागावून ह्मणाला "तुह्मांला अशा रीतीनें दुसऱ्याला विचारण्याचा काय हक्क आहे?

बोटीवर निरनिराळ्या धर्माचे लोक आहेत, त्यांनां कां नाहीं उपदेश करीत ? ”

असें त्याचें व तिचें कांहीं बोलणें झालें. असो.

त्या बिचारीचा कांहीं वाईट उद्देश नव्हता. ती आपलें कर्तव्य करीत होती, व आपल्या उतावळ्या स्वभावाला अनुसरून तिनें मला तसें विचारलें. किंवा तिला वाटलें असेल, कीं ही बाई अशी परदेशांत फिरत आहे, तेव्हां कदाचित् ख्रिश्चन असेल.

नंतर रात्रीं जेवण झाल्यानंतर पुन्हां माझ्याजवळ ड्राइंगरूममध्यें ती येऊन बसली, व ख्रिश्चन होण्याविषयीं मला तिनें पुष्कळ उपदेश केला. तो त्या बाईचा उपदेश ऐकिल्यावर मीं तिला सांगितलें कीं, “ तुह्मीं मला जो एवढा कळकळीनें उपदेश केला, त्याबद्दल मी तुमची आभारी आहें; परंतु तुह्मांला जशी तुमच्या धर्माची आस्था आहे, तशी आह्मांलाहि आमच्या धर्माबद्दल आहे, मग दुसऱ्याचा धर्म स्वीकारण्याची आह्मांला कशी इच्छा होणार ? जोंपर्यंत कोणतीहि गोष्ट करण्याची आपली मनापासून इच्छा नाहीं, तोंपर्यंत दुसऱ्याच्या सांगण्यावरून तसें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कोणत्याहि धर्मांत जावयाचें असेल, तर त्या धर्मावर आपला मनापासूनचा विश्वास पाहिजे, तरच तो धर्म स्वीकारण्यांत अर्थ !”

आमच्या बोटीवर फिलिपाइनची राहणारी एक पोक्त बाई होती. ती बाई अमेरिकन होती; परंतु नवरा बरेच दिवस फिलिपाइनमध्यें जाऊन राहिला होता, व तिकडे त्यानें चांगला रोजगार जमवून दोघें तिकडेच राहत असत. ही बाई आतां एकटीच अमेरिकेला आपल्या आप्तइष्टांनां भेटावयास चालली होती. अमेरिकेंत हिची माहेरची चांगली इस्टेट होती, ती पाहण्याकरितां जात होती. ही बाई थोडेच दिवसांत माझी चांगली मैत्रिण बनली. ती साध्या स्वभावाची असून मनाची फार मोकळी होती. रात्रीं जेवणानंतर आह्मी दोघी गप्पा मारीत बसत असूं. ती मला ह्मणाली “मिसेस

चिटणवीस, माझ्याजवळ इतका पैसा आहे, माहेरचें इतके इतके हजार डॉलर उत्पन्न आहे,व माझ्या नवऱ्याजवळहि पुष्कळ पैसा आहे;पण माझ्या पोषाकावरून व राहणीवरून कोणाला तरी वाटेल का हो, कीं, मी इतकी श्रीमंत आहें ह्मणून? भलभलत्या गोष्टींमध्यें व छानछुकीमध्यें पैसा खर्च करणें मला मुळींच आवडत नाहीं. जरी आम्हांला मुलेंवाळें कांहीं नाहींत, तरी आह्मी विनाकारण पैसा कधींच उधळीत नाहीं. दुसऱ्या कांहीं चांगल्या लोकोपयोगी कामांला आह्मी यथाशक्ति मदत करीत असतों. नाहीं तर आपल्या या बोटीवरील बाया पाहा! काय चमत्कारिक, अरुंद व लांडे स्कर्ट नेसतात, विलक्षण टोप्या घालतात, त्याला हात हात तुरे काय लावतात! वर्ष दोन वर्षांनीं यांची फॅशन बदलत असते. ही एक एक टूम प्रथम पॅरिसमध्यें निघते. झालें! एकदां ते भपकेदार कॅटलाग पाहिले कीं चालल्या धांवत दर्ज्याच्या दुकानीं! मग ते तसेच कपडे केले पाहिजेत. त्याला कितीहि खर्च येवो! पूर्वींचे कपडे कितीहि नवे असोत, ते झाले मग रद्दी! अशा या आजकाल तऱ्हा निघाल्या आहेत. आमच्या वेळेस असें नव्हतें. येथें ज्या या इतक्या बाया आहेत, त्यांपैकीं फारच थोड्या समजदार आहेत. बाकीच्या या अशाच उधळ्या आहेत. कोणी नवरे शोधीत आहेत, तर कोणी पैसे उधळण्याकरितां फिरत आहेत. जरासे यांच्याजवळ पैसे आले कीं, चालल्या इकडे तिकडे फिरावयाला."

अशा या बाईच्या गोष्टी चालल्या असतां एक तरुण मुलगी आमच्याजवळ आली; व विचारूं लागली "काय तुमच्या येवढ्या एकांतामध्यें गोष्टी चालल्या आहेत?"

आह्मी दोघीचजणी खालीं डायनिंगहॉलमध्यें बोलत बसलों होतों, व तेथेंच एका बाजूला बॅंड वाजत होता तोहि ऐकत होतों. त्या मुलीला माझी मैत्रिण ह्मणाली "दुसऱ्या कोणत्या गोष्टी चालणार? तुमच्याच आजकालच्या पोषाकाबद्दल चालल्या आहेत.मी या इंडियन बाईला सांगत

होतें, कीं, आमच्या आजकालच्या अमेरिकन मुली कसे विलक्षण पोषाख करितात, कसे पैसे उधळतात—हे तुमचे सर्व गुणानुवाद चालले होते! यावर ती तरुण मुलगी हंसतहंसत ह्मणाली "होय, खरेंच आहे! आतां तुमचे दिवस गेले, तेव्हां तुह्माला असेंच वाटणार. तुमच्या तरुणपणीं असें असतें, तर तुह्मीहि आमच्यासारखेंच केलें असतें."

ही बाई हंसतहंसतच ह्मणाली "पाहिलीत कशी रूढी आहे ती. काय ह्मणे, तुमचे दिवस गेले, ह्मणून तुह्माला असें वाटतें. जशा कांहीं जन्मभर आह्मी ह्मातार्‍याच होतों, व आमच्या वेळेस जसें कांहींच नव्हतें!"

मग बराच वेळ मी या दोघां बायांच्या गोष्टी ऐकत बसलें व त्यांच्या अशा गोष्टी ऐकून मनाला मोठी करमणूक झाली.

बोटीवर आमच्या बर्‍याचजणांशीं ओळखी झाल्या होत्या, त्यांत मिस्टर व मिसेस म्याकराय यांच्याशीं फार चांगली ओळख झाली होती. हीं दोघेंहि फार सज्जन आणि मायाळू होतीं. हीं दोघें हिंदुस्तान, जपान वगैरे देशांतून सहल करून आपल्या देशीं परत जात होतीं. हीं नवराबायको डेकवर कांहीं खेळ चालले असतां आह्मांला खेळावयाला नेत असत. कसा तरी आमचा वेळ आनंदांत जावा व करमणूक व्हावी, अशी त्यांची इच्छा असे.

मिस्टर म्याकराय आह्मांला नेहमीं सांगत असत, कीं, आह्मी दोघें नास्तिक आहों. देव मुळींच नाहीं व सृष्टीमध्यें जें चालतें, तें स्वाभाविक रीतीनें चाललेलें असतें. येशू ख्रिस्त एक चांगला मनुष्यच होऊन गेला, असा आमचा विश्वास आहे. तो देवाचा पुत्र होता, हें खोटें आहे. हे मिशनरी उगीच धर्मावर लांबलचक लेक्चरें देत बसतात. असो. बोटीवर असे अनेक मतांचे, धर्मांचे व पंथांचे लोक होते. त्यांच्या गोष्टी व विचार ऐकावयाला मिळत.

आमच्या कॅबिनच्या समोरच एक अमेरिकन जोडपें होतें, त्यांतील ती बाई विलक्षण होती ह्मणण्यापेक्षां आनंदी होती, असें ह्मटलें पाहिजे. बांधा ठेंगणा व अंग वाटोळें असून दिसण्यांत साधारणच होती. नवरा किडकिड्या व उंच होता. नवऱ्यावर तिचा पगडा जबर असे. ती पुढें झाली कीं, नवरा आपला गरीबासारखा तिच्या मागून चालावयाचा. तिच्याबरोबर नाहीं, मग पुढें कोठचा! ह्मणून तिची त्याच्यावर प्रीति नव्हती, असें माझें मुळींच ह्मणणें नाहीं; परंतु तिची वागण्याची तऱ्हाच अशी होती. एके दिवशीं डेकवर रेसेस् होत्या, व त्यामध्यें या आमच्या शेजारणीच्या नवऱ्यानेंहि पार्ट घेण्याचें ठरलें होतें. तेव्हां या बाईची काय जी सकाळपासून गडबड चालली होती, विचारावयालाच नको! ती आपल्या ओळखीच्या बायांनां सांगत होती " आज माझा नवरा रेसमध्यें पार्ट घेणार आहे, तेव्हां तुह्मी पाहावयाला या."

दुपारीं डेकवर स्त्रीपुरुषांची एकच गर्दी जमली. डेकच्या मध्यभागीं खडूनें एक वाटोळें मंडळ रेखाटलें. या मंडळामध्यें दोघांनीं उभें रहावयाचें, व एकमेकांचा हात धरून एका हातानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला त्या मंडळाच्या बाहेर ढकलावयाचा. जो रेघेच्या बाहेर गेला, तो हरला, असा हा खेळ होता. ह्मणून या बाईनें आपल्या नवऱ्याला अगदीं खेळावयाला जाईपर्यंत "असा हात धरा, असा आंगठ्यावर जोर द्या, पायखालीं चांगले दाबून ठेवा, मुळींच डगमगूं नका," अशा तऱ्हेनें शिकविलेलें पाहून सर्व मंडळी हंसत होती. इतकें बिचारीनें सांगितलें शिकविलें, तरी तिचा नवरा दोन्ही वेळां हरलाच! मग काय विचारतां? बायकोनें त्याची हुर्यो उडविली. त्याच्या तोंडापुढें हात ओंवाळिले. पाण्यांत ढेंकूळ टाकल्याप्रमाणें बिचारा अगदीं विरघळून गेला. त्याला हरल्याचें इतकें वाईट वाटलें नसेल; परंतु बायकोच्या भीतीनेंच बिचारा घाबरून गेला असेल. असो.

डेकवर रोजच मौजेचे व करमणूकीचे पुष्कळ खेळ होत असत. परंतु वर वर्णन केलेल्या खेळाबद्दल विशेष मौज वाटल्यामुळें त्याचें येथें थोड-

क्यांत वर्णन केलें आहे. जपानची एक शाळेंतील दहापंधरा मुलांची ‘टीम’ न्यूयार्कला बेसबॉल खेळावयाला जात होती, त्यांच्याहि कधींकधीं जपानी तऱ्हेच्या कुस्त्या होत. आणखी एक आमच्या ओळखीचें म्हातारें जोडपें होतें. या जोडप्याची तऱ्हा आमच्या शेजारच्या जोडप्याविरुद्ध असे. ह्मातारेबुवा बहुतकरून स्मोकिंगरूममध्यें पीत बसलेले असावयाचे, व बायको बिचारी भीतभीत ‘My Lord, My Master’ करीत नवऱ्याच्याजवळ जावयाची. नंतर ह्मातारा तिरसटपणानें तेथून उठून दुसऱ्या ठिकाणीं जाई, असें नेहमीं चालत असे. जोंपर्यंत ह्मातारा स्मोकिंगरूममध्यें गेला नाहीं, तोंपर्यंत वृत्ति जरा बरी असे. बायकोशीं नीट बोलावायचा, बसावयाचा वगैरे; परंतु एकदां ग्लासावर ग्लास चढले, ह्मणजे बुवांची वृत्ति बदलून जात असे. ही ह्मातारी बाई फार गरीब स्वभावाची होती, व नवऱ्यावर तिचें विलक्षण प्रेम दिसलें. नवरा जरी तिच्याशीं तिरसटपणानें वागे, तरी ती त्याची फार काळजी घेई. आह्मांला दोघांनां मोठें आश्चर्य वाटूं लागलें, कीं, ही अमेरिकन बाई मात्र आपल्या नवऱ्याला आळवितें; नाहीं तर अमेरिकन बायांची आख्या आहे, कीं, सर्व गोष्टींमध्यें त्या नवऱ्याच्याबरोबर चालावयाच्या.

एक चिनी ह्मातारा व त्याचे तीन तरुण मुलगे हेहि पॅसेंजर होते. या चिनी ह्माताऱ्याची व आमची बरीच ओळख झाली होती. हा ह्मातारा आपले मुलगे न्यूयार्कला शाळेंत ठेवण्याकारितां घेऊन जात होता. हे सर्व बौद्धधर्मी होते. ह्मणून त्यांचें मिशनरी लोकांशीं जमत नसे. कधींकधीं ह्मातारा आमच्याजवळ घटकाभर बसे व आपल्या चिनी लोकांच्या रीतींविषयीं व राज्यपद्धतींविषयीं बोले. याला इंग्लिश बरें येत असे, व मुलांनांहि चांगलें शिक्षण देण्याची त्याची इच्छा होती.

आह्मीं त्याला विचारिलें “तुह्मी आपलीं मुलें इतक्या दूर अमेरिकेला घेऊन जातां, तें कशाकरितां? चिनामध्यें चांगल्या शाळा बिलकूल नाहींत कीं काय?”

तो चिनी गृहस्थ ह्मणाला "आतां आमच्या देशांत बऱ्याच ठिकाणीं चांगल्या शाळा झाल्या आहेत; परंतु अमेरिकेंत तीन वर्षांत जितकें चांगलें शिक्षण होईल, तितकें आमच्या देशांत दहा वर्षांतहि होणार नाहीं! तेथील शिक्षणांत व येथील शिक्षणांत भेद आहे. माझें कुटुंब फार मोठें आहे. तुह्मांला ऐकून आश्चर्य वाटेल, माझ्या सात बायका आहेत, व एकंदर मुलें पंचवीस आहेत. मी फार श्रीमंत नाहीं. थोडीशी शेतीभाती आहे. खाऊनपिऊन सुखी आहें, एवढेंच."

"खरेंच आहे, एवढें मोठें कुटुंब असल्यावर श्रीमंती कशी राहील? मग त्या सातजणींमध्यें भांडणतंटे होत नाहींत काय?" असें मीं त्याला विचारलें.

तो ह्मणाला "नाहीं. त्या बहुतकरून निरनिराळ्या राहतात."

"एवढ्या सातजणी बायका केल्या तरी कशाला?"

"माझ्या आईबापांनीं उगीच चढाओढीनें करून ठेविल्या आहेत; तेव्हां त्यांनां पोसलेंच पाहिजे. त्या वेळीं पुष्कळ बायका असणें हें वैभवाचें लक्षण समजलें जात असे."

हा चिनी गृहस्थ बरेच वेळां अमेरिकेला गेला होता. त्याला तिकडील माहिती चांगली होती. त्याला जलप्रवास फार आवडे. तो ह्मणाला "मला येथें घरच्यासारखेंच वाटतें. कारण येथील नोकर चिनीच आहेत; ते आमच्या तऱ्हेचें जेवण करून देतात. भाज्या, भात, चटण्या असे पदार्थ असले ह्मणजे आमचें जेवण चांगलें होतें. इंग्लिश तऱ्हेच्या जेवणाचा रोजरोज कंटाळा येतो, ह्मणून मी डायनिंग रूममध्यें फारसा येत नाहीं. आपल्या तऱ्हेनें जेवलें ह्मणजे आह्मांला बरें वाटतें."

## होनालुलु.

तारीख २९ एप्रिल सन १९११ रोजीं सकाळीं ८ वाजतां आमची बोट होनालुलूच्या जवळ आली, व बंदरापासून दोन मैलांवर उभी राहिली.

ब्रेकफास्टनंतर सर्व मंडळी डेकवर जमा झाली. येथील देखावा फारसा चित्तवेधक नव्हता; परंतु समुद्राचें स्वच्छ पाणी गहिऱ्यानिळ्या रंगाचें दिसत होतें. किनाऱ्याजवळ हिरवट, गढूळ असें दिसे. पाण्यांत तऱ्हे-तऱ्हेचे मासे ओझरते वर येऊन खालीं जात. आकाशांत ढग वगैरे नसल्यामुळें हवा स्वच्छ होती.

डेकवर बायका, पुरुष, मुलेंबाळें चांगला स्वच्छ पोषाक करून जमा झालीं होतीं. कोणी दुर्बिणींतून दूरचा देखावा पहात होतीं. कित्येक बायका हातांत कोड्याक घेऊन फोटो घेत होत्या; परंतु सर्वांनां बोट एकदां धक्क्याला लागून केव्हां जमिनीवर फिरायला मिळतें, असें झालें होतें.

होनालुलु येथून डॉक्टर येऊन सर्वांची तपासणी करणार होता, ह्मणून बोट उभी राहिली होती. थोड्याच वेळांत एका लांचमध्यें बसून डॉक्टर आला, व त्याला शिडी टाकून वर घेतलें. मग सर्वांनीं डाय-निंगहॉलमध्यें जमण्याबद्दल घंटा वाजली. त्याप्रमाणें सर्व मंडळी जमा झाली. नंतर डॉक्टरनें सर्वांनां पाहून प्रत्येकाला पास दिला, व डॉक्टर परत झपाट्यानें निघून गेला. आमची बोटहि लागलीच धक्क्याला येऊन लागली. खलाशांनीं लागलीच रस्ता तयार करून लोकांनां बाहेर जाण्याची मोकळीक दिली. आह्मी दोघें डेकवरून मौज पहात होतों. हे ह्मणाले "आपण सावकाश जाऊं. एवढ्या गर्दींत शिरण्याची आप-ल्याला अशी कोणती गडबड आहे ?"

रस्ता तयार झाल्यावर सर्वांच्या पुढें आमची शेजारीणबाई निघाली. ती सकाळपासूनच आपली हँडब्याग, कोट, छत्री वगैरे घेऊन तयार होती. परंतु जाणारांची फार गर्दी झाल्यामुळें ह्मणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं ह्मणा, तिचा नवरा मागें राहिला, व डॉक्टरचे पासहि त्याच्याजवळच राहिले. तेव्हां पास तपासणारानें तिला बाहेर जाण्याला अटकाव केला. मग काय विचारतां ? ती अशी कांहीं संतापली, कीं,

बोलून सोय नाहीं. इकडे मोठमोठ्यानें नवऱ्याला हाका मारून त्याला बेजार केलें, व इकडे त्या मनुष्यावरहि खूब संतापली. तूं लेडीजूनां अशा तऱ्हेनें वागवतोस? तूं दांड मनुष्य आहेस! तूं कामाच्या लायक नाहींस! मी डॉक्टरच्या पासाशिवाय कशी जाईन? मला समजत नाहीं कीं काय? वगैरे वगैरे त्या मनुष्याला खूब बोलली. मग नवरा येऊन पास दाखवून एकदांचीं दोघें बाहेर गेलीं. परंतु तिला बिचारीला सर्वांच्या आधीं जावयाला मिळालें नाहीं. बरीच गर्दी कमी झाल्यावर आह्मी बाहेर गेलों. बोट येथें दिवसभर व रात्रीसुद्धां राहणार होती, ह्मणून रात्रींहि गांवांत राहतां आलें असतें.

आह्मी बाहेर आल्यावर एक घोड्याची गाडी करून एका हॉटेल-मध्यें गेलों. डायनिंगरूम मंडळींनें भरून गेली होती. बोटींतून सुटल्या-वर हॉटेलाहॉटेलांतून मंडळी जेवणावर घसरली. येथें डायनिंगरूम-मध्यें भिंतींनां विजेचे पंखे लावलेले होते, व त्यांचा शीतळ वारा सर्व-खोलीभर पसरला होता. कारण या वेळीं येथें बरीच उष्णता होती.

आह्मी उपहार करून एकभाड्याची मोटार ठरविली, व दोन तास फिरून तेथील कांहीं जागा पाहिल्या. होनालुलु हें हावाई बेटाचें मुख्य बंदर आहे. याला पॅसिफिकची स्वर्गभूमी अशी उपमा आहे. या बेटांत १६ वर्षांपूर्वीं निरनिराळे स्वतंत्र राजे होते. पुढें यांच्या आपापसांत लढाया होऊं लागल्या. शेवटीं त्रासून त्यांनीं संयुक्त सरकारची मदत मागितली, व स्वसंतोषानें आपला मुलूख त्याच्या ताब्यांत दिला. तेव्हांपासून संयुक्त सरकारचा अंमल येथें सुरू झाला आहे. या अंमला-खालीं याची अल्प अवधींतच भरभराट झाली. येथील रहिवाशांनां स्वतंत्रतेचे हक्क मिळाले आहेत. येथील बऱ्याच मूळच्या रहिवाशांनीं ख्रिश्चन धर्म स्वीकारिला आहे. विद्येचा प्रसारहि झपाट्यानें होत आहे, व त्या कामीं संयुक्त सरकार सढळ हातानें खर्च करीत आहे.

येथें अलीकडे चिनी व जपानी लोकांची वस्ती बरीच झाली आहे. येथील राज्याकरितां जपानची व इंग्लंडची मागणी होती; परंतु येथील लोकांनां युनायटेडस्टेट्सचा अंमल जास्त पसंत पडला.

हवाई बेटें समशीतोष्ण कटिबंधांत असल्यामुळें येथील हवा सर्व ऋतूंमध्यें बहुतेक सारखीच असते. येथील स्वाभाविक सृष्टिसौंदर्य फार अप्रतिम आहे. झाडेंझुडपें, डोंगर, पहाड वगैरे फार मनोरम दिसतात. भाजीपाला, फळफळावळ विपूल असते व हिंदुस्तानाप्रमाणें ताडाचीं व नारळीचीं झाडेंहि विपूल आहेत. कण्हेर, जासवंद, जाईजुई वगैरे फुलझाडेंहि बरींच आहेत. हीं आपल्या देशासारखीं झाडें व फुलें पाहून मला आनंद वाटला. कारण जपानमध्यें अशीं झाडें व फुलें कोठें दिसलीं नाहींत. होनालुलुमध्यें उंसाची लागवडहि फार होते, व येथें साखरेचा मोठा कारखाना आहे. अननसाचीहि मोठी लागवड होते, व त्यापासूनहि साखर कारितात. हे कारखाने व मळे वेळ नसल्यामुळें आह्मांला पाहतां आले नाहींत.

मोटारवाल्यानें आह्मांला शेवटच्या लढाईची जागा पाहण्याला नेलें. ही जागा एका उंच डोंगराच्या सपाटीवर आहे, व बाजूंनीं मोठमोठ्या खोल व भयंकर खडकाळ दऱ्या आहेत. लढाईच्या वेळीं या दऱ्यांमध्यें शेंकडों माणसें ढकललीं गेलीं, व त्यांचीं शरीरें छिन्नभिन्न झालीं, असें ह्मणतात. अजूनहि ही जागा उदास व भयाण दिसते.

नंतर येथील अक्वेरीयम जलचरांचें संग्रहालय पहाण्यास गेलों. येथें अनेक तऱ्हेचे चित्रविचित्र व रंगीबेरंगी मासे, आणि दुसरेहि पाण्यांत राहणारे प्राणी आहेत. या प्राण्यांच्या हालचालीचें व रंगारूपाचें वर्णन करणें अशक्य आहे. या माशांचे अनेक तऱ्हेचे सुंदर रंग पाहून ईश्वराच्या कौशल्याचें कौतुक वाटतें. हे सर्व मासे होनालुलूच्याच समुद्रांतील आहेत, व त्यांनां कांचेच्या भांड्यांत पाणी ठेवून फार काळजीपूर्वक ठेविलें आहे. तेथें त्यांची खाण्याची व हवेची चांगली सोय

केलेली आहे. हें जलचरांचें संग्रहालय प्रेक्षणीय आहे. याच्या आंत जागजागीं लहानलहान बाग व सुंदर कारंजीं आहेत. तेथें ज्या बाजूला पहावें, त्या बाजूला सुंदर मासे खेळतांना दिसतात. तेव्हां या माशां- बरोबर समुद्रांतच आपण फिरत आहों कीं काय, असें वाटतें. मला वाटतें येथें एकादा कुशल चितारी जरी एक वर्षभर राहिला, तरी त्याला देखील असे रंग हुबेहुब देतां येणार नाहींत. नंतर येथील पलटणी लोकांच्या जागा, जुन्या तोफा वगैरे पाहिल्या व येथील पूर्वींच्या राजांचे जुनेनवे महाल पाहिले. कांहीं विधवा राण्या या महालांतून पेन्शन खात पडल्या आहेत.

अमेरिकन लोकांनीं येथेंहि बाराबारा पंधरापंधरा मजली इमारती बांधल्या आहेत. चहाच्या वेळीं हॉटेलमध्यें परत आलों, व चहा घेऊन वर ड्रॉइंगरूममध्यें आलों. येथें बोटीवरील बरीच मंडळी इकडेतिकडे फिरून आल्यावर विश्रांति घेत पडली होती, व म्हातारें जोडपेंहि येथें बसलें होतें. आज तीं बरींच आनंदांत दिसत होतीं. आह्मांला पाहिल्या- वर दोघांनींहि आह्मांला आपल्याजवळ बसवून घेतलें. मग म्हातारीनें येथें कायकाय वस्तु खरेदी केल्या, त्या मला दाखविल्या, व ती सांगूं लागली "My Lord is very very kind to me. He allowed me to buy many things. Is not he an excellent husband?" मग म्हाताऱ्यानें सोडावाटर, लेमोनेट वगैरे आणवून आह्मांला आग्रह करून ड्रिंकस वगैरे दिलीं, व चांगलींचांगलीं फळें व मिठाईहि दिली. असें हें जोडपें आनंदांत पाहून आह्मांलाहि बरें वाटलें.

संध्याकाळीं जेवण झाल्यावर नाटक पहावयास गेलों. नाटक पाहून बोटीवरच निजावयास गेलों. रस्त्यानें जिकडेतिकडे ग्यासच्या दिव्यांचा सारखा लख्ख प्रकाश पसरला होता, व चोहोंकडे बरीच शांतता झाली होती; परंतु आमच्या बोटीवरील मंडळी मात्र कोठें रस्त्यानें दुकानांतून तर कोठें नाटकगृहांतून इकडे तिकडे फिरतांना दिसली.

सकाळीं ९ वाजतां ब्रेकफास्ट झाल्यावर आम्ही डेकवर गेलों, तेव्हां सर्व पॅसेंजर मंडळी लगबगीनें बोटीवर येऊं लागली. सर्व बायांच्या हातांत दोनदोन तीनतीन पार्सलें लटकत होतीं, व सर्वांनीं गळ्यांत कागदांचे रंगीबेरंगी मोठमोठे हार घातले होते. कांहीं बायांची तेवढ्यानेंहि तृप्ति झाली नव्हती, ह्मणून त्यांनीं आणखी कांहीं हार टोप्यांनांहि गुंडाळले होते. कांहीं बायांनीं मण्यांच्या व बियांच्या पुष्कळ माळा घातल्या होत्या. अशी ही अमेरिकन मंडळी होनोलुलूच्या बऱ्याच वस्तु खरेदी करून व रात्रभर नाटकें वगैरे पाहून मजा मारून सकाळीं बोटीवर दाखल झाली. येथें कांहीं नवीन पॅसेंजर्सहि आले होते. आमच्या शेजारीणबाई मात्र सर्वांच्या मागून आल्या. हातामध्यें तीनचार पार्सलें, कांखेमध्यें एक-दोन पुडकीं, नवऱ्याजवळहि कांहीं सामान, अशी इतरांप्रमाणें माळा वगैरे घालून स्वारी बोटीवर आली.

आह्मी बोटीवर परत आलों, तेव्हां तेथेंहि सर्वत्र शांतता व सामसूम होतें. परंतु येणाराजाणाराकारितां रस्ता मोकळा होता, व जिकडे-तिकडे लख्ख प्रकाश होता. बोट येथून दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां निघणार होती, ह्मणून आमच्याशिवाय दुसरे कोणीहि पॅसेंजर बोटीवर आले नव्हते. ते सर्व ती रात्र होनालुलूमध्येंच काढणार होते. आह्मांला बोटीवर येऊन कॅबिनमध्यें निजणेंच बरें वाटलें. उगीच एका रात्रीकारितां हॉटेलमध्यें निजून विनाकारण पैशाचा चुराडा, व दुसऱ्या दिवशीं दुकानांशिवाय दुसरें कांहीं पहावयालाहि वेळ नव्हता.

डेकवर पुनः गडबड सुरू झाली. जो तो आपापलें सामान मित्र-मंडळीला दाखवूं लागला, व काय पाहिलें, काय केलें वगैरे गप्पागोष्टी सुरू झाल्या.

बोटीवर जो मुख्य यूरोपियन वेटर होता, त्याला येथें पकडलें. कारण त्यानें चिनामधून एक पेटीभर अफू लपवून आणली होती. ती लबाडी येथें उघडकीला येऊन त्याला २ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्याच्या-

बद्दल आह्मां सर्वांनां मोठें आश्चर्य वाटलें. कारण तो पोक्त वयाचा इसम असून दिसण्यांतहि संभावीत दिसत होता. थोड्याच दिवसांपूर्वी त्यानें लग्न केलें होतें, ह्मणून कदाचित् पैशाच्या हावेनें असें केलें कीं काय, कोण जाणे. कसेंहि असो, वाईट कामाचा वाईटच परिणाम !

या मनुष्याला केव्हां पकडलें, केव्हां नेलें वगैरे आह्मांला कांहींच समजलें नाहीं, किंवा बोटीवर कांहीं गडबड वगैरे दिसली नाहीं. जेव्हां पॅसेंजर लोक बोलूं लागले, तेव्हां समजलें कीं, "इकडे अफू आणण्याची सक्त मनाई आहे." माझे गुडघे दुखत होते, ह्मणून आह्मी मुंबईहून एक बेलाडोनाचा डबा आणला होता, तो यांनीं समुद्रांत फेंकून दिला. ते ह्मणाले "कोणीं पाहिलें, तर अफू आहे असें वाटून आह्मांला परकीय ठिकाणीं त्रास व्हावयाचा."

सकाळीं १० वाजतां होनालुलु बंदरांतून बोट निघाली. जरी एकच दिवस आमचा मुक्काम झाला, तरी तेवढ्यानेंच आह्मां सर्वांनां बरें वाटलें. याकोहामापासून जी बोट निघाली, ती रात्रंदिवस चालून नेमलेल्या वेळीं १० दिवसांनीं होनालुलूला आली. इतके दिवस सर्वांचे डोळे होनालुलूकडे लागले होते, ते आतां सान्फ्रान्सिस्कोकडे लागले.

कसा तरी अर्धाअधिक जलप्रवास झाला, ह्मणून मला फार आनंद झाला. आतां ६।७ दिवसांचीच वाट राहिली, हें ऐकून मनाला बराच धीर आला.

आतां बोटीवर लेक्चरें, शर्यती, नाच वगैरेंची गर्दी उडाली. रोज एकदोन तरी भाषणें होत. दोन गृहस्थ मार्मन धर्माचे होते, त्यांनींहि आपल्या धर्माविषयीं २।३ दिवस लांबलचक भाषणें केलीं. त्यांनीं आपल्या धर्मामध्यें बरीच सुधारणा केली असल्याचें सांगितलें. "पूर्वी एका मनुष्याला वाटेल तितक्या बायका करतां येत असत, त्याला धर्मानें मनाई केली, व सर्व गोष्टींमध्यें चांगल्या सुधारणा केल्या आहेत; आणि निराश्रित व गरीब लोकांनां साहाय्य करण्याकरितां संस्था निर्माण केल्या आहेत.

यांतील लोक थोड्या पगारावर परोपकारार्थ कामें करितात. देव मनुष्यासारखाच आहे व इथल्याप्रमाणें सर्व वस्तु स्वर्गांत आहेत," असें चऱ्हाट बराच वेळ चाललें होतें.

बिशप व इतर कांहीं मंडळी यांच्यामागें लागून तुह्मी हिंदुस्तानाबद्दल कांहीं तरी माहिती सांगा असें ह्मणत होती. परंतु "सर्व मंडळीमध्यें उभें राहून बोलण्याची मला सवय नसल्यामुळें मला बोलतां येईल कीं नाहीं याचा संशय वाटतो," असें हे ह्मणाले. परंतु हें त्यांचें सांगणें कोणाला बरें वाटलें नाहीं. ते ह्मणाले "हा तुमचा कांहीं तरी बाहाणा आहे. तुह्मीं इंग्लिश चांगलें जाणत असून सर्व गोष्टींची तुह्माला माहिती आहे.तेव्हां थोडेंसें भाषण करणें तुह्माला कठीण नाही."

"बरें,"हे ह्मणाले."मीं कोणात्या विषयावर भाषण करावें,अशी तुमची इच्छा आहे? तुह्मांला कोणत्या तऱ्हेची हिंदुस्तानासंबंधीं माहिती पाहिजे?" असें त्यांनीं विचारलें. तेव्हां कोणी ह्मणूं लागले "आह्मांला हिंदुस्तानच्या राज्यकारभाराची, कोणी लोकस्थितीविषयीं, कांहीं बाया ह्मणूं लागल्या तुमच्या देशांतील लग्नाविषयीं माहिती द्या. बिशपसाहेब ह्मणाले "हिंदुस्तानच्या मिशनरी लोकांविषयीं कांहीं बोला." शेवटीं असें ठरलें, कीं, हिंदुस्तानांतील व तेथील लोकस्थितीविषयीं माहिती द्यावी, झालें. संध्याकाळीं लागलीच नोटीस लागली, कीं, उद्यां सकाळीं १० वाजतां मि. चिटणवीस हे हिंदुस्तानाविषयीं कांहीं भाषण करणार आहेत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९॥ वाजतां डायनिंगहॉलमध्यें बरीच मंडळी येऊन जमा झाली. एक इंग्लिश गृहस्थ व त्यांची पत्नी हीं भाषण ऐकण्याकरितां सर्वांच्या आधीं येऊन बसलीं होतीं. नाहीं तर तें जोडपें कधीं व्याख्यानाला येत नसे. परंतु आज इंडियन गृहस्थाचें भाषण होणार आहे, व हिंदुस्तानविषयीं व सरकारविषयीं हे काय बोलतात, काय नाहीं, या महत्त्वाकांक्षेनें हें जोडपें लवकर येऊन बसलें. हीं दोघें नवराबायको आमच्याबरोबर जपानपासून होतीं; परंतु कधींहि आमच्याशीं

बोललीं नाहींत. कधीं गुडमॉर्निंग नाहीं, कीं कधीं गुडइव्हिनिंग नाहीं; असा त्यांचा कल पाहून आह्मींहि कधीं त्यांच्याशीं बोललों नाहीं.

१० वाजतां यांचें भाषण सुरू झालें, तें ११ वाजतां संपलें. तें मंडळीला फार आवडलें व तें कांहीं अमेरिकन बाया व गृहस्थानीं दुसऱ्या दिवशीं त्यांच्याजवळून समजून घेऊन लिहून घेतलें. आमच्या मैत्रिणी अमेरिकन बाया व कांहीं गृहस्थ यांनीं अमेरिकेमधील आपल्या कांहीं इष्टमित्रांनां आह्मांला पुष्कळ इंट्रोडक्शन पत्रें दिलीं. तीं चिकॉगो, वॉशिंग्टन, न्यूयार्क वगैरेमधील लोकांकरितां होतीं.

प्रकरण चवथें.

## सान् फ्रान्सिस्को.

तारीख ६ मे १९११ रोजीं नेहमींप्रमाणें सकाळीं ८ वाजतां आमची बोट सान् फ्रान्सिस्कोजवळ येऊन उभी राहिली. ब्रेकफास्ट झाल्यावर आह्मी सर्व पॅसेंजर जेवणाच्या दिवाणखान्यांत डॉक्टरच्या तपासणीकरितां जमा झालों. डॉक्टरची तपासणी झाल्यावर पुनः सर्वांचीं नांवें लिहून घेतलीं. विशेषतः आह्मां परकीयांची अधिक कसून चौकशी केली. कोठून आले, काय उद्देशानें आले, इकडे किती दिवस राहणार, स्वदेशीं काय करीत असतात वगैरे पुष्कळ चौकशी केली, व सर्व लिहून घेतलें. आमच्या केंसाचा, डोळ्यांचा रंग, आमची उंची हें सर्व टिपून घेतलें. हें सर्व पाहून मला मोठें चमत्कारिक वाटेल, व रागहि आला, कीं, हे काय ह्मणून उगीच असा त्रास देतात? हे ह्मणाले "तसें कांहीं नाहीं. ते आपल्या रुलाप्रमाणें वागतात. इतक्या दुरून तुह्मी आलेले, तुह्मांला एखाद्या वेळीं कांहीं झालें गेलें, तर तुमची कांहीं माहिती त्यांनां पाहिजे कीं नको? ह्मणून ते लिहून घेतात, त्यांत तुमचें काय जातें?" दोन बर्मी मुलें एका मिशनरी डॉक्टरनें रंगूनहून इकडे शाळेंत ठेवण्याकारितां आणिलीं होतीं. हीं मुलें १३–१४ वर्षांचीं असतील. या दोन मुलांनां व त्या डॉक्टरला बोटीवर अडकवून ठेवण्यांत आलें. कारण, या मुलांच्या आईबापांचें अथवा नातलगांचें पत्र वगैरे त्या मिशनऱ्याजवळ नव्हतें. ह्मणून हीं मुलें चोरून किंवा फुस लावून आणिलीं असतील, अशा संशयावरून त्याला अडकविण्यांत आलें. तो मिशनरी डॉक्टर बर्माला तार करणार होता. तिकडून उत्तर येई-पर्यंत त्यांनां बोटीवरच ठेवणार, असें ह्मणत होते.

सर्व विचारपूस संपल्यावर आह्मी डेकवर गेलों. आह्मीं पूर्वींच सामान वगैरे बंद करून स्टयुवर्डच्या हवालीं केलें होतें, आणि एकेक हॅंडबॅग हातांत ठेविली होती. डेकवर जिकडेतिकडे मोठी गडबड चालू होती.

बोट आतां हळुहळू बंदरांत शिरत होती. समुद्रामध्यें जिकडेतिकडे डोंगर दिसत होते. सपाट जमीन कोठेंच दिसत नव्हती. जमिनीवर आतां उतरणार ह्मणून सर्वांनां, विशेषत: अमेरिकन बायांनां आपला देश आला ह्मणून, आनंद वाटत होता. अमेरिकन लोकांनां भेटण्याकरितां बंदरावर कोणाचीं मुलें, भाऊ, बहिणी येणार होतीं. ह्मणून बोट एकदां धक्क्याला केव्हां लागेल, व आपल्या भेटी केव्हां होतील, असें त्यांनां झालें होतें. होनालुलुवरून आलेल्या पॅसेंजर मंडळीमध्यें नाटकांत पार्ट करणारें एक जोडपेंहि आलें होतें. यांतील बाई नेहमीं तोंडाला रंग वगैरे लावून नेहमीं नाटकीवेषांतच राहत असे. ती स्वभावानें बरी होती, व बोटीवर गाणें वगैरे करून आमची नेहमीं करमणूक करीत असे. या जोडप्यानें आह्मांला अमेरिकेंत (न्युयार्कमध्यें) आपल्या थिएटरांत नाटकाला येण्याला सांगून पत्ताहि सांगितला होता. मी बरेच दिवसांपासून सानूफ्रान्सिस्कोच्या Golden Gate विषयीं ऐकत होतें, व माझी कल्पना होती, कीं, तें खरोखरीचें सोन्यानें मढविलेलें असेल. आतां तें गेट केव्हां येतें ह्मणून मी उत्कंठेनें वाट पाहत होतें. तितक्यांत चोहोंकडून आरोळ्या सुरू झाल्या. 'बोट आतां गोल्डनगेटमध्यें शिरते, गोल्डनगेटमध्यें शिरते !' तशी मी इकडेतिकडे पाहूं लागलें. परंतु डोंगराशिवाय दुसरें कांहींच दिसेना. ह्मणून मी यांनां विचारलें "आहे तरी कोठें तें गोल्डन गेट ?"

मग मला समजलें, कीं, गोल्डन गेट कांहीं सोन्याचें नाहीं ! दोन्ही बाजूंनीं दोन मोठे डोंगरांचे कडे आले आहेत, त्यामुळें हे समुद्रामध्यें एका मोठ्या थोरल्या दरवाज्याप्रमाणें दिसतात, व येथील देखावा विलक्षण दिसतो. यालाच गोल्डन गेट ह्मणतात. बोट येथें हळुहळू शिरत होती. कारण, दोन्ही बाजूंनीं डोंगर असल्यामुळें येथें रस्ता बराच अरुंद झाला आहे. गेटच्या आंत बोट गेल्यावर लवकरच धक्क्याकडे वळते. हें वळणहि अगदीं अरुंद बोळासारखें आहे. हें पाहिलें ह्मणजे असें

वाटतें, कीं, एवढी मोठी प्रचंड बोट या लहानशा अरुंद जागेंत शिरते तरी कशी? आणि या बोळामधून वळवली तरी कशी? आह्मी असें आश्चर्य करीत आहों, तों बोट त्या बोळांत शिरलीहि, व हळुहळू घसरत धक्क्याजवळहि आली, तसा डेकवरील गोंगाटहि अधिक झाला, व जिकडेतिकडे हातरुमालाचीं निशाणें फडकूं लागलीं, आणि बंदरावरहि लोकांची खूब गर्दी झाली. सर्वांनां आपले आप्तइष्ट दिसूं लागले, तशी त्यांची अधिकच खळबळ होऊं लागली. एक बाई तर केव्हांपासून वांकून आपल्या मुलाला पाहण्याचा प्रयत्न करीत होती. दोनतीन वर्षें तिची व मुलाची भेट झाली नव्हती. तिला जेव्हां मुलगा दिसला, तेव्हां मातृप्रेमाला भर आला. ती इकडूनतिकडे एकसारखी फिरूं लागली, व नवराहि तिच्याबरोबर फिरूं लागला. ती नवऱ्याला वारंवार सांगूं लागली "डिअर, आपला मुलगा केवढा मोठा झाला आहे पहा! आतां तर तो अगदीं तुमच्यासारखा दिसतो!" खरें पाहिलें असतां मुलगा त्या बाईला पूर्णपणें दिसतहि नव्हता. परंतु मातृहृदयच तें! एकसारखें उचंबळूं लागलें.

एकदांची बोट धक्क्याला येऊन लागली, व रस्ता तयार होतांच पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें सर्व लोक बंदरावर उतरले. या धक्क्याशीं लागूनच एक हॉल होता. त्यामध्यें सर्व लोक जमा झाले, व ज्याला त्याला वाटूं लागलें, कीं, केव्हां एकदां कस्टमची तपासणी होऊन आपण एकदांचे सुटूं. मला यांनीं एका खुर्चीवर आणून बसविलें, व आपण सामान पाहण्याला गेले. येथें कस्टमचा बराच त्रास होतो. सर्व पेट्या, ट्रंका, बॅगज् वगैरे त्यांनां उघडून दाखवाव्या लागतात. याविषयीं सर्व अमेरिकन लोकांनां मोठा अभिमान वाटत होता, असें दिसलें. ते ह्मणत होते " आह्मी अमेरिकन लोक मोठे न्यायी व अगदीं नियमाप्रमाणें वागणारे आहोंत," व त्यांच्या प्रेसिडेंटवरहि त्यांचा फार विश्वास व प्रेम दिसलें.

या कस्टमहॉऊसमध्यें ( A. B. C. D. ) याप्रमाणें अक्षरांचीं तिकिटें लावून सामान ठेवण्याकरितां निरनिराळ्या जागा केल्या आहेत. येथें विल्हेवारीनें प्रत्येकाचें सामान आणून ठेवितात. आह्मीं चिटणवीस ह्मणून आमचें सामान सीच्या वर्गांत गेलें. त्या क्लासच्या ढिगांतून ज्यानें त्यानें आपलें सामान शोधून काढावयाचें. यांनां त्या दिवशीं पुष्कळ दगदग पडली. तास तीड तास एकसारखें सामान पाहण्यांत व नवीन काय काय आहे तें दाखविण्यांत इकडूनतिकडे कितीतरी हेलपाटे घालावे लागले. मी मात्र एका जागीं बसलें होतें. पूर्वीं आह्मीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली वगैरे ठिकाणीं फिरलों, परंतु कस्टमची इतकी कडक तपासणी कोठेंच पाहिली नाहीं.

सर्व सामान जमा झाल्यावर सर्वांनां नंबराप्रमाणें एकेक तिकिट मिळतें. मग ही तिकिटवाली मंडळी एका रांगेनें उभी करितात. नंतर नंबराप्रमाणें एकेकाचें सामान तपासतात. सर्व कांहीं उघडून दाखवावें लागतें. तपासणी झाल्यावर सर्व सामानाला छाप मारितात. नंतर बाहेरच्या दरवाज्याजवळ एक मनुष्य उभा असतो. तो सर्व सामानाला छाप आहे कीं नाहीं, तें पहातो, तेव्हां सामान बाहेर जाऊं देतो. ज्या एकट्याच बाया असतात, त्यांच्या सामानाची तपासणी अगोदर करितात. नंतर पाळीपाळीनें इतरांची तपासणी करितात.

आह्मांला येथील लोकांनीं फारसा त्रास दिला नाहीं. उगीच वरवर जरा पेट्या उघडून पाहिल्या, व लवकरच पुन: बंद करून दिल्या. जपानी वस्तु आमच्याजवळ बऱ्याच होत्या, त्या आह्मीं एका पेटींत भरून एका ऑफिसराच्या स्वाधीन केल्या. त्यानें सांगितलें, कीं, तुह्मी अमेरिका सोडाल तेव्हां आह्मांला कळवा, ह्मणजे ही तुमची पेटी तुह्मांला बोटीवर मिळेल. तुह्मांला या वस्तूंवर डयूटी पडणार नाहीं.

## पॅलेस हॉटेल.

सान्फ्रान्सिस्कोमध्यें हें एक मोठें हॉटेल आहे. हें हॉटेल बारा मजली असून येथें पुष्कळ सोयीस्कर खोल्या आहेत. प्रत्येक खोलीला स्वतंत्र

बाथरूम असून, थंड पाण्याचा आणि गरम पाण्याचा नळ रात्रंदिवस चालू असतो. स्वच्छतेकडे फार काळजीपूर्वक लक्ष्य दिलें जातें. अंग पुसण्याचे टॉवेल रोज बदलतात, व साबणाच्या वड्याहि रोजरोज नवीन असतात. एक बाई रोज सकाळसंध्याकाळ येऊन खोलीची झाडलोट करीत असते, व बाथरूम साबणानें व गरम पाण्यानें धुऊन पुसून काढते. दुसरी जी मुख्य असते, ती बिछाने सुधारणें, आणि कपड्यांच्या घड्या करणें वगैरे कामें करिते, व नेहमीं देखरेख करीत असते. या अमेरिकन नोकरिणी बहुतकरून जोडे साफ करीत नाहींत. जोडे साफ करणारांचीं हॉटेलमधून जागजागीं लहान दुकानें असतात. त्यांच्या दुकानीं गेलें ह्मणजे जोड्याला पॉलिश वगैरे देऊन चांगले साफ करितात. शिवाय रस्त्यारस्त्यानेंहि जोडे साफ करणारीं मुलेंहि पुष्कळ फिरत असतात.

या हॉटेलमध्यें आह्मांला सातव्या मजल्यावरील खोली मिळाली होती. ही खोली मागच्या बाजूला असल्यामुळें फारशी हवाशीर नव्हती; परंतु यावेळीं येथें चांगली थंडी असल्यामुळें हवेची विशेष जरूरी भासली नाहीं. येथें प्रत्येक खोलींतून टेलिफोनची व्यवस्था होती. आपल्याला जर कांहीं वस्तु पाहिजे असली तर, किंवा एकादी नोकरीण पाहिजे असली तर टेलिफोन केला असतां तशी लागलीच व्यवस्था होते.

खालच्या मजल्यावर सुंदर मौल्यवान सामानानें सजवलेली ड्राइंग-रूम आहे. येथें दुपारीं व संध्याकाळीं रोज सुस्वर असा ब्यांड वाजत असतो, व शेंकडों बायकापुरुष येतजात असतात. कोणी घटकाभर बसून ब्यांड ऐकून जातात, कोणी लंच वगैरे घेऊन जातात; कोणी सोडावाटर पितात, कोणी आपली मित्रमंडळी घेऊन चहा पीत असतात. कित्येक बायका हातांत लहानलहान पेट्या घेऊन निरनिराळ्या फंडाकरितां लोकांजवळ पैसे मागत फिरतात. कोणी लहान मुलांच्या हास्पिटलकरितां, कोणी सोल्जरांकरितां, कोणी गरिबांच्या विद्येकरितां अशा रीतीनें या बाया रस्त्यांतून हॉटेलमधून पैसे जमा करीत फिरत असतात.

या हॉटेलमध्यें जेवणाचेहि पांचसहा हॉल आहेत. जसें ज्याला जेवण पाहिजे असेल, उत्तम, मध्यम, कनिष्ट त्याप्रमाणें व्यवस्था असते. इकडे खोलीचें भाडें निराळें द्यावें लागतें व चहाचे वगैरे निराळे पैसे द्यावे लागतात. इंग्लंडमध्यें तसें नाहीं. तिकडे खोलीचे व खाण्यापिण्याचे पैसे एकंदर घेतात.

आमची बंदरावरून सुटका झाल्यावर आह्मी या हॉटेलमध्यें आलों, व लंच घेतल्यावर थोडा वेळ ड्राइंगरूममध्यें बसलों. नंतर हे कुकच्या ऑफिसांत गेले, व अमेरिकेंतील पुढील प्रवासाचा प्रोग्राम करून आणला. दुसऱ्या दिवशीं मोटार करून येथील पार्क व किल्ला पाहिला. सान् फ्रान्सिस्कोच्या भोंवतालीं अनेक पार्क आहेत. या पार्कमध्यें अनेक तऱ्हेचीं फुलझाडें, फळझाडें, तसेंच कित्येक जातींचे कोमल वेल आहेत, व ठिकठिकाणीं कारंजीं, सुंदर टांकीं, तळीं व पाण्याचे धबधबे आहेत. या पार्कमध्यें गेलें ह्मणजे मनुष्य घटकाभर तहानभूक विसरून जातो, व येथेंच पहात राहावें असें वाटतें.

हें शहर चारपांच वर्षांपूर्वीं धरणीकंपानें व आगीनें उध्वस्त झालें होतें; परंतु असें ह्मणतात कीं, तें हल्लीं पूर्वींपेक्षां फारच चांगलें बांधलें आहे. झालेल्या नुकसानीचा आतां कोठेंहि मागमूस राहिला नाहीं, व दिवसेंदिवस अधिक सुधारणा होत आहे.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं माउंट टेंपल पाय व म्यूअर रेडवुड फारेस्ट पाहण्याला गेलों. सकाळीं सात वाजतां निघावें लागलें. सान फ्रान्सिकोमध्यें रेल्वे मुळींच नाहींत. कारण, हें शहर एका लहानशा बेटासारखें आहे. याच्या बाहेर जावयाचें ह्मणजे बोटीनें जावें लागतें, तेव्हां ट्रेन मिळते. हें बोटीचें बंदर एकाद्या मोठ्या रेल्वे स्टेशनासारखें बांधिलें आहे, व हें दोन मजली आहे. येथें बऱ्याच बोटी असतात, आणि त्या एकेका तासानें सुटतात. आपणाला ज्या रेल्वेनें जावयाचें असेल, त्याप्रमाणें बोट घ्यावी लागते. बोट बंदराशीं अगदीं लागून उभी असते-

बोटींत जाऊन बसावें तेव्हां असें वाटतें, कीं, हा एक या इमारतीचा दिवाणखानाच आहे कीं काय! या बोटींत तीन मजले असतात. खालच्या मजल्यावर सामान ठेवण्याची जागा असते. वरच्या मजल्यावर बसण्याची जागा व त्याच्या वरच्या मजल्यावर गच्चीसारखी उघडी जागा असते. कोणाला वाटेल तर तेथें जाऊन बसावें. या बोटीवर पहिला, दुसरा क्लास असा भेद नसतो. सर्वांकरितां एकच क्लास असतो. चहा, काफी, वाईनस वगैरे पदार्थ रिफ्रेशमेंटरूम असते तेथें मिळतात. या बोटीमध्यें अर्धापाऊण तास बसावें लागतें; परंतु तेवढ्याकरितांसुद्धां उत्तम सोयी असतात. कोणाला बोट वगैरे लागली तर पुरुषांकरितां व बायकांकरितां कॅबिन्स तयार असतात. जर बोटीला एकादा धोका झाला किंवा कांहीं वावटळ वगैरे झालें, तर लोकांच्या संरक्षणासाठीं लहानलहान होड्या ठेविल्या असतात, व प्रत्येक सिटच्या खालीं रबराचे गोल चाकासारखे वाटोळे कंबरेला बांधण्याकरितां बेल्ट्स् ठेवलेले असतात. असे कीं, वेळप्रसंग आला तर सर्व तऱ्हेची हुषारी असावी.

आह्मी बोटींतून उतरलों तेव्हां ट्रेन तयारच होती. या जवळपास जाणाऱ्या आगगाड्यांनां एकच क्लास असतो. मग तुह्मी कोणत्याहि डब्यांत बसा. सुमारें अर्ध्या तासानें ट्रेन या स्टेशनावर आली. येथून एक ट्राम्वेसारखी लहान गाडी डोंगरावर जाते. आह्मी उतरलों त्या वेळीं ही गाडी तयारच होती. जाणारे लोक उतरले व भराभर त्या गाडींत बसले; परंतु आह्मांला माहिती नसल्यामुळें आह्मी त्या गर्दीमध्यें दुसऱ्या बाजूच्या प्लॅटफार्मवर उतरलों. ह्मणून गाडीजवळ जावयाला आह्मांला वेळ लागला व आह्मी पोंचेपर्यंत गाडी निघाली. आह्मी दोघेंहि वेड्यासारखीं त्या गाडीच्यामागें धांवत सुटलों; पण ते अमेरिकेचे लोक—ते कसची गाडी उभी करितात! गाडी चालली आपली घणघण घंटा वाजवीत! या गाडीला एक लहानसें एंजिन असतें, व त्या एंजिनावर एक मोठी घंटा असते, व गाडी चालू झाली ह्मणजे ही घंटा आपोआप वाजूं लागते. त्यामुळें

ही गाडी मोठ्या मौजेची दिसते. अशी ही गाडी घणघण घंटा वाजवीत एकदम निघून गेली व आह्मी दोघें एकमेकांकडे पहात स्तब्ध उभीं राहिलों. हे ह्मणूं लागले " काय बेटे अमेरिकेचे लोक खराब आहेत! काय झालें असतें आमच्याकारितां थोडी गाडी थांबविली असती तर ?"

असे यांनां रागावलेले पाहून मला मनांतल्या मनांत हंसूं आलें; परंतु ती हंसण्याची वेळ नव्हती, ह्मणून मला मनांतल्या मनांत तें दाबून ठेवावें लागलें, व होईल तितकें गंभीर तोंड करावें लागलें. कारण, गाडी चुकली यांत थोडीबहुत आमचीहि चुकी होती. आह्मीहि गाडी उभी होती, त्या बाजूच्या प्लॅटफॉर्मवर उतरावयाला पाहिजे होतें; परंतु इकडील बरोबर माहिती नसल्याकारणानें अशी चूक झाली. शिवाय, येथें दोहोंबाजूंस सारखेच प्लटफार्म होते, व लोकहि दोहोंबाजूंनां उतरत होते. तेव्हां आह्मांला वाटलें, कीं, ही लहान गाडी इतक्यांत निघत नाहीं. कसेंहि असो. अशा घोंटाळ्यांनीं आह्मीं आपली गाडी चुकविली खरी. गाडी चुकली ह्मणजे कोणालाहि राग येतोच. त्यांत आपला कांहीं दोष असला, तरी मनुष्य दुसऱ्यावर रागावतो. आतां दुसरी गाडी केव्हां निघेल, या स्टेशनावर कितीवेळ थांबावें लागेल, येथें खाण्यापिण्याला मिळेल कीं नाहीं, अशा विचारांत आह्मी होतों, तों तेथून कांहीं अंतरावर एक अमेरिकन गृहस्थ उभा होता. मला वाटतें, तो बराच वेळपासून उभा होता, व आमची गाडी चुकण्याची घालमेल सर्व त्यानें पाहिली असावी. तो आमच्याजवळ आला व ह्मणूं लागला "तुमची गाडी चुकली; फार वाईट वाटतें. पण आतां एका तासानें तुह्मांला दुसरी गाडी मिळेल. एकदां गाडी सुटली ह्मणजे अमेरिकन लोक कोणासाठींहि ती उभी करीत नाहींत. ते आपले रूल पाळण्यांत स्ट्रिक्ट आहेत. तुह्मीहि लहान गाडी उभी होती त्या बाजूकडे उतरून गाडींत लौकर बसावयाचें होतें. कारण अमेरिकन लोक जसे नियम पाळण्यांत स्ट्रिक्ट आहेत, तसेच ते वेळेच्या किंमतीमध्येंहि स्ट्रिक्ट

आहेत." असें तसें सांगून वेळेपुरतें तो आमचें समाधान करूं लागला. कसेंहि असो. बिचारा येऊन चार गोड शब्द तरी बोलला, हे त्याचे मोठे उपकार समजावयाचे. नाहीं तर त्याला काय गरज पडली होती? तो कांहीं नोकर नव्हता. आमच्यासारखाच एक कोठें तरी जाणारा उतारूच होता. त्यानें मग आह्मांला एका लहानशा हॉटेलची माहिती सांगितली, व रस्ता वगैरे दाखविला.

हें हॉटेल लहानसेंच असून एकाद्या रेस्टॉरंटसारखें होतें. परंतु त्या वेळीं आह्मांला तेंच मोठ्या उपयोगाचें वाटलें, व तेथील मालकानें ब्रेकफास्ट व चहा, फळें वगैरे चांगलीं दिलीं. असो. अशा तऱ्हेनें एका तासाची खोटी झाल्यामुळें आमचा त्या दिवसाचा सर्व प्रोग्राम बिघडला. पुढील सर्व गाड्यांची चुकामूक झाली व उगीच एक तास या लहान स्टेशनावर घालवावा लागला. नंतर आह्मी पुन: स्टेशनावर आलों, तेव्हां ही लहान गाडी तयारच होती. तींत बसून डोंगराच्या माथ्यावर गेलों. येथें एक चांगलें सुंदर टापटिपीचें व स्वच्छ हॉटेल आहे. येथें कांहीं विशेष पहाण्यासारखें नाहीं. इतकेंच, कीं येथून दूरपर्यंतचा देखावा दिसतो. जिकडे पहावें तिकडे लहानमोठे डोंगर, दऱ्या व त्यांतून वहाणाऱ्या नद्या, शेतें वगैरे चांगलीं दिसतात. येथें कांहीं वेळ इकडे-तिकडे फिरलों, व मग म्यूअरवुड फॉरेस्टकडे जाणारी गाडी घेतली, व तिकडे गेलों.

येथील हॉटेलमध्यें चहा घेऊन हें म्यूअरवुड पहावयाला गेलों. हें खालीं खोल दरीमध्यें आहे. येथें जाण्याकरितां भाड्यानें घोडीं मिळतात, अथवा कोणी वाटेल तर पायीं जातात. येथें एक मैल खालीं उतरावें लागतें, व चढउतार दोन्ही फार खराब आहेत. परंतु खालीं मोठी चांगली रमणीय जागा आहे. हे वृक्ष फार मोठे व उंच आहेत, या झाडांच्या मधून एक स्वच्छ पाण्याचा सुंदर ओढा वहातो. जिकडेतिकडे हिरवें गार व फार थंड आहे. चढतांना व उतरतांना दोन्ही वेळ आमची पूर्ण खात्री झाली.

संध्याकाळीं सान फ्रान्सिस्कोला परत आलों. जेवण वगैरे झाल्या वर हे बाहेर गेले, व मी ड्राइंगरूममध्यें प्यांड वाजवीत बसलें. ड्राइंग रूममध्यें कित्येक अमेरिकन बाया जातयेत होत्या. कोणी त्यांच्या ओळखीच्या बाया भेटल्या, ह्मणजे त्यांच्याशीं गप्पागोष्टी सांगत बसत. पायामध्यें उंचउंच टांचांचे बूट, नवीन फॅशनचे लांडे आणि अरुंद स्कर्ट नेसलेल्या, डोक्यावर अनेक तऱ्हेच्या व विलक्षण टोप्या, हातामध्यें एकेक लहानशी पिशवी, अशा या शेंकडों बाया येतजात होत्या. मी एका खुर्चीवर बसून ती सर्व गंमत पहात होतें. माझ्यापासून कांहीं अंतरावर एक पोक्त वयाची बाई बसली होती. ती एकदम माझ्या जवळ आली व माझा हात धरून मला ह्मणाली. "How darling you are! Where is your husband? Why do you let him go out alone? You must be a generous wife; but you know this is America!" असें ती थट्टेनें बोलली, व मला ह्मणाली "मी तुह्माला पाहिल्याबरोबर ओळखिलें, तुह्मी इंडियन बाई आहांत; तुह्मी इतक्या दूर आपल्या नवऱ्याबरोबर एकट्या आलांत, हें तुमचें मोठें धाडस समजलें पाहिजे! काल मीं तुमच्या नवऱ्याला व तुह्माला येथें बसलेलें पाहिलें. तेव्हांच मी तुमच्याशीं बोलायला येणार होतें; पण तुह्मी तितक्यांत उठून गेलांत." तुह्मी कोठून आलांत, कोठें जाणार? वगैरे पूसतपास करूं लागली. या बाईला अशी बोलतांना पाहून आणखीहि कांहीं बाया आल्या व त्याहि कांहीं वेळ बोलत बसल्या. त्या बाया मला विचारूं लागल्या, कीं, "तुमच्या हिंदु लोकांचें येथें एक चर्च आहे, तेथें तुह्मी गेलां होतां कीं नाहीं? कोणी एक स्वामी येथें आले आहेत, व त्यांचीं वेदावर लेक्चरें होत असतात." मीं त्या बाईनां सांगितलें कीं, "आह्मांला येथील कांहीं माहिती नाहीं, व सारे दोन दिवस झाले येथें येऊन. आतां लवकरच जाणार आहोंत."

आमच्या बोटीवरील ओळखीची मंडळी आतां बहुतेक जिकडे-तिकडे निघून गेली होती. आमचे मित्र मि. म्यॉकराय व त्यांची बायको हींहि निघून गेलीं होतीं. जातांना त्यांनीं आपला न्यूयार्कचा पत्ता लिहून दिला होता, व सांगितलें होतें, कीं, तेथें आल्यावर जरूर आह्मांला कळवा, ह्मणजे आपण पुन: भेटूं.

तारीख ७ मे रोजीं रात्रीं ९ वाजतां आह्मी सान्फ्रान्सिस्कोहून युसा-मिठीकडे जावयाला निघालों. आमच्या सामानाची वगैरे हॉटेलच्या पोर्टरनें आधींच सर्व व्यवस्था लाविली होती. येथें हॉटेलमधून पोर्टरचीं व दरवानांचीं वगैरे साधारण कामें करण्याला बहुतकरून नीग्रो लोकच असतात. हे लोक वर्णानें काळेकुट्ट असून दिसण्यांत ओबडधोबड असतात. फारसे शिकलेलेहि नसतात. परंतु अलीकडे यांच्यांत बरीच सुधारणा झाली आहे, असें ह्मणतात.

लहान बोटींत बसून आह्मी ओकलंड स्टेशनावर गेलों. तेथें आमची ट्रेन तयारच होती. नंतर तिकिटकलेक्टरला तिकिटें दाखवून त्यानें दाखविलेल्या डब्यांत बसलों. तेथें आमच्या तिकिटावरील नंबरा-प्रमाणें आमच्याकरितां दोन बिछाने होते. इकडील या स्लीपिंग कार्स फारच मोठ्या व लांबरुंद असतात, व प्रत्येक डब्यावर एकेक नोकर असतो. तो पॅसेंजर लोकांच्या सामानाची वगैरे व्यवस्था पहातो. या कामावरहि बहुतकरून नीग्रो लोकच असतात, व त्यांच्यावर देखरेख करण्याकारितां एकदोन अमेरिकन्स असतात. या निजण्याच्या डब्यांतून लहानलहान हँडबॅगशिवाय दुसरें कांहीं सामान आणूं देत नाहींत. कारण, येथें सामान ठेवण्याकारितां मुळींच जागा नसते. आपलें जें कांहीं सामान असेल तें आधींच लगेजमध्यें द्यावें लागतें, व आपल्या नंबराच्या जागीं ज्यानें त्यानें बसावें लागतें. डब्याच्या दोन्ही बाजूंनीं बसण्याच्या जागा असतात, व जाण्यायेण्याकारितां मधून जागा असते. दोन्ही टोंकांनां दोन ड्रेसिंगरूम्स असतात. एक पुरुषांकारितां आणि एक बायकां-

करितां.या ड्रेसिंगरूमच्याजवळ एकदोन बिछान्यांची लहान खोली असते. या खोलीचें भाडें जबर असतें. परंतु ज्यांनां स्वतंत्र खोली पाहिजे असेल, ते श्रीमंत लोक ही घेतच असतात. गाडीच्या अगदीं शेवटीं आब्झर्वेशन् कार असते. तेथें बसण्याकारितां चांगल्या मखमलीच्या आरामखुर्च्या वगैरे ठेवलेल्या असतात, व त्यांच्याशीं लागूनच एक रीडिंग रूम असते. तेथें कांहींकांहीं वर्तमानपत्रें व लिहिण्याचें सामान असतें. येथें बसलें ह्मणजे देखावा फार चांगला दिसतो. डायनिंग कार पुढच्या टोंकाकडे असते, व सेकंड क्लासहि तिकडेच असतो. सेकंड क्लासमध्यें बसण्याकारितां एकेक खुर्ची मिळते. येथें निजावयाला मुळींच मिळत नाहीं. ही लांब गाडी फारच अवाढव्य दिसत होती. अमेरिकेचें सर्वच मोठें ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं !

मग लवकरच गाडी निघाली. आह्मी दिवसभर फिरल्यामुळें अगदीं थकून गेलों होतों, व आतां लवकरच निजायला मिळेल तर बरें, असें वाटत होतें. तेथील नीग्रो नोकराला हे ह्मणाले, "अरे, आमचे बिछाने लवकरच करून दे. आह्मांला फार झोंप आली आहे."

यावर तो नोकर ह्मणाला "होय महाराज, दहा वाजले, ह्मणजे लागलीच बिछाने करणें सुरू करितों."

येथें ह्मणजे सर्व कांहीं नेमलेल्या वेळीं होत असावयाचें. मागेंपुढें व्हावयाचें नाहीं. परंतु आमच्या सुदैवानें दहा वाजायला फारसा अवकाश नव्हता. लवकरच दहा वाजले, व त्या नोकरानें ताबडतोब सर्वांचे बिछाने तयार केले.

एका डब्यांत एकंदर खालींवर धरून वीस बिछाने असतात. खालचा बिछाना खुर्चीसारखा असून दिवसा बसण्याच्या उपयोगांत येतो, व वरच्या बिछान्यावर गाद्या, पलंगपोस, उशा वगैरे सामान ठेवून तो बंद करितात. रात्रीं त्या खुर्च्यांचे बिछाने केले जातात. मध्येंमध्यें लांकडाच्या फळ्यांचें पार्टिशन् करितात, व मोठमोठे डबल पडदे सोड-

तात. अशा तऱ्हेनें रात्रीच्या वेळीं डब्यामध्यें एकदम किती तरी फरक दिसूं लागतो. मधून बोळासारखा रस्ता व दोन्ही बाजूंनीं लांबलांब हिरवेगार मखमलीचे सुंदर पडदे सोडलेले. प्रत्येक बिछान्याजवळ एक विजेचा दिवा असतो. वाचावयाचें असेल, तर खुशाल पडून वाचावें. वरच्या बिछान्यावर शिडीनें चढावें लागतें. रात्रीं कोणाला खालीं उतरावयाचें असेल, तर नोकराला घंटी द्यावी, ह्मणजे तो शिडी आणून देतो. रात्रीचे कपडे वगैरे बदलावयाचे, ते त्या लहानशा ड्रेसिंगरूममध्यें जाऊन बदलावे व मग आपल्या बिछान्यावर जाऊन निजावें.

एकंदरींत ही अमेरिकेंतील ट्रेनमधील निजण्याची व्यवस्था मला कांहीं आवडली नाहीं. जरी पुष्कळ मोठमोठे पडदे असतात, बाजूला फळ्यांचें पार्टिशन् असतें, आणि लोकहि चांगले सभ्य असतात, तरी सर्व बायकापुरुषांनीं एकाच दिंडींतून जावयाचें, ह्मणजे बायकांना थोडासा त्रास पडतोच. यापेक्षां आपल्या हिंदुस्तानांतील व्यवस्था मला बरी वाटते. इतकेंच आहे, कीं, या गाडींतील बिछाने रुंद असतात.

अमेरिकन बाया प्रवासाच्या कामांत व इतर कामांतहि–बोलण्यांत, चालण्यांत, लिहिण्यांत, वाचण्यांत–सर्वच बाबतींत हुषार असतात. त्यांतल्यात्यांत प्रवास करण्यांत तर त्या फारच हुषार असतात. या आमच्या स्लीपिंग कारमध्यें पुरुषांपेक्षां बायकाच अधिक होत्या. या बायांजवळ एक हँड्बॅग व ओव्हरकोट हींच होतीं. या स्लीपिंग कारमध्यें अधिक सामान घेऊंच देत नाहींत. आह्मांला माहीत नव्हतें, ह्मणून आह्मीं एक मोठी बॅग आणि एक बिछाना घेतला होता; पण त्या दोन्ही वस्तु आह्मांला आमच्या बिछान्यावर ठेवून घ्याव्या लागल्या, व त्यामुळें निजण्याला थोडी अडचण झाली.

या बायांच्या लहानशा हँडबॅगमधून थोडथोडें सर्व कांहीं त्यांच्या उपयोगाचें सामान असतें. दांत घांसावयाचे ब्रश, दोनतीन तऱ्हेच्या पावडरी, आरसा, फण्या, साबण, हेअरपिन वगैरे सामान तर असतेंच;

परंतु त्यांतच रात्रीं निजण्याच्या वेळीं घालण्याचे पातळ कपडे, स्लीपर, थोडेंसें शिवणकामाचें सामान वगैरे सर्व नीटनेटकें तेवढ्यांतल्यातेवढ्यांत ठेविलेलें असतें. उतरावयाची वेळ आली, कीं, घेतली बॅग हातांत, चढवला कोट, कीं, चालल्या झपाट्यानें !

ही युसामिठी व्हॅलीकडे जाणारी गाडी फार वेगानें जाते. वांकडा-तिकडा रस्ता असल्यामुळें व बराच चढाव असल्यामुळें गाडी फार हालते; परंतु निजल्याबरोबर आह्मांला फार चांगली झोंप आली व जसें काय पाळण्यांत निजल्यासारखें वाटूं लागलें. सर्व रात्र कशी गेली तें समजलें देखील नाहीं.

सकाळीं सात वाजतां गाडी डेलपोर्टल स्टेशनावर पोहोंचणार होती, ह्मणून सहा वाजतांच मंडळीची उठण्याची व कपडे वगैरे घालून तयार होण्याची गडबड सुरू झाली. हे नेहमींप्रमाणें पांच वाजतांच उठून, पोथी वगैरे आटोपून, कपडे घालून पुस्तक वाचीत बसले होते. मला मात्र बिछाना दूर करवेना. कारण, इकडे सर्वत्र बर्फ पडल्यामुळें बरीच थंडी पडली होती.

ड्रेसिंगरूममध्यें पाळीपाळीनें दोघीदोघी तिघीतिघींची कपडे घालण्याची, तोंडें धुण्याची व वेण्या विंचरण्याची गडबड चालली होती. या लहानशा ड्रेसिंगरूममध्यें फार चांगली व्यवस्था होती. तोंड धुण्या-करितां ऊन पाणी, साबण, चांगले धुवट पुष्कळसे टॉवेलस्—प्रत्येकाला निराळा, साबण तेलासारखे बाटलींत भरून ठेवले होते. तो थोडासा हातावर ओतून घ्यावा व चोळावा, ह्मणजे साबणासारखा फेंस येई. या अमेरिकेंतील स्लीपिंग कार्स् सर्व पुलमन कंपनीच्या आहेत; ह्मणून यांना 'पुलमन कार्स्' असें ह्मणतात.

आमचे सर्वांचे कपडे वगैरे घालून झाले नाहींत, तोंच त्या नीग्रो नोकरानें सर्वांचे बिछाने गुंडाळून व घड्या वगैरे करून, आणि मधलें पार्टिशन् काढून, वरच्या बिछान्यांत सर्व बंद करून जिकडचेंतिकडे ठेवून दिलें, व पुनः बसण्याला जागा पूर्ववत् मोकळी झाली.

यां व्हॅलीचा देखावा फार चांगला दिसत होता. व्हॅलीमधून वांकडा-तिकडा पाण्याचा प्रवाह वहात होता, आणि त्यामध्यें हिरवी, निळी, व कांहीं पिवळट रंगाची शेवाळ पाण्याच्या जोरानें जिकडेतिकडे हेलकावे खात होती. व्हॅलीच्या बाजूनें व खडकावर कोठेंकोठें पांढरें शुभ्र बर्फ पडलें होतें. सकाळच्या वेळीं ही सर्व शोभा फार चांगली दिसत होती, व वारा चांगला थंड व मंदमंद वहात होता; त्यामुळें मनाला फार हुषारी व आनंद वाटूं लागला.

कांहीं व्यापारी लोकांनीं या व्हॅलींतील रंगीबेरंगी दगडांचे सुंदर दागिने करून, गाडीमध्यें विकावयाला आणले होते. आंगठ्या, नेकलेस, ब्रॉचेस वगैरे निरनिराळ्या प्रकारचे जिन्नस पॅसेंजर लोकांनीं आपापल्या आवडीप्रमाणें हवे तितके विकत घेतले.

सात वाजतां गाडी डेलपोर्टलच्या स्टेशनावर गेली. येथें हॉटेलचा मनुष्य उभाच होता. त्यानें आह्मांला हॉटेलमध्यें नेलें. हें हॉटेल स्टेश-नाच्या जवळच आहे, परंतु तें उंच टेंकडीवर असल्यामुळें बरेंच वर चढावें लागतें.

हॉटेलच्या पुढील हॉलमध्यें एक मोठी फायर प्लेस होती, व तीमध्यें धडधड विस्तव पेटत होता. त्यामुळें सर्व हाल चांगला गरम व ऊब-दार होता. कांहीं बायका व पुरुष विस्तवाजवळ बसून पुस्तकें व वर्त-मानपत्रें वाचीत होतीं, व कांहीं बाया शिवणकाम, विणकाम वगैरे करीत होत्या. हॉलच्या दुसऱ्या बाजूला एक दुकान होतें. तेथें स्टेश-नरी, ॲल्बम्स, पुस्तकें व कांहीं बारीकसारीक डागिने वगैरे विक्री-करितां ठेविले होते.

हॉटेलमध्यें थोडा उपाहार करून मग आह्मी कोचमध्यें बसून निघालों. या कोचमध्यें सोळासतरा माणसांनां बसण्याची जागा असते. हिला चार घोडे जुंपतात. हिच्यावरील हांकणारा मनुष्य फार हुषार असतो. तो अरुंद आणि नागमोडी रस्त्यांतून ती एवढी मोठी गाडी अगदीं

संभाळून नेतो. सामान नेण्याच्या गाड्या वेगळ्या असतात. त्याहि मोठमोठ्या असून त्यांनाहि चार किंवा सहा घोडे जुंपतात.

आमची कोच अगदीं गच्च भरली होती. एकसुद्धां सीट रिकामी नव्हती. यांत नेहमींप्रमाणें बायकांचाच भरणा जास्त होता. त्यांपैकीं बऱ्याच अमेरिकन बाया होत्या. कांहीं इंग्रज बायाहि होत्या, व एक ऑस्ट्रेलियन जोडपें होतें. हीं नवराबायको मांचूरिया बोटीवरहि आच्याबरोबर होतीं. हा ऑस्ट्रेलियन गृहस्थ जरा तिरसट स्वभावाचा होता. परंतु त्याची बायको फार चांगल्या स्वभावाची होती. ती त्याची युक्तीयुक्तीनें समजूत करीत असे. आमची कोचगाडी त्या दरीच्या किनाऱ्यानें वर चढत होती. कोठेंकोठें रस्ता अगदींच अरुंद होता, तेथें फार भीति वाटे.

या दरीमध्यें कोठेंकोठें फार चांगली शोभा दिसत होती. स्फटिकासारखें पांढरें स्वच्छ पाणी त्या खोल दरींतून खळखळ जोरानें वहात होतें, व तें त्यांतील मोठमोठ्या दगडांवर व खडकांवर धडाधड आपटत होतें. दरीच्या बाजूनें अनेक तऱ्हेचीं सुंदर जंगली फुलें फुललीं होतीं. त्यांचे पिवळे, निळे, काळे, पांढरे इत्यादि रंग सकाळच्या सूर्यप्रकाशामध्यें फारच चित्तवेधक दिसत होते. कोठेंकोठें डोंगरावरून लहानलहान धबधबे दरीमध्यें येऊन पडत होते.

ही सर्व शोभा अमेरिकन बाया स्वतः पाहून एकमेकींनां दाखवीत होत्या, व किती सुंदर, किती मनोवेधक, किती रमणीय अशी प्रशंसा करून आनंद करीत होत्या; परंतु त्या ऑस्ट्रेलियन गृहस्थाला हें कांहींच बरें वाटत नव्हतें, असें दिसलें. कारण तो अगदीं स्तब्ध व दुर्मुखलेला बसला होता. हें पाहून त्याची बायको त्याला ह्मणाली "पहा, त्या फुलांचा रंग किती चांगला दिसतो आहे तो!"

यावर तो जरा गुरगुरल्यासारखें करून ह्मणाला "अंः, त्यांत काय विशेष आहे? आपल्या देशांत असें नाहीं कीं काय? मला तर कांहीं

या अमेरिकेंत चांगलें दिसत नाहीं. हॉटेलांतून कांहीं चांगली खाण्यापिण्याची व्यवस्था नाहीं. सर्व गोष्टींची अतिशय महागाई. इकडे येऊन माझी अगदीं निराशा झाली आहे."

या बुवाला सकाळीं त्याच्या मनाजोगी ब्रेकफास्ट मिळाली नाहीं, ह्मणून सकाळपासूनच तो संतापला होता, व हॉटेलांतून निघाला तेव्हांच त्याची कुरकूर चालली होती. बायको त्याची समजूत करण्याचा प्रयत्न करी, पण तें त्याला रुचत नसे. उलटी अधिकच त्याची तब्बेत बिघडे हीं दोघें नवराबायको आमच्या अगदीं जवळ बसलीं होतीं, ह्मणून त्यांच्या सर्व गोष्टी आह्मांला ऐकूं येत होत्या.

अमेरिकन बायका बोलत होत्या व हंसत होत्या, तेंहि या बुवाला बरें वाटेना. तो हळूच पुटपुटायला लागला "What a noisy people are these Americans–especially women! They cannot keep quiet for a second!"

यावर त्याची बायको ह्मणाली "नाहीं, डिअर, हे फार चांगले व दयाळू लोक आहेत. हे हंसूनबोलून नेहमीं आनंदांत असतात. हें काय वाईट का आहे?"

अमेरिकन बायांची खरोखरीच एकसारखी टकळी चालली होती. बिचाऱ्या ड्रायव्हरला अनेक प्रश्न विचारण्याचा त्यांनीं सपाटा चालविला होता. या डोंगराचें काय नांव आहे, या वाटरफॉलला काय ह्मणतात, हीं झाडें कशाचीं, हीं फुलें किती दिवस टिकतात, असे सारखे प्रश्न चालले होते. तो बिचारा उत्तरें तरी किती देणार? त्याला घोडे सांभाळावयाचे, व या बायांच्या प्रश्नांना उत्तरें द्यावयाचीं. शेवटीं तो आपला दोनच शब्द बोलूं लागला "Yes Madam! No Madam!"

कांहीं बायका फारच बोलणाऱ्या व चवकसखोर होत्या. त्यांच्या तोंडाची टकळी सारखी सुरू होती. परंतु त्यांच्या बोलण्यामुळें आह्मांला चांगली करमणूक होत होती, व वेळ लवकर जात होता.

रस्त्यानें जे कित्येक डोंगर लागतात, त्यांना वेगळींवेगळीं नांवें दिलीं आहेत. जसें:—एल्. कॅप्टन, थ्री ब्रदर्स, कॅथीड्रल् पायरस्, ग्लेशीअर पॉइंट, पेर ऑफ् शूज् वगैरे. तसेंच येथील धबधब्यांनांहि निराळीं नांवें आहेत. उदाहरणार्थ:—ब्रायडल् व्हेल इत्यादि.

आमची कोच युसोमिठीला बारा वाजतां येऊन पोहोंचली. येथें एकच साधारण लहानसें हॉटेल आहे. परंतु तितक्यांतल्या तितक्यांत सर्व व्यवस्था चांगली आहे.

युसोमिठी ही दरी कॅलिफोर्नियाच्या मध्यभागीं आहे. मेजर साव्हेज यांनीं हिचा शोध १८५७ सालीं लाविला. ही दरी समुद्रापासून ४००० फूट उंच आहे, व हिची लांबी सात मैल आहे. रुंदी सरासरी एक मैल आहे. येथील सृष्टिसौंदर्य फार रमणीय आहे. येथें मरसेट नांवाची मुख्य नदी आहे, व तिला अनेक लहानलहान प्रवाह येऊन मिळाले आहेत, व त्यांपासून अनेक लहानमोठे धबधबे उत्पन्न झाले आहेत. सर्वांत मोठा धबधबा हॉटेलच्या जवळच आहे. तो बऱ्याच उंचावरून खालीं जोरानें पडत असतो, व त्याचे मोत्यासारखे तुषार दूरवर उडत असतात. या धबधब्याच्या सभोंवतालच्या तुषारांचें पांढरें शुभ्र व खडीसारखें घट्ट बर्फ जमलें होतें, व सर्वत्र झाडांझुडपांखालून व दल-दलीच्या जागांमधून बर्फ जमलें होतें. त्यामुळें येथें चांगलीच थंडी पडली होती.

आह्मीं स्नानें वगैरे करून लंच घेतली व हॉटेलच्यापुढें व्हरांड्यांत बसून सभोंवतालचें सृष्टिसौंदर्य पहात होतों. इतरहि प्रवाशी मंडळी बसली होती, व आपापल्या प्रवासाच्या व अनुभवाच्या गोष्टी एकमेकांनां सांगत होती. आमच्याहि कांहीं अमेरिकन बायांशीं ओळखी झाल्या होत्या. त्या आमच्याशीं फार ममतेनें वागत. विशेषत: एक म्हातारी अमेरिकन बाई व तिची एक तरुण मुलगी या दोघींची सकाळीं कोचमध्यें बसल्यापासूनच चांगली ओळख झाली होती. ही म्हातारी बाई फारच

ममताळू व कोवळ्या मनाची होती. रस्त्यानें सुंदर झाड दिसलें, अथवा एकादा सुंदर डोंगर दिसला, किंवा फुलें वगैरे दिसलीं, तर ती आह्मांला आधीं दाखवींत असे, व ह्मणत असे, कीं "तुमचें एकाद वेळ तिकडे लक्ष्य जाणार नाहीं, ह्मणून मी तुह्मांला सांगतें; पण तुह्मांला त्यापासून कांहीं त्रास होणार नाहीं ना ? कारण, माझ्या आईनें मला लहानपणा-पासून असें शिकविलें आहे, कीं, जर आपल्याला कांहीं सुंदर देखावा किंवा सुंदर वस्तु दिसली, तर ती आधीं दुसऱ्याला दाखवावी. ढगामध्यें व डोंगरांमधून सुंदर तोंडें कल्पावीं, ह्मणजे तशींच आपणांला दिसूं लागतात. तें पहा, त्या डोंगराच्या बाजूला हत्तीचें तोंड दिसत आहे. त्या ढगामध्यें पहा किती सुंदर पऱ्या नाचतांना दिसतात—"

यावर तिची मुलगी ह्मणाली "आई, कांहीं तरी वेड्यासारखें सांगते आहेस झालें ! आह्मांला तर त्या डोंगरावर तोंडें दिसत नाहींत, किंवा ढगामध्यें पऱ्या नाचतांना दिसत नाहींत."

ह्मातारी ह्मणाली "डार्लिंग, तूं विश्वास ठेवींत नाहींस ह्मणून तुला दिसत नाहीं !"

अशी सकाळपासून या ह्मातारीच्या बाईची व आमची चांगली ओळख झाली होती. या दोघी मायलेकी व्हरांड्यामध्यें आमच्याजवळ बसून हिंदुस्तानच्या वगैरे गोष्टी विचारीत होत्या, व तेथेंच आमच्याजवळ ऑस्ट्रेलियन बाईहि बसली होती. इतक्यांत ऑस्ट्रेलिअन बुवा स्नान करून, चांगले स्वच्छ कपडे वगैरे घालून बाहेर आले, व सकाळपेक्षां आणखी रागावलेले दिसूं लागले. आमच्याजवळ येऊन आह्मां सर्वांनां सांगूं लागले "पहा, येथें अमेरिकेमध्यें कसे लोकांजवळून सर्व बाबींचे वेगवेगळे पैसे घेतात ते ? स्नानाचा माझ्याजवळून एक शिलिंग घेतला ! खरें पाहिलें असतां यांनीं स्नानाबद्दल मुळींच पैसे घेऊं नयेत. ह्मणजे प्रवासी लोकांनां स्वच्छ रहाण्याबद्दल उत्तेजन तरी येईल. नाहीं तर कोणीहि आपल्या स्वच्छतेबद्दल काळजी घेणार नाहीं. लोकांजवळून स्वच्छतेबद्दल

पैसे घेणारा असा देश आपण नाहीं पाहिला बुवा ! अशानें लोकांना स्नानें करण्याला संकोच वाटणार. मग लोकांमध्यें आरोग्य कसें रहाणार ?"

हें ऐकून त्या ह्मातान्या बाईच्या मुलीला थोडा राग आला. कारण ती अमेरिकन होती. तिच्या देशाला वाईट ह्मटलेलें तिला कसें बरें वाटणार ? ती ह्मणाली "काय ? तुमच्या ऑस्ट्रेलियामध्यें स्नानाची व्यवस्था सर्व ठिकाणीं फुकटच असते कीं काय ? या युसामिठीसारख्या अवघड ठिकाणीं सर्व वस्तु आणावयाचा व हॉटेल ठेवावयाचा त्यांना किती त्रास व किती खर्च येत असेल ? मग लोकांजवळून सर्व वस्तूंचे पैसे घेणार नाहीं, तर एवढा खर्च कसा भागेल, व प्रवाशांची व्यवस्था कशी राहील ?"

असा त्यांचा बराच वादविवाद चालला. मग त्या बुवाच्या बायकोनें कांहीं तरी निमित्त काढून त्याला बाहेर बागेंत फिरावयाला नेलें.

दुपारीं चार वाजतां इन्स्पिरेशन पॉइंटकडे जाणारी बस तयार झाली. या गाडीलाहि चार घोडे जुंपलेले असतात, व त्यांत अठरावीसजणांना बसण्याची जागा असते. दुसरे कांहीं प्रवासी व आह्मी या गाडींत बसून निघालों. रस्त्यानें कांहीं पहाण्यासारखें नव्हतें. जिकडेतिकडे मोठमोठे डोंगर, आणि खडक दिसत होते, व कोठेंकोठें तुरळक एकादा लहानसा वॉटरफॉल दिसत होता. रस्ता अतिशयच अरुंद ह्मणजे अगदीं एका गाडीपुरता होता. रस्त्याच्या एका बाजूला खोलखोल व भयंकर दऱ्या होत्या, व दुसऱ्या बाजूला उंचनीच असे पर्वताचे कडे होते. जागजागीं रस्त्याला वांकडींतिकडीं अवघड वळणें होतीं. दरीकडील बाजूला दृष्टि फिरविली, ह्मणजे अंगावर शहारे येत होते. जरी पुष्कळ तऱ्हेनें खात्री होती, कीं, इकडे बहुतकरून अपघात होत नाहींत, इकडील लोक फार काळजी घेतात, तरी मनांतल्यामनांत फार भीति वाटतच होती; परंतु त्या हांकणाराला मात्र कांहींच वाटत नव्हतें. तो त्या अवघड वळणांनीं ती एवढी मोठी चार घोड्यांची गाडी फार जलदीनें व साहजिक रीतीनें हांकीत होता.

अशा या अरुंद रस्त्यानें ही गाडी डोंगराच्या माथ्यावर गेली. येथें पहाण्यासारखें असें कांहींच नाहीं. फक्त बरेंच वर आल्यामुळें खालील झाडाझुडपांचा व दऱ्या, धबधबे वगैरेंचा देखावा चांगला दिसत होता. आह्मी वर पोहोंचलों, ती सूर्यास्ताची वेळ होती सूर्याचीं मंद झालेलीं किरणें तेथील एका मोठ्या दरींत एक मोठा धबधबा होता, त्यावर पडलीं होतीं. त्यामुळें त्या धबधब्याचे हिरवे, तांबडे, पिवळे, जांभळे असे अनेक रंग बदलत होते. त्या दरीमध्यें कित्येक इंद्रधनुष्यें दिसत होतीं, एवढाच काय तो सुंदर देखावा तेथें दिसला.

जेव्हां आह्मी परत येऊं लागलों, तेव्हां अर्ध्या वाटेंत आह्मांला खालून येणारी गाडी भेटली. आतां ही गाडी कशी जाणार? रस्ता पाहिला, तर अगदीं एका गाडीपुरता. ही आमची गाडीहि मागें फिरवितां येत नव्हती, आणि ती गाडीहि मागें फिरवतां येत नव्हती. आतां कसें होणार, याबद्दल मला फार भीति वाटूं लागली. परंतु एवढें बरें होतें, कीं, ती दुसरी गाडी दोन घोड्यांची असून आमच्या गाडीपेक्षां पुष्कळ लहान होती ह्मणून त्या गाडीचे घोडे सोडले, व आमच्या बरोबरची कांहीं पुरुष मंडळी खालीं उतरून, त्या ड्रायव्हरला मदत करून, ती गाडी बाजूच्या एका खडकाकडे ओढून ठेविली. मग आमची गाडी पुढें हांकली. झालें. एकदांचीं आह्मी निर्विघ्नपणें हॉटेलांत परत आलों.

संध्याकाळीं जेवण झाल्यावर आह्मी सर्व ड्रॉइंगरूममध्यें येऊन बसलों. तेव्हां आमची ओळखीची अमेरिकन ह्मातारी बाई आह्मांला विचारूं लागली "आज दुपारीं तुह्मी कुठें गेलां हातां? तेथें काय पाहिलें व काय केलें?" या दोघी मायलेकी तो उंच डोंगर पहाण्याला दुपारीं आमच्याबरोबर आल्या नव्हत्या.

आह्मीं ह्मातारीला सांगितलें "तेथून दऱ्या, धबधबे वगैरेंचा देखावा फार चांगला दिसतो."

ह्मातारी ह्मणाली "आह्मी उद्यां जाऊं."

ह्मातारी आपल्या लेंकीवर जीव कीं प्राण करीत असे. ती ह्मणाली "मला कांहीं कोठें जाण्याची अथवा पहाण्याची फारशी इच्छा नाहीं. पण मुलीकरितां जावें लागतें."

ह्मातारी डोळ्यांत आसवें आणून पुढें ह्मणाली "मी फार दुःखी आहें. चार महिने झाले, माझी एक तरुण मुलगी निर्वतली. ती सर्वांत धाकटी होती. आणखी मला दोन मुली व दोन मुलगे आहेत. परंतु जें जातें, त्याची जागा दुसरें भरून काढूं शकत नाहीं. ज्याचे गुण त्याच्याबरोबर जातात. माझी ही मुलगी नेहमीं आजारी असते. ही फार नाजूक आहे. माझा नवरा मरण पावून एक वर्ष झालें. तेव्हांपासून माझी प्रकृति बरी नसते." असें ह्मातारी आपलें सुखःदुख सांगत होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं गाडींत बसून मिरर लेक पहाण्याला गेलों. या वेळीं ह्मातारी बाई व तिची मुलगी या दोघी आमच्याबरोबर होत्या.

मिरर लेक हें डोंगराच्यामध्यें लहानसें तळें आहे. याच्या भोंवतालीं उंचउंच डोंगर व लहानमोठीं झाडें आहेत. डोंगरावर जिकडेतिकडे बर्फाचें पांघरूण झालें होतें. येथें सूर्योदयाचा देखावा फार रमणीय दिसतो. पहिल्यानें सूर्य ताऱ्यासारखा लहान दिसतो, व जसजसा त्या डोंगरांच्या वर येतो, तसतसा तो मोठा दिसूं लागतो. येथील सभोंवतालच्या देखाव्याचें हुबेहुब प्रतिबिंब तळ्यांत दिसतें. तळ्याच्या पाण्यामध्यें एक मोठा दगड आहे. त्यावर उभें राहून लोक फोटो काढवितात. ते फोटो प्रतिबिंबासह निघतात. आमच्या बरोबरच्या सर्व मंडळीनें तेथें उभें राहून आपले फोटो घेतले. आह्मी दोघांनींहि आपला फोटो घेतला. परंतु माझा फोटो जरा चमत्कारिक निघाला. कारण, तेथें फार थंडी असल्यामुळें मीं एक लांब व जाड कोट घातला होता. कोटासुद्धां फोटो काढावा लागला. त्यामुळें माझा फोटो मला आवडला नाहीं. परंतु हे ह्मणाले "यांत कसलें चांगलें आणि वाईट आलें आहे? उगीच एकेका जागेची आठवण ह्मणून असावा."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



आमचा लेकमिरर येथें घेतलेला फोटो।

येथून अर्ध्या मैलावर असलेल्या मरसट नदींत हॅपी आग्दलस पहावयाला गेलों. इकडे गाडी जात नाहीं, ह्मणून येथें खेंचरें व गाढवें खोगीर घालून भाड्यानें देण्याला तयार होतीं. बरीच मंडळी यांच्यावर स्वार होऊन गेली. आह्मी दोघें व आमच्या मैत्रीणी त्या दोघी मायलेकी आणि ऑस्ट्रेलियन जोडपें व आणखी कांहीं मंडळी अशी पायींच चालत गेली. रस्ता डोंगराळ असल्यामुळें जागजागीं चढउतार होता. कोठेंहि चांगले दगड व छाया दिसली, कीं, तेथें बसून आह्मी सर्वजणें विश्रांति घेत होतों. कारण ती ह्मातारी बाई फार लवकर थकत असे. तिच्याकरितां आह्मी सर्वच घटकाभर बसत असूं, व ह्मातारीच्या गप्पागोष्टी ऐकत बसूं. येथें नदीच्या पाण्याशिवाय कांहीं विशेष पहाण्यासारखें नव्हतें. ह्मणून आह्मी लवकरच परतलों. ऑस्ट्रेलियन बुवाहि आज चांगले आनंदांत होते. ते बायकोशीं व सर्वांशींच आज हंसतमुखानें बोलत होते.

लंचच्या वेळेला परत हॉटेलांत आलों. लंच घेतल्यावर हॉटेलजवळील कांहीं चित्रांचीं व फोटोग्राफरचीं दुकानें पाहिलीं. येथील देखाव्यांचें आल्बम्स् वगैरे घेतलें. येथील दुकानदार आह्मांला विचारूं लागला, कीं "तुह्मी वाओनाला कां जात नाहीं? तेथल्याइतकीं मोठीं झाडें जगांत दुसरीकडे नाहींत, अशी आख्या आहे. कांहीं झाडांचे बुंधे कोरून, चार घोड्यांच्या बसेस् जाण्याइतका रस्ता केला आहे. तरी त्या झाडांनां कांहींएक इजा झाली नाहीं. तीं जशींच्या तशींच हिरवीं गार आहेत. तेथें नेहमीं पुष्कळ जाड बर्फ असतें, व लोकांनां इकडेतिकडे फिरण्याकरितां जाड तरटाचे जोडे घालावे लागतात. तुह्मीं इतक्या दूरवर येऊन ती पहाण्यासारखी जागा कशी सोडली?"

परंतु "आह्मांला आतां वेळ नसल्यामुळें तिकडे जातां येत नाहीं," असें आह्मीं त्या दुकानदाराला सांगितलें. असली चांगली जागा आह्मीं पाहिली नाहीं, ह्मणून आह्मांलाहि वाईट वाटलें; परंतु आमच्या पुढील प्रोग्रामाप्रमाणें आह्मांला एक दिवसहि मोडतां येण्यासारखा नव्हता.

मग आह्मी मोठ्या धबधब्याकडे गेलों व तेथील सुंदर हिरव्या गार राईमध्यें इकडेतिकडे फिरलों. तेथें दुसरीहि आणखी कांहीं मंडळी आमच्यासारखीच फिरत होती. या राईमधून नदीचा प्रवाह जोरानें खळाळून वहात होता, व जिकडेतिकडे पांढरे शुभ्र बर्फाचे ढीगच्याढीग पडले होते. या लहानशा उपवनाची शोभा फार मनोरम दिसत होती. नदीच्या बाजूनें, जागजागीं ओबडधोबड लांकडी खुर्च्या लोकांनां विश्रांति घेण्याकरितां ठेविल्या होत्या. नदीवर ठिकठिकाणीं लहानलहान लांकडी पूल बांधिले होते. त्यामुळें लोकांनां नदीच्या दोन्ही बाजूंनां जाण्यायेण्याचा त्रास होत नसे. येथील पांढऱ्या शुभ्र बर्फाचे गोळे करून मीं ते नदीच्या प्रवाहांत फेंकले. अगदीं माझ्या हाताला मुंग्या येत तोंपर्यंत मी त्या बर्फांत खेळ करीत होतें. हे तेथें खुर्चीवर बसून माझ्या वेडेपणाकडे पाहून हंसत होते, व "उगीच थंडामध्यें कशाला फार हात घालतां ? सर्दी वगैरे होईल. उगाच काय लहान मुलीप्रमाणें खेळ मांडला आहे ?" असें ह्मणून मधुनमधून मला रागेंहि भरत होते; परंतु त्या मऊमऊ बर्फाचे गोळे, बाहुल्या, बोळकीं वगैरे करण्याची मला फार मजा वाटे. या वेळीं मला माझ्या भाच्यांची आणि सुनांची फार आठवण झाली, व वाटलें, कीं, त्या जर येथें असत्या, तर त्या या बर्फांत खूप खेळल्या असत्या. कारण कँपमध्यें त्या नेहमीं आमच्याबरोबर असत, व आमच्या तंबूजवळ नदी किंवा नाला असला, तर तेथील वाळूमध्यें अथवा पाण्यामध्यें खूप खेळत असत; आणि लुगड्याचे ओंचे ओले करून तंबूंत आल्यावर मी रागें भरेन, ह्मणून इकडेतिकडे लपत असत. ती सर्व आठवण मला या वेळीं झाली.

संध्याकाळीं चहा वगैरे घेऊन आह्मी हॉटेलच्या पुढें व्हरांड्यांत बसलों होतों. इतक्यांत इन्स्पिरेशन पॉइंटकडे गेलेली कोच आली. तिच्यामधून ह्मातारी बाई व तिची मुलगी या दोघीहि गेल्या होत्या. ह्मातारी बाई एक मोठा उसासा टाकून गाडीच्या खालीं उतरली, व तिनें पिशवींतून

चट्दिशीं एक डॉलर काढून ड्रायव्हरच्या हातीं दिला. म्हातारीचें तोंड जरा रागावल्यासारखें व कांहींसें भ्याल्यासारखें दिसत होतें. थोड्या वेळानें हात व तोंड धुऊन ती आमच्याजवळ येऊन बसली, व म्हणूं लागली " त्या डोंगरावर कांहींसुद्धां पहाण्यासारखें नाहीं. तुम्ही काल सांगितलें, कीं, ती जागा फार रमणीय आहे. म्हणून मी आपल्या मुलीला घेऊन गेलें. पण तो भयंकर रस्ता पाहून मला फार भीति वाटूं लागली. उगीच हे लोक भलत्याच जागीं लोकांनां नेतात. अशा जागीं जर अपघात झाला, तर एक मनुष्यसुद्धां वांचणार नाहीं. " एकंदरींत म्हातारीला त्या अरुंद व अवघड रस्त्यानें फार भीति वाटली, असें दिसलें.

म्हातारी पुढें म्हणाली "तीं मोठीं झाडें पहावयाला जाण्याचीहि माझी इच्छा नाहीं. एक तर तिकडे गेलें म्हणजे दोनतीन दिवस मोडतील. तिकडे थंडी पण फार असते, व मुलीची प्रकृतीहि चांगली नाहीं. परंतु तिच्या मनांतून तिकडे जावयाचें फार आहे. तेव्हां तिला निराश करणेंहि मला बरें वाटत नाहीं, व अशा जागीं तिला नेऊन तिची प्रकृति बिघडविणेंहि ठीक वाटत नाहीं. आतां रात्रीं जेवण झाल्यावर एकटी बसून याचा पुष्कळ विचार करीन व मग त्याप्रमाणें बेत ठरवीन. माझ्या आईनें मला असेंच सांगितलें आहे, कीं, जर आपल्याला कोणच्याहि गोष्टीविषयीं निश्चय करावयाचा असेल, तर रात्रीं एकटें बसून विचार करावा, व मग काय तो निश्चय ठरवावा ?"

अशा रीतीनें ही बाई मोकळ्या मनानें आमच्याशीं बोलत असे. ती फार साध्या स्वभावाची व मायाळू होती.

संध्याकाळीं आम्ही येथील मूळचे रहिवासी रेड इंडियन्स् यांच्या रहाण्याच्या कांहीं जागा पाहिल्या. हे लोक आतां येथें फारच थोडे राहिले आहेत. हे शरीरानें चांगले मजबूत असून रंगानें जरा लालसर आहेत, व दिसण्यांत ओबडधोबड आहेत.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं आह्मी लंच घेऊन निघालों व संध्याकाळीं पांच वाजतां एल. पोर्टल येथें आलों. येथें जेवण वगैरे आटोपून आठांच्या गाडीनें निघालों, तीं सकाळीं सहा वाजतां सान्फ्रान्सिस्कोला आलों. येथें दुपारीं कांहीं बूट, मोजे, गरम कपडे वगैरेंची खरेदी केली. येथील दुकानांतून व्यवस्था व स्वच्छता फारच चांगली असते,व ज्या दुकानांत जावें, त्या दुकानांत गिऱ्हाइकांची अगदीं गर्दी असते. जोड्यांच्या दुकानांत जागजागीं गिऱ्हाइकांकरितां दहादहा, बाराबारा खुर्च्या ओळीनें ठेवलेल्या असतात, व प्रत्येक खुर्चीच्या पुढें एकएक स्टूल ठेवलेला असतो, व पांचसहा मनुष्यें खिशांत शूस्लिप्ट, बटणें, हुक्स् वगैरे घेऊन तयार असतात. गिऱ्हाइक गरीब असो वा श्रीमंत असो, लहान मुली असोत अथवा मोठ्या बायका असोत, दुकानांतील मनुष्यें सर्वांशीं फार अदबीनें वागतात. माझ्यासमोर दोघीतिघी बाया जोडे घेत होत्या, त्यांची गंमत मीं पाहिली. त्या बायांनीं पंचवीसएक जोडे घालून पाहिले असतील. हा घट्टच आहे, हा सईलच आहे, याचा रंगच चांगला नाहीं, याचें व्हार्निसच चांगलें नाहीं, असे करून कितीएक बुटांच्या पेट्या त्या मनुष्याकडून काढवल्या; परंतु तो जरासुद्धां त्रासला नाहीं, कीं, उद्धटपणानें किंवा मगरूरपणानें त्यांच्याशीं वागला नाहीं.

सान्फ्रान्सिस्कोहून रात्रीं जेवणानंतर सॉलट्लेक सिटीला जाण्याकरितां आह्मी निघालों. रात्रीच्या वेळीं येथें समुद्राचा देखावा अतिशय उत्तम दिसत होता. लहानलहान बोटी दिव्यांनीं दैदीप्यमान होऊन चोहोंकडे झपाट्यानें फिरत होत्या. त्यांतील दिव्यांचीं किरणें समुद्राच्या पाण्यावर प्रतिबिंबित होऊन दूरपर्यंत चकाकत होतीं. या लहान बोटी येथें रात्रंदिवस चाललेल्या असतात.

आह्मी रेल्वेस्टेशनावर आलों, तेव्हां तेथें ट्रेन तयार होती. वेस्टर्न पॅसिफिक नांवाची रेलवे लाईन नुकतीच उघडली गेली होती

व रेल्वेचे ऑफिसर लोक ह्मणाले, कीं, या गाडीच्या पहिल्या क्लासचें तिकिट तुह्मांलाच पहिल्यानें दिलें.

आमच्या डब्यांतील पोर्टर एक नीग्रो तरुण होता. हा फार गरीब मुलगा दिसला. हा चिकागोमध्यें डॉक्टरीचा अभ्यास करीत होता, असें त्याच्या सांगण्यावरून समजलें. तो ह्मणाला "सुटी असली, ह्मणजे अपाण पोर्टरची वगैरे कसली तरी नोकरी करितों,व त्या पैशांनीं आपला अभ्यास चालवितों. डॉक्टरची परीक्षा पास झाल्यावर माझा हिंदुस्तानला जाण्याचा विचार आहे. हिंदुस्तानांतील लोक मला चांगल्या रीतीनें वागवितील कीं नाहीं ? मला तेथें चांगले पैसे मिळतील काय ?"

यांनीं त्याला सांगितलें "तुझी हिंदुस्तानला येण्याची इच्छा आहे, तर जरूर ये. कारण, हिंदुस्तानांत चांगल्या डॉक्टराची जरूरी आहे. तुझ्या हुषारीप्रमाणें तुला पैसेहि मिळतील. हिंदुस्तानांत काळे, गोरे सर्व तऱ्हेचे लोक आहेत. तेव्हां तेथील लोक तुझ्याशीं कांहीं भेदभाव ठेवणार नाहींत."


मग त्यानें आपल्या नीग्रोज् लोकांविषयीं बरीच हकीगत आह्मांला सांगितली, व तो स्वतः किती गरीबींत व किती त्रासांत येथपर्यंत शिकला, तें सर्व सांगितलें. यांनीं शिक्षणाकरितां त्याला कांहीं पैसे बक्षिस दिले आणि तेथील कांहीं गृहस्थांनींहि त्याला मदत केली. अशा तऱ्हेनें त्याला बरेच पैसे मिळाले.

या नव्या लायनीनें कांहींच मनोरम देखावा नाहीं. जिकडे पहावें तिकडे बर्फानें आच्छादलेले रुक्ष डोंगर दिसत होते. झाडाझुडपांचें कोठें नांवसुद्धां नव्हतें. डोंगरांतील खडकांचे रंग मात्र अनेक तऱ्हेचे चित्रविचित्र दिसत होते. या खडकांच्या स्वाभाविक रीतीनें असंख्य तऱ्हेच्या आकृति झालेल्या होत्या, व आब्झर्वेशन कारमध्यें बसलें ह्मणजे जेथपर्यंत दृष्टि पोहोंचेल,तेथपर्यंत हा डोंगरी प्रदेश फार विलक्षण दिसतो. अमेरिकेंत लोक

येथील चित्रविचित्र दगडांचे दागिने करितात. हे दागिने ट्रेनमधील कांहीं ऑफिसर लोकांजवळ विक्रीकरितां ठेवलेले होते. त्या लोकांनीं गोडगोड गोष्टी बोलून आमच्याहि गळ्यांत कांहीं दागिने बांधले.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं सॉट्लेक सिटीला आह्मी पोहोंचलों. सॉट्लेक सिटी हें मारमन पंथी लोकांचें मुख्य शहर आहे. या शहराची रचना फार सुंदर आहे. ज्या सडकेनें जावें, त्या सडकेनें घरें एकसारखीं व नीटनेटकीं बांधलेलीं असून प्रत्येक घराच्या पुढें सुंदर बाग आहे, व सडका चांगल्या विस्तीर्ण असून स्वच्छ आहेत. येथें पहाण्याजोगीं स्थळें दोन आहेत. एक खाऱ्या पाण्याचें तळें, व दुसरें मारमन पंथी लोकांचें मुख्य देऊळ. हें देऊळ फार मोठें व चांगलें भव्य आहे. याच्या सभोंवतालीं सुंदर बाग, व जागजागीं सुंदर, स्वच्छ पाण्याचीं रमणीय कारंजीं आहेत. यांशिवाय लोकांनां पाणी पिण्याकरितां लहानलहान कारंजीं केलेलीं आहेत. या कारंज्यांकरितां लहानलहान दगडी चबुत्रे बांधलेले आहेत. त्या चबुत्र्यांच्या भोंवतालीं कांचेचे ग्लास पक्के बसविलेले असून, त्या खालून पाणी ग्लासांत येण्याची योजना केलेली आहे. सर्व लोक त्या लहानशा फवाऱ्याला तोंड लावून तें पाणी पितात. हें पाणी चांगलें थंड व गोड लागतें. उन्हाळ्यांत तर तें अमृतासारखें लागतें.

या देवळांत पांच हजार लोकांनां बसण्याची जागा आहे. येथें रोज दुपारीं बारा वाजतां छोटी प्रार्थना होते. त्या प्रसंगीं येथील आर्गन वाजवितात. येथील आर्गनिस्ट सर्व जगांत पहिल्या नंबरचा आहे, अशी आख्या आहे. हें सुमारें अर्धा तास वाजवितात. आह्मांला या वाद्याची कांहींच माहिती नव्हती, तरी त्याचे मधुर आलाप कानांला फार गोड लागत होते. तो मोठा हॉल त्या वाद्याच्या मधुर ध्वनीनें अगदीं दुमदुमून गेला होता. सर्व प्रेक्षकसमाज अगदीं चित्रवत् बसला होता. ही प्रार्थना संपल्यावर आह्मी थोडा वेळ येथील बागेमध्यें फिरलों, व मग



साल्टलेक सिटी येथील टॅबरनेकल.

923C

मोटारबसमध्यें बसून तेथील देखावे पहावयाला गेलों. ही मोटारबस आह्मां प्रवासी लोकांनीं अगदीं गच्च भरली होती. एक हांकणारा व एक माहिती सांगणारा असे दोन मनुष्य होते. माहिती सांगणारा मनुष्य तोंडाला मोठा थोरला पोंगाडा लावून त्याच्यांतून लोकांना घरांचीं, बागांचीं, सडकांचीं वगैरे नांवें सांगत होता. घरांची माहिती देत होता, ती मोठी मौजेची वाटत होती. "हें पिंवळें रंगविलेलें घर पहा; येथें चार वर्षांमागें एक गृहस्थ रहात होता, त्याला पंचवीस बायका होत्या. तें पांढरें घर पहा; तेथें एकजण रहात होता, त्याला तीस बायका होत्या." अशाचसारखी बरीच माहिती देत होता. येथील लोकांची पुष्कळ बायका करण्याची चाल आतां सरकारानें कायदे करून बरीच कमी केली आहे; तथापि त्या कायद्याची अजून पूर्ण बजावणी झाली नाहीं, असें कांहीं लोक ह्मणत होते.

दुपारीं चार वाजतां आह्मी येथून निघालों, तों दुसऱ्या दिवशीं सकाळीं सात वाजतां कालोराडोस्प्रिंगला पोहोंचलों.

## कालोराडोस्प्रिंग.

येथें आह्मी आलामो हॉटेलमध्यें उतरलों. हें गांव सहा हजार फूट उंचीवर आहे. येथें नेहमीं बरीच थंडी असते. हवाहि चांगली असते, असें ह्मणतात. कालोराडो गांव या हॉटेलपासून दोन मैलांवर आहे. हें गांव सोन्याच्या खाणींमुळें बरेंच प्रख्यात आहे, आणि त्यामुळें येथें बरीच श्रीमंत व्यापारी लोकांची वस्ति आहे.


ब्रेकफास्ट झाल्यावर आह्मीं एक घोड्याची गाडी ठरविली व तेथील प्रसिद्ध ठिकाणें पहावयाला गेलों. चिनक्यानन, ग्स्याटन पार्क, साउथ चिनक्यानन, सेव्हन् फॉल्स्, हेलन हॅन्ड, चीग्रेभ वगैरे स्थळें पाहून समिट बुलवार्ड व बेरक्रीक क्याननवरून खालीं आलों. नंतर कालोराडो शहरांतून परत हॉटेलांत आलों. रस्त्यानें पहाडी देखावा फार सुंदर

दिसत होता. सेव्हन् फॉल्स् येथें सात पायऱ्यांवरून पाणी खालीं येतें, ह्मणून याला सेव्हन् फॉल्स् ह्मणतात. ज्या एका उंच डोंगरावरून पाणी खालीं येतें, त्या डोंगराला पायऱ्यांसारखे सात कंगोरे आहेत. या सात कड्यांवरून पाणी खूप जोरानें खालीं येतें. तें पांढरें दुधासारखें दिसतें. येथें वर जाण्याकरितां एक चांगला लोखंडी जिना केला आहे. या जिन्यावर उभें राहून आह्मीं आपले फोटो घेतले. येथें रोडकीशीं दोन गाढवें ठेवलेलीं असतात व प्रेक्षक लोक आवडीनें या गाढवांवर बसून आपले फोटो काढवितात. या गाढवांनां इकडे 'बरो' ह्मणतात. येथील फोटोग्राफरनें आह्मांला पुष्कळ आग्रह केला, कीं, "तुह्मी दोघें गाढवांवर बसून आपले फोटो काढवा." परंतु त्या रोडक्या गाढवावर बसण्याची मला भीति वाटली. ह्मणून मीं तें नाकारलें.

मला हे ह्मणूं लागले "गाढवावर बसण्याचा चांगला सन्मान मिळत होता; परंतु तुमच्या नशिबीं नाहीं! पुन: असा योग येणार नाहीं!"

नंतर हेलन हॅन्डची समाधि पहाण्याला गेलों. या बाईला क्षयाची भावना झाल्यामुळें ही कालोराडोस्प्रिंगमध्यें येऊन राहिली होती. येथें असतांना या बाईनें पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं रमोना ही कादंबरी फार प्रख्यात आहे. ही बाई इ. स. १८८५ सालीं वारली, व तिच्या इच्छेनुरूप तिचें प्रेत इन्स्पिरेशन् पॉइंट येथें पुरलें. तिची आणखी अशी इच्छा होती, कीं, जर कोणी प्रेक्षक तिची कबर पहावयाला आले तर त्यांनीं दोन दगड तिच्या कबरेवर टाकावे, व त्यांपैकीं एक दगड आपल्याबरोबर स्मरणार्थ न्यावा. कांहींकांहीं विद्वान् मनुष्यांच्या कल्पना व आवडी विलक्षण असतात!

येथून साऊथ चिनक्याननकडे गेलों. इकडील रस्ता अगदीं अरुंद आहे. दोन्ही बाजूंनीं फार उंच उभे कडे आहेत. येथें उंचउंच डोंगरांशिवाय विशेष कांहीं पहाण्यासारखें नाहीं.



सेव्हनफाल्स येथें घेतलेला आमचा फोटो.

पुढें नॉर्थ चिनक्याननवरून समिट बुलवार्ड या सर्वांत उंच टोंका-कडे सडक गेली आहे. येथें एक लहान हॉटेल आहे. येथें सर्व प्रेक्षक लोकांच्या गाड्या अर्धापाऊण तास थांबतात. येथें आह्मीं लंच घेतली, व थोडा वेळ पायीं फिरून तेथील उपवनें व धबधबे पाहिले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उपाहार करून, मेसारोड नांवाच्या रस्त्यानें ग्लेनऐरीमधून विल्यमक्याननवर आलों. येथें थोडा वेळ इकडेतिकडे फिरून येथील वनशोभा पाहिली व तेथून प्रसिद्ध टेम्पल ड्राइव्हनें केव्ह आॅफ दि विंड्स येथें गेलों. ही गुहा एका मोठ्या डोंगरांत आहे. दरवाजा-वर तिकिटें घेऊन आह्मी आंत शिरलों. तेथील दोन माणसें आमच्या-बरोबर आलीं. त्यांनीं विजेचे दिवे लावून आंतील सर्व भाग आह्मांला दाखविले. आंत लहानमोठे व वांकडेतिकडे बोळ आहेत, व पावसाचें आणि बर्फाचें पाणी जिरून त्याच्या भिंतींनां वरच्या बाजूला अनेक तऱ्हेच्या सुंदर आकृति झाल्या आहेत. कोठें कमळाच्या फुलांसारख्या तर कोठें द्राक्षांच्या घडांसारख्या, कोठें शेवंतीच्या फुलांसारख्या तर कांहीं ठिकाणीं मनुष्यांच्या व जनावरांच्या तोंडासारख्या आकृति विजेच्या प्रकाशांत फार सुंदर दिसत होत्या.

नंतर आणखी कांहीं पहाडी जागा पाहून केव्ह ड्वेलर्स पहाण्याला गेलों. येथें रेड इंडिअन्स लोकांचीं घरें आहेत. हीं मुळचीं घरें नाहींत, तर लोकांनां दाखविण्याकरितां त्यांच्या घरांचे हुबेहूब नमुने केलेले आहेत. हे नमुने तयार करावयाला पुष्कळ खर्च आला, असें ह्मणतात. उत्तम कारागिरांकडून जुन्या घरांची मोजणी करून फोटो घेतले; कांहीं जुनी घरें विकत घेतलीं व तीं पाडून त्यांचें सामान येथें आणिलें व हुबेहूब नमुने तयार केले. ते इतके चांगले साधले आहेत, कीं, मुळांतील प्रत्येक भेग, पाण्याचे डाग व इतर सर्व खाणाखुणा अगदीं हुबेहूब दिसत आहेत.

जवळच एक म्युझियम असून, त्यांत रेड् इंडियन्स् लोकांच्या १४० वस्तु ठेविल्या आहेत. यांत मातीचीं भांडीं, दगडांचीं व हाडांचीं हत्यारें, गवताच्या व बासाच्या विणलेल्या टोपल्या वगैरे पुष्कळ वस्तु ठेविल्या आहेत. ग्रीष्मऋतूंत पुष्कळ इंडियन लोकांनां त्यांच्या गांवाहून येथें आणून ठेवितात. तेव्हां प्रेक्षकांनां त्यांनां पहाण्याची व त्यांच्याकडून तयार करविलेल्या अनेक वस्तु विकत घेण्याची संधि मिळते. येथून जुन्या इंडियन वाटेनें गार्डन् ऑफ् दि गॉड्सूकडे गेलों. येथें कांहींच पहाण्यासारखें नाहीं, व गार्डन् हें नांव तर या जागेला अगदींच शोभत नाहीं. कारण, येथें कसलींहि झाडेंझुडपें नाहींत, अथवा हिरवें गवत-सुद्धां नाहीं. जिकडे पहावें तिकडे रुक्ष खडक, डोंगर आणि वाळू हेंच होतें. मग अशा जागेला 'देवांचा बगीचा' असें नांव कोणत्या हेतूनें दिलें असेल, कोण जाणे ! येथील पुष्कळ लोक आह्मांला ह्मणत होते, कीं, तुह्मी गार्डन् ऑफ् दि गॉड्स् पहाण्याला जरूर जा. ती फार पहाण्या-सारखी जागा आहे. परंतु आह्मांला तर येथें जाऊन असें वाटूं लागलें, कीं, नांव मोठें व दर्शन खोटें, अशांतली ही जागा आहे ! येथें दगडांवांचून दुसरें कांहींहि नव्हतें. येथें त्याच दगडांच्या वस्तूंचीं चार-पांच दुकानें मात्र होतीं. त्या वस्तुमात्र चांगल्या सुबक केलेल्या होत्या. कांहीं मुलांचीं खेळणीं, फ्लॉवर पॉटस् व तबकें वगैरे होतीं.

येथून जवळच क्रिपलक्रीक येथें सोन्याच्या खाणी आहेत. १९१० मध्यें या खाणींतून दोन कोटी वीस लक्ष डॉलर किंमतीचें सोनें काढलें असें ह्मणतात. या खाणी पहाण्याला आंत जाऊं देत नाहींत, व त्या वेळीं खाणीचें कामहि बंद होतें.

येथील आणखी एक पहाण्याजोगी जागा पाइलपीक पर्वत ही आहे; परंतु या वेळीं येथें फार बर्फ असल्यामुळें रस्ता बंद होता. येथें वरपर्यंत जाण्याला लहान रेल्वे नेली आहे. पर्वताच्या माथ्यावर पुष्कळ बर्फ असल्यामुळें ट्रेन अर्ध्या रस्त्यापर्यंतच जात होती. तरीहि पुष्कळ लोक

जातच असत. या रेल्वेनें डोंगराची शोभा व पाण्याचे धबधबे फार सुंदर दिसतात.

तारीख १७ मे १९११ रोजीं सकाळीं सव्वानऊ वाजतां आह्मी कालोराडोस्प्रिंगहून चिकागोला जाण्याला निघालों. नेहमींप्रमाणें ट्रेन-मध्यें पुष्कळ गर्दी होती. इतक्या पुष्कळ लोकांकरितां डायनिंग कार एकच असल्यामुळें रात्रीं व दिवसाच्या जेवणाच्या दोनतीन पंक्ति होत असत.

## चिकागो.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं अडीच वाजतां आह्मी चिकागोला पोहोंचलों. येथील रेल्वे स्टेशन फार मोठें असून जागजागीं खालींवर येण्याजाण्या-करितां लिफ्टचा उपयोग केला आहे. इतर कोणत्याहि गाडीपेक्षां जिकडे-तिकडे मोटारगाड्याच फार दिसत होत्या. नंतर भाड्यानें मोटार करून आह्मी आडिटोरिअम ऑनेक्स् हॉटेलमध्यें गेलों. हें हॉटेल फार मोठें आहे, व यांतील पब्लिक रूम्स् फार उत्तम आहेत. हॉटेलमध्यें टिफनी-फाउंटन आहे. जवळ असलेल्या आडिटोरियम हॉटेलला जाण्याकरितां भुयारांतून रस्ता गेला आहे. हें भुयार पांढऱ्या संगमरवरी दगडाचें बांधिलेलें आहे. याच्यांतून जातांना हें भुयार असेल असें मुळींच वाटत नाहीं. कारण, येथें रात्रंदिवस विजेच्या दिव्यांचा चकचकाट असतो, व चांगला गार वारा येत असल्यामुळें थंड वाटतें. हॉटेलच्यासमोर मिचिगन लेक आहे. या लेकच्यासभोंवतीं गवताचें हिरवें गार गालिच्या-सारखें नरम लॉन आहे. येथें लोकांनां बसण्याकरितां लोखंडी कोच ठेविले आहेत. संध्याकाळीं येथें बायकापुरुषांची खूप गर्दी असते.

चिकागो हें युनायटेड् स्टेट्स्मधील दुसऱ्या नंबरचें शहर असून सर्वांत मोठें रेल्वे सेंटर आहे. येथें धान्याचा व मांस वगैरेंचा फार मोठा व्यापार चालतो. या शहराच्यासभोंवतीं अनेक मोठमोठ्या आणि सुंदर पब्लिक पार्कचा वेढा आहे. हे पार्क लोकांच्या करमणुकीकरितां व

आरोग्याकरितां येथील सरकारनें केले आहेत. येथें श्रीमंत ज्यू लोकांची मोठी वस्ति आहे. हे लोक येथें व्यापारावर खूप धनाढ्य झाले असून पुष्कळ लोकोपयोगी कामांमध्यें नेहमीं सढळ हातानें द्रव्याची व शरीराची मदत करीत असतात.

दुसऱ्या दिवशी ब्रेकफास्टनंतर आह्मी मोटारमध्यें बसून फिरावयाला गेलों, व तेथील पार्क्स, म्युझियम, तळीं वगैरे पाहिलीं. मोटारवाल्यानें आह्मांला गुरांचा बाजार पहाण्याला नेलें. हा गुरांचा बाजार पहाणें आह्मांला बरें वाटलें नाहीं; परंतु येथील ही एक पहाण्याची बाब आहे. हा गुरांचा बाजार फार मोठा आहे व जवळच एका इमारतींत यंत्रानें गुरें मारण्याची व चामडें वगैरे काढण्याची व्यवस्था आहे. या बाजाराचा विस्तार पांचशें एकर आहे. पंचाहत्तर हजार गुरें, तीन लक्ष डुकरें, पन्नास हजार मेंढरें आणि पन्नास हजार घोडे रहाण्याची यांत सोय आहे. येथील पॅकिंगहाऊसेस्‌मध्यें पंचवीस हजार मजूर काम करीत असतात. दरवर्षीं येथें तीनशें वीस मिलियन डॉलर्सचा माल तयार होतो. याच शहरांत पुलमन कंपनीचा मोठा कारखाना आहे. या कारखान्यांत दरवर्षीं बारातेरा हजार रेल्वेच्या गाड्या तयार होतात. कारखान्यांत काम करणाऱ्या मजूर लोकांकरितां जवळच एक लहानसें नमुनेदार व सर्व सोयींचें शहर वसलें आहे. येथें मजूर लोकांच्या मुलांकरितां शाळा, व बायकांपुरुषांकरितां रात्रीच्या शाळा, बायकांकरितां स्वयंपाक शिकविण्याचे वर्ग, शिवणकामाचे वर्ग, स्त्रीपुरुषांकरितां क्लब, हॉस्पिटलें, पार्क वगैरे सर्व व्यवस्था काळजीपूर्वक केली आहे.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं हे सिटी क्लबमध्यें लंच घेण्याला गेले. तेथें लंचनंतर मि. आडमूस यांचें टाऊन प्लॅनिंगवर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं शहरांची आणि घरांची रचना कशी असावी, कोणत्या दिशेला खिडक्या असाव्या, दरवाजे कोणत्या दिशेकडे असावे, घराचें तोंड कोणत्या दिशेकडे असावें, घराची उंची किती असावी, या सर्व गोष्टींची

चांगली माहिती दिली. अमेरिकन लोकांचे नेहमीं कांहीं तरी उद्योग आणि खटपटी चाललेल्या असतात. चार मित्रमंडळी एका ठिकाणीं जमली ह्मणजे भाषणें, व्याख्यानें यांच्या योगानें कांहीं तरी माहिती परस्परांनां द्यावयाची, अशी अमेरिकन लोकांची चाल आहे.

याच दिवशीं संध्याकाळीं आह्मांला मिस् आडम्सकडील जेवणाचें आमंत्रण होतें. मिस् आडम्स ही बाई चिकागोमध्यें फार प्रसिद्ध आहे. मिस् लेथराप यांनीं या बाईला पत्र दिलें होतें; तें आह्मीं पोस्टानें त्यांच्याकडे पाठविलें, व मिस् लेथरापहि त्याच दिवशीं चिकागोला आल्या होत्या, व त्या मिस् आडम्सकडेच उतरल्या होत्या. मिस् लेथराप बोटीवर आमच्याशीं फारच प्रेमानें वागत असत. त्यांचाआमचा स्नेहहि चांगला जुळला होता. आज त्यांची भेट होणार, ह्मणून आह्मांला फार आनंद झाला होता.

संध्याकाळीं सात वाजतां आह्मी हॉलहौस येथें गेलों. येथें मिस् आडम्सनीं आमचें चांगलें स्वागत केलें, व ड्रॉइंगरूममध्यें नेऊन तेथें आणखी कांहीं मंडळी जमली होती, त्यांच्याशीं आमची ओळख करून दिली. पाहुणेमंडळी दहाबारा होती. त्यांपैकीं कांहीं ज्यू लोक होते.

या हॉलहौसच्या एका भागांत बोर्डर्स रहातात व दुसऱ्या भागांत गरीब स्त्रीपुरुषांकरितां कांहीं करमणुकीच्या, कांहीं व्यायामाच्या अशा जागा केल्या आहेत. हे लोक दिवसभर पोटाकरितां हमालीचे वगैरे धंदे करितात व संध्याकाळीं दोनतीन तास येथें येऊन कांहीं करमणुकीचे खेळ व वाचन वगैरे करून चांगल्या लोकांच्या सहवासांत वेळ घालवितात. येथें बायकांकरितां शिवणकामाचे व स्वयंपाकाचे वर्ग आहेत. या हॉलहौसची मुख्य चालक मिस् आडम्स ही आहे. या बाईनें आपलें सर्व आयुष्य या संस्थेची भरभराट करण्याकडे लाविलें आहे. या सत्कृत्यानें हिनें पुष्कळ गरीब स्त्रीपुरुषांचा फायदा केला आहे, व त्यांनां वाईट मार्गापासून परावृत्त केलें आहे. अशा तऱ्हेच्या लहानमोठ्या

संस्था अमेरिकेमध्यें पुष्कळ आहेत, व त्यांच्या चालक बहुतकरून स्त्रियाच आहेत. अशा रीतीनें आपलें आयुष्य परोपकारीं लावणें, हें अमेरिकन बायकांनां खरोखर भूषणप्रद आहे.

जेवावयाला आह्मी सर्व मिळून दहाबाराजणें होतों. जेवणाचें टेबल वगैरे सर्व सामान अगदीं साधें होतें. इंग्लिश लोकांसारखें उंची व डामडौलाचें नव्हतें. तसेंच जेवणाचे पदार्थहि साधे, परंतु चांगले होते. सर्व पदार्थ व्हेजिटेबलचे होते. चांगले ताजे हिरवे वाटाणे, कोबी, बटाटे, फळें, दूध वगैरे पदार्थ होते. सर्व पदार्थ भांड्यांत घालून नोकर यजमानीणबाईच्याजवळ आणून देत होते, व मग ती आपल्या हातानें ते पदार्थ सर्वांच्या प्लेटमधून वाढीत होती. वाढणाऱ्या दोघी मुली, व एक तरुण वीसबावीस वर्षांचा मुलगा होता. मिस् लेथराप यांनीं त्या मुलाशीं शेकहॅन्ड केला व जेवतांना आह्मांला त्याची माहिती सांगितली. त्या ह्मणाल्या "हा मुलगा एका लॉर्डाचा आहे. पण दुर्दैवानें याचा बाप मरण पावला, व याला कर्जाशिवाय कांहीं ठेविलें नाहीं. हा अगदीं लहान असतांनाच याची आई वारली, ह्मणून हा येथें येऊन राहिला आहे. हा येथें विद्याभ्यास करितो, व आपल्या खुषीनेंच कधीं कांहीं काम पडलें तर मदत करितो. तो मिस् आडम्स यांनां अतिशय पूज्य मानतो, व नेहमीं यांच्या उपयोगीं पडतो."

जेवणानंतर मिस् लेथराप यांनीं आह्मांला तेथील सर्व क्लासेस दाखविले. एका भागांत बायकांचे व दुसऱ्या भागांत पुरुषांचे क्लासेस आहेत. बायकांचे क्लासेस ह्मटले ह्मणजे शिवणकामाचे, कपडे धुण्याचे, स्वयंपाकाचे, चित्रें काढण्याचे, दुधदुभतें करण्याचे, गायनवादनाचे, भांडींकुंडीं व घरांतील इतर सामान स्वच्छ करण्याचे, मुलांची शुश्रूषा करण्याचे वगैरे. येथील व्यवस्थाहि फार अनुकरणीय आहे.

पुरुषांचे क्लासेस शारीरिक व्यायामाकरितां अनेक तऱ्हेचे खेळ, रीडिंगरूम, लायब्ररी, साधारण सुतारकाम, जोडे शिवणें, वाद्यें वगैरे

वाजविणें, असे बऱ्याच तऱ्हेचे आहेत. या क्लासेसमधून अनेक विद्वान् स्त्रीपुरुषांचीं उपयुक्त विषयांवर लेक्चरें होत असतात. हे सर्व क्लासेस पहातांपहातां माझे पाय दुखूं लागले. थोड्या वेळांत इतकें पहाणें ह्मणजे बरीच धांवपळ करावी लागते, व त्यामुळें चांगलें पहाणेंहि होत नाहीं. हें सर्व हॉलहौस पहाण्याला निदान तीनचार दिवस तरी पाहिजेत.

मग दहांच्या सुमाराला मिस् लेथराप यांनीं आह्मांला एका मोठ्या आटोमोबिल (मोटार कार)मध्यें बसवून चॉइल्ड वेलफेयर एक्झिबिशन पहाण्याला नेलें. मिस् आडम्स याच या एक्झिबिशनच्या सेक्रेटरी होत्या. ह्मणून आह्मांला त्यांच्याकडूनच पास मिळाले होते. येथें बायकापुरुषांची व मुलांचीं खूप गर्दी होती. परंतु सर्व एकमेकांशीं फार सभ्यतेनें वागत होते. एकमेकांला धक्के लागले, तरी रागावून शिव्या देत नव्हते, अथवा भांडाभांडी करीत नव्हते. उलट एकमेकांची माफी मागत होते. 'बेग युअर पार्डन !' अथवा 'आय् ॲम् सॉरी !' हेच शब्द कानीं येत होते.

मिस् लेथराप यांच्या येथें पुष्कळ ओळखी असाव्या, असें दिसलें. कारण, या एक्झिबिशनमध्यें कमींतकमी शंभर बायकांनीं त्यांचे मुके घेतले असतील. या हिंदुस्तान, जपान वगैरेंकडे फिरून नऊदहा महिन्यांनीं आजच चिकागोला आल्या होत्या. ह्मणून यांच्या ओळखीच्या ज्या बाया भेटल्या, त्या त्यांचे मुके घेत होत्या. मिस् लेथराप यांनीं तेथें पुष्कळ बायांशीं व पुरुषांशीं आमच्या ओळखी करून दिल्या, व त्यांपैकीं कांहीं बायांनीं आह्मांला जेवणाला व चहाला आमंत्रणें केलीं; पण दुसऱ्याच दिवशीं आह्मांला चिकागो शहर सोडावयाचें होतें, ह्मणून त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करतां आला नाहीं. त्या बाया आह्मांला ह्मणूं लागल्या "तुह्मी इतक्या दुरून अमेरिका पहाण्याला आलां, व चिकागो शहरांत एक महिनापंधरा दिवस देखील

रहात नाहीं, तर तुह्मांला आह्मां अमेरिकन लोकांच्या ओळखी कशा होणार, व आमच्या चालीरीति आणि उद्योगधंदे वगैरेंची माहिती कशी होणार?"

हें त्यांचें ह्मणणें खरें होतें; पण आह्मांला दिवस मोडता येत नव्हते.

या एक्झिबिशनमध्यें बालशुश्रूषेसंबंधानें सर्व माहिती दाखविली होती. लहान मुलांनां कोणकोणते रोग होतात, व त्यांवर काय उपाय केले पाहिजेत, गाईचें दूध त्यांनां कसें पाजावें, गाईच्या दुधांत कोणतीं रोगबीजें असतात, व ते रोग मुलांनां कसे जडतात, वगैरे माहितीकरितां गायींचीं चित्रें दाखविलीं होतीं, व दुधांतील अनेक तऱ्हेच्या कृमींचींहि चित्रें दाखविलीं होतीं.

नंतर, जेथें चांगल्या निरोगी गायींचें दूध घेऊन तें यंत्रानें शुद्ध करून त्याचे डबे तयार करून गरीब लोकांनां फुकट देतात, त्यांचीं दुकानें शहरांत कोठें आहेत, वगैरे माहिती दिली होती, व तीं यंत्रेंहि लोकांनां दाखविण्याकरितां ठेविलीं होतीं.

तसेंच शहरामध्यें मुलांचीं हॉस्पिटलें कोठेंकोठें आहेत, दवाखाने कोठें आहेत, व तेथील व्यवस्था कशी असते, ही सर्व माहिती चित्रांच्या रूपानें दिली होती. हॉस्पिटलमध्यें नर्सेस मुलांची कशी काळजी घेतात, तेंहि दाखविलें होतें. एकाचा रोग दुसऱ्याला लागूं नये, ह्मणून प्रत्येक मुलाचें थर्मामिटरसुद्धां वेगवेगळें असतें, औषधांचे ग्लास, कपडे वगैरे अगदीं वेगळे असतात, एकाचा दुसऱ्याला स्पर्शसुद्धां होऊं द्यावयाचा नाहीं. सकाळच्या प्रहरीं कोवळें ऊन पडलें, ह्मणजे सुंदर जाळीदार वेताच्या पाळण्यासारख्या टोपल्यांतून, नरम, स्वच्छ उशा व पांढरे कपडे वगैरे घालून, त्यांत मुलें निजवून त्या टोपल्या कोवळ्या उन्हांत ठेवावयाच्या; ह्मणजे मुलांनां सकाळची ताजी स्वच्छ हवा व कोवळें ऊन मिळतें, आणि त्यामुळें त्यांच्या प्रकृतीला चांगला फायदा होतो. याला sun-baths ह्मणतात; अशा प्रकारच्या हॉस्पिटलाचींहि चित्रें दाखविलीं

होतीं. मिस् लेथराप ह्मणाल्या "तुह्मांला वेळ नाहीं; नाहीं तर हीं हॉस्पिटलें तुह्मांला नेऊन दाखविलीं असतीं. तीं फार व्यवस्थेशीर व पहाण्यालायक आहेत."

येथील एका प्रसिद्ध डॉक्टरानें आह्मांला चोहींकडे फिरवून बरीच माहिती दिली. कांहीं मुलें अशीं जन्मतात, कीं, त्यांचे हातपाय वांकडेतिकडे असतात; कोणाचे ओंठ पुढें चिरलेले असतात. अशा मुलांकरितां हॉस्पिटलें आहेत. तेथें अशीं मुलें पाठविलीं, ह्मणजे हुषार डॉक्टर लोक त्यांचें ऑपरेशन करून कांहीं इजा होऊं न देतां मुलांनां चांगले करतात. ज्यांचे ओंठ चिरले असतील, ते शिवून जोडून अगदीं बेमालूम काम करितात. अशीं मुलें पूर्वीं कशीं होतीं, व पुढें कशीं सुधारलीं, तीं सर्व चित्रें येथें दाखविलीं होतीं.

मुलें मोठीं झाल्यावर, त्यांनां काय शिक्षण दिलें जातें, व त्याची शहरामध्यें कोठें व्यवस्था केली आहे, याची तेथें सविस्तर माहिती दिली होती.

अशा तऱ्हेनें मुलांनां व मुलींनां सर्व प्रकारें चांगलें शिक्षण देऊन, त्यांनां पुढें उपयोगी व प्रामाणिक नागरिक करण्याकरितां शहरांत कायकाय योजना केली आहे, व यासंबंधीं कोणकोणत्या संस्था कोठेंकोठें आहेत, याची येथें त्रोटक माहिती दिली होती.

डॉक्टर ह्मणाले "अशा एक्झिबिशनपासून लोकांनां पुष्कळ फायदा होतो. कारण, एवढ्या मोठ्या शहराची सर्वांनां माहिती मिळणें फार कठीण असतें; परंतु येथें आल्यावर सर्व माहिती मिळते व पुढें कोणत्याहि गोष्टीची अडचण पडत नाहीं."

मग एका मोठ्या हॉलमध्यें एका डॉक्टरनें मुलांच्या शुश्रूषेसंबंधानें अर्धा तास लेक्चर दिलें. लेक्चर झाल्यावर आह्मी ट्रॅम्वेनें हॉटेलमध्यें परत गेलों.

या हॉटेलच्या ड्राइंगरूममध्येंहि सकाळीं आणि विशेषत: संध्याकाळीं अमेरिकन बायकांची खूप गर्दी असे. मी तेथें बसलें असलें, ह्मणजे

कांहीं बायका माझ्याजवळ येऊन बसत असत, व हिंदुस्तानाविषयीं माहिती विचारीत असत. एक पोक्त वयाची बाई मजजवळ बराच वेळ बोलत बसली होती. ती ह्मणाली "माझा नवरा निवर्तल्याला सहा महिने झाले. तो येथें व्यापारी होता. आमचा दोघांचा हिंदुस्तान पहावयाला जाण्याचा विचार होता. परंतु दुर्दैवानें माझा नवरा एकाएकीं वारला व माझ्या सर्व आशा निष्फळ झाल्या." असें ह्मणून बिचारी रडूं लागली."

मीं तिला विचारलें "तुह्मांला कांहीं मुलेंबाळें नाहींत काय ?"

त्यावर ती ह्मणाली "तिघे मुलगे आहेत; ते आतां मोठे झाल्यामुळें लग्नें वगैरे करून वेगळे राहिले आहेत."

ती पुढें ह्मणाली "आपणां बायकांनां नवऱ्यासारखा सोबती दुसरा कोणीहि नाहीं. मुलेंबाळें झालीं, तरी त्यांच्यावर आपली तरी सत्ताहि चालत नाहीं. You lose husband, you lose every-thing!" असें ह्मणून पुनः रडूं लागली. तिचें दुःख पाहून मला फार वाईट वाटलें. तिला काय ह्मणावें व कसें समजवावें, तेंच मला सुचेना. मलाहि तिच्याबरोबर रडूं येऊं लागलें.

थोडी शांत होऊन ती पुढें ह्मणाली "तुह्मीच पहा बरें, तुह्मी किती दूर आपल्या नवऱ्याच्याबरोबर आलांत ! तुमचा नवरा तुमच्याबरोबर आहे, ह्मणून तुह्मांला कसलीहि भीति वाटत नाहीं. You look as happy as day-light. आमचेंहि तुमच्यासारखेंच आनंदी व सुखी जोडपें होतें."

मीं त्या बाईला ह्मणालें "जर तुमच्या मनांत हिंदुस्तानांत जावयाचें आहे, तर आतां कां जात नाहीं ? तुमच्या नवऱ्यानें तर तुह्मांला पुरेसा पैसा ठेवलाच असेल. तुह्मी अमेरिकन बाया चांगल्या शिकलेल्या असतां. ह्मणून तुह्मांला एकटें कोठेंहि जाण्याची अडचण किंवा भीति नसते.

आजकाल शेंकडों यूरोपियन बायका जातयेत आहेत, व जिकडेतिकडे प्रवासाच्या सोयीहि चांगल्या झाल्या आहेत."

ती बाई ह्मणाली "होय, तें खरें. जाणाऱ्या पुष्कळ जातात. पण मला आतां पहिल्यासारखा कांहीं हुरूप राहिला नाहीं. कारण, आह्मी दोघें जाणार होतों, आणि आतां मी एकटी गेलें, ह्मणजे मला घटकोघटकीं त्यांची आठवण येईल, व मनाला फार दुःख वाटेल. मग अशा जाण्यांत काय अर्थ आहे? त्यापेक्षां न जाणें हेंच बरें नव्हे काय?"

असो. अशाच तऱ्हेच्या या बाईच्या व माझ्या गोष्टी झाल्या. मग दहा वाजावयाच्या सुमाराला ती बाई आपल्या घरीं निघून गेली, व आह्मी मोटारबसमध्यें बसून फिरावयाला गेलों. इकडे रात्रीचे बाराएक वाजेपर्यंत बहुतकरून कोणी निजत नाहीं, व रात्रीचे एकदोन वाजे-पर्यंत हॉटेलांतून व रस्त्यानें गाड्याघोड्यांची व लोकांची जाण्यायेण्याची धामधूम चाललेली असते. त्यामुळें चांगली झोंप येण्याचाहि संभव नसतो.

रात्रीच्या वेळीं शहराची शोभा फार चांगली दिसत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं, उंचउंच घरांतून, दुकानांतून व हॉटेलांतून खालच्या मजल्यापासून तों अगदीं वरच्या टोंकापर्यंत विजेच्या दिव्यांचा लखलखाट दिसत होता, व दुकानाच्या खालच्या मजल्यांतून त्यांतील माल कांचेच्या खोल्यांतून विजेच्या दिव्यांच्या प्रकाशांत चमकत होता. व रस्त्यानें येणाऱ्याजाणाऱ्या लोकांचीं मनें आकर्षण करून घेत होता. अनेक तऱ्हेचें मौल्यवान जवाहीर, तऱ्हेतऱ्हेचे बूट, मोजे, चांदीचीं व मुलाम्याचीं भांडीं, कपडे वगैरे अनेक तऱ्हेचा माल ठेवला होता, तसेंच स्त्रीपुरुषांचे व मुलांमुलींचे हुबेहुब पुतळे सुंदर पोषाख करून मोठमोठ्या कांचेच्या दालनांतून मांडले होते. ते दिवसापेक्षां रात्रीं दिव्यांच्या प्रकाशांत जास्त मोहक दिसत होते. या पुतळ्यांचीं हंसरीं तोंडें व चमकणारे डोळे पाहून असें वाटे कीं, हे पुतळे जणूं कांहीं आपल्याला बोलावीतच आहेत, व ह्मणत आहेत, कीं, या दुकानांत

या, व आमच्यासारखे कपडे घ्या ! तसेंच अनेक तऱ्हेच्या जाहिराती विजेच्या प्रकाशांत जिकडेतिकडे उंचउंच ठिकाणीं चकाकत होत्या, त्यांचे हिरवे, पिवळे, लाल असे तऱ्हेतऱ्हेचे रंग सुंदर दिसत होते. ही सर्व रात्रीच्या वेळची शोभा पाहून, एकाच्या सुमाराला आह्मी हॉटेलांत परत गेलों. अजूनहि कांहीं लोक हॉटेलांत खातपीत होते, व ज्या मुली टेलिफोनच्या व हिशेब वगैरेच्या कामावर होत्या, त्या अजूनहि आपलें काम करीत होत्या. या तरुण मुली आपल्या कामामध्यें फार दक्ष असतात, व त्यांच्या वागण्याच्या चालीरीतीहि फार सभ्यपणाच्या असतात. लोक नेहमीं यांनां माहिती विचारीत असतात. अमका पार्क कुठें आहे, ती अमकी गाडी केव्हां निघते, त्या थिएटरचा रस्ता कोणीकडून आहे, असें कांहीं तरी विचारीत असतात. परंतु त्या सर्वांनां या मुली कांहीं त्रास न मानतां फार सभ्यपणानें माहिती देत असतात.

## नायगारा फॉल्स.

तारीख २३ मे १९११ रोजीं चिकागोहून संध्याकाळीं पांच वाजतां आह्मी निघालों, व दुसरे दिवशीं सकाळीं, नायगारा फालला येऊन पोहोंचलों. येथें क्रामटन हॉटेलमध्यें आह्मीं उतरलों होतों. हें हॉटेल साधारणच होतें. हॉटेलचें मालक दोघें नवराबायको होतीं. बायको जेवणाखाणाची वगैरे आंतील सर्व व्यवस्था पहात असे, व नवरा बाहेरच्या दाराजवळ बसून, रस्त्यानें येणाऱ्याजाणाऱ्या लोकांनां ब्रेकफास्ट करितां बोलावीत होता. "येथें या ! फार स्वस्तांत चांगली ब्रेकफास्ट मिळेल; एकदम या; अनमान करूं नका; एकदां अनुभव तर पहा ! अशा रीतीनें तो लोकांचीं मनें वळवीत होता. त्याचा कंठशोष पाहून लोकांनां त्याची दया आल्याचें दिसलें. कारण, थोड्याच वेळांत तो जेवणाचा दिवाणखाना स्त्रीपुरुषांनीं अगदीं गजबजून गेला. वरच्या बाईची व तिच्या हाताखालच्या वाढप्या मुलींची खाण्याचे पदार्थ पुर-

विण्याची धांदल उडून गेली. आह्मी दोघेंहि तेथील एका लहानशा टेबलावर ब्रेकफास्ट घेत होतों. हे मला ह्मणाले " पहा, बेट्यानें ओरडून-ओरडून, बरेच लोक जमा केले. मोठा हिकमती मनुष्य दिसतो. आपणहि पेन्शन घेतली ह्मणजे असाच एकादा रेस्टोरंट काढूं. मग मी दरवाज्यावर बसून लोकांनां बोलावीत जाईन, व आंतील व्यवस्था तुह्मी ठेवीत जा !"

मीं ह्मणालें " त्या बिचाऱ्याला कशाला हंसतां ? तो आपला लोकांनां बोलावीत आहे, कोणावर कांहीं जबरदस्ती करीत नाहीं, किंवा कोणाला फसवून त्याच्याजवळून पैसे काढीत नाहीं. खायलाहि कांहीं अगदींच वाईट देत नाहीं."


बहुतेक हें हॉटेल लहानशा रेस्टोरंटसारखेंच आहे. जेवणाचा दिवाणखाना काय तो जरा मोठा होता. बाकीच्या खोल्या अगदीं लहान होत्या. वरच्या मजल्यावर लहानलहान पांचसहा बेडरूम्स् होत्या. आह्मांला येथें सारा दिवसभर रहावयाचें होतें. रात्रीच्या गाडीनें आह्मी न्यूयॉर्कला जाणार होतों. तरी आह्मांला कपडे वगैरे बदलावयाला एक दिवसा-करितां एक खोली भाड्यानें घ्यावी लागली. हॉटेलवालाबुवा व बाई दोघेंहि चांगल्या स्वभावाचीं दिसलीं. बाईनें स्वतः येऊन आमच्या खोलीची व्यवस्था पाहिली, व स्नानाची वगैरे तजवीज लावली. मालकहि एक-दोन वेळां चवकशी करून गेला.

ब्रेकफास्ट झाल्यावर घोड्याच्या गाडींत बसून आह्मी नायगारा फॉल्स् पहावयाला गेलों. नायगारा नदी ही युनायटेड् स्टेट्स व कानडा यांची सीमा आहे. नायगारा फॉल्स् हे अमेरिकेंतील स्वाभाविक व मनाला थक्क करणारे आश्चर्यकारक देखावे आहेत. नायगारा नदी लेक-एरीमधून निघते, व छत्तीस मैलांवर लेक आंटोरायल येथें मिळते. हिच्या उगमापासून पंधरा मैलांवर रॅपिटस् सुरू होतात, व जेथें नायगारा फॉल्स् आहेत, तेथें नदीचे दोन प्रवाह होतात. उजवीकडचा अमेरिकन फॉल् १०६० फूट रुंद व १६७ फूट उंच आहे, व डावीकडे

कॅनेडिअन किंवा घोड्याच्या नाला ( हॉर्स शु ) च्या आकृतीचा फॉल आहे, त्याची उंची १५८ फूट आहे, व परीघ ३०१० फूट आहे. या फॉल्स्च्या खालीं नदी अरुंद अरुंद होते. पुढें उंच खडकांतून पाणी खूप जोरानें फेंसाळत, कढतकढत, भोंवरे व आवाज करीत वहातें. येथें नदीचा व फॉल्स्चा देखावा फार विलक्षण दिसतो. या सृष्टीमध्यें ईश्वरानें अनेक तऱ्हेच्या अद्भुत वस्तु निर्माण केल्या आहेत, त्या पाहून परमेश्वराच्या कृतीचें कौतुक वाटतें.

येथें नदीच्या दोन्ही बाजूंनीं ट्राम्वे केली आहे. या ट्राम्वेंत बसून फिरलें, ह्मणजे अर्ध्या तासांत एकंदर सर्व देखावा ठोकळ रीतीनें पहावयाला सांपडतो. पूर्ण ट्रिपचें एक दिवसाचें तिकीट मिळतें. या ट्रिपमधून येथील सर्व प्रेक्षणीय स्थळें दाखवितात, व वाटेंत प्रेक्षकांना इच्छा झाल्यास कोठेंहि उतरूं देतात. कारण, वाटेंत जागजागीं दऱ्या, टेंकड्या, पार्क, राई वगैरे स्थळें आहेत; तेथें कोणाची इच्छा असली, तर घटकाभर फिरून नदीची शोभा पहातात. मग दुसरी ट्राम आली, ह्मणजे तिच्यांत बसून पुढें जातात. या कंपनीच्या ट्राम्स् दहादहा मिनिटांनीं जातयेत असतात. ह्मणून लोकांना त्रास पडत नाहीं व फार वेळ वाट पहावी लागत नाहीं.

सर्व स्थळें चांगलीं सावकाश रीतीनें पहाणें असल्यास हॉटेलमधून सकाळीं घोड्याच्या गाडींतून निघावें. ह्मणजे पहिल्यानें प्रास्पेक्ट पार्कला नेतात. अर्थात्च या ट्रिपला पैसे थोडे जास्त द्यावे लागतात. हा पार्क अमेरिकन फॉल्शीं अगदीं गार्जच्या जवळ आहे. येथें प्रास्पेक्ट् पॉइंट्वर लोखंडी कठडा केलेला आहे. या कठड्याशीं उभे राहून पाहिलें, ह्मणजे अमेरिकन फॉल्सचा देखावा फारच उत्तम रीतीनें दिसतो. याच्याजवळच सुपरिंटेन्डेन्टचें ऑफिस आहे, व तेथून गार्ज (ह्मणजे फॉल्च्या खालची खडकांतील निमुळती जागा ) च्या तळाशीं जाण्याला रेल्वे केली आहे, व कोणाला पायीं जावयाचें असेल, तर जिनाहि केला आहे. तेथें गेलें,




नायगाराफॉल्स—आइस माउंटन.

ह्मणजे मेड ऑफ दि सिस् नांवाची बोट तयार असते. तींत बसवून Horse Shoe Fall पर्यंत नेतात.

प्रास्पेक्ट पॉइंटपासून गोट ऐलंड ब्रिज हा तीन मिनिटांच्या रस्त्यावर आहे. त्यावरून कानडाच्या बाजूकडे जातां येतें. या ब्रिजवरून कानडाचा देखावा चांगला दिसतो. पहिल्यानें तिकडील इलेक्ट्रिक स्टेशन्स् दिसतात. मग जसजसें पुढें जावें तसतशीं घरें, दुकानें, रस्ते वगैरे दिसतात. ही कानडाची बाजू फार सुरेख दिसते. इकडे घरांची व रस्त्यांची रचना फार कुशलतेनें केलेली आहे. रस्त्यानें जागजागीं सुंदर सुंदर झाडें लावलेलीं आहेत, व मधुनमधून पार्क्स केलेले आहेत. इकडे एक उष्ण पाण्याचा झरा आहे. या झऱ्याचें पाणी एका लोखंडी नळींत भरतात, व त्याला काडी पेटवून लावतात, ह्मणजे हें पाणी पेट घेतें, व त्यांतून हिरव्या, पिवळ्या, निळ्या, लाल अशा ज्वाळा निघतात.

मग आह्मीं तेथील कांहीं दुकानें पाहिलीं. या दुकानांतून येथील फॉल्सूच्या खालीं कांहीं सुंदर, चकचकीत दगड अथवा खडे मिळतात, त्याचे दागिने करून विक्रीकारितां ठेविलेले होते. हे दागिने, बॉचेस्, आंगठ्या, हातांतील बांगड्या, गळ्यांतील कंठे वगैरे होते. तेथें चामडें फार उत्तम कमावतात. त्याच्याहि जोडे, ब्याग, पेट्या अशा तऱ्हेच्या पुष्कळ वस्तु होत्या.

येथून आह्मां प्रेक्षकांनां घोड्याच्या गाडींत बसवून कॅन्लेडिअन फॉल्स्‌जवळ नेलें. येथें घोड्याच्या गाड्यांनां रजा देतात. आमचें तिकीट कुक कंपनीच्या मार्फत होतें, ह्मणून आह्मी त्यांच्या व्यवस्थेप्रमाणें जात होतों. बहुतकरून पुष्कळ लोक कुक कंपनीच्या मार्फतच जातात. कारण त्यांची व्यवस्था फार चांगली असते. जागजागीं त्यांचीं ऑफिसें आहेत. ते लोक प्रेक्षकांनां चांगली माहिती करून देतात, व जसा वेळ असेल त्याप्रमाणें सर्व दाखवितात. ह्मणून परकीय लोकांनां कांहीं त्रास होत नाहीं.

आमच्या टोळीमध्यें आह्मी कुकचे टुरिस्ट पंधरावीसजण होतों, व आमच्याबरोबर एक गाइड होता.

येथें एक लहानसें ऑफिस आहे. या ऑफिसांत आह्मां सर्वजणांनां आणून बसविलें, व सर्वांनां विचारलें, कीं, तुह्मां कोणाला खालीं भुयारांत जाण्याची इच्छा असेल, तर जा. परंतु आमच्यापैकीं फारच थोड्याजणांनीं भुयारांत जाण्याची इच्छा दाखविली. आह्मी दोघें, दोघी अमेरिकन बायका व आणखी दुसरे दोघेतिघे गृहस्थ असे जाण्याला तयार झालों. तेथें ऑफिसमध्यें दोन खोल्या होत्या. एक बायकांकरितां व एक पुरुषांकरितां. बायकांच्या खोलीमध्यें आह्मी दोघी-तिघी बायका गेलों. तेथें खुंट्यांनां बऱ्याचशा काळ्या मेणकापडी अशा बरसाद्या टांगल्या होत्या, व तेथें एक नोकर-मुलगी बसली होती. तिनें त्या बरसाद्या आह्मांला घातल्या, आणि डोकीला एक तशाच तऱ्हेचें टोपरें घातलें. माझें लुगडें खालीं लोळूं नये, ह्मणून त्याला वरती आटोपून शेवटीं एकदोन पिन्स् लावून दिल्या. दुसऱ्या बायकांचेहि पोषाख चांगले सांवरून दिले. या बरसाद्या घातल्यावर तेथील आरशा-मध्यें पाहिलें, तेव्हां आमच्या काळ्याकाळ्या आकृति फार विलक्षण दिसूं लागल्या. सर्व अंग, डोकें, कान, तोंड अगदीं झांकून गेलें होतें. नाक तेवढें उघडें होतें. मग तिकडून पुरुषमंडळीहि बरसाद्या चढवून आली. नंतर आह्मां सर्वांनां एका अंधाऱ्या लिफ्टमध्यें नेलें व खालीं भुयारांत नेऊन सोडलें. तेथें पाण्याकडील बाजूचे कडे उजेडाकरितां व फॉल्सचा देखावा पहाण्याकरितां एकदोन जागीं फोडले होते, व त्यांचीं खिडक्यांसारखीं चौकोनी भोंकें केलीं होतीं. त्या खिडक्यांतून एकसारखे पाण्याचे तुषार आंत खूप जोरानें येत होते, व वरूनहि पाणी सारखें झिरपत होतें. धबधब्याच्या पाण्याचा धाड्धाड् आवाज अगदीं कानठळ्या बसवीत होता. जिकडेतिकडे पाणीच पाणी असल्यामुळें अतीशय गारठा होता. आमच्या अंगावर

मेणकापडी बरसाद्या होत्या, ह्मणून बरें झालें; नाहीं तर त्या बर्फा-सारख्या पाण्यानें स्नान घडून हातपाय गारठले असते. येथें पहाण्या-सारखें कांहींच नव्हतें. परंतु जोंपर्यंत पाहिलें नव्हतें, तोंपर्यंत वाटे, कीं, खालीं काय आहे आणि काय नाहीं ! तथापि मनाला एवढेंच सामाधान वाटलें, कीं, आह्मी फॉल्च्या अगदीं तळाशीं भुयारांत गेलों होतों. या भुयारांत जाणें जरा धोक्याचें आहे, ह्मणून कांहीं लोक जाण्याला धजत नाहींत. एका वर्षामागें एक बाई येथून झेंप जाऊन पडली होती. परंतु येथील लोकांनीं लागल्याच खालीं उड्या टाकून तिला काढलें व तिचा जीव वांचविला. तेव्हांपासून येथें लोखंडी कठडे वगैरे लावून चांगली मजबुती केली आहे. येथें पाण्याला जोर फार असतो, ह्मणून येथील कडे घसरण्याची भीति असते. या भुयाराला केप ऑफ धि विंड्स असें ह्मणतात. येथून जवळच क्वीन व्हिक्टोरिया पार्क आहे. हा पार्क पाहिल्यावर ट्राम्वेंत बसून नदीच्या सभोंवतीं फिरलों; त्यामुळें नदीच्या दोन्ही बाजूंचा देखावा चांगला पहावयाला सांपडला.

संध्याकाळीं हॉटेलांत परत आलों, आणि जेवणखाण आटोपून न्यू-यार्कला जाण्याला निघालों.

## न्यूयार्क.

तारीख २९ मे १९११ रोजीं संध्याकाळच्या ट्रेननें आह्मी नायगारा फॉलस्हून न्यूयार्ककडे जाण्याला निघालों. आतां आमचा अमेरिकेचा प्रवास बराच संपत आला होता, व आतां केव्हां एकदां लंडनला जाणें होईल, असें वाटत होतें. मला तर रोजरोज फिरूनफिरून कंटाळा आल्यासारखें झालें होतें.

ट्रेनमध्यें नेहमींप्रमाणें बरीच गर्दी होती. परंतु आमचे बर्थ रिझर्व्ह केले होते, ह्मणून आह्मांला त्रास झाला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां ट्रेन न्यूयार्कला जाऊन पोहोंचली. दोन स्टेशनें अगोदरच ट्रेनचें एंजिन काढून घेतलें होतें.

कारण न्यूयार्कमध्यें धुराचीं एंजिनें नेण्याची मनाई आहे. ह्मणून आतां विजेचीं एंजिनें लाविलीं होतीं. या गाड्या फार लांब असल्यामुळें यांनीं नेहमीं दोन एंजिनें जोडलेलीं असतात.

येथें ट्रेन 'ग्रॅन्ड सेन्ट्रल स्टेशन' वर उभी राहिली, व येथें सर्व उतारू लोक उतरले. हें स्टेशन फारच मोठें आहे. बरेच जिने चढावे लागले; तेव्हां कोठें सडकेच्या जवळ गेलों. चालतांचालतां पाय दुखूं लागले. इकडील लोकांनां चालण्याफिरण्याची सवय असल्यामुळें त्यांनां त्याचें कांहींच वाटत नाहीं. ह्मातान्याकोतान्या बायकासुद्धां दडदड चालतात.

येथें हॉटेलचे लोक आलेच होते. त्यांनां टॅक्सी करून आह्मांला हॉटेलांत नेलें. हें इम्पीरिअल् हॉटेल येथील मोठ्या हॉटेलांपैकीं एक आहे. हें पंचवीस मजली असून मोठ्या रस्त्यावर आहे. याचा फार मोठा विस्तार आहे. याच्या खालच्या भागांत बरींच दुकानें व जागजागीं रेस्टोरंट्स् आहेत. आह्मांला येथें चवदाव्या मजल्यावर खोली मिळाली होती. इकडील हॉटेलमध्यें इतकी चांगली व्यवस्था असते, कीं, प्रत्येक खोलीला स्वतंत्र बाथरूम असते, व तेथें रात्रंदिवस गरम पाण्याचा नळ तयार असतो. वाटेल तेव्हां स्नान करावें. थंड पाणी व ऊन पाणी नळांत भरलेलेंच असतें. खोलीभर जिकडेतिकडे विजेचे दिवे असतात. खोलीची देखरेख करण्याकरितां एक बाई नोकर असते. ती बिछाने वगैरे करून देते. तिच्या हाताखालीं आणखी एक बाई असते. ती झाड लोट करणें, जोडे पुसणें, तोंड धुवावयाचीं भांडीं साफ करणें, बाथ-रूम धुणें, वगैरे कामें करिते. खोली अगदीं स्वच्छ ठेवितात. बाथरूम-मध्यें रोज साबणाच्या नव्या वड्या आणून ठेवावयाच्या व सकाळ-संध्याकाळ टॉवेल बदलावयाचे. बिछान्यावरील पलंगपोस, गाद्या, उशा सर्व अगदीं साफ व नीटनेटकें ठेवावयाचें, अशी येथील व्यवस्था असते.

आमच्या खोलीचे रोजचे तीन डॉलर आह्मांला भाड्याबद्दल द्यावे लागत होते. जेवणाचे व चहाचे वगैरे पैसे वेगळेच द्यावे लागत

असत. जेवणाकरितां तीन दिवाणखाने होते. उत्तम, मध्यम व कनिष्ठ. आपल्याला जसें जेवण पाहिजे असेल तशा जागीं जावें, व त्याप्रमाणें पैसे द्यावे. अर्थात्च उत्तम दिवाणखान्यांत सर्व उत्तम असावयाचें. बिछाईत उत्तम, लाइट उत्तम, खाण्यापिण्याचे पदार्थ उत्तम, सर्व कांहीं चांगलेंच असावयाचें. पैसे उत्तम, असल्यावर मग काय उत्तम मिळणार नाहीं? आह्मी सकाळचें जेवण मध्यम दिवाणखान्यांत घेत होतों, व रात्रीचें जेवण उत्तम दिवाणखान्यांत घेत होतों. लंच व चहा आमचा बहुतेक बाहेरच होत असे.

अमेरिकेंतील 'हॉटेलांतून अशी एक चमत्कारिक चाल आहे, कीं, खाण्याच्या वेळीं टेबलाजवळ येऊन बसावें, तेव्हां तेथील मुख्य वेटर, एक लांब लिस्ट, एक कोरा कागद व पेन्सिल आणून देतो. या लिस्टमध्यें खाण्याच्या पदार्थांचीं नांवें व किंमत लिहिलेली असते. त्यांपैकीं आपल्याला जे जिन्नस पाहिजेत, ते त्या कोऱ्या कागदावर लिहून द्यावे, ह्मणजे पांचदहा मिनिटांत ते पदार्थ आणून दिले जातात. तोंपर्यंत मात्र वाट पहात बसावें लागतें. कधींकधीं फार वेळ वाट पहाण्याचा यांनां राग येत असे. तेव्हां हे ह्मणत "चला, दुसऱ्या एकाद्या हॉटेलमध्यें जाऊन जेऊं. हे लोक उगीच उशीर करितात, आणि दुसऱ्याचा वेळ घेतात. कसल्या बेट्यांच्या या विलक्षण चाली! इंग्लंडमध्यें आपलें सरसकट जेवण देतात व ठरींव किंमत घेतात."

"बरें, पण दुसरीकडे गेलें, तरी इकडील चालीप्रमाणें तेथेंहि थोडा वेळ वाट पहावी लागणारच. मग उगीच रागावून काय होणार आहे? रागानें आपण उठून गेलें, तर आपल्यालाच त्रास होईल," असें मी ह्मणालें, तेव्हां यांचा राग जरा शांत झाला व त्या वेटरनेंहि तितक्यांतच खाण्याचे पदार्थहि आणले.

इकडील हॉटेलांतून आणखी एक ही चाल आहे, कीं, दर जेवणाला तेथील वाढणाऱ्या वेटरला आठ आणे, बारा आणे, रुपया असें कांहीं

तरी इनाम दिलें पाहिजे. चारसहा आणे दिले तर ते घेत नाहींत. थोडे-थोडके मनाला येत नाहींत. अशा यांच्या सवयी आहेत. आपण या लोकांनां कांहीं दिलें नाहीं, तर ते तोंडानें कांहीं मागत नाहींत; पण कृतीनें मात्र दाखवितात. मग काय जेवणाचे पदार्थच लवकर आणावयाचे नाहींत; आपण टेबलाकडे जाऊन बसलों, तरी आपल्याकडे लक्ष्यच द्यावयाचे नाहींत. असें दाखवितील, कीं दुसऱ्यांनां वाढण्याच्या अगदीं गडबडींत आहेत. त्यांचें होईल तेव्हां दुसऱ्याकडे लक्ष्य दिलें जाईल. यांची तर गोष्ट राहूं द्या, पण मग मुख्य वेटरजीसुद्धां कानांवर लेखणी ठेवून सभ्य रीतीनें इकडेतिकडे मिरवत असतात; आणि तेसुद्धां इकडे लक्ष्य पुरवीत नाहींत. तेंच जर चांगलें बक्षीस हातावर पडलें असलें, ह्मणजे सगळाच प्रकार बदलतो. मग डायनिंगरूममध्यें गेल्या-बरोबर मुख्य वेटर लवकर पुढें येऊन खुर्च्या वगैरे पुढें करून मोठ्या अदबीनें सलाम करील; इतकेंच नाहीं, तर सर्वच पुढेंपुढें करून धांवतील, आणि जेवणाचे पदार्थ मिळण्यालाहि फारसा वेळ लागावयाचा नाहीं. या सर्व वेटर लोकांचें एकमत असून त्या सर्वांनां जें मिळतें, तें ते सारखें वांटून घेत असावेत, असें वाटतें. इकडील लोक या वेटर्सनां भराभर पैसे देत असतात, त्यामुळें त्यांनां अशा सवयी लागल्या आहेत. असें ह्मणतात, कीं, कांहीं हॉटेलांतून हे वेटरलोक पगार वगैरे कांहीं न घेतां नुसत्या टिप्सीवर ( बक्षिसांवर ) कामें करीत असतात. हे लोक बहुतकरून जर्मन, फ्रेंच, इटालिअन्, स्विस वगैरे असतात. अमेरिकन लोक हीं कामें बहुतकरून करीत नाहींत, असें दिसतें.

न्यूयार्कमध्यें आह्मी एक आठवडाभर होतों. या शहराची रचना फारच विलक्षण आहे. एक इमारत अतीशय उंच, तर तिच्या शेजारीं एक अगदीं ठेंगणी; पुन: तिच्यापलीकडे एक अतीशय उंच हवेली; अशा रीतीची चमत्कारिक रचना इथें दिसून येते. आगगाड्या तर इतक्या आहेत, कीं, कांहीं सांगतां येत नाहीं. शहरांतील कांहीं मोठ्या

रस्त्यांनीं लोखंडी खांब बसवून त्यांच्यावरून रेल्वे नेली आहे, व कांहीं भागांमध्यें या रेल्वेच्या रस्त्यावरून आणखी एक लहान रेल्वे नेली आहे. येथून रात्रंदिवस दोनदोन, चारचार मिनटांनीं गाड्या धांवत असतात. खालीं जमीन पोखरून आणखी दोनतीन रेल्वे लाइन्स् केल्या आहेत. रात्रंदिवस या गाड्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांची एकसारखी गर्दी असते. कारण, एवढ्या मोठ्या शहरामध्यें लोकांनां कितीहि दूर जावयाचें असलें, तरी या गाड्यांनीं लवकर व थोड्या खर्चांत जातां येतें.

न्यूयार्कमधील कांहीं मुख्य सडका रात्रीच्या वेळीं फार मजेदार दिसतात. दुतर्फा दुकानांतून विजेच्या दिव्यांची अप्रतिम रोषनाई केलेली असते; त्यामुळें आंतील कांचेच्या तावदानांतल्या वस्तु फारच मोहक दिसतात. तसेंच उंचउंच इमारती खालच्या मजल्यापासून तों वरच्या टोंकांपर्यंत दिव्यांनीं चकाकत असतात, व अनेक तऱ्हेच्या जाहिराती जिकडेतिकडे दिव्यांच्या साहाय्यानें चमकत असतात. मोठमोठ्या कारखान्यांतून झपाझप कामें चाललेलीं असतात. हें सर्व पाहून असें वाटतें, कीं, आपल्याइकडील मुंबईची दिवाळींतीलसुद्धां रोषनाई यापुढें कांहींच नाहीं. येथें रोजचीच दिवाळी आहे !

हें येथील लोकांच्या दीर्घ उद्योगाचें आणि अचाट कल्पनांचें फळ होय. आपल्यामध्यें जी 'नर करणी करे, तो नरका नारायण हो जाय!' अशी ह्मण आहे, ती अगदीं खरी आहे. मनुष्यानें नेटानें व प्रामाणिकपणानें कोणतेंहि चांगलें काम केलें, तर त्याचें फळ चांगलें मिळणारच.

दुसऱ्या दिवशीं आह्मी रेव्हरंड च्यामर यांच्या भेटीला गेलों. यांची भाची म्यांचुरिया बोटीवर पॅसेंजर होती. तिनें यांनां इंट्रोडक्शन् दिलें होतें. मि. च्यामर यांची बायको कोठें बाहेरगांवीं गेली होती; पण त्यांची मुलगी घरीं होती. तिनें व मि. च्यामर यांनीं आमचें चांगलें स्वागत केलें. त्यांचें चर्च, घरें व बागबगीचे वगैरे दाखविलीं, व दुसऱ्या दिवशीं जेवणाला येण्याचें निमंत्रण दिलें.

तरी इनाम दिलें पाहिजे. चारसहा आणे दिले तर ते घेत नाहींत. थोडे-थोडके मनाला येत नाहींत. अशा यांच्या सवयी आहेत. आपण या लोकांनां कांहीं दिलें नाहीं, तर ते तोंडानें कांहीं मागत नाहींत; पण कृतीनें मात्र दाखवितात. मग काय जेवणाचे पदार्थच लवकर आणाव-याचे नाहींत; आपण टेबलाकडे जाऊन बसलों, तरी आपल्याकडे लक्ष्यच द्यावयाचे नाहींत. असें दाखवितील, कीं दुसऱ्यांनां वाढण्याच्या अगदीं गडबडींत आहेत. त्यांचें होईल तेव्हां दुसऱ्याकडे लक्ष्य दिलें जाईल. यांची तर गोष्ट राहूं द्या, पण मग मुख्य वेटरजीसुद्धां कानांवर लेखणी ठेवून सभ्य रीतीनें इकडेतिकडे मिरवत असतात; आणि तेसुद्धां इकडे लक्ष्य पुरवीत नाहींत. तेंच जर चांगलें बक्षीस हातावर पडलें असलें, ह्मणजे सगळाच प्रकार बदलतो. मग डायनिंगरूममध्यें गेल्या-बरोबर मुख्य वेटर लवकर पुढें येऊन खुर्च्या वगैरे पुढें करून मोठ्या अदबीनें सलाम करील; इतकेंच नाहीं, तर सर्वच पुढेंपुढें करून धांवतील, आणि जेवणाचे पदार्थ मिळण्यालाहि फारसा वेळ लागावयाचा नाहीं. या सर्व वेटर लोकांचें एकमत असून त्या सर्वांनां जें मिळतें, तें ते सारखें वांटून घेत असावेत, असें वाटतें. इकडील लोक या वेटर्सनां भराभर पैसे देत असतात, त्यामुळें त्यांनां अशा सवयी लागल्या आहेत. असें ह्मणतात, कीं, कांहीं हॉटेलांतून हे वेटरलोक पगार वगैरे कांहीं न घेतां नुसत्या टिप्सीवर ( बक्षिसांवर ) कामें करीत असतात. हे लोक बहुतकरून जर्मन, फ्रेंच, इटालिअन्, स्विस वगैरे असतात. अमेरिकन लोक हीं कामें बहुतकरून करीत नाहींत, असें दिसतें.

न्यूयार्कमध्यें आह्मी एक आठवडाभर होतों. या शहराची रचना फारच विलक्षण आहे. एक इमारत अतीशय उंच, तर तिच्या शेजारीं एक अगदीं ठेंगणी; पुन: तिच्यापलीकडे एक अतीशय उंच हवेली; अशा रीतीची चमत्कारिक रचना इथें दिसून येते. आगगाड्या तर इतक्या आहेत, कीं, कांहीं सांगतां येत नाहीं. शहरांतील कांहीं मोठ्या

रस्त्यांनीं लोखंडी खांब बसवून त्यांच्यावरून रेल्वे नेली आहे, व कांहीं भागांमध्यें या रेल्वेच्या रस्त्यावरून आणखी एक लहान रेल्वे नेली आहे. येथून रात्रंदिवस दोनदोन, चारचार मिनटांनीं गाड्या धांवत असतात. खालीं जमीन पोखरून आणखी दोनतीन रेल्वे लाइन्स् केल्या आहेत. रात्रंदिवस या गाड्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांची एकसारखी गर्दी असते. कारण, एवढ्या मोठ्या शहरामध्यें लोकांनां कितीहि दूर जावयाचें असलें, तरी या गाड्यांनीं लवकर व थोड्या खर्चांत जातां येतें.

न्यूयार्कमधील कांहीं मुख्य सडका रात्रीच्या वेळीं फार मजेदार दिसतात. दुतर्फा दुकानांतून विजेच्या दिव्यांची अप्रतिम रोषनाई केलेली असते; त्यामुळें आंतील कांचेच्या तावदानांतल्या वस्तु फारच मोहक दिसतात. तसेंच उंचउंच इमारती खालच्या मजल्यापासून तों वरच्या टोंकांपर्यंत दिव्यांनीं चकाकत असतात, व अनेक तऱ्हेच्या जाहिराती जिकडेतिकडे दिव्यांच्या साहाय्यानें चमकत असतात. मोठमोठ्या कारखान्यांतून झपाझप कामें चाललेलीं असतात. हें सर्व पाहून असें वाटतें, कीं, आपल्याइकडील मुंबईची दिवाळींतीलसुद्धां रोषनाई यापुढें कांहींच नाहीं. येथें रोजचीच दिवाळी आहे !

हें येथील लोकांच्या दीर्घ उद्योगाचें आणि अचाट कल्पनांचें फळ होय. आपल्यामध्यें जी 'नर करणी करे, तो नरका नारायण हो जाय!' अशी ह्मण आहे, ती अगदीं खरी आहे. मनुष्यानें नेटानें व प्रामाणिकपणानें कोणतेंहि चांगलें काम केलें, तर त्याचें फळ चांगलें मिळणारच.

दुसऱ्या दिवशीं आह्मी रेव्हरंड च्यामर यांच्या भेटीला गेलों. यांची भाची म्यांचुरिया बोटीवर पॅसेंजर होती. तिनें यांनां इंट्रोडक्शन् दिलें होतें. मि. च्यामर यांची बायको कोठें बाहेरगांवीं गेली होती; पण त्यांची मुलगी घरीं होती. तिनें व मि. च्यामर यांनीं आमचें चांगलें स्वागत केलें. त्यांचें चर्च, घरें व बागबगीचे वगैरे दाखविलीं, व दुसऱ्या दिवशीं जेवणाला येण्याचें निमंत्रण दिलें.

रात्रीं जेवणानंतर थोडें बाहेर फिरावें, ह्मणून आह्मी हॉटेलच्या बाहेर गेलों, व बाजूचीं दुकानें पहातपहात हॉटेलच्या शेवटीं जेथें एक मोठी साइटसीइंग कार (गाडी) उभी होती, तेथें गेलों. त्याचा ड्रायव्हर आणि कंडक्टर हे दोघेहि रस्त्यानें जाणारांचीं मनें वळवीत होते. ते सांगत होते, कीं, अमक्याअमक्या जागा दाखवूं, पुष्कळ दूरपर्यंत फिरवून आणू, तिकिटाचा दर अगदीं माफक आहे, थोड्या पैशांत पुष्कळ मजा दिसेल, इ. इ. हे मला ह्मणाले "चला, आपणहि या कारमधून दोनतीन तास फिरून येऊं!"

ह्मणून आह्मीं तिकिटें घेतलीं, व कारमध्यें जाऊन बसलों. आमच्या पूर्वीं आणखी दोघेतिघे तिच्यांत बसले होते. परंतु कारमध्यें वीस-पंचवीस जणांनां बसण्याची जागा होती, तेव्हां अर्थात्‌च पुष्कळशा जागा अजून रिकाम्या होत्या, आणि याकरितांच त्या दोघांचा आणखी लोक मिळविण्याचा प्रयत्न चालला होता; पण त्यांच्याकडे कोणी लक्ष्यच देईना. आह्मांला शेवटीं कंटाळा आला. कारण, जवळजवळ अर्धा तास होत आला, तरी गाडी हालेना. हे ह्मणायला लागले "चला, आपण उतरूं. येथें उगीच कोठपर्यंत बसावें? दुसरीकडे कोठें नाटकाबिटकाला तरी जाऊं. आतां पैसे जातील तर जाऊं द्या, पण वर आणखी आपला वेळ निष्कारण कशाला घालवावा?"

पण तो ड्रायव्हर ह्मणाला "जरा थांबा. आतां लोक येतील. लोक इतक्यांत लवकर आले नाहींत, तर आह्मी तुमचे पैसे परत करूं." आणि त्याचेंच ह्मणणें खरें झालें. कारण, तितक्यांत भराभर मंडळी आली व कारच्या सर्व जागा भरल्या, आणि गाडीहि लागलीच झपाट्यानें निघाली, ती चिना टाऊनमध्यें गेली.

तेथें सर्व चिनी लोक रहातात, ह्मणून त्याला 'चिना टाऊन' असें ह्मणतात. या वेळीं येथें जिकडेतिकडे शांतता दिसत होती. येथील रस्तेहि फारसे रुंद आणि दिव्यांनीं लखलखणारे नव्हते. मोटारकार,

ट्राम्वे वगैरेंचीहि गर्दी नव्हती. फक्त याच कंपनीच्या आणखी एकदोन गाड्या येथें उभ्या होत्या. आमचीहि गाडी येथें उभी राहिली व आह्मी वीसबावीसजणें खालीं उतरलों. आमच्या गाइडनें प्रथम आह्मांला चिनी लोकांच्या दुकानांतून फिरविलें. या दुकानांतून सर्व वस्तु चिनी दिसत होत्या. हीं दुकानें पाहिल्यावर जवळच्याच एका गल्लीमधील चिनी लोकांचें देऊळ पहाण्याला गेलों. हें देऊळ चवथ्या मजल्यावर होतें. तेथें गाडीमधील दुसरीहि मंडळी आली होती. येथील जागा फार लहान असल्यामुळें दोन्ही गाड्यांमधील मंडळीची एकच गर्दी झाली. येथील सर्व वस्तु चिनी तऱ्हेच्या व चिनी देवळांतून दिसणाऱ्या होत्या. आह्मांला त्या पहाण्यांत विशेषशी मजा वाटली नाहीं, आणि त्यांत कांहीं नवलविशेषहि दिसलें नाहीं. आपल्या इकडल्यासारखींच कांहीं तांब्यापितळेचीं उपकरणीं, घंटा वगैरे सामान होतें, आणि कांहीं मृदंग, ढोलकीं, नगारे अशा प्रकारचीं वाद्यें होतीं. परंतु अमेरिकन बायकांनां सर्वच कांहीं अपूर्व वाटलें. त्या एकेक वस्तु उचलून पहात होत्या, व गाइडला शेंकडों प्रश्न विचारीत होत्या.

त्या गर्दीमध्यें कांहीं मंडळी खालीं जाऊं लागली, तेव्हां मीहि खालीं जाऊं लागलें; आणि ह्मणून हेहि माझ्या मागून खालीं आले. खालीं आल्यावर तो गाइड ह्मणाला "तुह्मी कशाला खालीं आलांत ? तुमची पार्टी तर अजून वरच आहे. तुह्मी माझ्या पार्टीपैकीं नव्हे. तुह्मांला वाटेल तर वर जा, नाहीं तर तुमची पार्टी येईपर्यंत येथेंच वाट पहात बसा."

मला हे ह्मणाले "तुह्मी कशाला खालीं उतरून आलां ? उगीच गडबड करतां. तुह्मांला खालीं येतांना पाहिलें, तसा मीहि खालीं आलों. मला वाटलें, तुह्मी एकट्याच कोठें तरी भटकाल ह्मणून."

"मला काय ठाऊक ? मला वाटलें, आतां सर्वांनींच खालीं जावयाचें आहे, ह्मणून मीहि खालीं उतरलें. त्या गर्दीमध्यें आपल्या पार्टीचे कोण व दुसऱ्या पार्टीचे कोण, हें माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं."

नंतर आह्मीं विचार केला, कीं, आतां इतके जिने चढून पुनः कशाला वर जावें? वर तरी असें मोठें काय पहाण्यासारखें आहे? त्यापेक्षां ती मंडळी येईपर्यंत खालींच वाट पाहूं. तिकडे वरती आह्मी दिसलों नाहीं, तेव्हां आमचा गाइड घाबरला. येथें खालच्या मजल्यावर एक अमेरिकन रखवालदार शिपाई होता, त्याच्याशीं आह्मी बोलत उभीं होतों. वरून गाइड एकसारखा त्याला हांका मारून विचारूं लागला, कीं "इंडिअन जंटलमन व लेडी खालीं आहेत काय?" जेव्हां त्यानें 'होय' ह्मणून सांगितलें, तेव्हां, त्याच्या जिवांत जीव आला, व त्याला ह्मणाला "त्यांनां कोठें जाऊं देऊं नको."

हे त्या अमेरिकन शिपायाला तेथील चिनी लोकांची माहिती विचारूं लागले. "हे लोक येथें कसे रहातात? यांचा रोजगारधंदा कसा काय चालतो? तुह्मी अमेरिकन लोक त्यांनां कसे वागवितां?" अशा तऱ्हेचे यांनीं त्याला प्रश्न विचारले.

"आमच्यानें होईल तितकी उद्योगधंद्यांत आह्मी यांनां मदत करतों; परंतु हे लोक जरा आळशी आहेत, व आपापसांत नेहमीं भांडत असतात."

"आपापसामध्यें कां भांडतात? दारू वगैरे फार पितात कीं काय?"

"दारू वगैर फार पीत नाहींत. त्यांच्यापेक्षां आमचे लोकच दारू जास्त पितात. परंतु हे लोक पैशाकरितां व बायकांकरितां आपसांत भांडतात. नेहमीं आह्मांला मध्यें पडून यांचीं भांडणें मिटवावीं लागतात."

मग लवकरच आमची पार्टी खालीं आली व आह्मी पुन्हां कारमध्यें बसून एका चिनी रेस्टोरंटमध्यें गेलों. हा रेस्टोरंट बराच मोठा आहे. येथें चिनी लोकांनीं आपलीं कांहीं वाद्यें वाजविलीं, व चिनी भाषेंतीलच कांहीं गाणीं ह्मटलीं. नंतर सर्व मंडळीला जेवणाच्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें जेवणाचीं लहानमोठीं टेबलें तयार होतीं. तेथें सर्व मंडळी जेवावयाला बसली. जेवणाचे पदार्थ चिनी तऱ्हेचे होते. चिनी मातीच्या

पसरट कटोऱ्यांतून चांगला गरम भात, व तशाच दुसऱ्या कटोऱ्यांतून कांदे, बटाटे, कीस वगैरे टाकून केलेली चांगली मसालेदार आमटी, चहा व तांदळाच्या पिठाचीं बिस्किटें, हे पदार्थ सर्वांच्या पुढें आणून ठेवले. आह्मीं चहा व बिस्किटें मात्र खाल्लीं; भाताला व आमटीला हातच लावला नाहीं. कारण एक तर आह्मांला भूक नव्हती व दुसरें असें मनांत आलें, कीं, कोण जाणे, ही आमटी बेडकांची आहे, कीं कसली आहे !

सपर झाल्यावर सर्व मंडळी तेथील स्वयंपाकाची, बिस्किटें करण्याची, चहा करण्याची वगैरे जागा पहाण्याला गेली. स्वयंपाकघरांत कांद्या-बटाट्यांचे ढीग पडलेले दिसले. चुलीवर मडक्यांतून भात व कांहीं भाज्या शिजत होत्या; यावरून असें दिसलें, कीं, अजून बरीच मंडळी सपरला येणार होती. बिस्किटें करण्याच्या खोलींत दोघे इसम होते. एकजण तांदळाचें चांगलें पांढरें पीठ कालवून त्यांत साखर वगैरे घालीत होता, व दुसरा ग्यासच्या चुलीवर बिस्किटें भराभर भाजीत होता. हें पाहून आह्मांला मोठी मौज वाटत होती. त्या ग्यासच्या चुलीवर बिस्किटें थोड्या वेळांतच चांगलीं खुसखुशीत होत होतीं. बिस्किटांची बाजारांत चांगली विक्री होते, असें लोक ह्मणत होते.

मग आह्मी तेथील चिनी लोकांकरितां बांधलेलें चर्च पहाण्याला गेलों. जे कोणी चिनी ख्रिश्चन झालेले आहेत, त्यांच्याकारितांच हें चर्च बांधलेलें आहे.

हें चिनी टाऊन पाहिल्यावर सर्व मंडळी पुन: कारमध्यें येऊन बसली. येथील मुख्यमुख्य रस्त्यानें फिरून सर्वांत उंचउंच इमारती दाखविल्या गेल्या. येथें एक मोठा श्रीमंत व्यापारी आहे; त्याची इमारत सर्वांत मोठी ह्मणजे चाळीसपंचेचाळीस मजली आहे. त्या इमारतीचा एक मजला रात्रीं बारा वाजतां उघडतात, व त्या वेळीं जो कोणी भिकारी येईल, त्याला एक डबल रोटी व थोडें लोणी दिलें जातें. रोज रात्रीं हजारपांचशें लोक तरी या रोट्यांकारितां येतच असतात.

नंतर आमच्या गाइडनें आह्मां सर्वांनां एका इटालिअन रेस्टोरंटमध्यें नेलें. येथेंहि कांहीं वेळ इटालिअन गाणेंबजावणें झाल्यावर दुसऱ्या दिवाणखान्यांत फराळाची तयारी झाली. या वेळीं रात्रीचे बारा वाजले होते. मला तर अतीशय झोंप येत होती, तेव्हां कसला फराळ व कसलें गाणें ? कांहींच बरें वाटत नव्हतें. असें झालें होतें, कीं, केव्हां एकदां बिछान्याला अंग लागतें. झोंपेनें अगदीं डुलक्या येत होत्या, आणि ह्मणूनच एवढें बरें झालें, कीं, येथून निघाल्यावर आह्मांला आणखी दुसरीकडे कोठें नेलें नाहीं. लवकरच कार हॉटेलच्या कोंपऱ्यावर नेऊन उभी केली व आह्मी सर्व मंडळी आपापल्या ठिकाणीं निघून गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रेल्वेनें ब्याटरी पार्कला गेलों, व तेथून हॅलिकन नांवाच्या बोटींत बसून दिवसभर न्यूयार्क बेमध्यें फिरलों. बोट निघाली ह्मणजे पहिल्यानें लिबर्टी स्टॅच्यू दिसतो. ही मूर्ति एका फ्रेंच कारागिरानें केलेली आहे. जेव्हां अमेरिका स्वतंत्र झाली, तेव्हां फ्रेंच लोकांनीं ही मूर्ति अमेरिकेला नजर केली. ही मूर्ति वरून तांब्याच्या पत्र्याची केलेली असून आंतून लोखंडाची आहे. मूर्तीच्या उजव्या हातांत विजयाचें चिन्ह ह्मणून लांब मशाल आहे, व डोक्याला प्रभावळीचा मुगूट आहे. मूर्ति १५१ फूट उंच आहे. ही मूर्ति किनाऱ्याजवळ बऱ्याच खोल पाण्यांत स्थापन केली असून फारच भव्य असल्यामुळें दूरवर दिसते.

बराच वेळ बोट बेमध्यें फिरवून समुद्रकिनाऱ्याचीं घरें, कारखाने, बागबगीचे वगैरेंचा देखावा दाखविला. मग बोट जरा जास्त पाण्यांत नेली. तेथें लाटांचा जोर फार होता, व बोट अगदीं लहान होती, ह्मणून फारच हलूं लागली. त्यामुळें पोटांत कालवाकालव होऊं लागून वांती होते कीं काय, असें वाटूं लागलें. पण आणखी पुढें बोट नेली नाहीं ह्मणून बरें झालें. नंतर बोट लवकरच पुनः बेमध्यें आणिली, व पोर्ट विल्यमकडून न्यूजर्सीकडे नेली व बेच्या दुसऱ्या किनाऱ्याकडे परत आणली.

दोन वाजतां आह्मी हॉटेलांत परत आलों आणि लंच घेतला, तेव्हां जरासें बरें वाटलें. कारण, या वेळीं येथें बराच गरमा होत होता.

संध्याकाळीं साडेसहा वाजतां मि. च्यामर यांच्याचकडे गेलों. तेथें बिशप कोर्ट यांनां हे भेटले. त्यांनीं आह्मांला विचारलें "तुह्मी ख्रिश्चन आहां कीं नाहीं ?"

आह्मीं सांगितलें "आह्मी ख्रिश्चन नाहीं, हिंदू आहोंत. आह्मी मूर्तिपूजक आहोंत."

हें ऐकून त्यांनां जरा राग आल्याचें दिसलें. त्यांनीं थोडें चमत्कारिक तोंड केलें आणि ह्मटलें "मग तुमचा उद्धार कसा होईल ? तुमचा हिंदू धर्म कसा काय आहे ?" वगैरेवगैरे थोडे प्रश्न त्यांनीं केले व मग अधिक कांहीं बोलले नाहींत.

आज आदितवार असल्यामुळें यांच्या चर्चमध्यें सेरिमनी झाला. तो पहाण्याकरितां मि. च्यामर यांनीं आह्मांला नेलें. तेथें त्यांची प्रार्थना वगैरे झाल्यावर बिशपसाहेबांनीं धर्मविषयक एक व्याख्यान दिलें. येथें स्त्रीपुरुष वगैरे मंडळी बरीच जमली होती. शेवटीं, धर्मार्थ फंडाकरितां सर्वांच्या पुढें ताट आणलें, त्यांत ज्यानें त्यानें आपापल्या ऐपतीप्रमाणें पैसे टाकले.

मग सपर घेऊन आह्मी कांहीं वेळ मि. च्यामर व त्यांची मुलगी यांच्याशीं बोलत बसलों. मि. च्यामर यांनीं पूर्वींची ओळख नसतांना आमचें आदरातिथ्य फार चांगलें केलें. ते ह्मणाले "माझी बायको येथें असती, तर तुह्माला व मि. चिटणवीस यांनां भेटण्यांत तिला फार आनंद झाला असता."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आह्मी कोलंबिया युनिव्हर्सिटी पहाण्याला गेलों. युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट डॉ. बटलर हे जरूरीच्या कामामध्यें गुंतले असल्यामुळें त्यांची आमची भेट झाली नाहीं; परंतु त्यांच्या असिस्टंटनें आह्मांला ती सर्व संस्था दाखविली, व शक्य तितकी माहिती दिली.

या युनिव्हर्सिटीच्या इमारती चांगल्या मजबूत व हवाशीर आहेत. ही जागा शहराच्या अगदीं एकीकडे असून तेथें चांगली शांतता असते. सभोंवतीं चांगला बाग आहे, आणि मधुनमधून हिरवींगार मैदानें आहेत.

या असिस्टंटनें आह्मांला येथील पदवीदानसमारंभाला येण्याविषयीं आग्रह केला व त्या दिवसाची वेळ, तारीख वगैरे लिहून दिली.

ता. ३० मे १९११ रोजीं सकाळीं आह्मी 'मेट्रोपोलिटन म्यूझिअम आफ् आर्ट्' पहावयाला गेलों. हें अमेरिकेंतील सर्वांत मोठें म्यूझिअम आहे. येथें पुष्कळ जुन्या वस्तूंचा संग्रह आहे. हें सर्व बारकाईनें पहावयाचें असल्यास बऱ्याच वेळां येथें आलें पाहिजे. येथील कांहीं दालनांतून भिंतींनां कोनाडे आहेत, व त्यांतून थंड पाण्याचे नळ आहेत. त्यामुळें प्रेक्षकांनां केव्हांहि चांगलें गार पाणी पिण्याला मिळतें. येथें पुष्कळ गार पाण्याची सोय करण्याचें कारण, येथील मोठमोठ्या खोल्या पहातांपहातां व जिनें चढतांचढतां फार तहान लागते. अशा वेळीं हें पाणी अमृतासारखें लागतें.

यानंतर येथें जवळच असलेली पब्लिक लायब्ररी पाहिली. येथें पुरुषांपेक्षां बायकाच वाचनांत गढून गेलेल्या जास्त दिसल्या.

दुपारीं ब्रॉनसपार्क पहावयाला गेलों. येथें बॉटॅनिकल गार्डन, व झोआलॉझिकल नांवाचा पार्क आहे. हे पार्क फार मोठे आहेत. ह्मणून आह्मी घोड्याच्या गाडींत बसून या पार्कमध्यें फिरलों. येथें जागजागीं हिरव्या गवतावरून व झाडाच्या छायेंत कांहीं कुटुंबें लहानलहान पेटाऱ्यांतून खाण्यापिण्याचे पदार्थ घेऊन वनभोजनें करीत होतीं, आणि लहानमोठीं मुलें मजेनें गवतावर लोळत होतीं व इकडेतिकडे बागडत होतीं.

दूरदूरचा भाग गाडींतून पाहिल्यावर मग आह्मी गाडी सोडून देऊन पायांनीं फिरलों. झोआलॉझिकल पार्कमध्यें एक रॉकिंग स्टोन आहे.

हा सात फूट उंच आणि दहा फूट रुंद असून ३० टन वजनाचा आहे. परंतु त्याला जरा स्पर्श झाला, कीं, तो हलतो ही त्यांत मोठी मौज आहे.

दुसऱ्या दिवशीं आक्वेरिअम पहाण्याला गेलों. येथें जातांयेतांना बऱ्याच ट्राम्वेज् व ट्रेन्स बदलाव्या लागल्या. हें आक्वेरिअम बरेंच मोठें आहे; परंतु होनालुलूसारखे चित्रविचित्र व सुंदर मासे येथें नाहींत. कांहीं सील मासे मात्र फारच मोठे आहेत. ते मोठमोठ्या म्हशींसारखे दिसतात. यांपैकीं प्रत्येकाला एकेका टांक्यांत ठेवलें आहे व टांक्यांच्या मध्यभागीं एकेक चबुत्रा बांधलेला आहे. या चबुत्र्यांवर बसून हे जाणारायेणारांची मजा पहात असतात. या टांक्यांच्या सभोंवतीं उंचउंच गज लाविलेले आहेत. त्यामुळें हे सीलमासे बाहेर पडण्याची भीति नाहीं आणखी कांहीं विशेष तऱ्हेचे मासे किंवा चमत्कारिक जलचरें येथें नाहींत व ही जागाहि होनालुलूसारखी रमणीय नाहीं.

दुपारीं बसमध्यें बसून रिव्हरसाइड पहावयाला गेलों. या बसमध्यें वरच्या मजल्यावर बसलें, म्हणजे दोन्ही बाजूंची शोभा चांगली पहावयाला सांपडते. नदीच्या बाजूनें पुष्कळ बागबगीचे व पार्कहि आहेत, येथें लोकांनां हिंडण्याफिरण्याकरितां व बसून विश्रांति घेण्याकरितां चांगल्या जागा केलेल्या आहेत. कामकरी लोकांनां सुटीच्या दिवशीं अशा जागांचा फार उपयोग होतो. ते आपला सुटीचा वेळ मोकळ्या हवेंत घालवून पुनः दुसरें काम करण्याला हुषार व ताजेतवाने होतात.


परत येतांना रस्त्यांत आम्हांला एक मोठें प्रोसेशन (मिरवणूक) भेटलें. या प्रोसेशनमध्यें पुष्कळ लोक हातांत निशाणें घेऊन, वाजवीत व गात चालले होते. असें प्रोसेशन जे कोणी शूर व नामांकित लोक होऊन गेले, त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षीं होत असतें, असें आमच्या बरोबरची मंडळी आम्हांला सांगूं लागली. हे लोक प्रसिद्ध लोकांच्या कबरींवर फुलें वगैरे टाकून त्यांचे गुणानुवाद गातात.

## वाशिंग्टन.

तारीख १ जून १९११ रोजीं दुपारीं एक वाजतां आह्मी वॉशिंग्टनला जाण्याकरितां निघालों. रस्त्यानें कांहीं मोठमोठीं शहरें लागलीं. त्यांपैकीं फिलाडेल्फिया हें एक होतें. येथें आमच्या ओळखीची एक व्याख्यार्ती बाई होती. तिनें येथें उतरण्याबद्दल आह्मांला फार आग्रह केला; परंतु वेळ नसल्याकारणानें आह्मांला उतरतां आलें नाहीं. फिलाडेल्फिया हें शहर अमेरिकेंत चांगलें प्रसिद्ध आहे. येथें मोठमोठे कारखाने असून त्यामुळें येथें पुष्कळ श्रीमंत व्यापारी लोकांची वस्ति आहे. येथें नीग्रो लोकांचीहि बरीच वस्ति आहे, त्यांपैकीं कांहीं लोक चांगले धनवान् आहेत, असें ह्मणतात. फिलाडेल्फियाचीं दोनतीन स्टेशनें आह्मांला वाटेंत लागलीं. गाडींतून दोन्ही बाजूंनां गिरण्या व मोठमोठीं घरें दिसत होतीं.

संध्याकाळीं सहा वाजतां आह्मी वाशिंग्टनला येऊन पोहोंचलों, व येथील कांग्रेस हॉटेलमध्यें उतरलों. हें हॉटेल कॅपिटल् व कांग्रेस लायब्ररी यांच्याजवळ आहे. रात्रीं जेवणानंतर लायब्ररी पहाण्याला गेलों. ही इमारत तीन मजली आहे. खालच्या मजल्यावर कापीराइट् ऑफिस, आंधळ्यांकरितां वाचनालय आणि सुपरिन्टेन्डेन्ट्चें ऑफिस आहे. वरच्या मजल्यावर पुष्कळ खोल्यांतून निरनिराळीं वाचनालयें आहेत, व कांहीं खोल्यांतून नकाशे ठेविलेले आहेत.

या लायब्ररीच्या मध्यभागीं एक वर्तुलाकार जागा आहे. येथेंहि एक मोठें वाचनालय आहे, आणि सभोंवतीं पुस्तकें ठेवण्याच्या खोल्या आहेत. पहिल्या मजल्यावर विवक्षित लोकांकरितां वाचनाच्या खोल्या आहेत. दुसऱ्या मजल्यावर दुर्मिळ पुस्तकांच्या छापील प्रती, व ग्रंथकारांच्या हस्तलिखित प्रती ठेविल्या आहेत. तेथें प्रेसिडेंट व प्रसिद्ध पुरुषांच्या तसबिरीहि टांगलेल्या आहेत.



लायब्ररी ऑफ कांग्रेस, वाशिंगटन

इमारत संगमरवरी असून नामांकित व प्रसिद्ध चिताऱ्यांकडून सर्वत्र सुंदर सुंदर चित्रें काढविलीं आहेत. हीं चित्रें ऐतिहासिक, धार्मिक, व थोर पुरुषांचीं आहेत. कांहीं ठळक आणि विशेष मनोवेधक देखावेहि काढविले आहेत. अशीं चित्रें सर्व इमारतभर काढलीं आहेत. ही इमारत अलीकडेच बांधली असल्यामुळें दिवसाच्या वेळीं चित्रांचे रंग फार भडक दिसतात, आणि रात्रीं विद्युत्प्रकाशांत हीं चित्रें चांगलीं सौम्य दिसतात.

वरच्या मजल्यावर ग्यालरीच्या सभोंवतीं नामांकित कवींचे व जगत्प्रसिद्ध पुरुषांचे संगमरवरी दगडांचे मोठमोठे पुतळे उभारले आहेत. त्यांमध्यें शेक्स्पिअरादि कवीश्वर आहेत. हे पुतळे अत्यंत मोहक व भव्य दिसतात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ब्रेकफास्टनंतर साइट्सीइंग कारमध्यें बसून तेथील निरनिराळ्या प्रसिद्ध जागा पहावयाला गेलों. येथील साइट्सीइंग कार फार मोठी होती; ह्मणजे तींत तीसपसतीस मनुष्यें बसण्याइतकी जागा होती. कार गच्च भरली होती. ही गाडी एकाद्या आगगाडीच्या डब्यासारखी दिसत होती. या सर्व मंडळींबरोबर फिरण्याची आह्मांला एक प्रकारची मौज वाटत होती, व हे लोकहि आमच्याशीं गोड रीतीनें वागत होते. या ट्रिपमध्यें आह्मी ट्रेझरी, करन्सी नोटा छापण्याचा कारखाना, व्हाइट् हौस, वाशिंग्टन मॅनुमेंट, म्यूझिअम व कॅपिटल या जागा पाहिल्या.


कॅपिटल ही इमारत प्रेक्षकांनां बारकाईनें दाखविण्याकरितां सरकारी गाइड ठेवलेले आहेत. या इमारतीच्या आंतील भागांत कांग्रेसच्या बैठकीचे हॉल आहेत; आणि पुढल्या बाजूला नॅशनल् स्टॅचुअरी हॉल आहे. या हॉलमध्यें कांहीं लोकमान्य पुरुषांचे पुतळे ठेवले आहेत. येथेंच पार्लमेंटच्या सभा होत असतात. येथेंसुद्धां खोल्यांखोल्यांतून

सुंदर चित्रें काढलीं आहेत. तीं एका इटालिअन चित्रकारानें काढलेलीं आहेत, असें ह्मणतात.

या चित्रकाराला इटालीमध्यें फार त्रास झाला, ह्मणून तो अमेरिकेला गेला. याच्या मरणामुळें येथील कांहीं चित्रें अपुरीं राहिलेलीं आहेत. त्याचें नांव ब्रुमींडी असें होतें. त्यानें असा पण केला होता, कीं, ज्या देशांत स्वतंत्रता असेल तेथेंच मी कलम उचलून काम करीन, व त्याच भूमीवर आपला देह ठेवीन. तेथील गाईड लोक ही जागा दाखवितांना मोठ्या लांबलचक कहाण्या सांगत असतात, आणि मधुन-मधून कांहीं नकला करून लोकांनां हंसवीत असतात.

व्हाइट् हौस हें येथील प्रेसिडेंटचें रहाण्याचें घर आहे. याची बांधणी अगदीं साधी आहे. यांतील सामानहि साधेंच आहे. येथें कांहीं स्टेट् रूम्स् आहेत, त्या लोकांनां पहाण्याची मोकळिक असते. या खोल्यांनां निरनिराळे रंग दिलेले आहेत, व त्याप्रमाणेंच व्हाइट् रूम, रेड रूम, ब्ल्यू रूम, अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यांमध्यें सामानहि तशाच रंगाचें आहे. या खोल्या साध्याच, परंतु नीटनेटक्या व स्वच्छ दिसतात. आह्मी हें हौस पहावयाला गेलों, त्या वेळीं प्रेसिडेंटसाहेब परगांवीं गेले होते, ह्मणून वाड्यावरील मोठें निशाण काढून घेतलें होतें.

वाशिंगटन मॅनुमेंट हें पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांनीं बांधलेलें आहे. हें ५५५ फूट उंच आहे. याचा कळस ५५ फूट उंचीचा असून तो अल्युमिनिअम धातूचा केलेला आहे. हें आंतून पोंकळ असल्यामुळें शिखरापर्यंत जातां येतें व तेथें पोंचण्याला नऊशें पायऱ्या चढून जावें लागतें. लिफ्टनेंहि वर जातां येतें. अर्ध्याअर्ध्या तासानें लिफ्ट वर जात असतें. सर्व लोकांनां फुकट वर जाऊं देतात. हा टॉवर बांधण्याला १,३००,००० डॉलर खर्च झाला, असें ह्मणतात. हा मॅनुमेंट वाशिंटनच्या सर्व भागांतून दिसत असतो. याच्या भोंवतीं सुंदर पार्क आहे,



वाशिंग्टन मान्युमेंट.

ह्मणून सकाळसंध्याकाळ हवा खाण्याकरितां आणि करमणुकीकरितां येथें पुष्कळ लोक येत असतात.

नोटा तयार करण्याच्या कारखान्यांत पुरुषांपेक्षां बायकाच काम करितांनां अधिक दिसल्या. येथील नोकर अगदीं झपाट्यानें काम करीत होते. कांहीं लोक यंत्रानें नोटांकरितां कागद कातरीत होते, कांहीं यंत्रानें ते छापून काढीत होते, व लागलीच दुसरीकडे नंबर वगैरे ठोकून नोटा अगदीं तयार करीत होते.

या वेळीं इकडे बरीच उष्णता असल्यामुळें आणि येथें कितीएक यंत्रांपासून निघणाऱ्या गरम वाफांमुळें बिचारी काम करणारी मंडळी अगदीं घामानें निथळत होती. ते लोक आपल्या पांढऱ्या हातरुमालाला आपलीं घामाघूम झालेलीं तोंडें एकसारखीं पुशीत होते. या लोकां-करितां येथें पुष्कळशीं बर्फाच्या पाण्याचीं फिल्टरें भरून ठेविलेलीं होतीं, त्यामुळें बिचाऱ्यांनां चांगलें थंड पाणी पिण्याला मिळत होतें. अशा या मजूर लोकांची भाकरी खरी कष्टाची असते.

दुपारीं मोटारमध्यें बसून आरलिंग्टन येथील नॅशनल सेमेटरी पहा-वयाला गेलों. येथें प्रसिद्ध थोर पुरुष, आणि मोठमोठे योद्धे यांनां पुरलें आहे. त्यांचीं थडगीं रिपेअर करून अजूनहि चांगल्या स्थितींत ठेव-लेलीं आहेत. येथें दूरपर्यंत जिकडेतिकडे थडगींच दिसतात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ॲग्रिकल्चरलचें ऑफिस पहावयाला गेलों. तेथील ऑफिसर लोकांनीं यांनां सर्व माहिती दिली. त्यासंबंधीं माहि-तीचीं मोठमोठीं पुस्तकेंहि दिलीं; आणि त्या ठिकाणचा पत्ता लिहून देऊन सांगितलें, कीं, जेव्हां तुह्मांला जरूर पडेल, तेव्हां आह्मांला कळवा, ह्मणजे आणखी पुस्तकें पाठवून देऊं; त्याबद्दल तुह्मांला कांहीं-एक खर्च पडणार नाहीं. तेथील मुख्य ऑफिसर फार चांगला मनुष्य होता. नाहीं तर आह्मी कोण आणि कोठले, ओळखीचे ना देखीचे, त्याला आमचें एवढें आदारातिथ्य करण्याची काय जरूर होती? परंतु

पुष्कळ अमेरिकन लोक फार प्रेमळ आणि उदार मनाचे असतात, असा आमचा अनुभव आहे.

दुपारीं येथील रेसिडेन्शल् क्वार्टर्स् पहावयाला गेलों. येथें निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रधान रहात असतात. हीं घरें फार चांगलीं बांधलेलीं आहेत. हीं न्यूयार्कमधील घरांसारखीं उंच नाहींत. दोनतीन मजली असून, सभोंवतीं सुंदर बागबगीचे आहेत. घरांची बांधण नीटनेटकी असून बहुतेक एकसारखी आहे. वाशिंग्टनचा हा भाग फार रमणीय दिसतो. येथें रस्ते चांगले स्वच्छ असून ट्राम्वे वगैरेंची कांहीं खडखड नाहीं. न्यूयार्कच्या मानानें वाशिंग्टनमध्यें फार शांतता आहे. येथील हवाहि फार चांगली आहे.

## पुनः न्यूयार्क.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां वाशिंग्टनहून निघालों, ते दुपारीं तीन वाजतां न्यूयार्कला परत आलों. तारीख ५ जूनला सकाळीं लवकरच ब्रेकफास्ट घेऊन हे कस्टम हौसकडे गेले. त्या दिवशीं माझी प्रकृति जरा बरी नव्हती, ह्मणून मी बरोबर गेलें नाहीं. खोलींत बिछान्यावरच पडून राहिलें. जातांना यांनीं मला सांगितलें, कीं, "मी कस्टम हौसमध्यें आपल्या पेटीचा तपास लावून ती बोटीवर पाठविण्याला सांगून तिकडूनच मुलींची शाळा पहावयाला जाईन, व एकदीड वाजतां लंचकरितां परत येईन.

दोन वाजले तरी कांहीं यांचा परत येण्याचा ठिकाण नाहीं; तेव्हां मला वाटलें, लंचकरितां कोणीं आग्रह केला असेल, येतील आतां थोड्या वेळानें. परंतु असें करतांकरतां चार वाजले तरी ठिकाण नाहीं, तेव्हां मात्र माझा जीव घाबरला आणि नाहीं नाहीं त्या कल्पना मनांत येऊं लागल्या. 'कोठें कांहीं अपघात तर झाला नसेल ना ? नाहीं तर इतका उशीर कधींच लागणार नाहीं. कांहीं तरी झालें असेल; यांचा स्वभाव आहे जरा गडबडीनें चालण्याचा, तेव्हां ट्राम्वेमधून उतरतां-चढतांनां पाय घसरला तर नसेल ना !' असें नाहीं नाहीं त्या विचारांचें

डोक्यांत काहूर माजलें, व अतीशय रडूं कोसळलें. ' परंतु खोलीमध्यें एकटेंच किती वेळ रडत बसलें, तरी काय होणार ? आतां खालीं जावें, व मॅनेजरला सांगून कुकच्या ऑफिसमध्यें टेलिफोन करवावा, आणि मि. चिटणवीस कोठें आहेत, वगैरे पत्ता लावण्याला सांगावें,' असा विचार मनांत आल्यावर जरा धीर आला व मीं लागलीच उठून तोंड धुवून कपडे घातले, आणि खालीं जाण्याच्या बेतांत होतें, इतक्यांत दरवाजा एकदम उघडला, व हे माझ्यापुढें येऊन उभे राहिले. त्या वेळीं मला किती तरी आनंद झाला, व मनांतल्या मनांत देवाचे मीं किती तरी आभार मानले. पण यांच्यावर थोडें तरी रागावल्याशिवाय माझ्याच्यानें राहवलें नाहीं.

हे ह्मणाले "मला वाटलेंच होतें, कीं, तुह्मी अशा घाबरून जाऊन तर्ककुतर्क काढीत बसाल. मी तुह्माला टेलिफोननें कळवणार होतों. पण या हॉटेलचें व तेथचें कनेक्शन् नव्हतें, ह्मणून कळवितां आलें नाहीं, व त्या बाईनें लंचचा आग्रह केल्यामुळें तिला नाहींहि ह्मणतां येईना. तुह्मांला वाटलें असेल, कीं, मीं मुद्दाम तुमच्याविषयीं निष्काळजीपणा केला, व तिकडे आपला भटकत राहिलों ! तुह्माला इकडे चिंता वाटत होती, तशीच मलाहि तिकडे तुमच्याविषयीं वाटत होती."

नंतर थोड्या वेळानें माझा राग शांत झाल्यावर यांनीं त्या दिवसाची हकीगत पुढीलप्रमाणें सांगितली:—

" मी कस्टम हाउसमध्यें गेलों, तेव्हां तेथें लोकांची अतीशय गर्दी होती. तेथें दोनचार जागीं पास दाखवून शेवटीं एकदांची पेटी मिळाली. येथें कस्टम हाउसमध्यें किती माल भरला आहे ! पेट्या, पार्सलें, पिंपें, गठ्ठे वगैरे पाहून मनुष्य अगदीं थक्क होऊन जातो. किती तरी माल समुद्रानें जातयेत असतो ! प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची कल्पना होणार नाहीं. आमची पेटी एका गोडाऊनमध्यें तळाशीं ठेविली होती. तीन-चार मजुरांनीं ती वर आणिली. त्याला लेबल् वगैरे लावून कोणत्या

बोटीवर केव्हां पाठवावयाची वगैरे सर्व व्यवस्था केली, आणि येथील मुख्य ऑफिसरला भेटून त्याच्या जवळून मीं पास घेतला.

"तो माझ्याशीं बराच वेळ बोलत बसला. 'तुह्मी इतकें उत्तम इंग्लिश बोलतां तेव्हां तुमचें शिक्षण इंग्लंडअमेरिकेमध्यें झालें असलें पाहिजे. त्याशिवाय इतकें चांगलें इंग्लिश कसें बोलतां येईल? तुह्मी इंग्लंडला कशाला जातां? तुह्माला कारोनेशनचें आमंत्रण आहे कीं काय?' असें-तसें पुष्कळ विचारूं लागला. मी त्याला होस हो देऊन कसा तरी लवकर निघून जाण्याचा विचार करूं लागलों; पण त्याचें कांहीं लवकर आटपेना.

"तो आपल्या हाताखालच्या लोकांनां बोलावून माझी सर्व हकीगत सांगूं लागला 'अहो, हे पहा इंडियन गृहस्थ किती चांगलें इंग्लिश बोलतात! यांनां इंग्लंडला कारोनेशनचें बोलावणें आहे, ह्मणून हे लवकर निघाले; नाहीं तर यांनां इकडील आणखी पुष्कळ पहावयाचें होतें,' वगैरे वगैरे.

"नंतर मला विचारूं लागला 'तुह्मीं कारोनेशनकरतां कसला पोषाक तयार केला आहे? तो आह्मांला दाखवाल काय?' असेतसे प्रश्न विचारून त्यानें माझा बराच वेळ घेतला. परंतु पेटीच्या कामांत बिचाऱ्यानें बरीच मदत केली व बोटीसंबंधीं माहितीहि चांगली दिली."

मीं मनांतल्यामनांत ह्मटलें "खरोखर, विद्वान् मनुष्य कोणत्याहि देशांत गेला, तरी त्याचा मान होतो. सर्वत्र विद्येमुळें व सद्गुणां-मुळें तो कोठेंहि झांकला जात नाहीं. नाहींतर आमच्यासारख्यांची स्थिति पहा! आमच्यासारखीं अज्ञानमाणसें कोठेंहि गेलीं, तर त्यांनां कोण विचारणार आहे?"

हे पुढें ह्मणाले "मग कस्टम हाउसमधून निघाल्यावर येथील एक ट्रेनिंग स्कूल पहावयाला गेलों. हें स्कूल कस्टम हाऊसपासून बरेंच लांब आहे. त्यामुळें तेथें पोहोंचेपर्यंत बारा वाजून गेले. तेथें

स्कूलाच्या लेडी सुपरिंटेंडंटना भेटलों. त्या बाईनें आह्मांला पुष्कळसे प्रश्न विचारण्याला सुरवात केली. 'तुह्मी कोण ? कुठचे ? अमेरिकेंत येण्याचा हेतु काय ? हिंदुस्तानांत काय उद्योगधंदा करीत असतां ?' वगैरे बरीच चौकशी केली.

"मीं तिला सांगितलें, कीं, 'मी हिंदुस्तानांत मध्यप्रदेशांत रहाणारा आहें. तेथें डे. कमिशनर आहें. हल्लीं रजेवर असून दूरदूरचे देश पहावे ह्मणून माझी पत्नी व मी जपान, अमेरिका पाहून आतां इंग्लंडला जाणार आहोंत. येथें आलोंच आहों, तेव्हां इकडील शिक्षणाची वगैरे माहिती मिळवावी, ह्मणून तुमचें स्कूल पहावयास आलों आहें.'

"असें त्या बाईला सांगितलें; पण डेप्युटी कमिशनर ह्मणजे काय? हें तिला मुळींच समजेना. ती ह्मणाली 'काय, तुह्मी क्लार्क आहां? तुह्मी मर्चंट आहां? तुह्मी सुपरिंटेंडेंट ऑफ स्कूल आहां?' असे प्रश्न विचारूं लागली.

"तेव्हां मी ह्मणालों 'होय. मी सुपरिंटेंडेंट ऑफ स्कूल आहें.' कारण डेप्युटी कमिशनर ह्मणजे काय वगैरे कोठें आतां हिला समजावीत बसूं? व वेळ खर्च करीत बसूं? ह्मणून मी सुपरिंटेंडेंट ऑफ स्कूल आहें, असेंच तिला सांगितलें. पण हें ऐकून ती फार खूष झाली असें दिसलें. ती एकदम ह्मणाली 'असें का ? मग तुह्मांला स्कूलची चांगली माहिती असेल व ह्मणूनच तुह्मी शाळा पहाण्यांत इतकें अगत्य बाळगितां. किती स्कूलची पहाणी तुह्मी करितां? तुमची हिंदुस्तानची शिक्षणाची तऱ्हा कशी काय असते? तें सर्व मला सांगा.' असें ह्मणून तिनें आपलें नोटबुक काढलें व लागली प्रश्नावर प्रश्न विचारावयाला.

"मी ह्मणालों 'शंभर शाळांची पहाणी माझ्याकडे आहे."

हें ऐकून मी हंसावयाला लागलें. तेव्हां हे ह्मणाले "कां, हसतां कशाला? डेप्युटी कमिशनरकडे शंभर शाळांची पहाणी नसते का? एका जिल्ह्यामध्यें शंभर शाळा सहज असतात. यांत मीं कांहीं खोटें तर नाहीं सांगितलें?

मग तुह्मी कशाला उगीच हंसतां ? ऐका पुढें. मग तिनें लागलेंच माझें नांव आपल्या नोटबुकांत लिहून घेतलें. 'Mr. Chitnavis, Superintendent of 100 Schools, from India.' आणखीहि बऱ्याच गोष्टी नोटबुकांत टिपून घेतल्या. या विचारपुशीमध्येंच एक वाजून गेला. घड्याळ पाहून ती आश्चर्यानें ह्मणाली 'पहा, आपण बोलत बसलों इतक्यांत एक वाजला, व आतां दोन वाजेपर्यंत शाळा बंद रहातील; तेव्हां तुह्माला तोंपर्यंत थांबलें पाहिजे. चला आतां आमच्याबरोबर लंच घ्या.'

"तुह्माला कळवण्याकरितां टेलीफोनचा पुष्कळ तलास केला, पण या हॉटेलशीं संबंध असलेला टेलिफोन तेथें नव्हता. ह्मणून तुह्माला कळवतां आलें नाहीं, व इतक्या दूर तेथें शाळा पहाण्याला गेलों होतों तेव्हां कांहीं तरी पाहिल्याशिवाय परत येणेंहि बरोबर नव्हतें, ह्मणून नाइलाजास्तव थांबावें लागलें.

"लंचला सातआठ जणी बायाच होत्या पुरुष आह्मी दोघेच होतों; एक मी व एक पोरेलासा तेथील क्लार्क होता. या बाया तेथील शाळा मास्तरणी होत्या. ती लेडी सुपरिंटेंडेंट ह्मणाली 'इकडे मुलांच्या शाळांतूनसुद्धां बहुतकरून बायकाच शिक्षकांचीं कामें करीत असतात. कारण, पुरुष मास्तर ठेवावयाचे ह्मणजे त्यांनां जास्ती पगार द्यावे लागतात.'

"लंच झाल्यावर थोड्या वेळानें शाळा सुरू झाल्या, तेव्हां लेडी सुपरिंटेंडेंट मला शाळा पहावयाला घेऊन गेली. मुलांच्या एकदोन शाळा पाहिल्यावर मुलींच्या शाळेंत नेलें. तेथें दर क्लासामध्यें लेडी सुपरिंटेंडेंट आपली हा पाढा वाचूं लागली 'I have the pleasure of introducing you Mr. Chitnavis from India, the Superintendent of 100 schools.'

"असा हा पाढा प्रत्येक क्लासामध्यें वाचावयाचा, तेव्हां अर्थात्‌च त्या सर्व मुलींनां उठून आह्मांला सलामी द्यावी लागे. या क्लासांतून कांहीं बारा वर्षांच्या वयाच्या मुली होत्या, कांहीं सोळा वर्षांच्या होत्या व कांहीं वीस वर्षांच्या होत्या. लेडी सुपरिंटेंडेंट मला विचारूं लागली 'मि. चिटणवीस, या बारा वर्षांच्या मुली जर हिंदुस्तानांत असत्या तर यांचें काय झालें असतें ?'

"यांचीं लग्नें झालीं असतीं."

"या सोळा वर्षांच्या व वीस वर्षांच्या मुलींचें काय झालें कसतें?"

"यांनां एकएक, दोनदोन मुलें झालीं असतीं."

"हें ऐकून मग काय ? लागली मोठमोठ्यानें ओरडून त्या मुलींनां सांगायला 'बारा वर्षांच्या मुलींनों ! तुह्मी जर हिंदुस्तानांत असतां तर तुमचीं लग्नें झालीं असतीं. सोळा वर्षांच्या व वीस वर्षांच्या मुलींनों ! तुह्मी जर हिंदुस्तानांत असतां, तर या वयांत तुह्मांला एकएक, दोनदोन मुलें झालीं असतीं.' हें ऐकून एक बारातेरा वर्षांची हुषारशी मुलगी चटकन् उठून उभी राहिली व मोठ्यानें ह्मणाली 'Thank God we are not in India !' हें पाहून सर्व मुली हंसूं लागल्या व सर्वांनीं एकदम टाळ्यांचा गजर केला.

"मग लेडीसुपरिंटेंडेंट ह्मणाली 'तुह्मी कांहीं तरी भाषण करा, अथवा या मुलींनां कांहीं उपदेश करा.'

"मीं मनांत ह्मटलें 'या बाईचें कांहीं लवकर सरतच नाहीं ! आतां काय करावें ?' मग एक लहानसें स्पीच केलें व तिला सांगितलें, कीं, 'आतां मला गेलेंच पाहिजे; कारण माझ्या बायकोला काळजी लागली असेल, कीं माझें काय झालें व काय नाहीं !'

"नंतर तेथून निघालों, तो कोठें दुकानांत वगैरे न जातां तडक हॉटेलांत आलों, आणि येथें आलों तर मी जसें भविष्य केलें होतें, तशाचप्रमाणें तुमची स्थिति झालेली दिसली !"

अशी शाळेंत घडलेली हकीकत यांनीं मला सांगितली, आणि तेथील शिक्षणपद्धतीविषयीं व तेथील व्यवस्था वगैरेविषयीं जें नोटबुकांत टिपून आणलें होतें, तें दाखविलें. 'लेडीसुपरिंटेंडेंट ह्मणाली कीं, 'मुलींनां रागें भरण्याचासुद्धां आह्मांला हुकूम नाहीं, मग मारणार कुठचें? त्यांनीं जर चुकी केली अथवा अपराध केला, तर त्यांनां चांगल्या रीतीनें समजावून सांगावयाचें व पुन: असें करूं नका ह्मणून उपदेश करावयाचा,' वगैरे.

आतांपर्यंत न्यूयार्कमध्यें आह्मी बऱ्याच पहाण्यायोग्य जागा व स्थळें वगैरे पाहिलीं होतीं, व रोजरोज फिरून जरा कंटाळा आल्यासारखें झालें होतें. ह्मणून आज आह्मी कोठें न जातां लवकरच निजावयाला गेलों. नुकतेच बारा वाजले होते. खोलींतील दिवे वगैरे विझवून बिछान्यावर पडलों व थोडा कुठें डोळा लागतो न लागतो, तोंच एकदम आमच्या टेलिफोनकडून किर्रर्रर्र असा आवाज ऐकूं आला. आह्मी दोघेंहि टेलिफोन टेलिफोन करीत बिछान्यावर उठून बसलों व हे लागलीच टेलिफोनजवळ गेले. मला थोडी भीति वाटली, कीं, कधीं नाहीं व आजच एवढ्या रात्रीं कोणाचा बरें टेलिफोन आला असेल? हा टेलिफोन आमचे मित्र मि. म्याकरॉय यांच्याकडून आला होता. न्यूयार्कला आल्याबरोबर त्यांनीं ज्या हॉटेलचा आपला पत्ता दिला होता, त्या पत्त्यावर त्यांनां आह्मीं पत्र पाठविलें होतें. परंतु ते आपल्या वतनाच्या गांवीं गेले होते, व याच रात्रीं अकरा वाजतां न्यूयार्कला परत आले होते. त्यांनां आमचें पत्र पोहोंचलें तसाच त्यांनीं आह्मांला टेलिफोन केला व 'उद्यां एक वाजतां लंचला या' ह्मणून सांगितलें.

मिस्टर व मिसेस् म्याकरॉय न्यूयार्कला आलीं, हें पाहून आह्मांला फार आनंद झाला. आह्मांला त्यांनां पत्र लिहून बरेच दिवस झाले होते. परंतु त्यांच्याकडून कांहींच उत्तर आलें नसल्यामुळें आह्मांला वाटलें 'कदाचित् हॉटेलची चुकामूक झाली असेल, त्यामुळें आमचें

पत्र त्यांनां मिळालें नाहीं, व आतां त्यांची व आपली भेट होणार नाहीं. ह्मणून आमची बरीच निराशा झाली होती. कारण, त्यांनीं सांगितलें होतें, कीं, आह्मी तुह्मांला न्यूयार्कमध्यें पुष्कळ माहिती व चांगल्या लोकांच्या भेटी वगैरे करून देऊं. तीं उभयतां आमचीं चांगलीं व प्रेमळ मित्र होतीं. तेव्हां त्यांनां भेटल्यावांचून अमेरिका सोडणें ह्मणजे आह्मांला एकप्रकारची निराशाच वाटत होती.

दुसऱ्या दिवशीं एक वाजतां आह्मी आंटोनिया हॉटेलमध्यें गेलों. तेथें मिस्तर म्याकरॉय यांनीं स्वतंत्र खोल्या घेतल्या होत्या, व त्यांनीं आपले नोकर ठेवून स्वयंपाकाची वगैरे स्वतंत्र व्यवस्था केली होती. हें हॉटेल आमच्या हॉटेलपासून बरेंच दूर होतें, आणि तें शहराच्या निवांत भागांत असल्यामुळें तेथें चांगली शांतता होती. आमच्या हॉटेलसारखी रात्रंदिवस गाडीघोड्यांची व ट्राम वगैरेची खडखड धडधड नव्हती.

मिस्तर व मिसेस् म्याकरॉय यांच्या खोल्या हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर होत्या. आह्मी तेथें पोंहोंचल्यावर त्यांचें नांव सांगितलें, तेव्हां लिफ्टवाल्यांनीं आह्मांला नेमकेंच त्यांच्या दरवाज्याजवळ उतरवलें. मिसेस् म्याकरॉय बाहेर येऊन आह्मांला आंत घेऊन गेल्या.

लंचला आमच्याशिवाय त्यांची एक भाची व एक तरुण मित्र होता. हा तरुण गृहस्थ फार बोलका होता. कोणचाहि विषय निघाला, कीं, हा त्याच्यावर लांबलचक भाषण करीत असे.

मिस्तर म्याकरॉय यांची न्यूयार्कच्या जवळच कांहीं शेतीभाती व घर आहे. पण हे बहुतकरून न्यूयार्क येथेंच रहातात. हे गरीब लोकांच्या उन्नतीकरितां चाललेल्या चळवळींत नेहमीं भाग घेतात. यांनीं आह्मांला येथें आणखी एकदोन महिने रहाण्याला पुष्कळ आग्रह केला. ते ह्मणाले " येथील कांहीं पुढारी लोकांच्या तुमच्याशीं ओळखी करून देतों व येथील उपयोगी संस्थांची वगैरे माहिती करून देतों." परंतु आह्मांला वेळ नसल्यामुळें त्यांचें ह्मणणें मान्य करतां आलें नाहीं. उपाहारानंतर मि. व मिसेस् म्याकरॉय यांच्याबरोबर आह्मी नाटक पहावयाला गेलों.

तारीख ७ जूनला ब्रेकफास्टनंतर आह्मी रत्नागिरीच्या एक मिशनरी बाई मिस् जेफरसन ज्या बोटीवर आमच्याबरोबर होत्या व ज्यांनीं आपला न्यूयार्कचा पत्ता व न्यूयार्कमध्यें त्या केव्हां येतील ती तारीख वगैरे आह्मांला लिहून दिली होती, त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. या आपल्या एका मैत्रिणीकडे उतरल्या होत्या. या बाईची एक खाजगी शाळा आहे. येथें वीस विद्यार्थिनी रहाण्याची सोय आहे. तेथील मुलींमध्यें दोघी जपानी मुली होत्या. "या जपानी मुलीहि शिकण्यामध्यें व शिवणकामामध्यें वगैरे फार हुषार आहेत," असें ती बाई ह्मणाली.

नंतर मिस् जेफरसन व त्यांची मैत्रीण यांनीं आह्मांला येथील सर्व व्यवस्था दाखविली. येथें मुलींचीं सर्व कामें त्यांचीं त्यांच्याकडूनच करविलीं जातात. बिछाने घालणें, झाडपूस करणें, आपआपले कपडे धुणें, जोडे वगैरे पालिश करणें, स्वयंपाक करणें हीं सर्व कामें अगदीं वेळच्या वेळीं करावयाचीं; त्यांमध्यें मग दोनचार मिनिटांचासुद्धां मागेंपुढें फरक होतां कामां नये. कारण, मुलींना वेळेची किंमत चांगली समजली पाहिजे, असें ती शिक्षकीण बाई ह्मणाली. अशा तऱ्हेनें येथें मुलींनां फार चांगलें शिक्षण दिलें जातें, व मुलींची घरच्यासारखी सर्व तऱ्हेनें काळजी घेतली जाते. त्यामुळें येथें त्यांनां शाळेसारखें वाटत नाहीं.

दुपारीं मिस्टर व मिसेस् म्याकरॉयबरोबर बेसबॉल म्याच् पहावयाला गेलों. हा येथील लोकप्रिय राष्ट्रीय खेळ आहे. दुसऱ्याहि आणखी घोड्यांच्या शर्यती व येरोप्लेनच्या शर्यतीहि पाहिल्या. येथें जागजागीं वर्तमानपत्रकार बसले होते. ते जें कांहीं होईल, तें भराभर टाइप रायटरनें लिहून घेत होते, व लागलीच आपपाल्या प्रेसला टेलिफोननें अथवा तारेनें कळवीत होते. ह्मणून इकडे खेळ वगैरे आटोपले नाहींत, तोंच तिकडे वर्तमानपत्रांतून सर्व बातमी शहरांत लोकांनां समजत होती. तसेंच तेथें पुष्कळ फोटोग्राफरहि होते, त्यांचीहि फोटो घेण्याची गडबड चालली होती. शिवाय, पुष्कळ बाया लहानलहान

कॅमेरे घेऊन झटझट फोटो घेत होत्या, व इकडूनतिकडे झपाट्यानें जातयेत होत्या. हा सर्व देखावा फार मनोवेधक दिसत होता.

येरोप्लेनच्या रेसेसहि फार मौजेच्या दिसत होत्या. सर्व येरोप्लेन्स आकाशामध्यें इकडेतिकडे फिरतांना खालून पाहिलें, ह्मणजे जशा कांहीं घारी उडताहेत असें दिसत होतें. जे जिंकतील त्यांनां चांगलीं चांगलीं बक्षिसें ठेविलीं होतीं. या येरोप्लेन्समध्यें नेहमीं अपघात होत असतात, तरीहि हे लोक प्रयत्न सोडीत नाहींत. हे फार धाडसी लोक असतात.

रात्रीं जेवणानंतर आह्मी पुनः नाटक पहावयाला गेलों. अमेरिकेंत आह्मी बरींच नाटकें पाहिलीं. परंतु इंग्लंडच्या नाटकांची बरोबरी इकडील नाटकें करूं शकत नाहींत. सीनसीनरीमध्यें, ॲक्टरॲक्ट्रेसेस्‌मध्यें, वाद्यांमध्यें, अथवा कोणच्याहि तऱ्हेनें इंग्लंडची बरोबरी करूं शकत नाहींत, असें मला तर वाटलें. मग दुसऱ्यांचा अनुभव वेगळा असेल तर कोण जाणे.

तारीख ८जून रोजीं संध्याकाळीं आह्मी कोनी ऐलंड पहावयाला गेलों. हें न्यूयार्कपासून सुमारें २९ मैल आहे. येथें जावयाला आह्मांला पुष्कळ ट्रेन्स बदलाव्या लागल्या. खालच्या, वरच्या जमिनींतल्या सर्व गाड्यांचा अनुभव घ्यावा लागला. या जिन्यानें त्या जिन्याकडे धांवा, त्या जिन्यानें या जिन्याकडे पळा, अशी चढउतर करतांना माझी अगदीं त्रेधा उडून जात असे. बरें, या गाड्या तरी कशा ? उगीच एक सेकंडभर थांबावयाच्या, व दर गाडीला लोकांची अतोनात गर्दी असावयाची. तेव्हां अशा या गर्दीतून कोणच्या तरी डब्यांत चटदिशीं शिरलें पाहिजे. नाहीं तर झालें, गेली गाडी निघून! मग आणखी चारपांच मिनिटें वाट पहावी लागणार; तेव्हां दुसरी गाडी मिळावयाची, व इकडे तर दोनचार मिनिटांची खोटी झाली कीं तेवढ्यानें सर्व प्रोग्राम चुकतो.

अगदीं संध्याकाळीं आह्मी या ऐलंडला पोहोंचलों. येथील एक्झिबिशन-सारखी सर्व कांहीं व्यवस्था आहे; आणि हें लोकांच्या करमणुकीकरितां बाराहि महिने चालू असतें. येथें करमणुकीच्या अनेक तऱ्हेच्या योजना केल्या आहेत.

रात्रीच्या वेळीं विजेच्या दिव्यांनीं प्रकाशित झालेली अशी ही जागा फारच शोभिवंत दिसत होती. स्त्रीपुरुषांच्या झुंडीच्या झुंडी आपापलीं मुलेंबाळें व इष्टमित्र घेऊन रस्त्यानें इकडूनतिकडे आनंदानें फिरत होत्या. ठिकठिकाणीं ब्यांडचे व इतर आणखी वाद्यांचे सुस्वर ध्वनि लोकांचीं मनें आकर्षण करीत होते. समुद्राची थंड आणि स्वच्छ हवा स्वेच्छेनें सर्वत्र खेळत होती व त्यामुळें मनाला व शरीराला फार हुषारी व आनंद वाटत होता.

एके ठिकाणीं कांहीं बायकापुरुषांनीं जनावरांचीं आणि पक्ष्यांचीं वगैरे सोंगें घेतलीं होतीं, तीं पहावयाला आह्मी तेथें गेलों. तेथें काय एकसारखें हंसणें, ओरडणें, धांवणें, खिदळणें, चाललें होतें. कांहीं मनुष्य शहामृग झाले होते, कांहीं मोर झाले होते, कांहीं मोठमोठे बेडूक झाले होते. कांहीं बाया अस्वली झाल्या होत्या. अशीं यांनीं निरनिराळीं सोंगें घेतलीं होतीं. कोणीहि प्रेक्षक आले, कीं, हीं जनावरें गमतीनें त्यांच्या अंगावर धांवावयाचीं. तसेंच बायका, पुरुष व मुलें इकडेतिकडे पळावयाचीं, ओरडावयाचीं, किंकाळ्या फोडावयाचीं व मग एकच हंशा पिकावयाचा.

मी जशी तेथें गेलें, तसा एक शहामृग व एक अस्वल जे माझ्या अंगावर ख्या ख्या करीत आले, तशी मला भीति वाटली व मी दुसरीकडे पळावयाला लागलें, तों तिकडून एक मोठा थोरला बेडूक टणाटण उड्या मारीत आला, तशी मी खूप ओरडायला लागलें. तेव्हां हे मला रागें भरूं लागले, कीं, तीं माणसें आहेत, त्यांना काय उगीच भितां, व ओरडतां ? ती माणसें आहेत हें जरी मला ठाऊक होतें, तरी

तीं अगदीं जनावरांसारखीं दिसत होतीं व आपल्या अगदीं जवळ आलीं ह्मणजे कसेंसेंच वाटत होतें. तीं अगदीं जवळ आलीं ह्मणजे आपलें खरें तोंड एकदम बाहेर काढावयाचीं व मोठ्यानें हंसावयाचीं. असा येथें गोंगाट व हंशा पिकला होता, व या विस्तीर्ण हॉलमध्यें वेषधारी जनावरें व माणसें एकमेकांच्यामागें सैरावैरा धांवत होतीं.

मग आणखी कांहीं खेळ पहातपहात एके जागीं दरवाज्यावर एक मनुष्य ओरडत होता ‘ Biggest men and biggest women in the world !’ तेथें आल्यावर हे ह्मणाले “ चला जाऊं कसे ते जगांतले सर्वांत मोठे पुरुष व बायका आहेत, त्या पाहूं ! ” दरवाज्यावर तिकीट घेऊन आह्मी आंत गेलों. या हॉलमध्यें दिवे अगदीं मंद होते व मधेंमधें लांकडी कठडे लावलेल्या टाक्यासारख्या ह्मणा, कीं घरकुलासारख्या ह्मणा, जागा केल्या होत्या. त्या जागांतून एकएक खुर्ची मांडून एकएक बाई व एकएक मनुष्य बसला होता. त्यांच्यापैकीं अर्धे निग्रोज् होते व अर्धे यूरोपियन होते. हे सर्व बायकापुरुष खूप मोठेमोठे आणि अक्राळविक्राळ दिसत होते. विशेषतः ते निग्रोज् तर राक्षसांसारखेच दिसत होते. कारण, हे लोक अतिशय काळे व अगदीं ओबडधोबड असतात. हे सर्व लोक स्वभावतःच इतके लठ्ठ दिसत होते, अगर कपडे वगैरे घालून त्यांनीं आपलीं अंगें फुगवलीं होतीं, कोण जाणे ! एक तर रात्रीची वेळ होती व दिवेहि मंद होते. त्यामुळें कांहीं बरोबर समजत नव्हतें. कांहीं प्रेक्षक बाया त्यांनां उठून उभें रहाण्यास सांगत होत्या व त्यांच्याजवळ जाऊन त्यांना इकडूनतिकडून पहात होत्या. हें बायकापुरुषांच्या लठ्ठपणाचें एक्झिबिशन मोठें चमत्कारिक दिसत होतें. बिचारे पैशासाठीं येऊन बसत असतील, दुसरें काय ?

नंतर एके जागीं नशीब सांगणारे लोक बसले होते, तेथें आह्मी गेलों. माझ्या मनांत तेथें जावयाचें नव्हतें; कारण एक तर रात्र बरीच

झाली होती, व दुसरें संध्याकाळपासून एकसारखें इकडेतिकडे फिरून माझे पाय फार दुखूं लागले होते व अतिशय थकवा आला होता. ह्मणून मीं यांनां ह्मटलें " काय उगीच नशीब नि फशीब विचारायचें आहे ? माझा नाहीं त्यांच्यावर विश्वास व आतां आपल्यासारख्या अर्धवयी माणसांचें काय नशीब विचारायचें आहे ? झालें. आतां कळलेंच आहे नशीब. मुलांबाळांचें नशीब विचारलें तर कांहीं तरी बरें. चला आतां लवकर बिऱ्हाडीं. आतां माझ्यानें नाहीं अधिक फिरवत."

पण यांच्या मनांत तेथें जावयाचें दिसलें. तेव्हां आह्मी तिकीट घेऊन आंत गेलों. तेथें नशीब सांगणारी मुख्य एक बाई होती व पांचसहाजण पुरुष होते. त्या सर्व पुरुषांनीं फकिरांचीं सोंगें घेतलीं होतीं, गळ्यांत मोठमोठ्या मण्यांच्या माळा घातल्या होत्या, अंगामध्यें भगव्या छाट्या घालून लांबलांब पांढऱ्या दाढ्या लावल्या होत्या आणि तसेंच डोळ्यांवर पांढऱ्या केंसांचें वेटाळें लावलें होतें. ही सर्व मंडळी अमेरिकनच होती. मध्यें बाई बसली होती व तिच्या भोंवतीं हे सर्व फकीर बसले होते. बाईनें डोळ्यांमध्यें सुरमा वगैरे घालून तोंडाला पुष्कळशी पावडरहि लाविली होती, व अंगामध्यें एक उंची जपानी किमोनो घालून चांगल्या भव्य रीतीनें बसली होती.

हे बाईजवळ गेले व तिला हात दाखवून कांहीं प्रश्न यांनीं विचारले. जसे आपल्या इकडील हात पहाणारे सांगतात, त्याप्रमाणेंच तिनेंहि कांहींतरी सांगितलें. "तुह्माला मागें अमक्याअमक्या वर्षी असें असें झालें होतें; पुढें आतां मोठें गंडांतर आहे; मग पुढें मोठा भाग्योदय होणार आहे; तुह्मांला कांहीं शत्रु आहेत, पण तेहि पुढें मित्र होतील; तुमचें मन मोठें चेंजेबल् आहे," असेंतसें बरेंच कांहीं सांगितलें. मग हे लागले तिच्या सांगण्यावर टीका करायला. "सर्वांनांच कांहीं शत्रू व कांहीं मित्र असतातच; सर्वांनांच कधींमधीं गंडांतर येत असतात, व कधींमधीं भाग्योदय होत असतो. सर्वांचींच मनें चेंजेबल् असतात."

याबरोबर ती बाई जरा चिडली व ह्मणाली " असें कसें ह्मणतां ? सर्वांचींच मनें चेंजेबल् असतात काय ? माझें मन चेंजेबल् नाहीं, व पुष्कळांचीं मनें चेंजेबल् नसतात."

यावर हे ह्मणाले "चला आतां येथून लवकर. आतां बाई फार चिडली. आतां तिला जास्त चिडवून उपयोग नाहीं." नंतर आह्मी लवकरच स्टेशनाकडे गेलों.

या वेळीं पुष्कळ रात्र झाली होती. ह्मणजे सुमारें एकदीड वाजला होता. तरीहि गाड्या दोनदोन चारचार मिनिटांनीं एकामागें एक धांवतच होत्या, आणि एवढी रात्र झाली होती तरी सर्व ट्रेन्स् माणसांनीं अगदीं गच्च भरलेल्या दिसत होत्या. आह्मी स्टेशनावर पोहोंचलों न पोहोंचलों, तोंच ट्रेन येऊन थडकली. मग लवकर तिकिटें घेऊन लोकांच्या गर्दींतून धांवपळ करीत एका डब्यांत शिरलों. अशा रीतीनें तीनचार ट्रेन्स बदलीत एकदांचीं दोहोंच्या सुमाराला हॉटेलांत जाऊन पोहोंचलों.

रस्त्यांत रात्रीच्या वेळचा देखावा फार चांगला दिसला. जेव्हां आह्मी अगदीं वरच्या ट्रेनमध्यें बसलों होतों, तेव्हां खालील सर्व देखावा चांगला पहाण्यांत येत होता. शेंकडों ट्रेन्स्, ट्रामवे, मोटारबसेस् वगैरे जिकडेतिकडे सैरावैरा धांवत होत्या, व स्त्रीपुरुषांचे जमाव मुंग्यांसारखे रस्त्यांरस्त्यांनीं फिरत होते. मोठमोठ्या हॉटेलांतून लोकांची सपर घेण्याची धांदल चालली होती, व नाटकगृहें बंद झाल्यामुळें प्रेक्षक लोकांची आपापल्या ठिकाणीं जाण्याची गडबड चालली होती. अशीं आह्मी वरच्या, खालच्या, तळच्या वगैरे सर्व गाड्यांत बसत, अनुभव घेतघेत व अनेक तऱ्हेचे देखावे पहात, दोन वाजतां हॉटेलांत आलों. आमच्या हॉटेलांतहि अजून गडबड चाललीच होती. कांहीं लोक सपर घेत होते, कांहीं ड्रिंक्स घेत होते, कांहीं वर्तमानपत्रें वगैरे वाचीत होते व हिशेब ठेवणाऱ्या व टेलिफोन वगैरे चालविणाऱ्या मुली आपापल्या पाळीप्रमाणें हजर होत होत्या.

तारीख ९ जून रोजीं ब्रेकफास्टनंतर आह्मी मिस्तर व मिसेस् म्याक-रॉय यांनां गुडबाय करण्याला गेलों. तेथें त्यांनीं लंचची व चहाची तयारी करून ठेविली होती. लंच वगैरे झाल्यावर आह्मी गोष्टी बोलत बसलों. मिस्तर. म्याकरॉय पुनःपुनः प्रस्ताव करीत होते, कीं येथें आल्यावर आह्मी लौकरच चाललों, कांहीं जास्त दिवस राहिलों नाहीं. त्यांची अशी फार इच्छा होती, कीं, आह्मांला आपल्या गांवाला न्यावें व आपलें घर आणि शेतीभाती वगैरे दाखवावीं. ह्मणून दोघेंहि नवराबायको फार प्रस्तावना करीत होतीं. हा त्यांच्या मनाचा किती मोठेपणा समजला पाहिजे ! नाहीं तर आह्मी कोण, कुठलीं, कुठच्या कोठें परकीय देशांत रहाणार, अथवा कांहीं फार दिवसांचीं ओळखीचीं नाहीं किंवा परिचयाचीं नाहीं, अथवा आमच्या-पासून त्यांनां कांहीं फायदा कीं हित कांहींच साधावयाचें नव्हतें. फक्त प्रेम—जगामध्यें खरें प्रेम हीच मोठी चीज आहे. असें खरें प्रेम करणारीं माणसें विरळा असतात. ह्मणून मिस्तर व मिसेस म्याकरॉय यांनीं आमच्याविषयीं जें प्रेम व आदर दाखविला, त्याची आह्मांला नेहमीं आठवण राहील.

नंतर मिस्तर म्याकरॉय आपल्या बायकोला ह्मणाले " Boby dear, sing something for our friends. "

मिसेस म्याकरॉय ह्मणाल्या "येथें माझ्याजवळ पियानो नाहीं कीं कांहीं नाहीं. तसेंच गाणें कसें बरें वाटेल ? पण मला जसें येईल तसें ह्मणतें."

मग मिसेस म्याकरॉयनीं चांगल्या उंच स्वरांत दोनतीन गाणीं ह्मटलीं. शेवटीं एक गाणें ह्मटलें तें फार टाचिंग ( हृदयस्पर्शी ) होतें. 'तुह्मी दूर देशीं जातां, पण आह्मी तुह्मांला विसरणार नाहीं. तुह्मीं आह्मीं मिळून आनंदांत वेळ घालवला, त्याची वारंवार आठवण येईल,' वगैरे तऱ्हेचें तें गाणें होतें.

प्रकरण पांचवें.

# अमेरिकेंतून इंग्लंडांत.

तारीख १० जूनला ब्रेकफास्ट घेऊन सकाळीं ९ वाजतां व्हाइट-स्टार कंपनीच्या सेलटिक नांवाच्या बोटीवर आह्मी चढलों. या कंपनीच्या तीनचार बोटी कारोनेशनला जाणाऱ्या लोकांनां घेऊन पूर्वींच गेल्या होत्या व ही सेलटिक बोट आतां शेवटलीच भरती घेऊन जात होती; ह्मणून या वेळीं बोटीवर खूपच गर्दी होती.

बोटीवर बहुतेक अमेरिकन होते व कांहीं कॅनेडियनहि होते. ही सर्व मंडळी कारोनेशन पहाण्याकारितांच चालली होती. आह्मी डेकवर गेलों, तेव्हां वर्तमानपत्रांचे पांचसहा एडिटर्स आमच्या भोंवतीं जमा झाले व जे ते आह्मांला विचारूं लागले " तुह्मी कोठून आलां? केव्हां आलां? तुमचें नांवगांव काय? तुमचा इकडे येण्याचा उद्देश काय? आह्मांला सर्व सांगा. आह्मांला आमच्या गॅझेटमध्यें लिहावयाचें आहे. तुह्मी हिंदुस्तानांतील कोणी राजे आहां कीं काय?"

यावर त्यांच्यातील एकजण घाईघाईनें ह्मणाला " अरे हो, हे हिंदुस्तानांतील कोणी तरी राजेच आहेत, हें विचारण्याचीच काय जरूर आहे? कारण या बाईच्या कपाळीं जो 'रेड मार्क' आहे, तेंच राजचिन्ह आहे, हें मला चांगलें माहीत आहे." असे हे लोक आमच्या उत्तराची वाट न पहातां आपापसांतच वाटाघाट करूं लागले.

हे ह्मणाले "आह्मी राजे नाहीं अथवा महाराजे नाहीं! मी हिंदुस्तानांतील एक सरकारी कामगार आहें. हल्लीं मी रजेवर असून या सुटीच्या दिवसांत कांहीं देश पहावे ह्मणून आह्मी जपान, अमेरिका वगैरे पाहून आतां अनायासें कारोनेशनची वेळ आहे ह्मणून इंग्लंडला जात आहों. असें जें खरें आहे, तें तुह्मांला सांगितलें." असें यांनीं त्या लोकांनां सांगितलें; परंतु त्यांच्यापैकीं कांहींजणांनां तें खरें वाटेना.

ते ह्मणाले " नाहीं, तुह्मी कांहीं तरी आमच्याजवळून लपवून ठेवितां. तुह्मी राजे नाहीं तर प्रिन्स व प्रिन्सेस् असाल !"

इकडील बऱ्याच लोकांचा असा समज असतो, कीं, इकडे येणारे एक तर राजे असतात, अथवा व्यापारी लोक असतात, आणि व्यापारी लोक बहुतकरून बायका बरोबर आणीत नाहींत. तेव्हां आह्मी कोणी तरी हिंदुस्तानांतील राजेच असलों पाहिजे, व या कल्पनेला आधार कोणता, तर माझ्या कपाळचें कुंकू व गोंधणें. त्यांनीं हीं राजचिन्हें ठरविलीं! मग त्यांनीं आह्मां दोघांचे बरेचसे फोटो वगैरे घेऊन व लंडनमध्यें आह्मी कोठें उतरणार, किती दिवस रहाणार वगैरेंची चौकशी करून स्वाऱ्या निघून गेल्या.

आमच्या हॉटेलचा मॅनेजर आह्मांला पोहोंचवावयाला बोटीवर आला होता, व आमच्याकारितां कांहीं तरी करावें ह्मणून बिचारा इकडेतिकडे गडबडसडबड करीत होता. कुठें स्ट्यूवर्डला जाऊन सांगत होता कीं, यांची चांगली व्यवस्था ठेवा, तर कुठें परसरला तसेंच सांगत होता. हे त्याला ह्मणाले " तुह्मी कशाला एवढी तखलीफ कारितां ? त्या लोकांचें तें कामच आहे, व तें ते आपोआप करतीलच, व त्यांनां केलेंच पाहिजे. पुनः आमचा हा कांहीं पहिलाच प्रवास नाहीं. आतां हे बोटीचे प्रवास आमच्या अंगवळणींच पडले आहेत."

दोनतीन दिवसांपूर्वींहि तो यांच्या मागें लागून यांनां बोटीवर घेऊन आला होता, व इकडेतिकडे फिरून बोटीचे कांहीं भाग वगैरे त्यांनीं पाहिले होते. कसेंहि असो. त्याची बिचाऱ्याची मनापासून इच्छा होती, कीं, आह्मांला कांहीं तरी मदत करावी. त्याच्या खटपटीचा एवढा परिणाम झाला, कीं, आह्मां दोघांकारितां एक लहानसें जेवणाचें टेबल डायनिंग रूमच्या शेवटाला वेगळेंच मांडलें. कदाचित् त्यांनां वाटलें असेल, कीं, आह्मांला दुसऱ्या कोणाच्या बरोबर बसणें आवडणार नाहीं. आमच्या टेबलाजवळ आणखीहि लहानलहान दोघांतिघांचीं टेबलें

होतीं. तेथें दोघे मित्र अथवा नवराबायको अशीं बसत होतीं. ह्मणून या बाजूला आह्मी कांहीं एकटींच नव्हतों. सर्व डायनिंग रूमभर बाजू-बाजूंनीं अशींच लहानलहान टेबलें होतीं, व मध्येंमध्यें लांब टेबलें मांडून पुष्कळ लोक बसण्याची व्यवस्था केलेली होती.

न्यूयार्कच्या बंदरांतून बोट निघाली, तेव्हां पॅसेंजर्स लोकांच्या मित्रमंडळींनीं, व आप्त वगैरे लोक जे पोहोंचवावयाला आले होते त्यांनीं हिप् हिप् हुर्रे करून खूप मोटा गोंगाट केला, व डेकवरील लोकांनींहि तसेंच केलें. बोट अगदीं दृष्टीआड होईपर्यंत सर्वांचे हातरुमाल हलत होते. हा देखावा फार चित्तवेधक दिसत होता.

संध्याकाळचे पांच वाजले होते. बोटीवरील सर्व पॅसेंजरलोक चहा वगैरे घेऊन डेकवर शांतपणानें बसले होते. कांहीं बाया लेस वगैरे विणून आपला वेळ घालवीत होत्या. कांहीं पुस्तकें वाचण्यांत गढल्या होत्या, व कांहीं तरुण स्त्रीपुरुष व्यायाम घेण्याकारितां डेकवर अनेक तऱ्हेचे खेळ खेळत होते. अशीं सर्वजणें आपापल्या उद्योगांत गुंतलीं होतीं. बोटहि आतां अफाट समुद्रांत आल्यामुळें आपला पुढील मार्ग झपाट्यानें क्रमीत होती, व समुद्राचें पाणी जिकडेतिकडे निळें व शांत दिसत होतें.

अशा शांततेमध्यें बोटीच्या पुढील टोंकाकडे एकदम गोंगाट सुरू होऊन लागलीच बोट उभी राहिली, आणि सर्व खलाशी लोकांनीं भराभर लहानलहान होड्या खालीं सोडल्या. बोटीवर सर्वत्र एकच गडबड उडाली. हें आहे तरी काय, ह्मणून सर्व पॅसेंजर्स लोक पुढील टोंकाकडे धांवूं लागले. एकाएकीं बोट थांबली व जिकडे तिकडे गडबड सुरू झाली. तेव्हां पॅसेंजर्स लोकांनां भीति वाटणें साहजिकच होतें.

तेथें जमा झाल्यावर सर्वांनां समजलें, कीं, भिण्याचें कांहीं कारण नसून बोटीला कांहीं अपघात वगैरे झालेला नाहीं; परंतु येथून मैल

दीड मैलावर एक बोट आहे, त्या बोटींतील एक मनुष्य समुद्रांत पडला. त्या बोटीनें या बोटीला अलार्म सिग्नल दिला, ह्मणून ही बोट त्यांनां मदत करण्याकरितां थांबली. ज्या ठिकाणीं समुद्रांत तो मनुष्य पडला होता, तेथें एक मोठा तरंगणारा लाल दिवा सोडला होता. त्या दिव्याजवळ खलाशी लोक इकडूनतिकडून लहानलहान होड्यांतून जमा झाले व त्या मनुष्याला काढलें. हा मनुष्य त्या बोटीवरील खलाशी होता.

कोणी ह्मणूं लागले "तो दारू प्याला होता." कोणी ह्मणूं लागले "त्यानें बुद्धयाच समुद्रांत उडी टाकिली." कोणी ह्मणे "त्याचा झोंक गेला." अशा सत्रांच्या सत्रा गोष्टी मग सुरू झाल्या. एवढें खरें, कीं, लागलीच सर्वांनीं मदत करून त्या मनुष्याला समुद्रांतून जीवंत काढलें, व त्याच्या बोटीवर त्याला पोहोंचतें केलें. या गडबडीमुळें आमच्या बोटीला तेथें दोन तास मोडावे लागले.

एकदोन दिवसांत बोटीवर आमच्या बऱ्याच जणांशीं ओळखी झाल्या. त्यांमध्यें एक कानडाचे गृहस्थ मिस्तर स्माल व त्यांची पत्नी हीं दोघें आमच्याशीं फार चांगल्या रीतीनें व ममतेनें वागत असत. हे कानडामध्यें बॅरिस्टर होते व कारोनेशनकरितां इंग्लंडला जात होते.

दुसरीं दोघें नवराबायको फिलाडेल्फियाचीं रहाणारीं होतीं. तीं दोघेंहि फार चांगल्या स्वभावाचीं होतीं. तीं दोघेंहि नेहमीं डेकवर आमच्याजवळ बसून अमेरिकेंतील बरीच माहिती सांगत असत. त्यामुळें आमची बरीच करमणूक होत असे, व वेळ कंटाळवाणा वाटत नसे. या दोघांहि नवराबायकोला संस्कृत थोडेंथोडें समजत असे. ह्मणून तीं दोघे यांनां संस्कृतांतील श्लोक वगैरे नेहमीं विचारीत असत. अमेरिकेमध्यें विवेकानंदस्वामी आले होते, त्यांच्याविषयींहि ते पुष्कळ गोष्टी सांगत असत.

ते ह्मणाले "आह्मी बऱ्याच वेळां विवेकानंदस्वामींचीं व्याख्यानें ऐकावयाला गेलों होतों. तीं संस्कृतांत व वेदांतावर असल्यामुळें आह्मांला

फारशीं समजत नसत, व ह्मणून आह्मांला त्यांत विशेष उत्सुकता वाटत नसे. परंतु आमच्या अमेरिकन बाया कांहीं विचारूं नका! समजो न समजो, झुंडीच्याझुंडी चाललेल्या असावयाच्या, व तो स्वामी तरुण आणि जरा गोरागोमटा असे, मग काय ? या आमच्या अमेरिकन बाया त्याच्याभोंवतीं अगदीं मोहळासारख्या जमत असत," असें बोलून हे गृहस्थ हंसून आपल्या बायकोला ह्मणाले "कां, मी ह्मणतों तें खरें आहे कीं नाहीं?"

यावर त्याची बायकोहि हंसून ह्मणाली "होय, खरें आहे. पण त्यांत थोडी अतिशयोक्तिहि आहे. आह्मी अमेरिकन बाया महत्त्वाकांक्षी व जिज्ञासू तर आहोंच! परंतु तो गोरागोमटा व तरुण आहे ह्मणून त्याच्याभोंवतीं जमतों, असें ह्मणणें जरा अतिशयोक्तीचें आहे."

अशा आमच्या व त्यांच्या थट्टेच्या आणि करमणुकीच्या गोष्टी चालत असत. हीं दोघें नवराबायको आमच्यासारखाच आपला वेळ खुर्चीवर बसून पुस्तकें वाचण्यांत घालवीत असत. इतर लोकांप्रमाणें दुसऱ्या कोणत्या खेळांमध्यें सामील होत नसत. ह्मणून यांचें व आमचें चांगलें जमत असे. या बाईहि फार विद्वान् होत्या. त्यांनीं फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांचा चांगला अभ्यास केला होता; परंतु त्यांनां त्यांच्या विद्वत्तेचा इतकासुद्धां गर्व नव्हता. हीं दोघेंहि नवराबायको अगदीं तरुण होतीं. तथापि त्या दोघांचीहि रहाणी अगदीं साधी असे. उगीच आढ्यता व छानछुकीपणा मुळींच नसे.

डेकवर दुपारपासून संध्याकाळपावेतों अनेक तऱ्हेचे खेळ चाललेले असत व सर्व पॅसेंजर्स लोकांजवळून वर्गणी जमा करून खेळांमध्यें जे जिंकतील त्यांनां इनामें वांटीत असत. रोज रात्रीं नाच, गाणें, कान्सर्ट वगैरे चाललेलीं असावयाचीं. त्यामुळें वेळ फारसा कंटाळवाणा वाटत नसे.

दुपारीं व रात्रीं जेवणाच्या वेळीं ब्यांड वाजत असे. जेवणाच्या वेळीं दिवाणखाना खूप गजबजलेला असून त्यांत चकचकाट दिसत असे.

या बोटीवर वाढणारे वगैरे सर्व नोकर यूरोपियन होते. आमच्या टेबलाकडे वाढणारा एक पोक्त वयाचा मनुष्य होता. त्याला मॅनेजरनें आमची बरदास्त ठेवण्याला सांगितलें होतें कीं काय कोण जाणे! कारण तो बिचारा आमची फार काळजी घेत असे. जेवणाच्या वेळी घडी-घडी आह्मांला ह्मणत असे "भिऊं नका बरें, मी आहें तुमच्याजवळ!" पुन: दुसऱ्या टेबलाकडे कांहीं पदार्थ घेऊन जात असला ह्मणजे सांगायचा, कीं, "मी आतां येतों बरें, मी कांहीं तुह्मांला विसरलों नाहीं. मी येथें जवळच आहें."

आह्मांला याच्या बोलण्याची मोठी मौज वाटत असे व मी यांनां ह्मणें "या मनुष्याला पाहिलें, कीं, मला माझ्या माहेरीं जो आबा शागीर्द होता, त्याची आठवण होते. तोहि असाच गडबडगडबड बोलत असे, व अशीच आह्मां मुलांची फार काळजी घेत असे. अथवा दाखवीत तरी असे, कीं, तो मुलांची फार काळजी घेतो!" या मनुष्याचें तोंडहि कांहींसें आबासारखेंच दिसत असे. ह्मणून आह्मी आपले मराठी बोलीमध्यें त्याला आबाच ह्मणत असूं. असे हे बोटीवरील आबा आमची फार काळजी घेत असत, व आह्मांला नेहमीं विचारीत असत कीं, "तुह्मांला जर कांहीं विशेष पदार्थ हवा असेल, तर मला सांगा, मी तो करून देईन. कांहीं कढी, बटाटे वगैरे मला चांगले करतां येतात." आह्मीं त्याला होशीं हो लावलें, कीं, जेव्हां आह्मांला जरूर पडेल, तेव्हां तुला सांगूं.

त्याला बिचाऱ्याला वाटे, कीं, आह्मी येथें फार भितों व आह्मी कधीं बोटीचा प्रवास केलेला नाहीं. येथें सर्व अमेरिकन यूरोपियन असल्यामुळें आह्मांला फारच भीति वाटत असेल. अशासारखी त्याची कांहीं कल्पना होती. परंतु एकदोन दिवसांतच परसरनें या वेटरला आमच्या टेबलापासून बदललें. कारण, त्याला वाटलें, कीं, हा उगीच बडबड करून आह्मांला त्रास देतो, ह्मणून बिचाऱ्या आबाला आमच्या टेबलाकडून काढलें व त्याच्या जागीं दुसऱ्या एका पोऱ्याची योजना

केली. तेव्हांपासून हा वेटर आमच्याकडे अगदीं पाहीनासा झाला. नाहींतर केव्हांहि दिसला, कीं, गुडमॉर्निंग, गुडइव्हिनिंग ह्मणत असे, व कांहीं तरी हवे वगैरेसबंधानें बोलत असे; आणि दरवेळेला सांगत असे "कांहीं भिऊं नका व तुह्मांला कांहीं लागलें तर मला सांगा!" पण आतां मात्र तो परसरच्या धमकावणीनें अगदीं खजील झाल्यासारखा दिसत होता.

सेलटिक बोटीवर मुलेंहि पुष्कळ होतीं; बारा वर्षांचीं, चवदा वर्षांचीं, सोळा वर्षांचीं व कांहीं घोडमुलें वीसबावीस वर्षांचींहि पण होतीं. हीं मुलें सकाळसंध्याकाळ डेकवर फार गडबड करीत असत. सकाळीं सहा साडेसहा वाजतां उठून डेकवर इकडेतिकडे खूप धांवत असत. त्यामुळें डेकच्या खालीं ज्या लोकांच्या कॅबिन्स होत्या, त्यांनां त्रास होत असे व त्यांची झोंप मोडत असे. ह्मणून या लोकांनीं मुलांच्या आईबापांनां नोटिस दिली कीं, आपापल्या मुलांनां डेकवर अशी गडबड करूं देऊं नये, त्यापासून दुसऱ्या लोकांनां त्रास होतो, वगैरेबद्दल जिन्यावर लांबलचक नोटिस लाविली; पण तीं दांडगीं मुलें कसलें ऐकतात? त्यांनीं आपला क्रम अधिकच जोरानें सुरू ठेवला. बिचाऱ्या त्रास पावलेल्या लोकांनीं तीनचार दिवस पुनः पुनः नोटिस लाविली, व कांहींच परिणाम झाला नाहीं तेव्हां आपणांशींच कुरकूर करून त्यांनां गप्प बसावें लागलें. बरें झालें, कीं, आमचें कॅबिन डेकच्या अगदीं खालीं नव्हतें. मध्यें एक मजला होता. त्यामुळें डेकवर कांहीं झालें, तरी आह्मांला फारसा त्रास होत नसे.

एके दिवशीं दुपारीं लंचनंतर बोटीवर जिकडेतिकडे लोकांची धांवपळ व गडबड सुरू झाली. जे ते झपाट्यानें डेकवर जाऊं लागले. मी लंच घेऊन नुकतीच कॅबिनमध्यें बिछान्यावर पडलें होतें, हे आपलीं वाचण्याचीं पुस्तकें घेऊन डेकवर गेले होते. परंतु लागलेच पुनः कॅबिनमध्यें परत येऊन मला ह्मणाले "चला, चला लवकर

डेकवर ऐसबर्ग पहायाला. सर्व लोक तिकडे जमा झाले आहेत. ” तेव्हां मला समजलें, कीं, ही सर्व गडबड हा ऐसबर्ग पहाण्याची चालली होती.

हा ऐसबर्ग क्यापट्नला त्याच्या अपरडेकवरून दुर्बिणीनें पुष्कळ अंतरावरून दिसला. तेव्हां लागलीच पॅसेंजर्स लोकांनां समजण्याकरितां जिन्यावर नोटिस लाविली, कीं, बोटीच्या उजव्या बाजूकडे ऐसबर्ग येत आहे. ही नोटिस वाचतांच लोकांची डेकवर ऐसबर्ग पहाण्याची एकच गर्दी झाली.

हा बर्फाचा ढीग लहानशा टेंकडीसारखा दिसत होता, व अगदीं पांढरा शुभ्र असून समुद्राच्या निळ्या पाण्यावर हळुहळू मजेनें तरंगत चालला होता. कोणी ह्मणतात, हा ऐसबर्ग जितका वर दिसतो तितकाच खालीं पाण्यांत डुबलेला असतो, व फार कठीण असतो. त्यामुळें एकाद्या वेळीं रात्रीं बोटीशीं टक्कर झाली तर मोठमोठ्या बोटीसुद्धां फुटतात व फार नुकसान होतें. ह्मणून बोटीवरील कॅप्टन लोक या घातकी चोरांनां फार भितात. पुष्कळ ऐसबर्ग असे असतात, कीं, त्यांचीं फक्त लहानलहान टोंकें दिसतात, परंतु दुप्पटतिप्पट भाग चोरासारखा खालीं पाण्यांत लपलेला असतो. त्यामुळें बोटीवरील लोकांच्या तो सहसा लक्ष्यांत येत नाहीं, व बोट वेगानें चाललेली असते. अशा स्थितींत हा रस्त्यांत आला, ह्मणजे अर्थात्च टक्कर होते व वाईट अपघात होतात. बोटीवरील कॅप्टन व एंजीनियर वगैरे ऑफिसर लोकांवर केवढी जबाबदारी असते ! शेंकडों लोकांचे जीव त्यांच्या खबरदारीवर अवलंबून असतात.

कॅप्टनच्या डेकवर हे ऑफिसर लोक पाळीपाळीनें दुर्बिणींतून चहूंकडे बारकाईनें पहात असतात, व रात्रीच्या वेळींहि पाळीपाळीनें जागत असतात. अशा रीतीनें त्यांनां अनेक तऱ्हेची काळजी घ्यावी लागते. या समुद्रामध्यें नेहमीं ऐसबर्गची फार भीति असते.

हा ऐसबर्ग सुदैवानें दिवसाच्या वेळीं भेटला व त्यामुळें बोटीलाहि कांहीं हरकत झाली नाहीं व सर्व लोकांनांहि चांगल्या रीतीनें पहावयाला मिळाला.

पांच दिवसांनीं बोट क्वीन्सटाऊनच्या जवळजवळ आली, तेव्हां समुद्रामध्यें कांहीं मासे धरणारे पक्षी व बगळे वगैरे दिसूं लागले, व डेकवर जे ते आपापल्या दुर्बिणी घेऊन बाजूनें डोंगर व जमीन पाहूं लागले. हे डोंगर लाल रंगाचे व अगदीं रुक्ष दिसत होते. जसे रेडसीमधील व एडनच्या भोंवतालचे डोंगर रुक्ष व लाल दिसतात, तसेच हे डोंगर दिसत होते. त्यामुळें येथें रमणीय देखावा मुळींच दिसत नव्हता. तथापि जमीन जवळ आली ह्मणून आह्मां सर्वांनांच आनंद झाला होता. संध्याकाळचे पांच वाजल्यापासून समुद्रकिनारा व बाजूचे डोंगर दिसत होते, व बोट हळुहळू चालली होती.

१ नंतर रात्रीचे दहा वाजतां बोट क्वीन्सटाऊनच्यासमोर उभी राहिली, व येथें सर्व लंडन वगैरेकडील डाक आणि ऐर्लंडचे पॅसेंजर्स उतरले. आह्मी डेकवरून या उतरणाऱ्या लोकांची मौज पहात होतों. या लोकांनां जिन्यावरून उतरण्याकरितां जागजागीं बोटीवरील नोकरलोक उभे होते. येथें उतरणारे लोक बहुतेक सर्व सेकंडक्लासचे पॅसेंजर्स होते, व हे ऐरिश लोक होते. यांच्यामध्यें एक अर्धवयी मनुष्य होता. त्याला उतरतांना पाहून सर्वांनां मजा वाटली. त्यानें एक बोचकें पाठीला बांधलें होतें व दोन्ही बगलेमध्यें दोन बोचकीं दाबलीं होतीं, व दोन्ही हातांमध्यें दोन ब्याग्ज् घेतल्या होत्या. तेव्हां अर्थात्च त्या बोटीच्या निरुंद जिन्यावरून उतरणें फार कठिण झालें. परंतु जिन्यावर जागजागीं मदतीकरितां जे लोक उभे होते, त्यांनीं त्याला चेंडूसारखा हातोहात उचलीत एकदांचा लहान होडींत टाकला. तेव्हां सर्व लोक खूप हंसले व तोहि आनंदानें खूप मोठमोठ्यानें हंसला, व हातरुमाल हलवीत व सर्वांनां गुडबाय गुडबाय ओरडत किनाऱ्याकडे निघून

गेला. कांहीं बायाहि अशाच पुष्कळ कपडे अंगावर घालून व ज्यांचीं लहान मुलें होतीं त्या तीं घेऊन निघाल्या. त्यांनांहि अशाच हातोहात उचलून लहान होड्यांत घातलें. अशा तऱ्हेनें पॅसेंजर्स लोकांचें उतरणें झाल्यावर डाक उतरवणें सुरू झालें.

रात्र बरीच झाल्यामुळें आह्मी आपल्या कॅबिनमध्यें जाऊन निजलों. सकाळीं पांचसहा वाजतां जेव्हां उजाडलें, तेव्हां बोट पूर्ववत् समुद्रामध्यें झपाट्यानें आपला पुढील मार्ग क्रमीत होती व कॅबिनच्या खिडकींतून जेथपर्यंत नजर पोहोंचेल तेथपर्यंत जिकडेतिकडे आकाश व समुद्राचें पाणीच दिसत होतें.

रात्रीं बोट केव्हां निघाली व डाक वगैरे उतरणें केव्हां संपलें, हें आह्मांला कांहीं समजलें नाहीं, अशी गाढ झोंप लागली होती. सहांच्या ठोक्याला नेहमींप्रमाणें बाथबॉय कॅबिनच्या दरवाज्याजवळ येऊन स्नानाचें पाणी तयार असल्याबद्दलची वर्दी देऊन गेला. त्याला हुकूम दिल्याप्रमाणें तो रोज सकाळीं सहा वाजतां येऊन दरवाज्यावर दोन ठोके मारीत असे, व आपलें पाठ केलेलें वाक्य ह्मणत असे. 'मि. चिटणवीस, बाथ रेडी सर.' या बोटीवर सर्वच नोकर यूरोपियन होते. यांचें बहुतकरून सकाळीं सहा वाजतांचें स्नान कधीं चुकत नसे. मग कोठेंहि असा. हॉटेलमध्यें असा, ट्रेनमध्यें असा अथवा बोटीवर असा. रात्रीं कितीहि जागरण झालेलें असो अथवा कितीहि थंडी असो. कांहीं असो. पण सकाळचें स्नान चुकावयाचें नाहीं. ह्मणून हे बाथच्या कामावरील नोकर लोक, यांचें अवघड नांव आपल्या नोटबुकामध्यें लिहून घेत असत, व त्याप्रमाणें सकाळीं सहा वाजतां यांनां उठवीत असत. हजामत, स्नान वगैरे झालें ह्मणजे अर्धापाऊण तास यांचें रामायण, शिवलीलामृत व कांहीं स्तोत्रें वगैरे वाचणें होत असे, व आठ नाहीं वाजले, तोंच कपडे वगैरे घालून सर्व तयारी होत असे. मी मात्र बहुतकरून आठ वाजल्याशिवाय बिछान्याच्या बाहेर निघत नसें, व फार


थंडी असली तर रोज स्नानहि करीत नसें. यांचें झालें ह्मणजे हे मला एकसारखें उठवीत असत. "आठ वाजायला आले, चला आतां उठा, कपडे घाला, साडेआठाला ब्रेकफास्ट घेतली पाहिजे. उशीर झाला ह्मणजे पोरेज् चांगलें मिळत नाहीं." अशी यांची नेहमीं पोरेज्ची गडबड चालायची. कारण ब्रेकफास्टमध्यें आमच्या आवडीचा पदार्थ पोरेज् हा असायचा. पोरेज् हें गव्हासारखें धान्य असतें. तें जरा जाडें दळून आसट भातासारखें शिजवतात. मग तें दूधसाखरेशीं खावयाचें. तें आपलें साधारण खिरीसारखें लागतें. पण त्यानें पोटाला चांगला आधार होतो. ह्मणून आह्मां दोघांनांहि पोरेज् फार आवडत असे.

आठ वाजतां पहिलें बिगुल वाजत असे, व साडेआठांला दुसरें बिगुल होत असे. साडेआठपासून साडेनऊपर्यंत ब्रेकफास्ट मिळत असे. आठ वाजतां पहिलें बिगुल झालें, कीं, बहुतकरून सर्व लोक उठत असत, व अर्ध्या तासामध्यें ड्रेस करून दुसरें बिगुल झालें, कीं, हळुहळू डायनिंग हॉलमध्यें येऊन उपाहार घेत असत.

मीहि पण पहिलें बिगुल होईपर्यंत यांनां चाळवीत असें, व ह्मणत असें "आणखी तीनचार मिनिटांनीं खरोखरी उठतें. आणखी दोन मिनिटें तरी निजूं द्या. अजून आठ वाजायला पुष्कळ वेळ आहे. तुमची आपली सहा वाजल्यापासून गडबड चालते." पण पहिलें बिगुल झालें, कीं, मला खडबडून उठावें लागे, व गडबडीनें तोंडहात धुऊन, वेणीफणी करून कपडे घालून कशी तरी दुसरें बिगुल होईपर्यंत मी तयार होत असें. अशी गडबड झाली ह्मणजे तेवढ्यापुरता विचार मनांत येत असे, कीं, आतां उद्यांपासून जरा लवकर उठलें पाहिजे, ह्मणजे आपल्यालाच बरें पडतें. पण दुसऱ्या दिवशीं उठायच्या वेळीं हे विचार जागच्याजागींच रहात असत!

अशा तऱ्हेनें मला समुद्रप्रवासाचा व कोणत्याहि प्रवासाचा फार कंटाळा आला होता, व असें वाटे, कीं, केव्हां एकदां आपल्या स्वदेशीं जाऊं व शांतपणानें राहूं.

एके दिवशीं दुपारीं एका अमेरिकन गृहस्थानें तास दीड तास लेक्चर दिलें. त्यांत अमेरिकेमध्यें कसकशी सुधारणा झाली, व कोण-कोणत्या गृहस्थानें कायकाय केलें, वगैरे बऱ्याच गोष्टी सांगितल्या. प्रसिद्ध निग्रो बुकर टी. वॉशिंग्टन यानें आपल्या निग्रोज् लोकांकरितां किती सुधारणा केल्या आहेत व करीत आहे, हें सांगून त्याची फार तारीफ व प्रशंसा केली. निग्रो बुकर टी. वाशिंग्टन यानें अमेरिकेमध्यें आपल्या निग्रो लोकांकरितां एक शाळा काढिली आहे. त्या शाळेंत त्यानें सर्व तऱ्हेचे धंदे शिकविण्याची व्यवस्था केली आहे. अशासाठीं कीं, कोणताहि धंदा शिकून प्रामाणिकपणानें आपलें पोट भरतां यावें. यामुळें त्याच्या निग्रो लोकांमध्यें पुष्कळ सुधारणा झाली आहे. बुकर टी. वाशिंग्टन हा नेहमीं लेक्चरें देऊन आपल्या लोकांनां चांगला उपदेश करीत असतो, व त्यांनीं सुशिक्षित व्हावें व उद्योगी व्हावें ह्मणून पराकाष्ठेचे श्रम करीत असतो. अमेरिकेंतील सधन व परोपकारी लोक त्याला पैशाची नेहमीं चांगली मदत करीत असतात. त्यामुळें त्याची ही शाळा बरी चालली आहे. त्यानें आपल्याला जसें बुकर टी. वॉशिंग्टन नांव घेतलें आहे, त्याप्रमाणें तो कृति करीत आहे. असें या गृहस्थानें बुकर टी. वाशिंग्टनबद्दल पुष्कळ सांगितलें, आणि त्याची फार स्तुति केली.



लिव्हरपुल-सेलटीक बोट.

प्रकरण सहावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## इंग्लंड.

तारीख १८ जूनला संध्याकाळीं बोट लिव्हरपूलला येऊन पोहों-चली. पहिल्यानें सामान वगैरे उतरवणें झाल्यावर सर्व पॅसेंजर्स लोकांनां उतरण्याची मोकळीक मिळाली. येथें बोट अगदीं धक्क्याला येऊन लागते, व तपासणीचा वगैरे कोणताहि त्रास होत नाहीं. एजंट्स लोक असतात त्यांच्याजवळ किल्ल्या देऊन टाकाव्या, ह्मणजे ते सर्व व्यवस्था करतात व सर्व सामान वगैरे जिकडल्यातिकडे ठेवून देतात. आमचा कुक कंपनीकडील एजंट तेथें होताच, त्याच्याजवळ आह्मीं पेट्यांच्या किल्ल्या दिल्या. त्याप्रमाणें त्यानें सर्व व्यवस्था केली. सान्फ्रान्सिस्कोसारखा त्रास मुळींच झाला नाहीं. येथें पॅसेंजर्स लोकांकरतां दोन ट्रेन्स तयार होत्या. आह्मी पहिल्याच गाडीनें निघालों. अर्ध्या तासानें लागलीच दुसरी गाडीहि निघणार होती.

लिव्हरपूलला आल्यावर सर्वच कांहीं निराळें दिसूं लागलें. कदाचित् दुसऱ्या कोणाला यांत फारसा फरक वाटत नसेल; पण मला तर सर्व गोष्टींमध्यें फरक वाटूं लागला. हवेमध्यें, सृष्टिसौंदर्यामध्यें, ट्राम्वेमध्यें, गाड्यांमध्यें, ट्रेनमध्यें—सर्वच वस्तूंमध्यें अमेरिकेशीं तुलना करतां अगदीं बदल दिसूं लागला. येथील हवा चांगली थंड व सुखकर वाटूं लागली, व सभोंवतालचा देखावा हिरवागार, नीटनेटका, सुंदर आणि मनाला आनंद देणारा असा दिसूं लागला. एकंदरींत ट्राम्वे, ट्रेन्स, गाड्या वगैरे अमेरिकेसारख्या अवाढव्य नसून लहान, सुबक व सोयीवार अशा दिसूं लागल्या.

लिव्हरपूलला पोहोंचलों, तेव्हां मला मनांतल्यामनांत फार आनंद वाटूं लागला. कारण, मला अर्धें घरीं पोहोंचल्यासारखें वाटूं लागलें. लंडनमध्यें आपल्या हिंदुस्तानचे लोकहि पुष्कळ भेटतील, हाहि एक मनाला आनंद वाटूं लागला.

अमेरिकेंतील स्लीपिंगकारपेक्षां या स्लीपिंग कंपार्टमेंटमध्यें पुष्कळच फरक होता. हें कंपार्टमेंट दोन बिछान्यांचें होतें, व साधारण लहानच होतें. परंतु अगदीं खोलीसारखें असून स्वतंत्र होतें, व ज्या कांहीं पाहिजेत त्या सोयी होत्या. अशीं एकेका डब्यामध्यें आठ कंपार्टमेंटस् होतीं, व दोन्ही बाजूंला दोन बाथरूम्स होत्या. ट्रेनमधून बाजूचा देखावा हिरवागार व मनाला आल्हाद देणारा दिसत होता. सध्या इकडे वसंतऋतु असल्यामुळें शेतांतून भाजीपाला व फुलेंफळें चांगलीं टवटवीत दिसत होतीं.

रात्रीं बारा वाजतां ट्रेन सेंट प्यांकर्स स्टेशनावर आली. येथेंहि कुकचा मनुष्य होताच. त्यानें आमच्या सामानाची वगैरे सर्व व्यवस्था केली, व भाड्याची गाडी करून तो आह्मांला बिऱ्हाडीं घेऊन गेला.

अर्लस कोर्ट स्क्वेअर येथें बऱ्याच दिवसांपासून कुक कंपनीनें आमच्याकरितां खोली ठरवून ठेविली होती. येथें आह्मी १२ नंबरच्या घरामध्यें उतरलों. लँडलेडी मिसेस नॉरिस ही आमची वाट पहात जागत बसली होती. तिनें आमची खोली आह्मांला दाखविली, व सामानसुमान जिकडल्यातिकडे ठेवलें. या बाईचीं दोन घरें होतीं. १ नंबरचें एक व १२ नंबरचें दुसरें. हीं दोन्ही घरें सडकेच्या दोहों बाजूंला समोरासमोर होतीं. देशांदेशांतून कारोनेशन पहाण्याकरितां आलेले बरेच लोक येथें उतरले होते.

रात्रीचे बाराएक वाजले होते, तरी रस्त्यारस्त्यांनीं बायकापुरुष फिरतच होते, व जिकडेतिकडे दिव्यांचा चकचकाट असल्यामुळें रात्र व दिवस सारखेंच वाटत होतें.

## लंडन.

तारीख १९ जून रोजीं सकाळीं ब्रेकफास्ट घेऊन आह्मी कुकच्या ऑफिसांत गेलों. येथें लोकांची अतोनात गर्दी झाली होती. त्यांत हिंदुस्तानचे लोक पुष्कळ होते. या सर्वांनां कुकचे क्लार्क लोक फारच चांगल्या रीतीनें माहिती देत होते, व सर्व कांहीं समजून सांगत होते.

कोणाच्या अंगावर वसकणें, अथवा कोणीं फारच फार विचारलें तर त्याच्यावर रागावणें, त्रासणें असा प्रकार मुळींच दिसत नव्हता. आह्मी चीन, जपान, अमेरिका या सर्व ठिकाणांपासून कुकचीं ऑफिसें पहात आलों, पण सर्व जागीं अशीच चांगली व्यवस्था असते. त्यामुळें लोकांनां प्रवासामध्यें फार सोयीचें होतें, व पुष्कळ त्रास चुकतो.

आह्मीं येथें कारोनेशनची वगैरे माहिती करून घेतली, व कारोनेशन प्रोसेशन व रॉयल प्रोसेशन पहाण्याचीं तिकिटें घेऊन कोठें बसावयाचें, केव्हां जावयाचें वगैरे सर्व व्यवस्थेची माहिती करून घेतली. आमच्या कांहीं पेट्या ज्या आह्मीं मुंबईहून थेट लंडनला पाठविल्या होत्या, त्याहि घेतल्या.

दुपारीं पांच वाजतां प्रोफेसर भिसे यांच्या बिऱ्हाडीं त्यांच्या भेटीकरितां गेलों. प्रोफेसर भिसे हे चेसविक् येथें कार्लटन मॅनशनमध्यें रहात होते. मिसेस भिसे घरींच होत्या. त्यांनीं आमचें चांगलें स्वागत करून प्रोफेसर भिसे यांनां टेलिफोननें त्यांच्या ऑफिसमध्यें कळविल्यावर तेहि लवकरच घरीं आले. प्रोफेसर भिसे हे बऱ्याच वर्षांपासून लंडनला येऊन राहिले आहेत, व यांनीं येथें भिसो टाइप नांवाचें यंत्र काढिलें आहे. हें यंत्र इंग्लंड, अमेरिका येथील experts नीं फार पसंत केलें असून आतां टाटा कंपनीनें पैशांची मदत देऊन हीं यंत्रें तयार करण्याचा कारखाना काढिला आहे. प्रोफेसर भिसे यांनीं हें यंत्र तयार करण्यांत फार मेहनत घेतली व फार नेटानें प्रयत्न केला. हे आतां येथें सहकुटुंब स्थायिक झाल्यासारखे आहेत.

दुसऱ्या दिवशीं आह्मीं कांहीं सामान व कपडे खरेदी केले. येथें दुकानांतून आमच्या बोटीवरील जुन्या ओळखीच्या कांहीं अमेरिकन बाया भेटल्या. या बायांचीहि कपडे वगैरेंची खरेदी चालली होती. दुपारीं हे सर रिसले व आणखी कांहीं ओळखीच्या लोकांच्या भेटीला गेले. तेथें यांनां समजलें, कीं, यांच्याकारितां वेस्ट मिन्स्टर अॅबेमध्यें कारो-

नेशनच्या वेळीं जागा ठेविली होती; पण यांनां दोनतीन दिवस येण्याला उशीर झाला, ह्मणून ती जागा दुसऱ्या एका गृहस्थाला दिली होती. ते ह्मणाले "आह्मी फ्रान्स, जर्मनी वगैरेकडे तारा करून तुमचा पुष्कळ शोध केला; पण कांहींच पत्ता लागला नाहीं. तुह्मी अमेरिकेला गेलां आहां हें आह्मांला मुळींच ठाऊक नव्हतें."

हे ह्मणाले "मला त्याबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. मी कांहीं बुद्ध्या कारोनेशनकरितां येथें आलों नाहीं. अनायासें याच वेळीं कारोनेशन आहे, तर पहाण्याची संधि कां सोडावी, ह्मणून आह्मी अमेरिकेहून गडबडीनें निघून आलों."

संध्याकाळीं आह्मी मिस्टर व मिसेस भिसे यांच्या घरीं जेवावयाला गेलों. मिसेस भिसे यांनीं सर्व जेवण आपल्या हिंदुस्तानी तऱ्हेचें केलें होतें, व तें आह्मांला फार आवडलें. कारण, मुंबई सोडल्यापासून आह्मांला हेंच आपल्या तऱ्हेचें जेवण मिळालें. हे माझी थट्टा करूं लागले, कीं, "असें चांगलें जेवण मिळण्याकरितांच तुह्मी लंडनला आल्याबरोबर मिसेस भिसे यांच्या भेटीला येण्याची गडबड केली!"

मी ह्मणालें "जेवणाकरितां ह्मणून नाहीं कांहीं! पण परमुलखामध्यें कोणीहि आपलें असलें ह्मणजे त्याची भेट केव्हां होईल, असें वाटणें साहजिकच आहे!"

मिसेस भिसे यांनीं जेवणाचा थाट खरोखरीच फार चांगला केला होता. अगदीं आपल्या तऱ्हेचें मेजवानीचें जेवण होतें. वरण, भात, तऱ्हेतऱ्हेच्या भाज्याआमट्या, चटण्याकोशिंबिरी, लोणचें, पापडसांडगे, सारवड्याकुरवड्या, शिरापुऱ्या, भजींवडे, वासुंदी वगैरे सर्व कांहीं त्यांनीं स्वतःच केलें होतें. त्यांच्या येथें दोघी यूरोपियन बाया स्वयंपाक वगैरे करण्याच्या कामावर होत्या, तरी असे कांहीं पदार्थ करावयाचे असले ह्मणजे मिसेस भिसे यांनां स्वतःच करावे लागत असत. "तांदूळ, डाळ, तूप, पापडलोणचीं वगैरे पदार्थ आपण हिंदुस्तानांतून आणवीत

असतों " असें त्या ह्मणाल्या. आह्मी लंडनला होतों, तोंपर्यंत मिसेस भिसे आह्मांला नेहमीं जेवणाला, चहाला वगैरे बोलवीत असत. प्रोफेसर व मिसेस भिसे यांचा हा चांगुलपणा समजला पाहिजे. कारण यापूर्वीं त्यांचा व आमचा फारसा परिचय नव्हता, तरीहि त्यांनीं आमचें इतकें आदरातिथ्य केलें. मिसेस भिसे या सातआठ वर्षें झालीं, इंग्लंडला आपल्या पतीजवळ येऊन राहिल्या आहेत. इंग्लंडला येण्यापूर्वीं त्यांनां इंग्रजीचा एक शब्दहि समजत नव्हता. पण आतां त्या उत्तम प्रकारें इंग्लिश बोलतात, व दुकानांतून कांहीं खरेदी करणें, कोठें जाणेंयेणें वगैरे सर्व कामें करून येतात. यांनां दोघे मुलगे आहेत. एक दहा-अकरा वर्षांचा व धाकटा सातआठ वर्षांचा. या दोघांनां तर इंग्लिश-शिवाय दुसरी कोणतीहि भाषा बोलतां येत नाहीं. त्यांची मराठी भाषा बहुतेक ते विसरलेच आहेत. हे दोघेहि मुलगे चांगले हुषार आहेत.

येथें आह्मांला रा. रा. अण्णासाहेब खोपकर भेटले. हे नाशिकला डे. कलेक्टर होते, व आतां आमच्यासारखेच रजा घेऊन इंग्लंड पहाण्याला आले होते. कैलासवासी रा. रा. बाळासाहेब वैद्य यांचे दोघे मुलगेहि आह्मांला येथें भेटले. एक डॉक्टरीकरितां अभ्यास करीत होता व दुसरा सिव्हिल सर्व्हिसकरितां अभ्यास करीत होता. मिसेस भिसे या सर्वांचें फार आगतस्वागत करीत असत.

## कारोनेशन.

तारीख २२ जून रोजीं सकाळीं चार वाजतां उठून स्नान वगैरे आटोपून कपडे करून आह्मीं उपाहार केला, आणि कारोनेशन प्रोसेशन पहावयाला जाण्याकरितां तयार झालों. आमच्या लॉजिंगच्या सर्वच मंडळींची चार वाजल्यापासून गडबड चालली होती. लँडलेडीनें आह्मांला रात्रींच बजावून ठेविलें होतें, कीं, " उद्यां लवकर उठून ब्रेकफास्ट घ्या. उशीर झाला तर तुह्मांला बरोबर ब्रेकफास्ट मिळणार नाहीं.

माझे नोकर लोक कारोनेशन प्रोसेशन पहावयाला जाणार आहेत. उशीर झाला, तर ते कांहीं वाट पहाणार नाहींत!"

आह्मी अर्लस कोर्ट स्टेशनवरून टयूब रेल्वेनें डाऊन स्ट्रीट स्टेशनवर गेलों. तेथें स्टेशनच्याजवळच पिकाडेली स्ट्रीटमध्यें कुक कंपनीमार्फत कारोनेशन पहावयाला सीट्स घेतल्या होत्या. येथें आह्मांला चार वाजेतों रहावयाचें होतें, ह्मणून कुक कंपनीनें येथें प्रेक्षक लोकांकारितां खाण्यापिण्याची सर्व चांगली व्यवस्था करून ठेविली होती. बारा व एकच्या दरम्यान लंचची उत्तम व्यवस्था ठेविली होती. नंतर तीनपासून चारपर्यंत आफटरनून टी दिला जात होता, व सोडालेमोनेट वाटेल तेव्हां मिळत होतें. येथें एक रीडिंग रूम, स्मोकिंग रूम, कार्डरूम व लेडीज रूम यांचीहि योजना केली होती, आणि एक डॉक्टर व एक नर्स हींहि तेंथ हजर ठेविलीं होतीं. जर कदाचित् कोणी प्रेक्षक लोक आजारी झाले, अथवा काहीं ॲक्सिडंट झाला, तर डॉक्टरकरतां धांवपळ करायला नको. पुढील सीट्सचा चार गिनी, मधील सीट्सचा तीन गिनी, आणि मागील सीट्सचा दोन गिनी असे दर होते. त्याच्यामध्येंच खाण्यापिण्याचा, लंचचा वगैरे सर्व समावेश होत होता. आह्मीं मधील सीट्स घेतल्या होत्या. गर्दी अतिशय होईल, या भीतीनें पोलीसनें शहरांतील गेट्स सकाळीं सात वाजतांच बंद केलीं होतीं. तीनचार दिवसांपूर्वींच या सर्व व्यवस्थेच्या जाहिराती लोकांनां दिल्या होत्या.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं उभे रहाणारे बिचारे गरीब लोक सकाळचे तीनचार वाजल्यापासून येऊन आपापली जागा अडवून उभे राहिले होते. मुलेंबाळें, वृद्धतरुण असे सर्व प्रजाजन राजदर्शन घेण्याकारितां अगदीं उत्सुकतनें उभे होते. तरीहि पूर्वीं अंदाज केला होता त्यापेक्षां पुष्कळ लोक कमी आले, ह्मणून ह्मणण्यासारखी गर्दी झाली नाहीं, व त्यामुळें लोकांनां प्रोसेशन सुरू होईपर्यंत येण्याजाण्याची मोकळीक होती.

या उभे रहाणाऱ्या लोकांनां श्रमानें मूर्च्छा आली, अथवा तहान वगैरे लागली, तर त्यांचा समाचार घेण्याकरितां जागजागीं पोलीस ठेवले होते. प्रोसेशन सुरू होईपर्यंत रस्त्यानें डॉक्टर आणि नर्सेस मोटारमध्यें बसून या लोकांनां पहात होते, व मूर्च्छा आली असल्यास मोटारमध्यें घालून नेत होते.

आकाश अगदीं ढगांनीं व्यापलें होतें व राहूनराहून मंदमंद वृष्टिहि होत होती. त्यामुळें हवेमध्यें बराच गारठा आला होता. उभें रहाणाऱ्या लोकांनां हाहि एक त्रास झाला.

नंतर लवकरच ॲबेमध्यें जाणाऱ्या मानमानकरी लोकांच्या गाड्या जाण्याला सुरुवात झाली. या गाड्या दोन घोड्यांच्या असून ज्याच्या त्याच्या टायटलप्रमाणें त्यांचे रंग होते. कोणाच्या गाड्यांचे हिरवे तर कोणच्या गाड्यांचे जांभळे, कोणाच्या गाड्यांचे निळे, बदामी, पिवळट, अस्मानी, गुलाबी असे अनेक प्रकारचे रंग होते, व जसा गाडीचा रंग त्याच रंगाचे गाडी हांकणाराचे व गाडीच्या मागें उभे रहाणाऱ्या नोकरांचे कपडे होते. असें हें मूल्यवान व सुंदर गाड्यांचें प्रोसेशन फार चांगलें दिसत होतें. पण इतकेंच होतें, कीं, पाऊस पडत असल्यामुळें सर्व गाड्यांचे टफ टाकले होते, ह्मणून आंत बसलेले लोक दिसत नव्हते. या गाड्यांच्या मागून पलटणी यावयाला सुरुवात झाली. नंतर तीन वाजण्याच्या सुमाराला राजाचा आठ घोड्यांचा चांदीचा रथ आला. जेव्हां राजा व राणी आलीं, तेव्हां लोकांची आनंदानें ओरडण्याची व हातरुमाल उडविण्याची एकच गर्दी व गोंधळ झाला. राजा व राणी हीं हास्यमुखानें सर्व प्रजाजनांचे सलाम घेत होतीं.

अकरा वाजतां वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें मुख्य बिशपनें राजाच्या व राणीच्या मस्तकावर पवित्र जळाचें सिंचन केलें, व तिकडील चाली-प्रमाणें विधि करून त्यांच्या मस्तकांवर राजमुकुट चढविले. राजाच्या मस्तकावर मुकुट चढविला तशी तोफ झाली. तेव्हां सर्व लोकांनीं जिकडे-

तिकडे टाळ्यांचा एकच गजर केला. राजाच्या आणि राणीच्या मस्तकांवर मुकुट चढतांच सर्व ड्यूक व डचेस जीं आपापले मुकुट हातांत घेऊन वसलीं होतीं, त्या सर्वांनीं मुकुट धारण केले. त्या वेळीं त्या सर्वांची फार धांदल झाली, असें ह्मणतात. गडबडीमुळें कोणीकोणी आपले मुकुट वांकडेतिकडे घातले आणि आपापल्या शेजाऱ्याला विचारून नीटनेटके करूं लागले, असें तेथें हजर असलेली एक बाई आह्मांला सांगत होती. वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें सात हजार लोक होते, असें ह्मणतात. पुष्कळ लोकांनां हा कारोनेशनचा विधि मुळींच पहाण्याला मिळाला नाहीं. कित्येकजण जे अगदीं एका बाजूला बसले होते, त्यांनां तर राजाराणीसुद्धां दिसलीं नाहींत. एवढेंच झालें, कीं, वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें सीट्‌स मिळाल्या, हा एक मान झाला, एवढेंच जिवाला समाधान वाटलें.

या कारोनेशनच्या वेळीं परकीय देशांतील मोठमोठे मानकरी लोक वगैरे बोलावले नव्हते. विशेषतः हिंदुस्तानांतून कांहीं राजांशिवाय दुसरे लोक बोलावले नव्हते. कारण, किंग स्वतःच हिंदुस्तानला जाणार होते, ह्मणून किंग एडवर्ड यांच्या कारोनेशन समारंभाला जसे हिंदुस्तानचे मोठमोठे लोक बोलावले होते, तसे या वेळीं बोलावले नाहींत. जे कोणी आपल्या खुषीनें व आपल्या स्वतःच्या खर्चानें आले होते, तेवढेच होते. हिंदुस्तानचे राजेलोक मात्र बरेच आले होते, व या राजेलोकांमध्यें कांहीं राजे बहुतकरून वर्ष दोन वर्षांनीं नेहमींच इंग्लंडला येणारे होते. तेव्हां त्यांनां इंग्लंड कांहीं नवीन नव्हतें. भोपाळच्या बेगमसाहेब या वेळीं आपल्या सर्व परिवारासहित आल्या होत्या. त्यांच्याबरोबर यांचा एक मुलगा होता. बेगम लांब बुरखा घालून गार्डनपार्ट्यांनां, चहापार्ट्यांनां, अशा कोणत्याहि मोठ्या राजकीय समारंभाला जात असत. कारोनेशन प्रोसेशन संपल्याबरोबर सर्व लोकांची आपापल्या घरीं जाण्याची गर्दी सुरू झाली. तेव्हां सर्व गेटांजवळून पोलीस उभे

राहून लोकांनां विनंती करीत होते "सावकाश जा, गडबड करूं नका, गर्दी करूं नका, मुलेंबाळें संभाळा." असें सर्वांनां चांगल्या तऱ्हेनें वागवीत होते. कोणालाहि उद्धटपणानें अथवा अरेरावीनें बोलत नव्हते.

दुसऱ्या दिवशीं ब्रेकफास्टनंतर आह्मी रॉयल प्रोसेशन पहाण्याला गेलों, व आमच्या आधल्या दिवसाच्या जागींच बसलों. आजच्या दिवशीं चांगली उघाडी असून आकाश स्वच्छ होतें, ह्मणून बाहेरच्या लोकांनां कालच्यासारखा आज त्रास झाला नाहीं. त्यामुळें हें रॉयल प्रोसेशन चांगल्या रीतीनें पार पडलें. याच्यामध्यें सर्व निरनिराळ्या पलटणींचे निरनिराळे ड्रेस फार मनोवेधक दिसत होते. पहिल्यानें हिंदुस्तानचे राजेरजवाडे घोड्यांच्या गाड्यांत बसून पुढें गेले. नंतर पायदळ पलटण गेली. मग घोडेस्वारांच्या पलटणी निघाल्या. या पलटणींचे उमदे घोडे व वर बसलेले शस्त्रास्त्रमंडित स्वार असा हा देखावा फार सुंदर दिसत होता. यांच्यामागें तोफांची पलटण आली. पुष्कळ निरनिराळ्या चाकें लावलेल्या तोफा शिपाईलोक ढकलीत नेत होते. या तोफांनंतर आणखी कांहीं पायदळ आलें. मग उंटावर निशाण, भेरी, चौघडा, झेंड्या वगैरे लष्कर आलें. मग मोठ्या राष्ट्रांचे प्रधान, मानकरी, मांडलिक असे घोड्यांवर बसून आले. यांच्यामागें प्रिन्सप्रिन्सेस, ड्यूकडचेस वगैरे राजघराण्यांतील लोक घोड्यांच्या गाड्यांत बसून आले. शेवटीं राजराजेश्वरी यांचा आठ घोड्यांचा रथ आला. त्या वेळीं लोकांचा उत्साह व आनंद अगदीं पहाण्यासारखा होता. लहान मुलांपासून तों अगदीं ह्मातान्यांपर्यंत सर्व लोक आपापल्या हातरुमालांचीं निशाणें करून आनंदानें फडकावीत होते, व राजाराणींचा जयजयकार करून सर्व दिशा दणाणून सोडीत होते. राजाराणीहि सर्वांच्या स्वागताचा स्वीकार करीत होतीं. या रॉयल प्रोसेशनमध्यें राजराजेश्वरींनीं आपले सर्व राजचिन्हमंडित अलंकार धारण केले होते. मस्तकावर रत्नजडित राजमुगुट घातले असून दोघांनींहि हातांमध्यें रत्नखचित राजदंड घेतले

होते. आणखीहि पुष्कळ मौल्यवान अलंकार घातले होते. असें हें रॉयल प्रोसेशन निर्विघ्न पार पडलें. या दिवशीं पाऊस वगैरे कांहीं नसल्यामुळें सर्व राजेरजवाडे व राजघराण्यांतील लोक उघड्या गाड्यांतून गेले, ह्मणून सर्व लोकांनां चांगले पहाण्याला मिळाले, व राजाचा रथहि अगदीं हळुहळू गेला, ह्मणून सर्वांनां राजाराणीहि चांगलीं पहाण्याला मिळालीं.

तारीख २४ जूनला नेव्हल रिव्ह्यू झाला. तो पहाण्याला मी गेलें नाहीं. हे एकटेच गेले होते. दोन दिवस प्रोसेशन पहायाला गेल्यामुळें मला अगदीं थकल्यासारखें वाटत होते, ह्मणून मी घरींच राहून विश्रांति घेण्याचा विचार केला, व दुपारीं मिसेस भिसे यांनां चहाला बोलावलें, त्यामुळें मला एकटें वाटलें नाहीं व वेळ चांगला गेला.

रात्रीं बारा वाजतां हे नेव्हल रिव्ह्यू पाहून परत आले, तेव्हां त्यांनीं तेथील सर्व हकीकत सांगितली. तेथें हिंदुस्तानचे व आणखी इतर देशांचे राजेरजवाडे सर्व जमा झाले होते. या सर्व लोकांकरितां समुद्रांत मोठमोठ्या बोटी तयार ठेविल्या होत्या. समुद्रामध्यें जिकडेतिकडे बोटीच बोटीच दिसत होत्या, व मध्यभागीं राजाची रॉयल बोट होती. हा देखावा फार सुंदर दिसत होता, व रात्रीं सर्व बोटींवर दिव्यांची फार चांगली रोषनाई केली होती.

## सर अँड्रू फ्रेजर.

तारीख २९ जून रोजीं दुपारीं आह्मी सर अँड्रू व लेडी फ्रेजर यांच्या आमंत्रणावरून त्यांच्या भेटीला गेलों. तीं आपल्या एका श्रीमंत मित्राच्या घरीं उतरलीं होतीं. तें गांव लंडनपासून दोनअडीच तासांच्या रस्त्यावर होतें, तेथें सर अँड्रू फ्रेजर यांनीं लिहिल्याप्रमाणें आह्मी ट्रेननें गेलों. स्टेशनावर सर अँड्रू फ्रेजर यांचे मित्र गाडी घेऊन आह्मांला नेण्याकरितां आले होते, त्यांच्या गाडींत बसून आह्मी त्यांच्या घरीं गेलों. तेथें दरवाजाशींच सर अँड्रू फ्रेजर आमची वाट पहात होते. आह्मांला पहातांच ते गाडीच्याजवळ आले, व आह्मां दोघांनांहि शेकहँड करून

त्यांनीं फार प्रेमानें कुशलवृत्त विचारलें, आणि आह्मांला घरांत घेऊन गेले. सर अँड्रू फ्रेजर हे सेंट्रल प्रॉव्हिन्सेसमध्यें डेप्युटी कमिशनर, कमिशनर, व चीफ कमिशनर अशा मोठमोठ्या हुद्यांच्या कामावर होते, व तेथें फार लोकप्रिय होते. आमच्या सासऱ्यांच्या वेळेपासूनच यांचें आमच्या घराण्यावर फार प्रेम व आदर होता. तें प्रेम त्यांनीं आतांपर्यंत कायम ठेविलेलें हें पाहून आह्मां दोघांनांहि फार आनंद झाला आणि कौतुक वाटलें. जशीं आपलीं अगदीं जिव्हाळ्याचीं व ममतेचीं माणसें फार दिवसांनीं भेटलीं असतां मनुष्याला आनंदाचें भरतें येऊन अंतःकरण प्रेमानें उचंबळून येतें, त्याप्रमाणें हे वृद्ध व सन्माननीय गृहस्थ आमच्या गाडीजवळ धांवत येऊन आह्मांला भेटले. खरें व निःष्कपट प्रेम कधींहि लपत नाहीं ! सर अँड्रू फ्रेजर यांनीं आपल्या हिंदुस्तानांतील अनुभवावर जें एक मोठें पुस्तक लिहिलें आहे, त्यांतहि त्यांनीं आमच्याविषयींचें आपलें प्रेम आणि आदर व्यक्त केला आहे.

घरामध्यें गेल्यावर लेडी फ्रेजर व आणखी कांहीं बाया आह्मांला भेटल्यावर, तेथेंच नागपूरचे रा. ब. वासुदेवराव पंडित व नागपूरजवळील कामठा गांवचे जमीनदार असे ओळखीचे दोघे गृहस्थ भेटले. नंतर सर्वांनां लेडी फ्रेजरनीं चहा घेण्याकारितां डायनिंग रूममध्यें नेलें.

चहापान झाल्यावर आह्मीं घराच्या भोंवतालचा सुंदर बाग पाहिला. या बागेमध्यें थोडथोडेंच पण सर्व कांहीं होतें. फळझाडें, फुलझाडें व गुलाबांचे सुंदर वेल, मध्येंमध्यें लहानलहानसे फुलांचे ताटवे व दूर्वांची हिरवींगार व सुबक चक्रें, टेनिसकोर्ट, वगैरे सर्व फार व्यवस्थेशीर होतें. या सुंदर बागेच्या मध्यभागीं घर होतें. घरांतीलहि सर्व व्यवस्था व स्वच्छता फार चांगली होती.

हें सर्व पाहिल्यावर थोडा वेळ त्यांच्याशीं संभाषण करून मग आह्मी त्यांची रजा घेतली. जातांना सर अँड्रू फ्रेजर आणि लेडी फ्रेजर यांनीं

आह्मांला सांगितलें, कीं, आमच्या स्कॉटलंडांतील घरीं आगस्टमध्यें आह्मांला जरूर भेटा, व तेथें कांहीं दिवस आमच्याजवळ रहा. या सर्व व्यवस्थेबद्दल नोट लिहून त्यांनीं आमच्याजवळ दिली.

परत येतांना आह्मी जमीनदारसाहेब व वासुदेवराव पंडित यांच्या आग्रहास्तव त्यांच्या मोटारमध्यें बसलों. हे जमीनदारसाहेब आपल्या खर्चानें कारोनेशन व लंडन पहाण्याला आले होते. त्यांच्या बरोबरच रा. ब. वासुदेवराव पंडित हेहि आले होते. जमीनदारसाहेबांनीं आपल्याबरोबर आपले नोकरचाकर, स्वयंपाकी वगैरे बरीच मंडळी आणिली होती, व ते जेवणखाण वगैरे सर्वांमध्यें आपल्या तऱ्हेनें रहात असत. त्यांच्या सांगण्यावरून असें दिसलें, कीं, त्यांनां इकडील प्रवास सोसला नाहीं, व आवडलाहि नाहीं. ह्मणून त्यांचा लवकरच परत जाण्याचा विचार होता. आह्मीं जमीनदारसाहेबांना विचारिलें "तुह्मांला लंडन कसें काय आवडलें?" यावर ते ह्मणाले "येथें कांहीं मला विशेष दिसत नाहीं. थोडेंबहुत मुंबईसारखेंच आहे. माझी जशी कल्पना होती तसें नाहीं!"

आह्मीं त्यांनां सांगितलें "येथें तुह्मी आल्यासारखे आणखी कांहीं दिवस रहा, व येथील पहाण्यासारखीं स्थळें पहा, ह्मणजे तुह्मांला तुमच्या कल्पनेसारखें कांहीं दिसेल!"

पण ते ह्मणाले "मला इकडील थंड हवा बिलकूल सोसत नाहीं, ह्मणून जितकें लवकर जावें तितकें बरें. उगीच परमुलुखामध्यें प्रकृति अधिक बिघडली तर काय करावें?"

असो. जमीनदारसाहेबांसारख्या मनुष्यानें इकडे येण्याचें धाडस केलें, हेंच फार समजावयाचें!

## एव्हर्सले.

तारीख २८ ब्रेकफास्टनंतर आह्मीं जून रोजीं आगगाडीनें एव्हर्सलेला गेलों, व दुपारीं तेथें एक वाजतां पोहोंचलों. हें गांव लंडनच्या जवळच

आहे. ट्रेननें सारी दोनतीन तासांचीच वाट आहे. येथें सेंट्रल प्रॉव्हिन्सेसचे फायनॅन्शल कमिशनर मि. फॉक्स ट्रांगवेज हे रहात होते. हे हल्लीं येथें रजेवर आले होते. मिस्टर व मिसेस फॉक्स ट्रांगवेज यांची आमची फार चांगली ओळख असल्यामुळें त्यांनीं आह्मांला चार दिवस आपल्या घरीं रहाण्याला बोलाविलें होतें. मिस्टर फॉक्स ट्रांगवेज यांचें घर लहानसेंच पण सुबक व चांगलें सोयीचें होतें, आणि बाजूंनीं चांगला बाग होता. मिसेस फॉक्स ट्रांगवेज यांची घरांतील व्यवस्था वाखाणण्याजोगी होती. या बाई फारच मनमिळाऊ असून अगदीं साध्या रहातात. या आपलीं घरांतील कामें अगदीं नियमित वेळीं व व्यवस्थेशीर रीतीनें करीत असत. जरी यांच्या घरांत एक स्वयंपाकीण व एक घरकामाकरितां अशा दोन बाया नोकर होत्या, तरीहि त्या स्वत: सर्व देखरेख करीत असत. यांचीं दोन्ही मुलें या वेळीं घरींच होतीं. मुलगा पंधरासोळा वर्षांचा होता, व मुलगी तेराचौदा वर्षांची होती. हीं दोन्ही मुलें अगदीं आपल्या आईबापांच्या आज्ञेप्रमाणें वागत असत. मुलगी मिस एलीनार ही जरा लाजाळू होती. ती फारशी बोलत नसे; पण आपल्या आईसारखीच नेहमीं उद्योगी व साध्या तऱ्हेनें रहाणारी दिसली.

मिस्टर व मिसेस फॉक्स ट्रांगवेज या दोघांनींहि आमचें प्रमानें आदरातिथ्य केलें. मिसेस फॉक्स ट्रांगवेज या स्वतां दोनतीन वेळां येऊन आमच्या खोलींतील व्यवस्था पहात असत, व सांगत असत, कीं, तुह्मी अगदीं आपल्या घरच्याप्रमाणें रहा, व जें कांहीं लागेल तें कांहींएक संकोच न धरितां आपल्याला कळवा.

रात्रीचें जेवण झाल्यावर आह्मी सर्वजणें ड्राइंगरूममध्यें कार्ड खेळत बसलों. साडेअकरांच्या सुमाराला खेळ आटोपला, व मिसेस फॉक्स ट्रांगवेजनीं आपल्या मुलांनां "जा आतां जाऊन निजा, उद्यां सकाळीं शाळेंत जायचें आहे," असें सांगितलें. मुलें गेल्यावर थोड्या वेळानें

मीहि उठलें. तेव्हां मिसेस फॉक्स ट्रांगवेज मेणबत्ती घेऊन माझ्या बरोबर आल्या. सर्वांच्याच निजण्याच्या खोल्या वरच्या मजल्यावर होत्या. मिसेस फॉक्सनीं गरम पाणी भरलेली रबराची पिशवी माझ्या बिछान्यांत आणून ठेविली. त्या ह्मणाल्या "रात्रीं गरम पाण्याची पिशवी वापरणें फार चांगलें आहे. तुह्मी जपान, अमेरिका वगैरे थंड देशांतून व बर्फाच्या मैदानांतून फिरलां, तरी गरम पाण्याची पिशवी कशी वापरीत नाहीं ? तुह्मां हिंदुस्तानच्या लोकांनां तर इकडील थंडी फार कठीण वाटावी. जरी या वेळीं समर आहे तरीहि रात्रीची बरीच थंडी असते." अशा तिकडील हवामानाच्या वगैरे गोष्टी आह्मी थोडा वेळ बोलत बसलों. मग जातांना त्यांनीं मला सांगितलें कीं, "आह्मी सकाळीं साडेआठाला ब्रेकफास्ट घेत असतों. पण एवढ्या सकाळीं उठून पोषाक करायचा व खालीं यायचें, असा तुह्मांला उगीच त्रास होईल, ह्मणून तुह्मांला माझी नोकरबाई ब्रेकफास्ट तुमच्या खोलींत आणून देईल." असा त्या मला आग्रह करूं लागल्या. मीं त्यांनां सांगितलें "मला सकाळीं उठण्याची संवय आहे, व खालीं डायनिंग रूममध्यें येण्याचा मला कांहींएक त्रास होणार नाहीं. तुह्मी कांहीं काळजी करूं नका. येथें आह्मांला वरच्याहिपेक्षां आराम आहे."

हे बराच वेळ खालीं मिस्टर फॉक्स ट्रांगवेजशीं बोलत बसले होते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेसहा वाजतांच नोकरबाईनें तोंड, हातपाय धुण्याकरितां गरम पाणी दरवाज्याच्या बाहेर आणून ठेविलें, व दरवाजावर हलकेच दोन ठोके मारून गरम पाणी तयार असल्याची सूचना केली. हे नेहमींप्रमाणें सहा वाजतां उठून स्नान करून पोथी वगैरे वाचून आठ वाजायच्या आधींच तयार झाले, व मलाहि गडबड करून साडेआठांच्या पूर्वींच सर्व तयारी करविली. नंतर आह्मी दोघेंहि खालीं गेलों. तेव्हां डायनिंगरूममध्यें मिस्टर व मिसेस फॉक्स ट्रांगवेज मुलें-बाळें घेऊन ईश्वराची प्रार्थना करीत होते. हें पाहून आह्मी त्यांच्या

प्रार्थनेमध्यें उगीच कशाला अडथळा करावा, ह्मणून बाहेरच्या बगीच्यामध्यें घटकाभर फिरण्याला गेलों. मग लवकरच फॉक्स तेथें आले व “ हमारी पूजा हो गई, आव, अंदर चलो !” असें थट्टेनें हिंदुस्तानींत ह्मणाले. त्यांच्याबरोबर आह्मी डायनिंगरूममध्यें गेलों. ब्रेकफास्टला त्यांच्या बागेंतील ताज्या भाज्या, फळें, मोरंबे वगैरे जिनसा होत्या. मिस्तर व मिसेस फॉक्स हीं दोघेंहि व्हेजीटेरियनच होतीं. त्यांचा बहुतेक आहार भाजीपाला व फळें हाच असे.

दुपारीं मिसेस फॉक्स यांनीं गार्डन पार्टी केली, व बायकापुरुष मिळून बरीच मित्रमंडळी बोलाविली. नंतर टेनिस, बॅडमिंटन वगैरे खेळ झाले. येथें आह्मी तीनचार दिवस राहिलों. तितक्या वेळांत आमच्या बऱ्याच जणांशीं ओळखी झाल्या. एके दिवशीं डॉक्टर पेट्रीस यांच्याकडे आह्मांला गार्डनपार्टीला नेलें. तेथें आह्मी सर्वजणें मोटारमध्यें बसून गेलों. तेथें फार मोठी गार्डनपार्टी होती. सर्वांच्या करमणुकीकरितां पुष्कळ तऱ्हेच्या खेळांची योजना केली होती, व जिंकणारांकरितां चांगल्याचांगल्या वस्तु बक्षिसांकरितां ठेविल्या होत्या. यांनीं एक टारगेट क्रिकेटचा खेळ जिंकला ह्मणून यांना एक सुंदर फोटोफ्रेम बक्षीस मिळाली ! खूप कर्मणूक करून व उत्तम केकज् आणि ताजी स्ट्राबेरीज फळें व रिच क्रीम असे पदार्थ खाऊन संध्याकाळीं आह्मी सर्वजणें घरीं परत आलों.

एके दिवशीं दुपारीं मिस्टर व मिसेस ओम्याक यांच्या भेटीला गेलों. मिस्टर ओम्याक हे सेंट्रल प्रॉव्हिन्सेसमध्यें पोलिटिकल एजंट असून त्यांची आमची पूर्वींची ओळख होती. मिस्टर ओम्याक हे आतां पेन्शन घेऊन येथें सुखवस्तु रहात होते. या उभयतांच्या भेटीमुळें आह्मांला फार बरें वाटलें. आपलीं जुन्या ओळखीचीं माणसें भेटलीं ह्मणजे मनाला फार आनंद होतो. मिसेस ओम्याक यांनीं जपान वगैरेकडून प्रवास करून चांगल्या तसबिरी व सुंदर चित्रें अशा अनेक वस्तु आणून

आपलें घर चांगलें सजविलें होतें, व हिंदुस्तानच्याहि चांगल्या चांगल्या पुष्कळ वस्तु आणल्या होत्या. त्या जिकडेतिकडे सुबक रीतीनें मांडून घराला फार शोभा आणिली होती. मग मिसेस ओम्याक यांनीं आह्मांला बगीचा पाहाण्यास नेलें. त्या बगीचाच्या कामांतहि फार कुशल आहेत, व स्वतां पुष्कळ मेहनत घेतात, असें मिसेस फॉक्स ट्रांगवेज यांनीं आह्मांला सांगितलें होतें. बगीचा खरोखरी फार सुंदर होता. जिकडेतिकडे गुलाबाचे वेल नीटनेटके व काळजीपूर्वक सुरेख रीतीनें लाविले होते, व हा वसंतऋतु असल्यामुळें गुलाबाला सुंदर फुलांचे झोकच्याझोक लागले होते. एकंदरींत सर्व बगीचा जिकडे पहावा तिकडे सुरेख व चित्ताकर्षक दिसत होता.

एके दिवशीं दुपारीं मिसेस फॉक्स ट्रांगवेज यांनीं आह्मांला त्यांच्या दुसऱ्या एका मित्राच्या घरीं नेलें. यांचें घर फार मोठें व तसाच सुंदर बागबगीचा, नोकरचाकर वगैरे सर्व व्यवस्था अगदीं श्रीमंती थाटाची दिसली. घरचे यजमान बरेच वृद्ध झाले होते. या गृहस्थांनीं आस्ट्रेलिया-मध्यें व्यापार करून चांगले पैसे मिळविले होते, व आतां एव्हर्सलेमध्यें घर करून ते सुखवस्तू राहात असत. दुर्दैवेंकरून बिचाऱ्याची बायको कांहीं वर्षांमागें वारली; परंतु मोठमोठे मुलगे, मुली, नातवंडें वगैरे मोठें कुटुंब आहे. मुलगे इकडेतिकडे रोजगारव्यापार करीत फिरत असतात व मुलेंबाळें ह्मातारबुवांजवळ आणून टाकतात. घरांतील व्यवस्था पहाण्याकरितां ह्मातारबुवांची त्यांच्यासारखीच एक वृद्ध बहीण आहे. ती मुलांबाळांवर व घरांतील व्यवस्थेवर लक्ष्य ठेवते.

आह्मी त्यांच्या येथें गेलों, तेव्हां त्यांचा भव्य बटलर आह्मांला आंत नेण्याकरितां आला. त्याला पाहून मला वाटलें, कीं, हाच घरचा मालक असावा. पण हा आह्मांला शेकहँड करीत नाहीं, कांहीं बोलत नाहीं, नुसतें खुणेनें रस्ता दाखवतो आहे, हें कसें, ह्मणून मीं हळूच यांनां विचारलें, तेव्हां मला समजलें, कीं, हा बटलर आहे.

नंतर त्या बटरलनें रस्ता दाखविल्याप्रमाणें आह्मी ड्राइंगरूममध्यें गेलों. तेथें घरचे मालक व त्यांची बहीण आणि मुलेंबाळें व नातवंडें अशीं कुटुंबांतील माणसें बसलीं होतीं. ड्राइंगरूम चांगली भव्य व सुशोभित असून फायरप्लेसमध्यें धगधगीत विस्तव जळत होता. त्या विस्तवाच्या चकाकींत उजेडानेंहि ड्राइंगरूमला विशेष शोभा आली होती.

मिसेस फॉक्स यांनीं आमच्या सर्वांशीं ओळखी करून दिल्या. या वृद्ध गृहस्थानें आमचें फार स्वागत केलें, व आपला आस्ट्रेलियांतील बराच अनुभव वगैरे सांगितला. हे वृद्ध गृहस्थ सत्तरऐशीं वर्षें वयाचे झाले आहेत, तरी रोज नियमितपणानें कांहीं ना कांहीं उद्योगधंदा करीत असतात, व रोज दोनतीन कोस तरी पायीं फिरून येतात. त्याप्रमाणें ते आतांच कांहीं महत्त्वाच्या कामाकरितां दूरची मजल करून आले होते, व नातवंडें वगैरेंनां घेऊन विस्तवाजवळ चहा पीत बसले होते. ते आपल्या नातवंडांनांहि फार काळजीपूर्वक शिक्षण देतात, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. असें हें सुखी कुटुंब पाहून आह्मांला फार आनंद झाला, व या वृद्ध गृहस्थाची भेट झाल्यामुळें एक मोठा लाभ झाल्यासारखें वाटलें.

याच दिवशीं आह्मी मिस्टर व मिसेस निल यांनां भेटलों. हेहि नागपूरमध्यें कमिशनर होते, व यांचीहि आमच्या सासऱ्यांच्या वेळेपासून चांगली ओळख आणि फार स्नेहसंबंध होता. हे बरेच वर्षांपासून रिटायर झाले आहेत, आणि आतां सुखवस्तू कालक्रमण करीत आहेत. तथापि अजूनहि हिंदुस्तानचें कोणी ओळखीचें आलें असतां त्याला अगत्यानें भेटतात व शक्य ती मदत करितात.

अशा तऱ्हेनें आमचा एव्हर्सले येथील वेळ फार आनंदांत व चांगल्या लोकांच्या भेटी घेण्यांत अगदीं लवकर गेला, आणि मिस्टर व मिसेस फॉक्स ट्रांगवेज व त्यांचीं मुलें या सर्वांनीं आमचें फार आदरातिथ्य केलें. या गांवीं हवाहि फार चांगली आणि रस्त्यांनीं वगैरे जिकडेतिकडे

अगदीं शांतता असते. येथील घरांची रचना फार चांगली आहे. घरें फारशीं मोठीं नाहींत; पण सोयीवार असून प्रत्येक घराच्या भोंवतालीं सुंदर बाग आहे. घरें बरींच दूर दूर अंतरावर बांधिलीं आहेत. अशीं घरें मोकळीं व अंतरानें असल्यामळें वारा चांगला वाहूं शकतो, व आरोग्य चांगलें राहतें, आणि झाडेंझुडें व बागबगीचेहि चांगले भरारतात. या वेळीं मिसेस फॉक्स यांच्या बगीच्यांतहि चांगलीं फळें व भाज्या होत्या. लंचच्या वेळीं व दुपारच्या वेळीं स्ट्रॉबेरीज, रासबेरीज, गुजबेरीज हीं फळें क्रीम व साखर यांबरोबर आह्मीं पुष्कळ खाल्लीं. दुपारच्या वेळीं मुलें आह्मांला बागेंत नेत असत, व तेथें झाडांचीं ताजीं फळें खाण्याचा फार आग्रह करीत असत.

तारीख १ जुलै रोजीं सकाळीं ब्रेकफास्ट घेऊन आह्मी एव्हर्सल येथून निघालों. मिसेस फॉक्सहि आमच्याबरोबर आल्या होत्या. जवळच रीडिंग नांवाच्या स्टेशनावर आह्मी उतरलों. तेथें मिसेस फॉक्स यांनीं आह्मांला हातमागाच्या फॅक्टरीमध्यें नेलें. परंतु त्या दिवशीं फॅक्टरी बंद असल्यामुळें पहातां आली नाहीं. मग कांहीं शिवणकामाचीं दुकानें पाहिलीं व स्टेशनवर परत गेलों. तेथून आह्मीं लंडनकडील ट्रेन घेतली व मिसेस फॉक्स आपल्या गांवीं परत गेल्या.

## पुनः लंडन.

तारीख २ जुलैला आह्मी जनरल व मिसेस फेगन यांच्याकडे चहा घेण्याला गेलों. जनरल फेगन यांचे चिरंजीव मिस्टर फेगन हे सेंट्रल प्रॉव्हिन्सेसमध्यें पोलीस सुपरिंटेंडेंट आहेत. त्यामुळें या फेगन्स कुटुंबाशीं आमची चांगली ओळख आहे. जनरल फेगन यांच्याकडे आणखीहि कांहीं मंडळी चहाला आली होती. त्यांमध्यें कांहीं सफ्रेजेटस बायाहि होत्या. त्यांची दुसऱ्या दिवशीं एक मोठी सभा होती, ह्मणून त्या दूरदूरच्या गांवांहून आल्या होत्या. त्यांची आपसांमध्यें बरीच वाटाघाट चालली होती. पण आह्मांला त्यांतलें विशेष कांहीं समजलें नाहीं. मला इतकेंच समाधान वाटलें, कीं, सफ्रेजेट बाया पहाण्यास मिळाल्या. मिसेस फेगन यांनीं

आमच्याकरितां चहाची फार उत्तम तयारी केली होती, व चांगलीं ताजीं फळें आणि दुधाचे वगैरे पदार्थ केले होते.

चहा घेतल्यावर क्वीन्स हॉटेलमध्यें मिसेस ॲनी बेझंट यांचें लेक्चर ऐकण्याला गेलों. तेथें दरवाजावर लोकांची फार गर्दी होती. दरवाजा उघण्याची वाट पहात लोक तटस्थ उभे होते. अर्ध्याएक तासानें दरवाजे उघडले व सर्वांनां आंत जाण्याची मोकळीक मिळाली. आह्मी आपल्या तिकीटांप्रमाणें खुर्च्यांवर जाऊन बसलों. मग लवकरच बेझंट बाई आपल्या उंच जाग्यावर येऊन उभ्या राहिल्या, व सुमारें एक तास त्यांचें लेक्चर झालें. तें लोकांनां उपदेशाचें व तत्त्वज्ञानाचें होतें. राजनिष्ठ असावें, परोपकार करावा, विद्यावृद्धि करावी वगैरेबद्दल बाई बोलल्या. या बाईची इतकीच तारीफ आहे, कीं, त्या एकदां बोलावयाला लागल्या, कीं, एकसारख्या बोलत असतात. मग थांबत नाहींत, किंवा अडखळत नाहींत, कीं घुटमळत नाहींत. सारख्या शांतपणानें बोलत असतात व सर्वांनां ऐकूं येईल असें स्पष्ट बोलतात.

दुसरे दिवशीं सर्व इंडियन विद्यार्थ्यांकडून सर कृष्ण गुप्त यांनां एका हॉटेलमध्यें लंचपार्टी होती. त्याचें निमंत्रण आल्यावरून आह्मी तेथें गेलों होतों. तेथें सयाजीराव महाराज गायकवाडहि होते, व पुष्कळ हिंदुस्तानचे स्त्रीपुरुष होते. यूरोपियन लोक फार थोडे होते. हा हिंदुस्तानी लोकांचा घोळका मोठा चमत्कारिक दिसत होता. या घोळक्यांत बऱ्याच जातींचे लोक होते. बंगाली होते, मराठे होते, कांहीं थोडे पारशी होते, गुजराथी होते, ब्राह्मण होते. असे बऱ्याच जातींचे लोक होते. ते येथें सर्व निर्भयपणें एकमेकांनां खेटून जेवत होते.

जेवण संपल्यावर सयाजीराव महाराजांनीं भाषण केलें. त्यांत त्यांनीं आपल्या राज्यांत कसकशा सुधारणा केल्या व सर्व जातींच्या लोकांनां मोठमोठ्या जागा दिल्या, वगैरे माहिती सांगितली व सर कृष्ण गुप्त यांची तारीफ केली.

नंतर सर कृष्ण गुप्त हे बोलले. यांच्या भाषणांत यांनीं विद्यार्थ्यांनां उपदेश केला व सरकारचे आभार वगैरे मानले. हें सर्व आटोपल्यावर आह्मी आलेंपिया येथें फुलांचें प्रदर्शन पहाण्याला गेलों. येथें अनेक तऱ्हेच्या फुलांच्या कुंड्या फार सुरेख रीतीनें ठेविल्या होत्या. फुलांचे चित्रविचित्र रंग व निरनिराळ्या आकृति फारच मोहक दिसत होत्या. या वेळीं येथें स्वीटपीज नांवाच्या फुलांचा फार भर होता. त्यामुळें जिकडेतिकडे तींच फुलें दिसत होतीं. असा हा फुलांचा देखावा पहातच रहावें असें वाटत होतें.

लंडनमध्यें आह्मी जुलई महिनाभर होतों. त्या वेळांत रोज कोठें ना कोठें तरी जात होतों बहुतकरून रोज रात्रीं नाटकाला अथवा कान्सर्टला जावें, अथवा नेहमीं अॅटहोम पार्थ्यांचीं व गार्डन पार्थ्यांचीं आमंत्रणें असत तेथें जावें, असा आमचा क्रम असे.

शेक्सपियरचींहि बरींच नाटकें आह्मीं पाहिलीं. या वेळीं लंडनमध्यें किस्मत हें नाटक फारच लोकप्रिय झालें होतें. तें रोज रात्रीं होत असे. त्याला लोकांची फार गर्दी होत असे. त्यांतील सीनसीनरी, अॅक्टर्स, अॅक्ट्रेसेस् हें सर्व पहाण्याजोगें होतें.

एके दिवशीं आह्मी व्हाइट सिटि पहाण्याला गेलों. येथें फार मोठें एक्झिबिशन होतें.याच्याकरितां मोठमोठ्या इमारती पांढऱ्या केल्या होत्या, व एकेक भागामध्यें एकेक देशच्या वस्तु ठेविल्या होत्या, व त्या त्या देशचे कांहीं लोकहि आणले होते. रात्रीच्या वेळीं येथें फार चांगली रोषनाई होत असे, व दारूकामहि सुटत असे. त्यामुळें या पांढऱ्या इमारतींनां विलक्षण शोभा येत असे.

आह्मी हिंदुस्तानचें सेक्शन पहाण्याला गेलों. तेथें सर्व हिंदुस्तानचे लोक जरीचीं वगैरे कामें करीत होते. आह्मांला पाहून ते लोक फार खूष झाले. आह्मांला पाहून जे ते आपापलीं कामें सोडून आह्मांला अनेक प्रश्न विचारूं लागले. “तुह्मी कधीं आलां ? तुह्मी कोणच्या गांवां-

हून आलां ? किती दिवस रहाणार ? आह्मांला हिंदुस्तानचें कोणी दिसलें ह्मणजे फार आनंद होतो. त्या अमक्याला तुह्मी ओळखतां का ? त्या तमक्याला तुह्मी ओळखतां का ?'' गरीब बिचारे, असे आह्मांला पुष्कळ प्रश्न विचारूं लागले.

आह्मीं त्यांनां विचारलें " तुह्मांला येथें कसें काय वाटतें ? तुमची येथें सर्व चांगली व्यवस्था ठेविली जाते कीं नाहीं ? तुह्मांला किती दिवसांकारितां आणलें आहे ?'' वगैरे चौकशी केली. त्यावर ते ह्मणाले "आमची येथें सर्व चांगली व्यवस्था आहे. पण या विजेच्या दिव्यांजवळ बसून काम करण्यामुळें आमच्या डोळ्यांनां फार त्रास होतो, व आह्मांला फार थकवा येतो.'' हे लोक कांहीं दिल्लीचे होते, कांहीं आग्र्याचे होते, कांहीं कानपूरचे होते व कांहीं बनारसकडील होते. या लोकांनां चांगले पगार देऊन व येण्याजाण्याचा खर्च देऊन येथें एक्झिबिशनसाठीं आणलें होतें.

असें हें व्हाइट सिटि एक्झिबिशन आह्मी संध्याकाळचे पांच वाजल्यापासून रात्रीचे अकरा वाजेपर्यंत हळुहळू पहात होतों. तरीहि त्याचा अर्धा भागसुद्धां पहाणें झालें नाहीं. रोज सकाळीं ब्रेकफास्ट झाली, कीं, या एक्झिबिशनविषयीं बोलणें चालत असे.

रोज सकाळीं ब्रेकफास्ट झाली, कीं, यांची बाहेर जाण्याची गडबड चालत असे. " चला लवकर, तयार व्हा; आपलीं शस्त्रास्त्रें घ्या !'' आमचीं शस्त्रास्त्रें ह्मणजे छत्र्या, चष्मे, घड्याळें, पैशाच्या पिशव्या, आणि वरून पांघरावयाचे ओव्हरकोट. मुख्य शस्त्र पैशाची पिशवी. ती विसरलों कीं झालें, सर्व कारभार अडला ! ह्मणून तें शस्त्र आधीं आठवणीनें खिशांत घालावें लागे. यांची तयारी झाली ह्मणजे मला ह्मणावयाचे "मी शस्त्रास्त्रमंडित झालों; आतां तुह्मी आपलें पहा, कांहीं विसरूं नका.'' अशा तऱ्हेनें आह्मी आमच्या वस्तूंनां शस्त्रास्त्रें ह्मणून कांहीं तरी गंमत करावी.

आह्मीं बहुतकरून टयूबनें, अंडरग्राऊंडनें अथवा मोटारबसनें फिरावें. यामुळें खर्चहि थोडा लागे व जाणेंयेणेंहि लवकर होई. त्यामध्यें जरा थोडें चालावें लागे व जिन्यांची वगैरे चढउतर करावी लागे, त्यामुळें मला थोडा त्रास होई; पण इकडे आल्यापासून नेहमीं पायींच फिरल्यामुळें, पायीं फिरण्याची मला थोडीशी सवय झाली होती.

ही टयूबरेल्वे बरीच जमीन कोरून खालीं केली आहे. या रेल्वेंत बसण्याकरितां लिफ्टनें पुष्कळ खालीं जावें लागतें व पुनः खालीं एकदोन जिने उतरावे लागतात. तेथें रात्रंदिवस विजेचे दिवे लावलेले असतात. वरून नळया लावून स्वच्छ हवा आणण्याची योजना केली आहे, त्यामुळें तेथें कोंडल्यासारखें वाटत नाहीं, किंवा गुदमरतहि नाहीं. तेथें पांचपांच मिनिटांनीं गाड्या येतजात असतात. गाड्यांनां विजेचींच एंजिनें असतात, त्यामुळें धूर मुळींच नसतो. या गाडींतून कोठेंहि जावयाचें असलें, तरी दोन आण्यांचेंच तिकीट लागतें, आणि ह्मणूनच त्या गाड्यांनां 'टपनीटयूब' ह्मणतात.

लंडनच्या कित्येक ह्मातार्‍या बाया या गाड्यांनीं कधींच प्रवास करीत नाहींत ! त्या ह्मणतात " अशा गाड्यांनीं जाणें धोक्याचें आहे. त्या ठिकाणीं केव्हां अपघात होईल, त्याचा कांहीं नेम नाहीं !"

आतां लंडनमध्यें जिकडेतिकडे मोटारबसेस झाल्या आहेत. दहा वर्षांपूर्वीं आह्मी गेलों होतों, तेव्हां या बसेसूनां घोडे जुंपीत असत. पण आतां त्या मोटारकारसारख्या मशीनरीनेंच चालतात. भाड्याच्या मोटारगाड्याहि जिकडेतिकडे पुष्कळ झाल्या आहेत. त्यामुळें घोड्याच्या गाड्या आतां फारशा दिसत नाहींत.

लंडनमध्यें असतांना आह्मीं आमच्या ओळखीच्या बर्‍याच लोकांच्या भेटी घेतल्या. या अवधींत आमच्या बर्‍याच नवीन लोकांशीं ओळखी झाल्या, व पहाण्यासारखीं पुष्कळ ठिकाणेंहि आह्मीं पाहिलीं. त्यांपैकीं कांहीं पिक्चर गॅलरीज्, म्यूझिअम्, लंडन टॉवर, झिआलॉजिकल् गार्डन्, हाइड पार्क, अर्लस् कोर्ट व कांहीं राजवाडे हीं होत.

एके दिवशीं आह्मी एका मोठ्या पार्टीला गेलों होतों. तेथें हिंदुस्तानांतील पुष्कळ मंडळी होती. बायका, पुरुष, विद्यार्थी, तरुण मुलें वगैरेंचा चांगलाच भरणा होता, व यूरोपिअन मंडळीहि पुष्कळ होती. हिंदुस्तानी लोकांमध्यें बंगाली लोकांची आणि पारशी लोकांची संख्या जास्त होती. ब्राह्मण, गुजराथी, मुसलमान वगैरे तुरळक दिसत होते. त्या ठिकाणीं मद्रासचे जस्टिस् सर शंकर नायर आणि त्यांच्या पत्नी हीं उभयतां होतीं. याच ठिकाणीं सर फ्रेडरीक लेली व लेडी लेली यांच्याहि भेटी झाल्या. सर फ्रेडरीक लेली हे सेंट्रल प्राव्हिन्सेसमध्यें कांहीं दिवस चीफ् कमिशनर होते, ह्मणून त्यांची आमची जुनी ओळख होतीच. अशा प्रकारें त्या पार्टीमध्यें आमच्या पुष्कळांशीं ओळखी झाल्या. नंतर एका अमेरिकन् गृहस्थानें एक तासभर ‘ नियमितपणा ’ यावर लेक्चर दिलें. तें सर्वांच्या मनावर ठसा उमटण्याजोगें झालें.

त्या ठिकाणीं एका इंग्लिश बाईशीं माझी ओळख झाली. तिनें तेथें जवळच असलेल्या ‘ लेडीज् क्लब ’मध्यें मला नेलें. त्या क्लबच्या लेडी लेली या मेंबर होत्या, त्याहि आमच्याबरोबर आल्या. हा क्लब एका मोठ्या इमारतींत तिसऱ्या मजल्यावर आहे. बऱ्याच खोल्या ओलांडून आह्मी साधारण प्रशस्त अशा खोलींत गेलों. तेथें मध्यभागीं एक वाटोळें टेबल होतें व त्यासभोंवतीं दहाबारा खुर्च्या होत्या. बाजूलाहि कांहीं खुर्च्या असून पुस्तकांचीं कांहीं कपाटें होतीं. आह्मी गेलों त्या वेळीं तेथें सातआठ बाया बसलेल्या होत्या. आह्मी त्या ठिकाणीं बसल्यावर एका प्रमुख स्त्रीनें त्या स्त्रियांशीं माझी ओळख करून दिली, व मला त्या छोट्या क्लबाची थोडक्यांत पुढीलप्रमाणें हकीगत सांगितली:—

“ या इमारतींत पुष्कळ तऱ्हेचे क्लब आहेत, व लहानमोठ्या लायब्ऱ्याहि आहेत. लंडनमध्यें असे क्लब व लायब्ऱ्या पुष्कळ ठिकाणीं आहेत. हा लहानसा ‘ लेडीज् क्लब ’ येथें जवळपास रहाणाऱ्या स्त्रियांनां सोयीस्कर पडेल असें जाणून मुद्दाम काढला आहे. संध्याकाळीं फुरसती-

प्रमाणें आह्मी येथें जमा होतों, व आपापल्या डायऱ्या आणि नोटबुकें काढून सबंध दिवसाचा आमचा अनुभव, विचार आणि माहिती वगैरे एकमेकींनां सांगतों. अशा प्रकारें मिळालेल्या नवीन माहितीबद्दल भवती न भवती होते. या तऱ्हेनें करमणूकची करमणूक होऊन शिवाय वाचन इत्यादि होतें."

त्यानंतर त्यांनीं आपापलीं नोटबुकें काढून आपापला अनुभव व माहिती आळीपाळीनें वाचून दाखविली. एका बाईनें तें सर्व एका पुस्तकांत टिपून घेतलें. त्या दिवशीं वाचण्यांत आलेले सर्व अनुभव व माहिती आज माझ्या लक्ष्यांत नाहींत; पण जे कांहीं आठवतात, त्यांपैकीं मुख्यमुख्य असे एकदोन येथें देतें.

एक स्त्री ह्मणाली "पांचसहा दिवसांपूर्वीं एक जपानी तरुण मुलगी लंडनला आली होता. ती कोणाबरोबर आली होती, किंवा एकटीच आली होती, तें कळत नाहीं; पण तिला एकहि इंग्लिश शब्द येत नव्हता, किंवा तिच्याजवळ खाण्यापिण्याला एक पैसाहि शिल्लक राहिला नव्हता. जेव्हां तिला दोनतीन दिवस उपास पडले, तेव्हां ती कुक कंपनीच्या ऑफिसांत गेली व तेथें त्यांनां खुणांनीं सांगूं लागली, कीं 'मला कसेंहि करून माझ्या देशीं पोहोंचवा. नाहीं तर मी आतां आत्महत्या करतें!' मग त्या लोकांनीं स्वतः पैसे देऊन तिची देशीं रवानगी करून दिली."

हें ऐकून सर्व बाया त्या मुलीबद्दल कळवळा दाखवून उद्गारल्या "लंडन-सारख्या सुधारलेल्या शहरांत त्या मुलीची अशी स्थिति व्हावी ना!"

दुसरी एक स्त्री ह्मणाली "दोन वर्षांपूर्वीं एका गरीब फ्रेंच बाईनें एका इंग्लिश मनुष्याच्या मोहांत पडून त्याच्याशीं लग्न केलें. तिनें आपल्याजवळ जें कांहीं खिडूकमिडूक व रोख रक्कम होती, ती त्याच्या स्वाधीन केली. पुढें तिला तो मनुष्य दारूबाज व जुगारी आहे असें समजलें. तेव्हां अर्थातूच दोघांचें पटेनासें झालें. पण ती स्त्री चांगल्या

स्वभावाची असल्यामुळें मारहाण व केव्हांकेव्हां उपासमार सोसूनहि त्याच्याजवळ राहिली. पण तो निर्दय मनुष्य इतकें करूनहि न थांबतां ती दोन दिवसांची बाळंतीण असतांना तिला सोडून गेला. त्या वेळीं तिच्याजवळ खाण्याला कांहीं पदार्थ किंवा लेण्यास धड कपडेहि नव्हते. अशा दुर्दैवी व दीन स्थितींत मीं कधींच कोणाला पाहिलें नव्हतें. मला तिची दया आली व मीं आपल्या शक्तीप्रमाणें थोडेंसें द्रव्य देऊन तिचा परामर्ष घेतला. उद्यां जर तुह्मांपैकीं कोणी मजबरोबर याल, तर आपण तिला व तिच्या मुलाला एकाद्या हास्पिटलमध्यें नेऊन पोहोंचवूं. "

हें ऐकून तिघीचौघी स्त्रिया ह्मणाल्या " मी येईन ! मी येईन ! "

अशा प्रकारचे त्या स्त्रियांचे अनुभव ऐकून मीं मनांत ह्मटलें, कीं, अशा तऱ्हेच्या गोष्टी एवढ्या मोठ्या लंडन शहरांत प्रत्यहीं हजारों घडत असतील; मग या साडेतीन बायांच्यानें कितीशी मदत होणार आहे ? त्याच वेळीं मला आपल्या पुराणांतील एक गोष्ट आठवली. एके जागीं श्रीधरस्वामींनीं उपमा दिली आहे "आपल्याला अतिशय तृषा लागली आहे, व आपल्यापुढें एक स्वच्छ नदीचा जलप्रवाह वहात आहे; पण तें सर्व चांगलें पाणी आपल्या एकट्याच्यानें प्राशन करवत नाहीं, ह्मणून दुःख करण्यांत काय अर्थ आहे ? तर प्रत्येकानें आपल्यापुरतें तहान भागण्याइतकें जल प्राशन करून आपल्या मनाची शांति करावी. " तसेंच या सुधारणेचें आहे. प्रत्येकजणानें ह्मटलें, कीं, या एवढ्या मोठ्या गांवाची व या एवढ्या मोठ्या देशाची सुधारणा आपल्याच्यानें काय होणार आहे ? आह्मांला सुधारणा करण्याची फार इच्छा आहे, पण आमच्या एकट्याच्यानें काय होणार आहे ! असें सर्वांनींच ह्मटलें, तर कांहींच होणार नाहीं. ह्मणून अशा कामामध्यें ज्याच्याकडून जें होईल तें त्यानें करीत असावें, ह्मणजेच कांहीं तरी सुधारणा होईल. कोणच्याहि कामामध्यें लहानसहान गोष्टींपासूनच

मोठमोठीं कार्यें होत असतात. आपल्यामध्यें एक ह्मण आहे, कीं, ‘ थेंबें थेंबें तळें सांचे. ’

अशा तऱ्हेनें कालक्रमणा केल्यावर सहा साडेसहा वाजतां सर्व स्त्रिया आपापल्या घरीं गेल्या, व मलाहि माझ्या नव्या मैत्रिणीनें खालीं लायब्ररीमध्यें, माझी वाट पहात बसले होते तेथपर्यंत आणून पोहोंचविलें.

मिस् विलियम्स या दोघी बहिणींनीं, एके दिवशीं रात्रीं दहा वाजतां आह्मांला ‘ ॲटहोम पार्टी ’ला बोलावलें होतें. त्या ठिकाणीं पुष्कळ यूरोपिअन व हिंदुस्तानांतीलहि बरीच मंडळी होती. या दोघी बहिणी लॉर्ड क्लाइव्ह यांच्या पणतिणी आहेत, आणि ह्मणूनच त्यांचें हिंदुस्तानांतील लोकांशीं बरेंच दळणवळण आहे.

आणखी एक मोठी ॲटहोम पार्टी श्रीमंत महाराज सयाजीराव गाइकवाड यांच्याकडून पिक्याडेली हॉटेलांत रात्रीं झाली होती. ही पार्टी सर्व हिंदुस्तानी लोकांकरितांच होती. ह्मणून तेथें कारोनेशनकरितां जे राजेरजवाडे व आणखी कांहीं बडीबडी मंडळी आली होती, ते सर्व होते. एकंदरींत हिंदुस्तानी लोकांचा बराच मोठा जमाव जमला होता. त्यांत ग्वालेरचे महाराज, इंदूरचे महाराज, बिकानेरचे महाराज, कुचबिहारच्या महाराणी व त्यांच्या बहिणी वगैरे मंडळी आली होती. कांहीं बंगाली कुलस्त्रियांनीं पियानोवर हिंदुस्तानी गाणीं ह्मटलीं. नंतर सर्वांनीं उपाहार केला. श्रीमंत सयाजीराव महाराज सर्व पाहुण्यांशीं फार प्रेमानें आणि मोकळ्या मनानें बोलत होते. त्यांनीं सर्व पाहुण्यांचें आदरातिथ्य सारखेंच ठेवलें, हें त्यांच्या थोरपणाला भूषणावह आहे. मध्यरात्रीच्या सुमाराला सर्वांनीं महाराजे व महाराणी यांची रजा घेतली.

मिस्टर व मिसेस् लतीफ यांची आमची ओळख झाल्यामुळें त्यांनीं आह्मांला एके दिवशीं दुपारीं व्हाइट सिटी येथील क्लबमध्यें चहाकरितां बोलावलें होतें. त्या ठिकाणीं मद्रासचे जस्टीस नायर व त्यांच्या पत्नी, मिसेस सासुन व तिच्या दोघी मुली, हैद्राबादच्या मिसेस वाकफिल्ड

आणि मुंबईचे मिस्टर आगासकर वगैरे मंडळी होती. चहा घेतल्यावर आह्मी प्रदर्शनाचा कांहीं भाग पाहिला व मिस्टर आणि मिसेस भिसे यांच्याकडे जेवावयाला गेलों.

एके दिवशीं सकाळीं ब्रेकफास्ट झाल्यावर हे एकटेच बाहेर गेले होते, व मी आपल्या खोलींत वाचीत बसलें होतें. इतक्यांत लँड-लेडींची मुलगी दरवाजा ठोठावीत ह्मणाली " एक लेडी तुह्माला भेटण्याकरितां आली आहे. तिला मीं ड्राँईगरूममध्यें बसविलें आहे. आपण सांगत असल्यास तिला इकडे आणतें. " हें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें. कारण या वेळीं कोणी भेटीला येणें शक्य नव्हतें. मिसेस् भिसे कांहीं या वेळीं खास येणार नाहींत. येथें दुसऱ्या कांहीं बाया आहेत, त्यांच्या भेटीला ती कदाचित् आली असेल, व त्या मुलीच्या ऐकण्यांत चूक झाली असावी, असें वाटून मी त्या मुलील ह्मणालें " येथें दुसऱ्या स्त्रिया आहेत, त्यांच्या भेटीला ती आली असेल. या वेळीं माझ्या भेटीला येणारी स्त्री अशी कोणी नाहीं. "

यावर ती मुलगी ह्मणाली " असें कसें ह्मणतां ? ती तुमचेंच नांव सांगते. "

लगेच मी उठलें, व ड्राँईगरूममध्यें गेलें. तेथें पहातें तों आमच्या परममैत्रिणी मिसेस ब्लॅकसली. त्यांनां पहातांच मला मोठा आनंद झाला, व आश्चर्यहि वाटलें. कारण मिसेस् ब्लॅकसली या वेळीं इंग्लंडला येणार हें आह्मांला मुळींच माहीत नव्हतें. मिसेस् ब्लॅकसली यांचे पति मिस्टर ब्लॅकसली हे रायपुराला पोलिटिकल एजंट आहेत. आह्मी त्या वेळीं रायपुराला होतों, आणि ह्मणूनच त्यांचा आमचा स्नेहसंबंध जमला होता. मिसेस् ब्लॅकसली यांचे बंधू मिस्टर डिब्रेट हेहि कांहीं दिवस रायपुरास पोलिटिकल एजंट होते, आणि ह्मणून त्यांची आम-चीहि ओळख होती. त्याचवेळीं मिस्टर डिब्रेट यांचे आईबाप जनरल व मिसेस डिब्रेट हे रायपुरास आले होते. त्यांची आमचीहि ओळख

होती. आह्मी जेव्हां नोव्हेंबरमध्यें रायपुराहुन रजा घेऊन निघालों, त्या वेळीं मिसेस ब्लॅक्सलीनें आपल्या आईबापांचा पत्ता आह्मांला दिला होता, व आह्मांला सांगितलें होतें, कीं, तुह्मी लंडनला गेल्यावर त्यांना जरूर पत्र पाठवा, ह्मणजे ते तुह्मांला भेटीला बोलावतील. बहुतेक तेच तुमच्या भेटीला येतील. पण तीं उभयतां वृद्ध आहेत, तेव्हां तुह्मीच त्यांच्या भेटीला जरूर जा.

मला आश्चर्य वाटलेलें पाहून मिसेस ब्लॅक्सली ह्मणाल्या "मिसेस चिटणविस, तुह्माला आश्चर्य वाटणें साहजिक आहे! पण आपली येथें अकस्मात् भेट झाल्यामुळें मला किती तरी आनंद झाला! माझ्या नवऱ्याची प्रकृति बिघडली व डॉक्टरनें समुद्रकांठच्या हवेंत कांहीं दिवस रहा, असें सांगितल्यामुळें आह्मीं तीन महिन्यांची रजा घेऊन एकदम निघालों. माझा नवरा फ्रान्समध्यें आहे, व मी वडीलमातोश्रीला भेटण्याकरितां आठदहा दिवस इकडे आलें आहे. माझ्या आईनें तुमचें पत्र आल्याचें सांगितलें, व पांचसहा दिवसांपूर्वीं त्याचें उत्तरहि धाडलें, असें ह्मणाली. पण अद्याप त्याचें उत्तरच नाहीं. तेव्हां मला आश्चर्य वाटलें, कीं, उत्तर कसें नाहीं? तेव्हां मला संशय आला, कीं, पत्ता लिहिण्यांत कांहीं तरी चूक झाली असावी, व तुह्माला पत्र पोहोंचलेंच नसावें. नंतर तुमचें पत्र पाहून त्यावर घराचा बारा नंबर असल्याचें आईला सांगितलें. तेव्हां ती ह्मणाली, आपण तेरा नंबर लिहिला होता. शेवटीं मीं स्वतःच येण्याचें ठरवून येथपर्यंत आलें. पण मला आपण भेटतां कीं नाहीं, याचीच शंका वाटूं लागली. कारण, लंडनमध्यें कोणाच्याहि भेटीला जावयाचें ह्मणजे आधीं दोनतीन दिवस भेटण्याची वेळ मुक्रर करावी लागते."

अशी त्यांनीं आपली हकीगत सांगितली. त्यावर मी ह्मणालें "तुमच्या मातोश्रीकडून आह्मांला मुळींच उत्तर आलें नाहीं. तेव्हां त्या येथें नसाव्या, परगांवीं गेल्या असाव्या, असा आह्मीं तर्क केला."

" माझ्या आईबापांनीं तुह्मां दोघांनां फोकस्टन येथें उद्यां बोलावलें आहे. त्यांची अशी इच्छा आहे, कीं, निदान दोनतीन दिवस तरी तुह्मीं त्यांच्या येथें येऊन रहावें. त्यांनीं पत्रांतहि असेंच लिहिलें होतें. तुह्मी आल्याचें ऐकल्यापासून तुह्मांला भेटण्याची माझ्या आईबापांनां फार उत्कंठा लागली आहे. मीहि आतां येथें आहें, तेव्हां तुह्मी उद्यांच अवश्य या. कारण, मी फार दिवस राहूं शकणार नाहीं. मला लवकरच परत जावयाचें आहे." नंतर कांहीं वेळ इकडच्यातिकडच्या गोष्टी सांगून मिसेस ब्लॅक्सली परत गेल्या.

घरीं आल्यावर मीं त्यांनां मिसेस ब्लॅक्सली यांच्या भेटींतील सर्वहकीगत सांगितली, व दुसऱ्या दिवशीं फोक्स्टनला जाण्याचें ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं ब्रेकफास्टनंतर आह्मीं लहानलहान पेट्यांतून दोनतीन दिवसांपुरते कपडे घेऊन, व आपापली हॅन्डबॅग घेऊन चेरिंग क्रास स्टेशनवरून निघालों, व लंचच्या वेळेला फोक्स्टनला पोहोंचलों. जनरल व मिसेस डिब्रेट आणि मिसेस् ब्लॅक्सली यांनीं आमचें फार स्वागत केलें. लंच झाल्यावर आह्मी समुद्राच्या काठीं फिरावयास गेलों. तेथें लोकांनां बसावयाला चांगली जागा केली असून पुष्कळशा खुर्च्या वगैरे ठेवल्या आहेत. संध्याकाळीं तेथें बॅन्ड वाजत असतो. इकडेतिकडे फिरून आह्मी चहाच्या वेळीं घरीं परत आलों. चहानंतर जनरल डिब्रेट, मिसेस ब्लॅक्सली व आह्मी दोघें घराच्या पुढील हिरव्या लॉनवर क्रोकेचा खेळ खेळलों. रात्रीं जेवणानंतर ब्रिजचा खेळ झाला.

मिसेस डिब्रेट यांचें घर दोन मजली असून साधारण लहानच होतें. पुढें थोडासा बगीचा होता. घरांतील व्यवस्था फार टापटिपीची व स्वच्छ होती. ड्राइंगरूम व डायनिंग रूममध्यें सर्व चांदीचेंच सामान होतें. लहानशा आटोपसर घरांतील खोल्या नीटनेटक्या सामानानें सुशोभित केलेल्या फारच सुंदर व रमणीय दिसत होत्या. निजावयाच्या खोल्या उत्तम व उंची सामानानें शृंगारल्या होत्या.

अकरा साडेअकरा वाजतां आह्मी सर्वांनां 'गुड नाइट' करून आमच्या खोलींत आलों; तेव्हां मिसेस डिब्रेट व मिसेस ब्लॅक्सली या उभयतां आमच्याबरोबर खोलींत आल्या व आमच्या खोलींतील व्यवस्था सर्व ठीक आहे कीं नाहीं, त्याची स्वत: खात्री करून घेतली. नंतर ह्मणाल्या "ज्या वेळीं कोणत्याहि गोष्टीची जरूर पडेल, त्या वेळीं ही पलंगाजवळची दोरी ओढा ह्मणजे आमची मोलकरीण येईल व आपलें काय काम असेल तें करील. तीच सकाळीं तुमच्या स्नानाची वगैरे व्यवस्था करील. कोणत्याहि गोष्टीचा संकोच धरूं नका. आपल्या स्वत:च्या घरच्याप्रमाणें रहा." असें मोठ्या कळकळीनें सांगून आमची रजा घेतली.

मिसेस डिब्रेट यांच्याजवळ शिकण्याकरितां राहिलेली त्यांच्या दुसऱ्या मुलीची मुलगी—नात होती. मिसेस डिब्रेट यांचे घरीं आह्मी तीन दिवस होतों, पण इतक्या अवधींत ती मुलगी आह्मांला एकदोन वेळांच दिसली. बहुतकरून तिचा दिवसाचा वेळ शाळेंत जात असे. सकाळीं संध्याकाळींसुद्धां ती ड्राइंगरूममध्यें आजीनें किंवा मावशीनें बोलावल्याशिवाय येत नसे. अशी ती मुलगी शांत व आजीच्या आज्ञेंत वागणारी दिसली.

तिकडील रिवाजाप्रमाणें, मिसेस डिब्रेट यांच्या येथें दोन मोलकरणी होत्या. एक स्वयंपाकाच्या कामावर व दुसरी वरकामाला. त्या दोघी आपलीं कामें अगदीं मुकाट्यानें व नियमितपणें करीत. आह्मी आलों तेव्हां त्यांनीं आमच्या पेटींतून कपडेलत्ते, बूट वगैरे काढून ते जागच्याजागीं मांडून ठेवले व आमच्या हँडबॅगमधील ब्रश, फण्या, आरसे, दंतमंजन, साबण इत्यादि सर्व सामान एकएक काढून स्वच्छ पुसून नीट मांडून ठेवलें. त्यांच्या पोथ्यासुद्धां सोडून चांगल्या टेबलावर मांडून ठेवल्या. आह्मी लंच घेतल्यावर खोलींत येऊन पहातों तों आमच्या सर्व वस्तु प्रदर्शनांत मांडतात इतक्या टापटीपीनें ठेव-

लेल्या दिसल्या. माझें कुंकवामेणाचेंसुद्धां आरशाच्यापुढें उघडून ठेवलें होतें. आह्मी खोलीच्या बाहेर गेलों कीं, काढून ठेवलेल्या कपड्यांनां ब्रश वगैरे करून घड्या घालून ते जागच्याजागीं ठेवलेले असावयाचे. अशा प्रकारें सर्व सामान सुव्यवस्थित मांडलेलें असावें. एकंदरींत वरकाम करणारी मुलगी आपल्या कामांत दक्ष व काळजीनें काम करणारी दिसली.

जेवणाच्या वेळीं सर्व पदार्थ स्वयंपाकाकडील नोकरीण टेबलावर यजमानीणबाईच्या पुढें आणून ठेवीत असे. मग यजमानीणबाई आपल्या हातांनीं ते सर्वांच्या ताटांत घालावयाच्या. मासाचे तुकडे कापण्याचें काम यजमानाकडे असतें. ब्रेकफास्टला व लंचलाहि अशीच व्यवस्था असते. सर्व वाढण्याचीं व ताटें वगैरे उचलून ठेवण्याचीं कामें बहुत-करून यजमान व यजमानीण करतात. विशेष जरूर पडली तर भिंतीला असलेलें बटन दाबलें ह्मणजे स्वयंपाकघरांतील घंटी वाजते, व तेथील मोलकरीण येऊन हजर होते. अशीच चाल तिकडे सर्व घरांतून दिसली. कारण मिसेस फॉस्कट्रांगवेजकडेहि अशीच व्यवस्था होती. तिकडील रिवाजाला अशीच चाल बरी असते. कारण एक तर तिकडे साधारण स्थितींतील कुटुंबांत फारतर एकदोनच मोलकरणी बाया असतात. तेव्हां अर्थातच त्यांनां दुसरींहि कामें करावीं लागतात. ह्मणून अशा व्यवस्थेनें त्यांचाहि वेळ मोडत नाहीं, व घरांतील मंडळींनां ह्मणा, किंवा पाहुण्यांनांहि ह्मणा, यजमानीणबाईच्या हातचें चांगलें नीटनेटकें वाढलेलें मिळतें.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं मिसेस डिब्रेट व मिसेस ब्लॅकसली यांच्या-बरोबर त्यांच्या मित्राच्या घरीं चहा पार्टीला गेलों. तेथेंहि पुष्कळ मंडळी जमली होती. मिसेस डिब्रेट यांनीं बऱ्याच जणांशीं आमच्या ओळखी करून दिल्या. तेथें कांहीं लहान मुलेंहि होतीं, त्यांनां माझ्या कपाळचें कुंकू पाहून फार आश्चर्य वाटूं लागलें. तीं माझ्याजवळ येऊन विचारूं लागलीं कीं, हें तुमच्या कपाळीं काय आहे ? हें तुह्मी कशा-

करितां लावलें आहे ? " तुमच्या देशांतील सर्व बायका असेंच लावतात काय ? " अशा प्रकारें त्या आपापली जिज्ञासा व्यक्त करूं लागलीं.

चहा झाल्यावर कांहीं बायांनीं पिआनो वाजविला. नंतर थोडें समुद्रकांठीं फिरून आह्मी घरीं आलों.

अशा प्रकारें दोनतीन दिवस फोक्स्टनमध्यें जनरल व मिसेस डिब्रेट यांचा पाहुणचार घेऊन सकाळच्या गाडीनें आह्मी लंडनला परत आलों,

एके दिवशीं आह्मी साउथसीला मिस्टर व मिसेस निढ्याम यांच्या भेटीला गेलों. मिस्टर निढ्याम हे सेंट्रल प्राव्हिन्सेसमध्यें असिस्टंट कमिशनर, डेप्युटी कमिशनर व कमिशनर अशा हुद्यांवर होते, व आतां ते रिटायर होऊन येथें–साउथसीमध्यें घर घेऊन राहिले आहेत. ते फार न्यायी व दयाळू ऑफिसर होते. त्यांनीं आपल्या कारकिर्दींत कोणाचेंहि मन दुखविलें नाहीं. मिस्टर निढ्याम हे कमिशनर असतांना वर्धा जिल्ह्यामध्यें दुष्काळ व प्लेगच्या वेळीं यांनीं त्यांच्या हाताखालीं काम केलें; तेव्हां मिस्टर निढ्याम यांनीं फार चांगली मदत केली, व यांनां फार प्रेमानें वागविलें. आह्मीं त्यांच्या घरीं गेलों तेव्हां मिस्टर निढ्याम बरेच आजारी होते. तरीहि ते आह्मी आलें असें समजतांच आपल्या खोलींतून बाहेर येऊन आह्मांला भेटले. त्यांनां त्यांच्या मुलींनीं " तुह्मी बाहेर जाऊं नका, मिस्टर चिटणविसांनां तुमच्याच खोलींत आणून भेटवूं, आह्मीं त्यांचें आदरातिथ्य उत्तम करूं " अशा प्रकारें किती सांगितलें, पण त्यांनीं मुळींच ऐकलें नाहीं. मुलींनीं ही सर्व हकीकत आह्मांला सांगितली. तें ऐकून मिस्टर निढ्याम ह्मणाले " मिसेस चिटणवीस, या मुलींच्या बोलण्याकडे तुह्मी लक्ष्य देऊं नका. या एवढ्याशा मुली आतां आह्मांला शहाणपण शिकवायला पहातात ! यांनां वाटतें आह्मां ह्मातार्‍या मनुष्यांनां कांहींच समजत नाहीं. " अशा प्रकारें त्यानीं आपल्या मुलींचें बोलणें थट्टेवारीच घालविलें.

लंच झाल्यावर पुन: सर्वजणें ड्राइंगरूममध्यें जाऊन बसलों. मिसेस निव्हाम मला ह्मणाल्या "मिसेस चिटणवीस, तुह्माला आमच्या घरीं दोनतीन दिवस राहून घ्यावयाचें होतें; पण आमचें घर लहान असल्यामुळें व एकहि अधिक खोली नसल्यामुळें तसें करतां येत नाहीं. कारण, येथें साऱ्या चारच बेडरूम्स् आहेत. एक आमची आहे व तिहींमध्यें आमच्या चार मुली निजतात. यामुळें कोणालाहि घरीं ठेवून घेतां येत नाहीं. मोठें घर घ्यावें तर आह्मांला फार खर्च झेंपत नाहीं."

यावर आह्मीं त्यांनां सांगितलें "तुमची भेट झाली हेंच पुष्कळ झालें. शिवाय आह्मांला दोनतीन दिवस रहाण्याला वेळहि नाहीं. करितां तुह्मीहि वाईट वाटून घेऊं नका."

मिस्टर व मिसेस निव्हाम हीं हिंदुस्तानांत असतांना त्यांच्या येथें नेहमींच फार खर्च होत असे. कारण, उभयतां नवरा बायको फार प्रेमळ व उदार मनाचीं असल्यामुळें त्यांच्याकडे नेहमीं त्यांची यूरोपिअन पाहुणे मंडळी येतजात असे, व नेहमीं खाणें, गार्डनपार्ट्या, टी पार्ट्या, बॉल वगैरे चालत असत. यामुळें त्यांच्याजवळ फारसा पैसा उरला नाहीं; आणि ह्मणूनच त्यांनां आतां ( पेनशन घेतल्यावर ) काटकसरीनें वागणें भाग होतें. मिसेस निव्हामला चवघीपांचजणी मुली असून मुलगा एकच आहे. मुलगा कोठें परगांवीं नोकर आहे; पण त्यालाहि त्याच्या पोटापुरतेंच मिळतें. मुलींचीं अजून लग्नें झालेलीं नाहींत. तेव्हां सर्व मुलींचें शिक्षण, कपडेलत्ते, खाणेंपिणें वगैरे खर्च फार पडतो. पण निव्हाम दांपत्य न डगमगतां धैर्यानें आणि दक्षतेनें संसार नीट चालवीत असतें.

नंतर मिसेस निव्हाम व त्यांच्या मुलींनीं आह्मांला टेनिसचा खेळ पहावयाला नेलें. तेथें खूप मोठें उघडें पटांगण आहे. त्यांत चारपांच टेनिस कोर्टें आहेत. तेथें पुष्कळ बायका व पुरुष टेनिसचा खेळ खेळत होते. जिकडेतिकडे प्रेक्षक मंडळीची खूप गर्दी दिसत होती. आह्मी

तेथें कांहीं वेळ बसून परत आलों, व चहा घेऊन मिस्टर व मिसेस निंढ्याम यांची रजा घेतली. त्यांच्या घराजवळूनच ट्रॅम जात होती, ह्मणून आह्मी ट्रॅममधूनच स्टेशनवर आलों. मिसेस निंढ्याम आह्मांला स्टेशनपर्यंत पोहोंचविण्याला आल्या होत्या.

तारीख १४ जुलै रोजीं सकाळीं उपाहार केल्यावर आमच्या प्रांतांतील सिव्हिलिअन मिस्टर स्टँडन यांच्या निमंत्रणावरून लिन्डफील्ड येथें गेलों. या गांवीं मिस्टर स्टँडन यांचे आईबाप आणि त्यांच्या बहिणी रहातात. मिस्टर स्टँडन हे स्टेशनावर येऊन आह्मांला घरीं घेऊन गेले. लंच झाल्यावर तेथील एलिझाबेथ राणीच्या वेळचा जुना वाडा, व बाग दाखविला. वृद्ध मिस्टर स्टँडनला वनस्पतिशास्त्राचें फार चांगलें ज्ञान असल्यामुळें त्यांनीं आह्मांला झाडांसंबंधीं व फुलांसंबंधीं बरीच माहिती सांगितली. तो बाग फार सुंदर होता. त्यांतील झाडें फार कुशलतेनें कातरलीं होतीं. झाडांनां फळांचा व फुलांचा भर आला होता.

बाग पाहिल्यावर परत घरीं आलों. मग वृद्ध मिसेस स्टँडन यांनीं व त्यांच्या दोघी मुलींनीं ड्रॉइंगरूममधील चित्रें वगैरे दाखविलीं. मिसेस स्टँडन यांच्या मुली चित्रें काढण्यांत फार हुषार आणि कुशल आहेत. त्या कोणतीहि वस्तु एकदां पाहिली, कीं, त्याचें हुबेहुब चित्र काढतात.

तिसऱ्या प्रहरीं मिस्टर स्टँडन यांनीं कांहीं मित्रमंडळी चहाकरतां व बॉल्स खेळण्याकरितां बोलावली होती. त्यामध्यें मुंबईचे कौन्सिलर मिस्टर क्लाडहिल यांचे वडील होते. बॉलसचा खेळ बागेमध्यें दुर्वांच्या लॉनवर झाला. पुरुषमंडळी खेळत असतांना मिसेस स्टँडन, त्यांच्या मुली, मी व आणखी कांहीं पाहुण्या बाया अशा सर्वजणी आह्मी गुलाबाच्या मांडवाखालीं गोष्टी बोलत बसलों होतों. मिसेस स्टँडन मला हिंदुस्तानच्या चालीरीतीबद्दल ह्मणाल्या "तुह्मी हिंदु स्त्रिया आह्मां यूरोपिअन स्त्रियांप्रमाणें नेहमीं एका जागीं जमतां कीं नाहीं ? आमच्या-

सारख्यां गार्डन पार्ट्या, टी पार्ट्या करतां कीं नाहीं? सुखदु:खाच्या प्रसंगीं एकमेकींच्या उपयोगी पडतां कीं नाहीं?"

मीं त्यांनां सांगितलें "तुमच्याआमच्या चालीरीति भिन्न आहेत. आमच्यांतहि कांहींकांहीं प्रसंगीं बायका एके ठिकाणीं जमतात. चैत्राचें हळदकुंकू, संक्रांतीचें हळदकुंकू, लग्नकार्यप्रसंगीं प्रसंगोपात मेजवान्यांचे समारंभ इत्यादि होतात. सुखदु:खाच्या प्रसंगीं एकमेकांच्या कामीं पडणें हा मनुष्यधर्मच आहे. त्यांत कोणी जास्ती कनवाळू अंत:करणाचीं असतात व कांहीं बेपर्वा करणारीं असतात. अशा प्रकारचा मनुष्यस्वभाव सर्वत्र आहे."

अशा प्रकारच्या गोष्टी बोलण्यांत आमचा बराच वेळ गेला, व हळुहळू संध्याकाळ होऊं लागली. त्या वेळीं बागेची शोभा मोठी रमणीय दिसत होती. हे वसंतऋतूचे दिवस असल्यामुळें झाडें व वेली कोंवळ्या हिरव्या पानांनीं मंडित झाल्या होत्या; प्रफुल्ल कुसुमांचा आल्हादकारक सुगंध सर्वत्र दर्वळला होता; फळझाडें फळांच्या भारांनीं अगदीं वांकून गेलीं होतीं. अशा प्रकारची रम्य आणि चित्त आकर्षण करणारी शोभा पाहून मानवी प्राणी तर तल्लीन झाले होतेच, पण निसर्गसृष्टींत स्वेच्छेनें विहार करणारे पक्षीसुद्धां तल्लीनता पावले होते, व त्याचें परिवर्तन त्यांच्या मंजुळ गाण्यांत होत होतें. सविता सूर्य तेजरहित होत्साता फक्त लाल गोळ्याप्रमाणें दिसत होता. लवकरच त्यानें दिवसभर झालेले श्रम परिहार करण्याकरितां महासागरांत उडी घेतली. संधिप्रकाश पडला, त्या वेळीं सृष्टी देवी जास्तच नटल्याप्रमाणें भासूं लागली. इतक्यांत पुरुष मंडळीचा खेळ संपला, व आह्मीं सर्वांचा निरोप घेऊन लंडनला परत आलों.

तारीख १९ जुलै रोजीं सकाळीं आह्मी इंपीरिअल इन्स्टिटयूटला गेलों होतों. तेथें राजा व राणी यांनीं कारोनेशनच्या वेळीं घातलेला पोषाख ठेवला होता, तो पाहिला. तेथें प्रेक्षक लोकांची पुष्कळ गर्दी झाली होती.

ते पोषाख कांचेच्या कपाटांत नीट पसरून लोकांना पहाण्याकरितां ठेवले होते, व कपाटांत विजेचे दिवे लावले होते. त्यामुळें ते पोषाख फारच चकचकीत दिसत होते. पोषाख पहाण्याकरितां माणशीं एक शिलिंगाचें तिकीट ठेविलें होतें.

तारीख १६ जुलै रोजीं आह्मी सर चार्लस व लेडी लायल यांच्याकडे लंचला गेलों होतों. तेथे मिस्टर बकलंड हेहि होते. हे पूर्वी बंगाल व आसाम येथें कमिशनर होते. त्यांनीं तिकडील बऱ्याच गोष्टी सांगितल्या. लंच झाल्यावर ड्राइंगरूममध्यें लेडी लायलच्या मुलींनीं कांहीं वर्तमानपत्रें वाचून दाखविलीं. त्यांत हिंदुस्तानच्या व इंग्लंडच्या राजेमंडळीची नुकतीच एक डिनरपार्टी झाली होती त्याच्याविषयीं विस्तृत हकीगत होती. कोणत्या राणीला कोणीं नेलें, कोणत्या महाराजांनीं कोण बाई नेली, कोणत्या डयूकनें कोणाला नेलें, अमकी डचेस कोणाबरोबर गेली, इत्यादि. त्यांत भोपाळच्या बेगमेचेंहि नांव निघालें, कीं, तिला अमक्याअमक्यानें नेली, व तिनें तोंडावरचा बुरखा मुळींच काढला नाहीं. हे ऐकून सर्वांनां आश्चर्य वाटूं लागलें, कीं बुरखा काढला नाहीं, तर बेगमसाहेब जेवल्या तरी कशा? अशा प्रकारें त्या डिनरपार्टीविषयीं बराच मजकूर आला होता. अशा प्रकारें कांहीं वेळ गोष्टी वगैरे झाल्यावर आह्मी परत बिऱ्हाडीं आलों.

तारीख १७ जुलैला २१ क्रामवेलरोड येथें नॅशनल इंडिअन असोसिएशनतर्फे चहापार्टी झाली. तेथें लॉर्ड व लेडी ॲमठील हीं होस्ट व होस्टेस होतीं. इंडिअन व यूरोपियन यांचा मोठा जमाव होता. पिआनोवर कांहीं गाणीं वगैरे झाल्यावर एका गृहस्थाचें तास दीडतास लेक्चर झालें, व मग समारंभ आटोपला.

तारीख २० जुलै रोजीं हाइड पार्क येथें कारोनेशनसंबंधीं एक प्रोसेशन निघालें होतें, तें पहावयाला गेलों. तें कांहीं फार चांगलें झालें नाहीं, व त्याचा काय अर्थ होता, तेंहि बरोबर समजलें नाहीं.

तेथून पुढें मेढावेल येथें कीन व्हिक्टोरिया स्व्यॅच्यू तयार होत होता, तो पहावयाला गेलों. तो स्व्यॅच्यू नागपूर येथील महाराज बागेंत ठेवण्याकरितां तयार होत होता. हा पहाण्याविषयीं मिसेस फॉक्स ट्रॅंगवेज यांनीं आह्मांला आग्रहानें सांगितलें होतें. तेथील शिल्पकारांनीं तो चांगल्या रीतीनें आह्मांला दाखविला.

तारीख २१ जुलैला सर फ्रेडरीक आणि लेडी लेली यांनीं डोव्हर स्ट्रीटमधील आलबरमाल क्लबमध्यें आह्मांला चहाला बोलावलें होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

प्रकरण सातवें.

## ऐर्लंड.

तारीख २२ जुलै १९११ रोजीं सकाळीं नऊ वाजतां पॅडिंग्टन स्टेशनवरून आह्मी ऐर्लंड व स्कॉटलंडकडील प्रवासाला निघालों. आमच्याबरोबर नागपूरचे बॅरिस्टर रा. ब. वासुदेवराव पंडित हेहि होते. हे कारोनेशनकरितां मध्यप्रांताच्या तर्फे निमंत्रित पाहुणे ( Representative) ह्मणून आले होते. त्यांच्या व आमच्या घराण्याचा पूर्वापार संबंध आहे. त्यांचे वडील रावबहादूर रामकृष्णराव पंडित हे मध्यप्रांतामध्यें ए. अॅ. क. होते. पुढें थोड्या दिवसांकरितां डेप्युटी कमिशनर झाले, व सध्या पेन्शन घेऊन भोसले इस्टेटीची व्यवस्था पहातात. रा. ब. वासुदेवराव पंडित आमच्याबरोबर आल्यामुळें आह्मांला बोलायला वगैरे चांगलीच सोबत झाली. आतां आमच्या तिघांची एक लहानशी प्रवासपार्टीच झाली. आमच्या ट्रेनमध्यें डायनिंग कारची व्यवस्था होतीच. तेथें एक वाजतां आह्मीं लंच घेतला. ट्रेनमध्यें बरीच गर्दी होती, ह्मणून पाळीपाळीनें लंचच्या तीन पंक्ति झाल्या. भोंवतालची सीनरी तारीफ करण्यासारखी नव्हती; पण प्रथम बोगदे मात्र बरेच लागले. दोन वाजतां फिशगार्ड येथें ट्रेन पोहोंचली. तेथें बोट तयार होतीच. पोर्टरनीं आमचें सामान भराभर बोटीवर चढवलें, व आह्मी डेकवर जाऊन बसलों. लगेच बोट निघाली. हा समुद्र लागतो अशी फार आख्या होती. कारण, बोट फारच हलते. मला कांहीं बोट लागली नाहीं; पण त्यांनां बरीच लागली. दोनतीन ओकाऱ्याहि झाल्या. ते खालींच निजून राहिले. वासुदेवरावांनांहि विशेष त्रास झाला नाहीं. चार वाजतां रासलेर येथें बोट पोहोंचली. नंतर आमचा प्रवास ट्रेननें होता, त्याप्रमाणें आह्मी ट्रेनमध्यें जाऊन बसलों. रात्रीं आठ वाजतां एका जंक्शनवर उतरून दुसऱ्या ट्रेनमध्यें बसलों. तेथें किलारनीच्या



रा. ब. वासुदेवराव पंडित.

हॉटेलच तीनचार ठिकाणचे एजंट आले होते. त्यांपैकीं दोघेतिघे आमच्याच डब्यांत बसले. त्यांची एकमेकांवर चढाओढ चालली होती. जो तो आपापल्या हॉटलची तारीफ करीत होता, व "आमच्याकडे चला, आमच्याकडे चला!" अशी आमच्याभोंवतीं 'काव काव' लावली होती. त्यांनां पाहून आह्मांला आमच्या तीर्थाच्या ठिकाणच्या गयावळ, पंड्ये, बडवे इत्यादींची आठवण झाली. शेवटीं आह्मीं होमफॉरम् हाटेलमध्यें जाण्याचें ठरविलें. मी तर दिवसभराच्या या चढउतरीनें अगदीं थकून गेलें होतें. स्वस्थपणें अंग टाकावयाला केव्हां एकदां मिळतें, असें मला झालें होतें. या ऐरिश एजंट लोकांची सारखी टकळी सुरू होतीच. सुदैवानें त्यांनां एक ऐरिशबाई वादविवाद करायला मिळाली; मग त्यांच्या गोष्टींनां खूपच रंग भरला.

साडेदहा वाजतां किलारनीचें स्टेशन आलें व आह्मी खालीं उतरलों. हॉटेलचा एजंट ह्मणाला "तुह्मी बाहेर चला; मी तुमचें सामान काढून आणतों." त्याप्रमाणें आह्मी होमफारम् हॉटेलची आमनीबस उभी होती तेथें गेलों. एजंटनें आणलेल्या सामानांत आमच्या दोन पेट्या आणि वासुदेवरावांची एक पेटी, अशा तीन पेट्या नाहींत असें आढळलें. त्यांनीं एजंटला रागें भरून "तूं अशी गडबड करून आमच्या तीन पेट्या घालवल्यास, डब्यांत नीट पाहिलें नाहींस, आह्मीं एवढा प्रवास केला, पण आमचें सामान मुळींच चुकलें नाहीं," वगैरे त्याला ह्मणूं लागले. तो ह्मणाला "तुह्मी घाबरूं नका. तुमच्या पेट्या कुठेंहि जाणार नाहींत. उद्यां तुह्मांला मिळतील. त्यांच्यावर तुमचीं नावें आहेत; त्या केव्हांहि जाणार नाहींत."

पुढील स्टेशनवर तार करावी, ह्मणून हे तारऑफिसमध्यें गेले; पण रात्र झाल्यामुळें तारऑफिस बंद होतें, त्यामुळें यांनां फारच राग आला. पुनः बिचाऱ्या एजंटावर त्या रागाचें उट्टें निघूं लागलें. "तुह्मां ऐरिश लोकांची चांगली व्यवस्थाच नाहीं! तुह्मी अगदीं सुस्तच आहां!

आळशी आहां! इतक्यांत, अकरा झाले नाहींत तोंच तारऑफिसें बंद झालीं! तुह्मांला केव्हांहि होमरूल देऊं नये!"

हें शेवटचें भाषण ऐकून मला आणि वासुदेवरावांनां हंसूंच येऊं लागलें; पण ती हंसायची वेळ नव्हती, ह्मणून आह्मी तोंडें झांकून स्वस्थ बसलों. आमच्या पेट्या हरवल्यामुळें बिचाऱ्या ऐरिश लोकांनां होमरूल मिळूं नये, असें ठरलें! बिचारा एजंट मिस्टर डनहू गिऱ्हाईक मिळाल्याबद्दल आनंद होण्याऐवजीं हिरमुसला झाला. आतां उद्यां-शिवाय कांहीं करतां येत नाहीं, असें ठरतांच आह्मी आमनीबसमध्यें बसलों व होमफारम् हॉटेलमध्यें गेलों. हें हॉटेल स्टेशनपासून तीन मैलांवर आहे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिस्टर डनहू स्टेशनवर जाऊन आले; पण आमच्या पेट्यांचा कांहींच पत्ता लागला नाहीं. त्या दिवशीं रविवार असल्यामुळें तारहि करतां आली नाहीं. आतां सोमवारीं काय होईल तें खरें, असा विचार करून उगीच बसावें लागलें. मग ब्रेकफास्ट घेऊन, गॅप ऑफ डनली व लेक्स पहावयाला गेलों. हॉटेलचीच घोड्याची गाडी भाड्यानें ठरविली होती. गाडीवाला मोठा गमती व नकली होता. सर्व रस्ताभर तो आह्मांला गोष्टी सांगत होता. रस्त्याच्या बाजूला लागणारीं शेतें, मळे, बागा, वाडे इत्यादिकांच्या ऐतिहासिक व जुन्या कथा तो सांगत होता. त्यानें एक बाजूचें मोठें पडीक शेत व जुना वाडा आह्मांला दाखविला आणि सांगितलें "याचा मालक फार वाईट होता. तो आपल्या कुळांनां फार त्रास देत असे. तो मेल्यावर स्वर्गाला गेला, तेव्हां दरवाजावरील एंजलनें त्याला आंत घेतलें नाहीं, आणि 'तूं फार वाईट मनुष्य आहेस, तूं येथेंहि माणसें टिकूं देणार नाहींस!' असें ह्मणून त्याला खालीं ढकलून दिलें! तेव्हांपासून तो या वाड्यांत भूत होऊन राहिला आहे; ह्मणून या वाड्यांत कोणीहि रहात नाहीं व हें शेत नांगरीत नाहींत." अशाच प्रकारच्या कांहीं गोष्टी त्यानें आह्मांला सांगितल्या.



लेकिकिलारनी येथील आमचें अश्वारोहण.

नंतर लवन नदीचा बोफर्ड ब्रिज पाहिला, व डनली कॅसलच्या बाजूनें केट ऑफ किलारनीच्या कॉटेजला पोहोंचलों. तेथून गॅप सुरू होते. ही गॅप चार मैलांची आहे, व पायीं किंवा घोड्यावर बसून जावें लागतें. मला माझी चिंता वाटूं लागली. मला कसें जातां येईल? चार मैल पायीं चालणें माझ्यानें होणार नाहीं, व घोड्यावर बसावयाची सवय नाहीं. पण तेथील लोक ह्मणूं लागले "मॅडम, तुह्मी मुळींच भिऊं नका. येथील घोडे अगदीं गरीब आहेत. तुमच्याबरोबर घोडेवाला राहील व तो घोड्याला संभाळील."

आह्मी घोडे ठरविण्याकरितां गेलों. तेथें १५।२० घोडे तयार होते. जो तो आपापला घोडा पुढें आणून त्याची तारीफ करीत होता. वासुदेवराव पंडित व यांनीं मिळून स्वतःकरितां दोन घोडे पसंत केले, व माझ्याकरितां एक गरीब आणि ह्मातारी घोडी ठरवली. त्या घोडीवर बसण्याशिवाय मला दुसरा उपायच नव्हता! ह्मणून तेथील एका उंच दगडावर चढून मी त्या घोडीवर स्वार झालें, आणि त्या मनुष्याला "तूं अगदीं घोडीबरोबर चाल," असें बजावलें. त्या मनुष्यानें एक बारीकशी वेताची छडी घेऊन त्या घोडीच्या पायावर चमक्या मारीत तिला चालविलें. पुढील घोडे धांवूं लागले, कीं, माझ्या घोडीलाहि पळावेंसें वाटे, व तीहि त्यांच्या मागें पळायला लागे. मला भीति वाटे व मी त्या मनुष्याला हांका मारून सांगें, कीं "पहा, घोडीला पळूं देऊं नकोस, नाहीं तर मीं खालीं पडेन!" यावर तो मनुष्य लांब गळा काढून घोडीला ह्मणत असे " Mary, be sober." आमच्या घोडीचें नांव मेरी होतें. अशा प्रकारें आह्मां तिघांची मिरवणूक चालली होती. वासुदेवराव पंडित तरुण, तसाच त्यांचा घोडाहि तरुण बांड होता. तो पुढें धांवे व त्याच्यामागें आमच्या दोघांचे घोडे चालत असत. अर्ध्या वाटेवर एक फोटोग्राफर भेटला. तो आह्मांला घोड्यावर बसलेले फोटो काढण्याचा आग्रह करूं लागला. तेव्हां वासुदेवराव पंडित ह्मणाले "खरेंच

काकू, आपला या वेळचा फोटो घेतलाच पाहिजे! कारण आपण घोड्यावर बसून अशीं या रस्त्यानें गेलों,त्याची आठवण आपल्याजवळ राहील. ”

त्या फोटोग्राफरनें आह्मां तिघांचा घोड्यावर बसलेला फोटो घेतला.

या रस्त्यावर बऱ्याच ऐरिश गरीब बाया, प्रवासी लोकांनां लेमोनेड अथवा सोडावाटर पिण्याला आणून देतात, व अशा प्रकारें लोकांजवळून पैसे काढतात.

आह्मीं एकदोन ठिकाणीं सोडा, लेमोनेड वगैरे ड्रिंक घेतलें, व त्या बायांनां पैसे दिले. पण थोडें पुढें गेलों नाहीं, तोंच, आणखी कांहीं बाया पेय घेऊन धांवत आल्या, व आह्मांला तें देऊं लागल्या. आह्मांला तहान नसल्यामुळें आह्मीं घेतलें नाहीं. मग काय, त्या आमच्यावर रागावल्या व शिव्या देऊं लागल्या. “ कोणत्या देशचे मेले भिकारी आले आहेत ! यांनां बायाबापड्यांनां मदत करायचेंहि जिवावर येतें ! चल, चल, हे काय आपल्याला देणार ! हे कदाचित् आपल्याहून गरीब असतील !” अशा प्रकारची त्यांची बडबड चालली होती. त्यांचें हें बोलणें ऐकून मला हंसूं येऊं लागलें, व त्यांच्या स्थितीबद्दल वाईटहि वाटलें. नंतर मग मला वाटलें, कीं, मला जरी तहान नव्हती, तरी त्यांनीं आणलेला सोडा घेऊन उष्टावून फेंकून दिला असता, व त्याबद्दल त्यांनां थोडे पैसे दिले असते, तर बरें झालें असतें. गरीब बिचाऱ्यांची उगीच निराशा झाली.

या गॅपमधील देखावा विशेष सुंदर दिसला नाहीं. ही गॅप बरीच अरुंद असून, रस्ता खडकाळ व उंचसखल आहे. माझी मेरी घोडी बिचारी किती वेळां ठेंचाळत होती. त्या वेळीं मी खालीं पडतें कीं काय, अशी मला भीति वाटावी. घोडेवाला मात्र मला धीर देत असे. तो ह्मणे “मॅडम, तुह्मी भिऊं नका ! ही मेरी तुह्माला पाडणार नाहीं. तुह्माला खालीं पडूं असा उगीच भास होतो. ही घोडी नेहमीं सोबर असते. हिनें आजपर्यंत कोणाला केव्हांहि पाडलें नाहीं !”

गॅपच्या उजव्या बाजूला ३४१४ फूट उंचीचा म्याकगिली कुडी हा पर्वत आहे, व डावीकडे २७३९ फूट उंचीचा परपल माउंटन आहे. उत्तरेच्या टोंकाला पोहोंचलें ह्मणजे ब्लॅक व्हॅलीचा देखावा चांगला दिसतो. पुढें अपर लेकवर लॉर्ड बार्डनची कॉटेज आहे. त्या ठिकाणीं आह्मीं घोड्यांनां रजा दिली, व लेकमध्यें तयार असलेल्या बोटींत बसलों. बोटींत लंचची व्यवस्था होती. या लेकमध्यें लहान मोठीं पुष्कळ बेटें आहेत. बोटींतून हीं बेटें फार सुंदर व मनोरम दिसतात. नंतर लॉंगरेजमध्यें बोट शिरते. हा नागाकृति प्रवाह आहे. दोन्ही बाजूंचा देखावा उत्तम दिसतो. या प्रवाहाच्या शेवटीं ब्रिजखालून बोट जाते, व थोडा वेळ डिनीस आयलंडजवळ, मीटिंग ऑफ दी वाटर्स येथें थांबते. नंतर मिडल लेकमध्यें बोट नेतात, व कॉलीन बॉन रॉक्सच्या जवळून, ब्रिकीन ब्रिजच्या खालून लोअर लेकमध्यें आणतात, व स्वीडनीश फॉलन ऐलंड येथें थांबवितात. येथें उतरून ओल्ड आबेस इनस, आबर्टस ग्रेव्ह, आणि बेड ऑफ ऑनर या जागा पाहिल्या. मग पुनः बोटींत बसून रॉस कॅसल येथें उतरलों. येथें बोटीचा प्रवास संपला. हॉटेलकडे जाण्याला गाड्या तयार होत्या. त्यांतून आह्मी अगदीं संध्याकाळच्या वेळीं हॉटेलांत पोहोंचलों.

होमफारम् हें हॉटेल लहानच असून त्याच्याभोंवतीं शेतें व मळे आहेत. जवळपास दुसरीं हॉटेलें किंवा घरें नाहींत. किलारनीची बहुतेक अशीच रचना दिसली, कीं, हॉटेलें व घरें अगदीं दूरदूर बांधलेलीं. निदान मैल अर्ध्या मैलाचें अंतर सहज असे. ज्याचें त्याचें घर त्याच्या शेतांत अथवा मळ्यांत असतें. अशीं चहूंकडे खेड्यापाड्यांतून, व लहान गांवांतून घरें बांधण्याची चाल आहे. आमच्या हॉटेलचा मालकहि एक शेतकरीच असून, सभोंवतीं असलेलें शेत त्याच्याच मालकीचें होतें. त्या योगें त्याला हॉटेल चालवून शेतावरहि देखरेख करतां येई, आणि ह्मणूनच या हॉटेलचें नांव होमफार्म असें आहे.

या वेळीं आह्मां तिघांशिवाय इतर सातआठ मंडळी होती. त्यांमध्यें एक ऐरिश जोडपें होतें. तें बोलूनचालून फार चांगलें होतें. रात्रीं जेवणा- नंतर तीं पिआनो वाजवून गाणीं वगैरे ह्मणत असत.

सोमवारीं सकाळीं तार केली, व आमच्या चुकलेल्या पेट्या आह्मांला मिळाल्या. मिस्टर डनहूला फारच आनंद वाटला. अद्यापपावेतों त्याचें तोंड अगदीं उतरून गेलेलें होतें. किनारनीला आह्मी आणखी दोन दिवस राहिलों. तितक्या वेळांत आणखी कांहीं पहाण्याजोग्या जागाहि पाहिल्या. मक्रार ॲबे, कॉलीन बॉम राक्स, ब्रिकेन ब्रिज, डेनीस आयलंड व तेथील कॉटेज टोरे धबधबा. या टोरे धबधब्यापासून लेक्सचा देखावा फार चांगला दिसतो. लॉर्ड केनमेरचा डिअर पार्कहि पाहिला. नंतर आघाडे येथील जुनें चर्च पाहिलें. तेथून लोअर लेक, कारटवाल आणि म्याकगीला कुडी रिक्स—ऐर्लंडांतील सर्वांत उंच पर्वत—याचा देखावा येथून फारच उत्तम दिसतो. तो येथून लोअर लेकच्या पश्चिम किनाऱ्यानें कित्येक मैल पसरला आहे. लॉर्ड केनमेरच्या होमपार्क- मधून हॉटेलांत परत आलों. रस्त्यानें बटाट्याचीं शेतें पुष्कळ दिसलीं. ऐर्लंडचे बटाटे फार नामांकित आहेत. कित्येक शेतकऱ्यांच्या झोंपड्या पाहिल्या. त्या सर्वांच्या येथें किटलींत मीठ घालून बटाटे उकडत ठेवले होते. 'उकडलेले बटाटे खा!' असा त्यांपैकीं कांहींनीं आह्मांला आग्रह केला. त्यांचें संध्याकाळचें जेवण ह्मणजे उकडलेले किंवा भाजलेले बटाटे, थोडेंसें दूध व लहानसा मांसाचा तुकडा. त्यांच्या छोटेखानी झोंपड्यांतील सामान नीटनेटकें ठेवलेलें असून त्या स्वच्छ होत्या.

## डब्लीन.

तारीख २६ जुलै रोजीं साडेअकरा वाजतां ट्रेननें निघालों, व संध्या- काळीं साडेचार वाजतां आह्मी डब्लीन येथें पोहोंचलों. ट्रेन भिकारडीच होती. तिला डायनिंगकार वगैरे नव्हती. एका मोठ्या स्टेशनवर चहा, दूध, साखर, फळें वगैरेसहित पेटारे विकत मिळाले. ते घेऊन आह्मी

फराळ केला. हॉटेलमध्यें आल्यावर जेवण उरकून गेइटी थिएटरमध्यें ' मॅरेज ऑफ किटी ' हें नाटक पाहिलें. त्यांतच आणखी दुसरे कित्येक खेळ झाले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, ब्रेकफास्ट झाल्यावर कुककंपनीच्या मार्फत तेथील प्रेक्षणीय स्थळें पहाण्याला गेलों. प्रथम ट्रिनिटी कॉलेज पाहिलें. या संस्थेचा मोड करण्याला आठवा हेनरी राजा यानें आणि दुसऱ्या आणखीहि राजांनीं बरीच धडपड केली होती. येथें बऱ्याच ऐरिश लोकांच्या स्मरणीय वस्तु आहेत. येथील लायब्ररी विशेष महत्त्वाची आहे. पण कॉलेजच्या इमारती आक्सफर्ड इतक्या पुरातन व सुंदर नाहींत. त्याच्या समोरच बँक ऑफ ऐर्लंडची भव्य इमारत आहे. हेंच पूर्वीं पार्लमेंट हाउस होतें. येथून डेक स्ट्रीटमधून सिटीहाल व म्यूनिसिपल बिल्डींगकडून डब्लीन कॅसलकडे नेतात. येथील स्टेट अपार्टमेन्टस, सेंट पॅट्रिक हॉल, रॉयल चॅपल या जागा फार प्रेक्षणीय आहेत. किंग जॉनचा राजवाडा आणि सर फीलीप सीडने यांच्या घराचा सर्व भाग अजून कायम आहे. येथून निघाल्यावर सेंट पॅट्रिक कॅथिड्रलची स्मरणीय इमारत दृष्टीला पडते. ही इमारत ह्मणण्यासारखी दिसण्यांत सुंदर नाहीं. तरी येथें अनेक नामांकित व्यक्तींचीं थडगीं आहेत. येथून टॉमस स्ट्रीटमधून गिनेस कंपनीच्या विशाल ब्रुएरीजवळून किलमॅनहॅम हास्पिटलमध्यें गेलों. हें फक्त सोल्जरलोकांकरतांच आहे. येथें जुन्या शस्त्रास्त्रांचा मोठा संग्रह आहे. नंतर सेंट स्टीफन्स ग्रीन या मध्यशहरांतील सुंदर पार्क पाहिला. नंतर मॅनशन हौस व रॉयल ऐरिश ॲकडमी पाहून नेशन म्यूझिअम पाहिला. त्यासमोरच न्याशनल लायब्ररी आहे.

## बेलफास्ट.

तारीख २८ जुलैला डब्लीनहून सकाळीं १०॥ वाजतां निघालों. ही ट्रेनसुद्धां रेंगाळत चालणारी होती. आकाश ढगानें व्यापिलें असून थोडथोडा पाऊसहि पडत होता. त्यामुळें हवा सर्द झाली. होती. रस्त्याचा

हिरवागार देखावा पाहून मन प्रफुल्ल झालें. आह्मी तीन वाजतां बेलफास्टला पोहोंचलों, व ग्रँड सेंट्रल हॉटेलमध्यें उतरलों. चहा वगैरे उरकून कपडे बदलले, व सर वुइल्यम व लेडी क्रॉफर्ड यांच्या भेटीला गेलों. त्यांचें घर हॉटेलपासून ३।४ मैल लांब होतें. सर वुइल्यम व लेडी क्रॉफर्ड यांनीं आमचें फार उत्तम स्वागत केलें. मग भोंवतालचा सुंदर बगीचा व घरहि दाखविलें. घर नवेंच बांधलें असून सर्व खोल्या मूल्यवान व सुंदर सामानानें सुशोभित केल्या होत्या. सर वुइल्यम क्रॉफर्ड हे तेथल्या एका मोठ्या गिरणीचे मालक आहेत. त्यांचा धाकटा मुलगा त्यांच्याच हाताखालीं काम करीत असतो. थोरला मुलगा बेंगालमध्यें डेप्युटी कमिशनर आहे. त्याची व आमची चांगली ओळख आहे. आह्मीं जेव्हां संबलपूर सोडलें, तेव्हां मिस्टर क्रॉफर्ड यांनांच डेप्युटी कमिशनरचा चार्ज दिला होता. नंतर लेडी क्रॉफर्डनें टेलिफोन करून आपल्या दोन मैलांवर वेगळ्या घरांत रहाणाऱ्या धाकट्या मुलाला व सुनेला कळविलें, कीं 'मिसेस चिटणवीस आल्या आहेत, तेव्हां सर्व मुलेंबाळें घेऊन लवकर या.' तेव्हां ती सर्व मंडळी मोटारमधून लवकर आली. आपल्या इकडीलप्रमाणें एके ठिकाणीं रहाण्याची त्यांच्यांत चाल नाहीं. ह्मणून लेडी क्रॉफर्ड यांचें एवढें मोठें घर असूनहि लेक व सून वेगळीं रहातात. नेहमीं जाणेंयेणें आणि दोनचार दिवस रहाणें वगैरे सर्व चालतें; पण एकदां लग्न झालें, कीं, ज्याचें त्याचें घर वेगळें असतें.

हीं सर्व मुलेंबाळें आल्यावर लेडी क्रॉफर्डची ड्राइंगरूम अगदीं गजबजून गेली. यांच्यांत कांहीं मुलें लेडी क्रॉफर्डच्या मुलींचीं होतीं. त्यांपैकीं एक थोरल्या मि. क्रॉफर्डचा मुलगा होता. तो शिकण्याकरितां ठेवला होता. लेडी क्रॉफर्डनें विचारलें "या विलीबाबांनां तुह्मीं ओळखलें कीं नाहीं? याला तुह्मीं संबलपुराला पाहिलेंच आहे. त्या वेळीं हा तीन वर्षांचा होता. पण आतां सातआठ वर्षांचा झाला आहे. फार बंडखोर

आहे." अशा प्रकारें गोष्टी बोलत त्यांनीं आमची, व लेंक, सून व नातवंडें इत्यादिकांची ओळख करून दिली.

नंतर त्यांच्याबरोबर थोडा फराळ करून आह्मीं त्यांची रजा घेतली. तेव्हां मिस्टर क्रॉफर्ड ह्मणाले "माझ्या मोटारमधूनच चला. तुह्मांला थोडेंसें फिरवून मग तुमच्या हॉटेलांत पोहोंचवितों." त्याप्रमाणें त्यांच्या मोटारमध्यें बसून आह्मीं २५।३० मैलांचा सुंदर प्रदेश पाहिला, व रात्रीं नवांच्या सुमाराला हॉटेलांत येऊन पोहोंचलों.

बेलफास्ट हें ऐर्लंडचें व्यापाराचें मुख्य शहर आहे. तेथें हारलंड व उल्फ कंपनीचा जहाजें तयार करण्याचा टोलेजंग कारखाना आहे, व लिनन तयार करण्याच्या अनेक गिरण्या आहेत.

दुसऱ्या दिवशीं आह्मीं तेथील प्रसिद्ध टेक्निकल इन्स्टिटयूट आणि कांहीं गिरण्या पाहिल्या. या गिरण्यांतील मजूर लोकांच्या बायका व मुलें मला पाहून माझ्याभोंवतीं जमा झालीं. त्यांनां वाटलें, कीं, मी कोणी तरी हिंदुस्तानांतील राणी आहें, तेव्हां त्यांनां कांहीं तरी देईन. ह्मणून 'हायनेस,' 'हायनेस,' करून तीं माझ्या पुढें हात पसरूं लागलीं. एकदोघां मुलांनां व कांहीं बायांनां मीं थोडेबहुत पैसे दिले. हें पाहून झुंडीच्या झुंडी धांवू लागल्या. तेव्हां मी इतक्या सर्वांनां कुठून देणार? पण इतक्यांत एक पोलिस तिकडून आला, तेव्हां सर्वजणें जिकडेतिकडे पळालीं. मला फार वाईट वाटूं लागलें. वासुदेवराव व हे जरा पुढें चालले होते, व मी हळुहळू मागून येत होतें. इतक्यांत त्या लोकांनीं मला अगदीं घेरून टाकलें. हीं बायामुलें अगदीं फाटकेतुटके कपडे घालून अनवाणीं भटकत असत. हीं आपल्या इकडील गरीबांप्रमाणेंच होतीं. अशा प्रकारचे लोक ऐर्लंडांत पुष्कळ दिसले.

दुपारीं, जायंटस्‌रिंग (राक्षसाची आंगठी) पहाण्याला गेलों. आह्मांला वाटलें, कीं, हें कांहीं तरी पहाण्यालायक असेल. परंतु तेथें गेल्यावर आमची अगदीं निराशा झाली. तेथें एक लहानशा तळ्या-

एवढा वाटोळा खळगा होता. हा खळगा एका शेताच्या बाजूला आहे. तेथें दगड, धोंडे, केरकचरा वगैरे पडला असून त्या ठिकाणीं एका लहानशा पायरस्त्यानें जावें लागतें. ती जायंटरिंग पाहून हंसूं येतें. कारण, हा खळगा दाखविण्याकरितां या लोकांनीं आह्मांला इतकें दूर आणलें. असो. एवढ्या निमित्तानें कां होईना, थोडेंसें फिरणें होऊन व्यायाम झाला, व ऐर्लंडचीं शेतेंभातें पहाण्यांत आलीं.

आमचा गाडीवाला ह्मणूं लागला "जाएंटरिंगमध्यें पहाण्यासारखें जरी कांहीं नाहीं, तरी ती फार जुनी आहे, व ह्मणूनच पुष्कळ लोक पहावयाला येतात."

तेथून कांहीं अंतरावर सेव्हन सिस्टरस् आहेत, त्या पहाण्याला गेलों. या सात बहिणी ह्मणजे पांचसहा फूट उंचीचे कोनाकृति सात दगड आहेत, व जायंटरिंगप्रमाणें हेहि एका शेताजवळ ओसाड जागीं पडले आहेत. तेथें जवळच एका शेतांत रहाणारी बाई आली व तिनें या सात बहिणींची एक बरीच लांबलचक गोष्ट सांगितली. शेवटीं ती ह्मणाली "या सेव्हनसिस्टरस् ड्रूइड लोकांच्या वेळेपासून आहेत. ते लोक यांची पूजा करीत होते."

रात्रीं भोजनोत्तर आह्मी तेथील हेल्थ एक्झिबिशन् पहावयाला गेलों. तेथें आरोग्यासंबंधीं पुष्कळ वस्तु ठेवल्या होत्या. नंतर तेथें जवळच असलेला हिपोड्रम पाहिला.

तारीख ३० जुलै रोजीं सकाळीं उपाहारानंतर ट्रेननें निघालों व पोर्ट्रश येथें आलों. तेथून पुढें लहान ट्रेन जाते, तींत बसलों. ही ट्रेन समुद्रकिनाऱ्यानें व डोंगराच्या पायथ्याजवळून जायंटस् कॉजवेपर्यंत नेली आहे. भोंवतालची सीनरी फारच उत्तम होती. सुमारें दोन वाजतां जायंटस कॉजवे येथें पोहोंचलों. तेथें जवळच एक लहानसें हॉटेल होतें. तेथें लंच घेऊन थोडा वेळ इकडेतिकडे फिरून भोंवतालचा देखावा पाहिला. तेथें जवळच एकदोन दुकानें होतीं त्यांत दगडाच्या केलेल्या कांहीं

वस्तु ठेवल्या होत्या, व कांहीं देखाव्यांचे आल्बमहि होते; त्यांपैकीं कांहीं आह्मीं विकत घेतले. मग चहा घेऊन समुद्रांतील दोन गुहा पहाण्याला गेलों. या गुहा पहाण्याला लहान होड्यांत बसून जावें लागतें. त्या वेळीं वारा बराच सुटला होता, व ती निरुंद व लांबट होडी पाहून तींत बसण्याची मला फार भीति वाटूं लागली. ह्मणून मी वासुदेवरावांनां ह्मटलें "अशा वाऱ्यांत या लहान होडींत बसणें, ह्मणजे समजूनउमजून जीव धोक्यांत घालण्यासारखें आहे. कोणाला काय वाटत असेल तें असो, पण मला मात्र माझें आयुष्य फार मौल्यवान वाटतें."

हें ऐकून वासुदेवराव त्यांनां हंसतहंसत ह्मणाले "ऐकलें का काकू काय ह्मणतात तें? त्या ह्मणतात 'या अरूंद होडींत अशा वाऱ्यांत बसणें ह्मणजे आपला जीव धोक्यांत घालणें आहे! आपलें आयुष्य फार मौल्यवान आहे. कारण आपल्याला पुस्तक लिहावयाचें आहे."

हें पुस्तकाचें वासुदेवरावांनींच अधिक जोडलें. मीं पुस्तकाबद्दल अवाक्षरहि उच्चारिलें नव्हतें. त्यांनीं आणि वासुदेवरावांनीं पुस्तकाबद्दल माझी नेहमीं थट्टा करावी. एकादा दगड दिसला कीं ह्मणावें "पहा बरें, हा दगड नीट लक्ष्यांत ठेवा, याचें वर्णन तुमच्या पुस्तकांत अगदीं हुबेहूब आलें पाहिजे! हें झाड पहा, याला किती पानें आहेत, खांद्या किती आहेत, तें सर्व पाहून घ्या. कारण त्याचें हुबेहूब वर्णन आलें पाहिजे! ती ह्मातारीबाई तिथें उभी आहे, तिचा पोषाक कसा आहे तो नीट लक्ष्यपूर्वक पहा. त्याचें वर्णन तंतोतंत जुळलें पाहिजे!" असेंच कांहींतरी बोलून पुस्तकाबद्दल माझी थट्टा करीत. असो.

तो ऐरिश नावाडी मला ह्मणाला "या होडींत बसण्याची कांहीं एक भीति नाहीं, व वाराहि भिण्याजोगा नाहीं. तसें भिण्यासारखें असतें व तुह्मीं आह्मांला १०० पौंड देऊन न्या ह्मणालां असतां तरी आह्मीं कधींहि नेलें नसतें! येथील हवेची वगैरे आह्मांला तुमच्यापेक्षां पुष्कळ माहिती आहे."

मग आह्मी तिघें होडींत बसलों, व गुहा पहाण्याला गेलों. मोठी दरी जी आहे, तिलाच 'रनकेरी केव्ह' ह्मणतात ही हजार फूट लांब आणि ९६ फूट उंच आहे. दुसरी गुहा ६०८ फूट लांब आणि ९० फूट उंच आहे. तिला 'पोर्टकुन केव्ह' असें ह्मणतात. या दऱ्या किनाऱ्यापासून थोड्या दूर समुद्रांतच आहेत. येथील दगड लोखंड मिश्रित असून पाण्यांत सल्फेट ऑफ कॉपर व आक्साईड ऑफ आयर्न आहे. त्यामुळें पाण्यांत अनेक रंग दिसतात. या दऱ्यांच्या दोन्हीं बाजूंनीं व छतावर, दगडामध्यें स्वाभाविक तऱ्हेनें अनेक प्रकारच्या आकृती झाल्या आहेत. त्यामुळें भोंवतालच्या भिंतीवर व छतावर एकाद्या कुशल शिल्पकारानें खोदींव काम केलें आहे, असें दिसतें. त्यांत ते दगड निरनिराळ्या रंगांचे असल्यामुळें तर जास्तच रमणीय भासतात.

जायंटस् कॉजवे हे पुलासारखे आहेत. त्यांची रचना ज्वालामुखीच्या कृतीनें झाली आहे, असें ह्मणतात. स्टुकनस हा भाग धान्याच्या पोत्यासारखा दिसतो. या कॉजवेचे तीन भाग आहेत. त्यांनां लिटल्,मिडल् व ग्रँड ह्मणतात.याचे स्वाभाविक खांब पंचकोनी,षट्कोनी व सप्तकोनी असे चमत्कारिक दिसतात. लिटल् कॉजवेमध्यें स्वच्छ व गोड पाण्याचा झरा आहे, त्याला जायंटस् वेल ह्मणतात. मिडल् कॉजवेमध्यें खुर्चीच्या आकृतीचा एक दगड आहे, त्याला विशिंग चेअर ह्मणतात. ग्रँड कॉजवेमध्यें लॉर्ड आनंट्रीगची पारलर, किस्टोन व लेडीज फॅन हीं पहाण्यासारखीं आहेत. कॉजवेचा कांहीं भाग चिमनी–पॉटसारखा दिसतो.

हें सर्व पाहून आह्मी संध्याकाळीं बेलफास्टला परत आलों. तेथील हॉटेलांत एक तरुण ऐरिश मुलगी मेडसर्व्हंट होती. ती रोज मला ह्मणत असे, कीं,"Madam, I wish you could take me with you to India. Because my heart is broken. —मॅडम, तुह्मी मला आपल्याबरोबर हिंदुस्तानांत न्याल तर बरें होईल. माझें हृदय फाटून गेलें आहे !"

मीं तिला विचारलें " तुझें हृदय असें फुटण्याला कारण तरी काय झालें ?"

तेव्हां ती डोळ्यांत पाणी आणून ह्मणे " तें अगदीं विचारूं नका! तें कांहीं मी सांगूं शकत नाहीं. पण माझ्या अंतःकरणाचा अगदीं चुराडा झाला आहे, आणि ह्मणून ह्मणतें, मला तुह्मी आपल्याबरोबर आपल्या देशीं न्याल, तर फार बरें होईल." असें त्या पोरीचें दुःख तरी कोणतें होतें, कोण जाणे !

जुलै ३१ रोजीं सकाळीं आह्मी सर क्रॉफर्डच्या निमंत्रणावरून, त्यांची मोठी गिरणी पहावयाला गेलों. या गिरणींत सर्व तागाचें काम होतें, व या तागाच्या दोऱ्यापासून इतकें सुंदर व तलम कापड तयार करतात, कीं, तें पाहून आश्चर्य वाटतें, व खात्री होते, कीं मनुष्य जर प्रयत्न व मेहनत करील तर काय होणार नाहीं ! टेबलावर टाकण्याचे कपडे, न्याप्किनस्, चादरी, हातरुमाल वगैरे कपडे तयार करतात.

गिरणी पाहिल्यावर सर क्रॉफर्ड यांनीं हार्लंड आणि उल्फ यांनां इंट्रोडक्शन पत्र दिलें. मग त्यांचा जहाजें तयार करण्याचा कारखाना पहावयाला गेलों. प्रथम दारावर आमचीं नांवेंगांवें टिपून घेऊन नंतर आह्मांला आंत सोडलें. हा कारखाना फार प्रचंड आहे. येथें मोठमोठीं जहाजें तयार होतात. येथील मोठमोठीं राक्षसी यंत्रें पाहिलीं, ह्मणजे अंगावर कांटाच उभा रहातो. एका मोठ्या दालनांत जाडजाड तक्त्यांनां भोंकें पाडण्याचें काम चाललें होतें. खूप जाड आणि उंच उंच यंत्रें तेथें रांगेनें ठेवलीं होतीं, व तीं काळ्या रंगानें काळींकुट्ट केलीं होतीं, आणि आतां खूप कामांत असल्यामुळें फार तापलीं होतीं व त्यांच्या गरम वाफांनीं तें दालन अगदीं गरम झालें होतें. या यंत्रांच्या दाभाडांत ते लोखंडी तक्ते आपोआप घसरत जात होते. तेथें त्यांनां नेमकीं वाटोळीं छिद्रें पडत होतीं. हा देखावा मोठा विलक्षण दिसत होता. असें वाटे, कीं, हे जणूं काय काळेकुट्ट राक्षसच ओळीनें उभे

राहिले आहेत, व ते लोखंडाचे पत्रे कडाकड दांतांनीं चावीत आहेत. दुसऱ्या दालनांत मोठमोठे खिळे तयार होत होते, तेहि पहाण्याला फार भयंकर दिसत असत. अशा प्रकारें अनेक तऱ्हेचीं अनेक यंत्रें आपापलीं कामें करीत होतीं. कारखान्याचा थोडासा भाग पाहून मग आह्मी ज्या भागांत जहाजें तयार होत होतीं तिकडे गेलों. एक मोठें जहाज अर्धें तयार झालें होतें. तें चहूंकडून पाहिलें. त्याचें लांकडी काम संपलें होतें, व त्याला खिळे व पत्रे ठोकण्याचें काम चाललें होतें. या जहाजाला आंतून बाहेरून जाड पितळेचे आणि लोखंडाचे पत्रे मोठमोठ्या खिळ्यांनीं ठोकून तें अगदीं मजबूत व पक्कें केलें होतें.

प्रकरण आठवें.

## स्कॉटलंड.

तारीख ३१ जुलै रोजीं संध्याकाळीं सहा वाजतां आह्मी बेलफास्टहून निघालों, व लारेन येथून बोटींत बसलों. सुमारें तास दीड तासानें स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर येऊन पोहोंचलों. येथून ट्रेनमध्यें बसावें लागतें. त्याप्रमाणें ट्रेन तयार होती. सुदैवानें आमच्या डब्यांत मुळींच गर्दी नव्हती. आह्मी तिघेंच होतों ह्मटलें तरी चालेल. वेळ रात्रीची असल्यामुळें सीनरी वगैरे कांहींच दिसली नाहीं, व झोंप येत असल्यामुळें पहाण्याचाहि आह्मीं प्रयत्न केला नाहीं.

## ग्लास्गो.

रात्रीं एक वाजतां ग्लासगोच्या स्टेशनावर पोहोंचलों. स्टेशनजवळील हॉटेलवाल्याला सकाळींच तार केली होती, कीं 'आमच्याकारितां दोन खोल्या राखून ठेवाव्या.' हे ह्मणाले "आपण रात्रीं १ वाजतां ग्लासगोला पोहोंचूं, तेव्हां स्टेशनजवळील हॉटेलमध्यें उतरणेंच बरें. ह्मणजे रात्रीच्या वेळीं त्रास होणार नाहीं. परंतु हॉटेलमध्यें गेलों, तेव्हां मॅनेजर ह्मणाला " येथें एकहि खोली रिकामी नाहीं. तुह्मी आठ दिवस आधीं लिहिलें असतें, तर खोल्या ठेवल्या असत्या." असें त्याचें उत्तर ऐकून असा राग आला, कीं,बोलायची सोय नाहीं! पण नुसता राग येऊन काय उपयोग होता? एवढ्या रात्रीं कोठें जावें? अशी पंचाईत पडली. झोंप तर अगदीं अंगावर आली होती. माझा तर जमिनीवरून पायच उचलत नव्हता. पण करतां काय! जिकडे ते जातील तिकडे जावेंच लागे. नंतर स्टेशनच्या बाहेर येऊन पहातों, तों तेथें एकहि गाडी दिसेना. हे ह्मणाले "काय भिकार स्टेशन आहे! भाड्याच्या गाड्यासुद्धां मिळत नाहींत!"

आतां पायींच जावें लागतें कीं काय नकळे, अशी पंचाईत पडली. पण इतक्यांत आमच्या सुदैवानें तेथें एक पोर्टर आला, व "मी तुह्माला भाड्याची गाडी आणून देतों;" असें ह्मणाला. त्याप्रमाणें त्यानें एक घोड्याची गाडी आणलीहि. नंतर आह्मी सामान भरून निघालों. एका हॉटेलपाशीं थांबलों, पण तेथेंहि जागा नव्हती. आह्मांला वाटलें, कीं, आतां उजाडेपर्यंत तरी जागा मिळते कीं नाहीं, कोण जाणे. पण आमच्या गाडीवाल्यानें आह्मांला धीर दिला व सांगितलें "जर तुमची हरकत नसेल तर मी तुह्मांला एका लहान हॉटेलमध्यें नेतों. तेथें तुह्मांला खात्रीनें जागा मिळेल!"

हॉटेल लहान असो कीं मोठें असो, आह्मांला आतां जाग्याची जरूरी होती. ह्मणून आह्मीं त्याला तिकडे गाडी नेण्याला सांगितलें. त्यानें आह्मांला बॉथ हॉटेलांत नेलें. तेथें खोल्या मिळाल्या. या वेळीं तीन वाजून गेले होते. मग आह्मीं आपलें सामान वगैरे पाहून घेतलें, व एकदांचीं बिछान्यांवर पडलों.

तारीख १ आगस्ट रोजीं सकाळीं ब्रेकफास्ट झाल्यावर डॉक्टर आणि मिसेस् डायर यांच्या भेटीला गेलों. हे गृहस्थ बरींच वर्षें जपानांत प्रोफेसर होते, व टोकिओ युनिव्हरसिटीच्या इंजिनिअरिंग कॉलेजचे मुख्याध्यापक होते. यांनीं जपानसंबंधीं दोन पुस्तकें लिहिलीं असून त्यांत जपानी लोकांविषयीं आणि तेथील कारभाराविषयीं फार उदात्त व कनवाळू विचार प्रदर्शित केले आहेत. यांचे तिसरे चिरंजीव, आमच्या प्रांतांत सिव्हिल सर्व्हिसमध्यें नोकर आहेत. त्यांचा व आमचा एकदोन जिल्ह्यांत संबंध पडल्यामुळें चांगली ओळख झाली आहे. ह्मणून आह्मी जेव्हां इकडील प्रवासाला निघालों, तेव्हां त्यांनीं आपल्या भावाला व बापाला पत्रें दिलीं होतीं. त्याप्रमाणें डॉक्टर व मिसेस डायर या दोघांनीं आमचें फार स्वागत केलें. चहापानानंतर तेथील प्रदर्शन पहाण्याला नेलें. त्यांतच पुष्कळ वस्तूंविषयीं पुष्कळ माहिती करून

दिली. हीं दोघें नवराबाको जरी वृद्ध झालीं आहेत तरी फार हुषार व तरतरीत आहेत. डॉक्टर डायर अजूनहि पुस्तकें लिहीत असतात. त्यांचा वाचनाचा व्यासंग जबर आहे. त्यांची लायब्ररी तळघरांत आहे. त्यांतील पुस्तकें नीटनेटकीं व्यवस्थेनें ठेविलीं आहेत. त्या ठिकाणीं एक लिहिण्याचें टेबल व कांहीं खुर्च्या इतकेंच सामान आहे. त्यांनां चार मुलगे आहेत, ते सर्व सुशिक्षित असून मोठमोठ्या हुद्यांवर आहेत. सर्व आईबापांप्रमाणें यांनांहि आपल्या मुलांविषयीं अभिमान वाटतो, व तें स्वाभाविक आहे. संध्याकाळीं आह्मी आपल्या बॉथ हॉटेलांत परत आलों. तेथें आमच्या तिघांशिवाय आणखीहि चारपांचजणें होतीं. हॉटेल जरी लहान होतें, तरी त्यांत स्वच्छता पुष्कळ होती. नेहमींप्रमाणें यांनीं तेथील सर्व्हंटला सांगून ठेविलें होते कीं, "सकाळीं सहा वाजतां मला स्नानाकरितां गरम पाणी तयार पाहिजे!"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहातात, तों गरम पाणी तयार नाहीं. ह्मणून यांनीं थंड पाण्यानेंच स्नान केलें, व मेड सर्व्हंटवर खूप रागावले. तिला ह्मणाले "आह्मी आतां दुसऱ्या हॉटेलांत जातों. तुमच्या येथें कांहीं व्यवस्था होत नाहीं!"

ही मेड सर्व्हंट वयातीत असून अंगानें रोडकी व कानानें बहिरी होती. दुसऱ्या हॉटेलमध्यें जाण्याचें नांव काढलें, तशी ती घाबरली व ह्मणाली "सर, आज मला जरा जास्त झोंप लागली, आणि ह्मणून अशी गडबड झाली. उद्यांपासून असें होणार नाहीं. दुसऱ्या हॉटेलमध्यें जाऊं नका; नाहीं तर आमच्या हॉटेलचें वाईट नांव होईल. पुनः असें होणार नाहीं. तुह्मी सांगाल त्या वेळीं तुमची स्नानाची तयारी ठेवूं."

मग कांहीं वेळानें माझ्याकडे येऊन मला ह्मणाली "लेडी, जंटलमन् माझ्यावर फार रागावले. कारण, त्यांच्या स्नानाची बरोबर व्यवस्था झाली नाहीं. तुह्मी त्यांनां दोन गोष्टी सांगून समजवा. दुसरीकडे कोठें जाऊं नका. आतां कोणत्याहि गोष्टीची हयगय होणार नाहीं."

अशा प्रकारची ही मेडसर्व्हंट फार गरीब व प्रामाणिक नोकर होती. जेव्हां पहावें, तेव्हां ही कांहींना कांहीं काम करीत असायचीच.

हॉटेलची मालकीणहि एक बाईच होती. ती हिशोब वगैरे लिहीत असे, व नेहमीं डामडौलांत असून आपल्या खोलींत शिवणकाम वगैरे करीत असे. आह्मी तिथें सकाळीं ब्रेकफास्टकरतां डायनिंगरूममध्यें जात होतों, तेव्हां हॉटेलची मालकीण कांहीं शिवणकाम करीत आपल्या खोलीच्या दारांत बसली होती. तिची खोली डायनिंग रूमजवळच होती. वासुदेवराव पंडित हे जरा पुढें चालले होते, व मी थोडी पाठीमागें होतें. पण मला पाहिलें, तशी ती बाई उठली व लवकर पुढें होऊन तिनें डायनिंग रूमचा दरवाजा उघडला, व मोठ्या हंसतमुखानें गुड मॉर्निंग वगैरे बोलली. आह्मी ब्रेकफास्टला बसलों, तेव्हां मी यांनां ह्मटलें "आज तर हॉटेलच्या मालकिणीनें उठून दरवाजा उघडला व माझ्याशीं मोठ्या अदबीनें बोलली. आज मी जरीचें पातळ नेसलें आहें, व आंगावर कांहीं दागिने घातले आहेत, ह्मणून असें असेल. कारण, काल मी साधारण लुगडें नेसलें होतें, तेव्हां तिनें माझ्याकडे पाहिलेंसुद्धां नाहीं. पहा, सर्व मान दागदागिन्यांनां व चांगल्या कपड्यालत्त्यांनां असतो!"

ब्रेकफास्ट झाल्यावर आह्मी ड्राइंगरूममध्यें डॉक्टर व मिसेस डायर यांची वाट पहात बसलों. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तीं दोघेंहि दहा वाजतां आलीं. डॉक्टर डायरनें त्यांनां व पंडितांनां बरोबर नेलें, व मी मिसेस डायरबरोबर गेलें. अशा प्रकारें आमच्या बायकांच्या व पुरुषांच्या निरनिराळ्या दोन पार्ट्या झाल्या.

मिसेस डायर व मी ट्रॅमनें बरेंच फिरलों. कांहीं पार्क पाहून मग कॅथिड्रलमध्यें गेलों. तें फार जुनें व मोठें असून चांगलें आहे. तेथून ग्लासगोचा सुंदर बाजार पाहिला. तेथें मोठ्यामोठ्या चौकासारख्या जागा आहेत. त्यांत चांगल्या वस्तूंचीं दुकानें आहेत. वरच्या मजल्यावर रेस्टोरंट आहे, तेथें आह्मी लंच घेण्याला गेलों. मिसेस डायर ह्मणाल्या

"मिसेस चिटणवीस, तुह्माला व्हिजीटेरिअन लंच आवडेल, तेव्हां आपण त्याच रेस्टोरंटमध्यें जाऊं."

आह्मी भाजीपाल्याच्या रेस्टोरंटमध्यें गेलों. तेथील भाजीपाल्याचे व फळांचे पदार्थ फारच उत्तम केलेले होते. आह्मी इतकें फिरलों, पण तसे पदार्थ कधींच माझ्या खाण्यांत आले नव्हते. तें गजबजलेलें रेस्टोरंट पाहून मला फार आश्चर्य वाटलें. तेथें मोठमोठ्या दालनांतून शेंकडों टेबलें मांडलीं होतीं व हजारों स्त्रीपुरुषें उपाहार करीत होतीं. नोकर लोक कांहींएक गडबड न करतां सर्व कामें यंत्राप्रमाणें सुरळीत करीत होते. लंच आटोपल्यावर मिसेस डायरनें मला लेडीजच्या दिवाण-खान्यांत नेलें. तेथें जिकडेतिकडे मखमलीनें मढवलेल्या खुर्च्या व कोचें ठेवलीं होतीं;त्यावर ऐषआरामानें लोळत असलेल्या पुष्कळ बाया दिसल्या. कांहीं पुस्तकें वाचीत होत्या, कांहीं वर्तमानपत्रें चाळीत होत्या, कांहीं गरम काफीचे घुटके घेत होत्या. त्या ठिकाणीं पुरुषांनां येण्याची सक्त मनाई असे. तेथें बायकाच नोकर होत्या. मिसेस डायर यांनीं तेथें आमच्याकरितां काफी मागवली. काफीचे पैसे देतांनां मी मिसेस डायरला ह्मणालें "रूम व लंचचे पैसे तुह्मीं दिले आहेत, तर काफीचे पैसे तरी मला देऊं द्या."

पण त्या ह्मणाल्या "तुह्मी माझ्या गेस्टस् आहांत, तेव्हां मी तुह्माला पैसे कसे देऊं देईन?"

तेथें कांहीं वेळ विश्रांति घेऊन आह्मी पुन: खालीं गेलों.तेथील व्यवस्था फारच उत्तम आहे. खालीं दुकानांत वस्तु खरेदी कराव्यात व वरती रेस्टरूममध्यें जाऊन फराळ करावा.चहाकाफी वगैरे जें लागेल तें ध्यावें. पुन: वाटल्यास दुकानांतून फिरावें. या दुकानांतील सर्व तऱ्हेचा माल उत्तम व मोह पाडणारा होता. रुप्याचीं व सोन्याच्या मुलाम्याचीं उत्तम भांडीं, सोन्यामोत्याचे, हिऱ्यांचे व रत्नांचे दागदागिने, मुलांचीं तऱ्हेतऱ्हेचीं खेळणीं इत्यादि सर्व कांहीं जिन्नस होते. मी कांहीं थोड्या वस्तु खरेदी केल्या, व लवकरच आह्मी मिसेस डायर यांच्या घराकडे

वळलों. पण पुरुषमंडळी अद्याप आली नव्हती. मिसेस डायरनें मला आपल्या खोलींत नेलें, व ह्मटलें "तुह्मी आतां थोडी विश्रांति घ्या. कारण, साऱ्या दुपारभर आपण फिरलों आहों; तेव्हां तुह्मी फार थकलां असाल." मग माझे बूट व मोजे काढण्याला त्यांनीं मदत केली, व आपले लोंकरीचे स्लीपर माझ्या पायांत घालून दिले, आणि एका मऊ कोचावर मला निजविलें. जवळ एका लहान टेबलावर एक थंड पाण्याचा ग्लास भरून ठेवला, व कांहीं पुस्तकें वाचण्याकारितां ठेवलीं. मी त्यांनां ह्मणालें "तुह्मीहि थकलांच आहांत, तुह्मीहि थोडी विश्रांति घ्या." त्या ह्मणाल्या "मी नाहीं थकलें. मला फिरण्यचीं रोजची सवय आहे. मी आतां खालीं स्वयंपाकघरांत जातें, व चहाची वगैरे व्यवस्था पहातें."

खरें पाहिलें असतां मी कांहीं ह्मणण्यासारखी थकलें नव्हतें. कारण, प्रवासांत निघाल्यापासून मलाहि रोज फिरण्याची सवय झाली होती; पण त्या वृद्ध व ममताळू बाईच्या प्रेमपूर्वक स्वागताला मला मान द्यावा लागला. त्याप्रमाणें मी त्या कोचावर पुरुष मंडळी येईपर्यंत चांगलाच आराम केला. डॉक्टरनीं त्यांनां कॅथीड्रल, सेमीटरी, टेक्निकल कॉलेज इत्यादि दाखवून नंतर लिबरल क्लबमध्यें नेलें. तेथें प्रमुख मेंबरांची ओळख करून दिली, व मग लंचचा समारंभ झाला. नंतर एकदोन पार्क पाहून संध्याकाळीं चारपांचांच्या सुमाराला डॉक्टर डायर घरीं आले. पुरुष मंडळी आल्यावर सर्वांनीं चहा घेतला. संध्याकाळीं आह्मी हॉटेलांत परत आलों.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं, पुनः डॉक्टर व मिसेस् डायर यांनीं आह्मांला घरीं बोलाविलें होतें. आह्मी एक वाजतां त्यांच्या घरीं गेलों. लंचनंतर डॉक्टर डायर यांनीं जपानविषयीं कांहीं गोष्टी सांगितल्या, व कांहीं फोटोहि दाखविले. मग चार वाजतां आह्मी पुनः एक्झिबिशन पहाण्याला गेलों. डॉक्टर डायर ह्मणाले "आज आपल्याला सर्व एक्झिबिशन पाहिलें पाहिजे, व मिसेस चिटणवीस थकून जातील, तेव्हां त्यांच्या-

करितां एक ढकलगाडी ठरवावी, ह्मणजे झालें. माझी बायको कांहीं थकणार नाहीं. तिला नेहमींची सवय आहे." असें ह्मणून सर्वांनीं आग्रह करून मला बळेंच त्या गाडींत बसविलें. माझ्यापेक्षां ह्मातार्‍या मिसेस डायर या चालत होत्या, व मी एकाद्या लंगड्याप्रमाणें त्या गाडींत बसलें, त्याबद्दल मला कसेंसेंच वाटून मी थोड्यावेळानें उतरलें आणि सर्वांबरोबर पायींच चालूं लागलें. संध्याकाळीं जेव्हां विजेची लाईट झाली, त्या वेळीं एक्झिबिशनची शोभा अवर्णनीय दिसूं लागली. बराच वेळ इकडेतिकडे फिरल्यावर आह्मी डाक्टर आणि मिसेस डायर यांनां 'गुडबाय' करून व त्यांच्या आदरातिथ्याबद्दल फारफार आभार मानून हॉटेलकडे परतलों व तीं आपल्या घराकडे गेलीं.

## काइलस् ऑफ ब्यूटी व आरड्रीश हेग.

तारीख ४ आगस्ट रोजीं सकाळीं ७। वाजतां आह्मी बोटीनें निघालों. वाटेनें मोठमोठ्या गोद्या व जहाजांचे कारखाने दृष्टीला पडले. किनार्‍यावरील लहानलहान बागा व त्यांनीं वेष्टिलेल्या सुंदर झोंपड्या वगैरे देखावा चांगला दिसला. आरड्रीश हेग येथें मोठें जहाज सोडावें लागलें व थोडें दूर लहान बोटीपर्यंत चालत जावें लागलें. सर्व प्रवासी आपापलें सामान घेऊन धांवत होते. मग आह्मींहि ब्यागा घेऊन त्या मंडळीचें अनुकरण केलें. हे वासुदेवरावांनां व मला ह्मणूं लागले "चला, उचला आपल्या ब्यागा, व धांवा या लोकांसारखे ! हें कांहीं हिंदुस्तान नाहीं, कीं, तुमचें बारिकसारीक सामानसुद्धां घेऊन हमाल तुमच्यामागें धांवतील ! चला लवकर, नाहीं तर बोट निघून जाईल !"

आह्मीं लगबगीनें जाऊन बोट गांठली व चांगली जागा पाहून बसलों. क्रीनन कॅनाल हा कालवा नऊ मैल लांब आहे. हा लॉक काइल, व लॉक क्रीनन यांच्यामध्यें आहे, व त्यायोगें क्लाइड व पश्चिम आयलंडस् यांच्या व्यापाराला पुष्कळ मदत झाली आहे. या कॅनालमध्यें १९ लॉक्स् आहेत व त्यांतून बोट फार हळुहळू जाते. या लॉक्स्मधून यंत्रानें

पाणी कोठें जास्त करीत असत व कोठें कमी करीत असत. जशी जरूर असेल तसें करून बोट पुढें चालवीत होते. कॅनालच्या दोन्ही बाजूंची सीनरी उत्तम होती. संध्याकाळीं आह्मी ओबनलला पोहोंचलों. ओबनलला आयलंडचें चेरिंगक्रास ह्मणतात. येथून सर्व दिशेनें एक्स्कर्शन करतां येतात. आह्मी येथील स्टेशन हॉटेलमध्यें रात्रभर राहिलों. सकाळीं आठ वाजतां इन्व्हरनेसला जाण्याकरितां निघालों. हॉटेलच्या जवळच बोटीचा धक्का होता. त्या वेळीं थोडथोडा पाऊसहि पडत होता. ह्मणून हवा थंड व सर्द पडली होती. या कालव्याला कॅलीडोनीयन कॅनाल असें ह्मणतात. वाटेनें तीन लेक्स् लागतात, व बोट लेक्स व कॅनालमधून जाते. हा कॅनाल सन १८२२ मध्यें केला असून यांतून १००० टनपर्यंतच्या बोटी जाऊं शकतात. वाटेनें ब्रिटनमधील सर्वांत उंच बेननेव्हीस पर्वताचा देखावा चांगला पहाण्यांत आला. दोन्ही बाजूंचे किल्लेहि चांगले दिसतात. बोटीवर अमेरिकन बाया पुष्कळ होत्या. त्यांच्या बोलण्याचालण्यामुळें होणाऱ्या गडबडीची चांगलीच करमणूक होत होती, व कंटाळवाणेंहि वाटत नव्हतें. अमेरिकन बाया बोलूनचालून मोकळ्या मनाच्या असतात. संध्याकाळीं इन्व्हरनेस येथें पोहोंचलों.

## इन्व्हरनेस.

इन्व्हरनेस हें हायलंडचें कॅपिटल आहे. येथेंहि आह्मी स्टेशन हॉटेलमध्येंच उतरलों. इकडील स्टेशन हॉटेलें फारच सोयीचीं असतात. रेल्वेनें जावयाचें असलें ह्मणजे फार दूर जावें लागत नाहीं. तेथून चहूंकडे गाड्या जातयेत असतात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उपाहारानंतर कलोडन बॅटल-फिल्ड पहावयाला गेलों. तेथें १७४६ मध्यें मोठी लढाई झाली होती. येथें फार मोठें मैदान आहे व बाजूनें हिरवींगार झाडेंझुडें आहेत. येथें एक दगड दाखवितात, व सांगतात, कीं, याच दगडावर उभें राहून

कुडर ड्यूकनें लढाइचें नेतृत्व केलें. येथें एक विहीर असून तिला ‘ वेल ऑफ दि डेड ’ असें ह्मणतात. कारण, कांहीं जखमी झालेले शिपायी तेथें पाणी पिण्याकरितां गेले होते. फार जखमी झालेले लोक तेथेंच मरण पावले. तेथें एक प्रकारचीं पांढरीं व तांबडीं फुलें असलेलें गवत पुष्कळ उगवतें व त्याला ‘ लकी हिदर ’ असें ह्मणतात. तें सुदैवी गवत येथून सर्व लोक घेऊन जातात, व आपल्या मित्र-मंडळीला प्रसादासारखें वांटतात. आह्मीहि तें ‘ लकी हिदर ’ बरेंच घेतलें, व आणखी कांहीं पाहून लंच घेऊन रेल्वेनें डिंगवेल येथें गेलों. कारण, रविवार असल्यामुळें स्ट्रेथपेफरपर्यंत गाडी जात नव्हती. सकाळीं इन्व्हरनेसहून टेलिफोननें स्ट्रेथपेफर येथील बेननेव्हिस हॉटेलच्या मॅनेजरीण बाईला कळविलें होतें, त्याप्रमाणें तिनें आपली घोड्याची गाडी आह्मांला पाठविली होती. तींतून आह्मीं संध्याकाळीं पांच वाजतां स्ट्रेथपेफर येथें पोहोंचलों.

## स्ट्रेथपेफर.

हॉटेलमध्यें पोहोंचलों, त्या वेळीं मॅनेजरीण बाई ह्मणाली “ तुह्मांला खोल्या दिल्याचें कळविलें, त्यांत आमची चूक झाली. आतां कशी तरी तुह्मांला एक रात्र राहूं देतें, पण उद्यांपासून तुह्मी दुसरीकडे खोल्या पहा. ”

अशा प्रकारें त्या बाईनें प्रथम कबूल करून नंतर आह्मांला फशीं पाडलें. प्रथम टेलिफोननें ‘ होय ’ ह्मणून, त्याप्रमाणें गाडीहि पाठविली, आणि येथें आल्यावर असें फसविलें. मग हे व वासुदेवराव दुसरीकडे खोल्या पहावयाला गेले. मिळाल्यास आतांच तिकडे जाण्याचा विचार होता. मी हॉटेलमध्येंच बसलें होतें. कोठेंच खोल्या रिकाम्या नव्हत्या. जे ते सांगूं लागले, कीं, आणखी ६।७ दिवसांनीं रिकाम्या होतील. शेवटीं कसेंतरी करून या मॅनेजरीण बाईनें ७।८ दिवस राहूं देण्याचें कबूल केलें.

या गांवीं गंधकाच्या पाण्याचे झरे आहेत, ह्मणून येथील पाणी पिण्याकरितां व या पाण्यानें स्नान करण्याकरितां शेंकडों लोक दरवर्षीं उन्हाळ्यांत येथें येत असतात. त्यामुळें येथील हॉटेलांतून या दिवसांत फार गर्दी असते. येथें आल्यावर प्रथम डॉक्टरला प्रकृति दाखवून मग ज्याप्रमाणें तो सांगेल त्याप्रमाणें पाणी पिण्याचें प्रमाण ठेवावें लागतें. डॉक्टरनें लिहून दिलेलें प्रिस्क्रिप्शन पाणी पिण्याच्या जागीं व स्नानाच्या जागीं दाखविलें, ह्मणजे तशी तेथें व्यवस्था करतात. पाणी पिण्याची जागा सकाळीं सहा ते नऊ, व दुपारीं दोन ते चार वाजेपर्यंत उघडी असते. या जागीं आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचा मोठा जमाव असतो. त्यांपैकीं कांहीं लंगडी, कांहीं मोठ्या पोटाची, तर कांहीं गळे सुजलेले, अशा नाना प्रकारची व्यंगी मंडळी असते. कांहीं आमच्यासारखीं धडधाकट असून उगीच चैन करण्याकरितां आलेलीं असतात.

हें पाणी यंत्रानें शुद्ध करून मग पिण्याला देतात. याची रुचि गंधकामुळें फार वाईट लागते. पण तें औषध ह्मणून प्यावें लागतें. डॉक्टरनें सांगितलें असेल, तितक्या उष्णतेचें पाणी, एक किंवा दोन वेळ हळुहळू प्यावयाचें. कोणाला इकडेतिकडे फिरत पाणी पिण्याला सांगितलेलें असतें. ती मंडळी इकडेतिकडे फिरत असतात. फिरण्याकरितां पुढें चांगला बाग केला आहे. झऱ्याजवळ एकदोन मजली इमारत आहे. वरच्या मजल्यावर पुरुषांच्या स्नानाची सोय आहे, व खालच्या मजल्यावर स्त्रियांची स्नानाची जागा आहे. स्नानगृहांच्या बाहेर बसण्याकरितां वेटिंग रूम आहे. स्नानाची फी व पाणी पिण्याची फी वेगळी द्यावी लागते. स्नानाला ते सांगतील त्याच वेळेला यावें लागतें. स्नानाचे बरेच प्रकार आहेत. जसें, सल्फर बाथ, डुशबाथ, शावर बाथ, मडपिटबाथ वगैरे डॉक्टर सांगेल त्याप्रमाणें बाथस् देतात. मला यांपैकीं शावरबाथ, डुशबाथ व सल्फरबाथ अशा तीन प्रकारच्या बाथस् दिल्या-

स्त्रियांच्या स्नानगृहांत व्यवस्था करण्याकरितां सर्व नोकर स्त्रियाच असतात. त्या नोकर बाया सुस्वभावी व काळजीपूर्वक काम करणाऱ्या असतात. आपल्या कामांत त्या थोडीसुद्धां हायगय करीत नाहींत.

पहिल्या दिवशीं शॉवरबाथ दिला, त्या नोकर बाईनें मला एका पातळ टॉवेलांत गुंडाळलें व डोक्याला एक रबराचें टोपडें घातलें. माझ्या सर्व कपड्यांच्या घड्या वगैरे घालून ते नीट ठेवले. मग दुसऱ्या एका खोलींत नेऊन एका रबराच्या बिछान्यावर निजविलें, व दरवाजा लावून घेऊन पाण्याच्या तोट्या एकदम सोडल्या. त्याबरोबर पावसाच्या धारांसारखें गरम पाणी माझ्या अंगावर पडूं लागलें. त्या नोकर बाईनें माझें सर्व अंग चांगलें चोळलें व रगडलें. तिचा पोषाखहि सर्व रबराचाच होता. त्या लहानशा खोलींत जिकडेतिकडे गरम पाण्याचे वाफारे निघत होते. माझ्या अंगावर एकसारखा गरम पाण्याचा पाऊसच पडत होता. मग नियमित वेळ झाल्यावर त्या बाईनें घंटा वाजविली, व त्या पाण्याच्या सर्व तोट्या बंद केल्या. तशी दुसरी एक नोकरबाई गरम केलेले टावेल्स घेऊन आंत आली, व त्या गरम टावेलमध्यें मला गुंडाळून दुसऱ्या एका खोलीमध्यें कोचावर नेऊन निजविलें व डोक्याचें रबरी टोपडें काढून टाकलें. आंतील केंस मुळींच ओले झाले नव्हते. नंतर तिनें एक घड्याळ माझ्याजवळ आणून ठेवलें व सांगितलें, कीं, "दहा मिनिटें अशाच पडून रहा. खूप घाम येऊंद्या. मग अंग चांगलें पुसून कपडे घाला. तुह्मांला कांहीं पाहिजे असेल, तर चहा, काफी, वाइन इत्यादि पेयें आणून देतें!"

मीं तिला सांगितलें "मला कांहीं नको. तूं जा, मी दहा मिनिटांनीं कपडे घालून बाहेर येईन."

डुश बाथला एका गरम पाण्याच्या उथळ टाक्यांत नेऊन बसविलें. पाठीवर, कमरेवर, गुढघ्यावर चांगल्या गरम पाण्याच्या रबराच्या नळ्या सोडल्या व जेथेंजेथें दुख असेल, तेथें चांगला शेक दिला.

सल्फर बाथला सल्फरच्या ऊन पाण्यामध्यें दहा मिनिटें पडून रहावयाचें, व मग पूर्वीप्रमाणेंच गरम टावेलस् वगैरे गुंडाळून घाम येऊं द्यावयाचा.

येथील पाणी पीत असतांना खाण्यापिण्यासंबंधानें नियमितपणा ठेवावा लागतो. बहुतकरून इकडे ओट्स धान्य असतें, त्याचे पदार्थ डॉक्टर खाण्याला सांगतात. कारण तें फार हलकें असतें. एकंदरींत जड अन्न खाऊं नये, असें आहे.

बेननेव्हीस हॉटेलमध्यें पुष्कळ मंडळी जमली होती, व रात्रीं जेव-णाचा दिवाणखाना व ड्राइंगरूम खूप गजबजून जात असे. हॉटेल-मध्यें सर्व व्यवस्था चांगली होती. पुढें मोठा सुंदर बाग होता. त्यांतच टेनिस कोर्ट, ब्याडमिंग्टन कोर्ट वगैरे खेळण्याच्या जागा होत्या. परंतु कोणालाहि फुकट खेळण्याची मोकळीक नव्हती. त्याबद्दल फी असे.

मॅनेजर बाईचें रोजरोज आमच्यामागें टुमणें लागलें होतेंच, कीं, "तुह्मी दुसरीकडे जागा पहा, मी आतां अधिक दिवस तुह्मांला ठेवूं शकत नाहीं. माझे महिना दोन महिने रहाणारे गिऱ्हाईक खोल्या मागत आहेत. तुह्मी काय थोड्या दिवसांनीं जाणार. तेव्हां मला त्यांनां खोल्या दिल्या पाहिजेत." अशा प्रकारें तिची रोज कुरकुर चाले.

यावर पंडित थट्टेनें ह्मणाले "मी आतां कांहीं गप्पा वगैरे सांगून या बाईवर छाप बसवतों, व आपल्याला ती कांहीं दिवस राहूं देईल असें करतों."

जेवणाच्या वेळीं मीं त्यांनां विचारलें "कां तात्यासाहेब, छाप बसली कीं नाहीं? काय ह्मणतात मॅनेजरीणबाई? तुह्मी बॅरिस्टर आहां; तुह्माला पुष्कळ हिकमती माहीत आहेत!"

वासुदेवराव ह्मणाले "काकू, अद्याप चांगली छाप बसली नाहीं; मी प्रयत्न चालवला आहे; पण अजून बाई चांगलीशी वळलेली दिसत

नाहीं. प्रथम एक रात्र राहूं देणार होतों, त्याला आज आठ दिवस झाले. तसेच आणखी कांहीं दिवस ढकलून पाहूं."

तारीख ८ आगस्ट रोजीं आह्मी फॉल्स् ऑफ रेगी पहावयाला गेलों. तेथून रोज चार घोड्यांच्या बसेस कुठेंकुठें जात असतात, ह्मणून आह्मीहि या बसेसमधून फॉल्स् पहाण्याला आलों. या बसेसमध्यें आणखीहि कांहीं मंडळी होती. त्यांत दोनतीन इंडिअनस् दिसले. या फॉल्स्च्या ठिकाणीं विशेष पहाण्यासारखें कांहीं नाहीं; परंतु येथें सामन मासे पुष्कळ सांपडतात, असें ह्मणतात. ही जागा स्ट्रेथपेफरपासून तीन मैलांवर आहे. या चार घोड्यांच्या बसेसमधून पुष्कळशा मंडळीबरोबर फिरण्याची मजा वाटते.

आमच्या ओळखीचे मिस्टर व मिसेस् स्टँडन हेहि येथें पाणी पिण्याला व स्नानाला आले होते, त्यांची आणि आमची येथें पुनः भेट झाली. मिसेस स्टँडननीं एके दिवशीं आह्मांला चहाला बोलावलें. तीं एका खाजगी लहान हॉटेलांत रहात होतीं. पाणी पिण्याच्या जागीं त्यांची आमची बहुतकरून रोज भेट होत असे. रोज सकाळीं सहा वाजतां हे नियमितपणें पाणी पिण्याला जात असत. पण पंडित व मी बहुतकरून रोज दुपारींच जात असूं. कारण, आमच्या दोघांच्यानेंहि सकाळीं लवकर उठणें होत नव्हतें.

इकडील प्रवासामध्यें वासुदेवराव पंडित आमच्याबरोबर असल्यामुळें मला जरा बरें वाटे. कारण, त्यांच्याशीं नेहमीं गप्पागोष्टी करण्याला सांपडत. सकाळीं लवकर उठण्यासंबंधीं पंडित माझ्याइतकेच आळशी असत, ह्मणून मलाहि बरें वाटे. केव्हांकेव्हां आमची ब्रेकफास्ट होई, तरीसुद्धां वासुदेवराव झोंपेंतच दंग! मग हेच जाऊन त्यांना उठवून आमच्या खोलींत आणून ह्मणत "पहा, चिरंजिवांनां उठवून आणलें. हे तरुण असून किती आळशी आहेत पहा!"

मग वासुदेवराव ह्मणत " नाहीं काकू, काल रात्रीं मी अमुकअमुक पुस्तक तीनचार वाजेपर्यंत वाचीत होतों. त्यांत इतकें कांहीं मन रमलें, कीं, तें खालीं ठेवावेंसेंच वाटेना. जेव्हां फार झोंप आली, तेव्हांच पुस्तक खालीं ठेवलें व निजलों, आणि ह्मणून उशीर झाला. " अशा प्रकारें आमचें नेहमींच चाले.

एके दिवशीं रात्रीं तेथील बागेंत मोठा नाच होता.त्याकारितां बेननेव्हीस हॉटेलचीहि सर्व मंडळी उंचीउंची पोषाख करून नाचावयाला गेली होती. आह्मीहि जेवण झाल्यावर थोडा वेळ नाच पहावयाला गेलों. आंत जाण्याकारितां तिकिटें होतीं. आमच्या हॉटेलचे दोघेतिघे ह्मातारे गृहस्थ, इतर तरुणांपेक्षां फारच उत्तम तऱ्हेनें नाचतांना दिसले. ते तरुण मुलींबरोबर व इतर बायांबरोबर सारखे नाचत होते. त्यांनां कंटाळा आलेला मुळींच दिसला नाहीं. हें पाहून हे ह्मणाले " पहा, स्काटलंडच्या थंड हवेनें या ह्मातार्यांनां किती तरतरी आली आहे ! सर्व नाचांत हे ह्मातारे पार्ट घेत आहेत." शेवटीं दोनतीन स्काच नाच झाले, ते पाहून आह्मी परत हॉटेलांत आलों.

बेननेव्हीस हॉटेलच्याजवळच एक लहान हॉटेल होतें.तेथें एक खोली रिकामी झाली, म्हणून आह्मी तेथें रहावयाला गेलों. मॅनेजरीणबाईची नेहमीं कुरकुर चाललेली असे, कीं, माझे महिनाभर रहाणारे गिऱ्हाईक खोलीसाठीं वाट पहात आहेत. अशीं तिचीं रडगाणीं नेहमीं चालू असत. तेव्हां तिची तरी हरकत कशाला करा, असा पोक्त विचार—दुसरीकडे जागा रिकामी झाल्यावर—आह्मीं केला व तेथें रहाण्याला गेलों. पंडितांनां मात्र तिनें मोठ्या मेहरबानीनें राहूं दिलें. कारण, ते एकटे असल्यामुळें त्यांनां सिंगल रूम चालत होती, व त्यांनां आणखी एक आठवडाभर रहावयाचें होतें. आह्मी दोनतीन दिवसांतच कूच करणार होतों. येथून मैल दीड मैलावर एक चांगलें मोठें हॉटेल होतें; पण तेथेंहि खोल्या

रिकाम्या नव्हत्या, व तें हॉटेल पाणी पिण्याच्या जागेपासून दूर होतें. त्या दुसऱ्या लहान हॉटेलांत आह्मांला चांगली खोली मिळाली होती, व खाण्याची वगैरे व्यवस्थाहि उत्तम होती. इतकेंच कमी होतें, कीं, बेननेव्हीस हॉटेलच्यापुढें असलेला बगीचा व मोठमोठ्या ड्राइंगरूमस् नव्हत्या.

या हॉटेलमध्यें दोनतीन दिवस राहून आह्मी तारीख १६ आगस्ट रोजीं सकाळीं स्ट्रथपेफरहून ट्रेननें निघालों, व इन्व्हरनेस मार्गानें आबरडीन येथें संध्याकाळीं पांच वाजतां पोहोंचलों. ही रेल्वेलाइन समुद्रकिनाऱ्यानेंच जाते, त्यामुळें दोन्हीं बाजूंनां दूरवर पसरलेला चित्रविचित्र प्रदेश मनोरम दिसला.

## आबरडीन.

हें स्टेशन फार मोठें आहे. विशेषत: लांबीमध्यें फारच मोठें आहे. येथें आह्मी स्टेशन हॉटेलमध्येंच उतरलों. हें स्टेशनाच्या बाजूनें जवळच आहे, परंतु बरेंच उंचावर आहे, त्यामुळें थोडें वर चढून जावें लागतें. हॉटेलमध्यें पोहोंचलों नाहीं, तोंच येथील प्रसिद्ध व्यापारी मिस्टर टॉमस ऑगलव्हे हे भेटीला आले. त्यांनां सर अँड्रू फ्रेजर यांनीं पूर्वींच लिहिलें होतें, ह्मणून ते आपली गाडी घेऊन आह्मांला नेण्याकरितां आले होते. मग आह्मी त्यांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेलों. त्यांचें घर मोठें असून घराभोंवतीं सुंदर बाग आहे. त्यांची एक नातलग बाई होती, तिनें आह्मांला सर्व बागभर हिंडाविलें. ती ह्मणाली "मिस्टर ऑगलव्हे यांची पत्नी पुष्कळ वर्षांपूर्वीं ख्रिस्तवासी झाली. त्यांचे तीनचार मुलगे आतां मोठे झाले आहेत, व ते परगांवीं उद्योगधंद्यावर गेले आहेत. त्यांनां पांचसहा मुली असून त्या सर्वांचीं लग्नें झालीं आहेत, आणि ह्मणून सध्यां मिस्टर ऑगलव्हे हे येथें एकटेच असतात. परंतु दोनतीन दिवसांपूर्वीं त्यांची थोरली मुलगी व तिचा नवरा येथें आलीं आहेत. सध्यां तीं दोघें बाहेर गेलीं आहेत. जेवणाच्या वेळीं तीं तुह्मांला भेटतीलच."

अशा प्रकारें गोष्टी सांगत कांहीं वेळ बागेंत फिरल्यावर मग घरांत गेलों. तेव्हां मिस्टर ऑगल्व्हे, त्यांची मुलगी व जांवई वगैरेंनीं आमचें स्वागत गेलें. जेवणाच्या वेळीं मिस्टर आगल्व्हे ह्मणाले " माझे मुलगे इकडेतिकडे गेले आहेत, त्यांचें मला विशेष वाटत नाहीं; पण माझ्या सहाहि मुली लग्न करून गेल्या, व त्यांनीं माझें घर रिकामें केलें, त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. मुली घरांत फार उपयोगी असतात, ह्मणून मला त्या गेल्यापासून अगदीं चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. एक धाकटी मुलगी राहिली होती, तर गुदस्तां एक (जांवयाकडे बोट करून) यांच्यासारखे आस्ट्रेलियाचे गृहस्थ आले व तिला घेऊन गेले !"

जेवणानंतर कांहीं वेळ बसून मग आह्मी हॉटेलांत परत आलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिस्टर ऑगल्व्हे यांची मुलगी हॉटेलांत आली व आह्मांला आबरडीनमधील प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याला घेऊन गेली. युनिव्हरसिटी, म्यूझिअम, पार्क वगैरे दाखवून शेवटीं आह्मांला ऑगल्व्हे यांच्या कारखान्यांत आणलें. तेथें टोप्या वगैरे करतात व गरम कपड्यांचाहि व्यापार आहे.

आबरडीनला ग्रानिड सिटी असें ह्मणतात. येथील इमारती सर्व दगडी आहेत. येथील दगड फार प्रसिद्ध असून ते फार दूरवर जातात. येथें फण्यांचेहि मोठमोठे कारखाने असून त्या फार चांगल्या समजल्या जातात. अलीकडे माशांचा व्यापार फार वाढला आहे.

## फोरफार.

तारीख १८आगस्ट रोजीं सकाळीं आह्मी नवांच्या ट्रेननें आबरडीनहून निघालों व ऑरब्राथच्या वाटेनें फोरफार येथें दुपारीं दोन वाजतां येऊन पोहोंचलों. तेथें आह्मी चारमन हॉटेलांत उतरलों. हें हॉटेल लहानसेंच खाणावळीसारखें आहे. येथें लंच घेतल्यावर सर अँड्रू फ्रेजर यांनीं लिहिल्याप्रमाणें रिडहॉल येथील प्रदर्शन पहाण्याला गेलों. थोड्या वेळानें

मराठी

सर अँड्रू व लेडी फ्रेजर हीं मोटारमधून आलीं. हल्लींच्या बेंगाल गव्हर्नरचे प्रायव्हेट सेक्रेटरी मिस्टर गुरले व त्यांच्या पत्नी हींहि सर अँड्रू यांच्याबरोबर होतीं. मिस्टर गुरले यांची व आमची संबलपुरापासून ओळख असल्यामुळें आमचे जुने मित्र भेटल्याचा एक लाभ झाला. "मि. गुरले जसे सुस्वभावी व मनमिळाऊ आहेत, तशाच त्यांनां पत्नीहि मिळाल्या आहेत," असें लेडी फ्रेजर हंसतहंसत ह्मणाल्या.

हें फुलांचें व भाजीपाल्याचें प्रदर्शन लेडी फ्रेजर यांच्या हातून उघडलें जाणार होतें. ह्मणून त्यांच्याकरितां स्टेज वगैरे उभारून चांगली जागा केली होती. मग स्टेजवर सर अँड्रू व लेडी फ्रेजर, मिस्टर व मिसेस गुरले व आणखी एकदोघे त्यांचे मित्र बसले. आह्मी सर अँड्रू फ्रेजर यांचे मित्र ह्मणून आह्मांलाहि स्टेजवर बसण्याचा मान मिळाला. या वेळीं त्या हॉलमध्यें स्त्रीपुरुषांची एकच गर्दी झाली होती. लेडी फ्रेजरनीं उठून एक्झिबिशन् उघडल्याचें जाहीर केलें. मग टाळयांच्या गजरांत सर अँड्रू फ्रेजर हे भाषण करण्याकरितां उभे राहिले. त्यांनीं बागेसंबंधीं आणि फुलांसंबंधीं समयोचित भाषण करून एक्झिबिशनचा उपयोग व योग्यता सांगितली. सर अँड्रू यांची भाषण करण्याची शैली फार चांगली आहे. ते कोणत्याहि विषयावर अगदीं सावकाशपणें व सर्वांनां समजेल असें स्पष्ट व सरळ भाषण करतात. मग आणखी एकदोघांचीं भाषणें झाल्यावर समारंभ आटोपला. नंतर आह्मीं सर्वांनीं फिरून प्रदर्शनांतील वस्तु पाहिल्या.तेथील कांहीं बाया लेडी फ्रेजरला विचारूं लागल्या "ही इंडियन मुलगी कुठून आली आहे व हिचें लग्न झालें आहे काय ?"

मला पोक्त बाईला त्या बायांनीं मुलगी केली ! लेडी फ्रेजर माझ्याकडे पाहून हंसूं लागल्या.

प्रदर्शन पाहिल्यावर आह्मी सर अँड्रू व लेडी फ्रेजर यांच्याबरोबर मोटारमधून निघालों. सोबत आणलेलें सामान मोटारवर ठेवलें,व त्यांच्या

ग्लेनऐला गांवीं जाण्याला निघालों. फोरफारपासून हें गांव २४ मैल आहे. मध्यें अलीथ नांवाचें एक गांव लागतें. तेथें कांहीं दुकानें वगैरे आहेत, ह्मणून तेथें थोडा वेळ मोटार उभी करून लेडी फ्रेजरनीं खाण्यापिण्याच्या वगैरे कांहीं वस्तु खरेदी केल्या, व आह्मी पुन: निघालों. रस्त्यानें जिकडेतिकडे हिरवेगार डोंगर फारच सुंदर दिसत होते. स्वच्छ व थंड वारा वहात होता. अशा या रमणीय व प्रशांत प्रदेशांतून मोटारनें जाणें मोठें सुखकर व आल्हादकारक वाटत होतें.

संध्याकाळीं सुमारें पांच वाजतां आह्मी ग्लेनऐला येथील त्यांच्या घरीं येऊन पोहोंचलों. त्यांच्या घराचें नांव 'आखनलीश' असें आहे.

## ग्लेनऐला आखनलीश.

ग्लेनऐला हें अगदीं लहान गांव आहे. ह्मणजे येथें लोकवस्ति थोडी आहे. येथें दुकानें वगैरे कांहीं नाहींत; परंतु डोंगरी दरी, त्यावरील तो हिरव्यागार गवतानें आच्छादलेला प्रदेश फारच आल्हादकारक आहे. सर अँड्रू फ्रेजर यांच्या घराजवळच ऐला नदीचा प्रवाह वहात आहे. त्यांचें घर दार्जिलिंगमधील गव्हर्मेंट हौसच्या नमुन्यावर आहे. येथें ते उन्हाळ्यांत सहकुटुंब रहाण्याला येतात. ही सर्व इस्टेट त्यांनीं आपल्या एका नातलगाकडून थोड्या वर्षांमागें विकत घेतली. नंतर त्यांत घर वगैरे बांधून चांगली सुधारणा केली.

आह्मी पोहोंचलों, त्या वेळीं चहाची वगैरे सर्व तयारी होती. मग लेडी फ्रेजरनीं चहा केला व सर्वांनां दिला. या वेळीं तेथें त्यांचा धाकटा मुलगा चारलीबाबा होता, व त्याचे शाळेंतील दोघे सोबतीहि होते. सर अॅन्ड्रू फ्रेजर आह्मांला ह्मणाले "हे सर्वजण रात्रीं जेवणानंतर देवाची प्रार्थना करीत असतात. तुह्मांला कांहीं हरकत नाहीं ना?"

आह्मी त्यांनां 'कांहीं हरकत नाहीं' ह्मणून सांगितलें. सकाळीं व रात्रीं जेवणानंतर अर्धाएक तास त्यांची प्रार्थना होत असते. प्रार्थनेच्या वेळीं त्यांचे चौघे नोकरहि डायनिंग रूममध्यें येऊन बसत असत.

दुसऱ्या दिवशीं लेडी फ्रेजरनीं आह्मांला मोटारमधून आलोय व इतर गांवें दाखविलीं.

तारीख २० आगस्टला रविवार असल्यामुळें दुपारीं सर अँड्रू व लेडी फ्रेजर यांच्याबरोबर आह्मी चर्चमध्यें गेलों. हें चर्च ऐलापासून पांच मैलांवर होतें. तेथें आह्मी सर्वजणें मोटारनेंच गेलों. तेथें सर अँड्रू फ्रेजरचें सर्मन झालें. संध्याकाळीं लेडी फ्रेजरनीं त्यांच्या घराजवळच कांहीं अंतरावर असलेली शेतकरणीची झोंपडी पहावयाला मला नेलें. या बाईला लहानलहान पांचसहा मुलें होतीं. तीं पाहिल्यावर माझ्या मनांत आलें, कीं, गरीब हिंदुस्तानांत असो, कीं, दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांत असो, त्याला अघळपघळ मुलें हीं असावयाचींच; आणि हा ईश्वरी संकेतच असावा. लेडी फ्रेजरनीं सोबत आणलेले खाऊचे पुडे त्या मुलांनां दिले. त्यांचें तें लहानसें स्वच्छ घर पाहून मला आनंद वाटला. त्यांत एक लहानसें स्वयंपाकघर असून मागें दोन लहान खोल्या होत्या. एवढेंच त्यांचें घर. स्वयंपाकघरांत एका कोपऱ्यांत एक पाळणा होता, व त्यांत तीनचार महिन्याचें तान्हें मूल निजलें होतें. तेथें थोडीबहुत असलेलीं भांडीं नीट पुसून व्यवस्थित ठेवलेलीं दिसलीं. आह्मी स्वयंपाकघरांतच उभीं राहून त्या बाईशीं बोलत होतों. इतक्यांत शेतकरीबुवा आले. त्याला लेडी फ्रेजरनीं शेताविषयीं व बकऱ्यामेंढ्यांविषयीं विचारपूस केली. शेवटीं त्या दोघांशीं शेकहँड करून आह्मी परतलों. लेडी फ्रेजर मला ह्मणाल्या "इकडील लोकांशीं शेकहँड करावा लागतो. नाहीं केला तर त्यांनां वाईट वाटतें. हे लोक जरी गरीब आहेत, तरी फार चांगले व सभ्य आहेत."

तें गरीब कुटुंब फार सुखी व आनंदी दिसलें.

नंतर त्यांनीं आपल्या नोकरचाकर वगैरे लोकांचा अनुभव सांगितला. "आह्मी हिंदुस्तानांत असतांना तिकडील लोक वाईट ह्मणून हे नेहमीं कुरकुरत असत; परंतु इकडील नोकरहि फार त्रासदायक

असतात. अमुक एक तासच काम करावयाचें, अधिक करावयाचें नाहीं; सकाळीं सात वाजल्याशिवाय उठावयाचेंच नाहीं, मग तुमच्या घरीं पाहुणे आले असोत, कीं कांहीं असो, यांची वेळ चुकावयाची नाहीं ! सध्या आह्मांला अशी वाईट स्वयंपाकीण मिळाली आहे, कीं, कांहीं सांगतां येत नाहीं ! तिला कांहीं सांगावयाला गेलें, कीं, ती उद्धटपणानें उत्तरें देते. मीं तिला सांगितलें, कीं, ज्याअर्थी तुझ्याशीं मी चांगल्या रीतीनें बोलतें व चांगल्या तऱ्हेनें वागतें, त्याअर्थी तूंहि मला चांगलीं उत्तरें द्यावीं व चांगलें वागावें ! पण याचा तिच्या मनावर मुळींसुद्धां परिणाम होत नाहीं. उलट दिवसेंदिवस ती जास्तच करते ! पण करावयाचें काय ! इकडे या लहानशा खेड्यांत यावयाला कोणी कबूल नाहीं. ह्मणून यांनां अशाच वागवून घ्याव्या लागतात. ”

या वेळीं आह्मी दोघीच असल्यामुळें घरगुती बाबतींतच बोलत होतों. ती अगदीं संध्याकाळची वेळ असल्यामुळें चांगला थंड वारा वहात होता. डोंगरावरील हिरवीगार शोभा, त्यांतून नागमोडीनें वहाणारा ऐला नदीचा प्रवाह इत्यादि पाहून मन रमत होतें. अशा प्रकारचा आल्हाद-कारक देखावा पहात, गोष्टी बोलतबोलत आह्मी संध्याकाळपर्यंत फिरलों व नंतर घरीं परत आलों, तोंच चारलीबाबा व त्याचे दोन सोबती नदीवर मासे धरण्याला गेले होते, तेहि परत आले. त्याच्या एका सोब-त्याचा पाय नदींत उड्या मारतांना लचकला होता. त्याला चारलीनें व दुसऱ्यानें धरून घरीं आणलें. मग लेडी फ्रेजरनीं त्याच्या पायाला पट्टया वगैरे बांधून त्याला दुसऱ्या खोलींत निजवलें, व मोटार पाठवून दुसऱ्या गांवाहून डॉक्टरला आणविलें. त्यांनीं औषधोपचार केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उपाहारानंतर सर अॅन्ड्रू बरोबर मोटारनें ग्लेनशी, ब्लेमार व ब्लेरगोरी या गांवीं गेलों. रस्त्यांत कांहीं जुने किल्ले पाहिले. ब्लेरगोरी येथें आमचे जुने मित्र डॉक्टर व मिसेस रिव्ही यांची भेट घेतली, व दुपारीं दोन वाजतां घरीं परत आलों. चार वाजतां सर

अँड्रू व लेडी फ्रेजर यांनीं कांहीं मित्र मंडळी चहाला बोलविली होती. चहानंतर क्रोके व बॉलस वगैरे खेळ झाले. अशा प्रकारें ही लहानशी गार्डन् पार्टी चांगली झाली. लेडी फ्रेजर यांचा बगीचा लहानसाच, पण टुमदार होता. एका भागांत भाजीपाला लावला होता. त्यांत वाटाण्याच्या शेंगा, कोबी इत्यादि जिन्नस होते. सकाळीं लेडी फ्रेजर व मी लहानलहान टोपल्या घेऊन वाटाण्याच्या शेंगा, फुलें इत्यादि तोडून आणीत असूं. तेथील आमचे चारपांच दिवस फार आनंदांत गेले.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं लेडी फ्रेजरबरोबर मोटारनें डंडी येथें गेलों. डंडी हें गांव या भागांत बरेंच मोठें आहे. येथें चांगलीं दुकानें व गिरण्याहि आहेत. लेडी फ्रेजर तेथेंच राहिल्या, व मॉनिफिथ येथें जाण्याला आह्मांला आपली मोटार दिली.

मॉनिफिथ हें गांव डंडीपासून पांच मैलांवर आहे. तेथें आह्मी आमचे मित्र मिस्टर व मिसेस निकल यांच्या आमंत्रणावरून तीनचार दिवस रहाण्याकरितां गेलों. आह्मांला तेथें पोहोंचवून मोटार लेडी फ्रेजरकडे परत गेली.

## मॉनिफिथ.

मिस्टर जॉन निकल हे बरींच वर्षें कलकत्याला तीनचार ज्युट फॅक्टरींचे जनरल मॅनेजर होते, व आतां अलीकडे ते मॉनिफिथ येथें घर बांधून सुखवस्तू ह्मणून रहात असत. १९०८ मध्यें हे इंडिअन फॅक्टरी लेबर कमिशनचे मेंबर होते, व तेव्हांपासून मिस्टर व मिसेस निकल यांची व आमची चांगली ओळख झाली. आह्मी त्यांच्या घरीं पोहोंचलों तेव्हां मिस्टर निकल यांनीं पुढें येऊन आमचें स्वागत केलें, व आह्मांला घरांत घेऊन गेले. मिसेस निकल या थोड्या आजारी असल्यामुळें बाहेर आल्या नाहींत. मिस्टर निकल यांचें घर फारच उत्तम व सोयीवार बांधलें आहे. भोंवतालीं फारच कुशलतेनें बगीचा थाटला आहे, जागजागीं बसण्याकरितां उत्तम लतामंडप केले आहेत, व नानाप्रकारच्या

आकृतींत नानाप्रकारच्या फुलझाडांचे ताटवे लावले आहेत. समुद्रकिनारा घरालगतच असल्यामुळें, माडीवरील खिडकींतून समुद्राची शोभा व लाटांचे उठणारे तरंगांमागून तरंग, व शेवटीं धक्क्याला आपटून होणारा राक्षसी आवाज व त्याबरोबरच निघणारा फेंस इत्यादि चित्ताल्हादक देखावा दिसे. संध्याकाळीं जेवणाच्या वेळीं मिसेस निकल यांनां बरें वाटलें, ह्मणून त्या खोलीबाहेर येऊन ड्राइंगरूममध्यें आह्मांला भेटल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिस्टर निकल यांनीं आपल्या मोटारमधून आह्मांला फिरावयाला नेलें. कारनोष्टी या गांवीं मिस्टर व मिसेस व्हिटन यांची भेट झाली. मिस्टर व्हिटन हे पुष्कळ काळपर्यंत नागपूर येथें हिसलाप कॉलेजचे मुख्याध्यापक होते. यांचेंहि घर फार चांगलें आहे. वृद्ध मिसेस व्हिटन यांनीं आमचें फार आदरातिथ्य केलें. संध्याकाळीं मिस्टर व मिसेस डगलस हे येऊन भेटले. हे नागपुराला रेव्हरंड आहेत.

तारीख २४ रोजीं सर ॲलेक्झांडर मॅकराबर्ट आपल्या नूतन पत्नी-सहित मिस्टर व मिसेस निकल यांच्याकडे आले. ते मोटारनें दुसऱ्या गांवीं जात असतांना वाटेंत लंच घेण्याला मिस्टर निकल यांच्याकडे उतरले. त्यांची व आमची फॅक्टरी कमिशनमधलीच ओळख होती. त्यांनींहि आह्मांला कांहीं दिवस घरीं रहाण्याला बोलावलें; पण आह्मांला वेळ नसल्यामुळें त्यांचें आमंत्रण मान्य करितां आलें नाहीं. त्यांची अनायासेंच भेट झाली. त्यांच्याबरोबर एक तरुण बाई होती. सर ॲलेक्झांडर मॅकराबर्ट हे फार विनोदी व गमती स्वभावाचे आहेत. सुदैवानें त्यांनां पत्नीहि फार चांगली मिळाली आहे. त्यांची पहिली बायको मरण पावल्याला बरींच वर्षें झालीं. त्यांनीं बराच काळ विधुरास्थेंत घालविला. जेव्हां आह्मी फॅक्टरी कमिशनवर फिरत होतों, तेव्हां ते नेहमीं आपल्या मृत पत्नीची आठवण काढीत असत, व नेहमीं सद्गदित होत. त्यांनां आतां द्वितीय पत्नीसह आनंदांत पाहून आह्मांला

आनंद झाला. लंचच्या वेळीं त्यांनीं खूप मौजेच्या गोष्टी सांगून आह्मांला फार हंसविलें. त्यांच्याबरोबर असलेली ती तरुण मुलगी—त्यांची मैत्रीण फार हुषार व चुणचुणीत मुलगी दिसली. ती सर अॅलेक्झांडर यांनां बोलण्यांत हार जात नसे. लंच झाल्यावर आह्मी सर्व थोडा वेळ बागेंत फिरलों. नंतर लवकरच सर अॅलेक्झांडर व लेडी मॅकराबर्ट जाण्याला निघाले. ते आपल्या पत्नीकडे पाहून ह्मणाले " आतां मोटारची फार काळजी घ्यावी लागते ! कारण हा व्हॅल्यूएबल कारगो, मोटरमध्यें असतो ! मी एकटा होतों, तेव्हां कांहीं काळजी नव्हती !"

त्यांच्या या विनोदी भाषणानें आह्मां सर्वांनां हंसूं आलें. लवकरच ते आपला 'व्हॅल्यूएबल कारगो' मोटारमध्यें घेऊन निघून गेले !

दुपारीं लेडी बॅक्सटर यांच्याकडून टेलिफोनमधून आह्मां सर्वांनां जेवण्याचें आमंत्रण आलें. त्याप्रमाणें मिस्टर निकल व आह्मी दोघे मोटारनें सर जॉर्ज व लेडी बॅक्सटर यांच्याकडे इनव्हरायटी गांवीं गेलों. हें गांव मॉनिफिथपासून एक मैल लांब आहे. मिसेस निकल यांची प्रकृति चांगली नसल्यामुळें त्या आल्या नाहींत. लेडी बॅक्सटरचे आईबाप जनरल व मिसेस फगन हेहि या वेळीं येथें आले होते. ह्मणून त्यांचीहि पुनः भेट झाली. लेडी बॅक्सटर या आपल्या आईबापांबरोबर संबलपुराला आपल्या भावाकडे आल्या होत्या. त्यांचे भाऊ मिस्टर फगन हे तेथें पोलिस सुपरिंटेंडंट होते. त्या वेळीं आह्मी तेथें होतों, हें मागें लिहिलेंच आहे. तेव्हांपासून लेडी बॅक्सटरची व आमची चांगली ओळख झाली. सर जॉर्ज बॅक्स्टर हे डंडी येथील प्रमुख व्यापारी असून कांझरवेटिव्ह पक्षाचे वजनदार पाठिंबे आहेत. सर जॉर्ज व लेडी बॅक्सटर हीं उभयतां फार चांगल्या स्वभावाचीं आहेत. जेवणानंतर कांहीं वेळ बसून मग आह्मी ११ वाजण्याच्या सुमाराला मॉनिफिथ येथें परतलों.

दुसऱ्या दिवशीं मिसेस निकलनें आह्मांला लांबच्या मोटारड्राइव्हला नेलें. वाटेनें स्कॉटलंडचा पुष्कळ सुंदर भाग व शेतें, बागबगीचे वगैरे

पहाण्यांत आले. जागजागीं पुष्कळ लोक—कोणी पिकनिकला जात होते, तर कोणी गोल्फ खेळायला जात होते. कित्येक हिरव्यागार लॅानवर टेनिस खेळत होते. अशा प्रकारें हा सर्व देखावा पाहून मन किंचित् काळ रमून जाई. दुपारीं २ वाजतां एका रमणीय बागेंतील सुंदर हॉटेलांत लंच घेण्याला थांबलों. गोल्फ व टेनिस वगैरे खेळणाऱ्या लोकांची येथें लंचकरितां पुष्कळच गर्दी झाली होती. या खेळाडू बाया खेळण्याच्या ड्रेसमध्यें फारच सुंदर दिसत होत्या. त्यांच्या सर्व गोष्टी कोणीं कसा जय मिळविला, कोणीं किती स्ट्रोक्स केले वगैरे खेळा-बद्दलच्याच होत्या. या गोष्टींनीं डायनिंग हॉल अगदीं दणदणून गेला होता. आह्मी लंच घेतल्यावर थोडी विश्रांति घेऊन पुनः निघालों, व चार वाजतां डंडी येथें पोहोंचलों. तेथें डी. एम. ब्राऊनच्या स्टोरमध्यें मिसेस निकलनें आह्मांला चहा दिला. संध्याकाळीं आह्मी मॉनिफिथला परत आलों. मिसेस निकल ह्मणाल्या "मिसेस चिटणवीस, तुह्मी आतां फार थकलां असाल. कारण मी तुह्मांला आज सबंध दिवस फिरविलें आहे. कारितां तुह्मी आपल्या खोलींत जाऊन जेवणाच्या वेळे-पर्यंत विश्रांति घ्या. कांहीं हवें असेल तर नोकरबाईला सांगा".

मिसेस निकलच्या घरांतील आह्मांला दिलेली खोली राजविलासी वस्तूंनीं सुसज्जित होती, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं! खोली मोठी व प्रशस्त असून तिला तीन खिडक्या होत्या. खिडकींतून बागेची शोभा दिसे. खोलींत पलंग, खुर्च्या, कोचें, आरसे, बिछाने वगैरे सामान मौल्यवान असून अगदीं स्वच्छ व कोरें होतें. आर-शाच्या पुढें टॉयलेटचें सर्व सामान चांदीचें होतें. तोंड व हात धुण्या-करितां गरम पाण्याचा व थंड पाण्याचा असे दोन्ही नळ रात्रंदिवस तयार असत. एकंदरींत सर्वच व्यवस्था उत्तम होती.

मिस्टर निकल हे स्वतः रोज सर्व व्यवस्था झाली आहे कीं नाहीं तें पहात, व नसल्यास लगेच नोकरलोकांकडून करवीत. त्यांच्या तीन

मोटारस होत्या. त्या ते आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं स्वच्छ करवीत. बगीच्याचें कामहि स्वतःच पहात.

तारीख २६ रोजीं सकाळीं आह्मी दोघें पायींच फिरावयाला गेलों. मॉनिफिथ येथील कांहीं दुकानें पाहिलीं, व कांहीं वस्तु खरेदी केल्या. मिसेस निकल यांच्या मुलांकरितां कांहीं खेळणीं घेतलीं. त्यांनां दोन वर्षांचा एक मुलगा होता; पण घरांत तो आहे कीं नाहीं, हें सुद्धां आह्मांला समजत नसे. तो नेहमीं आपल्या नर्सरीमध्यें नर्सजवळ रहात असे, व नेमल्या वेळीं मात्र त्याला आईकडे थोडा वेळ ती नर्स आणीत असे. थोडा वेळ इकडेतिकडे फिरून आह्मी घरीं आलों. त्या वेळीं मिस्टर व मिसेस निकल हीं कपडे करून बागेंत फिरत होतीं. मिसेस निकल मला ह्मणाल्या "मिसेस चिटणवीस, आह्मी आपल्या घराचें नांव 'नीगनागड' ठेविलें आहे. कारण आमचें घर बरेंच उंच आहे, व माझ्या नवऱ्याला हिंदुस्तानी नांव देणें आवडलें."

उपाहार केल्यावर आह्मी मॉनिफिथहून निघालों व डंडी येथील टेब्रिज स्टेशनवरून दहांच्या गाडींत बसलों. मिस्टर निकल हे आह्मांला स्टेशनपर्यंत पोहोंचवावयाला आले होते.

## एडिंबरो.

तारीख २६ आगष्ट रोजीं दुपारीं एडिंबरोला आलों व रॉयल हॉटेलमध्यें उतरलों. लवकरच मिसेस फ्लेमिंग यांच्या भेटीला गेलों. यांनां मिसेस रिव्हीनें इंट्रोडक्शन दिलें होतें. यांचे एक चिरंजीव मेजर फ्लेमिंग हे इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें असून आह्मी रायपुरला असतांना ते सिव्हिल सर्जन होते. मिसेस व मिस फ्लेमिंग आह्मी गेलों तेव्हां घरींच होत्या. त्यांनीं आमचें स्वागत करून आह्मांला ड्राइंगरूममध्यें नेऊन बसविलें, व रायपुरला गार्डन पार्ट्या, हॉकी मॅच, जिमखाना इत्यादि ग्रूप घेतले होते त्या तसबिरी दाखविल्या. त्यांच्या मुलानें त्या सर्वांची एकएक प्रत आपल्या आईला पाठविली होती. मिसेस फ्लेमिंग ह्मणाल्या "मिसेस

चिटणवीस, आह्मीं तुह्माला जरी प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें, तरी पहा तुमच्या किती तसबिरी आह्मांजवळ आहेत!"

मग त्यांच्याबरोबर चहा घेऊन आह्मी निघालों. त्या वेळीं त्यांनीं 'तारीख २८ रोजीं लंचला या,' ह्मणून आह्मांला आग्रहानें आमंत्रण दिलें.

संध्याकाळीं रा. ब. पंडित हे स्ट्रेथपेफरहून आले व आमच्या शेजारींच रॉयल हॉटेलमध्यें उतरले. तारीख २७ ला सकाळीं आह्मी पब्लिक कोचनें रासलीन कॅसल पहावयाला गेलों. हा जुना किल्ला एडिंबरोपासून सात मैलांवर आहे. तेथें कोचनें किंवा ट्रेननें जातां येतें. वाटेंत बऱ्याच मनोरंजक व ऐतिहासिक गोष्टी—वस्तु नजरेला पडतात. ईशान्य दिशेला क्रेगमिलर कॅसल दिसतो. तेथें क्वीन मेरीला कैद करून ठेविलें होतें, असें सांगतात, व प्रेक्षकांनां तिच्या निजण्याची खोलीहि दाखवितात. गिलमरटन येथें एक सुंदर दरी आहे. तिच्यासंबंधीं बऱ्याच कवींनीं आपल्या लेखांत उल्लेख केला आहे. रासलीन गांवांत एक फार जुनी इन आहे, तीहि प्रेक्षकांनां दाखवितात. तेथें प्रसिद्ध पुरुष जॉन्सन, बॉसवेल, बर्नर इत्यादि रहात होते. रासलीन कॅसलमध्यें जातांना रासलीन ग्लेनचा सुंदर देखावा दृष्टीला पडतो. हा किल्ला सिंक्लेर कुटुंबाच्या ताब्यांत बरींच वर्षें होता. समोरील भाग सर विलियम सिंक्लेर यांच्या वेळीं बांधला गेला. येथील बागेंत एक यू जातीचें झाड आहे, तें सातशें वर्षांचें जुनें आहे. त्याच्या फांद्यांचे तिरकमठे येथील जुने लोक करीत असत. कॅसलला लागूनच एक चॅपेल आहे. त्यांतील मुख्य पिलरला 'प्रेंटिएस्ट पिलर' असें ह्मणतात. हा फार प्रेक्षणीय आहे. त्याची अशी आख्यायिका सांगतात, कीं, एका नामांकित कारागिराला रोम येथील चॅपेलमध्यें जसा पिलर होता तसा येथें तयार करण्याला सांगितला; परंतु कारागीर ह्मणाला "मी रोमला जाऊन तो पिलर पाहून येईन आणि मग

तसा तयार करीन." तो कारागीर रोमला गेला; परंतु इकडे त्याच्या एका हुषार शिष्यानें आपला गुरु रोमहून परत येण्याच्या आधींच पिलर तयार केला. तें पाहून त्या कारागिरानें द्वेषानें त्याचा खून केला.

सन १५४४ मध्यें हा किल्ला इंग्लिश सैन्यानें जाळला होता. त्याच्या खुणा अद्याप कांहीं दगडांवर दिसतात. येथें स्कॉच लोकांनीं इंग्लिशांवर एका दिवसांत तीन वेळ जय मिळविला.

तारीख २८ रोजीं सकाळीं आह्मी एडिंबरो कॅसल पहाण्याला गेलों. हा रॉयल हॉटेलच्या अगदीं समोरच आहे. बऱ्याच पायऱ्या चढून वर जावें लागतें. वर गेल्यावर प्रथम एक खोली लागते. तेथें स्काटलंडच्या राजाचे अलंकार ठेवले आहेत. त्यांत ब्रूसचा राजमुकुटहि आहे. बाजूच्या खोलीमध्यें दुसऱ्या जेम्सच्या वेळीं तयार केलेली 'मानस मेग' नांवाची मोठी तोफ आहे. आणखी एक खोली दाखवितात, तींत सहावा जेम्स् जन्मला असें सांगतात. एकीकडे आरगाइल टॉवर आहे, त्यांत राजकीय कैदी ठेवीत असत. या टॉवरच्या जवळच आरमरी आहे. त्यांत स्काटलंडचीं जुनीं शस्त्रें व चिलखतें वगैरे युद्धोपयोगी सामान आहे. या किल्ल्यावरून सर्व एडिंबरो शहर दिसतें, व पुष्कळ लांबपर्यंतचा प्रदेश दिसतो.

दुपारीं मिसेस फ्लेमिंगकडे लंचला गेलों. त्यांनीं आणखीहि कांहीं मित्र मंडळी लंचला बोलावली होती. लंचनंतर त्यांनीं आह्मांला आपल्या घोड्याच्या गाडींतून फिरावयाला नेलें व एडिंबरोचा कांहीं प्रसिद्ध भाग दाखविला. एकंदरींत एडिंबरो शहराची रचना फार सुरेख दिसली. तेथील हवा नेहमींच चांगली असते.

तारीख २९ आगष्ट रोजीं सकाळीं आह्मी नवांच्या गाडीनें निघालों व त्याच दिवशीं संध्याकाळीं लंडन येथें परत आलों.

प्रकरण नववें.

# लंडनहून हिंदुस्तान.

या वेळीं लंडन येथें आह्मी सेंट आरमिन हॉटेलमध्यें राहिलों होतों. येथें बरेच इंडियनूस होते. विशेषत: पारशी मंडळी बरीच होती. आह्मांला ४।५ दिवसांतच स्वदेशीं जावयाचें असल्यामुळें सामान वगैरे खरेदी करण्यांत आणि मित्रमंडळीचे निरोप घेण्यांत तो काळ फारच गडबडींत व घाईत गेला. आतां पुन: इंग्लिश नाटकें क्वचित्‌च पहावयाला मिळतील, ह्मणून दर रात्रीं निरनिराळ्या कंपन्यांचीं निरनिराळीं नाटकें पाहिलीं. जाण्याचा दिवस जसजसा जवळ येऊं लागला, तसतशी मनाची उत्कंठा फारच वाढूं लागली. केव्हां एकदां स्वदेशच्या किनाऱ्यावर पाय ठेवूं, आप्तइष्टांनां केव्हां भेटूं, इत्यादि मनोविकारांनीं अंत:करणांत खळबळ करून सोडली होती. वासुदेवराव व हे नेहमीं पुढीलप्रमाणें भाषणें करून मला चिडवीत. "आपणाला कांहीं आणखी चारसहा महिने यूरोप सोडावयाचें नाहीं! कारण, इतकी थंड हवा, उत्तम पाचक पाणी, सात्त्विक अन्न, शहरांतील नयनमनोहर प्रासादभुवनें, त्यांत असलेल्या आल्हादमय सोयी, रमणीय देखावे, मनोरंजक नाटकें व तल्लीन करणारे सीनूस इत्यादिपैकीं एक तरी आपल्या हिंदुस्तानांत आहे काय? अर्थात् हें सर्व आपल्याला कांहीं पोट भरून पहावयाला सांपडलें नाहीं, तेव्हां आपण आणखी सुट्टी वाढवणार!"

"काकूंचीहि कांहीं घाई नाहीं! त्याहि हिंदुस्तानांत लवकर जाण्याला उत्सुक नाहींत. त्यांनांहि हें सर्व पहावयाला हवेंच आहे!" अशा प्रकारें बोलून वासुदेवराव त्यांनां पुष्टि देत.

मग मी त्यावर ह्मणे "मी आतां मुळींच रहावयाची नाहीं! इकडे रहावयाचें असल्यास खुशाल रहावें. मी एकटीच स्वदेशीं जाणार. या यूरोपियन बायका नाहीं का एकट्या प्रवास करीत? एवढी कांहीं

यूरोपची स्तुति करायला नको. हिंदुस्तानांतील हवापाण्याबद्दल मीं स्तुति करण्यापेक्षां परदेशीयांनींच केली आहे, व तें आपण जाणतांच. कविकल्पनांनीं कल्पिलेली व चित्रकारांनीं दृश्य केलेली सीनरी पहाण्यापेक्षां हिंदुस्तानांतील पावलोपावलीं दिसणारें नैसर्गिक सौंदर्य शेंकडों पटीनें अधिक सुंदर आहे. इकडील बबरजीनें शिजविलेल्या सात्विक अन्नापेक्षां आमचें रुचकर आणि पचनाला हलकें असें अन्न किती तरी उत्तम असतें. या ऐदी बनविणाऱ्या सोयींपेक्षां सहजीं होणाऱ्या व्यायामाची–श्रमांची योग्यता जास्त आहे. इत्यादि गोष्टी काय इकडे समजत नाहींत, असें नाहीं; पण उगीच माणसाला चिडवायचें झालें !"

तारीख ६ सप्टेंबर १९११ रोजीं सकाळीं आह्मीं लंडन सोडलें, व डोव्हरवरून संध्याकाळीं पॅरिसला पोहोंचलों.

## पॅरिस.

येथें साधारण हॉटेलमध्येंच आह्मी उतरलों. जेवणानंतर एक भाड्याची मोटार करून तीनचार तास पॅरिसचा चांगला भाग पाहिला. पंडित त्या ड्रायव्हरला फ्रेंचमध्यें पॅरिसची माहिती वगैरे विचारीत होते. आह्मांला फ्रेंचचा एक शब्दहि समजत नव्हता. विजेच्या दिव्यांत लखलखणारें शहर सुंदर दिसत होतें. तेथील सर्व रचना कांहीं वेगळीच दिसत होती. लंडनशीं तुलना करतांना सर्वच निराळें दिसे. रस्ते रुंद व प्रशस्त होते. दोन्ही बाजूंनां लोक कॉफी पीत बसले होते. रस्त्यांतील दिव्यांची रचना निराळीच होती. घरांची बांधणी फार वेगळी भासली. बगीचे मोठे असून त्यांत जागजागीं मनोरम सुंदर कारंजीं उडत होतीं. एकंदरींत पॅरिस शहर फारच रम्य व मनोहर आहे. या वेळीं आह्मी येथें एकच रात्र राहिलों; परंतु पूर्वीं आलों होतों, तेव्हां दोन आठवडे राहिलों होतों, व तेव्हां बहुतेक सर्व पॅरिस पाहिलें होतें.

दुसऱ्या दिवशीं लंच घेऊन एक वाजतां पॅरिसहून निघालों. ट्रेन-मध्यें फार गर्दी होती; परंतु एक लहान कंपार्टमेंट आह्मीं चवघें मिळून रिझर्व केला होता. या वेळीं आमच्याबरोबर आणखी एक हिंदुस्तानी गृहस्थ होते. या वेळीं उष्णता फार असल्यामुळें प्रवास फार त्रासदायक झाला. मध्यरात्रीच्या सुमाराला आह्मी आपल्या हँडबॅगवर डोकीं टेंकून झोंप यावी ह्मणून पडलों होतों. पंडित पुष्कळ वेळापासून एक पुस्तक वाचीत होते, तेहि आतां कंटाळून पुस्तक खालीं टाकून स्वस्थ पडले होते. इतक्यांत एका मोठ्या स्टेशनवर गाडी थांबली. पुष्कळच गडबड होऊं लागली, त्यावरून पुष्कळ मंडळी बसण्याकरितां आली असावी. इतक्यांत आमच्या कंपार्टमेंटमध्यें दोनतीन बाया शिरल्या. आह्मांला निजलेलीं पाहून त्यांचें पित्त खवळलें. त्या ह्मणाल्या "पहा हे कसे निग्रोज निजले आहेत !" लगेच पुनः ह्मणाल्या "Mean Indian !" असें ह्मणून फणकऱ्यानें त्या निघून गेल्या. वासुदेवराव जागेच होते. मीं त्यांनां ह्मटलें "काय हो वासुदेवराव, ती बाई काय बोलली ऐकलें का ? मी तिला उत्तर देणार होतें; पण ती निघूनच गेली. बिचारीला बसा-यला जागा मिळाली नसेल, ह्मणून तिचा संताप झाला असावा.

एक दिवस एक रात्र गाडीमध्यें काढून सकाळीं आह्मी मारसेल्सला पोहोंचलों. मारसेल्स पूर्वीं पाहिलें होतें ह्मणून आह्मी गांवांत गेलों नाहीं; थेट बंदरावरच गेलों. तेथें आरेबीया बोट उभीच होती.

प्रकरण दहावें.

## आरेबिया बोट.

बोट अगदीं धक्क्याशीं उभी असल्यामुळें, पॅसेंजर लोकांना येण्या-जाण्याकरितां मोठमोठे लांकडी जिनें लाविले होते. आह्मी तडक आमच्या नंबरच्या कॅबिनमध्यें गेलों. तेथें स्टुअर्डनें आमचें सामान नीट लावून ठेवलें होतें. कॅबिन लहानच दोन बिछान्यांची होती. आंत इलेक्ट्रिक फॅन होता, ह्मणून इतकी उष्णता भासत नव्हती. मग आह्मी स्नान वगैरे करून डेकवर गेलों. या वेळीं हिंदुस्तानला जाणाऱ्या लोकांची पुष्कळच गर्दी होती. त्यांत हिंदुस्तानी लोकांची संख्या बरीच होती. राजपिंपळ्याचे महाराज व त्यांचे कांहीं आश्रित होते. कांहीं मोत्यांचे गुजराथी व्यापारी लोक पॅरिसहून आले होते. आठदहा पार्शी पुरुष होते. कांहीं मुंबईचे मुसलमान व्यापारी होते. एक पंडितजी नांवाचा कनोजी ब्राह्मण होता. तो मांस वगैरे खात नसे, ह्मणून त्याची जेवणाची फारच पंचाईत होई. तो शिरा, चपात्या, उकड-लेल्या भाज्या वगैरे खाई. तो सेकंड क्लास पॅसेंजर होता; पण सेकंड क्लासमध्यें जागा नव्हती ह्मणून हा थोड्या दिवसांकरितां फर्स्ट क्लासमध्यें आला होता. ५।६ दिवसांनीं जागा झाली, तेव्हां तो तिकडे गेला. पारशी मंडळींनीं एक वेगळें टेबल केलें होतें, व दुसऱ्या टेबलावर आह्मी, गुजराती, मुसलमान, परदेशी इत्यादि बसत असूं. पारशी मंडळींत सर दिनशा पिटीट हे होते.

मारसेल्सहून बोट दहा वाजतां निघाली. नेहमींप्रमाणें बोटीवर नाच, खेळ वगैरे चालले होतेच. इंडिअन मंडळी मात्र नेहमीं ब्रीजच खेळत. दुसऱ्या खेळांत भाग घेत नसत.

रेड सीमध्यें बोट आल्यावर फारच उकाडा भासूं लागला. त्यामुळें तीनचार दिवस मोठे कठिण गेले. वारा मुळींच नव्हता. डेकवर, डायनिंग

रूममध्यें, ड्राइंगरूममध्यें, कोठेंच चैन पडेना. एडन ओलांडल्यावर थंड वारा वाहूं लागला, व मग पुष्कळच बरें वाटूं लागलें.

तारीख २२ सपटेंबर १९११ रोजीं सकाळीं आठ वाजतां बोट मुंबईच्या बंदरांत येऊन पोहोंचली, त्या वेळीं आह्मांला झालेला आनंद अवर्णनीय होय! मीं मनांतल्या मनांत देवाचे किती तरी आभार मानले. एवढ्या मोठ्या लांबच्या बिकट प्रवासांतून त्यानें आह्मांला निर्विघ्नपणें स्वदेशीं परत आणलें, ही त्याची केवढी कृपा! दूरच्या परकीय प्रदेशांत किंवा प्रवासांत आह्मांला कोठेंहि ह्मणण्यासारखा त्रास झाला नाहीं, अथवा कांहीं अपघात किंवा नुकसानहि झालें नाहीं. खरें पाहिलें असतां आमच्याबरोबर आह्मां दोघांशिवाय कोणी मित्र अथवा नोकरचाकर कोणीच नव्हतें. जी कांहीं मित्रमंडळी भेटली, ती सर्व लंडनमध्येंच.

ब्रेकफास्ट घेऊन सर्व पॅसेंजर लोकांबरोबर लहान बोटीनें आह्मी अपोलो बंदरावर उतरलों. या ठिकाणीं आमची आप्तमंडळी, स्नेही वगैरे आमच्या भेटीकरितां बराच वेळ वाट पहात होतीं. त्यांत आमचे मित्र खारकर हे हारगजरे घेऊन आले होते. नागपूरचे श्रीमंत छोटे राजेसाहेब, कुवर लक्ष्मणराव भोंसले यांनींहि बंदरावर येऊन आपल्या भेटीचा सन्मान आह्मांला दिला. अशा प्रकारें मुंबईला पोहोंचल्यावर आह्मीं तारीख २६ फेब्रुवारी १९११ रोजीं सुरू केलेल्या प्रवासाचा ता. २२ सपटेंबर १९११ रोजीं शेवट झाला.

ईश्वराच्या कृपेनें आह्मी मुंबईला सुखरूपपणें येऊन पोहोंचलों, याबद्दल पुनः त्याची अनन्यभावें करुणा भाकून, आह्मीं केलेल्या जगाच्या प्रवासाचें माझ्या अल्पमतीप्रमाणें हें शब्दचित्र पुरें करून मी लेखणी खालीं ठेवतें.